श्री. ज. स. करंदीकर

यांचे

# निवडक लेख व निबंध

( खंड २ रा )

प्रकाशक

**आत्माराम रावजी भट,** एम्. कॉम्.,

संयोजक, ज. स. करंदीकर-सन्मान-निधि;

केसरी कार्यालय, पुणें २.

शके १८७३; सन १९५१

मूल्य ६ रुपये

ग 32८

श्री. ज. स. करंदीकर

यांचे

# निवडक लेख व निबंध

( खंड २ रा )

G. P. LIBRARY
BHOR.

प्रकाशक

**आत्माराम रावजी भट,** एम्. कॉम्.,
संयोजक, ज. स. करंदीकर-सन्मान-निधि;
केसरी कार्यालय, पुणें २.

शके १८७३; सन १९५१

मूल्य ६ रुपये

मुद्रक :

आ. रा. भट, एम्. कॉम.,
केसरी मुद्रणालय,
५६८ नारायण पेठ,
केळकर रस्ता, पुणें २

सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन.

4 SEP 1996

# अनुक्रमणिका

4 SEP 1996

## प्रस्तावना


१ सविनय निवेदन ... ... ... ... ... ५
२ लेखसंग्रहाचा दुसरा हप्ता ... ... ... ... ८


## ऐतिहासिक विवेचन


१ अमेरिकेंतील अध्यक्षांची निवड ... ... ... ... १
२ पेशवाई जाऊन शंभर वर्षें झालीं ... ... ... ... ११
३ शहाजी व शिवाजी ... ... ... ... ... १९
४ स्वराज्यसंस्थापक श्रीशिवछत्रपतींचें पुण्यस्मरण ... ... २७
५ श्रीशिवाजीमहाराज युगप्रवर्तक नव्हत काय ? ... ... ३७
६ श्रीशिवरायाची त्रिशतसांवत्सरिक जयंती ... ... ... ४५
७ शंभर वर्षांपूर्वीचा पारीसचा पराक्रम ... ... ... ५०
८ फसलेल्या डावापासून घ्यावयाचा बोध ... ... ... ५५
९ वसईचा संग्राम धार्मिक का राजकीय ... ... ... ६३
१० हा घ्या चिमाजीअप्पांच्या हातचा पुरावा ... ... ... ७०
११ विघ्नांच्या कचाटींतून हस्तगत केलेलें यश ... ... ... ७९
१२ मध्यभारताचीं राजकीय स्थित्यंतरें ... ... ... ९५


## संमिश्र विभाग


१ जुलमाच्या डोलाऱ्यावर कळस ... ... ... ... १०५
२ मुसलमान पुढाऱ्यांच्या अराष्ट्रीय आकांक्षा ... ... ... १११
३ सिंधी हिंदूंचा छळ आणि हिंदूंच्या कर्तृत्वाची कसोटी ... ... ११६
४ मतस्वातंत्र्याची गळचेपी ... ... ... ... १२१
५ या अनुनयाला आळा घाला ... ... ... ... १२५
६ भारतीय राज्यघटनेंतील कांहीं खांचखळगे ... ... ... १३०
७ निराळा पक्ष न काढतां हिंदुसभाच बळकट करा ... ... १४२


## धर्म व तत्त्वज्ञान


१ श्रीसमर्थांचें राजकारण ( लेखांक १ ते ४ ) ... ... ... १४८
२ श्री. फाटक यांच्या 'श्रीसमर्थचरित्रा'चा परामर्श ... ... १६८
३ सिद्धावस्था व व्यवहार प्रकरण पुनः एकदां वाचा ... ... १९१
४ हा भगवद्गीतेचा निष्कर्ष नव्हे ... ... ... ... २०१

५ सत्यासत्य-हिंसाऽहिंसा-विवेक ... ... ... ... २०४
६ कर्मयोगाची चतुःसूत्री ... ... ... ... ... २२४
७ प्रार्थना फलदायक कशी होते ? ... ... ... ... २२९

## दिवंगतांच्या गुणांचें दिग्दर्शन

१ विचारक्रान्तीचे प्रणेते विष्णुशास्त्री चिपळूणकर ... ... २३७
२ लोकमान्यांचें धोरण व धडाडी ... ... ... ... २४८
३ 'काळ'कर्ते परांजपे यांच्यावर काळाची झडप ... ... ... २५२
४ कै. रघुनाथ पांडुरंग करंदीकर ... ... ... ... २५८
५ कै. बाबा विद्वांस यांची केसरी संस्थेंतील कामगिरी ... ... २६४
६ महाराष्ट्राचें महाभूषण गेलें ... ... ... .. २७०
७ लढवय्ये संपादक निवर्तले ... ... ... ... २७८
८ मुसलमानांतला चाणक्य गेला ... ... ... ... २८५
९ भालाकार भोपटकर गेलें ... ... ... ... २९२

## संकीर्ण विभाग

१ बृहन्महाराष्ट्र परिषद् ( झांशी ) ... ... ... ... २९४
२ पंचांगवादाचा निष्कर्ष ... ... ... ... ... ३०१
३ नरकासुराच्या कथेंतील मर्म ... ... ... ... ३०७
४ दैववाद व प्रयत्नवाद ... ... ... ... ... ३१०
५ जन्मकाल व मृत्युकाल यांचा संबंध ... ... ... ३१५
६ संस्थानिकांना कृतज्ञतापूर्वक श्रद्धांजलि ... ... ... ३२१
७ ब्राह्मणवर्गास महत्त्वाच्या सूचना ... ... ... ... ३२६

# सविनय निवेदन

G. P. LIBRARY
HOR.

केसरी-मराठा संस्थेचे विद्यमान विश्वस्त व 'केसरी'चे माजी संपादक श्री. **जनार्दन सखाराम** उपाख्य **तात्यासाहेब करंदीकर** यांच्या निवडक **लेखांचा व निबंधांचा दुसरा खंड** पुस्तकरूपानें वाचकांना सादर करीत आहें. पहिल्या खंडांत (१) महायुद्ध व परराष्ट्रीय राजकारण, (२) देशांतील राजकीय घडामोडी, (३) आर्थिक व्यवहार व (४) संपादकीय धोरण या विषयांवरील श्री. करंदीकरांचे लेख समाविष्ट करण्यांत आले होते. **प्रस्तुत खंडांत (१) इतिहास (२) धर्म व तत्त्वज्ञान (३) दिवंगतांच्या गुणांचें दिग्दर्शन** या विषयांवरील लेख व **पंचांगवाद, बृहन्महाराष्ट्र परिषद्, हिंदुसंघटन, भारतीय घटना** वगैरे विषयांवरील **स्फुट निबंध** दिले आहेत. पहिल्या खंडांत घातलेल्या लेखांच्या निवडीप्रमाणेंच या खंडांतील लेखांची निवड श्री. तात्यासाहेब करंदीकरांनीं सन्मानयोजनेच्या प्रवर्तकांच्या विनंतीवरून केली आहे. लेखांची निवड कोणत्या कारणाकरितां केली याचें स्पष्टीकरण व लेख कोणत्या संदर्भांत लिहिले त्याचीं टिपणेंहि परिश्रमपूर्वक त्यांनीं तयार करून दिलीं आहेत. याबद्दल सन्मानयोजनेचे प्रवर्तक श्री. शंकर प्रभाकर **ओगले** (म्हैसूर ग्लास अँड एनामल वर्क्स लि.), श्री. नारायण गोविंद नाईक (श्रीराम सिल्क मिल्स् लि.), गोपाळ दत्तात्रेय **आपटे**, ऑडिटर, श्री. रामकृष्ण गोविंद **कुलकर्णी** (सदर्न निटिंग वर्क्स लि.) व मी त्यांचे आभारी आहोंत.

श्री. करंदीकरांच्या शहात्तराव्या वाढदिवसाच्या अनुषंगानें त्यांच्या पन्नास वर्षांतील सार्वजनिक सेवेबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याकरितां आंखलेली **त्रिविध सन्मान-योजना** त्यांच्या लेख-निबंधांच्या द्वितीय खंडाच्या प्रकाशनानें **पुरी होत आहे.**

(१) गतवर्षीं दि. १५ फेब्रुवारी १९५० ला '**श्री. ज. स. करंदीकर व्यापार शिष्यवृत्ति निधि**' म्हणून रु. १०,५०० ची रक्कम पुणें विद्यापीठाच्या स्वाधीन केली. त्या निधीच्या व्याजांतून इंटरमीजिएट कॉमर्स परीक्षेंत निदान दुसऱ्या वर्गांत उत्तीर्ण होऊन 'अर्थशास्त्र' या विषयांत सर्वांत अधिक गुण मिळविणाऱ्या व पुणें विद्यापीठांत बी. कॉम्.चा अभ्यासक्रम पुरा करणाऱ्या विद्यार्थ्याला सतत दोन वर्षेंपर्यंत दरमहा रु. २५ची शिष्यवृत्ति देण्याची योजना झाली आहे. ही शिष्यवृत्ति एक वर्षाआड दिली जावयाची आहे.

त्यामुळें ज्या वर्षीं शिष्यवृत्ति दिली जाईल त्याच्या पुढील वर्षीं इंटरमीजिएट कॉमर्सच्या परीक्षेस बसून 'अर्थशास्त्र' या विषयांत पहिल्या क्रमांकानें गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्याची कांहींच संभावना होत नाहीं. तरी **आणखी आवश्यक तो निधि जमा करून** ज्या वर्षीं शिष्यवृत्ति देण्याची व्यवस्था

नाहीं त्या वर्षी **'श्री. ज. स. करंदीकर व्यापार पारितोषिक' देण्याची योजना करावी,** अशी सूचना सन्माननिधीचे देणगीदार व मुंबईचे सुगंधी मालाचे सुप्रसिद्ध व्यापारी श्री. **कृष्णाजी हरि ढमढेरे** यांनीं केली आणि या जादा निधीकरितां आपल्या पहिल्या रु. १०१ च्या देणगीच्या जोडीला पुनः रु. १५१ ची देणगी पाठविली. श्री. ढमढेरे यांची सूचना स्वीकारून मी अाणखी कांहीं ऋणानुबंधी मंडळींना देणगी देण्याबद्दल विनंती केली. पूर्वीप्रमाणेंच याहि वेळीं अशा मंडळींकडून योग्य तो पाठिंबा मिळाला व **दि. १२ मार्च १९५१ ला रु. ३६०० ची रक्कम 'श्री. ज. स. करंदीकर व्यापार पारितोषिक निधि' म्हणून पुणें विद्यापीठाच्या स्वाधीन केली.** या निधीच्या व्याजांतून ज्या वर्षी 'श्री. ज. स. करंदीकर व्यापार शिष्यवृत्ति' दिली जाणार नाहीं, त्या वर्षी **'श्री. ज. स. करंदीकर व्यापार पारितोषिक'** दिलें जाईल.

( २ ) गतवर्षी दि. १५ फेब्रुवारी १९५० ला सुप्रसिद्ध चित्रकार श्री. ज. द. गोंधळेकर यांजकडून काढून घेतलेलें श्री. ज. स. करंदीकरांचें **तैलचित्र** केसरी-मराठा संस्थेला लोकमान्य टिळकांचे नातू श्री. **जयन्तराव टिळक** यांच्या हस्तें समर्पण केलें.

( ३ ) गतवर्षी श्री. करंदीकरांच्या लेख-निबंधाचा पहिला खंड प्रसिद्ध झाल्यावर त्याचें स्वागत चांगलें झालें. महामहोपाध्याय श्री. दत्तो वामन पोतदार यांनीं मला कळविलें कीं,

"श्री. ज. स. करंदीकर यांच्या 'निवडक लेख व निबंध' संग्रहावर आता अभिप्राय कशाला ? ते लेख केव्हांहि वाचनीय, मननीय व संग्रहणीय ठरतील. या लेखांइतकाच किंबहुना त्याहूनहि माझ्या आवडीच्या दृष्टीनें संकलिपत दुसरा खंड फार उपयुक्त व मोलाचा ठरेल."

श्री. पोतदारांप्रमाणेंच अनेकांच्या भावना होत्या. दुसऱ्या खंडांत कोणत्या लेखांचा समावेश व्हावा याबद्दलहि कांहीं अभ्यासू वाचकांकडून सूचना आल्या. दुसऱ्या खंडाबद्दल वाटणाऱ्या औत्सुक्याच्या त्या निदर्शक होत्या.

वस्तुतः हा खंड १५ फेब्रुवारी १९५१ ला प्रसिद्ध करण्याचा मानस होता. परंतु बाजारांत योग्य भावानें वेळेवर कागद मिळणें शक्य झालें नाहीं. तेव्हां डेक्कन पेपर मिल्सचे चालक शेठ **प्रभुदास मेहता** यांना पुस्तकाकरितां कागद देण्याची विनंती केली. ती त्यांनीं आनंदानें मान्य केली व प्रचलित बाजारभावापेक्षां कमी भावानें तो पुरविला; त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहें.

श्री. 'ज. स. करंदीकर सन्मान योजने'च्या माझ्या सहकारी प्रवर्तकांनीं आवश्यक तो निधि जमवून ती साकार करण्याची जबाबदारी मजवर सोंपवली होती; ती ऋणानुबंधीयांनीं उदार हस्तानें देणग्या दिल्यामुळेंच पुरी

होऊं शकली. साकार स्वरूपाची योजना प्रकट केल्यावर वृत्तपत्रांनीं अनेक परीनें तिचें स्वागत केलें, श्री. करंदीकरांबद्दल आदरभाव व्यक्त करणारे लेख लिहिले व त्यांच्या पन्नास वर्षांतील कामगिरीचा परिचय आपल्या वृत्तपत्रांतून करून दिला. केसरी-मराठा संस्थेच्या विश्वस्तांनीं लेख-निबंध पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्याकरितां लागणाऱ्या छपाई, जाहिरात वगैरे सोयी उपलब्ध करून दिल्या. केसरी-मराठा संस्थेच्या व्यवस्थापकीय व 'प्रूफ करेक्शन' शाखांतील व छापखान्यांतील मंडळींनीं आत्मीय भावनेनें साहाय्य केलें व अनेकांनीं प्रसिद्धीपूर्वी लेख-निबंध-पुस्तकाची किंमत पाठवून प्रकाशनाचें काम सुलभ केलें. ज्यांनीं ज्यांनीं ही सन्मान योजना साकार करण्याच्या कामीं हस्तें-परहस्तें साहाय्य केलें त्या सर्वांचा मी आभारी आहें. परमेश्वरकृपेनें हातीं घेतलेलें हें कार्य आज पुरें होत आहे म्हणून मला समाधान वाटत आहे.

लेख-निबंध-पुस्तकांच्या विक्रींतून येणारें निव्वळ उत्पन्न पारितोषिक निधींत भर घालण्याकरितां पुणें विद्यापीठाच्या स्वाधीन करण्यांत येईल.

केसरी-मराठा कार्यालय,
पुणें २

आत्माराम रावजी भट
संयोजक

# लेखसंग्रहाचा दुसरा हप्ता

दोन वर्षांपूर्वी माझ्या लेखसंग्रहाचा पहिला खंड प्रसिद्ध करण्यांत आला. आतां हा दुसरा हप्ता म्हणून सादर करण्यांत येत आहे.

**या खंडांत काय वाचाल ?**

पहिल्या खंडांत महायुद्ध, परराष्ट्रीय राजकारण, हिंदुस्थानांतील राजकीय चळवळींचीं विविध अंगें, आर्थिक व्यवहार व घडामोडी या विषयांचा प्रामुख्यें-करून समावेश करण्यांत आला होता. प्रस्तुतच्या खंडाची घडण अगदीं निराळ्या स्वरूपाची आहे. यांत चालू राजकारणावरील प्रसंगप्राप्त लेखांना प्रामुख्य न देतां ज्या लेखांना ऐतिहासिक दृष्ट्या चिरस्थायिक स्वरूप आहे असेच लेख प्रथम निवडले आहेत. त्यांत पहिला विभाग ऐतिहासिक विवेचनाचा आहे; दुसऱ्यांत हिंदुमुसलमानांतील तेढ वाढत चालल्यामुळें भावी दुष्परिणामा-संबंधानें अगाऊ इशारा देणारे लेख आहेत; तिसऱ्या विभागांत धर्म व तत्त्वज्ञान या मथळ्याखालीं श्रीसमर्थांनीं धर्मसंरक्षणार्थ राजकारण कसें केलें त्याचें विवेचन असून, राजकीय पुढारी लोकमान्य टिळक यांनीं गीतारहस्यांत जें तत्त्वज्ञान सांगितलें त्याचें स्पष्टीकरण व समर्थन करणारे लेख आहेत. चौथ्या विभागांत दिवंगतांच्या गुणांचा परिचय करून देणें हा मुख्य हेतु असून, तद्विषयक गौरवपर लेख दिले आहेत. पांचवा विभाग हा संकीर्ण स्वरूपाचा असून, त्यांत बृहन्महाराष्ट्र परिषद्, पंचांगवाद, फलज्योतिष इत्यादि अवांतर विषय आले आहेत.

पहिल्या खंडांतील सर्व लेख **'केसरी'** वृत्तपत्रांतूनच निवडले गेले होते. प्रस्तुतच्या द्वितीय खंडांतलेहि बहुतेक लेख केसरींतूनच घेतले असले, तरी कांहीं विशिष्ट लेख **'सह्याद्रि'** मासिकांतून घेतले आहेत. एक लेख **'श्रीगुरुदेव'** या मासिकाच्या प्रार्थना-तत्त्वांकांतला असून, दुसरा एक लेख **'नवभारत'** मासिकांतला आहे. फलज्योतिषावरील लेख **'ज्योतिषतत्त्वदर्शन'** या निबंधसंग्रहांतला असून, शेवटचा **'ब्राह्मण-समाजाच्या दुरवस्थे'**संबंधाचा लेख हा पुण्यांत नुकत्याच होऊन गेलेल्या ब्राह्मण संमेलनापुढें सूचनार्थ म्हणून मांडला होता. तो समग्र लेख प्रथम स्वतंत्रच छापला होता. त्यानंतर कांहीं नियतकालिकांनीं त्यांतले निवडक उतारे आपल्या नियतकालिकांतून छापले. ते उतारे अपुरेच असल्यामुळें या पुस्तकांत त्या लेखांतला प्रासंगिक व औपचारिक भाग गाळून टाकून जेवढा सूचनात्मक भाग होता तेवढा सगळा छापला आहे.

वरील निवेदनावरून वाचकांना या द्वितीय खंडांत कोणते विषय समाविष्ट केले आहेत त्याची स्थूल कल्पना येईल. अनुक्रमणिकेवरून त्यांतल्या तपशिलाचीहि

कांहीं कल्पना येईल. तथापि लेखांच्या मथळयावरून लेखांतील विचारांचें दिग्दर्शन नेहमीं होतेंच असें नाहीं. वाचकांचें चित्ताकर्षण करण्याकरितां प्रसंगानुरूप लेखांना चटकदार मथळे दिलेले असतात. असे मथळे देतांना लेखांतील विषयाचा गौप्य-स्फोट करण्याच्याऐवजीं, वाचकांची उत्सुकता वाढविण्यासाठीं प्रायः गौप्यगोपन करण्याचाच प्रयत्न असतो. याकरितां त्या त्या लेखांत कोणत्या विषयाची मुख्यतः चर्चा केलेली आहे तिचा अल्पसा परिचय करून देणें आवश्यक आहे.

## ऐतिहासिक विवेचन

या विभागांतला पहिला लेख '**अमेरिकेंतील अध्यक्षांची निवड**' हा आहे. अमेरिकेंत अध्यक्षांची निवड कशी केली जाते, याची त्या वेळीं इकडील वाचकांस कांहींच माहिती नव्हती. हा लेख १९१२ सालीं लिहिला. यापुढें हिंदुस्थानचा अमेरिकेशीं दाट संबंध येत जाणार हें जाणून वाचकांना त्या विषयाचा प्रथमच परिचय करून देण्यांत आला.

'**पेशवाई जाऊन शंभर वर्षें झालीं**' या प्रसंगानें पेशवाईचें शतवार्षिक पुण्यस्मरण म्हणून हा लेख लिहिला आहे. त्याबरोबरच त्यांतून असाहि ध्वनि निघतो कीं, इंग्रजशाहीचींहि शंभर वर्षें भरलीं, तेव्हां तिनेंहि स्वराज्यदान करून आपलें चंबूगबाळें आटोपण्याच्या तयारीला लागावें.

स्वराज्यप्राप्तीच्या या मनोदयाबरोबर साहजिकच पूर्वीचे स्वराज्य-संस्थापक श्रीशिवाजीमहाराज यांचें पुण्यस्मरण होतें. यास्तव त्यांच्या अद्भुत करामतीच्या वर्णनात्मक असे तीन-चार लेख क्रमानें दिले आहेत. त्यांतील पहिल्या लेखाचें वैशिष्ट्य हें कीं, शहाजीच्या कर्तृत्वाची नीटशी कल्पना न आल्यानें त्याच्याविषयीं जे अनुदार उद्गार काढण्यांत येतात त्यांचें खंडन करून शहाजीचीहि थोरवी सापेक्षतेनें वर्णिली आहे. याच लेखसंग्रहांतील चौथ्या विभागांत समर्थांच्या राजकारणाचा विस्तृत ऊहापोह केला आहे. त्यावरून कित्येकांचा असा गैरसमज होतो कीं, समर्थांच्या राजकारणाचा गौरव करण्यांत शिवाजीमहाराजांना गौणत्व देण्यांत येतें. हा अपसमज प्रस्तुतच्या या चार लेखांनीं दूर होईल. यांतला पहिला '**शहाजी व शिवाजी**' हा लेख १९२३ सालांतला असून, '**शिवाजीमहाराज युगप्रवर्तक नव्हत काय**' हा लेख १९५१ मधला आहे. दोन लेखांत अंतर २८ वर्षांचें असून त्यांच्या दरम्यानच्या काळांतहि अनेक लेख याच विषयावर लिहिले गेले. त्या सर्वांचा समावेश या लेखसंग्रहांत करतां आला नाहीं, तरी पण जे तीन-चार लेख यांत घेतले आहेत त्यांवरून 'शितावरून भाताची परीक्षा' या न्यायानें श्रीशिवाजीमहाराजांच्याविषयींचा नितान्त आदर अखंड स्थिर आहे, त्यांत कोणत्याहि कारणानें खंड पडलेला नाहीं, हें वाचकांच्या लक्षांत येईल.

### क्रान्तीचें एक अपूर्व उदाहरण

**'पारीसचा पराक्रम'** हें प्रकरण फ्रान्समधील राज्यक्रान्तीच्या शतसांवत्सरिक स्मरणार्थ लिहिलें असलें, तरी तें कांहीं निर्हेतुक लिहिलेलें नाहीं. त्या वेळीं म्हणजे १९३० मध्यें हिंदुस्थानांत सरकारविरुद्ध खूप जोरांत आंदोलन चालू होतें. पण सरकारावर त्याचा कांहीं दृश्य परिणाम होत नव्हता. अशा वेळीं पारिस शहरानें सरकारची अडवणूक करून तीन दिवसांत राज्यक्रान्ति कशी घडवून आणली, यांचा इतिहास चळवळ्या लोकांच्या डोळ्यासमोर असावा या हेतूनें तो लेख लिहिला होता. त्या लेखाचा त्या वेळीं कांहीं परिणाम झाला नाहीं. तथापि १९४२ च्या चळवळींत कोठें कोठें फ्रेंचांच्या चळवळीच्या तंत्राचा अवलंब केल्याचें आढळून आलें. चळवळीच्या पुढाऱ्यांच्या नजरेसमोर जगांतील चळवळींचे सर्व प्रकार मांडलेले असावेत, मग ज्याला जें रुचेल व पचेल तें तो उचलील, अशा हेतूनें तो लेख लिहिला होता.

त्याच्या पुढचा लेख हा १८५७ सालच्या बंडाच्या स्मरणार्थ लिहिलेला आहे त्या वेळीं त्या बंडाचा ८१ वा स्मृतिदिन होता त्या अनुषंगानें पूर्वीचें बंड कां फसलें हें सांगून पुनश्च आपल्या बंडाला असें अपयश न यावें यास्तव आपण गतेतिहासापासून बोध काय घ्यावा याची सूचना म्हणून हा लेख लिहिलेला आहे.

### राजकीय का धार्मिक

वसईच्या संग्रामासंबंधाचे दोनहि लेख **श्री. तात्यासाहेब केळकर** यांच्या एका शंकेला उत्तरादाखल म्हणून लिहिले आहेत. वसईच्या स्वारीचा हेतु धार्मिक नसून राजकीय होता असें विधान तात्यासाहेब केळकर यांनीं केलें होतें, त्याला उत्तर म्हणून हे दोन लेख लिहिले आहेत. युरोपखंडांत धर्म व राजकारण यांची फारकत १८ व्या शतकाच्या उत्तरार्धापासून होऊं लागली. आपल्या देशांत अशी फारकत पूर्वी नव्हती; अलीकडे मात्र ती हळूच डोकावूं लागली आहे; परंतु सतराव्या अठराव्या शतकांत हिंदुस्थानांतील राजकारणाच्या बुडाशीं धर्मविरोध असे. मुसलमान जसे धर्मप्रचारार्थ चढाई करीत त्याप्रमाणेंच पोर्तुगीजहि धर्मप्रसारार्थ मुलूख जिंकीत; आणि नंतर जिंकलेल्या मुलुखांत ख्रिस्ती धर्मप्रसारार्थ अन्य धर्मीयांचा छळ करीत. हा छळ असह्य झाला म्हणूनच पेशव्यांनीं वसईची मोहीम आरंभिली. यासंबंधांत श्री. न. चिं. केळकर यांनीं वेगळें मत प्रतिपादन केलें होतें, त्याच्या खंडनार्थ हे दोन लेख लिहिले असून, त्यांत वसईच्या मोहिमेचा उद्देश धर्मच्छळांतून हिंदूंची सुटका करणें हा होता, हें पुराव्यानें सिद्ध केलें आहे. हल्लीं धर्मकारण व राजकारण यांचे संबंध त्रुटित झाले असले, तरी मराठी राज्याची प्राचीन परंपरा अवगत होण्यास हे लेख उपयोगी पडतील.

### मध्यभारतांत मराठ्यांचा प्रवेश

थोरले बाजीराव पेशवे यांच्या द्विशतसांवत्सरिक पुण्यस्मरणार्थ लिहिलेल्या

या लेखाला हा मथळा सहेतुक दिला आहे. बाजीरावाच्या पराक्रमाचें वर्णन केलें असतां, अशा पराक्रमी बाजीरावानें कोणते दिग्विजय केलें असें विचारण्यांत येतें. त्या दिग्विजयाचें वास्तविक मूल्यमापन करण्याला त्याच्या मार्गांतील विघ्नांची आडकाठी लक्षांत घेतली पाहिजे. बाजीरावाच्या मार्गांत नैसर्गिक आणि कृत्रिम अडचणी किती होत्या तें कळल्यास त्याच्या पराक्रमाविषयीं यथार्थ कल्पना येईल, अशी यथार्थ कल्पना यावी याकरितां हा लेख लिहिला असून, त्याला या ऐतिहासिक विवेचनांत स्थान दिलें आहे.

या विभागांतील शेवटचा लेख '**मध्यभारताचीं राजकीय स्थित्यंतरें**' हा आहे. बाजीराव, चिमाजीअप्पा आणि पवार, शिंदे, होळकर इत्यादि सरदार यांच्या मर्दुमकीनें मराठ्यांचा माळव्यांत प्रवेश झाला आणि त्यांच्याच पराक्रमानें व चिकाटीनें मराठ्यांचें बूड तेथें स्थिर झालें. हल्लींच्या नव्या राजवटींत संस्थानांचें विलीनीकरण झपाट्यानें सुरू झालें. त्यांत कोल्हापुरासारखें छत्रपतींचें आद्यपीठहि डळमळलें. अशा परिस्थितींत मध्यभारतांतील संस्थानिकांनीं आपला गट करून संघरूपानें आपलें स्थान टिकविलें. अशा मध्यभारत प्रदेशाचा महाराष्ट्राशीं असलेला पूर्वापार संबंध लक्षांत राहावा या हेतूनें हा लेख लिहिला आहे आणि त्याचें ऐतिहासिक महत्त्व जाणून त्यास या संग्रहांत स्थान दिलें आहे.

एवंच या ऐतिहासिक विभागांत जे लेख समाविष्ट केले आहेत त्यांत देशांतील व परदेशांतील अनेक घडामोडींची चर्चा केली आहे आणि त्या घडामोडी कितीहि शतकांपूर्वींच्या असल्या, तरी त्यांचा चालू राजकारणाशीं प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष संबंध लक्षांत आणून ते लेख लिहिण्यांत आले आहेत. अर्थातच हा केवळ प्राचीन इतिहासाच्या संशोधनाचा आढावा नसून, त्यांत चालू राजकारणाचे धागेदोरे अनुस्यूत आहेत हें ते ते लेख वाचल्यानें वाचकांच्या ध्यानांत येईल.

### संमिश्र विभागाचें स्वरूप

दुसऱ्या '**संमिश्र विभागांत**' चालू राजकारणांतील निरनिराळ्या प्रसंगांवरील लेख आहेत. त्यांत मुख्यतः हिंदु-मुसलमानांतील तेढ, सरकारी दडपशाही, नव्या राज्यघटनेंतील गुणदोष आणि हिंदुमहासभेची नवी व्यापक भूमिका यांसंबंधीं लेख आहेत.

### रानदांडगा लाठीमार

पहिलाच लेख '**जुलमाच्या डोलाऱ्यावर कळस**' हा असून, त्यांत पुण्यांतील सोन्यामारुतीपुढील वाद्यबंदीचा जुलमी हुकूम आणि त्या जुलमावर कळस करणारा लाठीमार यांचा तीव्र निषेध केला आहे. या लेखांत या वाद्यबंदीची कहाणी कथन करून मुख्यतः शुक्रवार दि. ७ मे १९३७ या दिवशीं सत्याग्रह पाहण्यासाठीं गोळा झालेल्या बघ्यांच्या जमावावर जो निष्कारण रानदांडगा लाठीमार झाला त्याचें वर्णन असून, या सरकारी अत्याचाराचा धिक्कार केला आहे.

भोर

### मुस्लिमांची चढती कमान

दुसऱ्या लेखांत मुसलमान पुढाऱ्यांच्या अराष्ट्रीय मागण्यांची पार्श्वभूमि निवेदली असून, त्यांच्या चढत्या सुराला आळा घातला नाहीं, तर या मागण्या वाढत वाढत शेवटीं पाकिस्तानांत त्यांची परिणति होईल, असा अगाऊ इशारा दिला आहे. 'भावी पिढ्या या समेट-सेनापतींना शिव्याशाप देतील' हें त्या लेखांतलें भविष्य सांप्रत खरें झालें आहे.

### सिंध हिंदूंचा छळ

यानंतरच्या तिसऱ्या लेखांत '**सिंध हिंदूंच्या छळाची करुण कहाणी**' कथन केली असून, हा छळ थांबविणें हीच '**हिंदूंच्या कर्तृत्वाची कसोटी**' आहे असें म्हटलें आहे. पाकिस्तानाची मागणी जसजशी जोरांत येत चालली तसतसा सिंध प्रांतांत हिंदूंचा छळ वाढत चालला. सिंधमधील अल्पसंख्य हिंदूंचें संरक्षण करणें दुर्घट होत चाललें, तरी पण इतर प्रांतांतले बहुसंख्य हिंदु संघटित होऊन सिंधमधील हिंदूंच्या छळाचा प्रतिकार करण्याचें मनावर घेईनात. हिंदुसमाज या कसोटीला उतरला नाहीं. त्याच वेळेपासून 'बहुसंख्य मुसलमानांच्या प्रांतांत राहणाऱ्या अल्पसंख्य हिंदूंच्या जीवितवित्ताची शाश्वती नाहीं' असें दुःस्वप्न पडूं लागलें. कुंभकर्णी झोपेंतल्या हिंदुसमाजाला जागृत व संघटित करण्याचे प्रयत्न निष्फळ होत असलेले पाहून सिंधमधील अल्पसंख्य हिंदूंची यापुढें धडगत नाहीं, असे निराशेचे विचार या लेखांत ग्रथित केले आहेत. दुर्दैवानें ८ वर्षांनंतर त्याचें प्रत्यंतर आलें आणि सिंधमधील हिंदु निर्वासित होऊन सिंध प्रांत निर्हिंदु झाला. अनिष्ट भाविष्य खरें ठरणें हें अभिमानास्पद नसून लज्जास्पदच आहे. तथापि आपण अगाऊ सूचना देण्याचें कर्तव्य केलें होतें एवढाच मनाला विरंगुळा समजावयाचा.

### राष्ट्रीय सप्ताहांत काळा कायदा

'**मतस्वातंत्र्याची गळचेपी**' या चौथ्या लेखांत मुंबई सरकारच्या 'सुरक्षा' कायद्याची जिनीव्हा येथील जागतिक परिषदेच्या ठरावाशीं तुलना करून, महायुद्धानंतर पाश्चात्य राष्ट्रांत मतस्वातंत्र्याची पुनश्च स्थापना होत असतां, येथें युद्धकालीन निर्बंधहि अपुरे वाटून मतस्वातंत्र्याची जी प्राणघातक गळचेपी केली गेली तिचा निषेध केला आहे. मुंबईच्या विधिमंडळांत ही गळचेपी करण्याचे पाश तयार होत असतां, त्याच वेळीं 'राष्ट्रीय सप्ताह' पाळला जात होता. १९१९ सालीं त्या वेळच्या परकी सरकारनें जो '**रौलेट ॲक्ट**' नांवाचा काळा कायदा केला, त्याच्याविरुद्ध देशभर निकराचा सत्याग्रह झाला व त्यांतून जालियनवाला बागेंतील अमानुष कत्तलीचा घोर प्रसंग ओढवला. त्या प्रसंगाच्या स्मरणार्थ त्या वेळेपासून राष्ट्रीय सभेच्या आदेशानुसार प्रतिवर्षीं दि. ६ ते १३ एप्रिल हा आठवडा राष्ट्रीय सप्ताह म्हणून पाळण्याची प्रथा रूढ झाली. त्या प्रथेला अनुसरून त्या वेळीं मुंबईत एकीकडे राष्ट्रीय सप्ताह चालू होता व आपण रौलेट ॲक्टाचा

प्रतीकार कसा केला हें मोठ्या अभिमानानें सांगण्यांत येत होतें, आणि त्याच वेळीं मुंबईच्या विधिमंडळांत, रौलेट कायद्यापेक्षांहि अधिक काळाकुट्ट असा कायदा घडविला जात होता. हें विचित्र दृश्य या लेखांत रेखाटलें आहे.

या काळ्या कायद्याचा पर्यायानें हिंदुमुसलमानांच्या तेढीशीं संबंध असल्यानें हा लेख या विभागांत समाविष्ट केला आहे. सुरक्षा कायद्याचा मुख्य रोख राज्याला धोका उत्पन्न करणारी चळवळ दडपून टाकणें, हा असला तरी त्यांत जातीजातींत द्वेष माजविणारे लेख आक्षेपार्ह ठरविण्याचें जें कलम आहे त्याचें पर्यवसान मुसलमानांच्या अत्याचाराची आणि हिंदूंच्या छळाची वार्ता छापण्यालाहि प्रतिबंध होण्यांत होणारी असल्यानें, पर्यायानें मुसलमानांच्या शिरजोरीला एकप्रकारें रान मोकळें होत आहे. असला हा काळा कायदा नव्या राज्यघटनेनंतरहि अद्यापि रद्द झाला नसल्यानें हा लेख गतेतिहासांत समाविष्ट न करतां ताज्या घडामोडीच्या भागांत समाविष्ट करण्यांत आला आहे.

## अजून तरी घसरगुंडी थांबवा

'या अनुनयाला आळा घाला' या पांचव्या लेखांत मुसलमानांच्या मनधरणीचे दुष्परिणाम राष्ट्राला भोंवत असूनहि वरिष्ठ सरकार अद्यापि पाकिस्तानची खुशामत करण्याची अनिष्ट प्रथा सोडीत नाहीं, या दुष्ट खोडीविरुद्ध जनतेचें गाऱ्हाणें पुढें मांडलें आहे; पण अद्यापि ही घसरगुंडी थांबली नाहीं.

## राज्यघटनेंतील गुणदोष

भारतीय राज्यघटना प्रसिद्ध झाल्यावर तिच्यांतील गुणदोषांची चर्चा करणारा हा लेख आहे. यांत घटनेंतील खांचखळगे दाखवून जनतेला व सरकारलाहि सावधगिरीची सूचना दिली आहे. नागरिकत्वाच्या हक्काची मर्यादा अद्यापि निश्चित होत नाहीं. निर्वासित जनतेची स्थिति तर 'ना घरका ना घाटका' अशी झाली आहे. मूलभूत हक्कांना आधींच अपवादाचा खोडा घालून ठेवला होता, त्या खोड्याचें बंधन न्यायालयांनीं सैल करतांच तें पुनश्च आवळून तंग करण्याचा उपद्व्याप झाला. प्रांतिक सरकारांना जें आर्थिक स्वातंत्र्य अवश्य पाहिजे तें यांत दिलें न गेल्यामुळें प्रांतिक सुधारणा कार्यवाहींत येऊं शकत नाहींत आणि अन्नधान्य व मूल्य-नियंत्रण यांत जो एकसूत्रीपणा पाहिजे तो मात्र या घटनेंत साधला नाहीं. उमेदवारांना पात्रतेची कसोटी ठेवली नसल्यामुळें निवडणुकांत गोंधळ माजणार याचा अनुभव लवकरच येणार आहे. जो तपशील घटनेंत नमूद करणें इष्ट नव्हतें तो तपशील घटनेंत समाविष्ट केल्यामुळें सरकारचेच हात दुहेरी बांधले गेले आहेत. त्यामुळें कांहीं इष्ट गोष्टी घडवून आणणें व अनिष्ट गोष्टी टाळणें दुरापास्त झालें आहे. सारांश, या खांचखळग्यामुळें सरकारला व जनतेला उभयतांनाहि वारंवार ठेचा लागत आहेत व आतांपासूनच घटना-दुरुस्तीची भाषा सुरू झाली आहे.

### निवडणुकींतील सहकार्य

या विभागांतला शेवटचा, सातवा, लेख हिंदुसमाजाला उद्देशून लिहिला असून, त्यांत हिंदुसभेचे हात बळकट करण्याविषयीं आदेश दिला आहे. काँग्रेस-पक्षाचा कारभार हुकुमशाहीच्या वळणावर चालला आहे. त्या हुकुमशाहीला लगाम घालण्याला प्रबळ असा विरोधी पक्ष हवा. हिंदुमहासभा असा विरोधी पक्ष बनवूं शकेल; पण तत्पूर्वी निवडणुकीच्या बाबतींत इतर अल्पसंख्य पक्षांशीं हातमिळवणी करण्याला हिंदुसभेच्या पार्लमेंटरी बोर्डाचीं दारें हिंदुसभेच्या कक्षेबाहेरच्याहि हिंदुहितवादी जनतेला मोकळीं ठेवलीं पाहिजेत. हें सहकार्य साधण्यासाठीं निराळाच पक्ष स्थापन करावा अशी जी कित्येकांची सूचना आहे ती हिंदुमहा-सभेच्या मोठेपणाला बाधक ठरेल. त्यास्तव असा वेगळा पक्ष स्थापन न करतां हिंदुमहासभेचेच हात बळकट करा अशी सूचना या लेखांत दिली आहे.

### धर्म व राजकारण यांची जोडगोळी

तिसऱ्या विभागाला 'धर्म व तत्त्वज्ञान' अशी संज्ञा दिली आहे. यांत धार्मिक विषयावरील अनेक लेखांचा समावेश करतां आला असता; परंतु सद्यःकालीन कित्येक मूलगामी व बेलगामी वाद उपस्थित झाल्यामुळें वाचकांचीं मनें संशयग्रस्त होत आहेत. '**समर्थांचें राजकारण**' या वादाचें गाडलेलें भूत पुनः प्रकट होऊन जनतेला भेडसावूं लागलें आहे आणि '**गीतारहस्याच्या मागें का पुढें**' हाहि एक बुद्धिभेद करणारा वाद नवाच उपस्थित झाल्यानें वाचकांचीं मनें द्विधा होऊं लागलीं आहेत. या दोन्ही बाबतींत महाराष्ट्रीय जनतेचीं मतें पूर्वीच ठाम झालीं असतां नव्या पिढीच्या वाचकांना नवें गौडबंगाल भुरळ पाडूं शकतें; याकरितां या दोन्ही बाबतीं-तील निस्संदिग्ध मतें ग्रंथनिविष्ट व्हावीं या हेतूनें या विषयावरील लेख या संग्रहांत ग्रथित केले आहेत. 'समर्थांचें राजकारण' या विषयावर वीस वर्षांपूर्वी लिहिलेले चार लेख येथें देऊन, अलीकडेच श्री. न. र. फाटक यांनीं 'समर्थांचें चारित्र' या नांवाखालीं जें पुस्तक प्रसिद्ध केलें आहे त्याचा परामर्श घेणारा एक विस्तृत लेख पूर्वींच्या लेखांना जोडून पांच लेखांची ही लेखमाला केली आहे. या पांच लेखांत समर्थांच्या राजकाणावरील सर्व आक्षेपांना उत्तरें दिलीं गेलीं आहेत.

हे राजकारणविषयक लेख 'धर्मतत्त्वज्ञान' या सदरांत कां कोंबले असा आक्षेप कोणी घेतल्यास याचा परिहार असा कीं, समर्थांचें राजकारण धर्मावर व अध्यात्मावर अधिष्ठित होतें. समर्थांच्या चतुःसूत्रींत 'मुख्य हरिकथा निरूपण। दुसरें तें राजकारण' या दंडकाला अनुसरून राजकारणाला दुय्यम स्थान दिलें गेलें होतें. पण त्याचा अर्थ धर्म व राजकारण यांची फारकत केली होती असा नसून धर्माच्या पायावर राजकारण उभें करावें असाच समर्थांचा दंडक होता. हल्लींच्या राजकारणाप्रमाणें समर्थांचें राजकारण निर्धर्मी आणि धर्माला बाधक असें नसून तें धर्माला पोषक असेंच होतें. किंबहुना धर्म हाच समर्थांच्या राजकारणाचा आत्मा

होता आणि धर्मरक्षणासाठींच त्यांना स्वराज्याची संस्थापना हवी होती. सारांश, समर्थांच्या चळवळींत धर्मकारण व राजकारण एकरूप असल्यामुळें या लेखांचा समावेश या विभागांत केला आहे.

श्री. फाटकांच्या पुस्तकाचा परामर्श घेणारा लेख खंडनमंडनात्मक आहे. त्यांत श्री. फाटकांच्या आक्षेपांचें खंडन असून, समर्थांच्या काव्यांतील अनेक उताऱ्यांवरून समर्थांच्या राजकारणाच्या अखंडित परंपरेचें मंडन केलें आहे.

### गीतारहस्याची स्पष्ट भूमिका

गीतारहस्यावरील आक्षेपांचें निरसन करण्यासाठीं लिहिलेले तीन लेख यांत दिले आहेत. त्यांतील पहिले दोन लेख केसरींत प्रसिद्ध झाले होते. तिसरा लेख **'नवभारत'** या मासिकांत प्रसिद्ध झाला होता. केसरींतील माझ्या लेखाला उत्तर म्हणून श्री. शंकर दत्तात्रेय देव यांनीं नवभारतांत दोन लेख लिहिले आणि त्यांत सत्यासत्य, हिंसाअहिंसा याची चर्चा करून गीतारहस्यांतील, किंबहुना मूळ गीतेंतीलहि विवेचन अपुरें पडतें असें भासविलें होतें. त्यांच्या या लेखाला उत्तरादाखल लिहावयाचा लेख नवभारतांतच आम्ही प्रसिद्ध करतों असें त्या मासिकाच्या संपादकांनीं कळविल्यावरून तो लेख त्यांच्याकडे पाठविला व त्यांनीं तो प्रसिद्धहि केला. प्रस्तुतच्या वादाची पूर्ति होण्यासाठीं केसरींतील पूर्वीच्या दोन लेखांबरोबरच तो तिसरा लेख या लेखसंग्रहांत ग्रथित केला आहे.

### चतुःसूत्री कशी लावावी

**'कर्मयोगाची चतुःसूत्री'** हा लेख माझ्या गीताभ्यासाचा निष्कर्ष आहे. गीतेंतील **'कर्मण्येवाधिकारस्ते'** या श्लोकाचा आजवरचा रूढार्थ मला संदर्भाला विसंगत वाटतो आणि गीतेंतील तत्त्वालाहि तो सोडून आहे अशी माझी समजूत आहे. यास्तव त्या श्लोकाचा मी वेगळा अर्थ कसा लावतों तें या लेखांत नमूद केलें असून, हा नवा अर्थ सर्वांच्या तोंडीं सुलभतेनें रुळावा म्हणून त्याला समश्लोकीचें स्वरूप दिलें आहे; आणि शब्दभेदानें वेगवेगळे असे १८ श्लोक या एकाच श्लोकाचे समानार्थक म्हणून दिले आहेत.

### प्रार्थनेचें तारायंत्र

**'प्रार्थना फलदायक कशी होते'** हा या विभागांतला शेवटचा लेख संत तुकडोजीमहाराज यांच्या सूचनेवरून त्यांच्या **'गुरुदेव'** या मासिकाकरितां लिहिला होता व तो त्यांत प्रकाशितहि झाला होता. या लेखांत ईश्वराच्या प्रार्थनेनें प्रार्थकाचे हेतु जे पूर्ण होतात, ते कसे होतात, प्रार्थना आणि कामनासिद्धि यांचा दुवा कसा जोडला जातो, याचें स्पष्टीकरण केलें आहे. त्यांत समर्थांचें 'बुद्धि देतो सेवकाला। बुद्धीनें पार पाडवी' हें वाक्य सूत्ररूप मानून त्याचें विवरण करून सांखळीचे दुवे कसे जोडले जातात तें विशद केलें आहे.

## अखंड स्मरण राहण्यासाठीं

यानंतरच्या विभागांत कांहीं प्रसिद्ध ‘ दिवंगतांच्या गुणांचें दिग्दर्शन ’ केलें आहे. कोणी प्रसिद्ध व्यक्ति परलोकवासी होतांच मृत्युलेख लिहून आणि दुखवट्याचे ठराव करून आपण मोकळे होतों. त्यानंतर थोड्याच दिवसांत त्यांची स्मृति देखील नष्ट होते. याचा परिणाम असा होतो कीं, भावी पिढीला गत पिढींतील प्रसिद्ध पुढाऱ्यांची देखील तोंडओळख राहत नाहीं, मग सामान्य व्यक्तींची तर कथा काय ? अशी स्थिति न व्हावी व हा स्मृतीचा धागा न तुटतां अखंड राहवा म्हणून कांहीं प्रसिद्ध व्यक्तींचे मृत्युलेख या संग्रहांत समाविष्ट करण्याचा विचार मुक्रर झाला. त्या विचाराला अनुसरून अनेक मृत्युलेखांतून हे नऊ मृत्युलेख निवडून घेतले आहेत.

## पहिले क्रान्तिवीर

यांतला पहिलाच लेख श्री. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या चरित्रासंबंधाचा आहे. वस्तुतः हा मृत्युलेख नसून शास्त्रीबुवांच्या जन्मशताब्दिनिमित्त लिहिलेला तो लेख आहे. पण त्यांतहि शास्त्रीबुवांच्या कामगिरीचें रहस्यच उलगडून दाखविलें आहे; आणि शास्त्रीबुवांचा मृत्युलेख लिहिला असता, तर त्यांत तरी काय, हाच मजकूर आला असता. पण नव्हे, शास्त्रीबुवांच्या मृत्यूच्या वेळीं त्यांच्यासंबंधानें लेख लिहिला असता, तर शास्त्रीबुवांच्या क्रान्तिकारक विचारांचें असें प्रतिबिंब त्यांत हटकून उमटलेंच असतें असें नाहीं. कारण त्या विचारक्रान्तीला नुकतीच कोठें सुरुवात झाली होती आणि विचाराच्या पुढच्या उच्चार आणि आचार या पायऱ्या गांठणें त्या वेळीं दुरापास्तच होतें. यामुळें शास्त्रीबुवांच्या क्रान्तिकारक विचारांचें यथार्थ मूल्यमापन त्या वेळीं होऊं शकलें नसतें. शंभर वर्षांत या देशांत जी क्रान्ति झाली त्या क्रान्तीच्या उगमाचा शोध आपण आतां सरळ लावूं शकतों. या दृष्टीनें कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या गुणांचें दिग्दर्शन इतक्या दीर्घकालानंतर झालें हेंच एकापरीनें बरें झालें.

## दुसरे क्रान्तिवीर

लोकमान्य टिळकांचें चरित्र सर्वतोपरी अलौकिक असल्यानें त्यांच्या स्मृतीवर पडदा पाडण्यास २५।३० वर्षांचा काल असमर्थच आहे. यामुळें त्यांचा मृत्युलेख केव्हांहि लिहिला तरी त्यांत त्यांचें अलौकिकत्व एकसारखेंच प्रकट व्हावयाचें. अर्थातच त्यांच्या गुणांचें दिग्दर्शन ते दिवंगत झाल्यावर एक वर्षानें केलें गेलें म्हणून त्यांत कांहीं उणीव आली नाहीं; अथवा मृत्युकाळच्या वेळच्या लेखांतली स्वाभाविक अतिशयोक्तीहि त्या लेखांत आली नाहीं. लोकमान्यांची गुणसंपदा एवढी अमूप होती कीं, तिच्या वर्णनांत अतिशयोक्तीला अवसरच नसून, लेखकानें केलेलें अतिशयोक्त वर्णनहि त्यांच्या योग्यतेच्या मानानें अपुरेंच पडणार हें निश्चित आहे.

याचमुळें आणि अनेक लेखकांचे गौरवपर लेख एकाच वेळीं प्रसिद्ध करावयाचें असल्यामुळें हा मृत्युलेख तोकडाच पडला आहे असें वाटतें, पण त्यास इलाज नाहीं.

### जयविजयांची जोडी

कै. तात्यासाहेब केळकर आणि काकासाहेब खाडिलकर ही जोडी लोकमान्यांच्या प्रभावळींत जयविजयासारखी शोभत होती. त्यांचें गुणवर्णन त्या त्या योग्य प्रसंगीं यथार्थतेनें झालेलें आहे. एक '**महाराष्ट्राचें महाभूषण**' म्हणून चमकले तर दुसरे '**लढवय्ये संपादक**' म्हणून चिरंतन- लौकिक मागें ठेवून दिवंगत झाले. संपादकत्व आणि राजकारण याव्यतिरिक्त उभयतांच्या कार्याचे आणखी अनेकविध पैलू होते. परंतु प्रस्तुतच्या लेखसंग्रहांत इतर विषयांचा परामर्श घेण्याला सवड नसल्यानें त्यांच्या एकेका पैलूचाच तेवढा विचार यांत ग्रथित केला आहे.

### तिसरे क्रान्तिवीर

कै. शिवरामपंत परांजपे यांच्या मृत्युलेखांत त्यांच्या लौकिक कार्यातील जेवढें स्वरूप व्यक्त झालें तेवढ्याचा परामर्श घेतला आहे. बाकी अण्णासाहेब परांजपे म्हणजे सामान्य जनतेला एक न उकललेलें कोडें होतें. उपरोधिक भाषण हें त्यांचें प्रभावी शस्त्र; परंतु तें प्रभावी केव्हां तर त्यांच्या भाषणांतील व्याजस्तुति, विरोधाभास, छेकापन्हुति जेव्हां उकलेल तेव्हां. त्याचप्रमाणें त्यांच्या चरित्रांतील सर्व धागेदोरे जेव्हां उमगतील तेव्हां त्यांची महती पूर्णत्वानें प्रतीत व्हावयाची. पण त्यांच्या मृत्युलेखांत 'काळकर्ते' या नात्यानें त्यांची जी महनीय आणि क्रान्तिकारक कामगिरी झाली तिच्यावरच मुख्यत्वेंकरून भर दिला आहे व त्या दृष्टीनें त्यांची अद्वितीय कामगिरी वर्णिली आहे.

### एकेकाळचा ज्वालामुखी

कै. भास्कर बळवंत ऊर्फ भाऊसाहेब भोपटकर हे एका काळीं ज्वलन्त ज्वालामुखी होते; परंतु ज्वालामुखीवर काळाचा प्रभाव चालून कालांतरानें तो दबून जातो. तरी पण अनुकूल वातावरण मिळतांच तो पुनश्च धगधगूं लागतो. अशी उघडझांप भाऊसाहेबांच्या आयुर्मानांत तीन वेळां झाली. तथापि हें लक्षांत घेतलें पाहिजे कीं, प्रज्वलित केलेला अग्नि कालांतरानें शांत झाला, तरी त्यानें आपल्या धगीनें जो रसपरिपाक केला असतो, तो कांहीं त्या अग्नीच्या थंडाव्याबरोबर पुनश्च पूर्वस्थितीला जात नाहीं; त्या रसाची जी मूस बनली अथवा दागिना बनला तो जशाचा तसा कायमच राहतो याच न्यायानें भालाकार भोपटकर यांनीं आपल्या धगधगीत लेखांच्या प्रखरतेनें महाराष्ट्रांतील जनतेच्या विचारांची जी घडण बनविली ती घडण त्यांच्या राजकारणनिवृत्तीच्या काळांतहि कायमच राहिली.

### जहाल-मवाळांतील दुवा

कै. दादासाहेब करंदीकर हे सातारा प्रांताचे पुढारी असून, लोकमान्यांच्या होमरूललीगच्या चळवळीच्या अनुषंगानें त्यांना प्रांतीय महत्त्व

आलें. शिवाय दादासाहेब म्हणजे जहालपक्ष व मवाळपक्ष यांच्यामधला एक दुवा होता; त्यामुळें महाराष्ट्रांत केव्हांहि जहाल व मवाळ यांच्यांत अहिनकुलवत् वैरभाव निर्माण झाला नाहीं. लोकमान्य टिळकांना त्यांच्या पोक्त सल्ल्याचा आणि कौशल्याचा अनेकवार उपयोग झाला. बुद्धिप्रधान, शांत डोक्याचे आणि गाजावाजा न करतां विधायक कार्य करणारे पुढारी या नात्यानें त्यांची कामगिरी महाराष्ट्रास अनेक संकटप्रसंगीं उपयोगी पडली; एवढेंच नव्हे, तर पंजाबांत जालियनवाला बागेंतील घोर हत्याकांडानंतर तेथील जनतेला धीर देण्याच्या कामगिरींत त्यांचें अंग प्रमुखत्वानें होतें.

## रसद पुरविणारे कारखानदार

कै. धोंडोपंत ऊर्फ बाबा विद्वांस म्हणजे लो. टिळकांचे खासगी कारभारी. त्यांची कामगिरी जनतेच्या समोर न येणेंच साहजिक आहे. पण लो. टिळक हे राजकारणाच्या रणांगणांत सरकारशीं व इतर प्रतिस्पर्ध्यांशीं निकराचा झगडा करीत असतां त्यांच्या मागचे दळणवळणाचे मार्ग सुरक्षित ठेवण्याची आणि त्यांना रसद पुरविण्याची कामगिरी बाबासाहेब बिनबोभाट कुशलतेनें पार पाडीत. रणांगणावर लढणाऱ्या योद्ध्याला जें यश मिळतें त्यांतला कांहीं वांटा तरी देशांतील कारखान्यांतून शस्त्रास्त्रांचा भरपूर पुरवठा करणाऱ्या कामगारांना मिळणें रास्त आहे. याच न्यायानें लोकमान्यांच्या चळवळींच्या यशांतला वांटा यथान्याय बाबा विद्वांस यांना देणें उचित होईल. लो. टिळक, तात्यासाहेब केळकर, काकासाहेब खाडिलकर हे केसरीचे तीन प्रमुख संपादक मोठ्या मान्यतेला चढले. हें यशाचें शिखर गांठण्यासाठीं त्यांना जो निर्वेधपणा मिळाला तो निर्वेधपणा त्यांना लाभूं देण्याचें श्रेय बाबांना आहे.

## प्रतिस्पर्ध्यापासून घ्यावयाचा बोध

'**मुसलमानांतला चाणक्य**' म्हणून संबोधलेले बॅ. जिना हे पाकिस्तानाचे निर्माते म्हणून हिंदुसमाजाला अलीकडे शत्रुस्थानीं भासूं लागले आणि जिनांचें हें यश हिंदुसमाजाला भोंवलें हें खरें. तरी पण 'शत्रोरपि गुणा वाच्या' या न्यायानें त्यांचें गुणवर्णन अप्रासंगिक नव्हे. पण त्यापेक्षांहि जिनांच्या गुणवर्णनांत दुसरा एक हेतु असा कीं, आजकालच्या राजकारणांत जर कोणाला आपल्या समाजाचा व आपल्या राष्ट्राचा उत्कर्ष साधावयाचा असेल, तर त्याला बॅ. जिनांचाच आदर्श आपल्या डोळ्यापुढें ठेवावा लागेल. शून्यांतून सृष्टि निर्माण करावी त्याप्रमाणें बॅ. जिना यांनीं शून्यांतून पांच कोटि मुसलमानांचें पाकिस्तानाचें राज्य निर्माण केलें. ज्यांच्या पाठीशीं तीस कोटि जनता आहे त्यांना हार खावी लागावी आणि ज्या जिनांच्या लीगचे एके काळीं पांच-पन्नासहि सभासद पटावर नोंदलेले नव्हते, त्या जिनांनीं हुकूमशहाप्रमाणें दिल्लीला मौंटबॅटन आणि गांधीजी यांना आपल्या अटीवर तहनामा करण्यास भाग पाडलें ही कामगिरी अद्वितीय

नव्हे असें कोण म्हणेल? जिनांची कामगिरी आपल्या मर्मस्थानांना झोंबत आहे हें निर्विवाद होय. पण तें शल्य दूर करण्याचा मार्ग म्हणजे बॅ. जिना अथवा आजचे त्यांचे वारस लियाकतअली, यांच्या नांवानें खडे फोडणें हा नव्हे. बॅ. जिनापासून काँग्रेसच्या पुढाऱ्यांनीं जर कांहीं धडा घेतला असता, तर आज जे काँग्रेसचे धिंडवडे निघत आहेत ते निघाले नसते. जिनांनीं आपली शक्ति केवळ मुस्लिम लीगचा स्वार्थ साधण्यासाठीं वापरली हें खरें असलें तरी, राजकारण हाच मुळीं स्वार्थपर डाव आहे. परमार्थ-साधनासाठीं कोणींहि राजकारणाचे डाव खेळत नसतो. अर्थातच हिंदुस्थानांतील पुढाऱ्यांना राजकारणांतले डांव जिंकण्यासाठीं जर कांहीं धडे शिकावयाचे असतील तर बॅ. जिनांचें चरित्र त्यांना कांहीं धडे शिकवूं शकेल.

या नऊ पुढाऱ्यांखेरीज अनेक महापुरुष महाराष्ट्रांत होऊन गेले. न्या. रानडे, ना. गोखले, प्रि. आगरकर, इत्यादिकांविषयीं लेखकाला नितान्त आदर वाटत नाहीं असें नाहीं; परंतु प्रस्तुतचा लेखसंग्रह म्हणजे चरित्रमाला नव्हे. ज्यांचे मृत्युलेख लेखकानें स्वतः लिहिले त्यांच्यांतूनच ही निवड करावयाची असल्यानें इतरांच्या चरित्रांचा येथें समावेश करतां आला नाहीं; कारण त्यांचे मृत्युलेख लिहिण्याचा योग आला नाहीं. निष्कारण गैरसमजाला जागा राहूं नये म्हणून हा खुलासा केला आहे.

## बृहन्महाराष्ट्र चळवळीचें बीजारोपण

शेवटच्या संकीर्ण विभागांत विविध विषय आले आहेत. त्यांत प्रारंभीं झांशी येथील बृहन्महाराष्ट्र परिषदेच्या अध्यक्षस्थानावरून केलेलें भाषण दिलें आहे. बृहन्महाराष्ट्र परिषद् आतां सर्वांच्या परिचयाची झाली आहे. परंतु प्रथमच जेव्हां ही परिषद् भरविण्याचें ठरलें त्या वेळीं 'संन्याशाच्या लग्नाला शेंडीपासून तयारी' या म्हणीप्रमाणें परिषदेच्या नामकरणापासून सर्वच नवीन जम बसवावयाचा होता. त्या वेळचें अध्यक्षीय भाषण हें पुढील सर्व कार्यरूपी वृक्षाचें बीजारोपण असल्यानें त्या भाषणाला एक प्रकारचें सूत्ररूप स्वरूप आलें आणि त्या सूत्राला अनुरूप असा त्या कार्याचा २५ वर्षांत विस्तारहि झाला. त्या दृष्टीनें त्या भाषणाला स्थायिक स्वरूप द्यावें म्हणून संकीर्ण विषयांत त्याला आद्य स्थान दिलें आहे.

## टिळक पंचांगच ग्राह्य कां ?

गेल्या तीस वर्षांतला मोठा वादाचा विषय 'टिळक पंचांग' हा होय. शुद्ध अयनांश आणि सूक्ष्म गति घेऊन तयार केलेलें हें टिळक पंचांग आरंभापासूनच प्रतिपक्षाच्या टीकेचा विषय होऊन बसलें आहे. त्या वादांत जीं अनेक उत्तरें-प्रत्युत्तरें झालीं त्यांतून वादाचा निष्कर्ष म्हणून जे बारा मुद्दे निघाले, त्यावरचा निर्णय एका लेखांत २३ वर्षांपूर्वी सविस्तर दिला होता. तोच लेख या संग्रहांत

समाविष्ट केला आहे. त्याच्या आधारें टिळक पंचांगाच्या अनुयायांस आपल्या प्रतिपक्षास पद्धतशीर समर्पक उत्तर देऊन निरुत्तर करतां येईल.

## पौराणिक कथांचें मर्म जाणावें

'नरकासुराच्या कथेंतील मर्म' हा लेख श्रीकृष्णावरील टीकेला उत्तर म्हणून लिहिला आहे. नरकासुराचा वध केल्यानंतर त्याच्या बंदींतील हजारों स्त्रियांना मुक्त करून श्रीकृष्णानें त्यांच्याशीं विवाह केला. हें कृत्य कांहीं टीकाकार समजतात त्याप्रमाणें विषयलंपटतेचें द्योतक नसून, उपस्थित झालेली एक सामाजिक समस्या सोडविण्याचा तो एक मार्ग होता हें त्या लेखांत दर्शविलें आहे.

## प्रयत्नांतीं परमेश्वर

दैववाद आणि प्रयत्नवाद व त्याचबरोबर ग्रहांचें फळ अटळ का टळ हे कधींहि निकालांत न निघणारे मुद्दे विचारांत घेऊन या लेखांत प्रयत्नवादाची बाजू जोरानें पुढें मांडली आहे व त्याचबरोबर ग्रहांचें फळ कोठपर्यंत टळ असतें व तें अटळ केव्हां होतें याचें विवेचन केलें आहे. त्याच विषयावरील दुसऱ्या लेखांत जन्मकालीन ग्रह आणि मृत्युकालचे गोचरीचे ग्रह यांचा परस्परांशीं कसा विरोधात्मक संबंध असतो तें ग्रह मांडून त्यांचें स्पष्टीकरण करून दाखविलें आहे.

## धर्मार्थसमुच्चय पक्ष

उपान्त्य लेखांत विलीन झालेल्या संस्थानांच्या अधिपतींना कृतज्ञतापूर्वक श्रद्धांजलि दिली आहे. शेवटच्या लेखांत, सद्यःस्थितींत ब्राह्मणांनीं कसें वागावें, म्हणजे त्यांचा व त्यांच्या संस्कृतीचा टिकाव लागेल, हें दर्शविलें आहे. ब्राह्मण समाजांत सांप्रत काळीं एक प्रकारचा नैराश्यवाद पसरला आहे. ही निराशा जाऊन तिच्या जागीं आशावाद निर्माण व्हावा, या हेतूनें संस्कृति, धर्म आणि अर्थ या तिहींचा मेळ कसा घालावा यासंबंधाच्या सूचना महाराष्ट्र ब्राह्मण संमेलनाच्या वेळीं ब्राह्मण-समाजाच्या पुढाऱ्यांस उद्देशून केल्या. त्या सूचनांना अनुसरून ब्राह्मण वागतील, तर ते प्रस्तुतच्या आपत्तींतून डोकें वर काढूं शकतील असा भरंवसा वाटतो.

मिति भाद्रपद शुद्ध ३,
शके १८७३

ज. स. करंदीकर

G. P. LIBRARY
BHOR.

# ऐतिहासिक विवेचन

## अमेरिकेंतील अध्यक्षांची निवड : : १

[ ' अमेरिकेंतील अध्यक्षांची निवड ' हा लेख ३९ वर्षांपूर्वी लिहिला गेला. अलीकडे अमेरिकेचा संबंध परराष्ट्रांशीं अधिकाधिक येऊं लागल्यामुळें अमेरिकेंतील राजकारणाकडे सर्वच जगाचें लक्ष वेधले जातें. पण चाळीस वर्षांपूर्वी अशी स्थिति नव्हती. त्या वेळीं अमेरिकेंतील कॉंग्रेसच्या कारभाराकडे विशेष लक्ष देण्याची आवश्यकता वाटत नव्हती; त्यामुळें तेथील अध्यक्षांची निवड कशी केली जाते, यासंबंधाची माहिती वाचकांना फारशी नसे, आणि अध्यक्ष कोणी निवडून आला तरी त्याचें सुखदुःख युरोपिअन राष्ट्रांनाहि फारसें वाटत नसे; मग हिंदुस्थान देश त्याविषयीं बेफिकीर असे, हें सांगावयास नकोच. परंतु १९१२ पासून आंतरराष्ट्रीय घडामोडींत अमेरिकेला अधिकाधिक महत्त्व येऊं लागलें आणि पुढें पहिल्या महायुद्धामुळें तर प्रे. वुइल्सन यांना जगांतील राजकारणांत प्रमुखस्थान प्राप्त झालें. अर्थातच त्या वेळेपासून अमेरिकेंतील अध्यक्षाची निवडणूक ही जणुं काय आपल्याच देशांतल्या राजकारणाची एक महत्त्वाची बाब आहे, अशा दृष्टीनें सगळे देश या निवडणुकीकडे टक देऊन पाहूं लागले आहेत. ही विचारक्रान्ति ज्यांनीं घडवून

(केसरी, दि. ९ जुलै १९१२)

आणली त्या प्रे. वुइल्सनच्या निवडणुकीच्या वेळीं आपल्या वाचकांना अमेरिकेंतील निवडणुकीच्या पद्धतीची कल्पना आणून देण्याकरितां केसरींत हा लेख लिहिला गेला. अलीकडे हिंदुस्थान व अमेरिका या दोन्ही देशांचे संबंध अति निकट आले असल्याने येथील वाचकांस ही माहिती असणें आवश्यक वाटल्यावरून हा जुना लेख या लेखसंग्रहांत समाविष्ट केला आहे. १९१२ नंतर अमेरिकेच्या घटनेंत एक महत्त्वाचा फरक झाला, तो येथें नमूद करणें जरूर आहे. १९१२ च्या निवडणुकीच्या वेळीं स्त्रियांना मतदानाचा हक्क नव्हता, म्हणून या लेखांत तसें विधान केलें आहे. परंतु पहिल्या महायुद्धानंतर इंग्लंडांतल्याप्रमाणें अमेरिकेंतहि स्त्रियांना मतदानाचा अधिकार मिळाला. अमेरिकेच्या घटनेंत हा फरक १९१९ सालीं झाला. प्रस्तुतचा लेख तत्पूर्वीचा आहे हें वाचकांनीं विसरूं नये. ]

गेल्या महिन्यांत अमेरिकेंतील ‘ संयुक्त संस्थानां ’त एकसारखी धामधूम माजून राहिली होती, आणि थोड्याबहुत प्रमाणानें ती नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यापर्यंत तशीच चालू राहणार आहे. संयुक्त संस्थानांत लोकसत्ताक राज्य-पद्धति असून सर्व अधिकाराचीं सूत्रें लोकमतानें निवडलेल्या अध्यक्षाच्या हातीं असतात. ह्या अध्यक्षाची निवडणूक दर चार वर्षांनीं नोव्हेंबर महिन्यांत होते, व तो, त्यानंतर येणाऱ्या मार्च महिन्याच्या ४ थ्या तारखेस, अधिकारारूढ होतो. चालू सालच्या नोव्हेंबर महिन्यांत ही चतुर्वार्षिक निवडणूक व्हावयाची असून सध्यां तिकडे जी धामधूम चालली आहे ती ह्या निवडणुकीच्या पूर्वतयारीची होय. संयुक्त संस्थानांतील अध्यक्षाचा दर्जा, अधिकार व मान फार मोठा मानला जात असल्यामुळें त्या पदाच्या प्राप्तीसाठीं एवढी धडपड चालते. अध्यक्षपदासाठीं जो उमेदवार पुढें येतो ( अथवा खरें म्हटलें तर पुढें आणिला जातो ) त्याची सर्व दृष्टि जरी राष्ट्रहिताकडेच असली तरी त्याच्या निवडणुकीच्या कामीं सहायक असें जे त्याच्या पक्षाचे लोक, त्यांची संकुचित दृष्टि बहुतेक स्वार्थाकडेच वळलेली असते. संयुक्त संस्थानांतील मोठ्या अधिकारांच्या व किफायतीच्या अनेक जागांवर नेमणुकी करावयाचा अधिकार अध्यक्षास आहे. प्रधानमंडळ, लष्कर व आरमार, कस्टम, टपाल व तारायंत्र इत्यादि अनेक खात्यांतील नेमणुका त्याच्या मर्जीवर अवलंबून असल्यामुळें स्वपक्षाचा इसम अध्यक्ष-पदावर यावा अशी ज्याची त्याची अपेक्षा असणारच; कारण विरुद्ध पक्षाचा पाडाव करून आपल्या बाजूचा इसम अध्यक्षाच्या जागीं येतांच त्याच्या निवडणु-कीच्या प्रसंगीं आपण जी मेहनत घेतली तिचा मोबदला म्हणून आपल्या भाऊबंदांची व आप्तेष्टांची कोणत्या तरी खात्यांत वरणी लावण्याची खटपट सुरू होते, आणि आस्ते आस्ते बऱ्याच ठिकाणीं पूर्वीच्या इसमांना रजा मिळून स्वपक्षीयांची त्यांच्या

जागीं भरती होऊं लागते. अशा प्रकारें आपल्या लोकांची भरती करण्याचा प्रकार कायदेशीर रीतीनें १८२९ पासून सुरू झाल्यानें आतां नव्या अध्यक्षानें तसें केल्यास त्यांत कोणास कांहीं नवल वाटत नाहीं. पण कोणी अध्यक्ष असें न करील तर मात्र आश्चर्य! इ. स. १८८५ सालीं पूर्वींच्या रिपब्लिकन पक्षाचा पाडाव होऊन डेमोक्रॅटिक पक्षाचा जय झाला व त्याचा पुढारी क्लीव्हलंड हा अध्यक्ष झाला. पण त्यानें अधिकारारूढ होतांच पूर्वींच्या नोकरांस अर्धचंद्र देऊन आपल्या प्रभावळींतील गणांची त्यांच्या जागीं योजना केली नाहीं, ह्याचें सर्वांस आश्चर्य वाटलें; व तत्पक्षीयांस तर हा त्याचा अपराध अक्षम्यच वाटला. बरोबरच आहे! क्लीव्हलंडने अध्यक्ष व्हावें म्हणून ज्या ज्या मतदारांनीं त्याला आपलें मत दिलें तें काय त्यापासून मोक्षप्राप्ति व्हावयाची होती म्हणून दिलें? अध्यक्षांची निवडणूक ही एक लढाई आहे. त्यांत ज्यांचा जय होईल त्यांना परपक्षाची छावणी लुटण्याचा हक्कच आहे! ( So the practice of securing places for persons who have served the party has sprung from the maxim that in the strife of politics the spoil belongs to the victor ). कसेंहि असो; अध्यक्षाच्या निवडणुकीवर मतदारांचें साक्षात् हिताहित अवलंबून असल्यामुळें ह्या प्रसंगीं इतकी धामधूम उडून जाते ती साहजिकच आहे.

### अमेरिकेंतील पक्षभेद

निवडणूक म्हटली म्हणजे तींत चढाओढ व चुरस ही ठरलेलीच. अर्थात् ह्या चढाओढीला मूर्त स्वरूप येण्याला परस्परांपासून स्पष्टपणें दर्शवितां येण्यासारखे विरोधी पक्ष पाहिजेत. इंग्लंडांत पार्लमेंटाच्या सभासदांची निवडणूक होते, त्यांत लिबरल व कॉन्झर्व्हेटिव्ह अथवा युनिअनिस्ट असे दोन मुख्य भेद असतात. संयुक्त संस्थानांत हल्लीं जे दोन प्रबळ पक्ष आहेत ते रिपब्लिकन व डेमोक्रॅटिक हे होत. ह्यांचीं हीं नांवें आणि त्यांचें अंतिम साध्य पूर्वीपासून निश्चितपणें एकच चालत आलें आहे असें मात्र नाहीं. हल्लीं ज्या पक्षाला डेमोक्रॅट्स् म्हणतात त्यालाच पूर्वी रिपब्लिकन हें नांव होतें आणि हल्लींच्या रिपब्लिकन्सना पूर्वी फेडरॅलिस्ट्स् म्हणत असत! पण कालांतराबरोबर जें मतांतर होतें त्यानें असा फेरफार सहज घडून येतो. इंग्लंडांतील एखाद्या कॉन्झर्व्हेटिव्ह पक्षाच्या मुत्सद्दयाचीं आज जीं मतें असतील तसलीं मतें प्रदर्शित करणाराची पाऊणशें-ऐंशी वर्षांपूर्वी कोणीहि लिबरल पक्षांत गणना केली असती; आणि आज ज्यास आपण लिबरल समजतों त्याला एकविसाव्या शतकांत कदाचित् पक्का कॉन्झर्व्हेटिव्ह मानण्याचा प्रसंग येईल. अथवा आपल्या येथीलच उदाहरण घ्यावयाचें झाल्यास आज ज्यास आपण मवाळ समजतों त्याला अर्धशतकापूर्वी कोणीहि जहाल गणलें असतें; आणि आजचा जहाल हा शेंपन्नास वर्षांच्या अवधीनंतर मवाळांतला मवाळहि ठरूं शकेल. असो; पूर्वी अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांत जो फेडरॅलिस्ट पक्ष होता त्याची प्रगति होतां

होतां तो आज रिपब्लिकन नामाभिधान पावला आहे; आणि पूर्वीचा रिपब्लिकन आजमितीला डेमोक्रॅट झाला आहे. आतां ह्या उभयपक्षांचीं मतें पूर्वी काय होतीं आणि तीं आजच्या मताला कशीं येऊन पोंचलीं ह्याचा इतिहास मनोरंजक असला तरी तूर्त त्याची आवश्यकता नसल्यामुळें सध्यां जे पक्ष अस्तित्वांत आहेत त्यांच्या मतांत विरोध कोणता आहे तेवढें पाहूं. रिपब्लिक पक्षांत भांडवलवाल्यांचा भरणा अधिक असल्यानें तो पक्ष संरक्षक जकातीला अनुकूल आहे; आणि ह्या पक्षाचेंच वर्चस्व सध्यां त्या देशांत विशेष असल्यामुळें ह्या संरक्षक जकाती वाढतां वाढतां कारखानदारांस मात्र फायदेशीर पण मध्यम व मजूर वर्गास अत्यंत जाचक झाल्या आहेत. डेमोक्रॅट पक्षांत मध्यम वर्ग आणि कामकरी ह्यांचा भरणा आहे. सबब त्या पक्षाचें धोरण खुल्या व्यापाराच्या बाजूचें आहे. ह्याशिवाय अलीकडे त्या देशांत व्यापारी संघांचें ( Trusts ) बंड माजल्यामुळें हे दोन्हीहि पक्ष ह्या संघाचा बीमोड करावा म्हणून म्हणत असतात. परंतु १८९६ पासून डेमोक्रॅट पक्ष अधिकारारूढ झालाच नाहीं. तेव्हां त्या पक्षाकडून संघ मोडले जातील कीं नाहीं ह्याचें प्रत्यंतर पाहण्याचा प्रसंगच आला नाहीं. रिपब्लिकन पक्षाच्या अध्यक्षांपैकीं प्रे. रूझवेल्टनें प्रथम कांहीं दिवस ह्या भांडवलवाल्यांच्या संघास विरोध करण्याचा प्रयत्न केला. पण त्यांत त्यास यश आलें नाहीं म्हणून त्यानें तो नाद सोडून दिला. पुढे टॅफ्ट हा रिपब्लिकन पक्षाचाच अध्यक्ष रूझवेल्टच्या पाठीमागून व त्याच्या अनुमतीनेंच अधिकारारूढ झाला. त्या वेळीं मार्गन रॉकफेलर प्रभृति कोट्याधीशांची खोड मोडून त्यांनीं केलेली रॉकेल तेलाची व पोलादाच्या व्यापाराची कोंडी फोडावयाची असा संकल्प ठरला होता आणि रूझवेल्टपेक्षां या कामीं टॅफ्टनें अधिक मेहनत केली; परंतु अद्यापि एका नाहीं एका रूपानें हे संघ अस्तित्वांत आहेतच. तेव्हां आतां माजी अध्यक्ष रूझवेल्टची स्वारी पुनः हे संघ मोडण्याची प्रतिज्ञा करून पुढें आली आहे. एकाच पक्षांतील टॅफ्ट-रूझवेल्टसारखे समान योग्यतेचे उमेदवार पुढें आल्यामुळें यंदाच्या अध्यक्षाच्या निवडणुकीसंबंधीं फारच गडबड उडून राहिली आहे.

### निवडणुकीची मर्यादा

इ. स. १९०१ सालीं अध्यक्ष मॅकिन्ले ह्याचा एका अराजक पक्षाच्या माथेफिरूनें खून केल्यामुळें त्या वेळचा उपाध्यक्ष रूझवेल्ट मॅकिन्लेच्या राहिलेल्या मुदतीपुरता अध्यक्ष झाला. इ. स. १९०४ सालीं नवी निवडणूक झाली, त्या वेळीं रूझवेल्ट हाच अध्यक्ष निवडला गेला; म्हणजे १९०१ ते १९०८ पावेतों सात वर्षे रूझवेल्ट अधिकारावर होता. संयुक्त संस्थानांची जी शासनपद्धति (Constitution) १७८८ सालीं ठरली तींत अध्यक्षाच्या जागेवर असलेल्या इसमानें पुनः पुढील निवडणुकीकरितां उमेदवार राहण्याला प्रतिबंध ठेवलेला नाहीं. तेव्हां अर्थात् कोणाहि पुढाऱ्यास सतत १०–२० वर्षे किंबहुना आपल्या हयातीपर्यंत अध्यक्षपद

उपभोगण्यास कायदा आडवा येऊं शकत नाहीं. तथापि १७८८ सालीं राज्यशासनपद्धति ठरल्यावर पहिल्या दोन निवडणुकींत प्रसिद्ध देशभक्त व वीर जॉर्ज वॉशिंग्टन ह्याचीच अध्यक्षाच्या जागीं एकमतानें योजना झाली. पण १७९६ सालीं जेव्हां तिसरी निवडणूक होण्याची वेळ आली त्या वेळीं, अनुयायांनीं गळ घातली असतांना देखील वॉशिंग्टननें तो मान तिसऱ्या वेळीं स्वीकारण्याचें नाकारलें. कारण अशी पद्धति पडल्यास लोकसत्ताक पद्धतीचें स्वरूप बदलून जाऊन तिला नियंत्रित राज्यपद्धतीचें स्वरूप येऊं लागेल असें त्याचें मत पडलें. वॉशिंग्टन-सारख्या महात्म्यानें तो मान लागोपाठ तीन वेळां स्वीकारण्याचें नाकारलें; त्या वेळेपासून त्या राष्ट्रभक्ताच्या स्वार्थत्यागाला व स्वदेशहितबुद्धीला मान देण्यासाठीं कोणीहि उमेदवार तिसऱ्यांदा अध्यक्षपदासाठीं पुढें येऊं इच्छित नाहीं. पण १९०४ सालीं रूझवेल्ट हा अध्यक्ष झाला, तत्पूर्वीची त्याची पहिली, म्हणजे १९०१ ते १९०४ पर्यंतची, कारकीर्द ही हक्काची नसून मॅकिन्लेच्या बदली तो तें काम पाहात होता. सबब लागोपाठ तीन वेळां अध्यक्षाच्या जागेसाठीं तो उमेदवार उभा राहिला असा आक्षेप १९०८ सालीं कोणी घेऊं शकला नसता. तथापि सात वर्षें कामाचा अनुभव घेतल्यावर विश्रांतीची अपेक्षा वाटल्यामुळें असो, अथवा आपल्या मनोदयाप्रमाणें व्यापारी संघ मोडण्याचें काम आपल्या हातून पार पडलें नाहीं म्हणून नाउमेदीनें असो, १९०८ सालीं रूझवेल्टनें आपण माघार घेऊन टॅफ्ट यास अधिकारारूढ होण्याची संधि दिली. टॅफ्टनें आपल्या कारकीर्दींत रॉकेल तेलाचे, पोलादाचे, आगगाड्यांच्या कंत्राटाचे वगैरे अनेक संघ मोडण्यासाठीं कायदा पास करून घेतला व त्याविरुद्ध वर्तन करणाऱ्यांस कोर्टापुढेंहि खेंचून आणलें. पण भांडवल-वाल्यांच्या एकजुटीपुढें त्याचें कांहींएक न चालून बहुतेक संघ पूर्वींप्रमाणेंच अद्यापि चालू राहिले आहेत. ही झटापट चालू असतांना रूझवेल्टनें असें बोलून दाखविलें होतें कीं, मी स्वतः यापुढें अध्यक्षपदाकरितां उमेदवार न होतां टॅफ्ट याचीच पुनश्च निवडणूक व्हावी म्हणून खटपट करीन; परंतु पुढें काय झालें असेल. तें असो. नवीन निवडणुकीचे दिवस समीप येऊं लागतांच रूझवेल्टची स्वारी अचानक पुढें आली आणि टॅफ्टवर भलभलते आरोप लादून आपलें घोडें पुढें ढकलण्याची त्यानें शिकस्त केली! आणि 'येन केन प्रकारेण' परपक्षाचा पाडाव करावयाचा एवढीच दृष्टि असल्यामुळें जे कित्येक घाणेरडे प्रकार सुरू झाले त्यांची हकीकत देण्याचें कारण नाहीं. मात्र ह्या झटापटीचें मुख्य साधन जें लोकमत तें आपल्याकडे वळवून घेण्याचा व तें प्रदर्शित करण्याचा प्रयत्न कसा चालतो तें पाहूं.

### निवडणुकीची पद्धति

संयुक्त संस्थानांत कायदेकानू करणाऱ्या दोन सभा आहेत. पहिली सीनेट सभा आणि दुसरी लोकप्रतिनिधि सभा. पहिल्या सभेंत प्रत्येक संस्थानाकडून दोन सभासद पाठविले जातात. संस्थान लहान असो वा मोठें

असो, सीनेट सभेंत प्रत्येकाचे प्रतिनिधि सारखेच असावयाचे. आजमितीला संयुक्त संस्थानांच्या जुटींत ४८ संस्थानें आहेत. तेव्हां अर्थात् सीनेट सभेंत ९६ सभासद झाले. लोकप्रतिनिधि सभेंत मात्र प्रत्येक संस्थानाला लोकसंख्येच्या प्रमाणांत प्रतिनिधि पाठविण्याचा हक्क आहे. सर्वांत मोठें संस्थान न्यूयॉर्क असल्यानें पूर्वी या संस्थानाचे ३७ प्रतिनिधि असत. १९११ सालीं खानेसुमारी होऊन लोकसंख्या वाढली त्या प्रमाणानें प्रतिनिधींची संख्याहि वाढून ती ४३ झाली आहे. इ. स. १९११ पूर्वी सर्व ४६ संस्थानांत मिळून ३८६ लोकप्रतिनिधि निवडले जात असत, त्यांची संख्या चालू सालीं ४४० झाली आहे. संयुक्त संस्थानांची खानेसुमारी नऊ कोटींवर आहे. त्या मानानें पाहतां दोन लक्ष वस्तीच्या भागास एक प्रतिनिधि असें साधारण प्रमाण पडतें. परंतु ह्या संघांत चार-पांच संस्थानें इतकीं लहान आहेत कीं, त्यांची लोकसंख्या एक लाखापेक्षांहि कमी आहे. तरी पण अगदीं चिमुकल्या संस्थानाचा सुद्धां निदान एक तरी प्रतिनिधि सभेंत असलाच पाहिजे, असा नियम असल्यानें तेवढ्या संस्थानापुरतें हें प्रमाण लागू पडत नाहीं. असो; सीनेट सभा आणि लोकप्रतिनिधि सभा दोनहि मिळून हल्लीं ५३६ प्रतिनिधि आहेत. आतां अध्यक्षाची जी निवडणूक करावयाची त्या निवडणुकींत मत देण्याचा अधिकार प्रत्येक वयांत आलेल्या (म्हणजे २१ वर्षें पूर्ण झालेल्या) पुरुषास आहे. अनाथगृहांतले भिकारी, अथवा शिक्षा भोगीत असलेले किंवा भोगून बाहेर पडलेले गुन्हेगार ह्यांना मात्र मत देण्याचा अधिकार नाहीं. त्याचप्रमाणें उपऱ्या लोकांसहि हा हक्क नाहीं. कांहीं संस्थानांत निरक्षर लोकांनाहि मत देण्याची मनाई आहे व ती योग्य आहे. पण तो नियम सर्व संस्थानांत सारखाच लागू नाहीं. अशा रीतीनें मत देण्याला अपात्र लोकांची संख्या वजा जातां एकंदर नऊ कोटि लोकसंख्येपैकीं जवळजवळ दोन कोटि लोकच मत देण्याला पात्र ठरतात. ह्या दोन कोटि लोकांच्या मतानें अध्यक्षांची निवड व्हावयाची खरी; परंतु ही निवड प्रत्यक्ष न होतां अप्रत्यक्ष होणेंच सोयीचें असल्यानें तसे नियम ठरविण्यांत आले आहेत. प्रत्येक संस्थानांतील मतदारांकडून, दर चार वर्षांनीं नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यांत ठरलेल्या एकाच दिवशीं, अध्यक्ष निवडण्याची कामगिरी करण्याकरितां प्रतिनिधींची निवडणूक होते. दर-एक संस्थानांतून जितके प्रतिनिधि कॉंग्रेसला (सीनेट व लोकसभा मिळून) जातात तितकेच प्रतिनिधि अध्यक्षाची निवड करण्याकरितां निवडले जातात; म्हणजे नेवाडासारख्या अत्यंत लहान संस्थानांतून कमींत कमी तीन आणि न्यूयॉर्क संस्थानांतून जास्तींत जास्त ४५ प्रतिनिधि निवडावयाचे असतात. हे प्रतिनिधि कॉंग्रेसचे सभासद किंवा सरकारी अधिकारी असूं नयेत असा नियम आहे. चालू सालीं नोव्हेंबर महिन्यांत सर्व ४८ संस्थानांत मिळून ५३६ 'अध्यक्ष-नियोजक' प्रतिनिधि निवडले जातील. ही निवडणूक झाल्यावर त्या त्या

संस्थानचे प्रतिनिधि आपल्या संस्थानच्या मुख्य स्थानीं जमून अध्यक्षाच्या जागेकरितां जे उमेदवार असतील त्यांतून आपापल्या पक्षाच्या आवडीप्रमाणें मतें दतात. ह्या कारणामुळें नोव्हेंबर महिन्यांत होणारी ही निवडणूक सुलभ असून तिचा परिणाम काय होणार हें सर्वांस आगाऊ कळलेलेंच असतें. कारण ज्या वेळीं 'अध्यक्षनियोजक' प्रतिनिधींची निवड होते त्याच वेळीं त्या प्रतिनिधींनीं कोणत्या उमेदवारास मत द्यावयाचें तें ठरलेलेंच असतें; आणि कोणीहि प्रतिनिधि आपल्या पक्षाच्या ठरावाविरुद्ध वागत नाहीं. पण अध्यक्षाच्या जागेकरितां उमेदवार पुढें करण्याचें कामच काय तें मोठ्या विचाराचें व अत्यंत बिकट असतें.

### उमेदवारांची निवड

सांप्रत संयुक्त संस्थानांत 'रिपब्लिकन्स्' व 'डेमोक्रॅट्स्' असे दोन प्रमुख पक्ष आहेत. प्रत्येक पक्षाच्या लोकांना आपल्या तर्फेचा इसम अध्यक्ष व्हावा अशी मनीषा असते. पण ४८ संस्थानांतील सर्व रिपब्लिकन किंवा डेमोक्रॅट मतदारांमध्यें आपल्या बाजूचा कोण उमेदवार पुढें करावा ह्यासंबंधीं मतभेद असणारच. हल्लीं जी अमेरिकेंत दंगल चालली आहे ती ह्याच मतभेदामुळें होय. रिपब्लिकन पक्षातर्फे टॅफ्ट, रूझवेल्ट, लॅफोलीट, ट्रॅमिन्स्, ह्यूज इत्यादि उमेदवार पुढें आले होते. त्यांत खरा सामना पहिल्या दोघांतच होता. दोघेहि वीर समान गुणाचे व योग्यतेचे असल्यास मतदारांची धांदल अधिक होते. अशा वेळीं आपल्या हस्तकांच्या साहाय्यानें प्रत्येक संस्थानांतून आपल्या बाजूला मतें मिळविण्याची खटपट सुरू होते. ह्या कामाची पूर्वतयारी म्हणून ठिकठिकाणीं त्या त्या पक्षाच्या सभा पोट-सभा असून अगदीं यःकश्चित् खेड्यापासून तों बड्या शहरापर्यंत ही सभांची मालिका लागलेली असते. ह्या सभांमार्फत प्रत्येक मतदाराच्या मताची छाननी होऊन त्याचें नांव अनुकूल, प्रतिकूल अगर त्रयस्थांच्या यादींत दाखल होते. मग साधल्यास त्रयस्थांचें, साधल्यास प्रतिकूलाचें सुद्धां, मन वळविण्याचा प्रयत्न चालतो. ह्या कामांत लांचलुचपतीचा, बक्षिसांचा, सोयीचे कायदे करण्याच्या वचनांचा सर्व कांहीं प्रकार चालतो. त्याचें वर्णन करण्यापेक्षां वाचकांनीं त्याची कल्पनाच करावी हें बरें! आपल्या पक्षाचा उमेदवार अध्यक्ष झाल्यास त्याला दीड-दोन लक्ष सरकारी नोकरांची बहाली, बढती अगर बडतर्फी करण्याचा अधिकार असतो, एवढें सांगितलें म्हणजे नुसत्या एवढ्या मधाच्या बोटानेंच किती जणांस गुंगवितां येईल ह्याची वाचकांस कल्पना होईलच. अशा रीतीनें पूर्व तयारी केल्यावर आपल्या पक्षाचा उमेदवार निवडण्याकरितां शिकॅगो, न्यूयॉर्क, बाल्टिमोर वगैरेसारख्या कोणत्या तरी बड्या शहरांत त्या पक्षाचे प्रतिनिधि जमतात. नोव्हेंबर महिन्यांत निवडावयाच्या 'अध्यक्षनियोजक' प्रतिनिधींच्या दुप्पट प्रतिनिधि ह्या वेळीं सर्व संस्थानांतून एकाच शहरीं जमतात. ही सर्व व्यवस्था खाजगी रीतीची ज्या त्या पक्षानें आपल्याला सोयीची वाटेल तशी नियमबद्ध केलेली असते. उमेदवार ठरविण्याकरितां जी

ही खासगी सभा भरते तिला कन्व्हेन्शन् म्हणतात. रिपब्लिकन पक्षाची कन्व्हेन्शन् यंदा जून महिन्यांत शिकॅगो शहरीं भरली होती; त्या वेळीं एकंदर संस्थानांत मिळून १०७२ प्रतिनिधि जमले होते. ह्या कन्व्हेन्शन्मध्यें बरीच धामधूम व कांहीं असभ्य प्रकार सुद्धां होऊन अखेरीस रिपब्लिकन पक्षानें ५६१ मतांनीं टॅफ्ट ह्यासच आपला उमेदवार ठरविलें. ह्या सभेंत रूझवेल्टनें आपल्या तर्फेचें मताधिक्य करण्याकरितां जंगजंग पछाडलें परंतु त्याचा जय झाला नाहीं. त्याला अवघीं १०७ मतें पडलीं आणि ३४८ इसमांनीं त्याच्यातर्फेनें मतें द्यावयाचीं तीं कांहीं तक्रारीमुळें तहकूब ठेवलीं. तीं जमेस धरून सुद्धां टॅफ्टपेक्षां त्यास ११० मतें कमी पडलीं. तेव्हां अर्थात् टॅफ्ट हाच रिपब्लिकन पक्षाचा उमेदवार ठरला. रूझवेल्टनें रिपब्लिकन पक्ष सोडून प्रोग्रेसिव्ह ( प्रागतिक ) नांवाचा निराळाच पक्ष स्थापण्याची धमकी दिली आहे.

रिपब्लिकन्सची कन्व्हेन्शन् आटपल्यावर डेमोक्रॅटनीं आपली कन्व्हेन्शन् बाल्टिमोर शहरीं भरविली. ह्या पक्षातर्फे ब्रायन, , क्लार्क, वुइल्सन् प्रभृति उमेदवार आहेत. अमेरिकेंतील निवडणुकींत असा एक नियम असतो कीं, एखाद्या उमेदवाराला केवळ इतरांपेक्षां अधिक मतें मिळालीं एवढ्यानेंच त्याची निवडणूक होत नाहीं. रिपब्लिकन पक्षाच्या कन्व्हेन्शन्मध्यें १०७२ प्रतिनिधि होते. त्यांतून टॅफ्ट ह्यास निम्याहून अधिक मतें ( ५६१ ) पडलीं म्हणून त्याची निवडणूक पसंत झाली. पण जरकरितां त्यास पांचशेंच मतें पडून बाकीचीं मतें रूझवेल्ट, लॅफोलीट वगैरे उमेदवारांत विभागलीं गेलीं असतीं तर टॅफ्टचा पहिला नंबर येऊनहि त्याची निवडणूक झाली असें ठरलें नसतें. असा प्रकार झाल्यास पुनः मतें घ्यावीं लागतात, आणि कोणत्या तरी एक-दोघां उमेदवारांच्या पक्षाचे प्रतिनिधि आपला हेका सोडण्यास तयार नसतील तर हीं मतें घेण्याचें काम आठआठ दिवस चालून पन्नासपाउणशें वेळां सुद्धां मतें घेण्याचा प्रसंग येतो. इ. स. १८८० सालीं जेम्स गार्फील्ड हा तिसाव्या वेळीं उमेदवार पसंत झाला. जास्तींत जास्ती ७३ वेळां मतें घेतल्याचेहि दाखले आहेत! हल्लीं डेमोक्रॅट पक्षाचे ब्रायन, क्लार्क, वुइल्सन् असे तीन प्रमुख उमेदवार होते. तिघांचेंहि समान बल असल्यास प्रत्येकाला तीन-साडेतीनशेंपर्यंत मतें पडणार, मग त्यांत पहिला कोणी का येईना, त्याची मातब्बरी नाहीं. अशा वेळीं तिघांहि उमेदवारांच्या बाजूचे प्रतिनिधि जर आपला हट्ट धरून बसले तर पुनः पुनः मतें घेऊनहि काम भागत नाहीं. मग अशा वेळीं तडजोड म्हणून तिसराच कोणी नवा उमेदवार पुढें आणणें भाग पडतें. ह्याला ( Dark Horse ) म्हणजे 'बेरंगी उमेदवार' म्हणतात. ह्याची विशेष प्रसिद्धीहि नसते; पण उलट बाजूची त्याच्याबद्दल नावडहि नसते; टॅफ्ट व रूझवेल्ट ह्यांचा तंटा लवकर मिटला नसता तर असा 'बेरंगी उमेदवार' पुढें येण्याचा संभव होता. तथापि त्याचा निकाल लवकर टॅफ्टला अनुकूल असा झाला. डेमोक्रॅट पक्षांत तर उमेदवार निवडावयास मतांची संख्या दोनतृतीयांश पाहिजे असा नियमच आहे. म्हणजे १०७२

प्रतिनिधींपैकीं निदान ७१६ प्रतिनिधींनीं एकालाच मतें दिलीं पाहिजेत, तेव्हां तो उमेदवार पसंत ठरावयाचा. हा नियम रद्द करून निम्म्याहून अधिक मतें मिळालीं म्हणजे पुरें, असा नियम करावा अशी ब्रायनची सूचना होती. पण उमेदवाराच्या निवडणुकींखेरीज इतर कामासंबंधीं हा नियम मीं सुचवला आहे असा पुढें खुलासा करण्यांत आल्यानें तो वाद थांबला. रिपब्लिकन्सची निवडणूक जशी तडकाफडकी आटपली तशी डेमोक्रॅट्सची आटपली नाहीं. ब्रायन् हे पहिल्यापासून नाउमेद होऊन मागें पडले. पुढे वुइल्सन् आणि क्लार्क ह्यांच्यामध्यें झटापट सुरू झाली. ह्या दोघांखेरीज अंडरवुड् वगैरे उमेदवार होते त्यांची सरशी होण्याची आशा बिलकूल नव्हती. पण त्यांच्या वांटणीला जीं कांहीं शें-दोनशें मतें जात त्या योगानें ७१६ मतांची एका उमेदवाराला भरती होणें दुरापास्त झालें. ही धांदल आठआठ दिवस चालून चाळीस वेळां मतें मोजण्यांत आलीं. पण पुनः येरे माझ्या मागल्या आहेच. कधीं क्लार्कला चारशें-पांचशेंपर्यंत मतें पडत तर कधीं वुइल्सनचें पारडें त्याच मानानें जड किंवा हलकें होई. मतें देतां देतां प्रतिनिधि थकून गेले. विश्रांतीसाठीं सभा तहकूब ठेवण्यांत आली. पुढें काय करावें याविषयीं खलबतें सुरू झालीं. अखेर पंचेचाळिसाव्या पाळीस अंडरवुडनें माघार घेतली. तेव्हां त्याचीं पन्नासएक मतें वुइल्सनला मिळून त्याची सहाशें जवळजवळ संख्या भरत चालली. क्लार्कच्या पक्षाच्या लोकांनीं आणखी एकवार प्रयत्न करून पाहिला, परंतु त्यांतहि त्यांना हार खावी लागल्यानें क्लार्कनें आपण माघार घेतल्याचें जाहीर केलें. त्या-बरोबर सर्व तंटा मिटून सर्वानुमतें वुइल्सनची निवडणूक कायम झाली.

### निरनिराळ्या पक्षांचें धोरण

ह्याप्रमाणें रिपब्लिकन पक्षातर्फे टॅफ्ट आणि डेमोक्रॅट पक्षातर्फे वुइल्सन् असे दोन उमेदवार निश्चित ठरले; आणि नोव्हेंबर महिन्यांत त्या दोघांपैकीं बहुमतानें अखेरची निवडणूक कोणाची होईल तें पाहावयाचें. रिपब्लिकन पक्षच अधिकारा-रूढ झाल्यास आयात मालावरील जकाती आणि ट्रस्ट्स् (व्यापारीसंघ) कायमच राहतील. डेमोक्रॅट पक्षाची सरशी झाल्यास हे संघ मोडण्याचा आणि आयात मालावरील जकाती कमी करण्याचा प्रयत्न केला जाईल. पण त्यांत त्यास यश येईलच असें नाहीं; कारण इंग्लंडांत जसें प्रधानमंडळास लोकसभेचें भरपूर पाठबळ असतें तसें संयुक्त संस्थानांच्या अध्यक्षाला कॉंग्रेसचें पाठबळ असतेंच असें नाहीं. उमेदवार जर दोघेच असले तर ज्याचा पहिला नंबर येतो त्याला अर्ध्याहून अधिक मतें पडलेलीं असतातच; म्हणून अमेरिकन कायद्याप्रमाणें त्याची निवडणूक कायम होते. पण दोहोंपेक्षां अधिक उमेदवार असल्यास नुसता वर नंबर येऊन भागत नाहीं. पांचशेंछत्तीस 'अध्यक्षनियोजकां'पैकीं निदान २६९ मतें ज्यास मिळतील तोच अध्यक्ष होऊं शकतो. यंदा टॅफ्ट आणि वुइल्सन् खेरीज रूझवेल्ट हे 'प्रागतिक' असा तिसराच एक नवा पक्ष स्थापन करून त्याच्या

मार्फत उमेदवार होऊन पुढें येणार आहेत. ह्या पक्षाचें कन्व्हेन्शन् ता. १ ऑगस्ट रोजीं शिकॅगो येथें भरावयाचें आहे. ह्या पक्षाचे आद्य प्रस्थापकच रूझवेल्ट असल्यानें तेथें त्यांना प्रतिस्पर्धी कोणी उभा राहणार नाहीं. तेव्हां केवळ स्वतःच्या जोरावर हे 'तिसरे नवरदेव' पुढें येणार! असे तीन उमेदवार पुढें आल्यानें मतदारांना मतें देण्याची मोठी पंचाईत पडते. टॅफ्ट व रूझवेल्ट ह्यांचें सामान्य धोरण सारखेंच असल्यामुळें रिपब्लिकन पक्षांत दोघांचेहि अनुयायी जवळ-जवळ सारखेच आहेत. त्या योगानें 'अध्यक्षनियोजकां'पैकीं रिपब्लिकन पक्षाच्या प्रतिनिधींत फूट पडून डेमोक्रॅट पक्षाचें आयतेंच काम साधेल आणि त्यांचाच उमेद-वार वुइल्सन् हा अध्यक्ष होईल. परंतु रिपब्लिकन प्रतिनिधींनीं 'अन्यैस्सह विरोधे तु वयं पंचाधिकं शतम्' ह्या नीतीचा अवलंब केल्यास टॅफ्टची निवडणूक होण्याचा संभव जास्ती आहे. एकंदरींत शक्याशक्यतेच्या दृष्टीनें टॅफ्ट, वुइल्सन् व रूझवेल्ट असा अनुक्रम आज लावतां येईल.

आतां या तिघां उमेदवारांतून कोणासच अर्ध्याहून अधिक ( म्हणजे निदान २६९ ) मतें न पडतील तर त्याचा निकाल लावण्याचें काम कायद्यानें काँग्रेसकडे सोपविलें आहे. समजा कीं, नोव्हेंबरांत प्रत्यक्ष मतें घेऊन पाहतां टॅफ्ट यास २४०, वुइल्सनला २०० आणि रूझवेल्टला बाकीचीं ९६ मतें मिळालीं. ह्यांत टॅफ्टचा नंबर पहिला आला तरी कायद्याप्रमाणें निम्म्यापेक्षां अधिक मतें कोणासच मिळालीं नसल्यानें ह्यापुढें निवडणुकीचें काम काँग्रेसमधील लोकप्रतिनिधि सभेकडे जातें, आणि तेथें संयुक्त संस्थानांत जितकीं संस्थानें सामील असतील तितक्या संस्थानांच्या प्रतिनिधींनीं आपापल्या संस्थानातर्फे एकच मत द्यावयाचें; ह्या प्रकारें लोकप्रतिनिधि-सभेनें निवडणूक करावयाचे प्रसंग आतांपर्यंत तीनचार वेळां आले आहेत.

### निवडणुकीचा खर्च व खटाटोप

अशा रीतीनें दर ४ वर्षांनीं एकदां संयुक्त संस्थानांत जिकडे तिकडे दंगल माजून जाते. बहुतकरून अध्यक्षाची निवड व्हावयाच्या आधीं पांच-सात महिन्यांपासून इतर सर्व कामांकडे दुर्लक्ष होऊन लोकांना हाच वेध लागतो. खुद्द काँग्रेसमध्यें सुद्धां जरूरीच्या कामांखेरीज इतर कामें पुढें येतच नाहींत. स्वतः अध्यक्षाला आपण पुनः निवडून येऊं कीं नाहीं याची वानवाच असल्यामुळें त्याचेंहि कामांतून मन उडून जातें. मतें घेण्याची धांदल सुरू झाली म्हणजे वर्तमानपत्रांना देखील इतर कोणत्याहि विषयांकडे लक्ष देतां येत नाहीं. ह्या निवडणुकीच्यापायीं पैसा किती खर्च होतो ह्याचा तर सुमारच नाहीं. लांचलुचपतीचा प्रकार चालतो तो वेगळाच; पण नुसता उघडउघड दिसणारा जरूरीचा खर्च प्रत्येक जिल्ह्यांत पांच-सात लाख रुपये येतो. ह्यांतून बहुतेक खर्च आपापल्या पक्षाच्या लोकांकडून वर्गणीनें वसूल केला जातो आणि कमी पडेल तो ज्या उमेदवाराकरितां ही सर्व खटपट असेल त्याला करावा लागतो. ह्या सर्व प्रकारामुळें सर्वथैव योग्य असेच उमेदवार अध्यक्षाच्या जागीं

निवडले जातात असें नाहीं; कारण ह्या सर्व दगदगीला त्रासून किंवा ह्या अशाश्वत मानापेक्षां इतर व्यवसाय अधिक सोयिस्कर वाटून पुष्कळ लायक इसम अध्यक्ष होण्याच्या भानगडींत पडत नाहींत. तथापि प्रत्येक पक्षाला प्रतिपक्षीयांवर छाप ठेवण्याची जरूरी भासत असल्यानें होतां होईल तों आपल्यांतील लायक इसमालाच ते पुढें करतात. म्हणून आजपर्यंत जे पंचवीस अध्यक्ष निवडले गेले त्यांत जॉर्ज वॉशिंग्टनच्या तोडीचे जरी थोडेच असले तथापि आपल्या कामाला नालायक इसम अध्यक्ष झाल्याचें उदाहरण क्वचितच आढळून येईल.

---

## पेशवाई जाऊन शंभर वर्षें झालीं : : २

[ पेशवाईच्या शतसांवत्सरिक उत्सवाच्या स्मरणार्थ हा लेख लिहिला आहे. दि. ३ जून १८१८ या दिवशीं दुसऱ्या बाजीरावानें आपल्या राज्याची सोडचिठ्ठी दिली. त्या वेळची परिस्थिति आणि त्यानंतरच्या शंभर वर्षांतील स्थित्यंतरें लक्षांत घेऊन इतिहासाचें सिंहावलोकन करणें हा हेतु या लेखांत मुख्यतः आहे. पेशवाई नष्ट होण्याला कोणतीं कारणें उपस्थित झालीं, महाराष्ट्राची त्या वेळची मनःस्थिति कशी होती आणि पुढें महाराष्ट्रावर पश्चात्ताप करण्याची पाळी कां व कशी आली, याचा ऊहापोह या लेखांत असून, परकी सत्ताधाऱ्यांना येथील अधिकारप्राप्तीपासून जर खरोखर आपलें हित साधावयाचें असेल तर त्यांनी आपलें धोरण कसें ठेवावें, याचेंहि दिग्दर्शन यांत केलें आहे. हा लेख लिहिला गेला त्या वेळीं पहिलें जर्मन महायुद्ध संपलें नव्हतें आणि हिंदुस्थानांत जबाबदार राज्यपद्धति सुरू करण्याची योजनाहि ठरली नव्हती. मॉंटेग्यु-चेल्म्सफर्ड रिपोर्टहि त्या वेळीं तयार झाला नव्हता. अशा वेळीं येथली ' एकमुखी अनियंत्रित राज्य-पद्धति बदलून स्वराज्यपद्धति येथें सुरू करणें अपरिहार्य झालें नाहीं काय, ' असा प्रश्न या लेखाच्या शेवटीं विचारला आहे. ही अपरिहार्यता त्या वेळीं ब्रिटिशांना पटली होती, तरी स्वराज्यदानाची कृति हातून प्रत्यक्ष घडण्याला दुसरें जर्मन महायुद्ध अंगावर यावें लागलें. तें कसेंहि असो, पण १८१८ सालीं बाजीरावानें आपल्या स्वराज्याचें उदक मालकमच्या हातावर सोडलें आणि बरोबर शंभर वर्षांनीं मालकमच्या वंशजांनीं तेंच स्वराज्य हिंदी लोकांना परत बहाल करण्याचा संकल्प केला, हा योगायोग लक्षांत घेण्याजोगा आहे. ]

( केसरी, दि. ४ जून १९१८ )

## शतसांवत्सरिक आढावा

आहार, निद्रा, भय इत्यादि व्यापार मनुष्यप्राण्याला व पशुपक्ष्यांना सारखेच असतात; मग मनुष्याला अधिक विशेष काय तर ज्ञान होय. पशुपक्ष्यांनाहि ज्ञान अगदींच नसतें असें नाहीं. त्यांनाहि कित्येक गोष्टींचें उपजत ज्ञान असतें व कांहीं बाबतींत तर त्यांचें ज्ञान मानवी ज्ञानाच्या पेक्षां वरचढ असतें! परंतु पशु-पक्ष्यांचें ज्ञान वर्तमानकाळानें बरेंचसें मर्यादित झालें असतें. मानवी ज्ञानाची ज्योत मात्र भूत व भविष्य या कालांत यथेच्छ संचार करीत असते. पूर्वी आपण कोण होतों, कसें होतों, आणि पुढें कसें होऊं असले विचार जर मनुष्यमात्राच्या मनांतून कायमचे नष्ट होतील, तर त्यांच्यांत व पशूंत 'पुच्छविषाणहीनत्वा'-शिवाय दुसरा कोणता भेद राहील? अर्थातच भूतकालीन स्थितीचें सिंहावलोकन आणि भविष्यत्कालाचें मनोराज्य हे दोन मनोव्यापार अत्यंत हीन स्थितींतील व्यक्तीस देखील स्फूर्तिदायक होतात; आणि म्हणूनच प्रत्येक मनुष्य केव्हांना केव्हां तरी या दोहोंतून कोणत्याना कोणत्या तरी एका मनो-व्यापारांत तल्लीन होऊन गेलेला आढळतो. हा जो सिद्धान्त व्यक्तीस तोच राष्ट्रासहि लागू पडतो. यांत फरक एवढाच कीं, व्यक्तीच्या आयुर्दायाच्या मानानें त्यांस जसें एक वर्ष तसें राष्ट्राच्या आयुर्मानाला शतसंवत्सर होय. यास्तव मनुष्य जसा आपल्या व्यवहारांत वार्षिक आढावा काढीत असतो, तसा राष्ट्रानेंहि शतसांवत्सरिक आढावा काढणें जरूर आहे.

वरील विचारसरणीस अनुसरून महाराष्ट्राचा गेल्या शतकाचा आढावा काढा-वयाचा विचार मनांत आणला तरी त्याचें आजमितीला औचित्य काय असा प्रश्न कदाचित् कित्येक वाचकांनीं केला असता; परंतु रा. न. चिं. केळकर यांनीं 'मराठे व इंग्रज' या नांवाचें पुस्तक लिहून व त्यावर मराठेशाहीचें शतसांवत्सरिक वाङ्मय-श्राद्ध असा शिक्का मारून अगाऊच गौप्यस्फोट करून ठेवला असल्यानें इतिहासान-भिज्ञ वाचकांसहि बुचकळ्यांत पडण्याचें कारण राहिलेलें नाहीं. ता. ३ जून १८१८ रोजीं मराठेशाहीची अखेर झाली. या विधिघटनेस शंभर वर्षें पुरीं झालीं. या शंभर वर्षांनंतर महाराष्ट्राची स्थिति काय आहे याचें सिंहावलोकन करण्याचा हाच योग्य प्रसंग असल्यानें त्यांत औचित्यभंगाचा दोष येण्याची भीति बाळगावयास नको. मराठेशाहीची अखेर ता. ३ जून १८१८ रोजीं झाली का त्याच्या आगेंमागें कधीं झाली याविषयीं कदाचित् मतभेद असूं शकेल, असें समजून रा. केळकर यांनी आपल्या पुस्तकांत या प्रश्नाची सांगोपांग चर्चा केलेली आहे; परंतु तो वाद आम्हांस तूर्तच्या प्रसंगीं अप्रस्तुत वाटतो. ता. ३ जून १९१८ हाच मराठेशाहीच्या खग्रास ग्रहणाचा काळ होय, असें आम्हीच मानतों असें नसून ज्या मालकमसाहेबानें बाजीरावाकडून राज्याचा राजिनामा लिहून घेतला त्यालाहि हा दिवस हिंदुस्थानांतील इंग्रजांच्या कारकीर्दीत अपूर्व वाटला. 'पहिला हिंदु

राजा आम्हांस बिनशर्त शरण आला असा हाच पहिला दिवस असून आमच्या अप्रतिहित शक्तीची सर्व हिंदुस्थानभर छाप बसण्याला हीच गोष्ट कारणीभूत झाली ', असें मालकमनें आपल्या रोजनिशींत लिहून ठेवलें आहे.

ता. ३ जून सन १८१८ रोजीं सकाळीं १० वाजण्याच्या सुमारास महाराष्ट्राच्या उत्तर सरहद्दीवर अशीरगड किल्ल्याच्या उत्तरेस २०–२५ मैलांवर कैरी नांवाच्या खेड्यानजीकच्या छावणींत काय प्रकार चालला होता त्याचें चित्र आमच्या वाचकांनीं कल्पनेच्या जोरावर आपल्या अंतश्चक्षूपुढें आणल्यास त्यास काय दिसेल बरें ? महाराष्ट्राचा शेवटचा हतभागी व नादान पेशवा आपली शेवटची छावणी सोडून आपला सर्व इतमाम व अभिमान बाजूस सारून इंग्रजांच्या छावणींत येऊन दाखल झाला आणि तेथें त्यानें आपल्या राज्याचें उदक मालकमसाहेबांच्या हातावर सोडलें ! रावबाजीनें कोणत्या अटीवर शरण यावें याची वाटाघाट तीन दिवस चालली होती. परंतु मालकमनें एकदां ज्या अटी कळविल्या त्यांत रेसभरहि माघार घेतली नाहीं; आणि अखेरीस ता. ३ जून रोजीं १० वाजतां बाजीरावानें मुठींत नाक धरून त्या सर्व अटी कबूल केल्या; आणि ८ लक्षांपेक्षां कमी नाहीं इतकें वार्षिक पेन्शन घेऊन आपल्या राज्याचा बेवारसा लिहून दिला.

### मराठेशाहीच्या ऱ्हासाचीं कारणें

बाजीरावावर असा दुर्धर प्रसंग कसा ओढवला आणि १०० वर्षांची पेशवाई अथवा १५० वर्षांची 'शिवशाही' अशी चुटकीसरशी नष्ट कशी झाली, हा मोठा कूट प्रश्न आहे. मालकमच्या हातावर राज्याचें उदक सोडण्यापूर्वी इंग्लिशांच्या कैचींतून निसटण्याकरितां बाजीरावानें खडकी, कोरेगांव, अष्टी इतक्या ठिकाणीं रणदेवतेची आराधना केली होती; परंतु देवता तरी भक्तांची श्रद्धा पाहूनच त्यांस प्रसन्न होत असते; आणि बाजीरावाची रणदेवतेवर किती निस्सीम श्रद्धा होती हें जगजाहीरच आहे ! तथापि बाजीराव पेशवा तसाच नादान व रणभीरु होता एवढेंच म्हटल्यानें हें गूढ उकलत नाहीं. १८०२ सालीं बाजीरावानें वसईचा तह करून राजीखुशीनें आपल्या पायांत खोडा अडकवून घेतला होता खरा; परंतु तो तह शिंदे, होळकर, भोसले प्रभृति मराठा मंडळाला बिलकूल मान्य नसल्यानें त्यांनीं इंग्रजांविरुद्ध हत्यार उपसलें होतें; आणि हे सरदार कांहीं बाजीरावासारखे कमकुवत, कच्च्या दिलाचे किंवा पळपुटे नव्हते; असें असतां त्यांच्याहि कपाळीं हरहमेष अपेशच कां लिहिलें गेलें ! मराठ्यांच्याखेरीज हिंदुस्थानांतले इंग्रजांचे दुसरे प्रतिस्पर्धी हैदर व टिपू हे होत. हे पितापुत्र समशेरबहाद्दर नव्हते असें त्यांचे शत्रु देखील म्हणूं शकत नाहींत; तथापि त्यांना देखील इंग्रजांच्या युद्धकलेपुढें हातच टेकावे लागले कीं नाहीं ! सारांश, व्यक्तिशः रावबाजी कितीहि बेहिमती व नतद्रष्ट असला तरी मराठेशाहीच्या ऱ्हासाचीं सामान्य कारणें दुसरीकडेच शोधलीं पाहिजेत.

मराठेशाही कां बुडाली याचें उत्कृष्ट विवेचन 'मराठे व इंग्रज' या पुस्तकांत ग्रंथकर्त्यांनीं सविस्तरपणें व निःपक्षपातीपणानें केलेंच आहे. त्याचें येथें खंडन अगर मंडन अथवा अनुवादहि करण्याची आवश्यकता नाहीं. तथापि कांहीं कारणांचें विशेष स्पष्टीकरण करूं. बाजीरावास महाराष्ट्रांत कोणत्याच सरदाराचें पाठबळ न मिळाल्यानें तो हताश होऊन महाराष्ट्र सोडून तापीपार होऊन इंग्रजांस शरण गेला. त्यांस सरदारांची मदत न मिळण्याला सरदारांचा बेइमानपणा आणि सरंजामी पद्धति हीं दोन कारणें पुढें करण्यांत येतात; परंतु ज्या बाजीरावानें आपल्या सबंध कारकीर्दीत एकाहि सरदाराशीं स्वतः इमान राखलें नाहीं आणि सरदारांच्या त्रासांतून सुटण्याकरितां म्हणून ज्यानें इंग्रजांच्या हातापाया पडून त्यांची सरंजामी फौज आपल्या राज्यांत ठेवून घेतली, त्याला ऐन आणीबाणीच्या प्रसंगीं आपल्या सरदारांनीं हातचें सोडलें, अशी तक्रार करण्यास जागाच उरली नव्हती. मराठेशाहींतील सरंजामी पद्धति मराठ्यांचें राज्य स्थापित होण्यास, तें वृद्धिंगत होण्यास आणि अनेक आघातांतून त्याचा बचाव करण्यास कारणीभूत झाली नाहीं असें म्हणतां येत नाहीं. शिवाय युरोपखंडांत देखील कवायती फौजेचें जेव्हां महत्त्व लक्षांत आलें तेव्हांच सरंजामी पद्धति मोडत चालली हें उघड आहे; मराठेशाहींत जोंपर्यंत कवायती फौजेची जरूरी भासूं लागली नव्हती तोंपर्यंत सरंजामी पद्धतीचा राज्याला चांगलाच उपयोग झाला, हें कोणासहि नाकारतां यावयाचें नाहीं. अर्थातच कवायती खड्या फौजेला सरंजामी पद्धति कितीहि विसंगत असली, तरी एके काळीं ती उपयुक्त होती म्हणूनच तिचा महाराष्ट्रांत अवलंब करण्यांत आला.

### युद्धकलेंत नवीन शोधांचा अभाव

सरंजामी फौजेचा मनु पालटून खड्या कवायती फौजेचा मनु सुरू झाला हें युरोपखंडांत तरी फ्रेडरिक धी ग्रेटच्या बापानेंच प्रथम ताडलें आणि स्वतः फ्रेडरिकनें या नव्या तऱ्हेचें सैन्य प्रथम उपयोगांत आणून आपलें राज्य वाढविलें. ही गोष्ट युरोपखंडांत १८ व्या शतकाच्या उत्तरार्धांतच घडली असल्यामुळें हिंदुस्थानांत तिचा पेशव्यांनीं तत्पूर्वी अवलंब केला नाहीं, याबद्दल हिणविण्याचें विशेष कारण दिसत नाहीं. तोफा, बंदुका, संगिनी इत्यादि नव्या तऱ्हेचीं हत्यारें मात्र युरोप खंडांत अनेक शतकें प्रचारांत असून, आणि युरोपिअन व्यापाऱ्यांनीं व राज्यकर्त्यांनीं त्यांचा हिंदुस्थानांतहि प्रसार केला असून, मराठ्यांनीं त्यांचा करावा तसा उपयोग केला नाहीं आणि ही हत्यारांची उणीवच अखेरीस त्यांच्या नाशास कारणीभूत झाली. युरोपखंडांत आजमितीला सगळ्या शास्त्रीय शोधांचें पर्यवसान युद्धकलेंत होत असून युद्धांतील जयापजय शास्त्रज्ञांच्या बुद्धिप्रकर्षावर अवलंबून आहे. हिंदुस्थानांत लढवय्या वर्ग व बुद्धिमान् संशोधक यांची अनेक शतकांपासून फारकत झाली असल्यानें युद्धकलेंत बुद्धिमत्तेचा कांहीं उपयोग आहे ही गोष्टच प्रथम हिंदी लोकांच्या लक्षांत आली नाहीं. आणि ज्या वेळीं ती लक्षांत आली त्या वेळीं युद्धकले-

तील त्यांचे गुरूच त्यांचे शत्रु बनल्यामुळें त्यांना हातोहात हार खावी लागली. याचीच पुनरावृत्ति आजमितीला तुर्कस्तान व इराण या देशांत घडून येत आहे.

भेदनीतीचा प्रभाव

मराठ्यांना आपल्या शत्रूंचे बातमेत कळत नव्हते. इंग्रज, पोर्तुगीज, फ्रेंच आले कोठून, त्यांचा उद्देश काय, त्यांना त्यांच्या देशांतून पाठबळ किती मिळण्यासारखें आहे वगैरे गोष्टींचा मागमूसहि लागत नसे. उलटपक्षीं युरोपिअनांना मराठ्यांच्या अंतःपुरांतल्याहि बित्तंबातम्या कळत इत्यादि गोष्टीला कित्येक लेखक निष्कारण नसतें महत्त्व देतात; परंतु संपादित द्रव्याचें रक्षण करणारा मालक व त्या द्रव्याचा अपहार करण्यास टपलेला भोंदू स्नेही या उभयतांच्या जागरूकतेंत नेहमीं अशी तफावत पडतेच. बाजीरावाच्या राज्यांतील खडान्‌खडा माहिती करून घेतल्याबद्दल ज्या इंग्रज बहाद्दरांची खरेशास्त्री इतकी वाखाणणी करितात त्याच इंग्रजांना जर्मन हेरांची लंडन शहरांत चाललेलीं कारस्थानें कळूं नयेत, अथवा जर्मनांचा हल्ला कोणत्या आघाडीवर येणार हें देखील अगदीं अखेरपर्यंत कळूं नये, याचा अर्थ काय ? याचा अर्थ इतकाच कीं, रक्षक व अपहारक यांच्या जागरूकतेचें प्रमाण १:१ असूनच नव्हे तर १००:१ असून देखील भागत नाहीं; कारण अपहारकांच्या चुकीचा कांहीं रक्षकाला फायदा घेतां येत नाहीं, पण रक्षकाची चुकी मात्र त्याला तात्काळ भोवते. मराठ्यांना सवत्या सुभ्याची आवड फार असे आणि त्यांच्या ठायीं संकलित देशाभिमानाचा अभाव होता, हा दोष मात्र कोणासहि नाकबूल करतां यावयाचा नाहीं. या दोषाचा फायदा कसा घ्यावा हें अकबराला कळलें होतें व इंग्रज तर त्या विद्येंत निष्णातच होते. म्हणूनच त्यांच्या राज्यांची वृद्धि होत गेली आणि अवरंगजेब व पोर्तुगीज यांना ती विद्या अवगत नव्हती, अतएव त्यांच्या सत्तेचा ऱ्हास झाला. सगळ्या शत्रूंना एकदम दुखवावयाचें नाहीं व एका शत्रूशीं लढतांना देखील त्यांच्याच संघांतला कोणी तरी घरभेद्या आपल्याजवळ नेहमीं बाळगावयाचा, या भेदनीतीचा इंग्लिशांनीं प्रत्येक कारस्थानांत उपयोग करून घेतला. बाजीरावाचें राज्य गिळंकृत करतांना त्यांनीं सातारच्या महाराजांस हातीं धरिलें आणि 'पेशवे पुंड बंडखोर होते ते गेले; पण खरी दौलत मागें शिल्लक राहिली. आम्ही मराठी दौलत पूर्वीप्रमाणेंच चालविणार आहों; गेलें तें राज्य पेशव्यांचें, महाराजांचें राज्य अबाधितच आहे', असा जाहिरनामा इंग्रजांनीं काढला व तेवढ्या शाब्दिक लालचीनें सर्व सरदार बाजीरावास सोडून चालते झाले; परंतु एकानेंहि या इंग्रज बहाद्दरास असें विचारलें नाही कीं, पेशवे जर पुंड व बंडखोर होते तर ते गेले हें ठीकच झालें; पण त्या बंडखोर पुंडांच्या ताब्यांतला मुलूख सातारच्या महाराजांना परत द्यावयाचा का तुम्हीच तो मधल्यामध्येंच लाटावयाचा ? पुंडखोर प्रधानाला प्रधानपदावरून दूर केलें तर राजाचा मुलूख खालसा कां ? बाजीराव पेशवे गेले तर त्यांच्या जागीं सातारकर महाराज दुसऱ्या

पेशव्यांची नेमणूक करतील! शिवाय पेशवे कितीहि पुंड झाले तरी त्यांनीं बाह्यतः तरी साताऱ्च्या महाराजांच्या नांवानें व त्यांच्याकडून अधिकाराचीं वस्त्रें आणवूनच पुण्याचा कारभार चालविला होता; परंतु एल्फिन्स्टनसाहेबांनीं तर महाराजांकडून अधिकारवस्त्रेंहि न घेतांच कारभार चालविला हें कसें!

### मालकमसाहेबाचें धोरण

असले अनेक प्रश्न इतिहासकार व नीतिशास्त्रकार विचारूं शकतील; परंतु त्या वेळीं इंग्रजांना असा सवाल विचारण्याची प्रत्यक्ष सातारकर महाराजांची किंवा एकाहि मराठा सरदाराची छाती नव्हती; किंबहुना इच्छाहि नव्हती. हीच तर हिंदी लोकांच्या वर्तनांतली मोठी गोम होय. पोर्तुगीजांप्रमाणें किंवा औरंगजेबाप्रमाणें इंग्रज जर सरसकट सर्वांस सारखेंच झोडीत उठले असते, तर मराठ्यांनींहि राजारामाच्या वेळेप्रमाणेंच एकजूट करून त्यांचा प्रतिकार खात्रीनें केला असता; परंतु इंग्रजांनीं हिंदी लोकांची ही गोम ओळखली असल्यामुळें कोणालाहि न दुखवितां एकेकाच्या तोंडावर एकेक तुकडा फेकीत त्यांनीं सर्व देश पादाक्रांत केला आणि ही त्यांची राजनीति अद्यापिहि जागृत आहेच. बाजीराव शरण आल्यास त्यास कसें वागवावयाचें हें देखील मालकमसाहेबांनीं याच धोरणावर ठरवून ठेविलें होतें. बाजीरावावर एकदम स्वारी करून त्यास पकडणें व ठार करणें त्यास अशक्य नव्हतें; परंतु तसें केलें असतां औरंगजेबानें संभाजीच्या बाबतींत जी चुकी केली तिचीच पुनरावृत्ति झाली असती. पण मालकम पडला पक्का धोरणी! आपल्या वरिष्ठांस लिहिलेल्या एका खलित्यांत तो असें लिहितो कीं, "महाराष्ट्रांतील सर्व दर्जांच्या व सर्व वर्गांच्या लोकांचा स्वभाव मला पुरता माहीत झाला आहे; त्यावरून मी सांगतों कीं, देशांत शांतता प्रस्थापित होण्याला व ब्रिटिशांची धवलकीर्ति पसरण्याला बाजीरावानें शरण यावें व आपखुषीनें राज्याधिकार सोडावा हेंच इष्ट आहे. तो जर ठार मारला गेला तर त्याच्याविषयीं मराठे लोकांस अनुकंपा उद्भवेल आणि दुसरा कोणी तरी महत्त्वाकांक्षी वारस पुढें होऊन सर्व मराठे आपल्या निशाणाखालीं एकत्र करील. बरें, त्याला पकडून कैदेंत टाकावा तर त्याला सोडविण्याचे यत्न होतील व कदाचित् तो कैदेंतून निसटला तर फिरून आमच्याविरुद्ध निशाण उभारील. यास्तव उत्तम मार्ग म्हणजे त्यानें आपण होऊन आमच्याकडे यावें, आपल्या सैन्यास रजा द्यावी, आपल्या राज्याची सोडचिठ्ठी लिहून द्यावी, आणि खुशाल आनंदांत पेन्शन खात राहावें; म्हणजे त्याचा सर्व लोकांच्या मनावर वेगळाच परिणाम होईल; आणि ज्या राज्याचें त्यानें आपखुषीनें दान केलें तें राज्य त्याला परत मिळवून देण्याचा कोणीहि प्रयत्न करणार नाहीं." या लेखावरून मालकमसाहेबांचें काय धोरण होतें तें उघड दिसतें व या हेतूप्रमाणें बाजीरावाला राजीखुषीनें राज्य सोडावयास लावण्यासाठीं त्यानें कडेकोट बंदोबस्त केला होता!

## परराष्ट्रीय घडामोडींचा परिणाम

अस्तु; मराठेशाहींतील अंतर्गत दोष आणि हिंदी लोकांच्या स्वभावांतील नैसर्गिक वैगुण्य यांच्या समुच्चयानें मराठेशाहीचा लोप झाला हें तर खरेंच; परंतु त्याला बाह्य जगांतील घडामोडीहि कारणीभूत झाल्या. फ्रेंच व इंग्रज यांच्यामध्यें अठराव्या शतकाच्या प्रारंभापासून युरोप खंडांत जो झगडा चालला होता त्याचें प्रतिबिंब हिंदुस्थानांतील कारस्थानावर पडल्याखेरीज राहात नसे. सप्तवार्षिक युद्धांतील फ्रेंचांच्या पराजयामुळें इंग्लिशांना मद्रास इलाख्यांत धुमाकूळ घालण्यास व हैदर आणि टिपू यांस तंबी देण्यास मुभा मिळाली. पुढें इजिप्त व आशियामायनरमध्यें नेपोलिअनचा पराभव होऊन तो निराश होऊन परत फ्रान्सला गेल्यानें टिपूचें मरण जवळ ओढवलें आणि टिपूची इंग्रजांच्या उरावरील कट्यार नाहीशी झाल्यानें वेलस्लीसाहेबाला बाजीरावास पाठीशीं घालून त्याच्याकडून वसईच्या तहावर सही घेऊन शिंदे व होळकर यांची नांगी मोडतां आली. त्यानंतर १८०५ पासून १८१५ पर्यंत युरोपांत नेपोलिअननें धुमाकूळ माजविल्यामुळें इंग्रजांनीं हिंदुस्थानांत बिलकूल हालचाल केली नाहीं. पण वाटर्लूच्या लढाईत नेपोलिअनचा नक्षा उतरतांच हिंदुस्थानांतहि इंग्रजांची कमान वर चढूं लागली; आणि ज्या मालकमसाहेबानें नुकतेंच वाटर्लूचें रणांगण व नेपोलिअनचा राजिनामा पाहिला होता तोच मालकम हिंदुस्थानांत येतांच त्यालाहि बाजीरावाच्या राजिनाम्याचीं सुखस्वप्नें पडूं लागलीं. आणि त्यानें बाजीरावाची सातारा मुक्कामीं भेट घेऊन 'तुजवर जर कांहीं कठीण प्रसंग आला तर मजकडे ये, मी तुझ्या दुःखाचा परिहार करीन', असें मधाचें बोट अगाऊ लावून ठेविलें आणि त्याच मधाच्या बोटानें बाजीराव नर्मदातीराकडे आकर्षिला गेला व अखेर जाळ्यांत सांपडला. "विनाशकाले विपरीतबुद्धिः" या म्हणीप्रमाणें नेपोलिअनची देखील जेथें बुद्धि चकली व तो नेमका इंग्लिश गलबतावर जाऊन जाळ्यांत सांपडला, तेथें बाजीरावालाच कांहीं दोष देण्याचें कारण नाहीं. 'येन केन प्रकारेण' का होईना, परंतु ता. ३ जून १८१८ रोजीं बाजीरावानें मराठेशाहीला तिलांजलि दिली आणि महाराष्ट्रावर कंपनी सरकारचा अंमल सुरू झाला. शंभर वर्षांनंतर या गतकालीन राजकीय डावपेंचाकडे पाहिलें असतां कोणते विचार व विकार मनांत उद्भवतात तें सांगण्याचें प्रयोजन नाहीं. तथापि या शतवार्षिक कालावधींत महाराष्ट्राची स्थिति काय झाली आणि तिचें पर्यवसान काय होणार याचें किंचित् दिग्दर्शन करून हा लांबलेला लेख आटपता घेऊं.

## राजसत्तेचा अकल्पित व्यापकपणा

परकीय राजसत्तेला हिंदी लोकांनीं इतर राष्ट्रांतल्याप्रमाणें निकरानें विरोध केला नाहीं, असें अनुमान कित्येक इतिहासकार काढतात, पण वस्तुस्थिति तशी नाहीं. हिंदी लोकांना धर्माचा, संस्कृतीचा, आचारविचारांचा, फार तर काय आपल्या पोषाखाचा देखील अभिमान आहे, मग राष्ट्राभिमान नसेल हें संभवतें तरी कसें?

तर मग आपला राज्यकारभार ते बिनदिक्कत दुसऱ्याच्या हवालीं करतात याचा अर्थ काय ? तर याची उपपत्ति अशी कीं, हल्लींच्या पाश्चात्य राष्ट्रांची राजसत्ता जशी सर्वव्यापी आहे तशी त्यांची राजसत्तेची कल्पना नव्हती. राजानें उत्पन्नाचा $\frac{1}{6}$ कर घ्यावा आणि अंतर्बाह्य शत्रूंचा बंदोबस्त करावा एवढेंच त्याचें काम. राजसत्तेंत व्यापारी सत्ता, धर्माधिकार, शिक्षणावर देखरेख अशा अनंत गोष्टींचा समावेश होतो अशी त्यांची कल्पना नव्हती; पण प्रत्यक्ष अनुभव तसा येऊं लागल्यापासून राजसत्तेंत आपलें अंग असणें जरूर आहे, असेंच हिंदी लोकांस वाटूं लागलें आहे. हातचें स्वराज्य गमावतांना मनांत इंग्रजांविषयीं जी आदरबुद्धि होती ती आज राहिली नाहीं, यांतलें मर्म तरी हेंच होय. स्वराज्यहानीबरोबर धार्मिक, नैतिक, बौद्धिक, शारीरिक, आर्थिक सर्वच प्रकारची जर हानि होऊं लागली तर शांततामय सुराज्यापेक्षां सदोष व दंग्याधोप्याचेंच का होईना पण स्वराज्य बरें, असें कोणास वाटणार नाहीं ? मराठेशाहींत इतर कितीहि दोष असले तरी त्या वेळीं महाराष्ट्रांत संपत्ति, पौरुषगुण, नशीब काढण्यास वाव व साधनें आणि आत्मविश्वास व इभ्रत हीं सर्वच निःसंशय उत्कटत्वानें वास करीत होतीं. त्यांच्या जागीं आज सर्वत्र लुलेपांगळेपणा भरला आहे.

### स्वराज्यदानाची पर्वणी हीच

सर्वंकष अशा परकीय सत्तेचा वरवंटा महाराष्ट्रभर शंभर वर्षें फिरल्यानें आमची राष्ट्रीय दृष्ट्या व वैयक्तिक दृष्ट्या किती घोर हानि झाली तें आमचें आम्ही जाणतों. तथापि 'इमे दोषाः स्वयं कृताः' अशी स्थिति असल्यामुळें आम्ही आमच्या वैयक्तिक अवनतीच्या दृष्टीनें सरकारास सवाल करीत नाहीं; परंतु ब्रिटिश सरकारास त्यांच्याच हिताच्या दृष्टीनें आम्ही अशी पृच्छा करितों कीं, महाराज, आपण जें बाजीरावाच्या हातून मराठी राज्याचें उदक आपल्या हातावर घेतलें तें कांहीं त्यापासून मोक्षप्राप्ति मिळणार होती म्हणून खास नव्हे. त्यापासून आपल्या साम्राज्यांत कांहीं प्रत्यक्ष लाभ व्हावा म्हणूनच हा उपाध्येपणा आपण पत्करला; परंतु शंभर वर्षांच्या कालावधीनंतर महाराष्ट्रापासून आपल्या साम्राज्यास कितीसा उपयोग होत आहे ? नुसत्या महाराष्ट्रांत पेशव्यांचा व त्यांच्या सरदारांचा मिळून ६०–७० हजारांपर्यंत घोडा नांदत असे. घोडा नाहीं असें घर सहसा महाराष्ट्रांत आढळत नसे आणि पेशवे स्वारीवर निघतांच नालबंदी घेऊन स्वारींत येण्यास लाखो लोक तयार असत. यावरून महाराष्ट्रांत शिपाईगिरी किती भरपूर नांदत होती तें दिसून येतें आणि आजची स्थिति काय आहे ? शेतकी व व्यापारी दृष्टीनें पाहिलें तरी तीच रडकथा ! आज महायुद्धामुळें देशाचा माल व परमुलुखांतला माल येईनासा होतांच पोटाला चिमटा घेण्याची व रस्त्यांतून अंधारांतून हिंडण्याची पाळी आली आहे. शंभर वर्षांत सुताच्या व कापडाच्या गिरण्यांखेरीज इतर कोणते मोठे कारखाने निघून साम्राज्याच्या संपत्तींत भर पडली ? शेतीचें

उत्पन्न शंभर वर्षांत किती पटीनें अधिक वाढलें ? नाहीं म्हणावयाला अबकारीचें उत्पन्न मात्र पेशव्यांच्या वेळीं अवघें ५० रुपये होतें तें आज २॥ कोटि झालें आहे ! महाराष्ट्रांतील बुद्धिमत्तेचा आज आपण कितीसा उपयोग करून घेत आहां ? असे अनेक प्रश्न आपल्या डोळ्यापुढें उभे राहात नाहींत काय ? शंभर वर्षांपूर्वी हिंदुस्थानांत आपली सत्ता स्थापित झाली नव्हती तरी नेपोलियनशीं टक्कर मारण्याला हिंदुस्थानचें साहाय्य थोडेंबहुत तरी झालें. त्या वेळच्या मानानें पाहतां आज किती तरी पटीनें अधिक मुलूख आपल्या हातीं आहे, पण तितक्या पटीनें साहाय्य होत आहे काय ? नेपोलियनच्या महत्त्वाकांक्षेपेक्षां कायसरची महत्त्वाकांक्षा शेंकडों पटीनें अधिक भीतिप्रद नाहीं काय ? आणि भीतीचें निर्मूलन करावयाचें असल्यास हिंदुस्थानास सामर्थ्यवान् बनवावयास नको काय ? आपल्या गेल्या शंभर वर्षांच्या पद्धतीनें या देशाचें सामर्थ्य – नुसतें लष्करीच नव्हे तर आर्थिक व बौद्धिक सामर्थ्य – वाढत गेलें अशी साक्ष आपली मनोदेवता आपणांस देत आहे काय ? शंभर वर्षांचा आढावा आपणांस काय सांगत आहे बरें ! या गोष्टीकडे असेंच आणखी दुर्लक्ष करून यापुढें चालावयाचें नाहीं, असें युरोपचें रणकंदन आर्त स्वरानें सांगत आहे. अर्थातच पूर्वीची राज्यपद्धति – एकमुखी अनियंत्रित राज्यपद्धति – बदलून जेणें करून हिंदी लोकांच्या अंगीं स्वाभिमान व तेज जागृत होईल अशी स्वराज्य-पद्धति येथें सुरू करणें अपरिहार्य झालें नाहीं काय ? आणि असें स्वराज्य जर येथील लोकांस देणें प्राप्त आहे तर तें देण्याला महाराष्ट्रियांच्या स्वराज्याचें दानोदक घेतल्याच्या शतसांवत्सरिक पर्वणीपेक्षां अधिक उचित पर्वणी दुसरी कोणती असणार ?

---

## शहाजी व शिवाजी : : : : ३

[ श्रीशिवाजीमहाराजांची खरी साधार जन्मतिथि रूढ होण्यापूर्वी शिवजयंतीचा उत्सव वैशाख महिन्यांत होत असे. अशा या उत्सवाच्या प्रसंगीं श्रीशिवाजीमहाराजांचें गुणगान करण्याच्या निमित्तानें हा लेख केसरींत लिहिला गेला. त्या वेळीं पुरातत्त्वभूषण राजवाडे यांचा **'राधामाधवविलासचंपू'** हा ग्रंथ नुकताच प्रसिद्ध झाला होता. त्या ग्रंथांत शहाजी राजांच्या कर्नाटकांतील वैभवाचें वर्णन होतें आणि राजवाडे यांनीं त्या ग्रंथाला जी विस्तृत व व्यापक प्रस्तावना लिहिली त्या प्रस्तावनेंत मराठेशाहीच्या स्थापनेला शहाजीची कर्तब-

( केसरी, दि. २४ एप्रिल १९२३ )

गारी कितपत उपयोगी पडली याचा ऊहापोह केला होता. तेंच वादाचें सूत्र मूलभूत धरून हा लेख लिहिलेला आहे.

या लेखांत शहाजीच्या कर्तृत्वाचें श्रेय त्याला यथाप्रमाण दिलें आहेच. तरी पण श्रीशिवाजीमहाराजांच्या अंगच्या अलौकिक गुणांमुळेंच मराठेशाही उभी राहूं शकली, केवळ शहाजीच्या पराक्रमानें ती उभी राहूं शकली नसती, या मताचें प्रतिपादन व समर्थन केलेलें आहे. तथापि त्या वेळीं, म्हणजे १९२३ सालीं, असहकारितेचा भर असल्यानें शहाजी हा सहकारितावादी आणि शिवाजी हा असहकारितावादी असें म्हणून पहिल्याची निंदा व दुसऱ्याची स्तुति करण्याची प्रथा पडली होती. यास्तव त्या दृष्टीनेंहि विचार करून शहाजी हा खरोखर सहकारितावादी होता काय, सहकारिता व असहकारिता यांच्या मर्यादा कोणत्या आणि त्या मर्यादा शहाजी व शिवाजी या उभयतांनींहि आपापल्या वर्तनांत यावच्छक्य कशा पाळल्या व त्यांचा सुपरिणाम कसा झाला, याचेंहि विवेचन या लेखांत आलें आहे. ]

## राजवाडे यांची प्रस्तावना

श्रीशिवाजीमहाराजांनीं महाराष्ट्रांत स्वराज्य-संस्थापना कशी केली, त्यांच्या या अलौकिक कर्तबगारीस भूतकालीन वा समकालीन अशा कोणत्या व्यक्तींचे प्रयत्न साहाय्यभूत झाले आणि श्रीशिवाजीमहाराजांचें लहानपणापासून धोरण काय होतें याविषयीं इतिहासकारांत अद्यापि एकमत झालेलें नाहीं. तथापि प्रसिद्ध इतिहाससंशोधक वासुदेवशास्त्री खरे यांचा 'मालोजी व शहाजी' हा निबंध आणि 'राधामाधवविलासचंपू' या काव्याची प्रसिद्धि करतांना राजवाडे यांनीं त्या ग्रंथास जोडलेली प्रस्तावना यांच्या योगानें या विषयावर बराच प्रकाश पडला आहे. 'राधामाधवविलासचंपू' हें काव्य शहाजीच्या चरित्रावर रचलें असल्यानें त्याच्या प्रस्तावनेंत मुख्यतः शहाजीचेंच धोरण, ध्येय व साधनें यांचा विस्तरशः ऊहापोह करण्यांत आला आहे; तथापि शहाजीचा प्रयत्न कां फसला याची मीमांसा करतांना शहाजी व शिवाजी यांच्या धोरणाची व साधनांची तुलना करणें भाग पडल्यामुळें राजवाडे यांच्या प्रस्तावनेचा एकांगीपणा नाहींसा होऊन ती सर्वांगपूर्ण बनली आहे.

पारतंत्र्याची शृंखला महाराष्ट्राच्या पायांत ठोकली गेल्यानंतर ती तोडून टाकण्याविषयीं किंवा निदान तज्जन्य वेदना सह्य होतील असें करण्याविषयीं शहाजीच्या पूर्वी कसकसे प्रयत्न करण्यांत आले व ते कां विफळ झाले, याचें मार्मिक वर्णन राजवाडे यांनीं एके ठिकाणीं केलें आहे. ते लिहितात – "शहाजीच्या आधीं

व त्या कालीं राष्ट्रसुधारणांचे प्रयत्न करणारे शेख महंमद कांहीं थोडेथोडके झाले नव्हते. विठोबा सर्व कांहीं योग्य वेळीं नीट करील, असें समाधान मानून घेणारे भक्तिमार्गी तर असंख्य होते. मुसलमानी पेहराव, चालीरीति, धर्म, भाषा स्वीकारून समाजाच्या यातना बंद करूं पाहणारे किती तरी हिंदु प्रांतोप्रांतीं पीर होऊन बसले होते. यवनांवर रुसून त्यांच्याशीं व्यवहार बंद करून त्यांचें मुखावलोकनहि न करणारी दासोपंतादि मंडळी आपल्याकडून यवनांच्या पारिपत्याचे प्रयत्न करीतच होती. यवनांविरुद्ध बंड करून स्वराज्य मिळवूं पाहणारेहि कांहीं वेडे निपजले! यवनसेवा करून जनतेचा परामर्श घेऊं पाहणारे दामाजीपंतहि अनेक होऊन गेले. यज्ञयागांचा व देवदेवालयांचा जीर्णोद्धार करून धर्मसंरक्षण करून प्रजेंत जोम उत्पन्न करूं पाहणारे गोरखनाथीहि देशांत वावरत होते. कथाकीर्तनें व रामायणभारतें देशभाषेंत बनवून लोकांच्या अंगीं स्फुरण चढवूं पाहणारे कीर्तनकार व ग्रंथकार त्या कालीं शेंकड्यांनीं मोजावे लागत. असे नाना प्रकारचे बरेबुरे उपाय जो तो आपापल्या परीनें करीत होता; परंतु असले हे सर्व उपाय तीनशें वर्षें करूनहि यवनांचें काडीमात्र नुकसान कोणी करूं शकला नाहीं. ”

### सहकारितेचा प्रयोग

शहाजीच्या पूर्वीच्या काळाचें यथार्थ चित्र वरील अवतरणांत प्रतिबिंबित झालें आहे. पारतंत्र्याच्या पंकांत रुतलेलें कोणतेंहि राष्ट्र प्रथम कित्येक वर्षें केवळ स्तिमित होऊन निष्क्रिय बनतें व त्यानंतर कल्पनातरंगाच्या ओघाबरोबर वाहत जाऊन जो कोणता मार्ग यदृच्छेकरून चोखाळतां येईल तो चोखाळण्यांत सार्थक मानूं लागतें. पण हे सर्व प्रयत्न विस्कळीत, अहेतुजन्य आणि अदूरदृष्टीचे असल्यानें त्यापासून ‘ बुडत्याचा पाय खोलांत ’ या म्हणीप्रमाणें राष्ट्राचा उद्धार होण्याऐवजीं तें परदास्यांत अधिकाधिकच गुरफटलें जातें. यानंतर सहकारितेचा मनु सुरू होतो. एका बाजूनें राज्यकर्त्यांचा पहिला जोम ओसरत जाऊन ते सुखास चटावूं लागतात आणि आपलीं किरकोळ कामें जित लोकांच्या अंगावर टाकून चैनींत गर्क होऊन जातात. दुसऱ्या बाजूनें जित लोकांनाहि वाटूं लागतें कीं, परकी राज्याचें जोखड कांहीं आपल्याला सर्वस्वीं झुगारून देतां येत नाहीं; आणि तें जर आपल्या मानेवर राहणारच तर त्यांतल्या त्यांत आपल्या हातीं जेवढा अधिकार लाभेल तेवढा तरी नीट बजावून आपल्या देशबांधवांचे हाल कमी करावे आणि स्वराज्याची तहान सुराज्यानें भागवून घ्यावी. शहाजीच्या पूर्वीच्या पिढीपासूनच असली सहकारितेची विचारसरणी महाराष्ट्रांत सुरू झाली होती आणि जाधवराव, मालोजी, मुरार जगदेव वगैरे योद्धे व मुत्सद्दी यवनांशीं सहकारिता करून, साधेल तेवढा अधिकार बळकावून, म्लेंच्छांच्या गांजणुकींतून रयतेस सोडवूं पाहात होते. जित व जेते यांच्या व्यवहारांत अशी वेळ ओघानेंच प्राप्त होते आणि त्यांतूनच महत्त्वाकांक्षी सहकारितावाद्यांना भावी स्वराज्याचीं स्वप्नें पडूं लागतात.

शहाजीच्या पूर्वीच्या पिढींतील मराठे मनसबदारांना असलें सुखस्वप्न क्वचित् पडलें असेल; परंतु आपल्या अंगचें वाढतें कर्तृत्व आणि यावनी सत्तेचें दौर्बल्य यांची तुलना करून शहाजीनें असा कयास बांधला होता कीं, स्वराज्याचें पक्व फल यवनी सत्तेच्या वृक्षापासून तुटून अलगत आपल्या पदरांत पडल्यावांचून राहात नाहीं. 'जुलमी परकीय राजांचा नाश करावयाचा म्हटला म्हणजे त्यांची नोकरी व विश्वास संपादन करून योग्य समयीं त्यांस गचांडी देण्याचा मार्ग जित लोकांना सदा श्रेयस्कर, सुरक्षित व न्याय्य आहे', अशी शहाजीची समजूत झाली होती आणि निजामशाहीची वजिरी करतां करतां लहानगा मूर्तिजा दरबारला भितो या मिषानें त्यास तख्तावर घेऊन बसण्याचा परिपाठ पाडून दरबाऱ्यांच्या नजरेला हिंदु राजा तख्तावर बसलेला पाहण्याची संवय लावून त्यानें आपलें ध्येय बहुतांशीं साध्य करून घेतलें. शहाजीची मनसबदारी एखाद्या शहाला शोभेल अशी तोलदार फौज बाळगणारी झाली. असल्या मनसबदारीला कह्यांत ठेवणें मोठें जिवावरचें व संकटाचें काम होऊन बसतें. 'सुखविली' तर ती आयतीच अलगत प्रेमानें उरावर बसते, आणि 'दुखविली' तर रागावून प्राण घेते. शहाजीची समजूत अशी झाली होती कीं, मूर्तिजाशहा व त्याचा दिवाण मलिकंबर हे आपणास दुखवूं शकणार नाहीत; आणि यदाकदाचित् त्यांनीं तसला मूर्खपणा केलाच तर आपण त्यांचा समूळ उच्छेद करूं शकूं. पण त्याचे हे दोनहि अंदाज चुकीचे ठरले. निजामशाहींतून याची हकालपट्टी झाली आणि त्याबद्दलचा सूड उगविण्याचें आपलें सामर्थ्य अत्यंत कोतें आहे असेंहि त्यास कळून आलें. ज्या दिवशीं शहाजीला निजामशाहीनें दुखविलें त्या दिवशीं हिंदुस्थानांत सहाशें वर्षें बांधीत असलेल्या इस्लामच्या तटांत पहिलें भगदाड पडलें आणि इस्लामी सत्ता हिंदुस्थानांतून कायमची बाद होण्याच्या मार्गास लागली.

## सहकारितेंतलें दुर्बलत्व

तथापि इस्लामी तट जमीनदोस्त करण्याची कामगिरी शहाजीसारख्या यावज्जन्म सरकारी मनसबदारी करणाऱ्याच्या हातून होणें शक्य नव्हतें. तें कां, याची मीमांसा राजवाडे यांनीं केलेली नसल्यामुळें तिचें विवेचन करणें जरूर आहे. परकी सत्तेशीं सहकारिता करून एखादा मनसबदार कितीहि प्रबल झाला तरी त्याची धांव विशिष्ट मर्यादेच्या पलीकडे जाऊं शकत नाहीं. पूर्वीच्या काळांत तो दसहजारी मनसबदार बनला असता किंवा कदाचित् काबूल, बंगालसारख्या प्रांतांवर सुभेदारहि नेमला गेला असता. हल्लींच्या काळीं त्याची उडी गव्हर्नरच्या पायरीपर्यंत किंवा अंडरसेक्रेटरीपर्यंत जाऊं शकेल. पण ज्या सरकारशीं सहकारिता करून त्याची सत्ता प्रबळ करण्याला मदत केल्यामुळेंच आपलें वैभव वाढलें असतें त्या सरकारचा उच्छेद करण्याइतकी शक्ति आपल्या मनसबदारींत येऊं शकत नाहीं; झाडावर चढून आपण बसलेली फांदी मुळाकडून तोडल्यास त्या फांदीबरोबरच आपलाहि अधःपात

होईल ही गोष्ट प्रथम शहाजीच्या लक्षांत आली नाहीं. निजामशाहींतून निघून स्वतंत्र स्वराज्यस्थापना करण्याचा त्यानें जो पहिला प्रयत्न इ. स. १६२९ त केला त्यांत त्याला असाच कटु अनुभव येऊन तो प्रयत्न चारसहा महिन्यांतच आटोपला. पुढें फार वर्षांनीं त्यानें फिरून यत्न करून पहिला व त्याचीहि गति तीच झाली. त्यानंतर विजापूरच्या आदिलशाहीशीं उघड वैर करण्याचें टाकून कर्नाटकांत आदिलशाहीच्याच नांवावर मांडलिकी राज्यस्थापनेचा त्याचा तिसरा प्रयत्न बराच सफल झाला.

यावरून हेंच सिद्ध झालें कीं, ज्याचें बहुतेक सर्व आयुष्य सहकारितेंत गेलें व ज्याच्या वैभवाचा उगम सहकारितेंतच झाला त्याची उडी मांडलिकी संस्थानाच्या पलीकडे जाऊं शकत नाहीं. याला कारणेंहि तशीच नैसर्गिक असतात. एक तर असल्या मनसबदारांचें तेज सूर्यासारखें स्वयंप्रकाशित नसून चंद्रासारखें प्रतिबिंबित असतें. त्यामुळें सूर्याचें तेज अडविण्याचा चंद्रानें यत्न केल्यामुळें सूर्याला खग्रास ग्रहण लागलें तरी त्याबरोबर चंद्राच्याहि तेजाचा लोपच होतो. तशीच स्थिति राजकीय वैभवाच्या झगड्यांतहि घडून येते. दुसरें कारण असें कीं, दुर्बल राजाची पेशवाई किंवा सरलष्करकी करतां करतां त्याला हळूंच ढकलून देऊं इच्छिणाऱ्या स्वराज्यस्थापकावर कृतघ्नतेचा व स्वामिद्रोहाचा आरोप येतो. याचा परिणाम पारलौकिक किंवा नैतिक सुखदुःखांतच दिसून येणारा असता तर त्याची फारशी पर्वा केली नसती. इहलोकांतल्या आपल्या कोट्यवधि देशबांधवांना पारतंत्र्याच्या नरकांतून काढून स्वराज्याच्या स्वर्गांत नेऊन ठेवतां आलें तर स्वामिद्रोहाच्या पातकामुळें परलोकांत स्वतःपुरती नरकाची शिक्षा भोगण्याला कोणीहि राष्ट्रवीर तयार होईल. पण या स्वामिद्रोहाच्या आक्षेपाचें पाप या लोकींच भोंवतें व त्या मनसबदारास स्वराज्य पचूं देत नाहीं. अशा मनसबदारानें आपलें पूर्वायुष्य स्वतःची बढती करून घेण्यांत घालविलेलें असतें, व त्या वेळेपासूनच त्याच्या भाईबंदांकडून त्याच्या उदात्त हेतूचा विपर्यास केला जातो व ते त्याचे शत्रु बनतात. जेते वर्गांतील अधिकाऱ्यांना तर जित वर्गांतला हा उपटसुंभ आपणास वरचढ होत असलेला पाहून मत्सरानें त्यांना पूर्ण पछाडलेलें असतें व त्याचा नायनाट करण्याकरितां ते टपलेले असतात. अशा परिस्थितींत शहाजीसारख्या सहकारी मनसबदारानें परकी सत्ता ढकलून देण्याचा यत्किंचितहि प्रयत्न सुरू करतांच त्याला दुहेरी शत्रूंचा मारा सहन करावा लागतो आणि त्या वावटळींत त्यानें परकीय सामर्थ्याचें अधिष्ठान तर आपण होऊन सोडलेलेंच असतें व स्वकीय अधिष्ठान मिळणें पूर्वकालीन विश्वासाच्या अभावीं त्यास दुर्घट होतें.

### असहकारितेचा प्रयोग

अशा त्रिशंकूच्या स्थितींत दुसरा कोणी लेचापेचा सरदार असता तर तो चिरडूनच गेला असता. स्वकीय आणि परकीय सकारण व निष्कारण शत्रूंस दाद

न देतां शहाजी बचावला यांतच त्याचे धैर्यशौर्यादि गुण व्यक्त होतात. या अनुभवानें शहाणपण शिकून त्यानें स्वतः पुनः आदिलशाहीशीं सहकारिताच स्वीकारिली आणि कर्नाटकांतील मांडलिकी राज्याधिकारावरच तो बाह्यतः संतुष्ट राहिला; पण त्याच्या अंतःकरणांतील स्वराज्यस्थापनेची तळमळ थंडगार पडली नव्हती. आपलें ध्येय स्वतःस कां साधतां आलें नाहीं याचा सर्व बाजूंनीं विचार करून आपल्या प्रतापशाली पुत्राच्या हातून ध्येय सिद्धीस नेण्याची त्यानें ईर्षा बाळगिली. आणि स्वतःला आड आलेलीं विघ्नें आपल्या पुत्रास घातक होऊं नयेत याविषयीं त्यानें प्रथमपासूनच सावधगिरी बाळगिली. परकी राज्यसत्तेशीं असहकारिता करून टिकाव धरण्याइतकी शक्ति आपल्या ज्येष्ठ पुत्राच्या म्हणजे संभाजीच्या अंगीं नाहीं असें पाहून त्यास त्यानें आपल्याबरोबर घेतलें आणि शिवाजीच्या अंगचें तेज लहानपणापासूनच ओळखून त्यास दादाजी व जिजाबाई यांच्या स्वाधीन करून आपल्या पुणें प्रांतांतील स्वतंत्र जहागिरींत विजापूरपासून दूर ठेवून दिलें.

शिवाजी लहानपणापासून स्वकीयांच्या संगतींत आणि स्वतंत्रतेच्या वातावरणांत वाढला. वडिलांनीं दोन तपें परकीय सत्तेशीं एकनिष्ठ राहून जी कर्तबगारी केली तिचें फळ त्यांना अखेरीस कसें मिळालें तें जाणून आपल्या पराक्रमाला स्वतंत्र अधिष्ठानाचा आश्रय घेण्याचा त्यानें संकल्प केला. कोणत्याहि मुसलमानी शाहीशीं सहकारिता करावयाची नाहीं असें जरी त्याचें व्रत ठरलें होतें तरी तो चतुर राजकारस्थानी पुरुष असल्यानें त्यानें उतावळेपणानें आपल्या मनांतील हेतु योग्य वेळ येईपर्यंत जाहीर केला नाहीं. त्याचप्रमाणें शहाजीच्या सहकारितेचें फळ जी जहागीर, सेना, मुत्सद्दी-मंडळ आणि संपत्ति यांचाहि त्यानें अव्हेर केला नाहीं. उलट या साधनसामुग्रीचा आणि बापाच्या नांवलौकिकाचा जितका फायदा करून घेतां येईल तितका त्यानें करून घेण्यांत कसूर केली नाहीं. राजवाडे आपल्या प्रस्तावनेंत लिहितात कीं, "दरबारी मुत्सद्दी, लष्करी सरदार, लढाऊ सामान, जेधे आदिकरून शहाण्णव कुळींच्या मराठयांचें साहाय्य व शहाजीच्या नांवाचा दरारा इतक्या देणग्या शहाजीकडून शिवाजीस मिळाल्या. यास्तव शहाजीलाहि स्वराज्य-स्थापनेच्या श्रेयाचा वांटेकरी करणें इतिहासास प्राप्त आहे." परंतु यांत राजवाड्यांची दुहेरी चूक आहे. जे मुत्सद्दी व सरदार शिवाजीला आरंभापासून अनुकूल झाले त्यांचें त्या वेळेपावेतों महत्त्व तितपतच होतें; आणि जेधे, बांदल वगैरे थोडेसे सरदार व देशमुख अपवादादाखल सोडून दिल्यास निजामशाहींत किंवा आदिलशाहींत नांव गाजविलेले असे सरदार शिवाजीस साहाय्यभूत तर झाले नाहींतच, पण उलट शिवाजीच्या कार्याची खंबीर पायावर उभारणी होईपर्यंत त्यांस त्यांनीं विरोधच केला. मोरे, निंबाळकर, घोरपडे, सावंत, मोहिते वगैरे सरदार आरंभापासूनच हिंदवी स्वराज्याच्या स्थापनेला अनुकूल असते तर शिवाजीचें कार्य किती तरी सुकर झालें असतें. पण परकी शत्रूंबरोबरच

स्वकीय शत्रूंशीं दोन हात करून शिवाजीनें आपल्या वर्चस्त्राचा जो पाया घातला त्यांत शहाजीला वांटेकरी करतां येत नाहीं. शिवाय 'क्रियासिद्धिः सत्त्वे भवति महतां नोपकरणे' हा न्यायहि विसरून चालावयाचें नाहीं. शहाजीनें स्वतःची जेवढी कमाई शिवाजीच्या स्वाधीन केली तिच्याहून किती तरी पटींनीं अधिक कमाई केलेले व हिंदुस्थानभर नांव गाजविलेले मानसिंग, जसवंतासिंग, जयसिंग इत्यादि रथी-महारथी दिल्ली-दरबारीं होऊन गेले, पण दिल्लीच्या मोगली सत्तेचें मूळ त्यांना हलवितां आलें नाहीं. शिवाजीनें जे असले अचाट व अद्वितीय पराक्रम करून दाखविले त्यांचें श्रेय अर्थात् त्याच्याच अलौकिक बुद्धिमत्तेस, धाडसास व राजकीय धोरणास दिलें पाहिजे.

## मराठा तेतुका मेळवावा

शहाजीच्या वेळेपर्यंत देशांतील मराठ्यांची बहुतम संख्या यवनादींची सेवा करण्यांत दूषण मानावयाच्या ऐवजीं प्रायः भूषणच मानीत असे. हा राष्ट्रघातक ओघ बदलून देशांतील सर्व मराठा एका ठायीं मेळवावा ही उच्चतम राष्ट्रीकरणाचा सल्ला रामदासांनीं शिवाजीस दिला. समर्थांनीं महाराष्ट्रांत राष्ट्रभावना जागृत केल्यानें जे मराठे सरदार व बारगीर पूर्वी शहाजीच्या प्रयत्नाकडे वैरभावानें किंवा मत्सरबुद्धीनें पाहात असत, त्यांना शिवाजीच्या ध्येयाविषयीं आपलेपणा वाटूं लागला. या राष्ट्रीयत्वाच्या जागृतीच्या जोरावर शिवाजीचा स्वराज्यपक्ष चोहों बाजूंस फोफावूं लागला आणि त्याचें मूळ तर इतकें चिवट बनलें कीं, अवरंगजेबानें त्याच्यावर तीस वर्षें आघात केले असतां हें मूळ तुटण्याच्या ऐवजीं अवरंगजेबाच्या हातांतील सत्तारूपी शस्त्रच बोथट होऊन गेलें. एतावता शहाजीच्या साधनसामुग्रीप्रमाणेंच रामदासांच्या महाराष्ट्रधर्माच्या शिकवणीचा शिवाजीस कल्पनातीत दुजोरा मिळाला. तथापि शिवाजीच्या अंगीं नीतिमत्ता, निःस्वार्थता, न्यायप्रियता, शौर्य आणि अष्टपैलू मुत्सद्देगिरी हे अलौकिक गुण नसते व त्यांच्या योगानें महाराष्ट्रियांचीं अंतःकरणें विकसित झालीं नसतीं तर समर्थांचा उपदेश अरण्यरुदनवत् झाला असता. शहाजीच्या कर्तबगारींत संहकारितेच्या दोषामुळें स्वार्थाची जी छटा दिसत होती तिचा लवलेशहि शिवाजीच्या चारित्र्यांत दृष्टिगोचर न झाल्यामुळें प्रत्यक्ष त्याच्या शत्रुपक्षीयांसहि तो आदरणीय वाटूं लागला, व याच गुणाच्या जोरावर तो जयसिंगाच्या स्वारीनें ओढविलेल्या संकटांतून सुरक्षितपणें निभावला.

## दूरदर्शीपणाचें राजकारण

स्वराज्यस्थापनेच्या पहिल्या एकदोन अंकांत शिवाजीनें वडिलांकडून मिळालेल्या साधनसामुग्रीचा यावच्छक्य उपयोग करून घेतला; पण पुढील सगळी करामत त्याच्या स्वतःच्याच जोरावर उभारली गेली. परकीय सत्तेशीं असहकारिता करून स्वराज्यमंदिर निर्माण करावयाचें असल्यास शत्रूचा जेथें सहसा घाला पडूं शकणार

भोर JAN 1934

नाहीं असलें स्वतंत्र अधिष्ठान पाहावें लागतें. शहाजीला ही मोठी उणीव भासत होती. शिवाजीनें प्रारंभींच घाटाखालचीं १२ मावळें काबीज करून शत्रूच्या मार्गांत सह्याद्रीची दुर्घट धोंड उभी करून ही उणीव दूर केली. अरब व पोर्तुगीज व्यापाऱ्यांच्या वखारींशीं प्रत्यक्ष संबंध जोडून आपल्या सैन्याला उत्कृष्ट कारागिरीचीं हत्यारें आणि उमदे घोडे मिळविण्याचा मार्ग निर्वेध करून ठेवला. इतक्याहि अडचणींतून शत्रु अंगावर आला तर अखेरचें संरक्षणाचें साधन म्हणून सिंधुदुर्गासारखे किल्ले बांधविले, स्वतःचें आरमार सज्ज केलें व संपत्तीची उणीव शत्रूच्या मुलुखांत लुटालूट करून भरून काढली. या योगानें शत्रुपक्षीयांवर दरारा बसत चालला. त्यांची प्रतिकारशक्ति संकुचित होऊं लागली, आणि स्वपक्षीयांस लक्ष्मीच्या देखाव्यानें आणि आत्मरक्षणाच्या खात्रीमुळें धीर चढत चालला व त्याच्या अनुयायांची संख्या झटाझट वाढत चालली. ज्या ज्या वेळीं ज्या शत्रूंशीं प्रत्यक्ष झगडा चालू नसेल त्याच्याशीं संबंध ठेवल्यापासून अनहित न होतां प्रसंगविशेषीं आपल्या कार्यास तो संबंध हितकारकच होतो हें जाणून त्यानें केव्हांहि सर्वांशीं सर्व प्रकारचा संबंध ताडकन तोडून टाकला नाहीं. स्वराज्यसंस्थापनेचें दुर्धर कार्य एकदम सिद्धीस जात नाहीं, हें तत्त्व लक्षांत बाळगून अर्धेमुर्धें यश पदरांत पडत असल्यास त्याचा अव्हेर न करतां व विषाद न बाळगतां आणि पुढील प्रयत्नाविषयीं हताश न होतां हस्तगत झालेला राज्यभाग पचनीं पाडून घेण्याचा दूरदर्शीपणा त्याच्या अंगीं जन्मसिद्ध होता. महत्संकटाच्या वेळीं बेफाम होऊन सर्वस्व गमावण्याचा वेडेपणा न करतां वेळप्रसंग ओळखून स्वराज्यमंदिराचा पाया तेवढा भक्कम शाबूत ठेवून तह करण्यांत त्यास नामुष्की वाटली नाहीं. आग्ऱ्यास बोलावून शिवाजीच्या पायांत सुवर्णशृंखला किंवा लोहशृंखला घालण्याचा कावेबाज डाव पाताळयंत्री अवरंगजेबानें टाकला असतां तें आव्हान स्वीकारण्यास शिवाजी डरला नाहीं किंवा त्यांत हरलाहि नाहीं.

## शिवाजीचें विभूतिमत्त्व

एवंच, शहाजी व शिवाजी या पितापुत्रांनीं आपापल्या परीनें स्वराज्य संपादण्याचा यावज्जन्म प्रयत्न केला. त्यांत शहाजीची मदार सहकारितेवर होती; त्यामुळें तिच्यांतील नैसर्गिक अतएव अनुल्लंघनीय दोषामुळें त्याची कामगिरी विशिष्ट मर्यादेपलीकडे जाऊं शकली नाहीं. शिवाजीनें आपल्या मार्गांत तसली अडचण आड येऊं दिली नाहीं. यावरून असहकारितेचा मार्ग निष्कंटक असें मानून चालावयाचें नाहीं. सहकारितेचा मार्ग स्वल्पिष्ट घर्षणाचा असल्यानें चोखाळण्यास निर्भय असतो, यामुळें सामान्य कर्तृत्ववान् माणसें साहजिकपणेंच त्या मार्गाकडे वळतात. शिवाजीनें आंखलेल्या मार्गांत ठिकठिकाणीं यमदूत खडे होते, तरी पण भिकेची हुंडी शिंक्याला चढत नाहीं आणि 'साहसे श्रीः प्रतिवसति' या तत्त्वांचें शिवाजीला बाळकडूच मिळालें असल्यानें, त्यानें सुगम पण अल्प फलप्रद

असा पंथ सोडून देऊन दुर्गम पण अतर्क्य फल देणारा आणि केवळ स्वतःचें वैभवच कळसास चढविणारा नव्हे तर आसेतुहिमाचल हिंदवीराष्ट्राचा उद्धार करणारा पंथ स्वीकारला. शिवाजीचें विभूतिमत्त्व यांतच संकलित झालें आहे. सद्गुणानें व आशावादित्वानें रेसभर कमी असा जर दुसरा कोणी राष्ट्रपुरुष हें राष्ट्र-कार्य हातीं घेतां तर त्याच्या जिवाचे ‘ न भूतो न भविष्यति ’ असे धिंडवडे निघाले असते. असलें दुर्घट कार्य शिवाजीनें निःशंकपणें हातीं घेतलें आणि अल्प काळांत स्वकीयांना आणि परकीयांनाहि स्वल्पतम दुःख सोसावयास लावून तें यशस्वी करून दाखविलें. याकरितांच मुख्यतः महाराष्ट्र व पर्यायानें सर्व हिंदी राष्ट्र, शिवाजीचें सदैव ऋणीच राहील यांत शंका नाहीं.

---

# स्वराज्य-संस्थापक श्रीशिवछत्रपतींचें पुण्यस्मरण ४

[ श्रीशिवाजीमहाराजांची खरी जन्मतिथि जेधेशकावलि व शिवभारत यांच्या आधारें सिद्ध झाली तरी, जुन्या मताला चिकटून राहणाऱ्या अनेक पुढाऱ्यांनीं, १९२७ सालींच श्रीशिवाजीमहाराजांचा त्रिशतसांवत्सरिक जन्मोत्सव मोठ्या प्रमाणांत करण्याचें योजिलें आणि त्या योजनेस अनुसरून शेंकडों ठिकाणीं हा उत्सव गाजला. अर्थातच या प्रसंगानेंहि शिवछत्रपतींचें गुण-वर्णन करून, स्वराज्य-संस्थापक श्रीशिवाजीमहाराजांच्या चरित्रापासून जनतेनें स्वराज्य-संस्थापनेची स्फूर्ति घ्यावी, या हेतूनें हा गुणवर्णनपर लेख केसरींत लिहिला.

या लेखांत स्वराज्यसंस्थापनेंत शिवरायाची स्वधर्मरक्षणाची दृष्टि कशी होती याचें विवेचन असून, शिवाजीसारख्या अलौकिक विभूतीला कोणी ‘ अवतारी पुरुष ’ मानलें तरी त्या कल्पनेमुळें कांहीं राष्ट्रकार्याची हानि होत नाहीं; तथापि नारायणाचा अवतार नररूपानें होतो असें मानण्यापेक्षां ‘ नराचा नारायण ’ कशानें होतो, याचा विचार करणें हें अधिक स्फूर्तिदायक आहे, या मुद्द्यांचेंहि स्पष्टीकरण या लेखांत केलें आहे. शिवाजीमहाराज युगप्रवर्तक होते का नाहीं या नव्या वादाच्या वेळीं हा जुना लेख या वादाच्या निर्णयाला उपयुक्त ठरेल. ]

( केसरी, दि. १० मे १९२७ )

रावण के राम कार्तबीज के परशुराम।
दिल्लीपति दिग्गज के सेर सिवराज है॥

-- भूषण कवि

गेल्या आठवड्यांत अखिल भरतखंडभर श्रीशिवछत्रपतींचें पुण्यस्मरण इतक्या भक्तीनें व कृतज्ञतेनें करण्यांत आलें कीं, त्याची हकीगत वाचून महाराष्ट्रियांचें अंतःकरण आनंदातिशयानें उचंबळून आल्याशिवाय राहणार नाहीं. महाराष्ट्र ही जशी श्रीशिवरायाची जन्मभूमि तशीच कर्मभूमीहि असल्यानें, महाराष्ट्रियांचा शिवाजीच्या चरित्राशीं साक्षात् संबंध असल्यामुळें, छत्रपतींविषयीं त्यांना आदरातिशय वाटावा यांत नवल नाहीं; पण परप्रांतीयांना देखील त्यांच्याविषयीं इतकी भक्ति वाटावी हें सकृद्दर्शनीं विस्मयजनक वाटतें; परंतु वस्तुस्थिति तशी आहे आणि ती तशी आहे यावरूनच शिवाजीचें अलौकिकत्व आपोआपच सिद्ध होतें.

## हिंदवी स्वराज्याचा झेंडा

शिवाजी केवळ रणपंडित असता तर युद्धशास्त्र जिज्ञासूंनींच काय तो त्याच्या रणपांडित्याचा अभ्यास केला असता; शिवाजी नुसता विद्वान् असता तर विद्वत्सभांनींच काय तो त्याच्याविषयीं आदरभाव प्रकट केला असता; तो केवळ भोजराजासारखा दाता असता तर याचकवर्गाव्यतिरिक्त इतरांना त्याच्या गुणाचें स्मरणहि झालें नसतें आणि त्याच्या कर्तबगारीनें महाराष्ट्रियांचेंच तेवढें कल्याण झालें असतें, तर महाराष्ट्राबाहेर इतरत्र त्याचें पुण्यस्मरण करण्याची अशी अहमहमिका दिसून आली नसती; परंतु शिवाजीची कर्तबगारी याहिपेक्षां फार व्यापक होती आणि तिचीं सुमधुर फळें जशीं महाराष्ट्रियांस तशींच इतर प्रांतीयांसहि चाखावयास मिळत असल्यामुळें महाराष्ट्रियांप्रमाणेंच इतर प्रांतांतील जनतेसहि शिवाजीचें नांव निघतांच आपला माथा आदरपूर्वक लववावा अशी साहजिकच भावना होते. शिवाजी हा स्वराज्यसंस्थापक होता आणि आर्यधर्मसंरक्षकहि होता. त्यानें पारतंत्र्याची शृंखला तोडून टाकून आपला महाराष्ट्र देश स्वतंत्र केला आणि त्याच्या या अद्भुत कर्तृत्वशक्तीचा हिंदुस्थानांतील इतर प्रांतांनाहि अप्रत्यक्ष फायदा मिळाला. शिवाजीच्या पराक्रमामुळेंच हिंदुस्थानांत पांचशें वर्षें बद्धमूल झालेली यावनी सत्ता खिळखिळी झाली आणि तिच्या जुलमांतून नुसता महाराष्ट्र प्रांतच नव्हे तर इतर प्रांतहि मुक्त होऊन त्यांना आपली बाजू एक प्रकारें पुनः सावरून घेतां आली. शिवाजीमुळेंच रजपुतांच्या वरची मोगलांची पकड ढिली पडली आणि शिखांनाहि आपल्या भावी उत्कर्षाच्या बीजाची पेरणी व जोपासना निर्वेधपणें करण्यास संधि सापडली.

शिवाजीनें अशा रीतीनें महाराष्ट्रांत 'हिंदवी स्वराज्या'चा झेंडा उभारल्यामुळें परकी, आडदांड आणि धर्मवेड्या मुसलमानांची सत्ता आस्ते आस्ते मोडू

लागली आणि हिंदुस्थानचा भावी उत्कर्षाचा मार्ग एका बाजूनें मोकळा झाला; पण यापेक्षां स्वधर्मसंरक्षणाची जी अद्भुत कामगिरी शिवाजीच्या हातून घडून आली तिचें महत्त्व आजच्या दृष्टीनें विशेष आहे. भूषण कवीनें वर्णन केल्याप्रमाणें रावणाला जसा राम, कार्तवीर्याला जसा परशुराम तसा दिल्लीपतीला शिवाजी शेर भेटला आणि त्यानें रायगडावर राज्याभिषेक करून घेतला असें कळतांच

राजा शिवाजीके नगारनकी धाक सुनी।
केते पातसाहने छाती दरकति है ॥

यांत वर्णिल्याप्रमाणें किती पातशहांच्या छातींत धडकीहि बसली असेल! पण राजकारणांतला असला अलोट पराक्रम कितीहि स्फूर्तिदायक वाटला तरी त्यापासून हिंदुस्थानांतील प्रत्येक हिंदूचें अंतःकरण प्रेमानें व कृतज्ञतेनें उचंबळून येणार नाहीं. अर्थातच शिवाजीविषयीं आजमितीला परप्रांतीयांनाहि आदरभाव वाटण्याचें कारण शिवाजीनें आर्यसंस्कृतीचें व हिंदुधर्माचें रक्षण केलें, हेंच होय. लाला लजपतराया-सारख्या आर्यसमाजिस्ट पुढाऱ्याला आणि मदन मोहन मालवीयासारख्या एकनिष्ठ सनातनधर्मीय पंडिताला शिवाजीचें नांव ऐकतांच सारखाच आदर वाटावा याचें बीज शिवाजीनें इस्लामी वावटळींतून वैदिक संस्कृतीचा बचाव केला हेंच होय. शिवाजीच्या स्वराज्य-स्थापनेचा प्रत्यक्ष फायदा जसा महाराष्ट्रियांना मिळाला तसा पंजाब, बंगाल, मद्रास किंवा संयुक्त प्रांत यांना मिळाला नाहीं; पण हिंदुधर्मावरील संकट टळलें, यांत सर्वच प्रांतांना सारखाच लाभ झाला.

## हिंदुधर्माची अब्रू राखली

"वेद राखे विदित पुरान राखे सारयुत रामनाम राख्यो अति रसना सुधर मे। हिंदुनकी चोटी रोटी राखी है सिपाहिनकी कांधमे जनेऊ (जानवे) राख्यो माला राखी गरमे (गळ्यांत)। राजनकी हद्द राखी तेंघनल शिवराज। देव राखे देवल मे स्वधर्म राख्यो घरमें॥" (भूषण कवि).

शिवाजीनें वेदांचें रक्षण केलें, पुराणांचें रक्षण केलें, हिंदूंच्या जिभेवर रामनाम कायम राखलें, डोक्यावरची शेंडी राखली, खांद्यावर जानवें राखलें, गळ्यांतील तुळशीची माळ कायम राखली, देवळांत देवाची मूर्ति राखली आणि घरांतला कुल-धर्म-कुलाचार राखला. अशी जी बहाद्दरी शिवाजीनें केली ती नुसत्या महाराष्ट्रा-पुरतीच नसून नुसत्या भरतखंडांतच काय पण पृथ्वीतलावर जेथें जेथें म्हणून वैदिक धर्माभिमानी लोक अस्तित्वांत असतील तेथें तेथें त्यांना ती एक अभिमानाचीच गोष्ट वाटत असली पाहिजे.

## शिवाजीविषयींचा चिरंतन आदर

त्यांतूनहि सत्कृत्याचें महत्त्व देखील सापेक्षच असतें. ज्याची ज्या वेळीं गरज अधिक त्याला त्या वेळीं मोलहि अधिक. हाच लौकिक न्याय शिवाजीच्या पुण्य-स्मरणाला देखील लागू आहे. आज आपण जे पारतंत्र्यांत खितपत पडलों आहों

तसें खितपत न पडतां जर आज आम्ही स्वराज्यसुखाचा आस्वाद घेत सुखांत लोळत असतों तर शिवाजीच्या पुण्यस्मरणाच्या उत्सुकतेचा पारा हल्लींच्यापेक्षां पांच-दहा अंश तरी खात्रीनें खालीं असलेला आढळला असता. आणि जो न्याय स्वराज्याला लागू तोच स्वधर्मालाहि लागू आहे, ही गोष्ट देखील दृष्टीआड करण्यांत हंशील नाहीं. सांप्रत कालीं हिंदुधर्मावर चौफेर हल्ले चढविले जात असून स्वधर्मरक्षण कसें होईल अशी हिंदुमात्राला फिकीर वाटूं लागली आहे. अशी संकटमय स्थिति आजला नसती तर शिवाजीमहाराजांनीं हिंदूंची शेंडी राखली व बारकऱ्यांची माळ राखली या गोष्टी आम्ही इतक्या कौतुकानें वाचल्या नसत्या, सांगितल्या नसत्या आणि ऐकल्याहि नसत्या; पण शिवाजीनें आपल्या अतुल पराक्रमानें जें रामनाम आमच्या जिव्हाग्रावर कायम ठेवलें तें यापुढें तसेंच कायम राहतें कां तें कायमचें 'राम' म्हणतें व त्याच्या जागीं 'रहीम' येऊन बसतो अशी कित्येकांस भीति वाटूं लागल्यामुळें "शिवरायाचें आठवावें रूप। शिवरायाचा आठवावा प्रताप" अशी जागृति हिंदुमात्रांत दिसूं लागून हिंदूंचें मन या उत्सवाकडे स्वाभाविकपणेंच आकर्षिलें गेलें. आणि रोगग्रस्ताच्या हातांत अमृताचा पेला देऊन त्यास हें अमृत अमक्या पर्वणीवर पी असें सांगितलें असतांहि रोगमुक्ततेची आतुरता अनावर झाल्यामुळें खरा मुहूर्त येण्यापूर्वीच तो जसा तें अमृत गट्ट करून टाकतो, त्याप्रमाणें शिवाजीच्या जन्माला आज तीनशें वर्षें झालीं असोत वा नसोत, हिंदुधर्मावरच्या आणि स्वराज्यावरच्या संकटानें सध्यां हिंदुसमाज त्रस्त होऊन गेलेला असल्यामुळें हा ताप शमविणारी औषधि त्याच्या हातीं पडतांच '**शुभस्य शीघ्रम्**' या न्यायानें त्यानें त्या गुणकारक औषधाचे घोट घेण्यास अधाशीपणानें सुरुवात केली यांत कांहीं आश्चर्य नाहीं.

अशा अनेक अंतर्बाह्य कारणांमुळें शिवाजीमहाराजांच्या जन्मोत्सवाच्या प्रेमांत अवांतर गोष्टींची भर पडली असली, तरी हिंदी लोकांच्या अंतःकरणांत शिवाजीमहाराजांविषयीं निरपेक्ष आणि निष्काम असा भक्तिभाव वसत नाहीं असें नाहीं. पावसाळ्यांत महापूर आल्यामुळें नदीचें मूळचें पात्र कोणतें व पुराचा लोंढा कोणता हें कळेनासें झालें, तरी केवळ महापुराकडे पाहून या नदीला कायमचें असें पात्रच नाहीं, असें म्हणणें जितकें चुकीचें होईल तितकेंच शिवाजीमहाराजांच्याविषयीं सध्यां ओतप्रोत भरून वाहणाऱ्या भक्तिरसाकडे पाहून, याला शाश्वत असें अधिष्ठानच नाहीं असें मानणें चुकीचें ठरेल.

### शिवाजीच्या नांवांत भरलेली जादू

सद्यःकालीन, सापेक्ष, अतएव स्वार्थी अशी दृष्टि बाजूस सारून केवळ तात्त्विक तारतम्यभावानें पाहूं लागलों तरी शिवाजीमहाराजांच्या अंगचे अलौकिक गुण आणि त्यांची अजब कामगिरी पाहून महाराष्ट्रास तर धन्यता वाटतेच, पण इतर प्रांतांतल्या लोकांनाहि शिवाजीविषयीं साश्चर्य आदर वाटतो. किंबहुना परप्रांतीयांना शिवाजीविषयीं जी पूज्यबुद्धि वाटते तीच त्याच्या मोठेपणाची निःसं-

दिग्ध कसोटी होय, आणि या कसास लावून पाहिल्यानें शिवाजीची थोरवी खरोखरीच कल्पनातीत ठरतें. कारण आम्ही महाराष्ट्रीय जसा श्रीशिवाजीमहाराजांचा राष्ट्रीय उत्सव करतों तसा आपण आपल्या प्रांतांतल्या कोणत्या विभूतीचा उत्सव करूं चाहतां, असें परप्रांतीयांना विचारलें असतां त्यांना खात्रीलायक असें उत्तर देतां येत नाहीं ! इतर कोणत्याहि प्रांतांतल्यापेक्षां राजपुतान्यांतून बाप्पा रावळ, राणा प्रताप, राणा कुंभ, अशीं कांहीं नांवें पुढें येतात. पण सर्व बाजूंनीं तुलना करून पाहिल्यास त्यांच्यांत शिवाजीचा अष्टपैलूपणा आढळून येत नाहीं. नुसत्या शौर्यांत, नुसत्या मुत्सद्देगिरींत, किंवा केवळ देशभक्तींत पाहूं गेल्यास कदाचित् कित्येक राष्ट्रवीर शिवाजीची बरोबरी करणारे सांपडतील. पण शिवाजींत जसा सर्व सद्गुणांचा समुच्चय समतोलपणानें नांदत होता, तसा इतरत्र क्वचितच दिसून येतो, आणि म्हणूनच परप्रांतीयांना देखील राष्ट्रांच्या आजच्या स्थितींत जर कोणाचा राष्ट्रीय उत्सव करणें योग्य असेल तर तो श्रीशिवाजीमहाराजांचाच होय हेंच मान्य करावें लागतें. महाराष्ट्रांतील व महाराष्ट्राबाहेरीलहि निरनिराळ्या जातींचें प्रेम एकाच ठिकाणीं बसण्यासारखें जर कोणतें स्थळ असेल तर तें शिवछत्रपतींचें चरित्र हेंच होय. शिवाजीच्या नांवांत जितकी जादू भरली आहे तितकी दुसऱ्या कोणत्याहि विभूतीच्या नांवांत भरलेली नाहीं. यास्तव हिंदुस्थानासारख्या गतप्राण झालेल्या राष्ट्रांत शिवाजीसारख्या विभूतीची आठवण जितकी अधिक वेळां व सर्वतोमुखीं होईल, तितकी अत्यंत श्रेयस्कर आहे. धैर्यानें, उमेदीनें, आत्मप्रत्ययानें राष्ट्रकार्य करणारे पुरुष देशांत निर्माण झाल्यास त्या राष्ट्राला जें तेज चढतें त्याचें प्रत्यक्ष उदाहरण म्हणजेच श्रीशिवाजीमहाराजांचें चरित्र होय. हें चरित्र इतकें अद्भुतरम्य आहे कीं त्याचीं कितीहि पारायणें केलीं तरी त्याचा वीट येत नाहीं. तथापि, त्या चरित्रांतील सर्वच महत्कृत्यांचें वर्णन करणें शक्य नसल्यानें या पुण्यप्रसंगीं त्यांतील विशेष प्रसंगांचें सिंहावलोकन करूं.

## शहाजी व रामदास

श्रीशिवाजीमहाराजांनीं स्वराज्यस्थापनेची स्फूर्ति कोणाकडूनहि उसनी घेतली नाहीं; कारण त्यांच्या अंगचें पाणी खरें, अस्सल व जातिवंत होतें. तथापि याचा अर्थ महाराजांच्या कार्यास कोणाचेंहि साहाय्य मिळालें नाहीं असें मात्र कोणीं समजूं नये. त्यांतल्या त्यांत एखाद्याचा नांव-लौकिक सर्वत्र पसरण्यापूर्वी जें निरपेक्ष साहाय्य मिळतें त्याचें महत्त्व खरोखरच अनेक पटींनीं अधिक मानलें पाहिजे. अशा दृष्टीनें ज्यांना ज्यांना शिवाजीचा भावी उत्कर्ष त्याच्या बाललीलेंतच दिसूं लागला व तो ओळखून ज्यांनीं त्यास कार्यप्रसाराची संधि आणून दिली त्यांची तारीफ करावी तेवढी थोडीच आहे. अशा भविष्यवाद्यांत शहाजी राजांची गणना प्रामुख्यानें केली पाहिजे; कारण त्यांनींच प्रथम शिवाजीच्या पराक्रमाचा कयास बांधून जें आपणास साधलें नाहीं तें साधण्यासाठीं शिवाजीस पुणें प्रांतीं पाठविलें आणि त्यास पोक्त सरंजामाचा पाठिंबा मिळेल

अशी तरतूद करून दिली. शहाजी राजांचें ऐनउमेदीचें आयुष्य मोडलेली निजामशाही सावरण्यांतच खर्च झाल्यानें आणि त्या कामगिरींतील परावलंबनामुळें त्यांस केव्हांहि यावें तसें यश न आल्यामुळें त्यांना 'नको ही परक्यांची सेवा' असें होऊन गेलें होतें. तरी पण आयुष्याच्या उत्तरार्धांत सुचलेल्या शहाणपणाचा स्वतःस फारसा फायदा करून घेतां येत नाहीं, हेंहि शहाजीस कळून चुकलें होतें. म्हणूनच या परावलंबीपणाचा शिवाजीला संपर्कहि लागू नये या हेतूनें शहाजीनें त्यास आदिलशाहीपासून अगदीं दूर अशा पुणें प्रांताच्या स्वतंत्र वातावरणांत ठेवून दिलें आणि त्यास यथायोग्य शिक्षण व सल्लामसलत मिळेल अशी तजवीज केली. शहाजी स्वतः जरी अनेक बादशहांच्या पदरीं नोकरीस राहिला होता तरी पण त्यानें सेवावृत्तींत अपरिहार्य मानलें गेलेलें लांगूलचालन कधींहि केलें नाहीं. इ. स. १६५७ त विजापूरच्या बादशहाला शहाजीनें लिहिलेलें एक पत्र राजवाडे यांनीं 'रामदास व रामदासी' मासिकांत छापलें आहे. त्यांत शहाजी स्वतःविषयीं लिहितो कीं, "आम्ही रजपूत लोक आहों; आजपावेतों चार पातशाहींत नोकरी केली; परंतु गैरहिसाबी भलतेंच नुकसान सोसून बेअब्रूनें व गैरमेहरबानगीनें पूर्वींहि नोकरी केली नाही व पुढेंहि करणार नाहीं." यांत शहाजीचा जो बाणेदारपणा दिसून येतो त्याचेंच शिक्षण शिवाजीस लहानपणापासून मिळालें होतें, आणि त्याला स्वतंत्र राहण्याची शहाजीनें तरतूद करून दिल्यामुळें या गुणांत शिवाजीनें 'बापसे बेटा सवाई' ही म्हण खरी करून दाखविली. पण शिवाजीच्या अंगांत दुर्दमनीय स्वाभिमान, देशाभिमान व आत्मप्रत्यय नसता तर शहाजीच्या इतक्या दूरदर्शीपणाचेंहि कांहीं चीज झालें नसतें; परंतु शिवाजीनें अल्प काळांतच आपल्या अंगचें पाणी दाखवून शहाजी सुद्धां सर्वांस चकित करून सोडलें. शिवाजीच्या कर्तृत्वाची परम सीमा समर्थांनींहि जाणली आणि त्या वेळेपासून म्लेंच्छांचें बंड मोडण्याचें सामर्थ्य अंगीं असणारा हा दैवी पुरुष आहे असें जाणून आपल्या सर्व संघटनेचा उपयोग त्याच्या कार्याकडे करावयाचा असें त्यांनीं ठरविलें.

## 'शीर सलामत 'वाले आचरट टीकाकार

धाडसी योद्धा, कल्पक सेनापति, चतुरस्र मुत्सद्दी, प्रजाहितैकदक्ष राजा, निष्पक्षपाती न्यायाधीश, आणि अत्यंत नीतिमान सत्पुरुष अशा सर्वच अंगांनीं शिवाजी हा इतर कोणत्याहि राष्ट्रपुरुषापेक्षां सरस ठरेल. सगळाच देश अनेक शतकेंपर्यंत परक्यांनीं पादाक्रान्त करून तेथें आपले पाय कायमचे रोवले असतां त्यांची सत्ता झुगारून देऊन त्यांच्या देखत देखत सिंहासनाधिष्ठित झालेला असा रणगाजी इतिहासांत क्वचितच आढळतो. त्यांतूनहि एखादा जॉर्ज वॉशिंग्टन किंवा एखादा रॉबर्ट ब्रूस हा यशस्वी होऊन आपली सत्ता प्रस्थापित करूं शकला असेल. पण शिवाजीच्या सभोंवतीं असलेल्या प्रतिकूल परिस्थितीशीं वॉशिंग्टनच्या किंवा रॉबर्ट ब्रूसच्या परिस्थितीची तुलना केली असतां त्यांत जमीनअस्मानाचें अंतर

दिसून येतें. वॉशिंग्टन किंवा ब्रूस यांच्याप्रमाणें शिवाजीला एकदोन शत्रूंशींच लढावयाचें नसून आदिलशाही, कुतुबशाही, मोगलशाही, इंग्रज, पोर्तुगीज, हबशी इतके परधर्मीय व परदेशीय शत्रु आणि मोहिते, मोरे, घोरपडे, सावंत इत्यादि स्वदेशीय व स्वधर्मीय शत्रु यांच्याशीं त्यास टक्कर द्यावयाची होती. पण कधीं अचाट धाडसानें तर कधीं सैन्याच्या अचानक हालचालीनें, कधीं मुत्सद्दे-गिरीनें तर कधीं सामोपचारानें, आपल्या वाटेंतला शत्रूचा कांटा दूर करून शिवाजीनें स्वराज्याचें ध्येय गाठलें. प्रसंगविशेषीं दोरी भलत्याच आवेशानें न ताणतां पड घेऊनहि त्यानें आपला कार्यभाग साधला. तथापि त्याचें नेहमींचेंच धोरण 'शीरसलामत' राखण्याचें होतें असें मानणाऱ्या आचरट टीकाकारांस शिवाजीच्या धाडसी स्वभावाचें रहस्यच कळलें नाहीं, असें म्हणणें प्राप्त आहे. इतिहासांतरीं एकांडे शिपाई म्हणून नव्हे तर सेनापति म्हणून नांवाजलेले जे जे वीर पुरुष आजवर होऊन गेले त्यांत शिवाजीसारखें अचाट धाडस केल्याचें उदाहरण क्वचितच आढळतें. अफझुलखानास आपल्या किल्ल्याशेजारीं पाचारण करून त्याच्याशीं समक्ष सामना करण्यांत, शाहिस्तेखानाच्या गोटावर छापा घालून प्रत्यक्ष खानावर चाल करून जाण्यांत आणि अवरंगजेबाच्या राजधानींतून त्याच्या करड्या नजरेखालून निसटून जाण्यांत शिवाजीनें जें धाडस दाखविलें त्याच्या पासंगालाहि पुरें पडेल, असें उदाहरण शोधूं गेल्यासहि सांपडणार नाहीं.

पण शत्रूंशीं खेळावयाच्या डावपेंचांत केवळ वैयक्तिक धाडस नेहमीं उपयोगी पडत नसतें, स्वराज्यसंस्थापकाच्या अंगीं सेनापतीचें कौशल्यहि असावें लागतें आणि त्यांतहि शिवाजी कोणास हार जाण्यासारखा नव्हता. गनिमी काव्याच्या लढाईचा एवढ्या मोठ्या प्रमाणांत त्यानेंच उपक्रम केला असें म्हणण्यास हरकत नाहीं. गनिमी काव्याच्या हुकमी हालचाली करून शत्रूला अचानक घेरण्यांत त्याचा हातखंडा असे, आणि ठाण मांडून समोरासमोर युद्ध करण्याचा प्रसंग आला असतां त्यांतहि त्यानें आपल्या शत्रूस चारीमुंड्या चीत करून चकित करून सोडलें.

## राजा प्रकृतिरंजनात्

अशा रीतीनें शिवाजी हा युद्धकलेच्या विविध प्रकारांत निष्णात होता. पण त्याची खरी थोरवी त्याच्या सुसंघटित राज्यपद्धतींत आहे. 'राजा प्रकृतिरंजनात्' हें राजाचें लक्षण शिवाजीस निरपवादपणें लागू पडतें. आदिलशाहीविरुद्ध पहिल्याप्रथमच बंडाची धामधूम सुरू झाल्यावेळीं कित्येक जुन्या जहागीरदारांनीं शिवाजीला मोठ्या जहागिरीचा वा द्रव्याचा लोभ सुटला आहे आणि म्हणूनच त्यानें हे चाळे सुरू केले आहेत, अशी स्वतःची समजूत करून घेऊन जेव्हां शिवाजीस विरोध करण्यास प्रारंभ केला तेव्हां शिवाजीनें त्यांस समक्ष भेटून सांगितलें कीं, "हें स्वराज्यस्थापनेचें कार्य तुम्ही हातीं घ्या आणि मी यःकश्चित् शिपाई म्हणून तुमचें साहाय्य करतों;" या आव्हानानें अर्थातच शब्दशूर टीकाकारांचीं तोंडें बंद पडलीं. हिंदवी 'स्वराज्याची'

स्थापना करण्याची प्रेरणा देवीनें केली म्हणून मी हा कार्यभाग हातीं घेतला आहे आणि हें राज्य माझें एकट्याचें नसून हें 'देवा-ब्राह्मणां'चें राज्य आहे असें तो म्हणत असे, व त्याचें आचरणहि त्यास अनुसरूनच असे. म्हणूनच त्यास 'गोब्राह्मणप्रतिपालक' ही अन्वर्थक पदवी मिळाली.

त्यानें स्वतःसाठीं राज्याचा लोभ कधींहि धरला नाहीं. राज्याभिषेक करून घेण्यांतहि त्याचा हेतु वैयक्तिक मोठेपणाचा नसून 'मराठा तेतुका मेळवून' त्यांच्या सत्तेचें केंद्रस्थान बनविणें हाच होता. शिवाजीच्या या निष्काम कर्मयोगाची छापू आरंभापासूनच त्याच्या अनुयायांवरहि पडलेली दिसून येते. अफझुलखानाला जमावानिशी जाऊन मिळण्याला कान्होजी नाईक जेध्यांना बादशहाचें फर्मान आलें असतां प्राणाहून प्रिय मानल्या जाणाऱ्या देशमुखीच्या वतनावर कान्होजीनें पाणी सोडलें ही स्वार्थत्यागाची स्फूर्ति काय दर्शवितें ? जणुं काय त्या वेळीं स्वार्थत्याग अधिक कोण करतो याची एक प्रकारें चढाओढच लागली होती ! कान्होजी जेधे आपल्या वतनाचें उदक शिवाजीच्या हातावर सोडतो. शिवाजी आपल्या राज्याची सोडचिठी समर्थांच्या झोळींत टाकतो, समर्थ तें राज्य आपल्या प्रिय शिष्यास परत करतात, शिवाजी रत्नांनीं भरलेलें ताट तुकारामबुवाकडे पाठवितो व तुकारामबुवाहि तें जसेंच्या तसें परत करतात ! या आणि अशाच अनेक उदाहरणांवरून त्या वेळीं महाराष्ट्रियांच्या अंतःकरणांत कोणत्या उच्च व स्पृहणीय भावना उद्दीपित झाल्या होत्या तें दृष्टोत्पत्तीस येतें.

स्वराज्य-संस्थापन हें स्वतःच्या चैनीकरितां अगर बडेजावीकरितां करावयाचें नसून समाजाच्या कल्याणाकरितां करावयाचें ही वृत्ति अंतःकरणांत ठसल्यावर अनियंत्रित राज्यकारभाराची पद्धति त्याज्य ठरून तिच्याऐवजीं सुसंघटित अशी अष्टप्रधानात्मक राज्यपद्धति सुरू करणें ओघानेंच प्राप्त होतें. आणि शिवाजीनेंहि राज्याभिषेकाच्या पूर्वीपासूनच आपलें धोरण तसें राखलें होतें आणि राज्याभिषेकानंतर त्या पद्धतीस सनदशीर स्वरूप दिलें. त्या वेळीं परिस्थिति भिन्न असल्यामुळें शिवाजीचे अष्टप्रधान म्हणजे हल्लींच्या मंत्रिमंडळाचीच हुबेहूब प्रतिकृति असणें शक्य नव्हतें; तथापि मुसलमानांची स्वच्छंदी सुलतानशाही आणि शिवाजीची लोककल्याणाभिमुखी अष्टप्रधानात्मक राज्यपद्धति यांतील अंतर ओळखण्याइतकें तारतम्य जनतेच्या अंगांत होतें.

शिवाजीनें ही अष्टप्रधानपद्धति प्राचीन नीतिशास्त्रग्रंथांवरूनच स्वीकारली असली तरी राज्यव्यवस्थेच्या धोरणांत त्याची स्वतंत्र प्रतिभा दिसून येते. कौटिलीय अर्थशास्त्रांतील राज्यव्यवस्था कितीहि व्यापक असली तरी तींत स्वतंत्र असें आरमारखातें नव्हतें. पण शिवाजीनें राज्यस्थापनेचें कार्य हातीं घेतल्यानंतर लवकरच आरमाराचें महत्त्व जाणून मराठ्यांचें नवें आरमार उभारलें. अर्थातच ऐतिहासिक काळांत स्वतःचें आरमार सज्ज करणारा आणि गलबतांत बसून मोहिमेवर जाणारा

शिवाजी हाच पहिला हिंदु राजा होय. आणि शिवाजीनें सुरु केलेला हा नवा प्रघात महाराष्ट्रियांच्या दुर्दैवानें शिवाजीच्या पश्चात् फार वेळ टिकला नाहीं म्हणूनच मराठ्यांची सत्ता नष्ट झाली.

## निष्कलंक चारित्र्य

असो; स्वराज्यसंपादन करण्यांत आणि संपादिलेल्या स्वराज्याचें दृढीकरण करण्यांत शिवाजीच्या अंगचे जे विविध गुण प्रकट झाले त्या गुणांमुळें शिवाजी हा सर्वांस वंदनीय वाटत असला तरी त्याच्याविषयीं महाराष्ट्रियांना जें स्वसंवेद्य प्रेम वाटतें तें शिवाजीच्या निष्कलंक चारित्र्यामुळेंच होय. शिवाजीची स्वातंत्र्यभक्ति अव्यभिचारिणी होती, त्याची धर्मश्रद्धा व गुरुभक्ति अढळ होती, दीनदुबळ्यांविषयींचा त्याचा कनवाळूपणा निस्सीम व सक्रिय होता आणि त्याचें वैयक्तिक आचरण धुतल्या तांदुळासारखें निर्दोष होतें. स्वतःच्या अतुल पराक्रमानें एवढें राज्य संपादन केलें असतां बालपणाची साधी वृत्ति अखेरपर्यंत कायम राहिलेल्यांचीं उदाहरणें शोधूं गेलें तरी क्वचितच हातीं लागतात. पण शिवाजीचा जसजसा उत्कर्ष होत गेला तसतसें त्याच्या अंगच्या सद्गुणसमुच्चयाचें तेज अधिकाधिकच चमकूं लागलें.

एवंगुणविशिष्ट असा हा दुष्टांचा संहारकर्ता आणि सुष्टांचा पालनकर्ता राजा महाराष्ट्रास लाभला आणि त्यानें मुसलमानांच्या सत्तेचा लोंढा परत फिरवून स्वातंत्र्याची मुहूर्तमेढ रोवली म्हणून हिंदु लोकांच्या अभिमानाला थोडा तरी आधार मिळाला. अशा या स्वराज्यसंस्थापक व स्वधर्मरक्षक वीराचें गुणवर्णन करतांना ‘ यद्यद्विभूतिमत्सत्त्वं श्रीमदूर्जितमेव वा। तत्तदेवावगच्छ त्वं मम तेजोंऽशसंभवम्॥ ’ या श्रीकृष्णाच्याच उपदेशानुसार शिवाजी ही दैवी विभूति किंवा ईश्वरी अवतार होय असें श्रद्धाळू हिंदूंनीं मानलें तर त्यांत गैर काय आहे ! शिवाजीला अवतार मानूं लागल्यास त्याच्या अंगच्या सद्गुणांचें आम्हांस अनुकरण करतां येणार नाहीं आणि शिवाजीचा आमचा संबंध सुटेल असले आक्षेप अलीकडे कित्येकांकडून पुढें येतात; पण ते अज्ञानमूलक असून त्यांत ख्रिस्ती, महंमदी इत्यादि परधर्मांतील कल्पनांची छटा दिसून येते.

## नरका नारायण हो जाय

परधर्मी लोक ईश्वर व मानव यांचा जो संबंध मानतात तो आर्यतत्त्वज्ञानानें सांगितलेल्या संबंधाहून अगदींच भिन्न आहे व तो अशास्त्रीयहि आहे. आपलें तत्त्वज्ञान ‘ ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः ’ असें जसें सांगतें, तसेंच ‘ नर करणी करें तो नरका नारायण हो जाय ’ असेंहि सांगतें. अर्थातच ‘ नर तोच नारायण ’ आणि ‘ नारायण तोच नर ’ असा हा आमच्या धर्मांत अभेद वार्णिला असल्यामुळें एखाद्या महात्म्याच्या अंगच्या अलौकिक गुणांकडे पाहून आदरबुद्धीनें कोणी त्यास अवतार मानल्यास तो महात्मा मानवकोटींतून दुरावला व त्यामुळें मानवी प्राण्यांना त्याचें अनुकरण करण्याची बुद्धि होणार नाहीं असली शंका

घेण्याचें कारण नाहीं. ख्रिस्ती, महंमदी वगैरे धर्मांत देव व मानव यांच्यांत जमीन-अस्मानाइतकें अंतर मानलें असेल. परंतु आर्यधर्मांत तसली अशास्त्रीय कल्पना नसल्यानें कोणत्याहि अद्वितीय वीराचें थोडक्यांत वर्णन करावयाचें म्हटल्यास आपण त्यास 'ईश्वरी अवतार' म्हणतों. कारण भारतासारखा सव्वा लक्ष ग्रंथ लिहून देखील ज्या गुणांची यथार्थ कल्पना मनांत बिंबणार नाहीं त्या सगळ्या गुणांची प्रत्यक्ष मूर्ति 'अवतार' या शब्दाच्या उच्चाराबरोबर पुढें उभी राहते, इतकी ती कल्पना समाजांत रूढ झाली आहे. आणि एका भाषेंतला रूढ शब्द घेऊन त्याचा अर्थ करतांना परभाषेंतल्या तत्सम शब्दाचा अर्थ त्याजवर लादूं लागल्यास असाच घोटाळा उडणार. अर्थातच टीकाकारांची विचारसरणी व तदंगभूत शंका हिंदुधर्मीयांना केव्हांहि पटणार नाहीं.

'परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृतां । धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥' हें भगवंतांचें वचन जर खरें आणि शिवाजीमहाराजांनीं जर यांतील प्रत्येक गोष्ट अत्यंत बिकट परिस्थितींतहि सिद्धीस नेली, तर शिवाजीमहाराजास 'अवतार' मानण्यास हरकत काय आहे! यांत मानव्याची हानि नसून उलट त्याचा गौरवच आहे. कारण यांत नारायणाचा नर झाला असें न समजतां नराचा नारायण झाला असें मानलें म्हणजे झालें. कारण समीकरणांत अ बरोबर ब म्हटलें काय किंवा ब बरोबर अ म्हटलें काय, तुलनेच्या दृष्टीनें तें सारखेंच. मात्र मुसलमानांच्या देवाला राग येईल म्हणून जशी त्यांच्या मशिदीपुढें वाद्य वाजविण्यास बंदी, त्याचप्रमाणें परधर्मीयांच्या धर्माला ही कल्पना रुचत नाहीं, म्हणून शिवाजीला 'अवतार' मानण्याची कल्पना टाकून द्यावयाची असल्यास निराळें! तें कसेंहि असो. हिंदुधर्मसंरक्षण आणि स्वराज्यसंस्थापन करण्याची अत्यंत अद्भुत आणि त्या वेळीं जवळ जवळ अशक्य वाटणारी कामगिरी श्रीशिवरायानें आपल्या अंगच्या अद्वितीय गुणांच्या बळावर सिद्धीस नेली; यामुळें अखिल भरतखंडाला शिवाजीनें इतकें उपकृत करून सोडलें आहे कीं, त्याचे गुणानुवाद आम्ही कितीहि गाइले तरी त्या उपकाराचें ओझें लवमात्र कमी होणार नाहीं. तें ऋण फेडावयाचें असल्यास पुनश्च स्वराज्यसंस्थापन आणि स्वधर्मसंरक्षण करणें हा एकचहांय मार्ग

---

# श्रीशिवाजीमहाराज युगप्रवर्तक नव्हत काय ? : ५

प्रतिपच्चंद्ररेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता ।
शाहसूनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते ॥

### वादाचा उगम

सांप्रतच्या हिंदी सरकारनें सार्वजनिक सुट्टयांची जी यादी सर्वत्र प्रवर्तित केली आहे, तींत श्रीशिवाजीमहाराजांच्या जन्मतिथीचा समावेश झालेला नाहीं. ही नजरचूक लक्षांत आणून देण्याच्या हेतूनें आमदार व्यंकटराव पवार यांनीं मुंबईच्या विधिमंडळांत प्रश्न विचारून, शिवाजीमहाराजांच्या जन्मदिवसाचा समावेश सार्वजनिक सुट्टयांच्या यादींत केला जावा असें सुचविलें. ही सूचना पंतप्रधानांनीं मान्य केली असती, अथवा इतर कांहीं अपरिहार्य अडचण दर्शवून ती सूचना स्वीकारतां येत नाहीं असें कळविलें असतें, तर गैरसमज पसरला नसता व अप्रिय वादहि माजला नसता; परंतु पंतप्रधान बाळासाहेब खेर यांनीं श्री. पवार यांच्या सूचनेला नकार तर दिलाच, पण तो अशा भाषेंत दिला कीं, त्या योगानें या विषयाचा ऊहापोह करणें प्राप्त आहे. प्राचीन काळांतले युगप्रवर्तक महात्मे आणि अर्वाचीन काळांतले सर्व जमातींना मान्य पुढारी यांच्याच जयंतीला किंवा पुण्यतिथीला सुट्टी देण्याचें सरकारचें धोरण आहे, त्यांत शिवाजीचें नांव बसत नाहीं म्हणून शिवाजीच्या जन्मदिवसाची सुट्टी देतां येत नाहीं, असें उत्तर दिलें गेल्यानें, शिवाजीमहाराज हे युगप्रवर्तक महापुरुष नव्हत, असें त्या उत्तरांतून ध्वनित झालें !

सरकारचा त्यानंतरचा खुलासा कोणास पटो वा न पटो, या उत्तरानें जो प्रश्न उपस्थित झाला आहे, त्या दृष्टीनें युगप्रवर्तक पुरुषाचें लक्षण काय आणि तें लक्षण शिवाजीमहाराजांस लागू पडतें कीं नाहीं तें आपल्या मतनिश्चितीकरितां तरी पाहणें इष्ट आहे.

### 'युगप्रवर्तका'चें लक्षण

'युगप्रवर्तक' या शब्दाची व्याख्या अव्याप्ति व अतिव्याप्ति हे दोन्ही दोष टाळून सयुक्तिक अशीच केली पाहिजे. तसें पाहूं गेल्यास सृष्टीची उत्पत्ति, स्थिति व लय यांचा कर्ता परमेश्वर हा एकटाच काय तो युगप्रवर्तक मानतां येईल; कारण तोच चतुर्युगांचा कर्ता आहे. याच्या उलट समाजाला नवें वळण लावणारा प्रत्येक क्रान्तिकारक वा सुधारक युगकर्ता मानतां येईल; परंतु आपणांस हीं दोन्ही टोकें वर्ज्य करून सुवर्णमध्य साधावयाचा आहे.

(सह्याद्रि, एप्रिल १९५१)

G. P. LIBRARY
BHOR.

महाभारतांत चतुर्युगाची कल्पना सांगून त्या युगांची प्रवृत्ति राजाच्या कृतीवर अवलंबून आहे असें म्हटलें आहे. कालाप्रमाणें व परिस्थितीप्रमाणें राजा किंवा महापुरुष त्या त्या कालाला अनुरूप असा निर्माण होतो, म्हणजे परिस्थिति आत्मानुरूप महापुरुष निर्माण करते असें कांही तज्ज्ञांचें मत आहे. हें मत खरें मानल्यास महापुरुषाला किंवा युगप्रवर्तकाला कांहींच श्रेय देतां येत नाहीं; कारण तो परिस्थितीचा चालक नव्हे, तर परिस्थितीचा बालकच झाला; पण हें मत महाभारतकारांना मान्य नाहीं.

कालो वा कारणं राज्ञः राजा वा कालकारणम् ।
इति ते संशयो मा भूत् राजा कालस्य कारणम् ॥

असा निकाल महाभारतकारांनीं स्पष्टपणें दिला आहे. अर्थातच 'काल हा राजाला (महापुरुषाला) निर्माण करीत नसून, राजा (महापुरुष)च आपल्याला संमत असा काल (युग) निर्माण करतो. हाच सिद्धान्त अधिक स्पष्ट करण्याकरितां महाभारतकार पुढें म्हणतात कीं,

राजा कृतयुगस्रष्टा त्रेताया द्वापरस्य च ।
युगस्य च चतुर्थस्य राजा भवति कारणम् ॥

या श्लोकांत राजा हाच आपल्या पराक्रमानें व शीलानें कृत, त्रेता, द्वापर अथवा कलि यांतील कोणत्याहि युगाचा स्रष्टा होतो, असें निस्संदिग्धपणें सांगितलें आहे.

### देशस्थितीला कलाटणी दिली

महाभारतकारांची ही कसोटी शिवाजीमहाराजांस लावून पाहिल्यास शिवाजीमहाराजांनीं पारतंत्र्याचें आणि स्वदेशधर्माच्या घाताचें कलियुग घालवून लावून देवाब्राह्मणांचें राज्य स्थापन करून सत्ययुग निर्माण केलें असें दिसून येत नाहीं काय? शिवाजीमहाराजांच्या जन्मापूर्वी हिंदुधर्माची व देशाची स्थिति कशी भयंकर होती, आणि शिवाजीमहाराजांनीं रायगडावर राज्याभिषेक करवून घेऊन देशस्थितीला व धर्मग्लानीला केवढी कलाटणी दिली बरें! धर्मरक्षणासाठी युगायुगाच्या ठायीं परमेश्वर अवतार घेतो, असें स्मृतिवचन असलें तरी व्यवहारतः धर्मग्लानि मोडून जेव्हां परत धर्मसंस्थापना होते, तेव्हां असे फेरफार घडवून आणणाऱ्या महापुरुषानें नवें युग सुरू केलें असेंच म्हणणें वस्तुस्थितीला शोभणारें नाहीं काय?

हें सामान्य विवेचन शिवाजीमहाराजांच्या काळाला लावून पाहिलें तर काय दिसून येईल बरें? शिवाजीच्या जन्माआधीं देशस्थिति अत्यंत हीनावस्थेला पोंचली होती आणि वैदिक धर्माची तर नुसती धुगधुगी राहिली होती. दक्षिणेंतलें हिंदूंचें प्रबळ असें विजयनगरचें साम्राज्य स्मृतिशेष होऊन शंभर वर्षें होत आलीं होतीं आणि हिंदूंना बाटविण्याचा आणि त्यांचीं देवळें भ्रष्टविण्याचा तडाका चालला होता.

### समर्थांनीं केलेलें भाकित खरें झालें

श्रीशिवाजीमहाराजांच्या जन्माच्या वेळची अशी स्थिति होती. या सर्व परिस्थितीचें अवलोकन व आकलन करून आणि शिवाजी नांवाचा शककर्ता कृष्णातीरीं देश-धर्मरक्षणार्थ कांहीं यत्न करीत आहे असें ऐकून समर्थांनीं शिवाजीस पत्र लिहिलें. त्यांत ते म्हणतात –

तीर्थक्षेत्रें मोडिलीं । ब्राह्मणस्थानें भ्रष्ट झालीं ।
सकळ पृथ्वी आंदोळली । धर्म गेला ॥
या भूमंडळाचे ठायीं । धर्म रक्षी ऐसा नाहीं ।
महाराष्ट्रधर्म राहिला कांहीं । तुम्हांकरितां ॥
सर्वज्ञ मंडळी धर्ममूर्ति । सांगणें काय तुम्हांप्रती ।
धर्मस्थापनेची कीर्ति । सांभाळली पाहिजे ॥

यावरून धर्माची ग्लानि दूर करून अधर्माचें पाखांड मोडून काढून धर्मसंस्थापना करण्याचें कार्य श्रीशिवाजीमहाराजच करूं शकतील असा समर्थांना भरंवसा वाटला; हें निश्चित आहे. याचाच अर्थ, महाभारताच्या वचनाच्या आधारें शिवाजीमहाराज हे युगप्रवर्तक होणार असें भाकित समर्थांनीं केलें, असा होत नाहीं काय ? शिवाजीच्या जन्माच्या वेळची स्थिति समर्थांच्या शब्दांत वर दिली आहे. त्याच समर्थांनीं शिवाजीच्या अंतकाळीं जें पाहिलें व जें भविष्य वर्तविलें त्याचेंहि वर्णन त्यांच्याच शब्दांत देऊं. या दोन वेळच्या परिस्थितींची तुलना वाचकांनीं करून पाहावी. समर्थ लिहितात –

बुडाले सर्वहि पापी । हिंदुस्थान बळावलें ।
अभक्तांचा क्षयो जाला । आनंदवनभुवनीं ॥
बुडाले भेदवाही ते । नष्ट चांडाळ पातकी ।
गळाले पळाले मेले । जाले देशधडी पुढें ॥
निर्मळ जाहाली पृथ्वी । आनंदवनभुवनीं ॥
उदंड जाहालें पाणी । स्नानसंध्या करावया ।
जप तप अनुष्ठानें । आनंदवनभुवनीं ॥
सामर्थ्यें यशकीर्तीचीं । प्रतापें सांडिली सीमा ।
ब्रीदेचीं दीधलीं सर्वें । आनंदवनभुवनीं ॥

असें हें वर्णन आणखी लिहावें तेवढें थोडेंच आहे. पण त्यावरून एक गोष्ट सिद्ध आहे कीं, शिवजन्माच्या वेळची स्थिति आणि त्यांच्या अंतकाळची स्थिति यांत जमीनअस्मानाचें अंतर पडलें होतें आणि ज्या विभूतीच्या कर्तृत्वानें असें जमीन-अस्मानाइतकें स्थित्यंतर घडून येतें त्या विभूतीलाच 'युगप्रवर्तक' म्हणणें रास्त ठरेल.

शिवकालीन जनतेच्या भोळ्या समजुतीप्रमाणें तर शिवाजी हा अवतारी पुरुषच होता. भोळ्या लोकांची ही भावना बाजूस सारली तरी, त्या वेळच्या साक्षेपी

पुरुषांनींहि त्यांना 'शककर्ता' म्हणून संबोधिलें आहे. समर्थांच्या जन्मकाळींच एकनाथस्वामींनी '**हा परमसमर्थ होईल, कोण्ही शककर्ता कृष्णातीरीं होईल! याच्या योगें त्याची कीर्ति होईल; धर्मस्थापना होईल**' असें भविष्य वर्तविलें होतें. ऐतिहासिक दृष्टया एकनाथस्वामींचा समाधिकाल समर्थांच्या जन्माच्या पूर्वींच येतो. म्हणून हें भविष्य एकनाथस्वामींचें नसून त्यांच्या शिष्य-प्रशिष्याचें असेल; पण त्या वेळीं शिवाजी हा शककर्ता होणार ही समजूत प्रचलित होती, एवढेंच त्यावरून आम्हांस पाहावयाचें आहे.

## वाचमर्थोऽनुधावति

हीहि भोळी समजूत आपण बाजूला सारली तरी ज्या समर्थांनीं शिवाजीचें चरित्र जन्मापासून अखेरपर्यंत अगदीं जवळून पाहिलें त्यांचें मत तर आपणांस ग्राह्य मानलेंच पाहिजे. श्रीसमर्थ हे अत्यंत साक्षेपी होते. त्यांचे शब्द जोखून तोलूनच वापरलेले असणार. समर्थांनीं प्रत्यक्ष भेटीच्या पूर्वींच शिवाजीचें कर्तृत्व पाहून व ऐकून शिवाजीला कसें संबोधिलें तें पाहा —

निश्चयाचा महामेरू। बहुत जनांसी आधारू।
जयाचे गुण-महत्त्वासी। तुळणा कैंची ।।
यशवंत कीर्तिवंत। सामर्थ्यवंत वरदवंत।
पुण्यवंत आणि जयवंत। जाणता राजा ।।
धीर उदार सुंदर। शूर क्रियेसी तत्पर।
सावधपणेंसि नृपवर। तुच्छ केले ॥
या भूमंडळाचे ठायीं। धर्म रक्षी ऐसा नाहीं।
महाराष्ट्रधर्म राहिला कांहीं। तुम्हांकरितां ॥
आणखी कांहीं धर्म चालती। श्रीमंत होऊनि कित्येक असती।
धन्यधन्य तुमची कीर्ति। विश्वीं विस्तारली ॥

यांतील कांहीं भाग प्रत्यक्ष घडलेला, पण पुष्कळसा भाग भविष्यरूपाचा आहे; तथापि तें भविष्य तंतोतंत खरें झालेलें आहे. समर्थांना अशी वाक्‌सिद्धिच प्राप्त झाली होती कीं, ते जें होणार म्हणून आगाऊ म्हणतील तेंच पुढें प्रत्यक्ष घडून येई.

**लौकिकानां हि साधूनां अर्थं वागनुधावति।**
**ऋषीणां पुनराद्यानां वाचमर्थोनुधावति ॥**

या दोन वर्गांपैकीं 'आद्य ऋषीं'च्या कोटींत समर्थांची गणना करतां येईल. याकरितां समर्थांनीं शिवाजीमहाराजांची जी बालपणींच स्तुति केली, ती मोठेपणीं यथार्थच ठरली; पण बालपणच्या स्तुतीचाच दाखला कशाला घ्या. मोठेपणीं महापराक्रम करण्याच्या वेळीं आणि तो पराक्रम घडल्यानंतर समर्थांनीं शिवाजीमहाराजांविषयीं काय म्हटलें तेंहि नमूद आहेच. दासबोधांतील १८ व्या दशकांतला ६ वा समास

'उत्तम-पुरुषलक्षण' म्हणून आहे. त्यांत वर्णिलेला उत्तम पुरुष 'शिवाजी'च होय. त्या समासांत समर्थ लिहितात –

यश कीर्ती प्रताप महिमा। उत्तम गुणासि नाहीं सीमा।
नाहीं दुसरी उपमा। देणें ईश्वराचें॥
धर्मस्थापनेचे नर। ते ईश्वराचे अवतार।
जाहले आहेत पुढें होणार। देणें ईश्वराचें॥
उत्तम गुणाचा ग्राहक। तर्क तीक्ष्ण विवेक।
धर्मस्थापना पुण्यश्लोक। देणें ईश्वराचें॥
देवाचा कैपक्ष घेणें। ब्राह्मणांची चिंता वाहणें।
बहुत जनांसि पाळणें। देणें ईश्वराचें॥

अशा शब्दांत ज्या उत्तमपुरुषाचे गुण समर्थांसारख्या निःस्पृह महंतानें गाइले तो उत्तमपुरुष जर युगप्रवर्तक नव्हे, तर मग युगप्रवर्तक याचा अर्थच बदलला असें मानावें लागेल.

### हें वर्णन शिवाजीचेंच

वर उद्धृत केलेल्या वेच्यांत शिवाजीमहाराजांचें नांव नाहीं, तेव्हां तें सगळें वर्णन शिवाजीराजांचेंच कशावरून अशी शंका चिकित्सक वाचक घेतील. परंतु हें वर्णन शिवाजीमहाराजांच्या अनुषंगाने त्यांच्या वंशजांची बिरुदावलि झालें. समर्थांच्या मठांतून सातारच्या छत्रपतींना उत्सवासंबंधीं आणि अन्य प्रकरणीं जीं दरबारीं पत्रें जात, त्यांत सातारच्या छत्रपतींचा हा मायनाच ठरून गेला होता. त्यांना पत्र लिहितांना –

यशश्री कीर्ति प्रताप महिमा। उत्तम गुणासि नाहीं सीमा।
नाहीं दुसरी उपमा। देणें ईश्वराचें॥
देवाचा कैपक्ष घेणें। ब्राह्मणांची चिंता वाहाणें।
बहुत जनांसी पाळणें। देणें ईश्वराचें॥

असें संबोधून पुढें इतर मजकूर लिहीत.

यावरून हीं लक्षणें शिवाजीमहाराजांस अनुलक्षूनच प्रथम रामदासांनीं योजिलीं हें स्पष्ट होतें. पदव्या व बिरुदावलि प्रथम एखाद्या कर्तबगार पूर्वजानें संपादन कराव्या व त्या त्यानंतरच्या वंशजांच्या नांवाला कायमच्या चिकटून राहाव्या अशीच रूढि आहे. शिवाजीनंतरच्या कोठल्याहि छत्रपतीच्या अंगीं स्वतः ही बिरुदावलि संपादन करण्याचें कर्तृत्व नसल्यानें, या बिरुदावलीचा उगम समर्थांनीं अफझलखानाच्या वधानंतर शिवाजीचा जो गौरव केला त्यांतच असावा, हें उघड आहे.

### आधुनिक इतिहासकारांची कसोटी

हे जुने ऐतिहासिक दाखले सोडून देऊन आपण आधुनिक ऐतिहासिक दृष्टीनें इतर देशांतील महापुरुषांशीं तुलना करून पाहूं गेलों तरी शिवाजीमहाराजांची

योग्यता अतुलनीय अशी सर्वश्रेष्ठच ठरते. महापुरुषांच्या मोठेपणाचें मूल्यमापन करतांना (१) त्यांना मिळालेला साधनांचा वारसा, (२) त्यांचे सहायक, (३) परिस्थितीची अनुकूलता वा प्रतिकूलता, (४) प्रतिस्पर्ध्यांचें बलाबल आणि (५) यशस्वितेचें परिमाण, अशा पांच गोष्टी लक्षांत घेऊन महापुरुषांत क्रमवारी लावण्यांत येते. या सर्व कसोट्या लावून पाहिल्यास सर्व महापुरुषांत शिवाजीमहाराज हेच सरस ठरतात.

(१) शिकंदर बादशहाला आणि हानिबॉलला जसें बापानें शिकवून तयार ठेवलेलें सैन्य वारसाहक्कानें आयतें लाभलें तसा कांहीं लाभ शिवाजीला झाला नाहीं. शहाजीनें शिवाजीला पुणें प्रांतांतला मोकासा दिला खरा, पण त्याबरोबर कांहीं त्यानें आपल्या हाताखालचें खासें सैन्य शिवाजीला दिलें नाहीं. शिवाजीला आपले सगळे सवंगडी व सैन्य स्वतः पारखून व शिकवून अुभें करावें लागलें. पुणें प्रांताची जहागीर मिळाली खरी, पण ती जहागीर निर्वेधपणें आपलीशी करून घेईपर्यंत त्याला निजामशाही, आदिलशाही व मोगलशाही अशा तीन शाह्यांच्या सरदारांशीं व जहागीरदारांशीं झगडावें लागलें.

(२) शहाजीच्या हाताखालचे दादाजी कोंडदेव, जेधे, बांदल वगैरे सरदार आणि कांहीं मंत्री यांचें साहाय्य त्यास प्रारंभीं मिळालें, पण तें अत्यंत अपुरें होतें. त्यानंतरचे सर्व सहायक त्याला स्वतःच्या पराक्रमाच्या जादूनें भारूनच वश करून घ्यावे लागले. नेपोलियनप्रमाणें आयतें सैन्य आणि आयताच लष्करी अधिकार त्याच्या आधीन झाला नाहीं. हानिबॉलप्रमाणेंहि शिवाजीला आपल्या बापाच्या पराक्रमानें उठावणी मिळाली नाहीं.

(३) परिस्थिति तर शिवाजीला जितकी प्रतिकूल होती तितकी कोणत्याच महापुरुषाला प्रतिकूल नसेल. आल्फ्रेड दी ग्रेट याला अत्यंत हालअपेष्टेंत दिवस काढावे लागले हें खरें. तथापि त्याची आपत्ति नैसर्गिक नसून प्रासंगिक होती. त्याचे अनुयायी त्याला साहाय्य करण्यास उत्सुक होते व त्याला शोधून काढून त्यांनीं तत्परतेनें त्याला साहाय्य केलें. शिवाजीच्या भोवतीं सगळीकडून शत्रूंचाच गराडा पडला होता. आदिलशाही व मोगलशाही यांच्या कात्रींत तो सांपडला असून कोकणांत सिद्दी व पोर्तुगीज हे त्याला पाण्यांत पाहात होते. याशिवाय सर्वांत अडचणीची व मोठी नडणारी गोष्ट ही कीं, मोरे, सावंत, घोरपडे यांसारखे तालेवार मराठे सरदारच, शिवाजीच्या ध्येयाची व पराक्रमाची त्यांना प्रथम कल्पना न आल्यानें, त्याला प्रतिस्पर्धी होऊन अस्तनींतल्या निखाऱ्याप्रमाणें चटके देत होते.

(४) शत्रूचें बलाबल लक्षांत घेतां शिवाजीची लष्करी तयारी आणि आदिलशाही व मोगलशाही यांची लष्करी सामुग्री यांची तुलनाच होऊं शकत नाहीं. त्यांतून अवरंगजेबानें जेव्हां जयसिंगासारखा अस्सल मोहरा पुढें करून शिवाजीला शह दिला, त्या वेळीं तर शिवाजीला मुठींत नाक धरून २० किल्ले देऊन तह करावा

लागला, आणि आग्र्याला पातशहाच्या भेटीला जाऊन त्याच्या पिंजऱ्यांत अडकून पडावें लागलें. क्रॉम्वेल, जॉर्ज वॉशिंग्टन, फ्रेडरिक दी ग्रेट इत्यादि कोठल्याहि देशांतले थोर सेनापति घेतले तरी त्यांच्यावर एवढें घोरसंकट केव्हांच आलें नव्हतें आणि एवढ्या प्रबळ प्रतिस्पर्ध्याशीं त्यांची गांठ पडली नव्हती.

(५) अशा प्रकारें सर्व बाजूंनीं प्रतिकूलता असतां आणि फाटलेल्या आकाशाला ठिगळ लावण्याप्रमाणें अवरंगजेबाच्या तडाक्यांतून हिंदुशाही व हिंदुधर्म यांची सुटका करणें अशक्य वाटत असतां, शिवाजीमहाराजांनीं हिंदुपदपातशाही स्थापून रायगडावर जो यशोध्वज फडकविला त्याला इतिहासांत तोडच मिळणार नाहीं. शिवाजीच्या यशांत बिलकूल उणेपणा राहिला नव्हता. नेपोलियनच्या किंवा हानिबॉलच्या यशाप्रमाणें त्याच्या यशाला कधींच ग्रहण लागलें नाहीं. मराठेशाहीची स्थापना शिवाजीनें जी एकदा केली ती दृढमूल झाली. अशा भक्कम पायावर ज्या विभूतीनें मराठेशाहीची उभारणी केली तो महापुरुष युगप्रवर्तक नव्हे असें म्हणणें इतिहासाचा विपर्यासच नव्हे काय ?

## शिवाजीची अपूर्व कर्तबगारी

(१) शिवाजीनें शिकंदराप्रमाणें स्वतःच्या बडेजावीकरितां साम्राज्यशाही स्थापली नाहीं. त्यानें धर्माची ग्लानि दूर करून हिंदुधर्मावरचें संकट दूर करून, हिंद देश यवनमय होण्याच्या महासंकटापासून वांचविला. (२) गनिमीकाव्याच्या युद्धाची तालीम देऊन आपल्या लष्करी चातुर्यानें मराठे लष्कर अजिंक्य करून ठेवलें. (३) आरमाराची अगदीं नवीच उभारणी करून व जलदुर्गांची रचना करून पाश्चात्यांच्या आक्रमणाला तोंड देण्याची तयारी करून ठेवली. (४) दूरदृष्टीनें डोंगरी किल्ल्यांची पेरणी करून ठेवून व त्यांच्या संरक्षणार्थ नियम बांधून देऊन त्यानें महाराष्ट्र देश पादाक्रान्त करणें शत्रूच्या पायदळाला व घोडदळाला अशक्य करून ठेवलें. (५) सरंजामशाही मोडून रयतेचा गादीशीं साक्षात् संबंध जोडला. (६) मंत्रिमंडळ नेमून राज्याला स्थिरता आणली आणि जुलमी राजांपासून होणाऱ्या छळाला आळा घातला. (७) चौथाईची, सरदेशमुखीची नवी टूम काढून शिवशाहीची परिणति साम्राज्यशाहींत होण्याच्या मार्गांतला पहिला टप्पा गांठला. (८) स्वतः धर्मनिष्ठ राहून आणि उत्कृष्ट शीलसंपन्नता राखून राज्याचें बल धर्मशीलतेंत आहे हें सर्वांच्या प्रत्ययास आणून दिलें. (९) खडें सैन्य व भरपूर खजिना यांच्यावर राज्याची बळकटी अवलंबून आहे हें जाणून सैन्याची जय्यत तयारी आणि गडगंज खजिना कायम राखण्यांत त्यानें केव्हांहि कसूर होऊं दिली नाहीं. (१०) अधिकाऱ्यांकडून प्रजेचा छळ न होईल अशी दक्षता घेऊन उत्तम परीक्षा करून कसोटीला उतरतील असेच अधिकारी त्यानें नेमले. (११) अन्यायाची गय न करतां व अपराध्याला शिक्षा करण्यांत कोणाचाहि मुलाहिजा न राखतां शत्रु व मित्र या उभयतांवरहि त्यानें सारखाच वचक बसविला.

शिवाजीच्या अंगचे हे राजकारणांत व्यक्त होणारे गुण झाले. याशिवाय वैयक्तिक दृष्टीनें पाहिल्यास त्याचें शौर्य, धैर्य, धाडस, स्वधर्माभिमान, स्वदेशाभिमान, मातृपितृभक्ति, गुरुनिष्ठा, निष्कलंक सच्चारित्र्य, प्रत्युत्पन्नमतित्व, दूरदर्शित्व, निष्कपट स्नेह, दीनदयाळुत्व, उदारपणा, स्त्रीदाक्षिण्य, परधर्मसहिष्णुता इत्यादि विविध गुण अवर्णनीय होते. इतका मोठा गुणसमुच्चय एकाच महापुरुषांत इतरत्र क्वचितच आढळेल.

## न्यायमूर्ति रानडे काय म्हणतात ?

आतां श्रीशिवाजीमहाराजांच्या योग्यतेविषयीं इतिहासज्ञ विद्वानांनीं कोणता अभिप्राय लिहून ठेविला आहे तो नमूद करून हें विवेचन पूर्ण करूं. न्यायमूर्ति रानडे लिहितात – " हिंदुस्थानाच्या इतिहासांत शिवाजीनें आपलें नांव अजरामर करून ठेवलें आहे. आत्मबलिदान करण्यापर्यंत सळसळणारी धर्मनिष्ठा, दैवी शक्तीचें कवच आपलें रक्षण करीत आहे अशा भावनेनें अंगीं आलेलें अपूर्व धैर्य आणि धाडस, लोकवशीकरणाची अद्भुत जादू, कालप्रसंगानुरूप जनतेच्या गरजा अचूक जाणून त्या पुरविण्याची दूरदृष्टि, संकटाचे डोंगर कोसळले तरी विचलित न होणारा दृढनिश्चय, पौर्वात्य वा पाश्चात्य कोठल्याहि ऐतिहासिक पुढाऱ्यांत क्वचितच आढळणारें प्रसंगावधान आणि योजनाचातुर्य, खरा देशाभिमान, न्यायबुद्धि व दयार्द्रबुद्धि यांचा समन्वय इत्यादि गुणांच्या आधारानें शिवाजीनें जो स्वराज्याचा पाया घातला तो इतका पक्का खंबीर होता कीं, शिवाजीच्या पश्चात् मराठ्यांना त्या पायावर शिवाजीच्या योजनानुसार टोलेजंग साम्राज्य उभारतां आलें आणि इतिहासांत साम्राज्यकर्ते म्हणून मराठ्यांचें नांव नोंदवून ठेवतां आलें."

शिवाजीचे चरित्रकार डॉ. बाळकृष्ण ( कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजचे माजी प्रिन्सिपॉल ) यांनीं अनेक विद्वानांचीं मतें पडताळून व पारखून पाहून शेवटीं निष्कर्ष काढला आहे तो असा –

" अनेक प्रबळ प्रतिस्पर्ध्यांशीं झगडून शिवाजीने हिंदुपदपातशाही स्थापित केली, यांत त्याचा थोरपणा दिसून येतो. 'बंडखोर' शिवाजीला स्वराज्यस्थापनेचा कित्ता वळविण्याला कोणीहि अर्वाचीन राज्यकर्ता त्याच्या दृष्टीसमोर नव्हता. एवढेच नव्हे, जे कांहीं थोडे हिंदु राजे त्याच्या वेळीं होते, ते शिवाजीला चिरडून टाकण्याच्या कामांत मुसलमान राज्यकर्त्यांशीं संगनमत करीत होते ! अशा प्रतिकूल परिस्थितींत हिंदुराज्याची स्थापना करणें हें अचाट व अतिमानुष पराक्रमाचें व बुद्धिमत्तेचें कार्य होतें. शिवाजीनें आपल्या एकट्याच्या नैसर्गिक बुद्धिमत्तेच्या जोरावर, कोणाच्याहि साहाय्याची अपेक्षा न धरतां, अजिंक्य सेना निर्माण केली, तिच्या जोरावर सुसंघटित राज्य स्थापिलें आणि त्या राज्यांत भव्य आणि जनहितोपकारक अशी राज्यपद्धति निर्माण केली. स्वाभाविकपणेंच हिंदूंना हा स्वराज्यसंस्थापक, स्वधर्मपुनरुज्जीवक, आर्य संस्कृतीचा संरक्षक पुढारी, अतिमानुष कोटींतला, देवाचा अवतारच वाटूं लागल्यास त्यांत नवल नाहीं."

### समर्थांच्या वर्णनाला इतिहासकारांची मान्यता

'निश्चयाचा महामेरू' या शब्दांनीं समर्थांनीं शिवाजीचें जें वर्णन केलें, तें या लेखांत प्रारंभीं उद्धृत केलेंच आहे. तें वर्णन कित्येकांस अतिशयोक्तीचें वा भाविकतेचें वाटेल; परंतु डॉ. बाळकृष्ण यांनीं शिवाजीच्या चरित्रांत शिवाजीच्या अंगच्या गुणांचें वर्णन करण्यासाठी 'निश्चयाचा महामेरू' हें समर्थांचें पत्रच आधारभूत मानून त्या पत्रांत उल्लेखिलेले सर्व गुण शिवाजीमहाराजांच्या अंगीं होते असा निर्वाळा दिला आहे. त्यावरून समर्थांना गुणांची पारख किती उत्तम होती आणि शिवाजीच्या अंगीं कोणते लोकोत्तर गुण होते याची उत्तम साक्ष पटते.

### महाराष्ट्राचें अधिदैवत

मुसलमानांच्या मगरमिठींतून व जुलमापासून महाराष्ट्राची मुक्तता करणारा, हिंदुधर्माचा पुनरुद्धारकर्ता, अनेक धार्मिक व सामाजिक सुधारणांचा उपक्रम करणारा शिवाजी, महाराष्ट्राचें अधिदैवत बनला हें यथायोग्यच होय. असा हा राजकीय द्रष्टा, मुसलमानांच्या जोखडांतून महाराष्ट्राची मुक्तता करण्यासाठी बंडाचें निशाण उभारणारा बडा बंडवाला, महाराष्ट्रांतला नरकेसरी आणि भारताच्या स्वातंत्र्याचा ध्रुवतारा, असा शिवाजी हा आम्हां सर्वांचें स्फूर्तिस्थानच होऊन राहील. इतिहासांत आजवर जे जे जगज्जेते म्हणून गाजले, स्वराज्यसंस्थापक म्हणून नांवाजले गेले, सर्वश्रेष्ठ देशाभिमानी म्हणून गणले गेले आणि मातृभूमीच्या मुक्ततेसाठीं लढणारे असे जे दिव्य अमर वीर होऊन गेले, त्यांच्या मालिकेंत शिवाजीचें स्थान अत्यंत वरच्या दर्जाचें आहे.

अशा रीतीनें ज्यानें पारतंत्र्यगर्तेतून स्वराष्ट्राचा उद्धार केला, ज्याच्या राजमुद्रेचें विश्ववंदित्व सार्थ ठरलें, ज्यानें कलियुगाचें सत्ययुग बनविलें अशा विश्ववंद्य नरश्रेष्ठाला जर युगप्रवर्तक म्हणावयाचें नाहीं तर काय सत्ययुगाचें कलियुग करून सोडणाऱ्या निंद्य मतिभ्रष्टांना युगप्रवर्तक मानावयाचें ?

---

## श्रीशिवरायाची त्रिशतसांवत्सरिक जयंती : ६

[ जेधे शकावलींतील आणि शिवभारतांतील शिवाजीच्या जन्माची जी खरी तिथि, त्या तिथीला अनुसरून शिवाजीच्या जन्माला तीनशें वर्षें झालीं, त्यानिमित्त शिवनेरीवर मोठा उत्सव झाला. त्या प्रसंगाला अनुलक्षून हा लेख लिहिला आहे. या लेखांत शिवाजीच्या अंगच्या अलौकिक गुणांची इतर जगप्रसिद्ध महापुरुषांच्या अंगच्या गुणांशीं तुलना करून शिवाजीमहाराज कसे सर्वश्रेष्ठ ठरतात तें दर्शविलें आहे. ]

(केसरी, दि. १८ मार्च १९३०)

शिवरायाचें आठवावें रूप। शिवरायाचा आठवावा प्रताप।
शिवरायाचा आठवावा साक्षेप। भूमंडळीं॥

– समर्थ रामदास

पौराणिक काळांत साधूंच्या परित्राणाकरितां आणि दुष्कृतांच्या विनाशाकरितां अनेक ठिकाणीं अनेक अवतार झाले असतील; परंतु आधुनिक काळांत या भरतभूमीला यवनांच्या धार्मिक व राजकीय जुलमांतून मुक्त करून स्वराज्याचा जरीपटका आणि हिंदुधर्माचा भगवा झेंडा आसेतुहिमाचल डौलानें फडकत व नाचवीत ठेवण्यास कारणीभूत झालेला ऐतिहासिक अवतारी पुरुष श्रीशिवाजीच होय. भरतखंडाला ललामभूत असा हा वीर पुरुष आपल्या महाराष्ट्रांत जन्मास आला, आणि त्यानें महाराष्ट्राचें नांव जगाच्या इतिहासांत सुवर्णाक्षरांनीं लिहून ठेवण्याच्या योग्यतेचें केलें म्हणून कृतज्ञ महाराष्ट्रास शिवरायाविषयीं सदोदित निरतिशय आदर व अभिमान वाटत आहे. त्याचप्रमाणें शिवरायानें इस्लामी धर्म-प्रसाराची लाट उलटवून हिंदुधर्मावरील प्राणांतिक संकट दूर केलें आणि 'देवराखे देवलमे स्वधर्म राख्यो घरमे' असली धर्मरक्षणाची अद्भुत कर्तबगारी करून दाखविली. यास्तव जेथें जेथें हिंदुधर्माचा ध्वज आजमितीला फडकत आहे तेथें तेथें शिवरायाचें नांव ऐकतांच हिंदुधर्मसंरक्षक या नात्यानें त्यांच्याविषयींची पूज्यबुद्धि हरएक प्रकारें व्यक्त केल्याविना राहात नाहीं. तथापि स्वराज्यसंस्थापक म्हणून स्वातंत्र्येच्छुजनांना शिवाजीविषयीं जो अभिमान वाटतो, आणि त्याच्या पराक्रमाचें वर्णन ऐकून त्यांना जें स्फुरण चढतें त्याला देशाची, धर्माची किंवा इतर कसलीहि मर्यादा लागू नाहीं. यामुळेंच या वीर पुरुषाच्या त्रिशतसांवत्सरिक जयंतीच्या उत्सवांत महाराष्ट्रेतर व हिंदीतर लोकहि आदरानें व औत्सुक्यानें आज भाग घेत आहेत.

पण तीनशें वर्षांनंतर आजमितीला शिवाजीच्या पराक्रमाचें वर्णन करणाऱ्या आणि त्याच्या स्वराज्यस्थापनेचें कौतुक करणाऱ्या लक्षावधि लोकांतून कितीजणांना तत्कालीन परिस्थितीची यथार्थ कल्पना असेल? स्वराज्याची, स्वातंत्र्याची कल्पना उच्चारून दाखविणें आणि वाटेल तेथें स्वराज्याचें निशाण उभें करणें या गोष्टी त्या वेळीं हल्लींच्याप्रमाणें सहजसाध्य नव्हत्या. हिंदुत्व आणि छत्रपतित्व यांची फारकत होऊन जवळजवळ शंभर वर्षें लोटल्यामुळें हिंदुधर्मीय सरदार केवढाहि अचाट पराक्रमी असला तरी तो सिंहासनारूढ होऊं शकेल ही कल्पनाच त्या वेळीं बहुतेकांना अशक्य कोटींतील वाटत होती. उलटपक्षीं मुसलमानांची सत्ता बाह्यतः इतकी बद्धमूल होऊन बसली होती आणि हिंदूंच्या स्वतंत्र पराक्रमाला वावरण्याला क्षेत्र इतकें थोडकें राहिलें होतें कीं, हिंदूंच्या स्वराज्यरूपी वृक्षाचें बीं नेमकें योग्य स्थळीं पेरलें जाईल, त्याला अनुकूल असें खतपाणी मिळेल, बालपणीं त्याची योग्य जोपासना होऊन घातक

प्राण्यांचें तोंड त्याला त्या वेळीं न लागेल, त्याचा जोमदार वृक्ष बनल्यावर त्याच्या एकेक शाखेच्या तडाख्यानें एकेका दिशेचीं कांटेरी झाडेंझुडपें झोडपून काढून स्वराज्यरूपी वृक्षाच्या वाढीची वाट मोकळी करतां येईल आणि अशा रीतीनें त्याची वाढ पूर्ण होऊन त्याच्या छायेखालीं अखिल महाराष्ट्र सुखानें नांदत असलेलें आपण पाहूं, असा केवळ मनोरथ करणारा इसम देखील त्या वेळीं अत्यंत धाडसी मानला गेला असता. अर्थातच सर्वत्र निराशेचा व किंकर्तव्यतामूढतेचें घनदाट तमःपटल पसरलें होतें आणि त्यामुळें कोणासच कोठेंहि आशेचा किरण दिसत नव्हता.

अशा नितान्त निराशेच्या मध्यरात्रीं शिवरायाचा शिवनेरीवर जन्म झाला आणि त्याच्या उदयाबरोबरच महाराष्ट्राच्या मनोभूमींतील निराशारूपी अंधकार ओसरत चालला. आशेच्या उत्साहजनक किरणांनीं प्रथम जिजामातेच्या अंतःकरणांत प्रवेश केला. तिलाच प्रथम वाटूं लागलें की, आपला हा पुत्र स्वधर्मोद्धारक आणि स्वराज्यसंस्थापक होईल आणि तो सिंहासनारूढ झालेला पाहून आपल्या डोळ्यांचें पारणें फिटेल. स्वातंत्र्यशाहीर कवि गोविंद यानें जिजाबाईच्या या आशाजनक विचारांचें वर्णन आपल्या काव्यमयवाणीनें पुढीलप्रमाणें केलें आहे :—

**भूभक्तीचें प्रबल दुग्ध पाजीन । मी वीर तुला बनवीन ॥**
**रिपुरक्तें भू तुझ्या करीं न्हाणीन । स्वातंत्र्य घरीं आणीन ॥**
**साधीन सख्या ज्ञाण लोककल्याण । तुज राज्यपदीं स्थापून ॥**

हें वर्णन जरी कवीच्या काव्यप्रतिभेंतून अवतरलें असलें तरी जिजामातेच्या मनांतील विचारांचें प्रतिबिंब त्यांत हुबेहूब उठलें आहे असें मानण्यास हरकत नाहीं; कारण शिवाजीच्या जन्मापासून आपल्या पुत्राचा राज्याभिषेक कधीं पाहीन हाच एक विचार जिजाबाईच्या मनांत घोळूं लागला होता व तेंच तिचें जन्माचें ध्येय बनलें होतें; आणि खरोखरीच शिवाजीला राज्याभिषेक झाल्यावर दहाच दिवसांनीं त्या वीरमातेनें आपले डोळे मिटले.

शिवाजीच्या अवतारकार्याची जिजाबाईची कल्पना केवळ मातृप्रेमावर अधिष्ठित होती; आणि मातृप्रेम हें बोलूनचालून आंधळें असल्यानें हें आपलें ध्येय कसें साधेल, केव्हां साधेल इत्यादि विचारांचा कीस काढीत बसण्याची त्यास इच्छाच नसते. परंतु आपल्या पुत्रावर डोळस प्रेम करणाऱ्या शहाजींच्या अंतःकरणांतहि हीच आशा आस्ते आस्ते उदित होऊं लागली, आणि जें **बापाला साधलें नाही तें मुलगा साधील** अशा भरंवशानें शहाजी हा शिवाजीच्या शिक्षणाची तजवीज करूं लागला. अर्थातच शहाजीच्या या आशेला पायाहि कांहींसा खंबीर होता. बाह्यतः यावनी सत्ता कितीहि खंबीर व पक्की रुजलेली दिसत असली तरी आंतून कीड लागून ती अगदीं पोकळ झाली आहे, आणि तिचीं पाळेंमुळें कुजूं लागून तिचा एकेक आधार सुटत चालला आहे हें निजामशाहींत व आदिलशाहींत अधिकारपदावर वागलेल्या शहाजीसारख्या दीर्घदर्शी

मुत्सद्द्याच्या लक्षांत आल्यावांचून कसें राहील? शहाजीनें निजामशाहीरूपी व आदिलशाहीरूपी यावनी वृक्षांचें बळ त्यांस अनेक वेळा गदगदां हलवून अजमावून पाहिलें होतें. आणि त्यांतली निजामशाही सावरून धरण्याचा त्यानें स्वतः प्रयत्न केला असतां मोंगलांच्या विरोधाची नुसती झुळूक लागतांच ती शाही कोलमडून पडलेलीहि त्यानें प्रत्यक्ष पाहिली होती. विजापूरची आदिलशाही जरी अद्यापि उभी होती तरी तो नुसता पोकळ डोलारा असून जास्त बंडाळीचा वारा लागतांच तोहि कोलमडून पडेल, असें शहाजीला स्वानुभवावरून अलीकडे वाटूं लागलें होतें. पण तेवढा धक्का देण्याची धडाडी उतारवयामुळें त्यांच्या अंगांत राहिली नव्हती. सबब आपण आपल्या मुलाच्या मार्गांतून बाजूस व्हावें, आणि त्याला आपल्या सर्व साधनांचा उपयोग करूं द्यावा अशा धोरणानें शहाजी महाराष्ट्रापासून दूर अलग राहूं लागला आणि शिवाजीचा मार्ग मोकळा झाला.

मातृप्रेमामुळें जिजामातेला आणि मुत्सद्देगिरीच्या दीर्घदर्शी दृष्टीमुळें शहाजीला शिवाजीचा जो भावी उत्तुंग उत्कर्ष बालपणापासूनच दिसूं लागला होता तोच क्रमाक्रमानें शिवाजीच्या अंगचे तडफ, दुर्दमनीय महत्त्वाकांक्षा, क्षत्रियोचित बाणेदारपणा इत्यादि गुण पाहून दादोजी कोंडदेवास आणि त्याचें अचाट धाडस, लोकवशीकरणाची त्याची हातोटी, मनुष्यस्वभावाची त्याची अचूक पारख इत्यादि गुणांची प्रचीति येऊन तानाजी, बाजी, येसाजी इत्यादि बालसंवगड्यांस अगाऊच दिसूं लागला. त्याचप्रमाणें अखिल भरतखंड पालथें घालून हिंदुधर्मरक्षक असा कोणी गाजी आढळतो काय, याचा शोध करणाऱ्या समर्थ रामदासस्वामींनींहि ज्याचा आपण शोध करीत आहोंत तो देशोद्धारकर्ता ईश्वरी अवतार शिवाजीच होय अशी खूणगांठ, ' या भूमंडळाचे ठायीं । धर्मरक्षी ऐसा नाहीं । महाराष्ट्रधर्म राहिला कांहीं । तुम्हांकरितां ॥ ' असें म्हणून बांधून ठेविली.

अशा रीतीनें शिवाजीच्या भावी उत्कर्षाविषयीं कोणी कितीहि कल्पना अगाऊ केल्या असल्या तरी शिवरायाच्या अजब उत्कर्षाची उडी या सर्वांच्या कल्पनासृष्टीच्याहि पलीकडे गेली हा एक शिवाजीच्या अंगच्या अद्वितीयत्वाचा पुरावाच होय. इतिहासाचार्य विसूभाऊ राजवाडे लिहितात कीं, ' शिवाजीशीं तुलना करण्याकरितां जी जी म्हणून लोकोत्तर व्यक्ति घ्यावी ती ती कोणत्याना कोणत्या गुणांत तरी शिवाजीहून कमतरच ठरते ! ' हें मत राजवाडे यांनीं महाराष्ट्रीय म्हणून कदाचित् महाराष्ट्राच्या अभिमानाच्या भरांत झोकून दिलें असेल असें क्वचित् कोणास वाटेल; पण शिवाजीच्याच समकालीन अशा परदेशच्या इतिहासकारांनी असेंच लिहून ठेविलें आहे कीं, ॲलेग्झँडरमध्यें जी तडफ दिसून येत होती, ज्युलियस सीझरमध्यें जें संघटनाचातुर्य आढळत होतें आणि हानिबॉलच्या हालचालींत जे विलक्षण डावपेंच होते ते सर्व गुण एकट्या शिवाजीच्या लष्करी पराक्रमांत एकवटलेले दिसून येतात !

तथापि शिवाजीचा मोठेपणा केवळ त्याच्या युद्धकौशल्यांतच प्रतीत झालेला नाहीं. रणांगणावर जसा त्यानें अचाट पराक्रम केला तसाच मुलकी राज्यकारभाराची सुव्यवस्था लावून देण्यांतहि त्यानें आपली अलौकिक बुद्धिमत्ता सिद्ध केली. राज्यव्यवस्थेसंबंधानें त्यानें जें धोरण घालून दिलें होतें तें जोंपर्यंत पाळलें गेलें तोंपर्यंत मराठ्यांस पराजय स्पर्श करूं शकला नाहीं. पण त्यानें घालून दिलेली शिस्त बिघडतांच तिचे दुष्परिणाम राष्ट्रास भोगावे लागले. न्यायाच्या कामांत तो जातगोत, आप्तसंबंध बिलकूल लक्षांत न घेतां निःपक्षपातानें व न्यायनिष्ठुरपणानें निर्णय देत असे. त्यामुळें त्याच्या राज्यांत प्रजेवर जुलूम होऊं शकला नाहीं. हरून अलरशीदप्रमाणें तो स्वतः गुप्त वेषानें प्रजाजनांत हिंडून राज्यकारभार कसा काय चालला आहे याची चौकशी करी, आणि जर कोणाचा अन्याय दिसला तर त्याच्या पूर्वीच्या इतर कामगिरीचा मुलाहिजा न धरतां त्यास कडक शिक्षा करी. यामुळें अधिकाऱ्यांवर त्याचा एवढा वचक बसला होता कीं, त्याच्या कारकीर्दीत प्रजेचा छळ केवळ कल्पना-सृष्टींतच राहून सर्वांना खऱ्या रामराज्याचें सुख उपभोगण्यास सापडलें.

अफजलखानाला शिवाजीनें विश्वासघातानें मारलें असा आरोप कित्येक पाश्चात्य ग्रंथकार शिवाजीवर करीत असतात; परंतु स्वतः अफझलखान किती विश्वासघातकी होता, त्यानें कर्नाटकांत शेऱ्याच्या नाईकाला भेटीला बोलावून विश्वासघातानें कसें ठार केलें इत्यादि माहिती अलीकडे उघडकीस आलीच आहे; शिवाय डच बातमीदारांनीं आपल्या कंपनीच्या चालकांना कळविलेल्या माहितींतच अफझलखानाच्या दुष्टाव्याचा नवा पुरावाहि उघडकीस आला आहे. डच बातमीदार असें लिहितो कीं, अफझलखान ज्या वेळीं मोहिमेवर निघाला त्या वेळीं विजापूरच्या सुलतानानें त्यास मुद्दाम असें बजाविलें कीं, "शिवाजीशीं गोड बोलून व कांहीं तरी लालूच दाखवून भेट घेतांना त्याला चिरडून टाकावें अगर इतर कोणत्या तरी उपायानें त्यास ठार मारावें." ही बातमी विजापूरच्या दरबारांतल्या एका प्रमुख दरबाऱ्याकडून शिवाजीला गुप्तपणें कळविण्यांत आली. हा गुप्त बेत अगाऊ कळल्यामुळें शिवाजी सावध होता व त्यानें खानाचा डाव त्याच्यावरच उलटविला यांत त्याजकडे कांहींच दोष येत नाहीं. शिवाजीची धर्मसहिष्णुताहि सर्वश्रुत असून त्याचें खाजगी चारित्र्य अगदीं निष्कलंक होतें याविषयीं नवीन प्रसिद्ध होणाऱ्या परदेशीय माहितींतहि भरपूर पुरावा मिळतो. शिवाजीनें सुरतेवर पहिली स्वारी केली त्या वेळीं रे० फादर अँब्रोज नांवाच्या मिशनऱ्याच्या घराला बिलकूल उपद्रव होऊं नये असा हुकूम दिला होता, ही माहिती शिवाजीला नांवें ठेवणाऱ्या परदेशी लेखकांनींच दिलेली आहे.

एवंच, शिवाजीनें आपल्या ३६ वर्षांच्या कारकीर्दींत जी अलौकिक व अद्भुत कामगिरी केली तिला कोठल्याहि राष्ट्राच्या इतिहासांत तोड सापडत नाहीं. कोणी

नुसतेच धाडसी सेनापति तर कोणी केवळ मुत्सद्दी, कोणाचें सार्वजनिक चारित्र्य उज्ज्वल तर खाजगी चारित्र्य कलंकित, कोणाची राष्ट्रीय कामगिरी अत्यंत उठावदार पण तिच्या मुळाशीं असलेला हेतु सात्त्विक नाहीं असे प्रकार आढळतील. अर्थातच शिवाजीसारखें सर्वथैव निर्दोष चारित्र्य आणि अष्टपैलूपणा हे गुण इतर वीर पुरुषांत एकत्रित झालेले क्वचितच आढळतील. त्यांतल्या त्यांत शिवाजीनें आपल्या चळवळीस प्रारंभ केला त्या वेळची परिस्थिति व जनतेची मनःस्थिति आणि शिवाजीवर ओढवलेलीं संकटें यांचा विचार केला असतां इतक्या प्रतिकूल वातावरणांतून आणि काळाच्या भयंकर दाढेंतून निधड्या छातीनें वाट काढून आपला मनोरथ संपूर्णतेनें सिद्धीस नेणारा यशस्वी मुत्सद्दी व योद्धा शिवाजीसारखा एकटा शिवाजीच होय असेंच म्हणणें इतिहासकारास प्राप्त आहे.

---

## शंभर वर्षांपूर्वीचा पारीसचा पराक्रम : : ७

[ हा लेख १९३० सालच्या चळवळीच्या काळांत लिहिलेला आहे. ब्रिटिशांच्या मगरमिठींत सांपडलेलें आपलें स्वातंत्र्य त्या कचाट्यांतून सोडवून घेण्यासाठीं देशभर आंदोलन चालू होतें. अशा काळांत परराष्ट्रांच्या इतिहासांतून आपणांस कांहीं शिकतां येईल कीं काय हें पाहण्यासाठीं फ्रान्स देशांत इ. स. १८३० च्या ऑगस्ट महिन्यांत जी क्रान्ति झाली त्या क्रान्तीची रूपरेषा या लेखांत रेखाटली आहे. दहाव्या चार्ल्सनें फ्रान्समध्यें झारशाही आरंभून छळवाद मांडला आणि जनतेच्या स्वातंत्र्याचा अपहार चालविला. त्या वेळीं पारीसमधील जनतेनें एकजुटीनें झारशाहीला विरोध करून तीन दिवसांत कशी क्रान्ति घडवून आणली याचें धावतें चित्र या लेखांत रेखाटलें आहे. ]

राज्यक्रान्ति हा शब्द उच्चारतांच मनांत किती तरी विविध कल्पनांचें काहूर माजतें. राज्यक्रान्तीचा व रक्तपाताचा संबंध तर अगदीं सामान्य लोकांच्या मनाला अपरिहार्य असाच वाटतो. त्याचप्रमाणें राज्यक्रान्तीनें जुनी घडी मोडून नवी घडी बसवावयाची असल्यानें एवढा फेरबदल घडवून आणण्यास कालावधीहि बराच मोठा लागत असला पाहिजे, अशीहि समजूत बहुतेकांची असते; पण अनुभवानें या सर्व कल्पना चुकीच्या ठरविल्या आहेत. राज्यक्रान्तीचा व रक्तपाताचा संबंध हा कांहीं समवायी संबंध नव्हे. अर्थातच रक्तपाताच्या खेरीजहि राज्यक्रान्ति घडूं शकते. कालावधिसंबंधानेंहि असेंच म्हणतां येईल कीं, राज्यक्रान्ति घडून

(केसरी, दि. ५ ऑगस्ट १९३०)

येण्याला अमुकइतका कालावधि अवश्य पाहिजेच असें नाहीं; अथवा उलटपक्षीं अमुकइतक्या कालावधींत राज्यक्रान्ति पूर्ण झालीच पाहिजे असेंहि नाहीं. सारांश, राज्यक्रान्ति हा शब्द जरी अतिशय महत्त्वाच्या घडामोडीचा वाचक असला तरी प्रसंगविशेषीं असली उलथापालथ चुटकीसरशींहि घडून येऊं शकते.

इंग्लंडच्या व फ्रान्सच्या इतिहासांत दोनहि प्रकारचीं म्हणजे उलटसुलट उदाहरणें आढळून येतात. इंग्लंडांतली पहिली राज्यक्रान्ति इ. स. १६४० ते १६४८ च्या दरम्यान झाली. या कालावधींत मोठमोठाल्या लढाया होऊन भयंकर रक्तपात झाला; आणि इतक्या परिश्रमानें घडवून आणलेली राज्यक्रान्ति पुरी एक तपापर्यंतहि टिकूं शकली नाहीं. उलटपक्षीं पुढें चाळीस वर्षांनंतर १६८८ त इंग्लंडात दुसरी राज्यक्रान्ति झाली. ही राज्यक्रान्ति अगदीं चुटकीसरशी बिनबोभाट घडून आली व तींत रक्ताचा एक थेंबहि खालीं पडला नाहीं; म्हणूनच त्या राज्यक्रान्तीला इतिहासकार 'ब्लडलेस रेव्होल्यूशन' म्हणतात. फ्रान्स देशांतली १७८९ त प्रारंभ झालेली राज्यक्रान्ति इतिहासज्ञांस सर्वश्रुतच आहे. या राज्यक्रान्तीच्या कालावधींत जितका रक्तपात झाला तितका रक्तपात तेवढ्या अवधींत इतरत्र क्वचितच झाला असेल; आणि इतकें करून पुनः १८१५ त सगळेंच गाडें उलटून फ्रान्स देशावर पूर्वीच्या बुर्बोन घराण्याचीच राजसत्ता परत लादण्यांत आली आणि सोळाव्या लुईच्या जागीं अठरावा लुई येऊन पूर्वीच्या १६ आणे जुलुमाच्या जागीं १८ आणे जुलूम सोसण्याची फ्रेंच लोकांवर पाळी आली! परंतु पुढें बाराच वर्षांनीं म्हणजे इ. स. १८३० च्या जुलै महिन्याच्या अखेरीस दुसरी राज्यक्रान्ति झाली. ही क्रान्ति इंग्लंडांतल्या क्रान्तीप्रमाणें 'ब्लडलेस रेव्होल्यूशन' म्हणून इतिहासांतरीं प्रसिद्ध नसली तरी या वेळीं अगदीं थोडा रक्तपात झाला; आणि ही सगळी उलथापालथ अवघ्या तीनच दिवसांत घडून आली. बरोबर शंभर वर्षांपूर्वीं फ्रान्समध्यें घडून आलेला हा ऐतिहासिक प्रसंग अनेकांना अनेक दृष्टींनीं मननीय व बोधप्रद वाटण्याजोगा असल्यामुळें त्या राज्यक्रान्तीच्या शतसांवत्सारिक स्मृतिदिनाच्या प्रसंगीं त्याची त्रोटक माहिती वाचकांना देण्यांत येत आहे.

स्वतंत्रता, समता व बंधुता या त्रयीच्या प्रस्थापनेकरितां फ्रेंच लोकांनीं अत्यंत हालअपेष्टा सोसून १७८९ ते १७९२ पर्यंतच्या तीन वर्षांत जी राज्यक्रान्ति घडवून आणली ती युरोपांतील इतर राष्ट्रांवर जुलमी सत्ता गाजविणाऱ्या सत्ताधाऱ्यांना शल्यासारखी सलूं लागल्यामुळें त्यांनीं फ्रान्सविरुद्ध आपली एकजूट केली. आणि ऑस्ट्रिया, प्रशिया, रशिया व इंग्लंड या चौकडीनें आपल्या तलवारीच्या जोरावर नेपोलियनला फ्रान्समधून हुसकून लावून फ्रेंच लोकांना अत्यंत अप्रिय झालेल्या बुर्बोन घराण्यांतल्या अठराव्या लुईची फ्रान्सच्या गादीवर परत स्थापना केली. आणि त्याच्याविरुद्ध फ्रेंच जनतेनें बिलकूल हालचाल करूं नये म्हणूनें आपलें बरेचसें लष्कर फ्रेंचांच्या खर्चानें खुद्द पारीस शहरांतच ठेवून दिलें.

या लष्करी अंमलाच्या जाचांत फ्रेंचांनीं दोनतीन वर्षें अगदीं बिलकूल हालचाल न करतां सर्व जुल्म निमूटपणें सोसला. हें पाहून परकीय सैन्य पारीसमधून हलविण्यांत आलें. पुढें लवकरच म्हणजे इ. स. १८२४ सालीं हा अठरावा लुई मृत्यु पावला, आणि त्याच्यामागून १० वा चार्ल्स गादीवर आला. या राजानें स्वतः पूर्वीची राज्यक्रान्ति पाहिली नसल्यानें व तिचें दुःख अनुभविलें नसल्यानें गादीवर बसतांच सत्तेच्या तोऱ्यांत झारशाहीला प्रारंभ केला! राज्यक्रान्तीच्या वेळीं हद्दपार केले गेलेले धर्मोपाध्याय याच्याभोंवतीं गोळा झाले व त्यांच्या सांगण्यावरून त्यानें धर्मलंडपणाचें आचरण करणाऱ्याचा हात तोडून टाकण्याची रानटी शिक्षा पुनः नव्या कायद्यानें चालू केली. स्वतःच्या चैनीच्या खर्चाला अडचण पडूं नये म्हणून सरकारी खर्च कमी करण्यासाठीं सरकारी कर्जावरील व्याजाचा दर ५ टक्के होता तो ३ टक्के करून सर्व व्यापारी वर्गांत असंतोषाचें बीं पेरून ठेवलें. जुन्या राज्यक्रान्तीच्या वेळच्या कायद्यानें सर्व मुलांना वारसाहक्क सारखाच ठेवला होता; पण तो कायदा बदलून पुनः वडील मुलाला विशेष हक्क देण्याचा कायदा करण्यांत आला. आणि सर्वांत विशेष चीड येण्याजोगी गोष्ट ही कीं, पूर्वीच्या राज्यक्रान्तीच्या वेळीं ज्या देशद्रोही इसमांच्या इस्टेटी सरकारजमा झाल्या होत्या त्यांना नुकसानभरपाई म्हणून ६० कोटि रुपये देण्याचा ठराव करण्यांत आला!

अशा रीतीनें सर्व राष्ट्रभर असंतोषाचा अग्नि धुमसूं लागला असतां १८२७ सालीं जुनें पार्लमेंट बरखास्त करून नवीन निवडणूक करण्याचा हुकूम देण्यांत आला. राजाचा अम्मल जरी असा अनियंत्रित चालला होता आणि प्रधान मंडळावर पार्लमेंटची सत्ता बिलकूल चालत नव्हती तरी फ्रेंच मतदारांनीं पार्लमेंटच्या निवडणुकीवर बहिष्कार घालण्याचें कधींहि मनांत आणलें नाहीं. राजानें जुनें पार्लमेंट बरखास्त करतांच फ्रेंच मतदारांनीं निवडणुकींत राजविरोधी प्रतिनिधि पूर्वींहून अधिक येतील अशीच खटपट केली; आणि नव्या पार्लमेंटांत हुजूरपक्षाची मंडळी अगदींच थोडी निवडून आली. या वेळेपासून राजपक्ष व लोकपक्ष यांत उघड उघड घासाघीस सुरू झाली. राजानें जुनें लोकपक्षीय मंत्रिमंडळ मोडून नवें लोकविरोधी मंत्रिमंडळ नेमलें. त्या मंत्रिमंडळावर आपला विश्वास नाहीं असा पार्लमेंटानें ठराव केला आणि राजास नवें लोकपक्षीय मंत्रिमंडळ नेमण्याची विनंती केली. ही विनंती राजास कळविण्यासाठीं जें शिष्टमंडळ राजाकडे गेलें होतें त्याचा राजानें अपमान केला; आणि पार्लमेंट जर आपली वर्तणूक न सुधारील तर पार्लमेंट पुनः बरखास्त करीन अशी धमकी दिली! आणि सहा महिनेपर्यंत पार्लमेंटची बैठक तहकूब केली.

असल्या झारशाही कृत्यांमुळें जनतेंतल्या असंतोषाचा वणवा अधिकाधिक भडकत चालला. तरी पण राजा चार्ल्स व त्याचे मंत्री यांना असेंच वाटत होतें कीं, दडपशाहीचा वेताळ मोकळा सोडला असतां त्याच्या दहशतीनें लोकपक्ष

नरम येईल, आणि नवी निवडणूक केल्यास ती आपल्याला अनुकूल अशीच होईल. या समजुतीनें राजानें १८३० च्या मार्च महिन्यांत पार्लमेंट बरखास्त केलें आणि १८३० च्या जून महिन्यांत नवी निवडणूक झाली. त्या वेळीं 'नवा जुन्यास बरा म्हणवितो' या म्हणीचा राजास प्रत्यय आला. राजपक्षाच्या प्रतिनिधींची संख्या आणखी ५० नी घटली, आणि लोकपक्षाचें बळ तेवढ्या संख्येनें अधिक वाढलें. अशा रीतीनें हा निवडणुकीचा डाव आपल्यावर उलटलेला पाहतांच राजा चार्ल्स व त्याचे जुलमी सल्लागार यांनीं जनलज्जा व मनलज्जा यांना सोडचिठ्ठी देऊन झारशाहीवर ताण करण्याचा विचार केला.

दडपशाहीची पहिली गदा वर्तमानपत्रांवर उभारली गेली. जुलमी राजांची सर्वत्र अशीच समजूत असते कीं, हीं खाष्ट वर्तमानपत्रेंच आगलावेपणाचें काम करतात, म्हणूनच जनतेंत असंतोष पसरतो; आणि वर्तमानपत्रांची एकदां मुस्कट-दाबी केली कीं मग आपण कसाहि नंगानाच घातला तरी लोक तो जुलूम निमूट-पणें सोसतील! पण ही समजूत आजपर्यंत कोठेंच खरी ठरली नाहीं, मग ती फ्रान्समध्यें तरी कशी खरी ठरणार! चार्ल्सनें पहिलें फर्मान असें काढलें कीं, सर-कारी परवान्याशिवाय कोणतेंहि वृत्तपत्र प्रसिद्ध करूं नये! दुसऱ्या फर्मानानें नवी पार्लमेंट भरण्यापूर्वीच बरखास्त करण्यांत आली! आणि तिसऱ्या फर्मानानें मतदारांच्या लायकीची मर्यादा वाढवून मतदारांची संख्या संकुचित करण्यांत आली; प्रत्यक्ष निवडणुकीच्या ऐवजीं अप्रत्यक्ष निवडणुकी व्हाव्या असें ठरविण्यांत आलें आणि पार्लमेंटपुढें कोणतेंहि बिल यावयाचें झाल्यास तें सरकारपक्षामार्फतच आलें पाहिजे असें जाहीर करून प्रतिनिधींच्या हक्काचीहि सपशेल खच्ची केली!

ता. २६ जुलै १८३० इसवी रोजीं हे तीन वटहुकूम फ्रान्समध्यें सर्वत्र प्रसिद्ध झाले, आणि फ्रेंच लोकांनीं व विशेषतः पारीस शहरांतील नागरिकांनीं या जुलमा-विरुद्ध झगडण्यास कंबर बांधली. 'नॅशनल' नांवाच्या वृत्तपत्राचा संपादक थायर्स याच्या अध्यक्षतेखालीं वर्तमानपत्रकारांची परिषद् भरून सरकारी वटहुकूम बेकायदेशीर आहेत सबब ते आपण मानणार नाहीं असा ठराव करण्यांत आला; आणि दुसऱ्या ठरावानें पार्लमेंटच्या सभासदांना अशी विनंती करण्यांत आली कीं, राजानें बेकायदा वटहुकूम काढून जरी पार्लमेंट मोडून टाकलें आहे तरी पार्लमेंटनें तो वटहुकूम न पाळतां आपली बैठक भरवावी आणि आपलें कायदेमंडळाचें काम चालू करावें. अशा प्रकारें ठराव करून लोकपक्षानें राजपक्षाच्या दडपशाहीला खरमरीत उत्तर दिलें. सरकारी परवाना न घेतां कित्येक वृत्तपत्रें प्रसिद्ध होऊं लागलीं; परंतु कायदेमंडळाच्या सभासदांना मात्र आपली बैठक भरविण्याचें धैर्य होईना.

अशा आणीबाणीच्या वेळीं पारीस शहरांतील रिपब्लिकन पक्षाचे कित्येक पुढारी पुढें सरसावले आणि त्यांनीं झारशाहीशीं उघड झुंज सुरू केली. अठरावा लुई गादीवर आल्यापासून या रिपब्लिकन पक्षाला आपली चळवळ उघड रीतीनें

चालविणें अशक्य झालें होतें. तरी पण रिपब्लिकन पक्षाच्या गुप्त संस्था ठिक-ठिकाणीं असून त्या शक्य ती कामगिरी करीत राहिल्या होत्या. अशा गुप्त संस्थांना पुढें येण्याला ही पर्वणी चांगलीच लाभली. या संस्थांनीं मजूरवर्ग, विद्यार्थी आणि मध्यम वर्गांतील तरुण मंडळी यांना हातीं घेऊन झारशाहीला उघड तोंड देण्याचें ठरविलें. सरकारी परवान्याशिवाय वर्तमानपत्रें छापण्याची सर्वांसच मनाई झाल्या-मुळें जे कित्येक छापखाने बंद पडले होते, त्या छापखान्यांतील सगळा कामकरीवर्ग ता. २७ जुलै रोजीं बेकार होऊन रस्त्यांतून भटकूं लागला, आणि त्याचे पोलिसांशीं खटके उडूं लागले. बेकार कामकरी आणि बेकाम पोलीस यांची घासाघीस सुरू होतांच राज्यक्रान्तीची पहिली ठिणगी पडली, आणि पारीस शहरांतली परिस्थिति वणवा पेटण्याला सर्वस्वी अनुकूल असल्यामुळें त्या ठिणगीनें पेटलेल्या अग्नीच्या ज्वाला ताबडतोब सर्व शहरभर पसरल्या.

पारीस शहरांतल्या दंग्याचें वृत्त कानीं पडतांच अमेरिकेच्या स्वातंत्र्ययुद्धांत फ्रेंच सैनिकांचें आधिपत्य ज्याच्याकडे होतें तो वृद्ध लाफायटी धावतच पारीसला आला, आणि त्यानें तरुण स्वयंसैनिकांचें आधिपत्य स्वीकारलें. मंगळवार ता. २७ जुलै रोजीं रात्रीं नॅशनल वृत्तपत्राच्या कचेरींत प्रमुख पुढाऱ्यांची सभा भरली. तीत थायर्स हा सनदशीर मार्गानेंच झारशाहीचा प्रतिकार करावा असें म्हणणाऱ्या पक्षाचा पुढारी होता. पण त्या पक्षाचें बहुमत न होतां उघड सशस्त्र प्रतिकार करावा असें म्हणणाऱ्या लाफायटीच्या पक्षाचेंच त्या सभेंत बहुमत झालें, आणि थायर्स हा पारीस सोडून निघून गेला व पारीस शहराचें पुढारीपण लाफायटीकडे आलें.

बुधवार ता. २९ रोजीं लाफायटीनें पारीस शहरांत जेवढीं हत्यारें मिळ-ण्याचीं ठिकाणें होतीं तेवढीं काबीज करून आपल्या अनुयायांना सज्ज केलें, आणि लहान-सहान बोळांच्या तोंडांशीं मोर्चे बांधून आपल्या स्वयंसैनिकांच्या बचावाची तजवीज केली. शहरांतील बंडखोरांची संख्या एकसारखी फुगत चालली व त्यांनीं हॉटेल डी व्हिला ही आपल्या छावणीची जागा ठरवून तिच्यावर लोकशाहीचें तिरंगी निशाण चढविलें. हें सर्व वर्तमान राजास कळतांच त्यानें मारमाँट यांस सैन्यासह पाचारण केलें व मारमाँटनें राजवाड्याच्या बचावार्थ कांहीं सैन्य ठेवून बंडखोरांना हॉटेल डी व्हिला येथून हुसकून लावलें; परंतु जेथें सगळें पारीस शहरच राजाविरुद्ध उलटलें तेथें एखादें ठाणें काबीज केल्यानें काय होणार! मारमाँटला देखील एकंदरींत लक्षण ठीक दिसेना, तेव्हां त्यानें राजास आपला वटहुकूम रद्द करण्याचा सल्ला दिला. पार्लमेंटच्या प्रतिनिधींकडूनहि राजाकडे तसाच निरोप आला. पण राजानें सैन्याची जमवाजमव करून बंडखोरांची खोड मोडण्याविषयीं मारमाँटला सक्तीचे हुकूम दिले.

मारमाँटनें सैन्य जमवून पारीस शहर कह्यांत आणण्याचा प्रयत्न केला; परंतु आतां लष्करांतच दुमत दिसूं लागलें. कित्येक पलटणींनीं बंडखोरांवर चालून

जाण्याचें नाकारलें. इतर कांहीं पलटणी तर उघडपणें बंडखोरास जाऊन मिळूं लागल्या! कोणत्या पलटणीवर विश्वास ठेवावा हेंच मारमॉंटला कळेनासें होऊन तो गोंधळून गेला. त्यानें पुनः असाच सल्ला दिला कीं, सगळे वटहुकूम परत घेऊन पार्लमेंटची बैठक बोलावली तरच निभाव लागेल. इतक्या पल्ल्यावर गोष्टी आल्यावर राजाच्या डोळ्यावरची धुंदी उतरली. त्यानें पार्लमेंट बोलावण्याचें मनाशीं ठरविलें, आणि तसा लेखी हुकूम दिला व तो दुसऱ्या दिवशीं सकाळीं प्रसिद्ध करण्याचें ठरलें; पण योग्य वेळ निघून गेली होती. ता. २९ जुलै रोजीं रात्रींच बंडखोरांतील कांहीं पुढाऱ्यांनीं ड्यूक ऑफ आर्लीन्सशीं संधान बांधलें आणि त्याच्याकडून सनदशीर रीतीनें राज्य करण्याचें वचन घेऊन त्याच्या नांवानें द्वाही फिरविण्याचें ठरविलें.

चार्ल्स राजाला दुसऱ्या दिवशीं सकाळीं हें वृत्त कळतांच त्याला पश्चात्ताप झाला; परंतु तो पश्चात्तापच! त्याचा आतां उपयोग काय? राज्यत्याग केल्याविना गत्यंतर नाहीं असें पाहतांच त्यानें आपला व आपल्या वडील मुलाचा राज्यावरचा वारसा सोडल्याचा राजिनामा खरडला व तो स्कॉटलंडला निघून गेला. ता. ३ ऑगस्टला हा राजिनामा प्रसिद्ध झाला; आणि ता. ७ ऑगस्टला पार्लमेंटची बैठक होऊन लुई फिलिपी ऊर्फ ड्यूक ऑफ आर्लीन्स यास रीतसर राज्यपद देण्यांत आलें. अशा रीतीनें ता. २६ जुलै ते ता. ७ ऑगस्टपर्यंतच्या बारा दिवसांत ही राजक्रान्ति अथपासून इतिपर्यंत संपूर्ण झाली. पण राज्यक्रान्तीचा खरा झगडा काय तो ता. २७, २८ व २९ या ३ दिवसांतच झाला; आणि एवढ्या अल्पावधींत आणि एकट्या पारीस शहरानें ही राज्यक्रान्ति घडवून आणली. असंतोषाच्या घुशी लागून राजसत्तेची इमारत सगळीकडून पोखरली गेल्यावर क्षुल्लक धक्क्यानें देखील ती कशी एकदम ढासळते याचें हें फ्रान्सच्या इतिहासांतलें शंभर वर्षांपूर्वीचें उदाहरण इतिहासाच्या वाचकांस काय शिकवितें बरें?

---

# फसलेल्या डावापासून घ्यावयाचा बोध : : ८

[ १९२९ मधील लाहोर येथील कॉंग्रेसच्या अधिवेशनानंतर हिंदुस्थानभर स्वातंत्र्यदिन साजरा करण्याचें ठरलें. त्या वेळीं दि. २६ जानेवारी हा स्वातंत्र्यदिन म्हणून पाळण्याचा आदेश देण्यांत आला. त्याप्रमाणें ही स्वातंत्र्यदिनाची प्रथा चालू आहे. तथापि हा स्वातंत्र्यदिन जाहीर होण्याच्या पूर्वी अनेक वर्षें **वीर सावरकरांनीं** १८५७ च्या स्वातंत्र्य-संग्रामाचा प्रारंभदिन म्हणून दि. १० मे हा दिवस स्वातंत्र्यदिन पाळण्याची प्रथा चालू केली होती. त्या प्रथेला अनुसरून

(केसरी, दि. १० मे १९३८)

हिंदुसभेमार्फत दि. १० मे हा स्वातंत्र्यदिन साजरा होत असतो. त्या अनुरोधानें हा लेख लिहिला असून त्यांत १८५७ चा प्रयत्न कां फसला, त्यांत आपलें काय चुकलें, तें लक्षांत घेऊन त्यापासून सांप्रतच्या चळवळींत आपण कोणता बोध घ्यावा याचें प्रतिपादन या लेखांत केलें आहे. ]

**मर्दे तकवा सोडूं नये । म्हणजे प्राप्त होतो जय ।**
**कार्यप्रसंग समय । ओळखावा ॥**
**कार्य समजेना अंतरें । तें काय झुंजेल विचारें ।**
**युद्ध करावें खबरदारें । लोक राजी राखोनी ॥**

**– क्षात्रधर्म, समर्थ रामदास**

खर्ड्याच्या लढाईत मराठ्यांनीं एवढी मर्दुमकी गाजवून दक्षिणेचा मोंगल नामोहरम केला, तरी पण त्या लढाईसंबंधीं फारसे ग्रंथ लिहिलेले आढळत नाहींत आणि पानपतच्या लढाईत मराठ्यांच्या सैन्याचा फन्ना उडाला असतां त्या रणसंग्रामाविषयींच जो तो लिहितो, वाचतो व बोलतो यांतलें रहस्य काय, असा प्रश्न एका चिकित्सकानें एका इतिहासज्ञास केला असतां त्या तज्ज्ञानें जें उत्तर दिलें तेंच प्रस्तुत प्रकरणींहि लागू आहे. १८५७ सालच्या स्वातंत्र्ययुद्धांत हिंदी वीरांच्या वांट्यास अपयश आलें खरें; तथापि तो रोमांचकारी प्रसंगच इतका स्फूर्तिदायक व उद्‌बोधक आहे कीं, तशी स्फूर्ति अथवा तसा बोध हिंदुस्थानच्या इतिहासांतल्या कोठल्याहि यशस्वी युद्धापासून क्वचितच मिळूं शकेल. धर्मदृष्ट्या कर्माचें पुण्य अथवा पाप हें जसें त्याच्या फलांत नसून, त्या कर्माच्या मुळाशीं असलेल्या बुद्धींत असतें, त्याप्रमाणेंच कोणत्याहि रणसंग्रामाचें रहस्य त्याच्या परिणामांत नसून त्या रणसंग्रामाला प्रवृत्त करणाऱ्या हेतूंत व तो हेतु पार पाडण्यासाठीं योजलेल्या साधनांत असतें. याच दृष्टीनें १८५७ सालच्या स्वातंत्र्ययुद्धाचें रहस्य त्याच्या परिणामांत नसून त्याच्या बुडाशीं असलेल्या हेतूंत आणि त्याच्या बजावणीच्या मार्गांत समाविष्ट झालेलें आहे.

### बंड नव्हे, स्वातंत्र्याचा रणयज्ञ

१८५७ सालचा संग्राम हें केवळ लष्करी शिपायांचें बंड होतें का तो गमावलेलें स्वातंत्र्य परत प्राप्त करून घेण्यासाठीं आरंभिलेला रणयज्ञ होता याविषयीं कित्येकांचीं मनें साशंक दिसतात. पण अनेक परकीय इतिहासकारांनीं देखील तें केवळ शिपायांचें बंड नसून त्यांत स्वराज्यप्राप्तीचा उच्च व व्यापक हेतु होता असा अभिप्राय नमूद करून ठेवला आहे. मीरतच्या छावणींत रविवार ता. १० मे रोजीं जी चकमक झडली तेवढीच लक्षांत घेतल्यास तें केवळ लष्करी

शिपायांचें बंड होतें असेंच मानावें लागेल; परंतु आकस्मिक कारणानें रणधुमाळीची ठिणगी कोठें कशी पडली एवढेंच पाहून कोणत्याहि घटनेची यथार्थ कारणमीमांसा करतां येत नाहीं. युरोपांतील गेल्या महायुद्धाला प्रारंभ सर्व्हियांतील एका माथेफिरूनें आस्ट्रियन राजपुत्राचा खून केल्यावरून झाला, हें तात्कालिक कारण सर्वमान्य असलें, तरी युद्धाची उभयपक्षीं तयारी निदान दोन-तीन वर्षें आधींपासून चालली होती आणि जर्मनीचा कील कालवा पूर्ण होतांच या महायुद्धाला प्रारंभ होणार हें भाकित धूर्त मुत्सद्द्यांनीं सहा वर्षें आधींच लिहून ठेवलें होतें.

याच विचारसरणीनें इकडे पाहिल्यास काडतुसाचें निमित्त हें तात्कालिक कारण झालें खरें, पण असलें तात्कालिक कारण शोधून काढून त्याचा फायदा घेण्याची मनाची तयारी आधींपासूनच पांच-सात वर्षें तरी चाललीच होती. याकरितांच अनेक इतिहासकारांनीं लिहून ठेवलें आहे कीं, काडतुसाचा प्रश्न उद्भवला नसता, तरी बंडाचें निशाण उभारलें गेलें असतेंच यांत शंका नाहीं.

### शिपायांचा असंतोष

काडतुसाचें निमित्त अशा रीतीनें गौण ठरलें, तरी लष्करी शिपायांतील असंतोष गौण ठरूं शकत नाहीं. यापूर्वी लष्करांत नोकरी धरतांना आपल्याला हिंदुस्थानाबाहेर लढाईकरितां जावें लागेल ही कल्पना शिपायांना नव्हती. ब्रह्मदेशांतील युद्धाकरितां बंगालमधून पलटणी रवाना होऊं लागल्या त्या वेळीं या तक्रारींचें बीजारोपण झालें. पुढें रशियन युद्धाकरितां क्रिमियन द्वीपकल्पांत आणि इराणांत व इजिप्तमध्यें सैन्याची पाठवणी होऊं लागल्यानें या असंतोषांत भर पडली आणि ही तक्रार न्याय्य रीतीनें न मिटवितां जेव्हां सैन्यांत दाखल करून घेतांनाच ' जेथें कोठें पाठवाल तेथें लढाईला जाऊं ' असें लेखी वचन घेण्याचा नवा कायदाच घडविण्यांत आला, तेव्हां तर हा असंतोष स्फोट होण्याइतक्या अतिरेकाला पोंचला.

परराष्ट्रीय युद्धावर हिंदुस्थानांतले शिपाई धाडले गेल्यानें शिपायांच्या मनोभूमिकेंत दुसराहि एक महत्त्वाचा परिणाम घडला, हिंदी शिपायांना आपल्या शौर्याची जाणीव होऊं लागली. आणि त्याबरोबरच हिंदी शिपायांच्या मदतीखेरीज ब्रिटिश सरकारला आपलें जगड्व्याळ साम्राज्य टिकवितां येणार नाहीं, याचीहि अंधुक कल्पना त्यांच्या डोक्यांत शिरूं लागली. या योगानें काळ्या शिपायांचा गोऱ्या शिपायांसंबंधाचा आदर डळमळूं लागला आणि स्वतःविषयींचा न्यूनगंड नाहींसा होत चालला. हिंदी शिपायांच्या शौर्याचें एवढें महत्त्व असून देखील आपल्याला कसें तुच्छतेनें वागविलें जातें आणि गोऱ्या शिपायांची मिजास कशी राखली जाते याचाहि तुलनात्मक विचार हिंदी पलटणीच्या पुढाऱ्यांच्या मनांत घर करून बसला आणि प्रसंग येतांच असंतोषाच्या ज्वाला भडकविण्याला त्याचा निःसंशय उपयोग झाला.

पण ही सर्व कारणमीमांसा हें केवळ 'शिपायांचें बंड' होतें अशा संकुचित विचारानें घेरलेल्या मेंदूंतूनच उद्भवली आहे. असंतोषाची व्याप्ति शिपायांच्या पलीकडे गेली नसती तर एवढीं कारणें पुरेशीं ठरलीं असतीं; परंतु १८५७ सालच्या संग्रामाचें क्षेत्र केवळ लष्करी छावणीपुरतेंच मर्यादित नव्हतें. बंडाची पहिली ज्वाळा भडकली ती शिपायांच्या छावणींतच भडकली यांत शंका नाहीं; तथापि तो वणवा पेटत पेटत पूर्वेस बराकपुरापासून पश्चिमेस झांशीपर्यंत आणि उत्तरेस रोहिलखंडापासून दक्षिणेस नरगुंदापर्यंत कमीजास्त प्रमाणानें पसरला. अर्थातच शिपायांच्या छावणीच्या बाहेरच त्याची व्याप्ति अधिक असल्यानें शिपायांच्या बंडाहून अधिक व्यापक स्वरूप त्यास आलें होतें हें निश्चित आहे.

## राज्यक्रान्तीचा प्रयत्न

१८५७ सालची रणधुमाळी मुख्यतः लखनौ, कानपूर, झांशी या क्षेत्रांत माजून राहिली आणि बंडाचें पुढारीपण नानासाहेब पेशवे, तात्या टोपे, झांशीची राणी यांच्याकडे होतें यावरून देखील तें 'शिपायांचें बंड' नव्हतें हें सिद्ध होतें; कारण 'शिपायांच्या बंडा'चें नेतृत्व शिपायांच्या पुढाऱ्याकडे न राहतां इतरांच्या हातीं गेलें, यावरून शिपायांच्या गाऱ्हाण्याला गौणत्व येऊन गेलेलें राज्य परत मिळविण्याच्या प्रश्नाला प्रधानत्व आलें हें उघड आहे. अलीकडे गिरण्यांतून मजुरांचे संप होतात व त्या संपाला पगाराचा कांट किंवा असाच कांहीं तात्कालिक अन्याय कारणीभूत होतो; तथापि संप करावयाचा का नाहीं, आणि संप सुरू झाल्यावर तो केव्हां कोणत्या अटींवर मिटवावयाचा हें ठरविण्याचा अधिकार जर प्रत्यक्ष मजुराकडे न राहतां तो 'भाई' लोकांकडे दिला गेला असेल, तर त्या संपाचें मूळ कारण कांहींहि असलें तरी संपाच्या हेतूंत क्रान्तीचें बीज दडून बसलें आहे हें निश्चित समजावें. याच दृष्टीनें १८५७ सालचें बंड हें प्रथमारंभीं केवळ लष्करी शिपायांच्या बंडाच्या स्वरूपानें पुढें आलें असलें तरी तो एक राज्यक्रान्तीचाच प्रयत्न होता आणि तो अयशस्वी ठरला म्हणूनच त्याच्या कपाळावर 'बंड' अशीं अक्षरें खोदलीं गेलीं. शिवाजीमहाराजांचा प्रयत्न यशस्वी होऊन त्यांना राज्याभिषेकहि झाला म्हणून अवरंगजेबासारख्या कट्टया दुश्मनालाहि त्यांचें राजेपण मान्य करावें लागलें; नाहीं तर शिवाजीहि प्रारंभीं जसा 'बंडखोर' गणला जात होता तसाच तो अखेरपर्यंत 'बंडखोर'च म्हटला गेला असता.

## 'बंड' शब्द वर्ज्य नाहीं

कायदेशीरपणाचा व अधिकाराचा विचार बाजूस सारून दुसऱ्या एका दृष्टीनें पाहिलें तर मात्र या घटनेला 'बंड' म्हणणेंच एकंदरींत समर्पक ठरतें. 'बंड' हा शब्द मर्दुमकीचा, हिंमतीचा आणि निधड्या छातीचा द्योतक आहे. त्यांत लपवाछपवी किंवा आडपडदा नसून छातीठोकपणानें केलेल्या स्वराज्यप्राप्तीच्या प्रयत्नाचाच तो द्योतक आहे. क्रान्ति या शब्दांत कुटिल नीतीचा समावेश होतो, पण

'बंड' या शब्दांत तसला कांहीं प्रकार नसल्यानें 'बंडा'चें पदक उघडपणें छातीवर मिरवण्यांत पौरुषत्व आहे. याकरितांच 'नेदर्लंडांतील बंडाचा इतिहास' या पुस्तकाच्या कर्त्यानें इंग्रजींतील 'Revolt' या शब्दाला अनेक पर्याय शब्द सुचवून त्यांतला 'बंड' हा शब्दच यथार्थवाचक मानून तोच त्या पुस्तकांत योजिला आहे. नेदर्लंडांतील राज्यक्रान्ति अपेशी न ठरतां पूर्णपणें यशस्वी झाली तरी देखील तिचें वर्णन 'बंड' या शब्दानेंच करण्यांत आलें असल्यानें 'बंड' या शब्दानें बिचकून जाण्यासारखें हीनत्व त्या शब्दाला चिकटलेलें नसून तो शब्द धैर्य व धाडस यांचाच दर्शक असल्यानें वर्ज्य नाहीं.

असो. बंड म्हणा, राज्यक्रान्ति म्हणा, स्वातंत्र्यसंग्राम म्हणा अथवा कोणताहि एखादा नवा शब्द निर्माण करून ती कल्पना वाचकांच्या दृष्टीसमोर मांडा; शब्द केव्हांहि गौणच ठरणार असून शब्दानें द्योतित केला जाणारा अर्थच खरा महत्त्वाचा असल्यानें, १८५७ सालीं सगळें हिंदुस्थान ज्या अघटित घटनेमुळें दणाणून गेलें ती घटना काय शिकविते तें पाहूं.

## डलहौसीची डल्लेबाजी

लॉर्ड डलहौसीच्या डल्लेबाजीचें समर्थन तद्देशीय इतिहासकारांनीं कसेंहि केलें तरी ती डल्लेबाजी अत्यंत अन्यायाची व चीड आणणारी होती याविषयीं शंकाच नाहीं. प्लासीच्या लढाईपासून तो शिखांशीं झालेल्या शेवटच्या गुजरातच्या लढाईपर्यंत इंग्रजांनीं अनेक विजय मिळविले आणि अनेक राज्यें घशांत घातलीं. तथापि रणदेवतेनेंच आपल्या विरुद्ध निर्णय दिल्यानें पराभूत पक्षास तितकेंसें वैषम्य वाटलें नाहीं. लढाईच्या उघड बनावाच्या पाठीमागें कुटिल कारस्थानें चालविलीं गेलीं नाहींत असें नाहीं, आणि जेवढ्या प्रमाणांत कुटिल नीतीचा उपयोग केला गेला तेवढ्या प्रमाणांत तेथें तेथें असंतोष धुमसत राहिला; परंतु डलहौसीनें जी डल्लेबाजी सुरू केली ती उघड दरवडेखोरीपेक्षांहि अत्यंत निंद्य असल्यानें त्याचें शल्य त्या त्या लोकांच्या मनांत कायमचें सलत राहिलें, अर्थातच झांशी, अयोध्या, नागपूर इत्यादि राज्यें डलहौसीनें खालसा केलीं नसतीं, दत्तकाचा धर्म्य व न्याय्य अधिकार नाकबूल केला नसता, नानासाहेब पेशव्यांचें पेन्शन बंद केलें नसतें, तर १८५७ सालच्या बंडाचा वणवा पेटलाच नसता अगर निदान तो इतका भडकला तरी नसता. तेव्हां १८५७ सालीं ज्यांनीं बंड केलें, त्यांनीं तें कां केलें असा प्रश्नच निरर्थक असून तो प्रश्न विचारण्यांत बावळटपणाच व्यक्त होतो. प्रश्न विचारावयासारखा आहे, पण तो कोणता ? तर बंडवाल्यांनीं बंड कां केलें हा नसून बाकीच्यांनीं बंड कां केलें नाहीं हा ! जसें अयोध्येचें व झांशीचें राज्य गेलें तसेंच नागपूरचें व साताऱ्याचें राज्य गेलें होतें, जसा नानासाहेब पेशव्यांचा पेन्शनचा हक्क गेला होता, तसाच कर्नाटकाच्या नबाबाचाहि गेला होता. तेव्हां अयोध्या, झांशी, कानपूर येथें जसें बंडाचें निशाण उभारलें गेलें तसें तें नागपूर, सातारा व कर्नाटक

यांतहि कां उभारलें गेलें नाहीं ? हैद्राबादच्या निजामाच्या राज्याला धक्का पोंचला नव्हता, तरी पण कर्जाच्या फेडीसाठीं म्हणून वऱ्हाड प्रांत ताब्रेगहाण घेण्यांत आलाच होता. लॉर्ड कर्झनच्या वेळीं जसें वऱ्हाडावर तुळशीपत्रच ठेवावें लागलें, तशी स्थिति अद्यापि आली नसली तरी त्याचें बीजारोपण झालें होतें. तरी पण निजामानें या वेळीं कांहीं हालचाल केली नाहीं.

### बंड सार्वत्रिक कां झालें नाहीं ?

काडतुसाचा धार्मिक भावनेचा प्रश्न विचारांत घेतला, तरी तेथेंहि कांहीं पलटणींनीं बंड कां केलें नाहीं असाच सवाल विचारला पाहिजे. कारण बंडाचें निशाण उभारणाऱ्या पलटणींचें कृत्य जर धर्मरक्षणाच्या दृष्टीनें योग्य व न्याय्य होतें, तर बाकीच्या पलटणींतल्या शिपायांना काय रशियन भाईप्रमाणें धर्म वावडा वाटूं लागला होता !

वस्तुस्थिति अशी आहे कीं, सार्वजनिक संकट तें आपल्यावरचेंच संकट असें मानण्याइतकी आणि देशकार्यासाठीं स्वार्थत्याग, किंबहुना प्राणार्पणहि करण्याची तयारी होण्याइतकी, सार्वजनिक कार्याची कळकळ अद्यापि आपल्यांत दृढमूल झाली नाहीं. शेजाऱ्यावरचें संकट म्हणजे आपण विचार करण्यासारखी बाबच नव्हे, असें म्हणून आपण तिकडे दुर्लक्ष करतों. महंमद कासीमनें सिंध गिळला, तरी त्याचें आम्हांला काय, असें म्हणून बाकीचे प्रांत थंडगार ! पुढें सगळें उत्तर हिंदुस्थान यवनाक्रान्त झालें, तरी दख्खन थंडगार आणि त्यानंतर दख्खनहि यवनांच्या घशांत गेल्यावर आतां हातपाय कसे हलवावयाचे म्हणून फिरून थंडगारच ! असाच कांहींसा प्रकार बंडाच्या वेळींहि झाला. ज्यांचीं राज्यें खालसा झालीं नव्हतीं त्यांना दूरदृष्टि व कळकळ नव्हती म्हणून ते स्वस्थ आणि ज्यांचीं राज्यें डलहौसीनें गिळंकृत केलीं ते 'राज्य गेलें, आतां काय' म्हणून स्वस्थ !

### माथा उजळ झाला

दिल्लीचा वृद्ध बादशहा बहादूरशहा, नानासाहेब व रावसाहेब पेशवे व त्यांचे सल्लागार तात्या टोपे आणि झांशीची शूर राणी लक्ष्मीबाई अशी कांहीं मंडळी वरील नियमाला अपवाद ठरली आणि त्यांनीं आपल्या प्राणांची आहुति देऊन एरवीं हिंदी लोकांच्या तोंडाला कायमची काळोखी लागली असती ती दूर केली व डलहौसीची डल्लेबाजीची कुटिल नीति सपशेल बदलावयाला लावली म्हणून बाकीचीं संस्थानें तरी वांचलीं आणि आज आपण उजळ माथ्यानें व अभिमानानें पूर्वजांचे पोवाडे गाऊं शकतों. पण खेदाची गोष्ट ही कीं, बंडवाल्यांच्या प्राणार्पणानें ज्यांचीं संस्थानें व अब्रू वांचली, ते स्वतः त्या बंडाचा प्रत्यक्ष फायदा अनुभवीत असतां बंडवाल्यांविषयीं हेटाळणीचेच उद्गार काढीत असतात ! लो. टिळकांनीं स्वराज्याची चळवळ चालवून कारागृहवास स्वतःवर ओढवून घेतला असतां

त्यांना नांवें ठेवणारे आणि त्यांच्या चळवळीपासून प्राप्त झालेल्या मंत्रिपदाचा अधिकार मात्र खुशाल उपभोगणारे त्या वेळीं दृष्टीस पडले, त्यांतलाच हाहि एक प्रकार होय.

परंतु त्याहिपेक्षां खरी चीड येते ती घरचें खाऊन लष्करच्या भाकरी भाजणारांची. शीखांनीं स्वतःचें राज्य गेल्याची काडीइतकीहि खंत न बाळगतां हें स्वातंत्र्ययुद्ध हाणून पाडण्याच्या कामीं परकी सरकारास कल्पनातीत मदत केली. काश्मीरच्या राज्यांतूनहि असाच मोठा सैन्याचा पुरवठा झाला. त्याच्याहिपेक्षां खेदाची गोष्ट म्हणजे नेपाळचे प्रधान जंगबहादूर यांनीं आपले गुरखे शिपाई अयोध्या प्रांत जिंकण्याकरितां इंग्रजांच्या दिमतीला पाठविले. यावरून १८५७ सालच्या झगड्याचें रहस्य त्यांना उमगलेंच नव्हतें हें स्पष्ट आहे.

### तटस्थांचे दोन दगडीवर हात

परकी सरकारास प्रत्यक्ष साहाय्य करणारे वगळले, तरी तटस्थांचा वर्गहि कांहीं लहानसहान नव्हता. त्यांतल्या त्यांत म्हैसूर, हैद्राबाद, बडोदें, राजस्थान, काठेवाड, भोपाळ इतक्या प्रांतांतले संस्थानिक ‘ रामाय स्वस्ति रावणाय स्वस्ति ’ असें म्हणून दोन दगडांवर हात ठेवून बसले होते. ग्वाल्हेर व इंदूर येथील संस्थानिक ब्रिटिशांना सर्वस्वीं अनुकूल होते. मात्र त्यांची कांहीं फौज त्यांच्या कह्यांत न राहिल्यामुळें ती बंडवाल्यांना मिळाली. तटस्थ राहिलेल्या संस्थानिकांपैकीं निजामसाहेबाला आपली तटस्थ वृत्ति राखणें विशेष कठीण गेलें. एकदां तर ता. १७ जुलै रोजीं कांहीं रोहिल्यांनीं तोराबाजखान यांच्या नेतृत्वाखालीं रेसिडेन्सीवर प्रत्यक्ष हल्ला केला; परंतु सरसालरजंग, शमसुल उलउमरा आणि रेसिडेन्ट कर्नल डेव्हिड् विल्सन यांच्या धिम्मेपणाच्या वागणुकीमुळें बंडाची ठिणगी न पेटतां ती जागच्या जागीं विझली. त्यानंतर औरंगाबादेसहि सैन्यांत थोडी चलबिचल झाली, पण तेथलाहि बार फुसकाच ठरला. एकंदरींत दक्षिणेंत नरगुंदखेरीज इतरत्र कोठें विशेष हालचाल झाली नाहीं. बंडाच्या ज्वाला उत्तरेंतून दक्षिणेंत येऊन पोंचल्या असत्या, तर त्या अनावर झाल्या असत्या. या दृष्टीनें बंडवाल्यांची ही मोठी चूक झाली कीं, त्यांनीं दक्षिणेकडे दृष्टि वळविली नाहीं. दिल्ली, लखनौ, कानपूर, झांशी, ग्वाल्हेर अशा पांच-सात ठिकाणींच सगळ्या सैन्याचें एकीकरण न करतां यशवंतराव होळकरानें १८०५ सालीं जसा नर्मदेपासून सतलजपर्यंत धुमाकूळ घातला, तसा गनिमी काव्याचा धिंगाणा या वेळीं घातला गेला असता आणि विशेषतः तात्या टोपे व नानासाहेब पेशवे नर्मदा ओलांडून दक्षिणेंत आले असते, तर त्यांचा मोड निदान इतक्या त्वरित तरी झाला नसता. परंतु अगाऊ कांहींच अंदाज नसल्यामुळें लष्करी पाचपेंच ठरविण्याला वेळच मिळाला नाहीं आणि यदृच्छेनें जो बनाव बनेल त्याबरोबर त्यांस वाहवत जावें लागलें; म्हणूनच बंडवाल्यांचा अखेरीस मोड झाला.

### वैयक्तिक पराक्रम

वैयक्तिक पराक्रमाच्या दृष्टीनें पाहिल्यास बंडवाल्यांत कांहीं न्यून आढळून आलें नाहीं. ब्रिटिशांच्याकडील नाणावलेल्या अनेक सेनापतींना यांनीं कंठस्नान घातलें व कांहीं सेनाधिकारी तर हाय खाऊनच मृत्युमुखीं पडले! तर जॉर्ज ॲन्सन् हा बंडाच्या प्रारंभींच दिवंगत झाला. सर हेन्री लॉरेन्स, कर्नल नील, जॉन निकल्सन्, हॉबसन् हे रणांगणांवर ठार झाले. सर ह्यू व्हीलर, कर्नल फिनिस् वगैरे अधिकारी कत्तलींत गतप्राण झाले आणि जनरल बर्नार्ड् व जनरल हॅवेलॉक् युद्धांत टेकीस येऊन आजारी पडून परलोकाला गेले.

बंडवाल्यांपैकीं झांशीच्या राणीला रणांगणावर क्षात्रधर्मानें मृत्यु आला. तात्या टोपे यांस मात्र फांसावर लटकावें लागलें आणि नानासाहेब पेशव्यांची अखेर कशी झाली हें एक गूढच आहे. पण तें अखेरपर्यंत गूढ राहिलें, यावरूनच बंडवाल्यांच्या विषयींची सहानुभूति अखेरपर्यंत लुप्त झाली नव्हती हें उघड आहे.

### राजनिष्ठेचे दिवे ओवाळून घेतले!

तरी पण त्या वेळींहि लुब्रे व चहाडखोर लोक कमी नव्हते. बंडाचा खरा 'श्रीमन्महा' बंगालमध्यें झाला आणि लुब्र्या लोकांच्या सभांचें पीकहि बंगालमध्येंच पसरलें आणि आम्ही राजनिष्ठ आहों, आम्ही राजनिष्ठ आहों, अशी जाहिरात देणारे हजारों सह्यांचे अर्ज बंगाल प्रांतांतून सरकाराकडे जाऊं लागले. एका अर्जांत असें लिहिलें होतें कीं, आम्हां बंगाली लोकांना भित्रे म्हणतात, पण आमची राजनिष्ठा अणुमात्रहि ढळली नाहीं, यावरूनच आमची काय ती परीक्षा करा! असले हे अर्ज पाहिले म्हणजे बंडवाल्यांचा पराजय कां झाला आणि आपण स्वराज्य कसें गमावलें याची मीमांसा करण्याला मेंदूला शीण देण्याचें कारणच राहात नाहीं. स्वराज्याच्या प्राप्तीसाठीं क्षात्रवृत्तीचे धाडसी देशभक्त रणकुंडांत धडाधड उड्या घेत असतां, किमानपक्ष त्यांचें कौतुक करावयाचें देखील धैर्य न दर्शवितां, आपल्याच हातानें आपल्या तोंडाभोंवतीं दिवे ओवाळून घ्यावे, त्याप्रमाणें राजनिष्ठेचे दिवे ओवाळून घेण्याला जेथले लोक इतके हापापलेले असतात, तेथें बंडाचा शेवट प्रतिकूल झाल्यास नवल काय! सुदैवाची गोष्ट एवढीच कीं, आतां ती स्थिति थोडीथोडी बदलत जाऊन बंडवाल्यांच्या शौर्याचें कौतुक तरी करतां येऊं लागलें; यामुळें आपण स्वराज्याच्या दिशेनेंच मार्गक्रमण करीत आहों अशी खात्री पटून देशभक्तीला पुनश्च भरती येईल असा भरंवसा वाटूं लागला आहे.

# वसईचा संग्राम धार्मिक का राजकीय : : १

[ भारत इतिहास संशोधक मंडळाच्या १९३९ च्या वार्षिक संमेलनांत त्या संमेलनाचे अध्यक्ष **श्री. तात्यासाहेब केळकर** यांनीं चर्चेसाठीं हा मुद्दा घेऊन वसईचा संग्राम धार्मिक नसून राजकीय स्वरूपाचा होता, असें मत प्रतिपादन केलें. त्याला उत्तर देण्यासाठीं जी चर्चा झाली त्या चर्चेंतून हा लेख निर्माण झाला. या लेखांत अनेक प्रमाणें देऊन वसईची मोहीम हातीं घेण्याचें मुख्य कारण, पोर्तुगीजांच्या छळांतून हिंदु प्रजेची सुटका करणें हेंच होय, असें दाखविलें आहे. ]

भारत इतिहास संशोधक मंडळाच्या संमेलन प्रसंगीं अध्यक्ष **श्रीयुत तात्यासाहेब केळकर** यांनीं वसईचा संग्राम हें धर्मयुद्ध नसून तो राजकीय बनाव होता, अशी बाजू चर्चेकरितां मांडली होती. त्या वेळीं ठरल्याप्रमाणें ही चर्चा पुढें चालविण्याकरितां भारत इतिहास संशोधक मंडळांत शुक्रवार तारीख १६ जून रोजीं श्रीयुत **ज. स. करंदीकर** यांनीं आपली बाजू मांडली.

अध्यक्षस्थानीं **प्रो. पुणतांबेकर** ह्यांची योजना झाल्यावर श्री. **करंदीकर** यांनीं जे मुद्दे मांडले त्यांचा सारांश पुढें दिल्याप्रमाणें आहे :-

**मराठेशाहीची स्थापना धर्मरक्षणार्थ**

वसईचा संग्राम धार्मिक का राजकीय हें पाहण्यापूर्वी मराठेशाहीची स्थापना कोणत्या पायावर झाली हें प्रथम पाहिलें पाहिजे. तो पायाच जर धार्मिक नसला तर वसईचा संग्रामहि धार्मिक होऊं शकणार नाहीं. पण मराठेशाहीची स्थापना धर्ममूलकच होती. शिवाजीची राज्यस्थापना धर्मासाठीं होती हें अनेक इतिहासकारांनीं मान्य केलें आहे. पाश्चात्य इतिहासकारांना हिंदूंच्या धर्मभावनाच कळत नसल्यामुळें त्यांनीं मराठेशाहीला लुटारू टोळयांची उपमा दिली किंवा डोंगरावरील वणव्याची उपमा दिली तरी त्यानें वस्तुस्थिति बदलूं शकत नाहीं. मराठ्यांनीं स्वराज्यस्थापनेसाठीं जे प्रयत्न केले त्यांच्या मुळाशीं स्वधर्मरक्षण करणें आणि परकीयांकडून होणारा धर्मच्छळ बंद करणें हा हेतु प्रामुख्यानें होता. इतिहासचार्य राजवाडे यांनीं याविषयीं आपला अभिप्राय स्पष्टपणें दिला आहे. ते लिहितात, " शिवाजीच्या वेळीं झालेल्या राज्यक्रान्तीचें मूळ तत्कालीन धर्मसमजुतींत होतें हें मला कबूल आहे. " " स्वराज्य व स्वधर्म यांचें संरक्षण करण्याकरितां शिवाजीचा अवतार होता. स्वराज्य व स्वधर्म यांचें संरक्षण करण्याचा उच्च, उदात्त व पवित्र हेतु मनांत धरून शिवाजीचे प्रयत्न चालले होते हें सर्वत्र मान्य आहे. ".

( केसरी, दि. २३ जून १९३९ )

न्यायमूर्ति रानडे हे आपल्या मराठी सत्तेचा उत्कर्ष ह्या पुस्तकांत धार्मिक प्रेरणेलाच अधिक मान देतात. रियासतकार रावबहादूर गोविंदराव सरदेसाई हे मॉडर्न रिव्ह्यूच्या मार्च महिन्याच्या अंकांत पुढीलप्रमाणें मत देतात :– "The Marathas did endeavour to create a Hindupadapadashahi but the ideal was more religious than political. They only wanted and claimed full religious liberty and tolerance from the Muslim rulers, provided they can experience no interference with their religious practices." या विधानांवरून सुप्रसिद्ध इतिहासकारांच्या मतानें हिंदुपदपातशाहीच्या स्थापनेच्या मुळाशीं धर्मकारणच होतें असा उलगडा होतो.

### समर्थांची शिकवण

इमारतीच्या बांधणीपूर्वीं जसा नकाशा तयार केला जातो आणि नंतर त्या नकाशाप्रमाणेंच इमारत उभारली जाते तसा कांहीं राज्यस्थापनेचा नकाशा कोठेंहि तयार नसतो. त्यामुळें राज्यस्थापनेचा हेतु अनुमानानेंच ठरवावा लागतो. शिवाजीच्या स्वराज्याच्या प्रयत्नांच्या पूर्वीं धर्मच्छळाची पराकाष्ठा झाली होती. याकरितां हा धर्मच्छळ थांबवावा कसा, हीच विवंचना सर्वांस लागून राहिली होती. अशा वेळीं स्वधर्मरक्षणासाठींच स्वराज्यस्थापना ही कल्पना बहुजनांस पटली, मानवली, म्हणूनच त्यांच्या साहाय्यानें शिवाजीस स्वराज्यस्थापना करतां आली.

तीर्थक्षेत्रें मोडलीं । ब्राह्मणस्थानें भ्रष्ट झालीं ।
सकळ पृथ्वी आंदोळली । धर्म गेला ॥
देव धर्म गोब्राह्मण । यांचें करावया परिपालन ।
हृदयस्थ झाला नारायण । प्रेरणा केली ॥
या भूमंडळाचे ठायीं । धर्म रक्षी ऐसा नाहीं ।
महाराष्ट्रधर्म राहिला कांहीं । तुम्हाकरितां ॥
सर्वज्ञ मंडळी धर्ममूर्ति । सांगावें काय तुम्हांप्रती ।
धर्मस्थापनेची कीर्ति । सांभाळिली पाहिजे ॥

यांवरून शिवाजीच्या स्वराज्यस्थापनेचें बीज धर्मस्थापना आणि धर्मसंरक्षण यांत होतें याविषयीं संशय उरत नाहीं.

### अमात्यांचाहि तोच अभिप्राय

रामचंद्रपंत अमात्य हे शिवकालीन थोर मुत्सद्दी आणि पूर्ण माहितगार. त्यांनीं शिवाजीमहाराजांच्या राज्यस्थापनेच्या हेतूविषयीं पुढील अभिप्राय व्यक्त केला आहे :–

"धर्मोद्धार करून देवब्राह्मण संस्थानीं स्थापून षट्कर्में वर्णविभागें चालविलीं."

"यवनाक्रान्त राज्य आक्रमावें यवनीं मंडळ निर्यवन करावें, हा निगूढ

चित्ताभिप्राय प्रगट करून पूर्व पश्चिम दक्षिण या प्रांतीं जीं यवनस्तोमें बद्धमूल झालीं होतीं तीं सेनासमुदायें करून मारून काढलीं."

"स्वामी हिंदुराज्यकार्यधुरंधर"

यांत यवनी मंडळ निर्यवन करावें हा हेतु स्पष्टपणें नमूद आहे व तोच हेतु वसईच्या मोहिमेला लागू पडतो.

हीच धर्मस्थापनेची कल्पना शिवाजीच्या पाठीमागून येणारे संभाजी व राजाराम यांच्या कारकीर्दींत कायम होती. संभाजीनें तर प्राण दिला, परंतु धर्म टाकला नाहीं. राजारामाच्या कारकीर्दींत अवरंगजेबाशीं जें गनिमी काव्याचें युद्ध झालें त्याच्या बुडाशींहि धार्मिक भावनाच उत्कटत्वानें होती. नाहीं तर अवरंगजेबास एकजुटीनें एवढा प्रतिकार होऊंच शकला नसता.

### शाहू राजाचा दृष्टिकोन वेगळा होता

अवरंगजेबाच्या मृत्यूनंतर शाहू राजा मोंगलांच्या नजरकैदेंतून सुटून आला व त्यानें मराठेशाहीचीं राज्यसूत्रें हातीं घेतलीं. पण त्याचें बरेंच वय मोंगली दरबारांत गेल्यामुळें त्याला मोंगलांविषयीं इतका तिटकारा वाटत नव्हता. शिवाय शाहू सुटून आल्यानंतर थोड्याच कालावधीनें मराठ्यांना दक्षिणच्या सहा सुभ्यांच्या चौथाई-सरदेशमुखीच्या सनदा मिळाल्या आणि त्यांच्या छोट्याशा स्वराज्यासहि बादशहानें मान्यता दिली. या वेळेपासून धर्मकारणाला गौणत्व येऊं लागलें आणि राजकारणाचें महत्त्व वाढलें.

बाजीरावाच्या बहुतेक सर्व स्वाऱ्या राजकारणासाठीं होत्या. त्यांत चौथाई-सरदेशमुखीच्या हक्कांची बजावणी, स्वराज्याची वाढ, दिल्लीच्या बादशाहीवरहि आपला शह बसवून दिल्लीचें राजकारण आपल्या हातीं घेणें इत्यादि हेतु होते. परंतु कोंकणांतील सिद्दीसातावरील स्वारी आणि वसईची मोहीम या दोन स्वाऱ्या धार्मिक कारणासाठीं होत्या. ब्रह्मेंद्रस्वामींच्या सांगण्यावरून सिद्दीसातावरील स्वारी हातीं घेण्यांत आली आणि अणजूरकर नाईक व अंताजी रघुनाथ कावळे प्रभृति मंडळींच्या आग्रहावरून वसई प्रांतांतील धर्मच्छळ थांबविण्याकरितां ही मोहीम सुरू करण्यांत आली. वसई प्रांतांत पोर्तुगीज अधिकारी हिंदूंचा किती छळ करीत आणि त्यांच्या बाटवाबाटवीचा कहर किती असह्य झाला होता ती हकीगत 'वसईच्या मोहिमें'त श्री. **य. न. केळकर** यांनीं एका स्वतंत्र प्रकरणांत वर्णिली आहे.

### पोर्तुगीजांनीं केलेला धर्मच्छळ

पोर्तुगीजांनीं कोंकणपट्टी काबीज केली तेव्हांपासून लोकांना बाटविणें आणि जे न बाटतील त्यांच्यावर जुलूम करून त्यांचा छळ करणें व बाटलेल्या लोकांत जे लोक हिंदुधर्माचा आचार पाळतील त्यांना इन्क्विझिशनच्या नांवाखालीं जिवंत जाळणें इत्यादि अमानुष प्रकार चालू होते. सोळाव्या शतकांत हा प्रकार जारीनें चालू असूनें मराठ्यांच्या हातीं सत्ता नसल्यानें त्यांना प्रतिकार करतां आला नाहीं.



दाखल नं ... JAN 1994

शिवाजीचा उदय झाल्यावेळेपासून तों त्याच्या मृत्यूपर्यंत पोर्तुगीजांची हालचाल थंडावली होती.

संभाजीच्या कारकीर्दींत पोर्तुगीजांनीं पुनश्च कहर केला आणि संभाजीनें गोव्यावर चढाई करून त्यास फोंडा मुक्कामीं तह करावयास भाग पाडलें. त्यांत वसईवर गांवखंडी आणि दमण प्रांतावर चौथाई लादण्यांत आली. पुढे राजारामाच्या कारकीर्दींत मराठ्यांचेंच बूड जाग्यावर नसल्यानें पोर्तुगीजांचा जुलूम वाढत चालला. तथापि बाजीराव पेशव्यांच्या हातीं सत्ता येऊन मराठ्यांची स्थिरस्थावर होईपर्यंत वसई प्रांतांतील हिंदूंना आपलें गाऱ्हाणें सांगावयालाच जागा नव्हती. बाजीरावानें कल्याण-भिवंडी प्रांत घेऊन तेथें सुभा स्थापिला तेव्हांपासून साष्टी-वसईचें कारस्थान खरेंखुरें शिजूं लागलें.

### सूत्रचालक नाईकांची दृष्टि

वसईच्या मोहिमेचे सूत्रचालक जे अणजूरकर नाईक यांची दृष्टि कशी होती तें त्यांच्याच पत्रांतील पुढील उताऱ्यावरून दिसून येतें. " वसई प्रांत फिरंगीयांकडे आहे. त्यानें देवस्थानें व तीर्थें यांचा व महाराष्ट्रधर्म यांचा लोप केला. हिंदु लोक भ्रष्टऊन क्षार केले. म्हणून साहेबीं मसलत करून प्रांतमजकूर सर करून देवस्थापना करावी व स्वधर्मस्थापना होय ते गोष्ट करावी. "

या मसलतीचा उपक्रम १७२१-२२ सालीं झाला तरी पेशव्यांना कित्येक वर्षें या प्रकरणांत हात घालण्याला फुरसतच झाली नाहीं. पुढें १७३४ सालीं पोर्तुगीज लोक ठाण्याचा कोट बांधूं लागले आणि मोठ्या प्रमाणांत बाटवाबाटवी करण्याचा विचार नक्की झाला. यासंबंधांत पेशव्यांकडे जें पत्र आलें त्यांत मजकूर होता तो असा — " फिरंगाण प्रांतांत साष्टींत जितके हिंदु माणूस आहे तितकीयांची टीप ( पांचा वर्षांपासून वृद्धापर्यंत ) लिहून घेतली. एक माणूस कोठें फिरको देत नाहीं. जागा जागा चौक्या ठेवल्या आहेत. हिंदु माणूस तेथून ( झाडून सारे ) बाटवणार म्हणून लौकिक आहे. याकरितां त्या प्रांतीं थोर आकान्त जाला आहे. "

गंगाजी नाईकानें बाजीरावास ही हकीगत लिहिली त्याजवरून रायाचें पत्र फिरंगीयांस आलें. " मग फिरंगी पाद्री जमा होऊन विचार केला कीं, ठाण्याचा कोट पुरा होईल तेव्हां मग हा प्रयोग ( बाटविण्याचा ) करूं. " अशा रीतीनें ही तात्पुरती स्थिरस्थावरता झाली. पण पेशव्यांनीं यासंबंधांत " अतःपर कार्य कर्तव्यच, दुसरा विचार नाहीं " असें जें कल्याणचे अधिकारी वासुदेव जोशी यांस कळविलें होतें, तें वचन कायम होतें. त्या वचनास अनुसरून चिमाजीआप्पा हे सिद्दीच्या मोहिमेंतून मोकळे होतांच बाजीरावानें त्यांची रवानगी कोंकणांत केली आणि १७३७ च्या एप्रिलपासून दोन वर्षें ही रणधुमाळी गाजून राहिली.

### धर्मकारणच मुख्य

अशा रीतीनें या मोहिमेचा उगम पाहिल्यास धर्मच्छळांतून सोडवणूक करणें

हाच हेतु यांत प्रामुख्यानें दिसून येतो. राजकारणांत अनेक हेतूंची नेहमींच गुंतागुंत होते; आणि धर्मकारणाबरोबरच राजकारण साधल्यास तें कोणास नको असतें असें नाहीं. पण बाजीरावाच्या उत्तरेकडच्या माळव्यावरील स्वाऱ्या अथवा दक्षिणेकडील निजामावरील व म्हैसूर प्रांतावरील स्वाऱ्या या जशा केवळ राजकीय हेतूच्या सिद्धीसाठींच होत्या, तशी कांहीं ही वसईची मोहीम नव्हती. धर्मच्छळामुळें वैतागलेल्या अणजूरकर मंडळींनीं आग्रह धरला नसता आणि पोर्तुगीज लोक यच्चयावत् हिंदूंना बाटविणार अशी आवई उठली नसती तर पेशव्यांनीं ही मोहीम या वेळीं हातीं घेतलीं नसती. यावरूनच यांत धर्मकारण मुख्य असून राजकारण गौण होतें असें दिसून येतें.

ही मोहिम चिमाजीअप्पाकडे सोपविण्यांत आली व त्यानें मोठ्या ईर्षेनें ती चालविली व तींत फत्ते मिळविण्यासाठीं मराठे सरदार व सैनिक यांनीं प्राण पणास लावून जो पराक्रम केला, त्यावरून त्यांना आपण हें धर्मरक्षणाचें कार्य करीत आहों अशी जाणीव असल्याचें अनुमान निघतें. राजकारणाच्या मोहिमेंत मनुष्य लाभहानीचा हिशेब पाहात असतो आणि लाभापेक्षां हानि विशेष दिसल्यास ती मोहीम सोडून देतो. वसईच्या मोहिमेंत मराठ्यांनीं तसा हिशेब पाहिला नाहीं. फिरंगीयांची सत्ता वसईतून खणून काढणें हेंच ध्येय त्यांनीं कायम ठेवलें व त्या दृष्टीनेंच कल्पनातीत पराक्रम केला; यावरूनच या युद्धांत मराठे केवळ धर्मकार्य म्हणून कर्तव्यबुद्धीनें लढत होते. राजकारणांतल्याप्रमाणें लाभहानीचा तराजू धरून लढत नव्हते हें सिद्ध आहे.

### फलश्रुति काय झाली

फलश्रुतीच्या दृष्टीनें पाहिलें तरी हीच गोष्ट नजरेस येते. वसईस निशाण चढल्यांवर अप्पासाहेबांनीं तत्कालीन धार्मिक समजुतीप्रमाणें सर्व धर्मकृत्यें केलीं. माणकोजी पाथरवटाकडून मारुतीची मूर्ति करून तिची स्थापना कोटांत विधिपूर्वक केली. शाहूमहाराजांना पाठविलेल्या पत्रांत चिमाजीअप्पा लिहितात – "महाराजांनीं या युगीं अवतार धरून धर्मद्वेष्टे दैत्यांचा निःपात केला." अमृतराव शंकर लिहितो – "याजपेक्षां श्रीकृपेकरून महत्कार्य होऊन हिंदु राज्याचें संस्थापन स्वामींचे हातून होईल." मल्हारराव लिहितो – "देवब्राह्मणांची संस्थापना करावयासाठींच स्वामींचा अवतार आहे."

पिलाजी जाधवराव यांचें वे. मू. चिमणभट टकले यांस पत्र आहे; त्यांत म्हटलें आहे कीं, "प्रांतमजकूर बहुत दिवस फिरंगीया आले होता. यामुळें हिंदुधर्माचा लोप जाहला होता. सांप्रत राजश्री पंतप्रधान यांनीं तुम्हांस या प्रांतें रवाना केलें. फिरंगीयास मारून काढले. देश हस्तगत झाला. तेथें धर्मस्थापन झालें पाहिजे. याजकरितां वेदमूर्तीस गांवगन्ना दरगांवास रुपया धर्मादाय करून द्यावा" इ. इ. (पण या पत्राच्या तारखेसंबंधानें शंका आहे).

पेशवे दप्तराची संपादणी करून ग्रंथमाला प्रसिद्ध करणारे रियासतकार रा. ब. सरदेसाई ' वसईची मोहीम ' या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत लिहितात –

" Shiwaji's chief aim was to make the land safe for the Hindu religion. This point was specially taken up by his grandson Shahu, who with that object conducted one campaign viz. that against Janjira, while the Peshawa took up another viz. against Bassein. "

## साष्टीच्या बखरीची साक्ष

साष्टीच्या बखरीच्या प्रारंभींच म्हटलें आहे कीं, "गांवचें गांव घेऊन बाटविले. किरिस्तान केले. सासष्ट गांवचे व आगर वसईचे बहुतेक लोक धरून बाटविले. घरांत कोणी मोठें नसलें तर पोरें नेऊन बाटवावीं, असा उपद्रव महाराष्ट्रांत मांडला. देवधर्म बुडाला. तीर्थक्षेत्रें लोपलीं, देवालयें फोडून साफ केली. फिरंगी धर्म चालावयास लागले. ब्राह्मणास मुलखांत फिरण्याची बंदी झाली, असा अनर्थ मांडला."

या अनर्थाला कंटाळूनच गंगाजी नाईक पेशव्यांच्या सुभेदाराकडे आले व बोलले – " आमचा प्रांत, आमची मायभूमि, तिचा जो राजा तूर्त आहे तो दुष्ट आहे. त्यानें आमचीं वतनें बुडविलीं, मुलखाचा देवधर्म बुडविला, आमचे लोक बाटविले. असा उपद्रव करीत आहे म्हणून आपल्यापाशीं आलों. "

या सर्व वर्णनावरून वसईची मोहीम धर्म-संकट-निवारणार्थ होती यांत तिळमात्र शंका राहात नाहीं.

## गोव्यास काय झालें ?

आतां याच वेळीं पोर्तुगीजांची सत्ता गोवें प्रांतांतहि होती व तेथेंहि धर्मच्छळ चालतच असे. मग पेशव्यांनीं गोवें कां घेतलें नाहीं, असा प्रश्न उद्भवतो. त्याला पहिलें उत्तर असें कीं, वसईला जसे गंगाजी नाईक लाभले तसे सव्यसाची नेते गोव्याला लाभले असते तर गोवेंहि घेतलें गेलें असतें. दुसरें उत्तर असें कीं, वसईच्या मोहिमेला जसे चिमाजीअप्पा महारथी मिळाले तसे कोणी महारथी गोव्याला मिळाले नाहींत. व्यंकटराव घोरपड्यांचें चिमाजीअप्पासारखें तेज पडूं शकलें नाहीं. आणि तिसरें मुख्य कारण हें कीं, वारणेच्या तहामुळें कृष्णेच्या दक्षिणेचा मुलूख कोल्हापूरचे राजे संभाजी यांजकडे गेला असल्यानें व्यंकटराव घोरपडे यांनीं गोव्यावर स्वारी केली असतां, त्यास साहाय्य करण्याच्याऐवजीं, कोल्हापूरच्या संभाजीनें शाहू राजासच प्रश्न केला कीं, व्यंकटराव घोरपडे हे कोणाच्या हुकुमानें गोवें प्रांतावर चालून गेले ? अर्थातच अशा परिस्थितींत पेशव्यांच्या हातून वसईप्रमाणेंच गोव्यांतून पोर्तुगीजांचें उच्चाटन होऊं शकलें नाहीं, याचा दोष पेशव्यांकडे येत नाहीं.

### सहिष्णुता म्हणजे प्रतिकारशून्यता नव्हे

वसई व गोवें येथें पेशव्यांनीं पोर्तुगीजांशीं जे तहनामे केले त्यांत हिंदूंचा धर्मच्छळ थांबविण्यासंबंधाचें कलम नसून उलट ख्रिस्ती मंदिरांना उपद्रव न देण्याचेंच आश्वासन आहे. याचें कारण हेंच कीं, पोर्तुगीजांनीं हिंदूंचा छळ अतःपर करणार नाहीं हें कलम मान्य केलें होतें; आणि हिंदूंना परधर्मीयांवर जुलूम करावयाची संवयच नसल्यानें त्यांनीं ख्रिस्ती लोकांस सवलती दिल्या हें स्वाभाविकच आहे. हिंदु लोक परधर्मसहिष्णु आहेत, ही स्वतःसिद्ध गोष्ट पुनश्च सिद्ध करण्याला वेदकालापासूनचे पुरावे शोधण्याची जरूरी नाही. शिवाय तो मुद्दा येथें अप्रस्तुत आहे. हिंदु लोक स्वतः दुसऱ्यावर धार्मिक जुलूम करीत नाहींत, याचा अर्थ कांहीं दुसऱ्यानें धार्मिक छळ केला तरी त्याचा ते प्रतिकार करीत नाहींत असा होत नाहीं. वसईची मोहीम परक्यांवर जुलूम करण्यासाठीं नसून हिंदूंच्यावर होणाऱ्या जुलमाचा प्रतिकार करण्यासाठींच होती. असा प्रतिकार हिंदूंनीं यापूर्वीं अवरंगजेबाला केला होता व पोर्तुगीजांनाहि केला. धर्मच्छळ होत नसला, धर्माचरणाला मुभा असली, तर परकी अमलाला हिंदु लोक फारसा विरोध करीत नाहींत; पण धर्मच्छळ सुरू होतांच तीव्र प्रतिकार करतात, हें ओळखूनच ईस्ट इंडिया कंपनीनें आपल्या मिशनऱ्यांना पायबंद घातला होता. आणि राणीच्या जाहिरनाम्यांत 'तुमच्या धर्मांत हात घालणार नाहीं' असें आश्वासन नमूद करण्याचें कारणहि तेंच होय. धर्मच्छळामुळेंच पोर्तुगीजांची वसई गेली आणि धर्मस्वातंत्र्यामुळें इंग्रजांची मुंबई भरभराटली, यावरून देखील वसईचा संग्राम राजकीय का धार्मिक याचा निर्णय होतो.

### धर्मक्षेत्रें कां सोडविलीं नाहींत

काशी, प्रयाग, मथुरा, वृंदावन, कुरुक्षेत्र इत्यादि धर्मक्षेत्रें पेशव्यांनीं परक्यांच्या हातून सोडविलीं नाहींत तर मग वसईचाच तेवढा पुळका पेशव्यांना कां आला? या प्रश्नाला पहिलें उत्तर हेंच कीं, वसईचा जुलूम पेशव्यांच्या घराशेजारीं होता आणि दुसरें उत्तर असें कीं, ज्या वेळीं पेशव्यांचे हात काशी-कुरुक्षेत्रापर्यंत पोंचूं शकले त्या वेळीं तेथें तसा धर्मच्छळ राहिलेला नव्हता. काशी, मथुरा, वृंदावन, प्रयाग, सोरटी सोमनाथ इत्यादि क्षेत्रांत हिंदूंचीं नवीं देवळें उभारलीं जाऊन तेथें निर्वेधपणें पूजा-अर्चा, धार्मिक विधि चालू झाले होते. त्यांतूनहि महादजी शिंदे यांची जरब जेथें पोंचली तीं क्षेत्रें त्यांनीं आपल्या ताब्यांत घेतलीं. परंतु इंग्रजांशीं फटकून वागावयाचें नाहीं असा महादजीबुवांचा शिरस्ता असल्यानें काशी क्षेत्र ताब्यांत घ्यावयाची त्यांनीं टाळाटाळ केली. परंतु वसई प्रांतांत होत असलेला जबरदस्त जुलूम आणि उत्तरेकडील क्षेत्रांच्या मालकीहक्कांचा प्रश्न यांत जमीनअस्मानाइतकें अंतर आहे. दोहोंत इतकें अंतर असल्यामुळें एकीकडची विचारसरणी दुसरीकडे लागू होत नाहीं. अर्थातच पेशव्यांनीं काशी,

प्रयाग इत्यादि क्षेत्रें काबीज केलीं नाहींत, एवढ्यानें वसईचा संग्राम धार्मिक न ठरतां राजकीय कसा ठरेल ? वसईच्या मोहिमेवर इतके समशेरबहादूर सरदार व सैनिक गुंतवून आपली इज्जत पणाला लावण्यासारखें राजकारण तेथें कोणतेंच उद्भवलें नव्हतें. धर्मकारण मात्र उद्भवलें होतें हें सर्वमान्य आहे. अर्थातच वसईचा संग्राम राजकीय नसून धार्मिक भूमिकेवरूनच लढला गेला.

---

# हा घ्या चिमाजीअप्पांच्या हातचा पुरावा : १०

[ ' वसईची मोहीम धार्मिक का राजकीय ? ' हा वाद कसा उद्भवला, याचें दिग्दर्शन मागील लेखांत केलेंच आहे. त्यानंतर **तात्यासाहेब केळकर** यांनीं आपला लेख प्रसिद्ध करून, पुनश्च या वादाला तोंड पाडलें. त्यावरून नवीन उपस्थित झालेल्या मुद्द्यांना उत्तर देण्यासाठीं व पूर्वीच्या लेखांतलीं कांहीं विधानें अधिक स्पष्ट करण्यासाठीं, हा दुसरा लेख लिहिण्यांत आला. यासंबंधाचें स्पष्टीकरण या लेखाच्या पहिल्या परिच्छेदांत केलेलें आहे. ]

## पुनश्च एकदां वसईचें धर्मयुद्ध

वसईचा संग्राम धार्मिक का राजकीय हा वाद भा. इ. सं. मंडळाच्या संमेलन-प्रसंगीं अध्यक्ष **श्रीयुत तात्यासाहेब केळकर** यांनीं केलेल्या भाषणांतून उद्भवला. त्या वेळीं श्री. केळकर यांचें भाषण लिहून तयार नसल्यानें तें प्रसिद्ध होऊं शकलें नाहीं. पण भा. इ. सं. मंडळाच्या वाढदिवसानिमित्त झालेल्या व्याख्यानमालेंत मी तात्यासाहेब केळकरांच्या शंकेला उत्तर दिलें व माझें भाषण लिहून तयार असल्यामुळें तें ता. २३–६ च्या केसरींत प्रसिद्ध होऊन गेलें. त्यानंतर तात्यासाहेब केळकर यांनीं आपलें भाषण लिहून दिलें व ता. ७ जुलैच्या अंकांत तें प्रसिद्ध झालें. यामुळें आधीं उत्तर आणि नंतर प्रश्न असा उलटा प्रकार झाल्यानें वाचकांचा कांहींसा घोटाळा होईल म्हणून थोडासा खुलासा करणें प्राप्त आहे. शिवाय तात्यासाहेबांचें समग्र भाषण पूर्वी लिहिलेलें नसल्यामुळें त्यांतील कांहीं मुद्द्यांना माझ्या लेखांत उत्तर येऊं शकलें नाहीं, म्हणूनहि अधिक खुलासा करणें जरूर आहे. तथापि माझ्या लेखाची पुनरुक्ति न करतां मी वाचकांना एवढीच सूचना देतों कीं, वाचकांनीं माझें पूर्वीचें उत्तर पुनश्च वाचावें. माझा हा लेख पूर्वीच्या लेखांची पुरवणी आहे, समग्र उत्तर नव्हे, हें लक्षांत बाळगून दोन्ही लेख एकत्र केले म्हणजेच माझें समग्र उत्तर होतें हेंहि वाचकांनीं लक्षांत ठेवावें.

( केसरी, दि. १८ जुलै १९३९ )

## वास्तविक वादाचें कारणच नाहीं

श्री. तात्यासाहेब केळकर याच्या लेखांतील पहिला व शेवटला असे दोन परिच्छेद वाचले म्हणजे त्यांच्या तोंडूनच वादाचा निकाल होतो. पहिल्या परिच्छेदांत ते लिहितात, "वसईवरील मोहिमेंत पेशव्यांची धर्मबुद्धि नव्हती असें मी म्हणत नाहीं" आणि शेवटल्याहि परिच्छेदांत ते अशीच कबूली देतात कीं, "वसईची मोहीम हें एकच उदाहरण असें ठळक दिसतें कीं, ज्यांत मराठ्यांनीं धर्मयुद्धाच्या दृष्टीनें मुलुखगिरी केली." यावर वाचक विचारतील कीं, अशी स्पष्ट कबुली दिल्यावर मग वादाला जागा तरी कोठें राहिली ? वास्तविक पाहतां यानंतर वाद होण्याचें कारणच नाहीं, परंतु पहिल्या परिच्छेदांत "धर्मयुद्धांत जितकी मुसलमानांची तीव्रता होती तितकी पेशव्यांची होती काय" असा प्रश्न विचारून आणि शेवटच्या परिच्छेदात "असें म्हणण्यास थोडीशी जागा आहे" अशी पुरवणी जोडून आणि त्याच्याहि पुढें "पेशव्यांच्या मनांत राजकीय हेतु व धार्मिक हेतु यांचें प्रमाण खरोखर किती" असें शेपूट त्या पुरवणीला जोडून तात्यासाहेबांनीं पहिली कबुली जवळ जवळ नाहींशी करून सोडली आहे, म्हणून वादाला जागा राहते.

## निस्संदिग्ध उत्तर

पहिल्या परिच्छेदांतील पहिल्या शंकेचें उत्तर असें कीं, "मुसलमानांची जेवढी तीव्रता होती तेवढी पेशव्यांची नव्हती" हें जगजाहीर आहे. पण यानें काय सिद्ध होतें ? मुसलमानांच्याइतकी तीव्रता पेशव्यांच्या स्वभावांतच नव्हती म्हटल्यानें वसईच्या मोहिमेचें धार्मिक स्वरूप नाहींसें होऊन तिला राजकीय स्वरूप कसें येईल ? शामभटाइतके लाडू रामभटानें खाल्ले नाहींत असें सिद्ध झालें, तरी तेवढ्यानें कांहीं रामभट जेवला नाहीं असें ठरत नाहीं.

शेवटच्या परिच्छेदांतहि "मराठ्यांनीं धर्मयुद्धाच्या दृष्टीनें ही मुलुखगिरी केली" अशी कबुली दिल्यावर अशीं आणखी किती उदाहरणें आहेत, हा प्रश्नच गौण ठरतो. इतर उदाहरणें असतील किंवा नसतीलहि; पण दुसरीं उदाहरणें नसलीं तरी "वसईवरील मोहीम धर्मयुद्ध नव्हे" असें कोणत्या तर्कशास्त्रानें ठरतें ? त्याचप्रमाणें एकदां धर्मयुद्धाच्या दृष्टीनें ही मुलुखगिरी केली असें मान्य केल्यानंतर "या मोहिमेंत पेशव्यांच्या मनांत राजकीय हेतु व धार्मिक हेतु यांचें प्रमाण किती" असा प्रश्न करण्यांत तरी स्वारस्य काय ? धार्मिक हेतु हाच प्रधान हेतु व राजकीय हेतु हा गौण हेतु असें मान्य केल्यानंतर, राजकीय हेतु शेंकडा ५ असला काय अथवा शेंकडा २५ असला काय, तो गौण हेतु कांहीं प्रधान होऊं शकत नाहीं. पण सगळ्या लेखाचा रोख असा कीं, पहिल्या व शेवटल्या परिच्छेदांत जी मान्यता दिली गेली ती बहुतेक सगळी पुसली जावी आणि एकंदरींत पेशव्यांची तीव्रता मुसलमानांइतकी नव्हती असें म्हणतां म्हणतां ती शून्यांशाइतकी होती असा वाचकांचा ग्रह व्हावा असा सगळ्या लेखाचा रोख दिसतो म्हणून त्यांस उत्तर देणें प्राप्त आहे.

### वाचकांनीं हें पुस्तक वाचावें

वसईच्या संग्रामाची थोडक्यांत चांगली कल्पना येण्यास वाचकांनीं '**वसईच्या धर्मसंग्रामाची पार्श्वभूमि**' हें छोटेसें पुस्तक वाचावें. वसईच्या विजयोत्सवाच्या वेळीं श्रीयुत गजानन गोविंद नाईक अणजूरकर यांनीं हें छोटें पुस्तक लिहून प्रसिद्ध केलें. त्याची किंमत अवघी चार आणे आहे व पाठारे क्षत्रिय इतिहास-संशोधक मंडळ वसई, यांजकडे तें मिळतें. त्या पुस्तकांत या मोहिमेला 'धर्मसंग्राम' असेंच अथपासून इतिपर्यंत म्हटलें आहे आणि त्या लेखकाच्या मनांत तर याविषयीं लवलेशहि शंका नाहीं. असो. आतां तात्यासाहेबांच्या एकेक मुद्द्याकडे वळूं.

### सहिष्णुता असहिष्णुता

हिंदु लोक हाडाचे गरीब व सहिष्णु आहेत हें मान्य केलें, तरी तेवढ्यानें "एकच मनुष्य सहिष्णु व असहिष्णु असूं शकत नाहीं" हें तात्यासाहेब केळकरांचें विधान ग्राह्य ठरत नाहीं. पांढरें व काळें हे जसे परस्परविरुद्ध गुण, तसे कांहीं सहिष्णुता व असहिष्णुता हे परस्परविरुद्ध गुण नाहींत. प्रत्येकाच्या सहिष्णुतेला मर्यादा असते; ती मर्यादा ओलांडली गेली कीं तोच मनुष्य असहिष्णु होतो. मुसलमानांची एकदां कुचेष्टा केली कीं तो रागवत असेल; तर हिंदु मनुष्य दहा वेळां कुचेष्टा केली तरी रागावत नसेल; तरी पण तो अकराव्या वेळीं रागावतोच. त्याचप्रमाणें हिंदूंना राग येण्याला धर्मच्छळाचा पारा बराच वर चढावा लागत असेल. तरी पण वसईतील धर्मच्छळानें तितका वर तो चढला आणि म्हणूनच मराठे चवताळून वसईवर चढाई करून गेले ही घडलेली गोष्ट आहे. ती खरी धरून तीवरून धर्मच्छळाचा पारा किती अंशावर गेला म्हणजे मराठ्यांना राग येतो हें ठरविणें युक्त होईल. पण तसें न करतां मराठे सहिष्णु असल्यानें ते केव्हांच असहिष्णु होऊं शकणार नाहींत, असें गृहीत धरून तर्क करूं लागल्यास ते वसईवर चालून गेलेच नाहींत, असेंहि म्हणण्याची पाळी येईल! शिवाजीच्या बंडापासून तो रँडच्या खुनापर्यंत मराठ्यांनीं शेंकडो वेळां प्रतिकार केला आहे, आणि त्यावरून ते कितीहि सहिष्णु असले, तरी कांहीं मर्यादेच्या पलीकडे ते असहिष्णु होतात हें ऐतिहासिक सत्य आहे. तसेंच वसई प्रांतांत त्या वेळीं धर्मच्छळ पराकाष्ठेला पोंचला होता हेंहि साष्टीच्या बखरीवरून सिद्ध होत आहे. धर्मच्छळाची पराकाष्ठा, गंगाजी नाईक प्रभृतींचा निकराचा तगादा आणि त्या तगाद्यामुळें पेशव्यांच्या मनांत उत्पन्न झालेली कर्तव्यजागृति इतक्या गोष्टी एकत्र विचारांत घेतल्या म्हणजे मुख्य प्रश्नाच्या उत्तराविषयीं संशयाला जागा राहात नाहीं.

### अवांतर प्रश्नांची चिकित्सा

पण तात्यासाहेब केळकर यांच्या विस्तृत लेखांत इतर अनेक अवांतर प्रश्न उपस्थित झाले असल्यानें त्यांचाहि थोडासा खुलासा करणें आवश्यक आहे. धर्मयुद्धाची पुष्कळ उदाहरणें मराठ्यांच्या इतिहासांत दाखवितां येतात काय, असा

एक त्यांचा प्रश्न आहे. यासंबंधांत एवढेंच सांगावयाचें कीं, ही वादाची भूमिकाच योग्य नव्हे. ठळकांतलें ठळक उदाहरण पुढें ठेवल्यावर तें सिद्ध करण्याला इतर उदाहरणांचीं अपेक्षा धरण्याची गरज नाहीं आणि कोणी तशी अपेक्षा केल्यास ती पुरी करणें शक्य नाहीं. समजा, महाराष्ट्रांत महापुरुष निपजले आहेत काय, असा प्रश्न उपस्थित झाला असतां टिळकांचें नांव पुढें करतां येईल. पण तें उदाहरण अपवादात्मक नव्हे हें सिद्ध करण्याला आणखी दुसरीं उदाहरणें द्या, असें म्हटल्यास टिळकांपेक्षां मोठा पुरुष कोठून आणावयाचा व तो कसा दाखवावयाचा, आणि तो दाखवितां आला नाहीं म्हणून महाराष्ट्रांत मोठे पुरुष निर्माण होत नाहींत आणि म्हणून टिळकहि महापुरुष नव्हेत, असें कोणी अनुमान काढल्यास तें कितपत योग्य ठरेल ? वसईचें धर्मयुद्ध हें मराठ्यांच्या इतिहासांत जास्तींत जास्त ठळक उदाहरण आहे. इतर कोणतींहि उदाहरणें त्याच्यापेक्षां कमी दर्जाचींच ठरणार; असें असतां वसईचें युद्ध हें धर्मयुद्ध होय कीं नव्हे अशीच शंका घेतल्यावर इतर कमी ठळक उदाहरणें सांगून तरी काय उपयोग ?

### पाहण्याच्या दृष्टींतला फरक

एकाच गोष्टीकडे वेगवेगळ्या दृष्टींनीं कसें पाहतां येतें याचीं उदाहरणें तात्यासाहेबांच्या लेखांतच अनेक आहेत. शिवाजीला कोंकणपट्टीकडे लक्ष देण्याला फुरसत मिळालीच नाहीं; तरी पण १६७७ सालीं त्याजकडे अनेक गाऱ्हाणीं आल्यावरून त्यानें पोर्तुगीजांवर स्वारी केली. पण आरमाराच्या सामर्थ्याच्या अभावीं त्यास पूर्ण जय मिळणें शक्य न झाल्यानें चौथाई घेण्याच्या करारावरच त्यास परतावें लागलें. ही गोष्ट खेदास्पद मानतां येईल, पण तीवरून शिवाजीच्या मनांत धर्मप्रेम नव्हतें, असें अनुमान काढणें कसें उचित होईल ? शिवाजीनें समर्थांना दिलेल्या सनदेंत "तुमचा मुख्य धर्म राज्यसाधन करून धर्मस्थापना, देवब्राह्मणाची सेवा, प्रजेची पीडा दूर करून पाळण, रक्षण करावें" असा उपदेश समर्थांनीं केला व त्याप्रमाणें आपण राज्यस्थापनेचा उद्योग केला, असें स्वतः शिवाजीमहाराजच लिहून ठेवतात, तेव्हां त्यांच्या उद्देशाविषयीं तरी शंका घेण्याचें कारण नाहीं. पूर्ण यशप्राप्ति झाली नाहीं तरी जेवढें पदरांत पडेल तेवढें घेऊन पुनः आपला उद्योग चालू ठेवावा, या नीतीला अनुसरून शिवाजी चौथाई घेऊन परतला; एवढ्यावरून विपरीत अनुमान कसें काढतां येईल ?

### पेशव्यांना कोपरखळी

"वसई मराठ्यांच्या राज्याला अगदीं लागून असतांना मराठ्यांनीं तेथील धर्मच्छळाची उपेक्षा कां केली; पन्नास वर्षांत वसईतील फिरंग्यांना एकदांहि कोपरखळी कां मारली नाहीं," असा प्रश्न तात्यासाहेब केळकर विचारतात, याचें सखेदाश्चर्य वाटतें. १७२१–२२ मध्यें मराठ्यांचें राज्य स्थिर झालें व त्यानंतर लगेच अणजूरकर नाईक मंडळी पेशव्यांच्याकडे वसईच्या कार्यासाठीं हेलपाटे घालू

लागली. पण पेशव्यांना १७३७ पर्यंत तिकडे लक्षच देतां आलें नाहीं हें त्यांच्या अनेक मोहिमांवरून दिसून येतें. सामर्थ्य आलें आणि फुरसद मिळाली, तेव्हां त्यांनीं हा प्रश्न हातीं घेतला आणि १०–२० हजार माणसें खर्ची घालून त्यांनीं तो प्रश्न सोडविला. तत्पूर्वी पन्नास वर्षांत मराठ्यांचें बूड ठिकाणावर नव्हतें हें काय इतिहासज्ञांस सांगावयास पाहिजे ? असें असतां पन्नास वर्षें दुर्लक्ष कां केलें म्हणून पेशव्यांना कोपरखळी मारणें उचित ठरेल काय ?

## तहांत काय मिळविलें ?

वसईचा किल्ला सोडून जातांना पोर्तुगीजांनीं ज्या अटी घातल्या त्या मान्य केल्या; यावर तात्यासाहेबांचा विशेष राग दिसतो. पण यांतहि त्या अटींकडे पाहण्याचा दृष्टिकोन वेगळा असू शकतो. बिनशर्त शरण जावयाचें का सशर्त शरण जावयाचें असा जेव्हां प्रश्न निघतो तेव्हां उभय सैन्यांचे अधिकारी आपलें व शत्रूचें बलाबल पाहून या अटी ठरवीत असतात. वसईचा किल्ला दुर्घट, आधींच १०–२० हजार सैनिक खर्ची पडलेले, आणखी दिवसगत लावल्यास इंग्रजांकडून किंवा गोव्याहून मदत येऊन शत्रु पुनः प्रबळ होण्याचा संभव; आणि बिनशर्त किल्ला घेण्यासाठीं पुनः द्यावे लागणारे आपल्या सैनिकांचे बळी, इतक्या सर्व गोष्टींचा सापेक्ष विचार करून चिमाजीअप्पांनीं असें ठरविलें कीं, वसई प्रांतांतून पोर्तुगीजांचें कायमचें उच्चाटन होत आहे, तर जातांना त्यांना थोड्याशा सवलती दिल्या व तेवढ्यानें आणखी हजार-पांचशें सैनिक बळी देण्याचें टळलें तर त्यांत काय बिघडलें ? आणि मराठे सहिष्णु असल्यानें तहांत अट नसती तरी ते कांहीं वसईत राहणाऱ्या ख्रिस्त्यांचा छळ करणार नव्हते किंवा त्यांचीं मंदिरेंहि पाडणार नव्हते. मग जी गोष्ट आपणांस करावयाचीच नाहीं, ती गोष्ट न करण्याची अट तहांत असली म्हणून काय बिघडलें ? असाच विचार करून चिमाजीअप्पांनीं पोर्तुगीजांच्या अटी मान्य केल्या व एकदांचें त्यांना वसई प्रांतांतून घालवून लावून धर्मच्छळ कायमचा थांबविला. अर्थातच या अटींमुळें वसईची मोहीम धर्मयुद्ध नव्हे असें कसें ठरतें ?

## परधार्जिणेपणा का उदारपणा

खलीफ ओमार यानें, नुसता नमाज पडल्यानें ख्रिस्ती मंदिराची मशीद करतां येत असतांना तसें केलें नाहीं, यांत त्याच्या उदारपणाचें कौतुक केलें जातें आणि चिमाजीअप्पानें ख्रिस्त्यांचें मंदिर न पाडण्याचें कबूल केल्यानें त्याची मात्र कुचेष्टा केली जाते, याचा अर्थ काय ? किंकेड आणि पारसनीस यांनीं आपल्या इतिहासांत चिमाजीअप्पाच्या उदारपणाची स्तुतीच केली आहे. ते लिहितात, "In the hour of victory the Marathas showed commendable generosity" ( Kinked and Parasnis – Vol. II, page 258 ). ज्याला किंकेड 'Commendable generosity' म्हणतात त्याबद्दल लिहितांना तात्यासाहेब केळकर हे "जिंकलेल्या वसईत हिंदूंचा धर्मच्छळ करणाऱ्या पोर्तु-

गीजांना हव्या त्या सवलती उगवून घेऊं देणारे विजयी मराठे कोणीकडे, " असा प्रश्न विचारून चिमाजीअप्पांच्या पदरीं कमीपणा बांधूं पाहतात हें न्याय्य आहे काय ?

## गोव्याच्या तहाचीं कलमें

गोव्याच्या मोहिमेंतील तहासंबंधानेंहि असाच गैरसमज झालेला दिसतो. वसईच्या मोहिमेला जसें अनुकूल वातावरण होतें तसें गोव्याकडे नव्हतें; म्हणून वसईला जसें यश आलें तसें यश गोव्याला आलें नाहीं. पण तेवढ्यावरून मराठ्यांना गोवें प्रांतांतील छळ थांबवावयाचा नव्हता असें कसें म्हणतां येईल ? गोव्याच्या तहाच्या ज्या अटी प्रथम सांगितल्या गेल्या होत्या त्यांत, हिंदूंना धार्मिक स्वातंत्र्य मिळालें पाहिजे अशी अट होती. या अटी गोव्याच्या व्हाइसरॉयांकडे गेल्या तेव्हां त्यानेंहि ती अट कबूल केली आणि फक्त खंडणी कमी करण्याविषयीं वाटाघाट सुरू झाली. खंडणीचा पहिला आंकडा १२ लाखांचा होता; तो अखेरीस ७ लाखांवर आला. इतर कलमें व्हाइसरॉयाला मान्य असल्यानें ती तहनाम्यांत लिहिली गेली नसावींत. पण तीं कलमें लिहिलीं गेलीं नसलीं तरी तहानंतर पोर्तुगीजांनीं वसईतल्याप्रमाणें हिंदूंचा छळ गोवें प्रांतांत केला नाहीं, हें इतिहासावरून दिसून येतें. त्यामुळें तहांत कलम लिहिलें किंवा न लिहिलें याला महत्त्व उरत नाहीं.

## इंग्रजांची मदत

गोव्याच्या तहाच्या अटी अधिक कडक न करण्याचें कारण इंग्रजांची गोवेंकरांना होणारी मदत होय. किंकेड व पारसनीस आपल्या पुस्तकांत लिहितात, "The mediation of the English softened their demands" याशिवाय सरदारांतील फूट आणि सातारकर व कोल्हापूरकर यांच्यांतला वाद इत्यादि अनेक कारणांमुळें मराठ्यांना वसईप्रमाणें गोवें घेतां आलें नाहीं. पण एवढ्यावरून वसईची आणि गोव्याची मोहीम हिंदूंचा धर्मच्छळ थांबविण्याकरितां नव्हती असें कसें म्हणतां येईल ? यश मिळालें नाहीं म्हणून मोहिमेचा हेतु कसा बदलतो ? गांधीजींनीं मिठावरचा कर माफ व्हावा म्हणून कायदेभंग सुरू केला; त्यासंबंधांत गांधी-आयर्विन पॅक्ट झाला; पण त्यांत मिठाचा कर उठविण्याचें कलम नाहीं; आणि अद्यापिहि मिठावरचा कर उठला नाहीं. तथापि तेवढ्यावरून त्या वेळचा सत्याग्रह हा मिठाचा सत्याग्रह असें म्हणण्याला कोणताहि प्रत्यवाय येत नाहीं.

## धर्मांतरितांचें शुद्धीकरण

वसई घेतल्यानंतर पूर्वीच बाटवून ख्रिस्ती झालेल्या लोकांचें शुद्धीकरण केलें नाहीं; असाहि एक मुद्दा पुढें आला आहे. पोर्तुगीजांकडून होणारा धर्मच्छळ थांबवावा म्हणून ही मोहीम सुरू झाली व वसई प्रांत घेतल्यानें धर्मच्छळ थांबला. त्यानंतरचा शुद्धीकरणाचा प्रश्न हा धार्मिक व सामाजिक प्रश्न होता. तो धर्माधिकाऱ्यांनीं आणि जातीच्या पंचांनीं व गोतांनीं कसाहि सोडविला किंवा न सोड-

विला तरी त्यानें धर्मच्छळ थांबविण्याच्या हेतुला बाध येत नाहीं. धर्मांतर केलेल्यांचें शुद्धीकरण कोणी करावें, कसें करावें वगैरेसंबंधीं त्या वेळीं हल्लींच्यासारखी समाजाची दृष्टि नव्हती. शिवाजीमहाराजांच्या अधिकाराच्या जोरावर कांहीं शुद्धीकरणें झालीं असलीं तरी शिवाजीच्या पश्चात् त्याच्याच नातवाचीं म्हणजे शाहूचीं धर्मकृत्यें वेदोक्त पद्धतीनें व्हावीं का पुराणोक्त पद्धतीनें व्हावीं असा वाद ज्या काळांत सुरू झाला त्या काळांत धर्मांतरितांचें शुद्धीकरण झपाट्यानें न झालें तर त्याचा दोष धर्माधिकाऱ्यांकडे येऊं शकेल; पण त्यावरून वसईची मोहीम धार्मिक न ठरतां राजकीय कशी ठरेल?

## धर्मरक्षणाची दृष्टि

धर्मक्षेत्रें सोडविलीं नाहींत याच्या कारणाची मीमांसा मागील लेखांत केलीच आहे. त्यासंबंधांत येथें फिरून हेंच सांगावें लागतें कीं, अमूक एका कार्यांत यश आलें नाहीं, एवढ्यानें त्या कार्याची कल्पनाच मनांत नव्हती असें मानतां येणार नाहीं. धर्मक्षेत्रें सोडविण्याची, धर्मच्छळ थांबविण्याची आणि गोरक्षणाची कल्पना मराठेशाहीच्या अधिकाऱ्यांच्या दृष्टीसमोरून केव्हांहि दूर झाली नव्हती. महादजी शिंदे यांनीं बादशहाकडून गोवध न होण्याविषयीं आणि धर्मक्षेत्रांना उपसर्ग न पोंचण्याविषयीं हुकूम लिहून घेतला. त्याचप्रमाणें खर्ड्याच्या लढाईनंतर झालेल्या तहांत दक्षिणेंत गोवध होऊं नये, असें कलम तर होतेंच, पण त्याहून महत्त्वाची गोष्ट ही कीं, निजामाकडून त्यांनीं हिंदूंचा धर्म व त्यांचे देव हे मुसलमानांचा धर्म व त्यांचा देव यांच्या बरोबरीचे आहेत असें तहांत लिहून घेतलें. हिंदूंना काफीर समजून त्यांची कत्तल करावी, निदान त्यांच्यावर जीझिया कर तरी बसवावा, अशी धर्माज्ञा आहे असें म्हणणाऱ्या मुसलमानांकडून हिंदूंचा धर्महि देवानेंच निर्माण केला आहे, अशी लेखी कबुली घेणें ही कांहीं सोपी गोष्ट नव्हे. कारण कोणीहि कडवा मुसलमान हिंदूंचा धर्म हा आपल्या धर्माच्या बरोबरीचा आहे असें म्हणणार नाहीं. पण खर्ड्याच्या तहांत ही गोष्ट मुद्दाम नमूद केली गेली, यावरून १७९५ पर्यंत तरी मराठेशाहीची धार्मिक भावना नष्ट झाली नव्हती हें उघड आहे.

शिवाजीमहाराजांनीं जयसिंगाला लिहिलेल्या पत्रांत पुढील वाक्यें आहेत. "आम्ही लोकांनीं या वेळीं हिंदु, हिंदुस्थान व हिंदुधर्म यांच्या संरक्षणासाठीं फार प्रयत्न केला पाहिजे. दक्षिण देशांत या टोंकापासून त्या टोंकापर्यंत इस्लामाचें नांव किंवा खूण राहूं देऊं नये." यांत शिवाजीचें ध्येय स्पष्ट प्रतिबिंबित झालें आहे. गोव्यांत हिंदूंचा छळ होतो असें गाऱ्हाणें येतांच त्यानें तिकडे स्वारी केली, याचा उल्लेख वर आलाच आहे. त्यानंतर संभाजीनेंहि याच कारणासाठीं गोव्यावर निकराचा हल्ला केला होता. त्या वेळीं गोव्याचा किल्ला अगदीं पडण्याच्या बेतांत आला होता; पण इतक्यांत मोंगली सैन्य घाट उतरून येऊं लागल्याची वार्ता कळतांच संभाजीला घाईघाईनें कसा तरी तह उरकून निघून जावें लागलें. तरी पण त्या

वेळेपासून पोर्तुगीजांनीं चाळीस वर्षे फारशी हालचाल केली नाहीं, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. असें असतां "संभाजीमहाराजांनीं आपली तेजस्वी तलवार हिंदूंच्या रक्षणार्थ कोठें व किती चमकविली," असा प्रश्न तात्यासाहेब विचारतात! त्याला उत्तर संभाजीच्या गोव्यावरील या स्वारीच्या इतिहासांतच सांपडेल.

## 'मला काय त्याचें'

हिंदु लोक सहिष्णु आहेत याचा अर्थ अतिरेकाला नेऊन हिंदूंच्या हातून धर्मयुद्ध होऊं शकत नाहीं असें जसें दाखविण्यांत आलें आहे, तसेंच हिंदु लोक इतरांच्या संकटांत त्यांच्या साहाय्यार्थ धावून जात नाहींत, 'मला काय त्याचें' असें म्हणून डोळेझांक करतात, या सामान्य आक्षेपाचाहि तसाच अतिरेक करून तात्यासाहेब केळकर यांनीं "संकटांत सांपडलेल्या हिंदूंच्या साहाय्याला हिंदु धावून जाणार नाहीं" असा निष्कर्ष काढला आहे व त्यावरून वसईची मोहीम हें धर्मयुद्ध नव्हे असें दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. पण 'मला काय त्याचें' अशीच हिंदूंची वृत्ति निरपवाद रीतीनें पूर्वीपासून होती असें जर आपण समजूं तर हिंदूंच्या हातून राज्यस्थापना आणि त्या राज्याची अटकेपर्यंत वाढ तरी कशी झाली? छत्रसाल राजानें साहाय्यार्थ पाचारण करतांच बाजीराव जो बुंदेलखंडापर्यंत गेला तो तरी निदान 'मला काय त्याचें' या वृत्तीचा नव्हता. आणि त्याच बाजीरावाच्या कारकीर्दींत वसईची मोहीम झाली, हें लक्षांत घेतलें म्हणजे, वसईतील धर्मच्छळाला प्रतिबंध करावा असा बाजीरावाचा हेतु अनुमानितां येतो. पण या ठिकाणीं नुसत्या अनुमानावर समाधान मानून घेण्याचें कारण नाहीं. स्वतः बाजीराबानें १७३५ च्या मार्च महिन्यांत खोचीवडें व पापडी येथील लोकांना आश्वासन दिलें; त्यांत पुढील वाक्य आहे. "धर्मरक्षणास तुम्ही सिद्ध अहा. तदनुरूप ईश्वर मनोभीष्ट सिद्धीस पाववील. चिंता न करणें. तुमचें ऊर्जित मशारनिल्हे सांगतील त्याप्रमाणें केलें जाईल." या आश्वासनावरून वसईतील जी मंडळी धर्मरक्षणासाठीं पेशव्यांचें साहाय्य मागत होती त्यांना तें साहाय्य देण्याचें बाजीरावानें अभिवचन दिल्याचें स्पष्ट आहे.

## चिमाजीअप्पांच्या हातचा पुरावा

श्री. तात्यासाहेब केळकर यांना खुद्द चिमाजीअप्पांच्या हातचा पुरावा पाहिजे आहे; त्याशिवाय त्यांचें समाधान होत नाहींसें दिसतें. पण तसाहि पुरावा उपलब्ध असून त्याकडे तात्यासाहेबांचें लक्ष गेलेलें दिसत नाहीं. वसई घेतल्यानंतर चिमाजीअप्पानें शाहूमहाराजांस जें पत्र लिहिलें त्यांत "महाराजांनीं या युगीं पूर्वी दाशरथी व श्रीकृष्ण व पांडवादिक अवतारीयांनीं दैत्यादि दमनें करून देव-ब्राह्मणांचा आशीर्वाद घेतला. त्याच न्यायें या युगीं महाराजांनीं अवतार धरून धर्मद्वेष्टे दैत्यांचा निःपात केला. महाराजांचे पुण्यें वसई फत्ते जाहली," असें स्पष्ट लिहिलें आहे. अवतार हा धर्मरक्षणाकरितांच असतो. त्याचा येथें दाखला दिल्यानें हें कार्य धर्मरक्षणाचेंच होतें असा चिमाजीअप्पांचा स्पष्ट अभिप्राय त्यांच्या हातच्या पत्रां-

तून पाहावयास मिळतो. हें समग्र पत्र 'सह्याद्री'च्या १९३९ मे महिन्याच्या अंकांत पृष्ठ ४०४ व ४०५ वर दिलें आहे. त्यांत वरील उतारा पृष्ठ ४०५ वर आहे व त्याचा उल्लेख मी माझ्या लेखांत पूर्वी केलाच होता.

### वादाचा निष्कर्ष

सारांश, वसईच्या मोहिमेचें प्रोत्साहक अणजूरकर नाईक यांनीं ही उठावणी धर्मरक्षणार्थच केली आणि पेशव्यांनींहि इतर अनेक राजकारणांच्या गुंतागुंती चालू असतां वसईचा धर्मच्छळ थांबविणें हें आपलें कर्तव्य असें समजून वेळांत वेळ काढून मुद्दाम ही मोहीम अंगीकारिली आणि जिवाची पर्वा न करतां ती यशस्वी केली. यांत धार्मिक बुद्धि किती व राजकीय बुद्धि किती यांचें नक्की प्रमाण सांगणें शक्य नाहीं; पण त्याची कल्पना येण्याकरितां समीकरण मांडून दाखवावयाचें झाल्यास तें पुढीलप्रमाणें मांडून दाखवितां येईल.

धार्मिक प्रेरणा – राजकीय अडचणी = मोहीम चालविण्याची उमेद.

या समीकरणांत वस्तुस्थितीच दर्शविली आहे. ती अशी कीं, धर्मकारणांसाठीं ही मोहीम सुरू करणें पेशव्यांना जरूरीचें वाटत होतें; पण राजकीय अडचणीमुळें त्या मोहिमेला व्यत्यय येत होता. तरी देखील धार्मिक प्रेरणा इतकी अधिक तीव्र होती कीं, तींतून राजकीय अडचणीमुळें होणारी दिरंगाई वजा टाकली तरी मोहीम करण्याची उमेद इतकी शिल्लक राहिली कीं, त्या उमेदीनें तें कार्य यशस्वी झालें. धर्मप्रेरणेला राजकीय प्रेरणा पूरक झाली असती, तर ही मोहीम याच्याहि आधींच सुरू करण्यांत आली असती. ती तशी सुरू करतां आली नाहीं यावरून राजकीय अडचणी तिला साधक न होतां बाधक होत्या हें उघड आहे. तरी पण इतक्या राजकीय अडचणी वाटेंत अडवीत असूनाहि ज्या अर्थी ही मोहीम हातीं घेतली गेली त्या अर्थी धर्मप्रेरणेचें माप राजकीय अडचणींपेक्षां अधिक भरलें हें उघड आहे. नक्की प्रमाण सांगतां आलें नाहीं तरी मार्गांतील इतर विघ्नें बाजूला सारण्याइतकी जोराची धर्मप्रेरणा याच्या बुडाशीं होती हें निर्विवाद सिद्ध आहे.

शेवटीं एवढेंच सांगावयाचें कीं, इतिहासांत घडलेल्या विशिष्ट गोष्टी पाहून त्यांवरून सामान्य सिद्धान्त बांधावयाचे अशी इतिहासकारांची पद्धति आहे. तात्यासाहेब केळकर यांनीं याच्या उलट पद्धति स्वीकारली आहे. त्यांनीं आधीं कांहीं सामान्य सिद्धान्त गृहीत धरले आहेत आणि ते सामान्य सिद्धान्त विशिष्ट गोष्टीला लावून त्यांवरून ते अनुमान बांधीत आहेत. इतिहासशास्त्रांत अशी पद्धति उपयुक्त ठरत नाहीं. इतिहास हा from particular to general अशा पद्धतीनें पाहणें युक्त आहे. from general to particular ही दृष्टि सामान्यतः इतिहासकार वापरीत नाहींत. अशा या दोन पद्धति वेगवेगळ्या असल्यामुळें त्या त्या दृष्टीनें पाहणाऱ्यांचीं अनुमानें वेगवेगळीं येतात, त्यास इलाज नाहीं. पण आजवरच्या बहुतेक सर्व इतिहासकारांनीं वसईच्या-युद्धाला धर्मयुद्धच मानलें आहे.

# विघ्नांच्या कचाटींतून हस्तगत केलेलें यश : ११

[ इ. स. १९४० च्या मे महिन्यांत पहिल्या बाजीरावाच्या मृत्यूला दोनशें वर्षे झालीं. त्या प्रसंगीं त्याच्या निधनस्थानीं, **रावेरखेडी** येथें द्विशतसांवत्सरिक पुण्यतिथि साजरी करण्यांत आली. त्या प्रसंगानें बाजीरावाच्या कर्तृत्वासंबंधानें हा लेख **सह्याद्रि मासिकांत** प्रसिद्ध करण्यांत आला. बाजीरावानें गाजविलेले पराक्रम सर्वमान्य आहेत; त्याविषयीं कोणाचा मतभेद नाहीं. तथापि त्यानें केलेला पराक्रम एवढाच कां, त्यानें असेंच कां केलें, हेंच कां केलें; असले आडमुठे आक्षेप अनेकांकडून घेण्यांत येतात. या आक्षेपांना या लेखांत उत्तरें दिलीं असून, बाजीरावाच्या मार्गांत विघ्नें किती व कोणतीं होतीं यांचीं सकृद्दर्शनीं जाणीव व्हावी या हेतूनेंच '**विघ्नांच्या कचाटींतून मिळविलेलें यश**' अशा आशयाचा मथळा या लेखाला दिला आहे. ]

### बाजीरावाची अलौकिक कर्तृत्वशक्ति

प्रौढप्रतापनिधि बाजीरावाचा पराक्रम आणि त्या पराक्रमाचें ध्येयसिद्धींत झालेलें पर्यवसान यांचा विचार करीत असतांना बाजीरावाच्या ध्येयसिद्धीच्या मार्गातील अनंत अडचणींचाहि विचार लक्षांत घेतला पाहिजे. '**हिंदवी साम्राज्य**' स्थापन करण्याची शिवाजीमहाराजांची अतृप्त राहिलेली मनीषा बाजीरावानें सिद्धीच्या मार्गाला लावून ती मराठ्यांच्या दृष्टीच्या टप्प्यांत आणून ठेवली. बाजीरावानें दिल्ली प्रत्यक्ष हस्तगत केली नसली, तरी ती अगदीं आपल्या धाकांत व मुठींत आणून ठेवली. शाहूसारख्या अल्पसंतुष्ट आणि मोंगल बादशाहीविषयीं सतत एकनिष्ठ असणाऱ्या मराठ्यांच्या राजाच्या तोंडूनहि, बाजीरावाच्या मृत्यूनंतर नानासाहेबांना पेशवाईचीं वस्त्रें देतांना '**पातशाही रक्षून सर्व हिंदुस्थान आपलें करावें ऐसा बेत त्याहि केला**, तो तुम्ही सिद्धीस न्यावा, अटकेपार झेंडे लावावे' असे उद्गार निघाले. यावरूनच हिंदवी साम्राज्य-स्थापनेचें कार्य बाजीरावानें किती नांवारूपास आणलें होतें तें दिसून येतें. उज्ज्वल ध्येय दृष्टीसमोर ठेवून त्याची अर्धीअधिक सिद्धीहि प्रत्यक्ष पदरांत पाडून घेणाऱ्या अशा विजयी वीराच्या कर्तबगारीविषयीं कोणालाहि वावगा बोल बोलण्यास जागाच राहूं नये. इ. स. १७२० सालचीं मराठ्यांच्या राज्याची संकुचित सीमा आणि १७४० सालापर्यंतच्या २० वर्षांत झालेला तिचा विस्तार यांच्या तुलनेनें आणि मुख्यतः 'मराठ्यांचा जो दरारा' हिंदुस्थानभर प्रस्थापित

( सह्याद्रि, मे १९४० )

झाला त्यानें, बाजीरावाची अलौकिक कर्तृत्वशक्ति निर्विवादपणें सिद्ध झाली असेंच कोणीहि प्रांजल बुद्धीचा इतिहासज्ञ मानील.

तथापि मराठेशाहीचा हा अफाट विस्तार पायाशुद्ध होता का तो नुसता फापटपसारा होता, त्यांत कांहीं टिकाऊपणा होता का वाऱ्याच्या झुळकेबरोबर कोलमडून पडणाऱ्या पत्त्यांच्या बंगल्याइतकीच त्याची बळकटी होती, अशा शंका काढून बाजीरावाच्या कर्तृत्वाला हिणकस ठरविण्याचा कित्येकांकडून प्रयत्न केला जातो. यास्तव बाजीरावाच्या ध्येयसिद्धीच्या मार्गांत जीं अनेक विघ्नें आड येत होतीं, ज्या विघ्नांच्यामुळेंच बाजीरावाच्या महत्त्वाकांक्षेच्या पूर्ततेंत उणेपणा राहिलासा भासतो, त्या विघ्नांचा विचार करणें अगत्याचें होऊन बसलें आहे.

काल व परिस्थिति यांना बगलेंत मारून जो करामत करून दाखवितो त्यासच महापुरुष म्हणावें हें तत्त्व ठीक आहे. पण परिस्थितीची कोणती प्रतिकूलता किती प्रमाणांत बदलतां येते याला कांहीं सीमा आहे का नाहीं ? कारागीर कुशलतम असला तर तो कसल्याहि दगडाला सुंदर मूर्तीचा आकार देईल. तथापि तो कांहीं काळ्या फत्तराचा संगमरवरी दगड बनवूं शकणार नाहीं. त्याचप्रमाणें अवतारी पुरुष झाला तरी समाजाचा जन्मसिद्ध स्वभाव पालटूं शकत नाहीं; आणि म्हणूनच त्यानें तसा स्वभावपालट न केल्यामुळें यशसिद्धींत येणारा उणेपणा त्याच्या कीर्तीला बाधक मानला जाऊं नये.

### मराठ्यांची वतनलुब्धता

मराठ्यांची मनोभावना इतर राष्ट्रांतल्या लोकांपेक्षां वतनाला अधिक लुब्ध होणारी अशी आहे. वतनासाठीं 'एका जातीच्या दोन जाती केल्या' याची शरम न वाटतां प्रौढीच मिरविणाऱ्यांपुढें वतनदारी पद्धतीमुळें उत्पन्न होणाऱ्या दोषांचा पाढा वाचून काय उपयोग होणार ? त्यांना वतनदारीचें आमिष दाखविणेंच प्राप्त होतें.

यावर कदाचित् कोणी वावदूक अशी शंका घेतील कीं, ज्या मराठ्यांना शिवाजीमहाराजांनीं हातीं धरून स्वराज्याची उभारणी केली त्या मराठ्यांचें स्वभावज दोष शिवाजीमहाराजांच्या कर्तृत्वाच्या आड येऊं शकले नाहींत; मग बाजीरावाच्या कर्तृत्वाच्या कसोटीच्या वेळींच त्या दोषांची सबब पुढें कां केली जावी ? या आक्षेपकांच्या हें लक्षांत येत नाहीं कीं, शिवाजीच्या वेळची स्वराज्याची उभारणी करण्याची कामगिरी आणि बाजीरावाच्या वेळची साम्राज्याची उभारणी करण्याची कामगिरी यांत महदंतर आहे. स्वतःच्या प्राणावर आणि प्राणाहून प्रिय अशा धर्मावर घाला आला म्हणजे त्याचा प्रतिकार करण्यांत जी मर्दुमकी व चिकाटी मराठे दाखवितील तीच मर्दुमकी व चिकाटी हजारों मैलांवर चालून जाऊन तेथेंच राज्य काबीज करण्याच्या कामीं ते दाखविणार नाहींत. हा मराठ्यांचा निसर्गसिद्ध स्वभाव आहे. कासीमवीर आपणाबरोबर मूठभर अनुयायी घेऊन सिंध प्रांतावर

चालून आला. त्याचप्रमाणें स्पॅनिश वीरहि आपल्या अत्यल्प अनुयायांसह मेक्सिको, पेरू इत्यादि देशांवर चालून गेले. त्यांचें अनुकरण कोणींहि मराठा वीर मराठा शिपायांवर भिस्त ठेवून करूं शकेल काय? तात्पर्य हेंच कीं, शिवाजीच्या वेळचा मुख्य प्रश्न मातृभूमीच्या स्वतंत्रतेचा व संरक्षणाचा होता. राजारामाच्या वेळीं तर संकटाची जशी परमावधि झाली तशीच मराठ्यांच्या अद्भुत व निःस्वार्थी पराक्रमाचीहि परमावधि झाली. परंतु अवरंगजेबाचे डोळे मिटले आणि मातृभूमीवरील संकट टळलें, असें कळतांच मराठे वीरांच्या निःस्वार्थी पराक्रमालाहि ओहोटी लागली. याच्या पुढचा पराक्रम प्रतिकाराच्या स्वरूपाचा नसून पराक्रमणाच्या स्वरूपाचा आहे, स्वराज्यासाठीं नसून साम्राज्यासाठीं आहे, असें दिसूं लागतांच त्याच मराठ्यांचा निःस्वार्थीपणा जाऊन त्याच्या जागीं जन्मजात वतनलोलुपता डोकावूं लागली. एवढेंच कशाला, शिवाजीच्या प्रथमारंभींच्या उद्योगाच्या वेळीं ज्यांनीं आपल्या वतनाला तिलांजली देण्याची सिद्धता दर्शविली त्याच वीरांनीं शिवाजीला राज्याभिषेक होतांच आपणाला वंशपरंपरागत वतनें करून देण्याची मागणी केलीच कीं नाहीं? एतावता शिवाजीमहाराजांनीं परिस्थितीला बगलेंत मारून सह्याद्रीच्या पठारावर मावळ्यांकडून अद्भुत करामत करून दाखविली, म्हणून बाजीरावालाहि त्याच मावळ्यांकडून तितक्याच निःस्वार्थीपणानें दिल्लीच्या मैदानावर तशी कर्तबगारी करवून दाखवितां आली असती, असें मानणें हें मनुष्यस्वभावाचें अज्ञान प्रकट करण्यासारखें आहे. यास्तव बाजीरावाला शिवाजीच्या वेळची लष्करी पद्धति बदलावी लागली असल्यास तो बाजीरावाचा दोष नसून तो परिस्थितिप्राप्त आणि नैसर्गिक दोषाचाच परिणाम होय.

### शाहूकडून होणारा अडथळा

बदललेली परिस्थिति आणि मराठ्यांचा स्वभाव या नैसर्गिक अडचणींचा विचार येथवर झाला. आतां व्यक्तिविषयक अडचणींचा विचार करूं. यांत मुख्य अडचण शाहूमहाराजांची. शाहूमहाराज धनी आणि बाजीराव हा त्यांचा प्रधान म्हटला तरी तत्त्वतः नोकरच. तेव्हां कोणतीहि गोष्ट शाहूमहाराजांना पटवून देऊन त्यांची परवानगी घेतल्याखेरीज बाजीरावाला स्वतःच्या अखत्यारीनें करतां येत नसे. बाजीराव व चिमाजी शाहूची मर्जी संभाळून त्यांच्या तंत्रानें वागत असत; तरी अधूनमधून शाहूचा टोमणा असेच कीं, हे चढेल होऊन मला जुमानीनातसे झाले आहेत! असा बोल आपणांवर येऊं नये म्हणून अनेक वेळां बाजीरावाला आपले बेत बदलावे लागले, अथवा अर्धवट सोडून द्यावे लागले. "शाहू तरं त्याविषयीं नेहमीं साशंक असे. प्रतिनिधि वगैरे बाजीरावांचे प्रतिस्पर्धी बाजीरावाच्याविरुद्ध शाहूच्या मनांत शंका भरवीत. म्हणून एखादें प्रकरण मुखत्यारीनें तडीस लावण्यास शाहूकडून बाजीरावास पुष्कळच अडथळा होत असे." भारतवर्ष पत्रें यादी ले. ६३, ६५ यावरूनहि शाहूच्या साशंकतेची आणि बाजीरावाविरुद्ध त्याजकडे जात असलेल्या चहाड्यांची कल्पना येते.

हे उतारे मराठी रियासतींतलेच आहेत. तथापि त्यावरून बाजीरावाच्या मार्गां-तील अडचणींचा यथार्थ अंदाज बांधून इतकीं विघ्नें बाजूस सारून बाजीरावानें आपलें ध्येय कसें साधलें याचें कोडकौतुक करण्याऐवजीं रियासतकार लिहितात कीं, बाजीराव हा बांका लेखक नव्हता, त्याला शाहूच्या मनांतला किंतू काढून टाकतां आला नाहीं !

बाजीरावाचा पुत्र नानासाहेब पेशवा हा मोठा चतुरस्र लेखक होता. त्यानें सरदारांना लिहलेलीं मुत्सद्देगिरीचीं पत्रें उपलब्ध आहेत; तशीं बाजीरावाच्या हातचीं पत्रें आढळत नाहींत हें खरें. परंतु यांत बाजीरावाकडे दोष येतो, किंवा निदान यांत बाजीरावाचा उणेपणा व्यक्त होतो, असें आम्हांस वाटत नाहीं. बाजीराव हा स्वतः कर्तबगार पराक्रमी वीर होता. कोणत्याहि कामांत तो स्वतः पुढाकार घेत असे आणि आपल्या सरदारांना आपणाबरोबर येण्यास आज्ञा करीत असे. अशा परिस्थितींत त्याचीं पत्रें हुकूमवजाच असावयाचीं. त्यांत गौरवाची, मुत्सद्देगिरीची, आर्जवाची भाषा कशी असणार ? नानासाहेब पेशवे यांची परिस्थिति याच्याहून भिन्न होती. यांना बहुतेक सर्व कामें हाताखालच्या सरदारांकडून कर-वून घ्यावयाचीं असत. यास्तव त्या सरदारांना कामाचें महत्त्व पटवून देण्यासाठीं व त्यांना प्रोत्साहन देण्यासाठीं नानासाहेबाला ‘ पल्लेदार पत्रें ’ लिहावीं लागत व त्या कामांत संवयीमुळें त्याचा हातखंडा झाला होता.

## पल्लेदार तलवारीवर भिस्त

बाजीरावाची भिस्त ‘ पल्लेदार पत्रां ’पेक्षां स्वतःच्या ‘ पल्लेदार तलवारी ’वर अधिक असल्यानें ‘ आधीं केलें मग सांगितलें ’ असाच त्याचा खाक्या होता; तेव्हां तो असलीं पाल्हाळिक पत्रें लिहीत बसतो कशाला ? नमुन्यासाठीं म्हणून एकच उदाहरण घेऊं. नानासाहेब पेशव्यानें दौलताबादचा किल्ला घेण्यासाठीं गोपाळराव पटवर्धनाची रवानगी केली. मोर्चे बसवून वेढा घालून किल्ला घेण्यापूर्वी “ किल्ल्यासंबंधाचें राजकारण आलें आहे, तेव्हां किल्लेदार मागतो तितकी रक्कम देऊन किल्ला घ्यावा काय ” अशी पृच्छा गोपाळरावानें नानासाहेबांकडे केली. त्यावरून नानासाहेबानें गोपाळराव पटवर्धनास लिहिलेलें पत्र अत्यंत मांवाजण्याजोगें आहे. त्यांत शेवटीं नानासाहेब लिहितो, “ गोपाळराव, या पत्रानें तुम्हांला कदाचित् राग येईल; पण जेवढा राग येईल तेवढा सर्व राग दौलताबाद किल्ल्यावर काढा, मजवर काढूं नका. ” हें पत्र अत्यंत कळकळीनें, आपुलकीनें व गौरवानें परिपूर्ण असें आहे यांत शंकाच नाहीं. पण असें पत्र कोण कोणास लिहितो ? ज्याला हाताखालच्या सरदारांकडून आपलीं कामें करून घ्यावयाचीं आहेत तो धनी लिहितो. बाजीरावाचा सगळा जन्म स्वतः राबण्यांत गेला, धनीपणा गाजविण्याला त्याला फारशी संधीच मिळाली नाहीं; अर्थातच त्याच्या हातच्या अशा पत्रांच्या अभावीं तो मुत्सद्दी नव्हता असें म्हणणें फोल आहे. कारण यांत तलवारीपेक्षां लेखणीला अधिक महत्त्व दिलें जातें आणि कर्तृत्वापेक्षां वक्तृत्वाची किंमत अधिक मानली जाते.

जातां जातां, केवळ पत्रव्यवहारावरून एखाद्याची योग्यता ठरविण्यासंबंधांत कशी गफलत होऊं शकते याचें मासलेवाईक उदाहरण म्हणून एकच उल्लेख करतों. राघोबादादाच्या घरबुडवेपणाच्या स्वार्थी वृत्तीविषयीं तर कोणाचें दुमत असूं शकणार नाहींना ? पण त्याच्याच खाजगी पत्रांतला देशाभिमानाचा आणि आपसांत कलह करून तिसऱ्याचें घर न भरण्याविषयींच्या उपदेशाचा एक उतारा राजवाडे यांनीं आपल्या एका खंडाच्या प्रारंभीं मुखपृष्ठावर दिला आहे. त्यांत राघोबा म्हणतो, '**आपल्यांत दुही पडते तेव्हां शत्रूस बळ फावतें !** ' एवढाच एक उतारा वाचला आणि राघोबाची इतर कृति लक्षांत न घेतली, तर राघोबा हा मोठाच मुत्सद्दी व एकीचा भोक्ता ठरेल !

असो. सांगण्याचा मुख्य मुद्दा बराच दुरावला म्हणून पुनश्च त्याची संगति लावण्याकरितां नमूद करतों कीं, बाजीरावाला शाहूच्या तंत्राप्रमाणें वागावें लागत असे, आणि शाहूच्या मनांत त्याचे प्रतिस्पर्धी भलत्या शंका भरवीत. त्यामुळें शंकांचें निरसन करण्याकरितां बाजीरावाला आपल्या कालाचा अपव्यय करावा लागल्यानें अथवा कार्याची दिशा अनेक वेळां बदलावी लागल्यानें, त्याच्या हातून एरवीं जितकी करामत झाली असती, तिच्यापेक्षां बरीच कमी करामत झालेली दृष्टोत्पत्तीस आली. यास्तव बाजीरावाची कर्तबगारी पारखतांना त्याच्या मार्गांतले हे अडथळे लक्षांत घेतले पाहिजेत.

### दिल्लीच्या तख्ताविषयीं शाहूचा आदर

शाहूचा धनीपणा कोणकोणत्या प्रकारानें नडत होता याची छाननी करूं लागल्यास त्यांत पुढील प्रकार प्रामुख्यानें दिसून येतात. दिल्लीच्या तख्ताविषयीं निष्ठा शाहूच्या मनांत अखेरपर्यंत अढळ होती. यामुळें पातशाहीला धक्का न लावतां उत्तर हिंदुस्थान जिंकावयाला बाजीरावाला परवानगी मिळाली होती. यांतली विसंगति शाहूच्या लक्षांत येतच नसे, त्याला कोण काय करणार ! शाहूची ही आज्ञा तत्त्वत: शिरसावंद्य मानून बाजीरावानें पातशाहीचें उच्चाटन केलें नाहीं; तथापि ती पातशाही इतकी खिळखिळी करून सोडली कीं, ती यापुढें टिकणें अशक्य होऊन गेलें; तरी पण शाहूचा भ्रम कायमच होता. बाजीरावाच्या मृत्यूनंतर नानासाहेबांस पेशवाईचीं वस्त्रें देतांना शाहूनें त्यास सांगितलेंच कीं, '**पातशाही रक्षून सर्व हिंदुस्थान आपलें करावें.** '

पातशाहीचें रक्षण आणि सर्व हिंदुस्थान आपलेसें करणें यांतील विसंगति शाहूच्या ध्यानीं आणून देण्याची उरस्फोड करण्यांत अर्थ नाहीं, हें ओळखून बाजीरावास दुटप्पी धोरण ठेवावें लागलें आणि उत्तर हिंदुस्तानांतल्या सर्व स्वाऱ्या पातशाहीच्या रक्षणाकरितांच आहेत असें भासवावें लागलें. त्यामुळें तहनाम्याची भाषाहि विशिष्ट साच्यांत बसवावी लागे आणि तीच भाषा नवीन स्वारीच्या वेळीं नडे; अशी कुचंबणा शाहूच्या कारकीर्दीच्या अखेरपर्यंत चालू होती. पण मौज ही कीं,

1004

शाहूच्या समजुतीसाठीं अंगीकारलेली ही दुटप्पी भाषा इतकी पक्की बद्धमूल झाली कीं, पुढें महादजी शिंद्यानें दिल्ली आक्रमिली तरी ती पातशाहीच्या रक्षणासाठींच! आणि त्यानंतर ईस्ट इंडिया कंपनीनें दिल्ली घेऊन सर्व कारभार हस्तगत केला, तरी १८५७ च्या क्रान्तीपर्यंत, तो कारभार बादशहाचा म्हणूनच कंपनीकडून चालविला जात असे. असो; कालांतरानें या दुटप्पी भाषेंतला फोलपणा चवाठ्यावर आला असला, तरी बाजीरावाला तो पदोपदीं नडत असे यांत शंका नाहीं.

## कोल्हापूरच्या संभाजीविषयींची आपुलकी

शाहूचा कोल्हापूरच्या संभाजीवियषींचा आपलेपणा बाजीरावास बराच भोंवला. एका दृष्टीनें परकी शत्रु पत्करला, पण असले आत्महितविरोधी भाऊबंद नकोत असें म्हणण्याची पाळी येई. संभाजी निजामाशीं मिलाफ होऊन मराठेशाहीविरुद्ध कारस्थानें करी; तरी पण संभाजीचा यत्किंचितहि अपमान केलेला शाहूला खपत नसे. इतर सरदारांची तर गोष्ट राहूं द्याच. पण प्रत्यक्ष चिमाजी-अप्पासारख्या स्वामिनिष्ठ सरदारसहि शाहूकडून या बाबतींत तंबी मिळे, इतकें हें संभाजीचें प्रकरण डोईजड होऊन बसलें होतें. पुढें स्वतः शाहूलाच जेव्हां चटका बसूं लागला, त्या वेळीं स्वतः शाहूनेंच प्रमुख सरदारांसह संभाजीविरुद्ध मोहीम सुरू केली आणि तींत संभाजीचा पुरता मोड करून त्यास तह करण्याला भाग पाडलें.

## नवीन अडचण उत्पन्न झाली

या तहाला '**वारणेचा तह**' म्हणतात. या तहानें शाहूचा पक्ष व ताराबाईचा पक्ष यांमधील वाद मिटला असला, तरी दुसऱ्याच एका वादाचें बीज पेरलें गेलें. कृष्णा-वारणा संगमापासून तो दक्षिणेस कृष्णा-तुंगभद्रा संगमापर्यंतच सर्व मुलूख संभाजीस मिळाला. त्यामुळें शाहूच्या राज्यास आणि पेशव्यांच्या पराक्रमास व महत्त्वाकांक्षेस कायमचा पायबंद बसला. आधींच शाहूच्या स्वराज्याची मर्यादा संकुचित होती. त्या संकुचित सीमेंतली अर्धी जहागीर कोल्हापूरला गेली. स्वराज्याच्या सोळा विभागांतून कऱ्हाड, खटाव, माण, मलकापूर, पन्हाळा, तारळा, आजरें, कोल्हापूर इतके प्रांत गेले हें तर नुकसान झालेंच; पण त्यामुळें दक्षिण दिग्विजयाचा रस्ताच अडला हें खरें मोठें नुकसान होय. संभाजी हाहि पेशव्यांसारखाच महत्त्वाकांक्षी असता, तर उभयतांनीं मिळून दक्षिण दिग्विजय केला असता. पण संभाजीच्या स्वप्नांतहि ती गोष्ट येईना. तेव्हां एकटे पेशवे काय करणार! तुंगभद्रेपासून रामेश्वरापर्यंतचा मुलूख जिंकण्याला मोकळा होता. तथापि रणभूमीचा मूळ पायाशीं संबंध तुटला कीं सैन्याचा धीरच सुटला म्हणून समजावें. अशा अडचणीच्या प्रसंगीं देखील ज्यांची छाती डगमगत नसे, अशा पेशव्यांनीं तुंगभद्रेच्या दक्षिणेकडील मुलुखावर स्वारी करून पाहिली. या कामीं संभाजीचें सैन्य मदतीला येण्याची गोष्ट दूरच राहिली. मात्र पेशव्यांनीं धाडस करून दक्षिण देश जिंकला असता तर त्याची वांटणी मागण्याची कोल्हापूरकरांची तयारी होती!

अशा परिस्थितींत दक्षिणेकडील मोहीम युद्धशास्त्रदृष्ट्या व अर्थशास्त्रदृष्ट्याहि अडचणीची होऊन बसली. त्यांतल्या त्यांत एवढें तरी बरें झालें कीं, वारणेच्या दक्षिणेचा सगळाच मुलूख संभाजीला न देतां मिरज प्रांत, विजापूर प्रांतींचीं कांहीं ठाणीं (अथणी, तासगांव वगैरे) शाहूनें आपल्या हातीं ठेवून घेतलीं. तेवढाहि अपवाद नमूद केला नसता, तर शाहूच्यातर्फे बाजीरावाला दक्षिणेकडे पाहावयाला नको अशी स्थिति होऊन गेली असती.

### चौथाई-सरदेशमुखीच्या सनदांची अडचण

वारणेचा तह जसा एकप्रकारें दक्षिण दिग्विजयाच्या आड आला, त्याप्रमाणेंच दिल्लीच्या बादशहाकडून मिळालेल्या स्वराज्य, चौथाई व सरदेशमुखी यांच्या सनदाहि पर्यायानें दक्षिण जिंकण्याला प्रतिबंधकच झाल्या. या सनदेनें दक्षिणेंतील सहा सुभ्यांतून चौथाई व सरदेशमुखी वसूल करण्याचा हक्क मराठ्यांना मिळाला. याचाच अर्थ असा कीं, त्या मुलुखावरची बादशहाची मालकी मराठ्यांनीं मान्य केली. हे दक्षिणेचे सहा सुभे म्हणजे खानदेश, वऱ्हाड, बेदर, हैद्राबाद, विजापूर व औरंगाबाद हे होत. या सहा सुभ्यांतून मराठ्यांनीं चौथाई व सरदेशमुखी वसूल करावी आणि त्याच्या मोबदला मोंगल पातशहास त्या मुलुखाचा बंदोबस्त राखण्यास मदतहि करावी. पातशहाच्या साहाय्याकरितां मराठ्यांनीं १५ ते २० हजार सैन्य बाळगावें असेंहि ठरलें होतें. वेलस्ली साहेबानें पुढें जी सरंजामी फौजेची पद्धति सुरू केली तिचेंच हें पूर्वरूप मानण्यास हरकत नाहीं. या पद्धतीमुळें दिल्लीच्या कारभारांत उलाढाली करण्याला मराठ्यांना सवड मिळाली खरी, पण त्याबरोबरच ती सत्ता निर्मूळ न करतां ती राखूनच तिच्या नांवावर कारभार करण्याची जबाबदारीहि मराठ्यांवर पडली. निजामाशीं मराठ्यांचे जे युद्धप्रसंग झाले, ते निजाम चौथाई व सरदेशमुखी वसूल करूं देईना म्हणून उद्भवले. पराजय होतांच त्यानें नुकसानभरपाई करण्याचें व बिनहरकत चौथाई वसूल करूं देण्याचें कबूल करतांच युद्धाचें कारण संपत असे. निजामाचा अनेक वेळां पराभव होऊन देखील निजामाची सत्ता निर्मूळ न होतां तो टिकून राहिला, याच्यांतलें बीज हेंच होतें कीं, दक्षिणचे सहा सुभे हें मराठ्यांचें स्वराज्य नसून चौथाई, सरदेशमुखी हक्क उकळण्याचा तो मुलूख होता. तो मुलूख जिंकून स्वराज्यांत सामील करण्यास कायदेशीर अडचण होती. मात्र हा कायदेशीरपणा दोन्ही बाजूंकडून कितपत पाळला जात होता हा प्रश्न स्वतंत्र आहे. तथापि तो मुलूख धड स्वराज्यहि नव्हे व धड परराज्यहि नव्हे अशा अर्धवट स्थितींत होता हीच मुख्य अडचण होती; आणि शाहू हयात असेपर्यंत तरी ही अडचण दूर होण्याजोगी नव्हती.

### स्वतः सुभेदार होऊन मग स्वतंत्र व्हावें

या अडचणींतून पार पडावयाचें म्हटल्यास एकच मार्ग होता. निजामास त्या

प्रांताचें संरक्षण करण्याला नालायक ठरवावयाचें आणि दक्षिणेची सुभेदारीच बादशहाकडून मराठ्यांच्या नांवानें घ्यावयाची आणि नंतर जसे बंगालचे, अयोध्येचे अथवा दक्षिणेचे सुभेदार स्वतंत्र झाले तशी स्वतंत्रतेची घोषणा करून पातशाहीपासून पूर्णपणें वेगळें व्हावयाचें. इतकें घडून यावयाला बाजीरावाचें आयुष्य अपुरें पडलें. तो जर आणखी दहावीस वर्षें जगला असता तर हा चमत्कारहि त्यास करून दाखवितां आला असता. दिल्ली पाहिल्यापासून बाजीरावाला ती राजधानी जिंकून घेण्याचा हव्यासच लागला होता. पण ती गोष्ट शाहूच्या हयातींत होणें शक्य नव्हतें. यास्तव शाहूची मर्जी, शाहूचें पातशहाशीं गुंतलेलें वचन, आणि स्वराज्य व चौथाई-सरदेशमुखी यांच्या सनदेनें घातलेली कायदेशीर मर्यादा, या सर्व गोष्टी संभाळून जितका साम्राज्यविस्तार करतां येणें शक्य होतें तितका बाजीरावानें केला. याकरितां त्यास जेवढे धन्यवाद द्यावे तेवढे थोडेच आहेत.

### प्रतिस्पर्धी आणि फितुरी सरदार

मराठ्यांतलेच प्रतिस्पर्धी अथवा फितुरी सरदारहि बाजीरावाच्या यशाच्या मार्गांतील आणखी एक धोंड होती. चंद्रसेन जाधव, रावरंभा यांसारखे मोठे घरंदाज व वजनदार सरदार प्रारंभापासूनच निजामाकडे जाऊन मिळालेले होते. त्यांतच शेवटीं त्रिंबकराव दाभाडे यांची मोठी व सर्व बाजूंनीं नडणारी भर पडली. याखेरीज कोल्हापूरकरांच्या पठडींतले उदाजी चव्हाणासारखे उपद्व्यापी, प्रतिनिधी, रघूजी भोसले, इत्यादि शाहूच्या पक्षांतील डोईजड सरदार, यांचा चढेलपणा किंवा कार्यविरोध हाहि बाजीरावास बराच नडला. आपल्यांतलेच कांहीं सरदार शत्रुपक्षाकडे गेले असल्यामुळें त्यांच्याविरुद्ध मोहीम चालविणें मोठें जिवावरचें काम झालें होतें.

त्रिंबकराव दाभाडे यानें मोंगलाशीं मिलाफ करून निजामाच्या चिथावणीवरून बाजीरावाशीं वैरभाव धरला. पण लढाईला उभें राहण्यापूर्वी सबब काय सांगितली? तर मराठ्यांचें राज्य बाजीरावानें बळकावलें आहे, तें मराठ्यांचा राजा संभाजी यांच्या स्वाधीन करण्याकरितां ही लढाई आहे! ज्यांना राजकीय घडामोडींतलीं सर्व कारस्थानें व आंतलीं बिंगें माहीत नसतात ते असल्या थापांनीं फसतात; म्हणूनच दाभाड्याकडे एवढें सैन्य बाजीरावांविरुद्ध, जमूं शकलें. तरी पण धन्य त्या बाजीरावाच्या कर्तृत्वाची आणि धडाडीची. तो असल्या फितुऱ्यांना प्रायश्चित्त देण्याला कचरला नाहीं. अखेरीस त्याची बाजू न्यायाची आहे अशी मराठ्यांची खात्री पटल्यामुळें त्याचे शिपाई एकनिष्ठपणानें लढले व त्यांच्या बळावर बाजीरावानें फितुरी लोकांचा नायनाट केला.

### एकनिष्ठ पाठीराखे व सहकारी

निजामासारखा उघड शत्रु पुरवला, त्रिंबकराव दाभाड्यासारखा उघड प्रतिपक्षी पुरवला, पण शाहूच्या दरबारांतच राहून अस्तनींतल्या निखाऱ्याप्रमाणें

चटका देणारे प्रतिस्पर्धी बाजीरावाला अधिक भोंवले व त्यांच्यामुळेंहि कार्यहानि पुष्कळच झाली. बाजीरावाच्या यशःसिद्धींत उणेपणा येण्याला असल्या प्रतिपक्षी-यांचा विरोध हें एक कारण असल्यानें बाजीरावाची योग्यता मापतांना या विरोधांतून पार पडून बाजीरावानें एवढी कामगिरी केली, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. त्याबरोबरच त्याच्या एकनिष्ठ सहायकांच्या सहकार्याचें श्रेयहि त्या सहायकांना देणें न्याय्य होईल. चिमाजीअप्पा हा बाजीरावास खरा पाठीराखा मिळाला होता हें त्याचें सुदैवच होय. बाजीरावाची एवढी कीर्ति होण्याला चिमाजीअप्पाचे पराक्रम पुष्कळ अंशीं कारणीभूत झाले आहेत हें दृष्टी-आड करून चालणार नाहीं. चिमाजीअप्पाच्या खालोखाल यशाचे वांटेकरी म्हणजे पिलाजी जाधव, राणोजी शिंदे आणि मल्हारराव होळकर हे होत. या शूर, भीम-पराक्रमी व एकनिष्ठ सरदारांनीं गुजराथ व माळवा प्रांत काबीज करण्यांत आणि इतर कित्येक मोहिमा चालविण्यांत पुढाकार घेतला होता. दरबारच्या कामांत पुरंदरे हे बाजीरावाचे निष्ठावंत साहाय्यकर्ते होते. बाजी भिवराव, चिमाजी, राणोजी, मल्हारजी व पिलाजी असें हें सरदार-पंचायतन त्या वेळीं होतें. यांतले सर्वच पुरुष पराक्रमी असले तरी बाजीराव हा त्या सर्वांत मेरुमणि शोभण्यासारखा होता. हाताखालच्या सेनापतींनीं लढाया माराव्या आणि वरिष्ठांनीं घरबसल्या त्याचें श्रेय घ्यावें, असा आयत्या पिठावर रेघोट्या ओढण्याचा प्रकार बाजीरावाच्या स्वप्नींहि नव्हता. प्रत्येक धोक्याच्या कामांत बाजीराव स्वतः पुढें असे आणि लढाईच्या वेळीं तर स्वतः आघाडीवर राहून लढाईत प्रमुखत्वानें भाग घेत असे. राज्यकारभाराचें धोरण आणि युद्ध उपस्थित झाल्यास त्या युद्धाचें धोरण स्वतः बाजीरावच ठरवीत असे आणि जेथें बाजीराव जातीनें हजर असे तेथील रणभूमीवरील सर्व हालचाली बाजीरावाच्याच हुकुमानें होत असत. अर्था-तच या कामीं बाजीराव पूर्ण स्वावलंबी असल्यानें जितक्या लढाया बाजीरावानें स्वतः जिंकल्या तितक्या लढायांतील रणकौशल्याचें श्रेय त्यालाच दिलें पाहिजे. आणि अशा लढायांची संख्याच इतकी मोठी आहे कीं, चिमाजीअप्पा, शिंदे, होळकर, जाधव प्रभृति सरदारांनीं स्वतंत्रपणें मिळविलेले विजय विचारांत न घेतले, तरी बाजीरावाच्या रणपांडित्याच्या यशस्वितेचें माप इतर कोणत्याहि जग-प्रसिद्ध योद्ध्याच्या यशापेक्षां कमी भरणार नाहीं.

### कर्जाची जबाबदारी एकट्या बाजीरावावरच कां ?

बाजीरावाला जन्मभर जर कोणत्या एका अडचणीनें पूर्णपणें सतावून सोडलें असेल तर द्रव्याचा तुटवडा हीच ती अडचण होय. हल्लीच्याप्रमाणें त्या वेळीं राष्ट्रीय कर्जाची आणि संयुक्त जबाबदारीची कल्पना नसल्यामुळें सैन्याच्या उभारणीकरितां प्रारंभीं द्यावयाच्या नालबंदीपासून तो युद्धाच्या अखेरीस नुकसान-भरपाई आणि बाळपरवेशीपर्यंतच्या सर्व खर्चाची जोखीम त्या त्या सरदारावरच

पडत असे. शाहू जर राज्याचा धनी आणि त्याच्या हुकुमाची बजावणी करण्यापुरतीच जबाबदारी जर बाजीरावाकडे होती, तर त्या मोहिमेच्या खर्चाची जोखीम तरी व्यक्तिशः बाजीरावावर कां पडावी ? परंतु या संबंधानें त्या वेळीं कोणतेंहि राष्ट्रीय धोरण ठरलेलें नसल्यामुळें मोहीम चालविण्यांत जो पुढाकार घेई त्याच्यावरच खर्चाचा बोजा लादला जाई. हा बोजा विभागला जावा म्हणून सरंजामी पद्धति अमलांत आली; आणि प्रत्येक सरदारानें अमुक इतकें सैन्य बाळगून सरकार-चाकरी करावी असें ठरविण्यांत आलें. पण अशा सरंजामदारांचें सैन्य कधीं भरपूर नसावयाचें आणि तें कधीं वेळेवर येऊन दाखल व्हावयाचें नाहीं आणि सैन्य आलेंच तरी 'खोगीरभरती'-च्याच स्वरूपाचें असावयाचें. असल्या भाडोत्री सैन्यावर विसंबून लढाईस उभें राहावें तर यश गमावून वरती प्राणावर संकट यावयाचें. याकरितां स्वतःच्या खात्रीची आणि जिवास जीव देणारी अशी फौज बाजीरावास बाळगावी लागे आणि त्या फौजेच्या पायींच कर्जाचा डोंगर वाढत जाई. शिंदे, होळकर, पवार, गायकवाड इत्यादिकांना सैन्याच्या खर्चासाठीं म्हणून मुलूख तोडून दिलेला असून शिवाय नवीन मुलूख जिंकला कीं, त्यांतहि त्यांचा वांटा असे. त्यामुळें अखेरीस बाजीराव हा कोरड्या यशाचा धनी आणि कर्जाला मात्र जबाबदार अशी स्थिति होई आणि फितुरी सरदार मात्र कोट्याधीश बनत. या परिस्थितीला कंटाळूनच उद्वेगाच्या भरांत बाजीरावानें लिहिलें कीं, " आज दाभाडे, गायकवाड, बांडे कोटि कोटि रुपये खजिने ( बाळगून आहेत ) आणि आम्ही धन्याचे पायाशीं निष्ठेनें वर्ततो ते अन्नास महाग झालों. "

## पराक्रमाच्या शिखरावर स्वार्थत्यागाचा कळस

बाजीरावाची ही केविलवाणी स्थिति पाहून त्याच्याविषयीं सहानुभूति वाटते आणि इतक्या संकटांनाहि न जुमानतां त्यानें अखेरपर्यंत मुलूखगिरीची शर्थ केली याविषयीं कौतुक वाटतें. राज्याची घडी जोंपर्यंत नीट बसली नाहीं तोंपर्यंत असे प्रकार घडणारच; त्यांत जे केवळ स्वार्थनिष्ठ असतात ते राष्ट्रकार्याचाहि उपयोग स्वतःची तुंबडी भरण्याकडे करतात आणि जे खरे राष्ट्रभक्त व कर्तव्यनिष्ठ असतात त्यांच्या संसारसचा उन्हाळा होतो. असें प्रकार त्याच वेळीं घडले असें नसून आजच्या परिस्थितींतहि, अल्प प्रमाणांत कां होईना, पण असले मासले आढळतातच. राष्ट्रभक्तीच्या नांवानें कोणी लक्षाधीश बनले आहेत तर इतर कित्येकांना दुपारचीहि भ्रान्त पडण्यासारखी स्थिति आली आहे. प्रश्न एवढाच कीं, अशा वर्गांपैकीं स्तुतीला पात्र कोण व दोषाला पात्र कोण ? अर्थातच जर कोणी इतिहासकार गब्बर बनलेल्या दिखाऊ देशभक्ताच्या दूरदृष्टीची तारीफ करून सच्च्या व स्वार्थत्यागी देशभक्तास, तुला अर्थशास्त्र व मुत्सद्देगिरी कळत नाहीं, असें म्हणून हिणवूं लागला तर त्याला आपण

काय म्हणूं ! सारांश, बाजीरावानें स्वामीकार्यार्थ आपल्या जिवाचें रान केलें आणि इतकीं अपरिमित संकटें कोसळलीं, तरी 'प्रारब्धमुत्तमजना न परित्यजन्ति' या न्यायानें राष्ट्रकार्य टाकून दिलें नाहीं, यामुळें त्याच्या पराक्रमाच्या शिखरावर स्वार्थत्यागाचा कळस चढला असेंच मानणें युक्त होय. अर्थातच बाजीराव सदा कर्जांत बुडालेला असे, ही गोष्ट त्याच्या मुत्सद्दीपणास कमीपणा आणणारी नसून तत्कालीन परिस्थितीचें व बाजीरावाच्या निःस्वार्थी स्वराज्यप्रेमाचें तें एक दृश्य-चिन्ह आहे असेंच मानलें पाहिजे. कर्जाला भिऊन जर बाजीरावानें मोहीम बंद केली असती तर त्याच्याकडे थोडा तरी दोष आला असता. तसें जोंपर्यंत झालें नाहीं, तोंपर्यंत बाजीराव दोषी ठरत नांहीं. शिवाय बाजीरावाचें कर्ज तरी असें कितीसें होतें ! सारें चौदा लक्ष रुपये. थोरल्या माधवरावाची कारकीर्द इतकी यशस्वी झाली तरी देखील त्यालाहि शेवटीं कर्ज होतेंच; आणि तुंगभद्रेपासून यमुने-पर्यंत राज्यविस्तार करणाऱ्यानें एवढें कर्ज डोईजड कां मानावें ! पांच-दहा वर्षें शांततेचीं गेलीं कीं, सर्व कर्ज फिटून खजिना भरून जाणें शक्य होतें, व तसें पुढें अनुभवलाहि आलें. असो. कर्ज करून लढाया चालविणारा पहिला बाजीराव हा जर तेवढ्यावरूनच मुत्सद्दी नव्हे असें ठरेल, तर लढाया न करतां खजिना भरणारा दुसरा बाजीरावच खरा मुत्सद्दी ठरेल !

### उत्तरेकडील राजेरजवाड्यांची पातशहाविषयींची निष्ठा

दक्षिणेंतील जुने मराठेशाही सरदार स्वार्थनिष्ठेमुळें साम्राज्यविस्ताराच्या कार्यास कांहीसे निरुपयोगी ठरले, तर उत्तरेकडील राजेरजवाडे दिल्लीच्या तक्ताविषयींच्या भावनेमुळें विरोधक ठरले. अवरंगजेबाच्या जुलुमामुळें रजपूत राजांची मनोभावना पूर्वीच्यासारखी राहिली नव्हती, तरी देखील मोंगलांच्या सत्तेचें उच्चाटन करण्याची कल्पना अद्यापि त्यांस पटण्यासारखी नव्हती. त्यामुळेंहि बाजीरावाला आपल्या ध्येयाला मर्यादा घालावी लागली. शाहूची निष्ठा आड येत असली तरी ती अकिंचित्कर असल्यानें फारशी बाधक होऊं शकली नसती; पण उत्तर हिंदु-स्थानांतील अखिल हिंदूंची संघटना करून हिंदवी स्वराज्याचा झेंडा दिल्लीवर लावावा म्हटल्यास त्याला हिंदूंकडूनच विरोध होण्यासारखी अद्यापि परिस्थिति होती. त्यामुळें बाजीरावास आपले बेत परिस्थिति पाहूनच ठरवावे लागत. याकरितांच काशी, प्रयाग इत्यादि तीर्थक्षेत्रें सोडवावीं असें विचार व्यक्त करण्या-इतपत बाजीरावाची सत्ता वृद्धिंगत झाली असली, तरी त्या विचारांची बजावणी प्रतिकूल परिस्थितीमुळें लांबणीवर टाकणें भाग पडलें, याबद्दल बाजीरावास दोष देतां येत नाहीं.

### निजामासारखा अत्यंत प्रबळ प्रतिस्पर्धी

बाजीरावाचा प्रतिस्पर्धी निजाम-उल्मुल्क होता ही बाबहि बाजीरावाची योग्यता ठरवितांना विसरतां कामा नये. प्रतिस्पर्धी जेवढा प्रबळ तेवढा यशाचा

गौरवहि थोर हें तर खरेंच, पण त्याबरोबरच यश प्राप्त होणेंच दुष्कर हेंहि खरें. अर्थातच निजामासारखा कसलेला वीर व मुत्सद्दी चारीमुंड्या चीत मारतां आला नाहीं म्हणून बाजीरावाच्या कीर्तीला कमीपणा येत नाहीं. निजामाला सर्व प्रकारची अनुकूलता होती; आणि त्यांच्या उलट बाजीरावाला सर्व प्रकारची प्रतिकूलता होती. दिल्लीचा बादशहा प्रारंभीं निजामाच्या विरुद्धच होता. पण अखेरीस त्याला आपली चूक कळून आली आणि निजामाशिवाय ' सत ना गत ' अशी त्याची स्थिति झाल्यानें पातशाहीचें सगळें बळ निजामाच्या पाठीशीं उभें राहिलें. त्यामुळें निजामाला खजिना, लष्कर, पातशाही सत्ता इत्यादि सर्वच सोयींचा लाभ मिळाला. बाजीरावाची याच्या सर्वतोपरी उलट स्थिति होती. कित्येक मराठे सरदारच फितुर होऊन निजामाकडे वारंवार जात असल्यामुळें बाजीरावाचे प्रयत्न कुंठित होत. शिवाजीच्या किंवा राजारामाच्या वेळची स्वराज्यासाठीं स्वार्थत्याग करण्याची ईर्षा व अहमहमिका या वेळीं सरदारांत राहिली नव्हती. एवढेंच नव्हे तर केवळ साधी कर्तव्यनिष्ठा व प्रामाणिक बुद्धीहि फारशी दृग्गोचर होत नव्हती. शाहूनें किंवा पंतप्रधानांनीं सरदारांस स्वारीवर येण्याकरितां हुकूम केला आणि तो सरदार आपला सगळा सरंजाम घेऊन वेळेवर हजर झाला असें क्वचितच घडून येई. ज्यांच्याकडे मुलुखाच्या वसुलाचा कांहीं हिस्सा लावून दिला असे, ते सरदार आपला हिस्सा तेवढा काढून घेऊन बाकीचा पेशव्यांचा वसूल त्यांच्याकडे बिनतक्रार पोंचतां करतील, असेंहि क्वचितच घडे.

अशा प्रकारची राज्यव्यवस्थेची नीट घडी बसवावयाला अनुभव यावा लागतो व त्याला वेळ लागतो. नाना फडणविसाच्या वेळीं ही सगळी हिशेबाची घडी बसत चालली; परंतु बाजीरावाच्या वेळीं मुळांत **' ग्रामो नास्ति कुतः सीमा '** अशी अनिश्चित स्थिति असल्यामुळें बाजीरावानें नाना फडणविसी पद्धतीचा हिशेबी कारभार चालू केला नाहीं असा दोष देण्यांत अर्थ काय? जेथें दर वर्षाला नवी स्वारी निघून नवा मुलूख स्वराज्यांत सामील होत होता आणि जेथें दर वर्षी चौथाई व सरदेशमुखी यांच्या वसुलीविषयीं नवी नवी तक्रार निर्माण होऊन तलवारीच्या जोरावरच वसुली अवलंबून होती, तेथें जमाखर्चाचें अंदाजपत्रक अगाऊ तयार करून पद्धतशीर कारभार कसा चालू होणार?

**आक्रमण हाच आत्मसंरक्षणाचा मार्ग**

टीकाकारांच्या मतें बाजीरावानें नवा मुलूख काबीज करण्याची हाव सोडून देऊन जेवढा मुलूख ताब्यांत होता तेवढ्याच्या कारभाराची नीट कांटेकोर व्यवस्था लावावयाची होती आणि ती घडी नीट बसल्यावर मगच पुढच्या प्रदेशांत पाऊल टाकावयाचें होतें! ही सूचना करणाऱ्यांना त्या वेळच्या मराठेशाहीच्या परिस्थितीची यथार्थ कल्पना आलेली नाहीं असें म्हणावें लागतें. पहिलें जेवण पचल्याशिवाय दुसरें जेवण जेवूं नये हा आरोग्यशास्त्राचा नियम ठीक आहे; परंतु तो

बाजीरावाच्या वेळच्या राजनीतीला लागू पडत नसून त्याच्या उलट नियमच लागू होत होता. म्हणजे पहिला जिंकलेला मुलूख पचवावयाचा असेल तर त्याच्या पुढच्या मुलुखावर स्वारी केली पाहिजे, अशीच त्या वेळची परिस्थिति होती. शिकंदर जसा मॅसिडोनियांतून निघाला आणि जग जिंकीत सुटला, तसा कांहीं बाजीराव पुण्याहून निघाला आणि दिल्लीपर्यंत मुलूख जिंकीत चालला असा प्रकार झाला नाहीं. बाजीरावाची कोणतीहि स्वारी त्यानें आपण होऊन आगळीक करून सुरू केली नाहीं आणि अगदीं अपरिहार्य ठरल्याशिवाय तो कोणत्याहि स्वारीवर जाण्यासाठीं घोड्यावर स्वार झाला नाहीं. त्याच्या सगळ्या स्वाऱ्या स्वराज्याच्या आणि चौथाई-सरदेशमुखीच्या हक्काच्या संरक्षणार्थ होत्या. मात्र "आत्मसंरक्षण करावयाचा उत्तम मार्ग म्हणजे पराक्रमण होय," या तत्त्वाला धरून सर्व मोहिमा कराव्या लागल्या. 'Offensive is the best means of Defence' हेंच तत्त्व बाजीरावानें अंमलांत आणलें आणि तेंच यथायोग्य होतें. बाजीराव जर माळव्यांत घुसून मुसलमानांशीं लढला नसता, तर त्याला महाराष्ट्रांतच मुसलमानांशीं लढावें लागलें असतें. तो जर दिल्लीवर चाल करून गेला नसता, तर पुण्यावर चालून आलेल्या दिल्लीकरांशीं मुळामुठेच्या संगमावरच त्याला लढावें लागलें असतें.

### दिल्लीची किल्ली हातांत घेतली

बाळाजी विश्वनाथानें दिल्लीहून स्वराज्य आणि चौथाई व सरदेशमुखी यांच्या सनदा आणल्या, त्या वेळेपासूनच उत्तरेकडील राजकारणाचें बीज रोवलें गेलें. या सनदा टाकून दिल्या असत्या तरच उत्तरेकडचा संबंध तुटूं शकला असता. या सनदेंत दक्षिणच्या सहा सुभ्यांतून चौथाई वसूल करण्याचा हक्क नमूद होता. त्यामुळें दक्षिणच्या सहा सुभ्यांवर दिल्लीहून सरसुभेदार कोण येतो त्यावर नजर ठेवणें पेशव्यांना प्राप्त होतें. सुभेदारानें चौथाईचा वसूल बिनबोभाट करूं दिला, तर दिल्लीपर्यंत गाऱ्हाणें जाण्याचें कारण नव्हतें; परंतु सुभेदार जर वसुलीला हरकत करूं लागला तर प्रथम दिल्लीला पातशहाकडे गाऱ्हाणें नेऊन त्याच्या दखलगिरीनेंच दक्षिणच्या सुभ्याविरुद्ध मोहीम सुरू करणें न्याय्य होतें. पहिला सुभेदार मुबारीजखान हा चौथाईला हरकत करूं लागला म्हणून त्याजविरुद्ध मराठ्यांना शस्त्र उपसावें लागलें. परंतु याच सुभेदारीवर निजाम आल्यास तो तर मराठ्यांशीं उघड शत्रुत्व करील म्हणून निजामाविरुद्ध मुबारीजखानाला साहाय्य करणें क्रमप्राप्त झालें. शिवाय तसें साहाय्य करण्याविषयीं बादशहाचें फर्मानहि आलें. यामुळें कसा पेंचप्रसंग उद्भवला पाहा. मुबारीजखान आणि निजाम हे दोघेहि मराठ्यांना सारखेच पाण्यांत पाहणारे असले, तरी बादशहाच्या मुर्वतीस्तव त्यांना मुबारीजखानाला मदत करणें आवश्यक झालें; परंतु ही मदत दिखाऊच असल्यामुळें निजामाचा मोड करण्याची पहिली संधि फुकट गेली. त्यामुळें निजाम गुजराथेंत व माळव्यांत प्रबळ होऊं लागला. त्यास तसेंच मोकळें सोडावें तर गुजराथ व माळवा येथील सुभेदार

हे एक होऊन मथल्यामधें मराठ्यांची दामटी वळली जावयाची. याकरितां निजामाला गुजराथेंत व माळव्यांत हातपाय पसरूं देऊं नयेत म्हणून मराठ्यांना आधीं गुजराथ व माळवा या प्रांताकडे लक्ष द्यावें लागलें. पेशवे जर दक्षिणेकडेच गुंतून राहिले असते, आणि गुजराथ आणि माळवा या प्रांतांत निजामानें एकदा आपलें बस्तान पक्कें बसविलें असतें, तर पेशव्यांना दिल्लीकडे दृष्टिक्षेप करण्यालाहि पुढें संधि मिळाली नसती. गुजराथ व माळवा हे प्रांत दिल्लीवरील स्वारीचे राजरस्ते असल्यानें बाजीरावानें पहिल्या तडाक्यासरसा त्या प्रांतांत मराठ्यांचा झेंडा रोवला यांत मोठेंच राजकारण साधलें. दिल्लीवर चढाई करण्याची वाट काबीज केल्यानें **दिल्लीची किल्ली हातांत आली** आणि त्यानंतर इतक्या राजक्रान्त्या झाल्या, तरी ती किल्ली अद्यापि मराठ्यांच्याच हातीं आहे. मराठ्यांचें लक्ष उत्तरेकडे वळल्यामुळेंच निजामाची सत्ता दक्षिणेंत दृढमूल झाली हें खरें नव्हे. बरें, तेवढ्यामुळेंच ती दृढमूल झाली असें मानलें तरी त्या वेळीं मराठ्यांच्या हातीं हैद्राबाद शहर राहणें श्रेयस्कर का इंदूर, ग्वाल्हेर हातांत राहणें श्रेयस्कर, असा प्रश्न विचारला असतां हैद्राबादच्या वतीनें वकिली करणारा कोणी भेटला असता असें वाटत नाहीं.

## निजामाला कोंडींत धरण्याचीं कारस्थानें

उत्तरेंतील कारस्थानांना कंटाळून निजाम दक्षिणेंत आला आणि तेथून तो मराठ्यांना सतावूं लागला त्या वेळीं निजामाची सत्ता चोहों बाजूंनीं कोंडींत धरण्याकरितां मराठ्यांनीं कर्नाटकांत स्वारी करून श्रीरंगपट्टण गांठलें. निजामानें कर्नाटकांत हातपाय पसरून प्रबळ होऊं नये म्हणूनच जशी ही स्वारी होती, तशीच निजामाचा दिल्लीशीं संबंध तोडून त्यास निर्बळ व निर्मूल करावें म्हणूनच उत्तरेकडचीहि मोहीम होती.

निजामाला नामोहरम करण्याला त्याच्या सुभ्यावरच चालून जाणें हा एक मार्ग होता व त्याचा अवलंब करून बाजीरावानें दोनदां त्यास वठणीवर आणला. पण '**नक्रः स्वस्थानमासाद्य गजेंद्रमपि कर्षति । स एव प्रच्युतः स्थानाच्छुनापि परिभूयते**' या न्यायानें निजामाच्या राज्यांतच चालून जाऊन त्याचा पराभव करण्यापेक्षां त्याला स्वस्थानावरून दूरवर ओढून नेऊन तेथें पराभव करणें अधिक सोयीचें असल्यानें शेवटीं बाजीरावानें याच युक्तीचा अवलंब केला. दिल्ली व मध्य हिंदुस्थान इत्यादि प्रांतावर स्वारी केली म्हणजे बादशहा निजामाला साहाय्यार्थ बोलावील; आणि आपला प्रांत सोडून निजाम मध्य हिंदुस्तानांत आला कीं, तेथें त्याला वेढून वठणीवर आणणें सुकर होईल हें जाणून बाजीरावानें हा डाव टाकला व तो किती यशस्वी झाला हें भोपाळच्या लढाईनंतरच्या तहावरून स्पष्ट होत आहे. सांगण्याचा मतलब हाच कीं, बाजीरावाच्या उत्तरेकडील स्वाऱ्यांत दक्षिणेकडील निजामाचा कांटा काढणें हाहि एक उद्देश त्याच्या मनांत असेच.

तथापि या प्रकरणाच्या प्रारंभीं सांगितल्याप्रमाणें निजाम मुत्सद्दीपणांत पक्का

मुरलेला असून त्याचें रक्षण करणें दिल्लीच्या पातशाहीला अगत्याचें वाटत असल्यामुळें त्याला सर्वच परिस्थिति अनुकूल होती. उलटपक्षीं बाजीरावाला आपलें धोरण ठरविण्याचें पूर्ण स्वातंत्र्य नसल्यामुळें आणि तत्कालीन मराठामंडळांत कांहीं पूर्ण कार्यनिष्ठ, कांहीं तरते बुडते पाहणारे तर कांहीं गुप्त वा उघड शत्रुत्व करणारे असे असल्यामुळें मराठ्यांची सर्व शक्ति मुसलमानांच्याविरुद्ध एकवटतां आली नाहीं. त्यामुळें बाजीरावाला आपलें ध्येय पूर्णपणें सिद्धीस नेतां आलें नाहीं; तरी पण एकंदरींत त्याला जी यशःप्राप्ति झाली ती केवळ वैयक्तिक पराक्रमामुळें व धाडसामुळेंच झाली असल्यानें व्यक्तिशः बाजीरावाच्या अंगच्या गुणांचा विचार करतांना त्याच्या युद्धकौशल्याबद्दल व मुत्सद्दंगिरीबद्दलहि कौतुकानें मान तुकवावी लागते.

## मुत्सद्दीपणाची सदोष व्याख्या

बाजीराव शूर होता, युद्धकुशल होता, सरळमार्गी, दिलदार, उदार मनाचा होता याविषयीं कोणी नकार देऊंच शकत नाहींत. तेव्हां दोष काढावयाचा म्हणून त्याच्या मुत्सद्दीपणाला नाकें मुरडावयाची प्रथाच पडून गेली आहे. त्यालाहि कांहीं चरित्रकार अपवादात्मक सांपडतील; परंतु बहुमत याच बाजूचें आहे कीं, बाजीरावाची गणना कांहीं मुत्सद्द्यांत करतां येणार नाहीं. आणि हें मत सहज सिद्ध करतां यावें म्हणून मुत्सद्दीपणाची व्याख्याच त्यांनीं इतकी कठीण करून ठेविली आहे कीं, त्या कसोटीला कोण उतरेल देव जाणें! "युरोपिअन इतिहासांत बिस्मार्क, ग्लॅडस्टन, वगैरे मुत्सद्दी आपापल्या राष्ट्राचें पुढील शें-दोनशें वर्षांचें ध्येय दृष्टीपुढें ठेवून तदनुरूप उद्योग अगोदरपासून चालू करतात. तसा विचार दूरदृष्टिपूर्वक निदान बाजीरावानें तरी केलेला दिसत नाहीं," असें रियासतकार लिहितात. 'शें-दोनशें वर्षांचें ध्येय दृष्टीसमोर ठेवून' हें वाक्य लिहितांना फारशी दूरदृष्टि खर्चली गेली असेल असें वाटत नाहीं. इतिहासकाराला असली अतिशयोक्ति खास शोभत नाहीं. ग्लॅडस्टन व बिस्मार्क यांनीं कोणतें धोरण घालून दिलें व तें शें-दोनशें वर्षें टिकलें किंवा टिकणार आहे? ग्लॅडस्टनच्या हयातीच्या अखेरीसच त्या पक्षाची काय स्थिति झाली? आणि सध्यां त्या पक्षाची कशी वाताहत झाली आहे हें कोणास विदित नाहीं? बिस्मार्कची त्याच्या हयातींतच कितीशी प्रतिष्ठा राहिली? पण इतके दूरचे दाखले कशाला हवेत? व्हर्साइलचा तह करणारे पुढारी मुत्सद्दी होते कां नव्हते? मग त्या तहाचे असे धिंडवडे कां निघाले? स्पेनच्या यादवींत कोण जिंकणार हें ज्यांना कळलें नाहीं त्यांना मुत्सद्दी कसें म्हणावयाचें? म्यूनिचला जाऊन चेंबर्लेनसाहेब कोणता करार करून आले आणि पुढें चार-सहा महिन्यांत त्या कराराची शोभा काय राहिली? हे सर्व प्रकार जर पाहतां पाहतां घडत आहेत, तर बाजीरावाला ५०–७५ वर्षांनंतर काय होणार याचें स्वप्न न पडल्याबद्दल फुकट दोष कां यावा? बाजीरावाकडे तत्त्वतः तेवढाहि दोष येत नाहीं. त्याच्या नातवानें आचरटपणा केला असेल व पुण्याचें राज्य

गमावलें असेल; परंतु तेवढ्यावरून पहिल्या बाजीरावानें उत्तरेकडे स्वारी करून गुजराथ, माळवा, बुंदेलखंड इत्यादि मुलूख जिंकले ही चूक केली असें कसें ठरतें ?

बाजीराव जर उत्तरेंत घुसला नसता आणि त्यानें गुजराथ, माळवा, बुंदेलखंड जिंकून नर्मदा व विंध्याद्रि यांतील मार्ग आपल्या कबजांत घेतले नसते व दक्षिणेचे मुसलमान व उत्तरेकडचे मोंगल यांच्या दरम्यान पाचर ठोकली नसती; तर पुनश्च एखादा अल्लाउद्दीन खिलजी, अकबर किंवा अवरंगजेब उत्तरेकडची प्रचंड सेना घेऊन दक्षिणेंत उतरला असता आणि संभाजीच्या वधाचीं व राजारामाच्या पळापळीची दुसरी आवृत्ति निघाली असती. बाजीरावानें आपल्या अद्भुत पराक्रमानें ही आपत्ति कायमची दूर केली. बाजीरावानें भीमथडीचीं तट्टें नर्मदापार केल्यापासून उत्तरेकडचे काबुली घोडे दक्षिणेंत यावयाचे कायमचे बंद झाले. हा विचार मनांत आणला म्हणजे, बाजीरावाचा राज्यविस्तार क्षणभंगुर फापटपसारा असें कोण म्हणेल ?

## ज्यूलिअस सीझर आणि बाजीराव यांची तुलना

नेपोलिअननें रशियाच्या राजधानीपर्यंत मजल मारली पण महिन्याच्या आंतच आपलें सगळें सैन्य गमावून त्यास परत यावें लागलें. शिकंदरनें सिंधुनदापर्यंत प्रदेश जिंकला, पण जसजसा तो परत फिरला तसतसा तो मुलूख हातचा जात चालला. तसा प्रकार बाजीरावाचा झाला नाहीं. बाजीरावाच्या कर्तबगारीची तुलना करावयाची झाली तर ती ज्युलिअस सीझरशीं करतां येईल. दोघांनाहि राज्यविस्ताराच्या कामीं स्वजनांचा विरोध झाला; पण त्या विरोधास न जुमानतां एक पुण्याहून दिल्लीपर्यंत गेला आणि दुसरा रोमपासून लंडनपर्यंत गेला. उभयतांनींहि जिंकलेले प्रांत त्यांच्या वारसांच्या ताब्यांत शेंकडो वर्षेपर्यंत टिकले. उभयतांनाहि आपलें राज्यधोरण चालविण्याकरितां स्वकीयांशीं संग्राम करावा लागला व त्यांत तें उभयतांहि विजयी झाले. उभयतांनाहि आपल्या देशबांधवांच्या कृतघ्नतेमुळें लवकर देह ठेवावा लागला. तरी पण एकाला नानासाहेबासारखा आणि दुसऱ्याला आगस्टस् सीझरसारखा चतुरस्र वारस भेटल्यामुळें उभयतांच्याहि पश्चात् त्यांचा राज्यविस्तार अधिकाधिकच होत गेला.

अशा दृष्टीनें पाहिल्यास बाजीराव व ज्यूलिअस सीझर यांत पुष्कळ साम्य आढळतें. रणकौशल्याच्या दृष्टीनें तर बाजीरावाचें ज्यूलिअस सीझरशीं विशेष साम्य आढळून येतें व तें कोणीहि नाकबूल करणार नाहीं. पण ज्यूलिअस सीझरनें रोमन साम्राज्य स्थापण्यांत जें मुत्सद्दीपण दाखविलें तसेंच मुत्सद्दीपण बाजीरावानेंहि मराठ्यांचें साम्राज्य स्थापण्यांत दाखविलें हें कबूल करणें कित्येकांस जिवावर येतें. तथापि वाचकांनीं सूक्ष्म दृष्टीनें इतिहास वाचून त्या वेळच्या सगळ्या परिस्थितीचा चित्रपट डोळ्यापुढें आणल्यास त्यांच्याहि विवेकबुद्धीला हें साम्य खात्रीनें पटेल.

# मध्यभारताचीं राजकीय स्थित्यंतरें : : १२

[ स्वराज्यप्राप्तीनंतर संस्थानांच्या विलीनीकरणाचा सपाटा सुरू झाला. त्यांत छत्रपतींचें कोल्हापूरचें राज्यहि विलीन होऊन गेलें. तथापि मराठ्यांच्या पराक्रमाच्या स्मारकरूपानें असलेलीं मध्यभारतांतील संस्थानें गटरूपानें टिकून राहिलीं. त्या प्रसंगानें मध्यभारतांत आजवर राजकीय स्थित्यंतरें कसकशीं घडत आलीं आणि मराठ्यांनीं आपला अम्मल मध्यभारतांत कसा बसविला याचें समालोचन या लेखांत आहे. ]

हिंदवी स्वराज्याच्या ताज्या घडामोडींत अनेक छोट्यामोठ्या संस्थानिकांनीं समंजसपणा दाखवून आपला एक गट निर्माण केला. अशा गट-स्थापनेंत काठेवाडांतील संस्थानिकांनीं आघाडी मारली आणि मध्यभारतांतील संस्थानिकांनीं त्यांचें अनुकरण करून आपलीं संस्थानें 'तूर्त तरी' विलीनीकरणाच्या महापुरांत वाहून जाण्याचीं थांबविलीं.

### मराठेशाहीचा उत्तरेकडील अवशेष तूर्त तरी राहिला

**'तूर्त तरी'** असें म्हणण्यांतला मतलब एवढाच कीं, चालू क्रान्तियुगांत आणखी कोणकोणत्या क्रान्त्या होतील तें आजच आज कोण सांगूं शकेल ! परकीय राज्य जाऊन भारतवर्षांत हिंदवी स्वराज्य स्थापिलें गेलें ही मोठी क्रान्ति काळानें घडवून आणली. आतां स्वकीय सत्ता सुरू झाल्यावर नवीन क्रान्तीचें कारणच नाहीं. तथापि हिंदवी स्वराज्याची घटना अद्यापि ठरावयाचीच आहे. आणि ती घटना प्रस्तुतच्या घटनासमितीनें ठरविली, तरी तिच्याशीं सहमत न होणारे क्रान्तिवादी कालांतरानें प्रबल होऊन, आज बसलेली घडी उद्यां उसकटून टाकणार नाहींत, अशी खात्री कोणीं बाळगावी ! काळाच्या पोटांत काय काय सांठवून ठेवलें आहे तें भविष्यवाद्यांसहि अनुमानतां येत नसल्यामुळें, आजच्या परिस्थितीपुरतेंच आज बोलावें, उद्यांचा विचार प्रकटविण्याचें धाडस करूं नये, यांतच शहाणपणा आहे. एवढ्याचसाठीं मध्यभारतांतील ज्या संस्थानिकांनीं आपला गट करून विलीनीकरणाच्या लाटेंतून आपलें अस्तित्व राखलें त्यांचें सद्यःस्थितींत अभिनंदन करणें स्वाभाविक आहे. 'आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः' या सुभाषितोक्तीची प्रतीति प्रस्तुतच्या राजकीय घडामोडींत जशी पटत आहे, तशी पूर्वीं कधीं पटली नसेल. दक्षिणेंतील संस्थानिकांनीं घाबरटपणानें घिसाडघाई करून विलीनीकरण ओढवून घेऊन आपल्याच हातानें आपल्या पायावर धोंडा पाडून घेतला आणि

( सह्याद्रि, जानेवारी १९४९ )

पेशवाईचा अवशेषहि नष्ट केला. आतां कोल्हापूरच्या प्रजेंतीलच एक गट कोल्हापूरच्या विलीनीकरणाविषयीं आतुर झाला असल्यानें कोल्हापूरची शिवाजीमहाराजांच्या वंशजांची गादीहि नामशेष होईल व त्या गटाचे डोळे निवतील, असा रंग दिसत आहे ! अशा घडामोडी सर्वत्र चालू असतां मध्यभारतांतील संस्थानिकांनी अभूतपूर्व अशी एकी करून आपला एक बळकट गट बनविला आणि मराठेशाहीचा उत्तरेकडील अवशेष तूर्त तरी राखला, याबद्दल महाराष्ट्रियांस कौतुक वाटणें स्वाभाविक आहे.

### मध्यभारताचें केंद्र उज्जयिनी

या मध्यभारताच्या गटांत ग्वाल्हेर, इंदूर, धार, देवास, बडवानी, झाबुआ, रतलाम, राजगढ, खिलचीपूर इत्यादि संस्थानांचा समावेश झाला आहे. या गट-प्रदेशांचें क्षेत्रफळ साधारणतः ४७ हजार चौरस मैल असून जनसंख्या ७२ लाख आहे. त्यांत ५३ शहरें असून ३२ हजार खेडीं आहेत. ब्रिटिश रियासतींत ज्याला सेंट्रल इंडिया आणि माळवा म्हणत असत त्यांतील बहुतेक संस्थानें यांत समाविष्ट झालीं आहेत. भोपाळसारखे कांहीं अपवाद राहिले आहेत; पण तेवढ्यानें कांहीं मध्यभारताचा विस्तीर्ण प्रदेश या गटांत आला असें सामान्यतः संबोधण्याला बाध येत नाहीं. म्हणूनच या गटाला उद्देशून या लेखांत **'मध्यभारत'** असा व्यापक शब्द वापरण्यांत आला आहे. कारण भारतकालापासून बिसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत **'मध्यभारत'** म्हणजे निश्चित व न बदललेल्या चतुःसीमेंतील एक अखंड प्रदेश अशी स्थिति केव्हांच नव्हती. राजकीय घडामोडींच्या अनुषंगानें त्याच्या सीमा बदलत होत्या; तथापि अवंतिका ऊर्फ उज्जयिनी हें या मध्यभारताचें केंद्रस्थान धरून तदनुषंगानेंच पुढील वर्णन करण्यांत येत आहे.

वेदकाळांत सप्तसिंधूंचा प्रदेश सर्वश्रुत असा होता. त्या वेळीं 'मध्यभारत' हा प्रदेश तितकासा प्रसिद्ध नव्हता. तदनंतर वैदिक आर्यांची वस्ती पंजाबांतून पूर्वकडे आणि दक्षिणेकडे वाढत चालली आणि गंगा-यमुना यांच्या दुआबांतील प्रदेश जसा पवित्र मानला जाऊं लागला तसाच नर्मदा व यमुना यांच्यामधील मध्यभारतहि यज्ञीय मानला जाऊं लागला. म्हणूनच कृष्ण यजुर्वेदांत अवन्ती हें नांव ' रक्षण करणारी ' या अर्थानें उज्जयिनी नगरीला लाविलें गेलें आहे आणि स्कंदपुराणानें अवन्ती नगरीचें हें लक्षण स्पष्ट केलें आहे. प्रातःस्मरणीय सप्तपुरींत अवंतीचा समावेश अतिप्राचीन काळापासून आहे. त्याचप्रमाणें उज्जयिनींतील महाकाळाची गणना द्वादश ज्योतिर्लिंगांत असलेली सर्वप्रसिद्धच आहे. श्रीकृष्णाचें गुरुगृह अवंतीसमीपच होतें. रामायणांत अवंतीचा उल्लेख सीता-संशोधनाच्या प्रकरणांत आला आहे. पण या सर्वांपेक्षां अधिक पटणारा असा ऐतिहासिक पुरावा म्हणजे भारतीय युद्धाचा होय. त्या युद्धांत अवंतीचे विंद आणि अनुविंद हे राजे कौरवांच्या बाजूनें लढत होते.

## मनूचा मध्यप्रदेश

अवंती म्हणजे ' रक्षण करणारी ' अशा अर्थाचें जें या नगरीचें नांव होतें तेंच पुढें बदलून त्रिपुरासुराच्या वधानें शंकरानें दैत्यांवर जो विजय मिळविला तद्दर्शक म्हणून 'उज्जयिनी' असें नवें नांव प्रचारांत आलें. अवंती किंवा उज्जयिनी ही ज्या प्रांताची राजधानी होती त्या प्रांताला मनुस्मृतिकाळीं 'मध्यप्रदेश' असें म्हणत.

मनूचा मध्यदेश हा हिमालय व विंध्य या उत्तर-दक्षिण आणि प्रयाग व सरस्वती या पूर्व-पश्चिम सीमेच्या मधला प्रदेश होय. सांप्रतच्या परिभाषेंत उत्तरेस चंबल नदी व दक्षिणेस नर्मदा नदी, पूर्वेस मध्यप्रांत आणि पश्चिमेस राजपुताना व गुजराथ यांच्या मधला जो प्रदेश तो आपला मध्यभारत होय. अक्षांश-रेखांशांत सीमा सांगावयाच्या झाल्यास उत्तर अक्षांश २१ ते २७ आणि पूर्व रेखांश ७४ ते ८३ यांच्या दरम्यानचा जो मुलूख तो साधारणपणें मध्यभारतांत मोडतो.

भारतकाळांत या भागांत शूरसेनदेश, मत्स्यदेश, दशार्णदेश, कुंतिभोजदेश, निषधदेश आणि अवंतीदेश असे प्रमुख देश होते. यांतील अवंती देशाच्या राजधान्या उज्जयिनी व माहिष्मती अशा दोन होत्या. यादव, सात्वत, भोज घराण्यांतील राजे या देशावर आलटूनपालटून राज्य करीत.

## पुराणकालीन घडामोडी

भारतकाळानंतर एक हजार वर्षांनीं उज्जयिनींत प्रद्योत वंशाचें राज्य चालू होतें. वत्सदेशाच्या राजांत उदयन हा प्रमुख राजा होऊन गेला. उज्जयिनींत प्रद्योताच्या पाठीमागून त्याचा मुलगा पालक हा राज्य करीत असतां शर्विलकानें बंड केलें व पालक राज्यभ्रष्ट झाला. यानंतर अवंतिवर्धनाची राजवट झाली. त्या राजाच्या मरणोत्तर मगधाच्या साम्राज्यांत अवंतिकादेश समाविष्ट करण्यांत आला.

मगधांचें साम्राज्य अशोकाच्या मृत्यूनंतर लवकरच विस्कळित झालें. त्यानंतर आंध्रभृत्य घराण्याचें प्राबल्य वाढत चाललें. आंध्र राजांतील शातकर्णी हा महाप्रबळ राजा होता. त्यानें पश्चिम माळवा आपल्या राज्यास जोडला आणि साम्राज्यपददर्शक अश्वमेध यज्ञ केले. मगध साम्राज्याचा शेवट झाल्यावर मगधांचा सेनापति पुष्यमित्र हा विदिशा ( पूर्व माळवा ) देशावर राज्य करूं लागला. पुष्यमित्र इ. स. पू. १४९ त कालवश झाला व त्याच्या पाठीमागून त्याचा पुत्र अग्निमित्र हा विदिशाचा राजा झाला. या वंशांतील देवभूति राजाचा शेवट त्याचा प्रधान वासुदेव यानें केला व तो विदिशाचा राजा झाला. या काण्व वंशानें ४५ वर्षें राज्य केल्यावर आंध्र राजानें माळव्याचा हा पूर्वभागहि जिंकला. अशा रीतीनें संपूर्ण माळवा आंध्रांच्या राज्यांत सामील झाला.

## स्वकीय व परकीय यांच्यांत झगडे

इ. स. पूर्व दुसऱ्या शतकापासून शक-पल्हवांचा पंजाबांत सुळसुळाट सुरू झाला. त्यांनीं प्रथम तक्षशिला राजधानी व्यापिली; नतर ते मथुरेंत शिरले आणि

अखेरीस माळव्यांत त्यांचा प्रवेश झाला. त्यांच्यांतला नहपान हा क्षत्रप मोठा पराक्रमी निघाला. त्यानें ४५ वर्षें राज्य केलें. नहपानाच्या मृत्यूनंतर गर्धभिलानें अवन्ती शहर परत जिंकून घेतलें; परंतु जैनमुनी कालकाचार्य यानें आपल्या बहिणीच्या अपमानाचा सूड उगविण्याकरितां शकांच्या एका प्रमुख शहाला चिथवून त्याच्याकडून अवंतीवर स्वारी करविली आणि गर्धभिलाचा शेवट झाला. त्याचा पुत्र विक्रम हा बापाच्या मृत्यूनंतर रानावनांत राहून आपलें राज्य परत मिळविण्याच्या उपायांची योजना करीत होता. अखेरीस इ. स. पूर्व ५८ त त्यानें शकांना उज्जयिनींतून हाकून लाविलें आणि आपण राज्यपद स्वीकारून इ. स. पूर्व ५६ पासून आपला विक्रम संवत् सुरू केला. अशा रीतीनें माळवा प्रांत पुनश्च स्वयंशासित झाला; पण हें वैभव फार दिवस टिकलें नाहीं. उत्तरेकडून शकक्षत्रप आणि दक्षिणेकडून आंध्रभृत्य यांचा उज्जयिनीवर डोळा होता. अखेरीस शकनृप चष्टण यानें आंध्रांचा पराजय करून इ. स. ७७ त उज्जयिनी जिंकली आणि आपला शक इ. स. ७८ पासून सुरू केला. ( यासंबंधांत इतिहासज्ञांत मत-भेद आहे. पण प्रस्तुतच्या लेखांत तो मुद्दा महत्त्वाचा नसल्यानें येथें आम्ही त्याची चर्चा करीत नाहीं. ) तें कसेंहि असो, माळवा प्रांत पुनश्च परवश झाला एवढें खरें.

चष्टणाच्या नंतर त्याच्या कुळांत रुद्रदामन हा पराक्रमी निघाला. त्याच्या राज्यांत विदिशा, अनूप, सुराष्ट्र, मरुकच्छ, सिंधुसौवीर, कुक्कुर, अपरान्त, निषध इत्यादि देशांचा समावेश झाला होता. पण रुद्रदामनच्या पश्चात् त्या वंशाच्या सत्तेला उतरती कळा लागली; आणि दुसऱ्या चंद्रगुप्त राजानें या वंशाची सत्ता नष्ट केली.

आंध्रांची सत्ता माळव्यांतून नष्ट झाल्यावर कांहीं वर्षें शेषवंशांतील भोगी नांवाचे नागराजे विदिशा नगरींत राज्य करीत होते. गणपति नाग नांवाचा राजा पद्मावती येथें राज्य करीत होता. त्याचप्रमाणें चंपावती आणि मथुरा येथेंहि नागराजे होते; परंतु माळव्याच्या पश्चिम भागांत नागांचें प्राबल्य नसून तेथें जयवर्म्याच्या वंशांतील चंद्रवर्मा राज्य करीत होता. या चंद्रवर्म्यानें उत्तरे-कडील बाल्हीक देश जिंकला आणि आपल्या राज्याच्या सोयीसाठीं आपली राज-धानी पुष्कर येथें नेली. समुद्रगुप्ताशीं येणारा संघर्ष टाळण्यासाठींहि हें स्थलांतर झालें असावें. पूर्व माळव्यांतील नाग घराण्यांतील भावनागाची कन्या वाकाटक वंशांतील गौतमीपुत्राला दिली होती, तिचा पुत्र रुद्रसेन यानें मध्यभारतांत आपला अंमल बसविला.

हूणांचा पराक्रमी राजा तोरमण यानें पांचव्या शतकाच्या मध्यापासून हिंदुस्थानावर स्वाऱ्या करण्याला सुरुवात केली. त्यामुळें गुप्तांचें साम्राज्य संकुचित होत चाललें. हूणांनीं पंजाब आणि मध्यभारताचा पश्चिम भाग व्यापला. इ. स. ५१९ त त्यांनीं विदिशा जिंकून घेतला. तोरमणचा पुत्र मिहिरकुल हा बापापेक्षांहि

पराक्रमी निघाला व त्यानें मध्यभारतांतील गुप्तांची सत्ता संपुष्टांत आणली; परंतु विंध्यप्रांतांत उदय पावलेला नवा पराक्रमी राजा यशोधर्मा हा मिहिरकुलास शेरास सव्वाशेर असा भेटला. त्यानें मिहिरकुलाचा सपशेल पाडाव करून त्याला मध्य-भारतांतून आणि पंजाबांतून घालवून लाविलें. तेव्हां यशोधर्म्याच्या अनुज्ञेनें मिहिरकुलानें आपलें राज्य काश्मीर प्रांतापुरतें मर्यादित केलें.

माळव्यांतून हूणांची सत्ता नष्ट झाली तरी पुनश्च प्रस्थापित झालेलें गुप्तांचें राज्य माळव्यांत फार दिवस टिकलें नाहीं. माळव्याचा राजा देवगुप्त याचें प्रसिद्ध सम्राट् हर्षवर्धन याच्याशीं वितुष्ट आल्यामुळें हर्षानें आपला सेनापति भंडी याला देवगुप्तावर पाठविलें. भंडीनें देवगुप्ताचा पराभव करून त्यास ठार केलें आणि माळव्याचें राज्य हर्षवर्धनाच्या साम्राज्यांत सामील झालें.

### धारानगरीचें चढतें वैभव

या वेळीं माळव्याचे दोन भाग अलग झाले होते. त्यांतील उत्तरेकडील भागाची राजधानी उज्जयिनी होती आणि दक्षिणेकडील भागाची राजधानी धारानगर होती. या धारानगरीलाच यापुढें उज्जयिनीपेक्षां अधिक महत्त्व आलें. या धारानगरींत शिलादित्याचा नातू राज्य करीत होता. उज्जयिनी राजधानी असलेला भाग हर्षाचा सेनापति भंडी यानें जिंकल्यावर तेथें हर्षाच्या अनुज्ञेनें एक ब्राह्मण मंत्री राज्यपदारूढ झाला असावा. चिनी प्रवासी हुएनत्संग हा उज्जयिनीला आला त्या वेळीं तेथें ब्राह्मण राजा होता असें त्यानें लिहून ठेवलें आहे. हा ब्राह्मण राजा कनोजच्या हर्षवंशीय राजाचा मांडलिक होता. कनोजचें हें मांडलिकत्व सुमारें १०० वर्षे टिकलें. त्यानंतर दक्षिणेंतील मालखेडच्या राष्ट्रकूटांनीं माळवा जिंकला आणि आपल्या ताब्यांत ठेवला. पुढें तो इ. स. ८०० च्या सुमारास पुनश्च कनोजच्या आधिराज्याखालीं गेला. त्यानंतर थोड्याच कालानें राष्ट्रकूटांचें साम्राज्य लयास गेलें आणि कनोजची सत्ताहि डळमळीत झाली; त्या वेळीं परमारवंशीय राजांनीं माळव्याचा ताबा आपणाकडे घेतला व ते तेथें राज्य करूं लागले.

धारचें परमार घराणें हें मूळचें क्षत्रिय रजपूत असून त्याचें वास्तव्यस्थान उज्जयिनी हेंच होतें. पण मध्यंतरींच्या हूण, शक, कनोजचे प्रतिहार आणि दक्षिणें-तील राष्ट्रकूट यांच्या संघर्षांत उज्जयिनी शहराला उपद्रव होऊं लागल्यामुळें या घराण्यानें उज्जयिनीहून धारला स्थलांतर केलें. कृष्णराज हा या घराण्याचा मूळ पुरुष होय. तो प्रथम कनोजचा मांडलीक असावा; पण ज्या वेळीं राष्ट्रकूटाच्या गोविंदराजानें कनोजच्या राज्यावर स्वारी केली त्या वेळीं कृष्णराजानें त्याची सत्ता झुगारून दिली. अशा रीतीनें धारचें हें परमार घराणें इ. स. ९०० च्या सुमारास स्वतंत्रपणें नांदूं लागलें. या घराण्यांत कृष्णराजाच्या नंतर वैरिसिंह, श्रीहर्ष, मुंज, सिंधुराज आणि भोज असे राजे प्रसिद्धीस आले. त्यांतील मुंज राजाचा वध राष्ट्रकूट सम्राट् तैलप यानें केला. मुंज निपुत्रिक असल्यामुळें त्याच्या पश्चात् त्याचा बंधु

सिंधुराज हा गादीवर आला आणि त्याच्या पश्चात् त्याचा पुत्र भोज हा धाराधीश झाला. विक्रमादित्यापासून ज्याप्रमाणें उज्जयिनीची कीर्ति सर्वत्र दुमदुमूं लागली त्याप्रमाणेंच भोजराजाच्या कारकीर्दीपासून धारानगरीचा कीर्तिदुंदुभि सर्वत्र गाजूं लागला.

## माळव्यांतील राज्यक्रान्ति

भोजानंतर या घराण्याचें वैभव फार दिवस टिकलें नाहीं. भोजानंतरच्या दुसऱ्याच पिढीस परमाराच्या जागीं तुवर घराण्यांतला जीतपाल हा राजा झाला. या तुवर घराण्यानें १४२ वर्षें राज्य केल्यावर चौहाण कुलांतला जगदेव हा राज्याधिकारी झाला. या घराण्यानें ही सत्ता १६७ वर्षें भोगली आणि त्यानंतर दिल्लीच्या मुसलमानी सुलतानांच्या अधिकाऱ्यांच्या हातीं माळवा प्रांत पडला. घोरी घराण्यांतला दिलवरखान नांवाचा सरदार धारचा सत्ताधीश झाला. त्याचा मुलगा अलिफखान यानें हुसंगशहा असें नांव धारण करून दिल्लीचा संबंध तोडून स्वतंत्रतेचा झेंडा उभारला आणि आपली राजधानी धारानगरीहून मांडूला नेली. मांडूचा किल्ला विस्तीर्ण व बचावाच्या दृष्टीनें अतिशय बळकट असल्यानें यापुढें मुसलमानांची स्वतंत्र सत्ता माळव्यावर होती तोंपर्यंत, म्हणजे इ. स. १७३२ पर्यंत मांडू हीच माळव्याची राजधानी राहिली. याच हुसंगशहानें हुशंगाबाद शहर वसविलें. हुसंगशहानंतरचा माळव्याचा प्रसिद्ध सत्ताधारी महंमद खिलजी होय. यानें मांडू किल्ल्यांत अनेक इमारती बांधून त्या किल्ल्याला प्रेक्षणीय स्वरूप आणलें. याच्या पाठीमागून तीन पिढ्यांपर्यंत ही सत्ता टिकली. त्यांतहि रजपुतांनीं अनेक स्वाऱ्या करून रथगड, सारंगपूर, भिलसा, चंदेरी हीं शहरें हस्तगत केलीं. पुढें गुजराथचा सुलतान बहादूरशहा व मांडूचा खिलजी सुलतान यांच्यांत वैमनस्य येऊन बहादूरशहानें माळव्यावर स्वारी केली आणि मांडूचा किल्ला काबीज करून, माळव्याची स्वतंत्र सुलतानशाही बुडविली.

तथापि गुजराथच्या सुलतानाचीहि सत्ता तेथें टिकली नाहीं. दिल्लीसच राज्यक्रान्ति होऊन बाबर तेथें सिंहासनारूढ झाला आणि त्यानें रजपुतांना सतावण्यास सुरुवात केली. या कारणामुळें अनेक रजपूत घराणीं मध्यभारतांत घुसून तेथें स्थायिक झालीं. त्या रागानें हुमायुनानें माळव्यावर झडप घातली आणि मांडूचा किल्ला घेऊन बहादूरशहाला स्थानभ्रष्ट केलें. पुढें थोड्याच दिवसांनीं स्वतः हुमायून पदभ्रष्ट होऊन जीव घेऊन इराणाला पळून गेला. तेव्हां इकडे मल्लूखान यानें मांडू घेऊन तेथें आपलें बस्तान बसविलें. तें फार दिवस टिकलें नाहीं. शीरशहाचा सरदार शुजलखान यानें मल्लूखानाची उचलबांगडी केली. त्याचा मुलगा बाझबहादूर हा अत्यंत व्यसनी होता, म्हणून त्याच्याविरुद्ध बंडें उद्भवलीं. तिकडे हुमायून परत दिल्लीला आला व लवकरच कालवश झाला. त्याचा विख्यात पुत्र अकबर यानें आपलें साम्राज्य सर्व हिंदुस्थानभर पसरविण्याची हाव धरली; आणि

प्रथम राजपुतान्यावर स्वारी करून तेथून माळव्याकडे मोर्चा फिरवला. अकबरानें अशा रीतीनें माळवा सर केला. माळवा प्रांत हा दिल्लीच्या सुलतानांचा एक सुभा बनला. त्या वेळेपासून अवरंगजेबाच्या दक्षिणेकडील स्वारीच्या प्रारंभापर्यंत माळव्याचें सगळें राजकारण दिल्ली राजधानींत ठरत असल्यानें माळव्याचें स्वतंत्र अस्तित्व राहिलें नाहीं.

## मराठ्यांचा माळव्यांत प्रवेश

मराठ्यांना जिंकण्यासाठीं अवरंगजेबानें दक्षिणेकडे मोर्चा वळविला, त्या वेळेपासून माळवा व राजपुताना या प्रांतांतून थोडीशी जागृति होऊं लागली. अवरंगजेबाच्या दक्षिण-दिग्विजयाला पैशाचा व शिपायांचा पुरवठा मध्यहिंदुस्थानांतूनच होत असे. तेव्हां ही रसद अडविल्यास मराठ्यांना साहाय्य केल्याप्रमाणें होईल आणि अवरंगजेबाच्या सत्तेला पायबंद बसल्यानें आपल्या स्वातंत्र्याचाहि अरुणोदय होऊं लागेल अशी कल्पना मध्यहिंदुस्थानवासियांच्या मनांत डोकावूं लागली. मराठ्यांना तर अवरंगजेबाशीं गनिमी काव्यानेंच लढणें भाग असल्यानें अवरंगजेबाच्या पिछाडीच्या मार्गावर घाले घालणें व त्याची रसद बंद करणें त्यांना आवश्यकच होतें. त्याकरितां राजारामानेंच प्रथम आपल्या सरदारांस नर्मदापार होऊन उत्तर हिंदुस्थानावर हल्ला चढवून अवरंगजेबाच्या हालचालीस पायबंद बसविण्याचा हुकूम दिला.

संभाजीच्या अमानुष वधानंतर एकच वर्षानें म्हणजे १६९० त मराठ्यांनीं नर्मदापार होऊन माळव्यांत पाऊल टाकलें. त्या वेळीं माळव्यांत राज्यस्थापनेची मराठ्यांची कल्पनाहि नव्हती. तरी पण माळव्याचा महत्त्वाचा टापू हातीं घेऊन अवरंगजेबाला शह दिल्याशिवाय मराठेशाहीची धडगत नाहीं हें ओळखून मराठ्यांनीं माळव्यांत धुमाकूळ घालण्यास सुरुवात केली. १६९० पासून १७०७ पर्यंत माळव्यावर मराठ्यांनीं तुरळक स्वाऱ्या केल्या. त्यांत कृष्णाजी सावंत यानें १६९९ त केलेली स्वारी महत्त्वाची होती. त्या स्वाऱ्यांचा मराठ्यांना मोठाच फायदा झाला. मराठ्यांचा हा ससेमिरा सोडविण्यासाठींच शाहूला सोडून देण्याचा सल्ला अवरंगजेबानें दिला व त्याच्या पुत्रानें तो पार पाडला. शाहूच्या सुटकेनंतर कांहीं काळपर्यंत मराठ्यांचें लक्ष अंतर्गत धामधुमीनेंच वेधून घेतलें होतें. तिकडे दिल्लींतहि वारसदारीबद्दल तंटे चालूच होते. अशा परिस्थितींत माळव्यांत धड कोणाचाच अम्मल नाहीं अशी बजबजपुरी माजली होती.

## मराठ्यांनीं माळवा जिंकला

इ. स. १७१५ त दावलजी सोमवंशी यानें माळव्यांत प्रवेश केला. नंदलाल मंदलोईनें त्यास २५ हजार रुपये देऊन परतवून लाविलें. पुढें सय्यदबंधूंनीं बाळाजी विश्वनाथ पेशव्यांशीं संगनमत करून त्यास दिल्लीला पाचारण केलें आणि मराठ्यांना १७१९ त स्वराज्य, चौथाई आणि सरदेशमुखी यांच्या सनदा दिल्या.

अवरंगजेबाच्या कारकीर्दीच्या अखेरपासून रजपुतांचें प्रस्थ माळव्यांत वाढत चाललें होतें त्यामुळें यापुढें माळव्यांत मराठ्यांना रजपुतांशीं झगडा करावा लागला. पण अंबरचा सवाई जयसिंग हा मराठ्यांचा मित्र झाल्यानें मराठ्यांना माळव्याच्या सुभेदाराला तोंड देण्याला बळ आलें. या वेळीं निजाम हा दक्षिणेचा सरसुभा होता व तेथें त्याच्या मराठ्यांशीं कटकटी चालूच होत्या. त्या कटकटी मिटवाव्या म्हणून निजामानें माळव्याची सुभेदारी पत्करली आणि माळव्यांत मराठ्यांशीं झगडा सुरू केला; परंतु दिल्लींतील राजकारणाच्या अनेक भानगडींमुळें निजामाला माळवा सोडून दक्षिणेंत जावें लागलें.,

१७२२ त गिरधरबहादूर हा माळव्याचा गव्हर्नर नेमला गेला. मराठ्यांना माळव्याची चौथाई वसूल करण्याचा हक्क मिळाला होता व त्या वसुलीकरितां बाजीरावानें कंठाजी कदम बांडे, उदाजी पवार आणि पिलाजी गायकवाड यांना अधिकार देऊन माळव्यांत पाठविलें. निजामानें दक्षिणेंत जाण्यापूर्वी नालछा येथें १८ मे १७२४ रोजीं बाजीरावाची भेट घेतली व त्या उभयतांत दोस्तीचा तह झाला. त्या तहानें मराठ्यांनीं दक्षिणेंतील निजामाच्या सुभेदारीला व्यत्यय आणूं नये आणि निजामानें माळव्यांत मराठ्यांना अडवूं नये असें ठरलें. निजामाच्या नेहमींच्या स्वभावाप्रमाणें त्यानें हा तह पाळला नाहीं. दक्षिणेंत येऊन त्याची सत्ता पक्की झाल्याबरोबर त्यानें मराठ्यांच्या चौथाई-वसुलीला हरकत करण्यास सुरुवात केली. तेव्हां बाजीरावानें माळव्याचा समाचार घेण्यापूर्वी निजामाचा समाचार घेण्याचें ठरवून पालखेड येथें निजामाला गांठलें आणि १७२८ च्या फेब्रुवारींत निजामाचा सपशेल पराभव करून त्यास मुंगीशेगांव येथें मराठ्यांच्या सर्व अटी मान्य करून तह करण्यास भाग पाडलें. अशा प्रकारें बाजीराव हा दक्षिणेंत गुंतला असतां त्यानें माळव्याच्या कामगिरीवर चिमाजीअप्पाची नेमणूक केली आणि त्याच्या मदतीस मल्हारराव होळकर व राणोजी शिंदे यांस पाठविलें. चिमाजीअप्पानें दि. २९ नोव्हेंबरला अमझेरा येथें मोगली सैन्यावर हल्ला चढवून बादशाही फौज उधळून लावली आणि गिरधरबहादूर व दायबहादूर या उभयतांसहि कंठस्नान घातलें. अशा रीतीनें सगळा माळवा मराठ्यांच्या हातीं आला.

मराठ्यांनीं हा मोठा विजय मिळविला तरी दिल्ली दरबारानें अद्यापि आशा सोडली नव्हती. बादशहानें जयसिंगाची माळव्याचा गव्हर्नर म्हणून नेमणूक केली आणि दक्षिणेंतून निजामाला त्याच्या मदतीकरितां पाचारण केलें. निजामालाहि मराठ्यांच्या वाढत्या सत्तेचा धाक वाटतच होता; याकरितां तो बादशहाच्या बोलावण्यावरून उत्तरेंत गेला आणि माळव्यांत मराठ्यांना तोंड देण्याचा त्यानें विचार चालविला. निजाम उत्तरेंत गेल्याचें पाहून बाजीराव स्वतः दिल्लीकडे निघाला. मराठे व मोगल यांच्यांत अनेक चकमकी झाल्या; पण त्यांचा तपशील अप्रस्तुत असल्यानें येथें देण्याचें कारण नाहीं. अखेरीस बाजीरावानें निजामाला त्याच्या मोगली सैन्यासह

तालभोपाळ येथें वेढलें आणि दि. १४ डिसेंबर १७३७ या दिवशीं निजामाचा आणि मोंगली सैन्याचा पूर्ण पाडाव करून मराठ्यांनीं माळव्याचा विजय पक्का केला.

बाजीरावाच्या विजयानंतर जो तहनामा झाला त्या तहानें (१) संपूर्ण माळव्याची ताबेदारी मराठ्यांना मिळाली. (२) नर्मदा व चंबळ या नद्यांच्या दरम्यानचा सर्व मुलूख मराठ्यांच्या हातीं आला. (३) बाजीरावाच्या स्वारी-खर्चाबद्दल त्यास ५० लक्ष रुपये दिल्ली दरबाराकडून देवविण्याची हमी निजामानें पत्करली.

## माळव्याच्या संपूर्ण हक्काची सनद

बाजीराव व निजाम यांच्या दरम्यान झालेल्या या तहाला **दुराईसराईचा** तह असें म्हणतात. या तहानें पेशव्यांच्या सर्व मागण्या मान्य झाल्या असल्या-तरी त्या तहाला बादशहाची मंजुरी मिळाल्यावांचून त्याची बजावणी कशी व्हावयाची ! त्याकरितां कांहीं दिवस वाट पाहून बाजीराव दक्षिणेंत परत आला. निजामहि दिल्लीला जाऊन तहाच्या मंजुरीविषयीं निराश होऊन परत दक्षिणेंत आला. त्यानंतर नादिरशहाच्या स्वारीची जी वावटळ आली तिच्यांत दिल्ली राजधानी झोडपून निघाली. त्या वेळीं बादशहाला बाजीरावाची आठवण झाली. बाजीरावानेंहि दिल्लीला येऊन नादिरशहाशीं सामना करण्याचें अभिवचन दिलें व तो नर्मदातीरापर्यंत येऊन पोंचला. तेवढ्यांत नादिरशहा दिल्लीची लूट घेऊन स्वदेशीं निघून गेला. तरी पण दुराईसराईच्या तहाला बादशहाची मंजुरी घेण्याचें काम राहिलेंच होतें. त्याकरितां वाटाघाटी चालू असतां दुर्दैवानें बाजीराव १७४० च्या मे महिन्यांत नर्मदातीरीं मृत्यु पावला. परंतु आश्चर्याची गोष्ट ही कीं, बाजीरावाच्या हयातींत जी मंजुरी मिळाली नव्हती ती मंजुरी बाजीरावाच्या निधनानंतर मिळाली. मात्र ही मंजुरी मिळविण्याकरितां नाना-साहेब पेशव्याला पुण्याहून ग्वाल्हेरपर्यंत मोर्चे न्यावे लागले. नानासाहेब पेशवा ग्वाल्हेरीला आलेला पाहतांच सवाई जयसिंगानें बादशाला मराठ्यांची समजूत काढण्याचा व त्यांचा स्नेह संपादन करण्याचा सल्ला दिला आणि बादशहानें दि. ४ जुलै १७४१ च्या फर्मानानें पेशव्यांना माळव्याची नायबसुभेदारी दिली आणि नंतर दि. ७ सप्टेंबरला माळव्यावरील दिवाणी-फौजदारी सुद्धां संपूर्ण हक्कांची सनद दिली.

## मराठे सरदारांत वांटणी

अशा रीतीनें दि. ७ सप्टेंबर १७४१ पासून माळवा प्रांत मराठ्यांच्या हातीं आला. ही सनद हातीं आल्यानंतर पेशवे व त्यांचे सरदार यांच्यांत माळव्याच्या वसुलाची वांटणी ठरली. तींत ३५ टक्के शिंदे, ३५ टक्के होळकर, २१½ टक्के पवार, ८½ टक्के पेशवे असे हिस्से ठरले. अमझेरा येथे गिरधरबहादर बुडविला चिमाजी-अप्पानें, तालभोपाळला निजामाची हड्डी नरम केली बाजीरावानें, अखेरीस सन दे

करितां पुण्याहून ग्वाल्हेरपर्यंत स्वारी नेली बाळाजी बाजीरावानें, असें असून पेशव्यांनीं स्वतःचा हिस्सा अवघा ८½ टक्के ठेवला आणि बाकीचा सर्व वसूल शिंदे, होळकर व पवार यांच्यांत वांटून दिला, हा महत्त्वाचा मुद्दा पेशव्यांच्या कारभारावर टीका करण्यापूर्वी टीकाकारांनीं लक्षांत घ्यावा.

**नवीन संस्थानी संघ**

असो; या वेळेपासून माळव्याच्या राजकीय परिस्थितींत नोंदण्यासारखें कांहीं घडलें नाहीं. पानिपतचा कहर कोसळला. पुण्यास चुलत्यापुतण्यांचे तंटे झाले, पेशवाईवर अनेक विघ्नें आलीं; तरी पण माळवा जो एकदां दिल्लीच्या मोंगलांच्या तावडींतून सुटला तो कायमचाच सुटला. शेवटीं १८१८ ला पेशवाई बुडाली तरी माळव्याची मालकी शिंदे, होळकर व पवार यांच्याचकडे राहिली. मात्र कंपनी सरकारच्या वतीनें शिंदे, होळकर, पवार यांच्याशीं गव्हर्नर-जनरलनें नवे तहनामे केले. त्या तहनाम्यांनीं या संस्थानिकांची लष्करी हालचाल बंद पडली व परराष्ट्रीय राजकारणाला आळा घातला गेला. तथापि अंतर्गत कारभारांत त्यांची संपूर्ण मुखत्यारी कायम होती. १८१८ पासून १९४७ पर्यंत हिंदुस्थानच्या राजकारणांत किती तरी महत्त्वाच्या घटना होऊन गेल्या; तरी देखील या संस्थानिकांच्या स्थानिक अधिकाराला धक्का पोंचला नव्हता. आतां हिंदुस्थान स्वतंत्र होऊन हिंदवी स्वराज्याची घटना घडत आहे. अशा वेळीं नव्या मनूला अनुसरून मध्यभारतांतील बहुतेक सर्व संस्थानिकांनीं आपला संघ बनविला आणि आपापल्या संस्थानांत सनदशीर लोकशाही कारभार चालू करण्याचा उपक्रम केला हें उचितच झालें. संस्थानिकांची ही जूट सद्भावानें चालू राहील तर आणखी नवीन क्रान्ति होण्याचा प्रसंग टळेल. सरदार पटेल यांनीं ग्वाल्हेर येथील भाषणांत हाच इशारा संस्थानिकांना दिला. प्रत्येक संस्थानिकानें आपण संघाचे सेवक असे एक घटक आहों हें विसरू नये आणि संघराज्यानें आपण हिंदवी स्वराज्यांतील एक घटक आहों हें विसरून हिंदुस्थानच्या उत्कर्षाला व वैभवाला बाधक असें कोणतेंहि वर्तन करूं नये, तरच त्यांची ही संघराज्याची योजना टिकून राहील. '**ना विष्णुः पृथिवीपतिः**' या पुराणप्रणित कल्पनेपासून '**राजा प्रकृतिसेवकः**' येथपर्यंत या मनूंत स्थित्यंतर झालें, ही अद्भुत घडामोड होय. पण लोकशाहीच्या मनूंतील प्रजेच्या सेवेचें हें व्रत संस्थानिक सत्याला स्मरून न पाळतील तर याच्याहि पुढचें आणखी एक स्थित्यंतर होण्याचें राहिलें आहे. तें त्यांना टाळतां येणार नाहीं. तसा प्रसंग हे मध्यभारतांतील समंजस संस्थानिक आपणांवर ओढवून घेणार नाहींत अशी आशा आहे.

# संमिश्र विभाग

## जुलमाच्या डोलाऱ्यावर कळस ! : : : १

[ १९३७ सालीं मे महिन्यांत पुणें शहरांतील रविवार पेठेंतील मुसलमानांनीं तेथील सोन्यामारुतीच्या आरतीच्या वेळीं वाद्यें वाजविण्यास हरकत घेऊन तंटा उपस्थित केला. त्या दंग्याचें निमित्त पुढें करून डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटनें सोन्यामारुतीच्या देवळांतील छोटी घंटाहि वाजविण्यास बंदी केली ! या जुलमी हुकमाविरुद्ध सत्याग्रह करून अनेकांनीं दंड सोसून वाद्यबंदीच्या हुकमाची पायमल्ली केली. तिनें चिडून जाऊन पोलिसांनीं एके दिवशीं, सत्याग्रह पाहण्याकरितां जमलेल्या प्रेक्षकांवर अमानुष लाठीहल्ला केला. त्या लाठीमाराविरुद्ध या लेखांत तक्रार असून, हिंदूंच्या नैसर्गिक हक्कावर घाला घालणाऱ्यांची चौकशी होऊन अपराध्यांना शिक्षा व्हावी आणि असले अन्याय्य हुकूम मागें घेतले जावे अशी मागणी आहे. ]

### सोन्यामारुतीपुढील वाद्यबंदीचा निषेध

पुण्यांतील सोन्यामारुतीपुढील वाद्यबंदीनें येथील अधिकाऱ्यांनीं हिंदूंच्या धार्मिक हक्कांवर निष्कारण अन्यायानें गदाघात केला असून आखिल हिंदूंच्या धर्मभावना दुखविल्या आहेत; तथापि हिंदु समाज जात्याच अतिसहिष्णु, पापभीरू, रक्तपात-विन्मुख, गुंडगिरीला पारखा आणि सनदशीर मार्गाविषयीं सश्रद्ध असल्यानें त्यानें

( केसरी, दि. ११ मे १९३७ )

या जुलमाचा प्रतिकार अत्यंत शांततेच्या सत्याग्रहाच्या मार्गानें चालविला आहे. या सत्याग्रहाचा जोर दिवसेंदिवस वाढत चालला, सत्याग्रह्यांची संख्या अदूरदर्शी अधिकाऱ्यांच्या कल्पनेबाहेर फुगत चालली, तींत मोठमोठे जबाबदार व प्रतिष्ठित दर्जाचे पुढारी मोठ्या प्रमाणांत भाग घेऊं लागले, हिंदु समाजांतील सर्व वर्गांत या अन्यायाची चीड व आपल्या हक्काची जाणीव जागृत झाली; शास्त्री, पंडित, संतमहंतहि यांत सामील होऊं लागले, नुसते आचारनिष्ठ संन्यासीच नव्हे तर प्रत्यक्ष चतुर्थाश्रम घेतलेले संन्यासीहि यांत भाग घेऊं लागले, कराचीपासून रंगूनपर्यंतच्या आणि लाहोरपासून कुंभकोणमूपर्यंतच्या अनेक हिंदुधर्मीयांनीं या अन्यायाचा तीव्र निषेध करून जुलमी अधिकाऱ्यांची छीःथूः केली, दूरदूरच्या सत्याग्रह्यांनीं येथवर येऊन सत्याग्रह करण्याची तयारी दर्शविली आणि कित्येकांनीं तर पदरमोड करून येथवर येऊन प्रत्यक्ष सत्याग्रह केला आणि वाद्यबंदीच्या जुलमी हुकुमाचा बोजवारा उडविला.

अशा रीतीनें आपल्या झारशाही हुकुमाची पायमल्ली होत आहे, आपल्या इज्जतीचा डोलारा कोलमडून जमीनदोस्त होत आहे, वरिष्ठ अधिकाऱ्यांना सांगितली असतां पटेल अशी वरकरणी सबबहि सांगण्याला नसल्यानें तिकडूनहि थप्पड मिळत आहे, अशामुळें कातावून गेलेल्या अधिकाऱ्यांचा मस्तकशूळ, श्रीयुत अण्णासाहेब भोपटकर हे आपल्या निवडक अनुयायांसह स्वतः सत्याग्रह करावयास येणार आहेत या वार्तेनें, परमावधीला पोंचला असेल आणि अशा माथेफिरूपणांतूनच गेल्या शुक्रवारच्या अमानुष लाठीहल्ल्याची कल्पना उदय पावली असेल असाच बहुतेकांचा समज आहे.

धर्मप्रेमी व करारी बाण्याच्या हिंदूंनीं आपल्या बाजूनें बारा दिवसपर्यंत हा सत्याग्रह इतका शांतपणें चालविला होता कीं, त्यांच्या हातून रस्त्यावरील एखादी मुंगीहि निष्कारण चिरडली गेली नसेल; पोलिसकामगारांकडूनहि तितकीच अनत्याचाराची वृत्ति पाळली गेली होती असें जरी म्हणतां आलें नाहीं, तरी कांहीं आक्षेपार्ह वर्तनाचीं उदाहरणें अपवादात्मक म्हणून सोडून दिल्यास एकंदरींत बारा दिवसांतील त्यांचेंहि वर्तन सामान्यतः शांततेचें होतें. आणि एकीकडून अन्यायाच्या जुलमी हुकुमाची रीतसर बजावणी व दुसरीकडून अनत्याचारी सत्याग्रहाच्या मार्गानें त्याचा प्रतिकार असा हा नैतिक झगडा शांतपणें चालला होता. त्यांत अखेरपर्यंत शारीरिक दंडेलीचा शिरकाव होणार नाहीं, अशीच गेल्या गुरुवार सायंकाळपर्यंत बहुतेकांची समजूत होती. परंतु पोलीस अधिकाऱ्यांच्या डोक्यांत एकाएकीं कोणत्या उन्मादाचें भूत शिरलें कोणास ठाऊक! त्यांनीं शुक्रवार सकाळच्या सत्याग्रहाला तोंड देण्याच्या इराद्यानें भलतीच तयारी चालविली. रोजच्यापेक्षां अनेक पटीनें लाठीवाले पोलीस वाढविण्यांत आले आणि जागोजाग अगाऊच रस्ते रोखून धरण्यांत आले!

## अमानुष लाठीमार

वाद्यबंदीचा पहिला हुकूम फर्मावणारी अधिकाऱ्यांची वृत्ति एकपट दूषणीय तर शुक्रवार सकाळची पोलीसची वृत्ति दसपट दूषणीय होती. सोन्या मारुतीच्या देवळांतील घंटानादालाहि बंदी करून अधिकाऱ्यांनींच आपल्या अविवेकानें वांग्याचें भूत बनविलें आणि शुक्रवार सकाळची त्यांची अगाऊ तयारी अशी दिसली कीं, आतां त्या भुताचा नंगा नाच सुरू होणार! वास्तविक पाहतां सत्याग्रहाच्या बजावणींत शांतताभंगाचा संभवहि नव्हता व प्रत्यक्ष दंगा केव्हांहि झाला नाहीं. श्रीयुत भोपटकर हे स्वतः सत्याग्रह करणार असें जाहीर झाल्यामुळें रोजच्यापेक्षां प्रेक्षकांची संख्या शेंकडों पटींनीं वाढली होती. पण प्रेक्षक कितीहि जमले म्हणून दंगा होण्याचें कारण काय? अण्णासाहेबांच्या बरोबर सत्याग्रह करणारी पांच-सातच मंडळी होती. बाकीचे सगळे प्रेक्षक म्हणून जमले होते आणि भोपटकरांचा सत्याग्रह संपतांच ते जसे आले तसेच शांतपणें घरोघर निघून गेले असते.

परंतु पोलिस अधिकाऱ्यांनीं एवढी साधी गोष्टहि साधेपणानें होऊं दिली नाहीं. सोन्यामारुतीच्या देवळाच्या अलीकडे ५० यार्डांवर ही मिरवणूक अडविण्यांत आली आणि श्री. ल. ब. भोपटकर व त्यांच्याबरोबरचे पांच-सात सत्याग्रही त्यांच्या पाठोपाठ पुढें पाऊल ठेवतात न ठेवतात तोंच लाठीवाले जवान जणूं काय भुतानें झपाटल्याप्रमाणें एकदम पुढें सरसावले व त्यांनीं प्रेक्षकांच्या झुंडीवर एकदम लाठीमार सुरू केला! हल्ला सुरू करण्यापूर्वी रीतसर सूचना दिली गेली नाहीं. परत फिरण्याला वेळ दिला गेला नाहीं, कोणीहि मागें फिरण्याची नाखुषी दाखविली नाहीं. दंग्याची तर वार्ताहि नव्हती. असें असतां गरीब बिचाऱ्या निःशस्त्र प्रेक्षकांवर लाठीवाल्या जवानांनीं जो लाठीमार केला तो अत्यंत अमानुषपणाचा होता.

या लाठीमारासंबंधानें मुंबईच्या 'टाइम्स' पत्राच्या शनिवार सकाळच्या व दुपारच्या अंकांत वेगवेगळी हकीकत आहे; लाठीमार होण्याबरोबर जी पहिली हकीकत मुंबईच्या 'टाइम्स'कडे पाठविली गेली तींत दंग्याचा उल्लेख नाहीं, दगड फेकल्याचीहि बात नाहीं आणि पोलीस सुपरिंटेंडेंटला लागल्याचीहि वार्ता नाहीं. पण मागाहूनच्या हकीकतींत या सगळ्याचें तिखटमीठ लावून वर्णन आहे. अशा प्रकारें पहिल्या बातमीला मागाहून पुस्ती जोडली गेली! तिच्यांतील हकीकत खरी असती तरी तेवढ्यानेंहि हा अमानुष लाठीहल्ला समर्थनीय ठरला नसता; पण जेथें प्रेक्षकांकडून शांतताभंगाला कारणीभूत होईल असें दांडगाईचें वर्तन मुळींच घडलें नव्हतें, तेथें असला निष्कारण व क्रूरपणाचा हल्ला किती निंद्य ठरत असेल याची वाचकांनींच कल्पना करावी.

सत्याग्रहाचा कार्यक्रम पाहण्याकरितां म्हणून केवळ कुतूहलानें जमलेला, हातांत नुसती वेताची काठी अगर छत्रीहि नसलेला आणि त्यांत म्युनिसिपल कौन्सिलर, वकील, सावकार, दुकानदार आणि त्यांचे नोकर अशांचाच बहुशः

समावेश होता. असला समाज ही काय पोलिसांना बदमाषांची बेफाम झालेली टोळी वाटली म्हणून ते तिजवर एकाएकी लांडग्यासारखे तुटून पडले? जन्मापासूनचे लंगडे आणि उंचीला पुरे साडेचार फूटहि न भरणारे म्युनिसिपल कौन्सिलर श्री. गोपाळराव महाजन हे काय पोलिसांवर तुटून पडणार होते आणि साडेसहा फूट उंचीच्या दांडग्या पठाणांच्या हातांतली जंगी लाठी हिसकावून घेणार होते, म्हणून कां त्यांचें टाळकें सडकण्यांत आलें? बिचारे श्रीयुत चैतन्य वकील हे तर आपल्या कामासाठीं परगांवाला जाण्याकरितां मोटार स्टँडकडे चालले होते; त्यांच्यावर हा आकस्मित घाला पडला व त्यांना बेदम ठोकण्यांत आलें! श्रीयुत खडीवाले वैद्य यांचा जो चेंदामेंदा झाला त्याच्यांतून ते नशिबानें वांचले असले, तरी तीन दिवस त्यांना असह्य यातना भोगाव्या लागल्या!

## सत्याग्रह दटावणीनें दबत नाहीं

पुण्यासारख्या दुय्यम राजधानीच्या शहरीं, लक्ष्मी रोडसारख्या प्रशस्त रस्त्यावर, भरदिवसां श्री. ल. ब. भोपटकर, राजवाडे, क्षीरसागर यांच्या समक्ष त्यांच्या अनुयायांवर असला बेगुमान आसुरी हल्ला करून त्यांची दाणादाण उडविण्यांत आली आणि 'कसे भित्रे पळाले' म्हणून त्यांची उलट जी टवाळीहि करण्यांत आली तिच्या बुडाशीं पोलीस अधिकाऱ्यांच्या मनांत कोणती भावना असावी तिचा तर्क करण्याचें काम आम्ही वाचकांच्या कल्पनाशक्तीवरच सोपवितों; पण या टारगट टीकाकारांना एवढेंच बजावतों कीं, त्या ठिकाणीं जमलेले हजारों प्रेक्षक हे लाठीवाल्या पठाणांशीं सामना देण्याच्या कल्पनेनें किंवा तयारीनेंहि आलेले नव्हते. सत्याग्रह हा शांततेचा नैतिक लढा असून तो सत्याग्रह कसल्याहि दटावणीनें दबत नाहीं असें पाहून चिडून जाऊन पोलीस बेभान झाले व त्यांनीं असला आसुरी मार्ग पत्करला, यांत सत्याग्रही लोकांचाच नैतिक विजय आहे. दुसरें असें कीं, सामन्याच्या तयारीनें न आलेल्या जमावावर आगाऊ सूचना न देतां भ्याडाप्रमाणें चोरून हल्ला करणारे हे आततायी शिपाई खरा सामनेवाला भेटला कीं, कोठें तोंडें लपवून बसतात आणि बायोनेटवाल्यांचा कसा धावा करतात याचीहि सर्वांस पुरेपूर माहिती आहे. तेव्हां लक्ष्मीरोडवर जमलेला जमाव घाबरटपणानें पळाला असें भासवून स्वतःच्या शौर्याची टिमकी वाजविण्यांत जो अंतस्थ हेतु आहे तो अत्यंत निंद्य होय.

## नैसर्गिक हक्कांत तडजोड कसली ?

रानदांडग्या लाठीवाल्यांनीं निरपराधी नागरिकांवर लांडग्याप्रमाणें तुटून पडून त्यांस झोडपून काढलें यावरून येथील स्थानिक अधिकाऱ्यांची मनोवृत्ति किती अधोगतीस पोंचली आहे त्याची प्रतीति येते. पण वरिष्ठ अधिकारी तरी याची दखलगिरी घेणार कीं नाहीं? लक्ष्मी रोडवरून जाण्यायेण्याला बंदी केल्याचा हुकूम जाहीर झालेला नव्हता, पांच माणसांहून अधिकांचा जमाव रस्त्यावर

जमण्यालाहि मनाई नव्हती, जमावाकडून कोणत्याहि प्रकारचें अत्याचाराचें कृत्य घडलें नव्हतें, असें असतां हा जो लाठीमाराचा रानटी प्रकार झाला त्याबद्दल मुंबई सरकार काय करणार? सोन्यामारुतीपुढील वाद्यघोषाला परवानगी न देणें हा प्रश्न खरोखर वादग्रस्त नसतांना हिंदूंच्या हक्काची पायमल्ली चालली आहे; आणि तिजविषयीं सात्त्विक संताप येऊन श्रीयुत तात्यासाहेब केळकरांसारख्या सार्वजनिक कार्यांतून बव्हंशीं निवृत्त झालेल्या सुविचारी व सत्त्वस्थ गृहस्थांनींहि सत्याग्रह केला यांत धिक्काराची परिसीमा गांठली गेली. अर्थातच यापुढें कोणतीहि सबब न सांगतां हिंदूंना त्यांचे धार्मिक हक्क निर्वेधपणें उपभोगूं देणें हाच सरकारचा सरळ न्याय्य मार्ग होय. त्या मार्गाचा अवलंब सरकारनें त्वरित करावा आणि हिंदूंच्या हृदयांतलें हें शल्य त्वरित दूर करावें. आपापसांत तडजोड होत नाहीं म्हणून हें प्रकरण भिजत पडलें ही सरकारची सबबहि निर्मूल व निराधार आहे. कारण हिंदूंच्या या नैसर्गिक हक्काच्या बजावणींत तडजोडीचा प्रश्नच उद्भवत नाहीं. हा कांहीं भाऊबंदांच्या वांटणीचा व देवाण-घेवाण करण्याचा प्रश्न नाहीं. प्रत्येक समाजांतल्या धार्मिक मंदिरासंबंधांत इतरत्र जे हक्क आहेत व ज्यांची बजावणी इतर देवळांतून विरोधाशिवाय होते, तशीच ती सोन्यामारुतीच्या देवळाबाबतहि व्हावी अशी निरपवाद व न्याय्य मागणी हिंदूंची आहे. त्यांत इतरांच्या मर्जी-गैरमर्जीचा प्रश्नच उद्भवत नसून विनाकारण यांत नसता खोडा उभा केला गेला आहे. अशा न्याय्य दृष्टीनें या प्रश्नाकडे पाहिल्यास त्या प्रश्नाचा निकाल सहज लावतां येण्यासारखा आहे अशी वरिष्ठ सरकारचीहि खात्री पटेल. याकरितांच या प्रश्नाचा अजून तरी सुविचारानें सत्वर निकाल लावावा अशी विनंती आम्ही गेल्या अंकीं केली होती.

पण त्यानंतर गेल्या शुक्रवारीं पोलिस अधिकाऱ्यांनीं जो अंगावर शहारे आणणारा, राज्यपद्धतीच्या मूलभूत तत्त्वाला काळिमा फासणारा, असा अमानुष लाठीहल्ला करविला त्या योगानें हिंदूंवर 'भीक नको पण कुत्रा आवर' असे उद्गार काढण्याची सकृद्दर्शनीं पाळी आली आहे. अर्थातच वाद्यबंदीच्या हुकुमाचा काय विचार व्हावयाचा असेल तो होईल, पण तूर्त या क्रूर लाठीहल्ल्याची तरी चौकशी होऊन मुंबई सरकारकडून या कामीं ज्यांच्याकडे दोष येईल त्या अधिकाऱ्यांस पुरेपूर प्रायश्चित्त दिलें जावें अशी तात्कालिक मागणी जनतेकडून जोरानें पुढें येत आहे. आणि रस्त्यावरून हक्कानें व न्यायानें जाणाऱ्या-येणाऱ्यांना लाठीमार होण्यांत नुसत्या हिंदूंचाच नव्हे, तर सर्वच नागरिकांचा नैसर्गिक हक्क पायाखालीं तुडविला गेल्यामुळें, त्या प्रश्नाला अधिक व्यापक व तीव्रतेचें स्वरूप प्राप्त झालें आहे यांत शंका नाहीं.

### अतःपर टोलवाटोलवी नको

अशी ही चौकशी होऊन अपराध्यांना भरपूर शिक्षा आणि ज्या निरपरा-

ध्यांना मार बसला त्यांना त्यांच्या जखमांच्या मानानें भरपूर नुकसानभरपाई मिळाली पाहिजे व तशी ती मिळेपर्यंत जनतेचें समाधान होणार नाहीं. तथापि या तांतडीच्या प्रश्नामुळें मूळच्या वाद्यबंदीच्या हुकुमाकडे हिंदु समाजाचें दुर्लक्ष होईल असें अधिकाऱ्यांस वाटत असल्यास तें बरोबर नाहीं. लाठीहल्ल्याच्या चौकशीचें काम ताबडतोब सुरू झालें तरी त्याचा यथाशास्त्र निकाल होण्यास थोडा तरी अवधि लागेल. पण वाद्यबंदीचा हुकूम माघारा घ्यावयाचा तो एकदोन दिवसांतच घेतला पाहिजे; कारण अक्षय्यतृतीयेच्या उत्सवाचा अखेरचा दिवस अगदीं नजीक येऊन ठेपला आहे. तत्पूर्वी हा हुकूम रद्द करून सवाद्य उत्सवाला परवानगी न मिळेल, तर हिंदूंच्या धार्मिक हक्कांना ब्रिटिश सरकार किती तुच्छतेनें लेखतें याची हिंदु समाजाची कल्पना पक्की दृढ होईल. आतां हा प्रश्न नुसता पुण्यापुरताच राहिला नसून त्याला अखिल भारतीय स्वरूप प्राप्त झालें आहे; आणि त्याकरितां दूरदूरच्या ठिकाणांहून अनेक सत्याग्रही स्वार्थत्यागपूर्वक धावून येत आहेत. अशा परिस्थितींत सरकारनें या प्रश्नाची लवकर न्याय्य तड न लावल्यास या प्रश्नाला पुढच्या वर्षी याच्यापेक्षां अधिक व्यापक व भीषण स्वरूप येईल. याकरितां त्या प्रश्नाचीहि अतःपर टोलवाटोलवी न करतां हिंदूंना त्यांचे धार्मिक हक्क निर्वेधपणें उपभोगूं देण्याची जाहीर घोषणा केली जावी. अशी जाहीर घोषणा वेळेवर न केल्यामुळेंच हा जुलमाचा डोलारा रचला गेला आणि त्या डोलाऱ्यावर लाठी-माराचा कळस चढविला गेला! हा जुलमाचा कळस पाहून ब्रिटिश सरकारची सर्वत्र छीःथूः होणार आहे; यास्तव लाठीहल्ल्याची चौकशी करून तो कळस तर त्वरित स्थानभ्रष्ट करावाच, पण असला लाठीमार करण्याचा प्रसंग ज्यामुळें उद्भवला तो जुलमी हुकुमाचा डोलाराच उखडून टाकल्याखेरीज त्यावर असला कळस चढ-विण्याचा मोह पोलीस अधिकाऱ्यांना आवरणार नाहीं. तेव्हां मुंबई सरकारास आपल्या स्वतःच्या व ब्रिटिश राज्याच्या अब्रूची जर कांहीं चाड असेल, तर त्यानें हिंदुधर्माच्या हेटाळणीचा जुलमी डोलारा समूळ खणून काढावा आणि हिंदु समा-जाचीं संतप्त मनें शांत करावीं.

SEP 1996

# मुसलमान पुढाऱ्यांच्या अराष्ट्रीय आकांक्षा : २

[ हिंदुस्थानाला स्वातंत्र्य प्राप्त होणार असें दिसूं लागतांच मुसलमानांनीं या देशाची चिरफाड करून आपला सवता सुभा स्थापन करण्याच्या योजनेचें बीजारोपण कसें केलें, त्याचें वर्णन या लेखांत आहे. या वेळेपर्यंत लीगनें पाकिस्तानाच्या मागणीच्या ठराव अधिकृत रीतीनें स्वीकारला नव्हता. तरी पण स्वराज्यांत हिंदु व मुसलमान एकत्र नांदूं शकणार नाहींत, अशी ओरड करून, सवता सुभा मागण्यासाठीं मुसलमानांना चिथावून देण्यास प्रारंभ झाला होता. हें भावी अरिष्ट ओळखून राष्ट्रीय सभेनें व हिंदूंनीं त्याचा प्रतिकार करावा, असा इशारा या लेखांत दिलेला आहे. ]

### देशाची चिरफाड करण्याची मागणी

हिंदुस्थान देशाची 'हिंदु हिंदुस्थान' आणि 'मुस्लिम हिंदुस्थान' अशी चिरफाड करून या देशांतच मुसलमानांचें निर्भेळ राजकीय वर्चस्व स्थापन केलें जावें अशी मुसलमानांच्या अनेक पुढाऱ्यांची महत्त्वाकांक्षा असल्याचें प्रसिद्ध आहे. पूर्वी सोयीचा वेळ-वक्त पाहून हे विचार मांडले जात असत, आतां राजरोसपणें पुनः पुनः ते मांडले जात आहेत. मुसलमान पुढाऱ्यांच्या अंतःकरणांत रुजत घातलेल्या या विचारांच्या बीजाचा वृक्ष केव्हां होणार एवढाच प्रश्न यापुढें मुसलमानांना महत्त्वाचा वाटतो. राष्ट्रीय स्वराज्य, राष्ट्रीय स्वातंत्र्य, राष्ट्रीय उन्नति या शब्दसमुच्चयांचा अर्थहि त्यांना समजेनासा झाला आहे असें या पुढाऱ्यांच्या वेळोवेळीं प्रकट होणाऱ्या सवत्या सुभ्याच्या भाषेवरून स्पष्ट दिसतें. मुसलमानांची लोकसंख्या हिंदुस्थानांत नऊ कोटि आहे असें मुसलमान पुढारी सांगतात. एवढी मोठी ही जमात हा अल्पसंख्याक समाज म्हणून राहूं शकत नाहीं, तें एक स्वतंत्र राष्ट्रच आहे असें पंजाब प्रांताचे मुख्य प्रधान असलेले सर शिकंदर हयातखानासारखे अधिकारपदस्थ लोक निःशंकपणें सांगतात, यावरूनच त्यांची विचारसरणी काय आहे हें सहज लक्षांत यावयास पाहिजे. एके काळीं हिंदुस्थानावर आम्ही आमचें साम्राज्य गाजविलें हाहि दिमाख ते दाखवितातच. मुसलमान पुढाऱ्यांच्या या विचारसरणीचा राष्ट्रीय दृष्टीनें राजकीय प्रश्नाकडे पाहणाऱ्या हिंदु पुढाऱ्यांनीं खोल विचार केला पाहिजे आणि आपलें राजकीय धोरण ठरविलें पाहिजे.

गेल्या वर्षी कराची येथें भरलेल्या मुस्लिम लीगच्या अधिवेशनांत हिंदु प्रांतांचें 'फेडरेशन' वेगळें आणि मुसलमानी प्रांतांचें 'फेडरेशन' वेगळें करावें अशी

( केसरी, दि. ३१ मार्च १९३९ )

योजना अधिकृत रीत्या पुढें मांडली गेली होती. हिंदुस्थानाबाहेरच्या मुसलमानी देशांचाहि अंतर्भाव या 'फेडरेशन'मध्यें पुढेंमागें करण्याची सोय ठेवावी असाहि ती योजना मांडणाऱ्यांचा हेतु होता. गेल्या आठवड्यांत मिरत येथें मुस्लिम लीगची त्या विभागाची एक महत्त्वाची परिषद् झाली. या परिषदेचे अध्यक्ष नबाबजादा लियाकतअल्लीखान यांनीं या परिषदेंत आपलें अंतःकरण अगदीं उघडें करून आपले विचार मांडले. अखिल भारतीय मुस्लिम लीग या संस्थेचे ते मुख्य कार्यकारी चिटणीस आहेत, हें त्यांच्या विचारांचें महत्त्वमापन करतांना लक्षांत ठेवलें पाहिजे. आपल्या अध्यक्षीय भाषणांत ते म्हणाले कीं, " सध्यांच्या परिस्थितींतून मार्ग काढावयाचा म्हणजे एकच उपाय सुचतो. तो हाच कीं, हिंदु व मुसलमान या समाजांनीं एकमेकांना अनिर्बंध रीतीनें आपापली उन्नति करून घेण्याची संधि द्यावी. ही गोष्ट उघड आहे कीं, जर हिंदु व मुसलमान सुखासमाधानानें राहूं शकत नसतील, तर हिंदुस्थान देशाची धार्मिक व सांस्कृतिक दृष्ट्या विभागणी करावी आणि तेथें हिंदु सत्ता व मुसलमान सत्ता स्वतंत्रपणें स्थायिक केली जावी. एकमेकांना त्रास न देतां सुखानें राहण्याची हीच योग्य युक्ति दिसते. " अशा रीतीनें या अध्यक्षांनीं आपल्या पोटांत असलेलें विष ओकलें आणि हे विचार मुसलमान समाजाच्या सर्वसाधारण विचारांचे पडसाद नाहींत असें म्हणणें धाष्टर्याचेंच ठरेल !

### असंतोषाच्या कारणांचा लंगडा युक्तिवाद

मुसलमानांच्या ज्या मागण्या असतील त्या पूर्णपणें मान्य कराव्यात आणि त्यांच्या हातीं कोरा कागद देऊन सलोख्याकरितां ते ज्या अटी लिहितील त्याच्यावर आपण डोळे झाकून सही करावी असें म्हणणाऱ्या पुढाऱ्यांनीं व हिंदु समाजांतील विचारी लोकांनींहि वरील सबल्या सुभ्याच्या मुसलमानी योजनेचा सूक्ष्म दृष्टीनें अभ्यास केला पाहिजे. हिंदु व मुसलमान यांचें पूर्ण ऐक्य होऊन राष्ट्राच्या स्वातंत्र्याच्या झगड्यांत दोन्ही समाजांनीं खांद्याला खांदा लावून लढावें ही ध्येयदृष्टि तात्त्विक दृष्ट्या आक्षेपार्ह असें कोण म्हणेल ? परंतु हें ध्येय साध्य करण्याकरितां द्यावी लागणारी किंमत किती मोठी आहे हें पाहिलें, म्हणजे ही ध्येयदृष्टि स्वप्नसृष्टि ठरते त्याची वाट काय ? मुसलमानांच्या असंतोषाचीं कारणें दूर करावीं असें हे भोळे लोक मोठ्या साळसूदपणें सांगत असतात. मिरत येथील परिषदेंतच जीं कारणें मांडलीं गेलीं तीं पाहिलीं म्हणजे हाहि युक्तिवाद लंगडा पडतो. मिरतच्या परिषदेच्या अध्यक्षांनीं सांगितलें कीं, " प्रांतिक स्वायत्तता संस्थापन केली गेल्यापासून मुसलमानांचें राजकीय वर्चस्व नाहींसें झालें. उद्यां 'फेडरेशन' आलें तर मुसलमान हे गुलामच बनतील ! मुसलमानांच्या धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांवर फारच मोठे आघात होत आहेत आणि गव्हर्नर आमचें संरक्षण करूं शकत नाहीं ! " असंतोषाचीं हीं कारणें दुरुस्त करावयाचीं

म्हणजे हिंदुस्थानची भावी राजसत्ता मुसलमानांच्या हातीं द्यावयाची आणि त्यांचें धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक जूं हिंदूंनी आपल्या मानेवर वागवावयाचें हा याचा अर्थ होय! सध्यांच्या लोकशाहीच्या युगांतील नागरिक हक्कांची मातब्बरी जाणणारा कोणता स्वाभिमानी हिंदु हें मान्य करील?

### स्वातंत्र्यमंदिराच्या पायांत सुरुंग

आज प्रांतांतील राजसत्ता बहुमतवाल्या मतदारांच्या हातीं दिली गेली आहे. उद्यां अखिल भारतांतील राजसत्ता लोकशाहीच्या दंडकाप्रमाणें अशीच बहुमतवाल्या पक्षाच्या हातीं खास जाणार. यांत वावगें किंवा आक्षेपार्ह असें कांहींच नाहीं. कोणत्याहि राष्ट्रीय वृत्तीच्या देशभक्ताला अशा तऱ्हेची लोकशाही स्थापन झाली तर आनंदच वाटला पाहिजे; परंतु मुसलमान पुढाऱ्यांना स्वतःच्या राजकीय वर्चस्वाची काळजी प्रथम असल्यानें त्यांना या लोकशाहीच्या तत्त्वाची महती वाटतच नाहीं. उलट ही लोकशाहीची व राष्ट्रीय वृत्तीची लाट थोपवून धरण्याइतकी अडवणूक आपण करूं शकलों, तर हिंदु पुढारी स्वराज्याच्या अधिकाराच्या लालसेनें आपलें म्हणणें मान्य करतील असा त्यांचा कयास आहे. बॅ. जिना यांचें मिरत येथील भाषण किंवा गेल्या आठवड्यांत दिल्लीस असेंब्लींत 'फिनॅन्स बिला'वर व 'अँग्लो-ब्रिटिश करारा'वर त्यांनीं जीं भाषणें केलीं तीं पाहिलीं म्हणजे बॅ. जिना हे एक नवा डाव खेळत असून अडवणूक, बुजगावणें, धाकदपटशा या मार्गांनीं हिंदूंना ते भेडसावीत असल्याचा भास होतो. राजकारणाच्या खेळांत धिमेपणा व दूरदृष्टि लागते. घाबऱ्या घाबऱ्या तात्पुरता विचार करून "नको बाबा, रागावूं नको, फुटून जाऊं नको, तुला पाहिजे तें देतों," असें म्हणून चालत नाहीं. स्वतंत्र व वैभवशाली हिंदी राष्ट्राचें लोकशाहीच्या तत्त्वांवर अधिष्ठित झालेलें जें सुंदर मंदिर बांधण्याची आकांक्षा आज राष्ट्रांतील जनतेनें हृदयाशीं धरली आहे, त्या मंदिराच्या पायांतच, या मागण्या मान्य केल्या गेल्या तर, सुरुंग भरून ठेवल्याचें पाप लागल्याशिवाय राहणार नाहीं.

बॅ. जिना यांनीं असेंब्लींत स्वच्छपणें दोन्ही वेळां प्रश्न केला कीं, "आम्हां मुसलमानांचें हित आम्ही फिनॅन्स बिल फेटाळण्यानें काय साधणार आहे? सरकार आमच्याकडे पाहात नाहीं. राष्ट्रीय सभावाले सत्ताधीश आम्हांला पायाखालीं तुडवितात! म्हणून आम्ही तटस्थ राहूं." इंडो-ब्रिटिश व्यापारी कराराचा प्रश्न चर्चिला जात होता त्या वेळीं बॅ. जिना म्हणाले कीं, "हा व्यापारी प्रश्न इंग्रज भांडवलवाले व हिंदु भांडवलवाले यांच्यामधील आहे. आम्ही मुसलमानांनीं यांत कां पडावें?" बॅ. जिना यांनीं पसरलेलें हें शब्दजाल नीट उकलून पाहिलें, तर असें स्वच्छ दिसतें कीं, या मुसलमान पुढाऱ्यांना मुसलमानी सत्तेचें, अधिकारांचें आणि स्वतंत्र अस्तित्वाचें शल्य या देशांत कायमचें बोचत ठेवावयाचें आहे. त्यांना सुडेटन जर्मनांची सुटका हिटलरनें केली तशी भविष्य काळीं केव्हां तरी घटना घडून

यावी असें वाटतें आणि ती वेळ यावी अशी त्यांची इच्छा आहे. म्हणून याच वेळीं इंग्रजी राजकर्त्यांना मोंजारून आणि काँग्रेसच्या हिंदु पुढाऱ्यांना भेडसावून सुडेटन जर्मनांप्रमाणेंच अधिकारांचा व सत्तेचा स्वतंत्र विभाग मिळविण्याची त्यांची खटपट आहे. अर्थात् ही त्यांची खटपट हिंदु पुढारी जितके भोळे व जितके भित्रे ठरतील त्या प्रमाणांत यशस्वी ठरेल हें सांगणें नकोच.

## मुसलमानांच्या मागण्या

हिंदुस्थानांतील सर्व मुसलमान पुढारी या एका भावनेनेंच प्रेरित झाले आहेत ही गोष्ट हैद्राबाद संस्थानांत ज्या मुत्सद्देगिरीच्या उलाढाली चालू आहेत त्यांवरूनहि लक्षांत येतें. हैद्राबादच्या निजामच्या अधिकाऱ्यांनीं स्टेट सेक्रेटरीपर्यंत आपला वशिला बांधून त्यांना त्यांनीं आपलेसें करून घेतलें आहेच. नुकतेंच गेल्या आठवड्यांत लिव्हरपूल येथें भाषण करतांना लॉर्ड झेटलंड यांनीं हैद्राबादच्या राज्यव्यवस्थेची मनमुराद तारीफ केली व त्याला उत्तम शिफारसपत्र दिलें. इकडे लोकांच्या चळवळीमुळें हैद्राबाद दरबार बहुसंख्य हिंदु प्रजेला कदाचित् लोकशाही तत्त्वानुसार अधिकार देईल. त्या गाडीला खीळ घालण्यांचा प्रयत्न पद्धतशीर रीतीनें चालू आहे. 'मजलीस इत्तिहाद-उल्-मुस्लिम' या संस्थेनें सर अकबर हैदरी यांना असें कळविलें आहे कीं, हैदराबादेंतील मुसलमानांचें राजकीय वर्चस्व कोणत्याहि कारणांनीं रतिमात्र सुद्धां नव्या सुधारणांनीं कमी होतां कामा नये! त्यांच्या मागण्यांमध्यें पुढील चार मागण्या प्रमुख आहेत. (१) असफजाह घराण्याच्या राजपुरुषाची सत्ता अमर्याद राहिली पाहिजे. (२) अगदीं जरूर तरच हैद्राबादनें 'फेडरेशन'मध्यें सामील व्हावें पण आपले अधिकार गमावूं नयेत. (३) परंपरागत असलेलें मुसलमानांचें सामाजिक, धार्मिक आणि राजकीय वर्चस्व कायम राहिलें पाहिजे. त्याकरिता सर्व स्वराज्यसंस्थांत व कायदेमंडळांत कायद्यानेंच मुसलमानांना बहुमत दिलें गेलें पाहिजे आणि त्यांचा मतदारसंघ स्वतंत्र असला पाहिजे. (४) उर्दू हीच संस्थानची भाषा राहिली पाहिजे. हैद्राबाद संस्थानांतील लोकसंख्येनें एकदशांश सुद्धां नसलेल्या मुसलमानांच्या या मागण्या आणि बॅ. जिना वगैरेच्या मागण्या एकाच मुशींत ओतल्या आहेत आणि त्यांच्यामागें असलेली जातीय स्फूर्ति एकच आहे, हें लक्षांत ठेवलें म्हणजेच या प्रश्नाची खरी मख्खी समजेल असें वाटतें.

हैद्राबाद येथील स्टेट काँग्रेसचा सत्याग्रह महात्मा गांधींनीं थांबविला हें खरें, पण त्याचा परिणाम हैद्राबाद येथील अधिकाऱ्यांवर अगर तेथील मुसलमान पुढाऱ्यांवर काय झाला आहे हें तेथील परिस्थितीवरून आणि वरील मुसलमानांच्या मागण्यांवरून स्पष्ट होतें. खुद्द हैद्राबादच्या लोकांना ही मुसलमानांची विचारसरणी आणि खाकसार पक्षाची सार्वराष्ट्रीय संघटना माहीत असल्यामुळें ते लोक म. गांधींनीं हा सत्याग्रह थांबविल्यामुळें भीतिग्रस्त झाले आहेत. त्यांना हें पुरतेपणीं माहीत आहे कीं,

मुसलमानांची संघटित शक्ति सर्व हिंदुस्थानांत – संस्थानांत अगर ब्रिटिश मुलुखांत – कोणत्याहि तऱ्हेचे अधिकार हिंदूंना मिळूं नयेत म्हणून उपयोगांत आणली जात आहे; आणि त्यामुळेंच हैद्राबादचा प्रश्न हा संस्थानी प्रजेच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचा ठरतो. हैद्राबाद स्टेट काँग्रेसचा सत्याग्रह बंद करण्याचा सल्ला देतांना हिंदुमहासभा आणि आर्य समाज यांच्या स्वतंत्र सत्याग्रहामुळें हैद्राबादेंतील चळवळ जातीय स्वरूपाची बनली आहे म्हणून तो दिला गेला असें सांगण्यांत आलें होतें. परंतु हैद्राबादेंत निजामी सत्ता आणि मुसलमान समाजाचें धार्मिक व सांस्कृतिक वर्चस्व हीं इतकीं एकरूप आहेत कीं, गांधीजींच्या अपेक्षेप्रमाणें शुद्ध राजकीय स्वरूपाची चळवळ तेथें केव्हांच होणें शक्य नाहीं, कारण या बाबतींत तरी गांधीजींची अपेक्षा असंभाव्य आहे असें वाटतें. धर्माचाराचें स्वातंत्र्य हा एक नागरिक स्वातंत्र्याचा प्रमुख भाग आहे हें लक्षांत ठेवलें म्हणजे वरील सिद्धान्त सहज पटेल. हैद्राबादेंतील मुसलमानांच्या उठाठेवींमुळें अखिल हिंदुस्थानांतील मुसलमान पुढाऱ्यांची पाताळयंत्री कारवाई लक्षांत येते आणि तिचें अराष्ट्रीयत्व उघडें पडतें हें स्पष्ट आहे.

### राष्ट्रीय लढा स्वतःच्या सामर्थ्यावर चालवा

मुसलमानांच्या अराष्ट्रीय वृत्तीचें अशा रीतीनें निःपक्षपाती वृत्तीनें परीक्षण केलें म्हणजे शुद्ध राष्ट्रीयत्वाचीं बीजें या देशाच्या मनोभूमिकेंत कशीं रुजवावीं हा प्रश्नच पडतो. मुस्लिम लीगवाले आणि हिंदुसभेचे पुढारी दोघेहि जात्यंध व स्वार्थी आहेत असा आरोप करून हा गुंतागुंतीचा पण जिव्हाळ्याचा प्रश्न डावलण्याची एक सोपी युक्ति स्वतःस वास्तववादी म्हणविणाऱ्या कृतिशून्य लोकांनीं काढली आहे. या ऱ्हस्व बुद्धीच्या बटूंना स्वतः कांहींच करावयाचें नसतें आणि त्यांच्या शहरी धर्मलंड आचारविचारांच्या आड हे प्रश्न केव्हांच येत नाहींत, पण सामान्य जनतेची ही स्थिति नाहीं, हें हिंदूंच्यावर केवढा धार्मिक जुलूम होतो आहे, याची हैद्राबादेस जाऊन त्यांनीं दखलगिरी घ्यावी म्हणजे त्यांना समजेल. स्वातंत्र्यवीर बॅ. सावरकर यांच्या सांस्कृतिक अभिमानाची थट्टा करणाऱ्यांनीं आपल्या जिव्हा व लेखण्या परजण्यापूर्वी स्वतःच्या नवमतवादाला आणि समाजवादी धर्मशून्यतेला कोठें जागा आहे काय हें नीट डोळे उघडून पहावें हें उत्तम. मुसलमान पुढाऱ्यांच्या धोरणाचा पूर्वेतिहास, गेल्या वर्षी कराची येथें त्यांनीं 'पॅन् इस्लामिझम्'ची केलेली घोषणा, मिरत येथें मुसलमानी हिंदुस्थान उत्पन्न करण्याचा केला गेलेला मनसुबा, हैद्राबादेंतील मुसलमानांच्या मुसलमानी वर्चस्व कायम ठेवण्याबद्दलच्या मागण्या या सर्व गोष्टी नीट दृष्टीपुढें ठेवूनच हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आम्हांला स्पष्ट वाटतें कीं, शुद्ध राष्ट्रीयत्वाचा प्रचार करण्याचा आटोकाट प्रयत्न करावा व ती बुद्धि ज्यांची असेल अशाच मुसलमानांचा राष्ट्रीय चळवळीस पाठिंबा घ्यावा आणि या देशांत असलेल्या बहुसंख्य हिंदूंनीं इतर मुसलमानांच्या कसल्याहि साहाय्याची अपेक्षा न करतां आपला स्वातंत्र्याचा लढा आपल्या स्वतःच्या

सामर्थ्याच्या बळावर लढवावा हें उत्तम. हिंदु-मुसलमानांचें ऐक्य झाल्याशिवाय हिंदुस्थान स्वतंत्र होऊं शकत नाहीं, हा भ्रम टाकून देऊन या ऐक्याकरितां राष्ट्र-पुरुषांच्या शरीरांत स्वतंत्र मुसलमानी सत्तेच्या विष-बीजाचें रोपण करूं नये हेंच श्रेयस्कर होय. आज या बाबतींत युरोपचा अलीकडचा इतिहास दृष्टीपुढें ठेवून काळजी घेतली नाहीं, तर भावी पिढ्या या ऐक्यवादी समेट-सेनापतींना शिव्याशाप दिल्याशिवाय राहणार नाहींत. मुसलमानी अराष्ट्रीय आकांक्षांचा वरील चित्रपट या दृष्टीनें बोधप्रदच ठरेल.

---

# सिंधी हिंदूंचा छळ आणि हिंदूंच्या कर्तृत्वाची कसोटी : ३

[ सिंध प्रांत मुंबई प्रांतांतन अलग होऊन तेथें बहुसंख्य मुस्लीम मंत्रि-मंडळाचा कारभार चालूं झाल्यावर सक्कर भागांत व इतरत्र जे दंगे झाले व ज्यांत हिंदूंच्या वित्ताची व अब्रूची होळी झाली, त्यावर उपाययोजना करण्या-विषयीं या लेखांत इशारा दिला आहे. हिंदूंचा असला छळ थांबविण्याची पराकाष्ठा हिंदुमहासभेनें करावी. कारण तीच तिच्या सामर्थ्याची कसोटी होय, असें यांत म्हटलें असून, मुसलमानांना पाकिस्तान मिळाल्यास त्यांतून हिंदूंची हकालपट्टी होईल हें भविष्य जाणून पाकिस्तानाच्या मागणीला कसून विरोध करण्याची सूचना यांत दिली आहे. तसा विरोध न झाल्यामुळे सात वर्षांनंतर सिंधी हिंदूंना त्याचा अत्यंत कटु अनुभव आला. ]

### सिंधमधील मोंगलाई

हिंदु लोकांवर त्यांच्या परीक्षेचे प्रसंग दिवसानुदिवस अधिकाधिक येत जाणार यांत शंका नाहीं. विशेषतः जे हिंदु मुसलमानी संस्थानांत व मुसलमानी प्रांतांत राहतात त्यांवरील संकटांना सीमाच राहणार नाहीं. वर्ष-दीड वर्षांपूर्वी हैद्राबाद संस्थानांत निःशस्त्रप्रतिकाराचा लढा चालवून तेथील कटु अनुभव हिंदूंनीं घेतला व त्या संस्थानांत जन्म काढण्याचें दुर्दैवानें ज्यांच्या नशिबीं आलें आहे ते तिकडील रहिवाशी हिंदु अद्यापिहि यातना भोगीत आहेतच. परंतु ती बोलूनचालून मोंगलाई असल्यामुळें तिच्या दुर्लौकिकास साजेल असाच हा छळवाद आहे असें फार तर कोणी म्हणेल. पण सिंधसारख्या ब्रिटिश हद्दींतील प्रांतांतहि मोंगलाईमधील यातनांसारखेच चटके बसावे यापेक्षां अधिक नामुष्कीची व खेदाची गोष्ट ती कोणती!

( केसरी, दि. १२ नोव्हेंबर १९४० )

सिंधमधील हिंदूंची इतकी दुरवस्था कां, याची कल्पना सिंधची भौगोलिक स्थिति डोळ्यांपुढें आणली असतां येणार आहे. त्याच्या पश्चिमेस बलुचिस्तान हा पहाडी मुसलमानांचा देश असून लूटमारीवर गुजराण करणें हा त्यांचा पेशाच आहे. पूर्वेस भावलपूर व खैरपूर हीं दोन संस्थानें मुसलमानांचीं आहेत आणि उत्तरेस लागून असणाऱ्या पंजाबांत् मुसलमानांचेंच प्राबल्य आहे. अंत मुसलमान व तिन्ही बाजूंनीं मुसलमानी प्रदेश व संस्थानें या कारणानें हिंदूंचा सतत छळ चालविण्यास सिंधमधील मुसलमानांना चांगलेंच फावलें आहे. तशांतून हा प्रांत पूर्ववत् मुंबई इलाख्यास जोडलेला असता तर मुंबई सरकाराचें दडपण त्याजवर पडल्यानें तत्प्रांतीय मुसलमानांना नंगा नाच घालणें हल्लींसारखें साधलें नसतें. पण हिंदुस्थान सरकारच्या नवीन कायद्यान्वयें तो स्वतंत्र झाला आहे व त्यावरील सत्ताहि मुसलमानांकडेच गेली आहे; त्यामुळें 'आधींच मर्कट, तशांतहि मद्य प्याला' अशासारखी तेथील मुसलमानांची स्थिति झाली आहे.

वरील वर्णनानें सिंध म्हणजे प्रति हैद्राबाद संस्थान कसें बनलें आहे याची वाचकांस कल्पना आली असेल. पण त्याच्या भरीला आणखी एक सत्य घातलें असतां सिंध प्रांत हैद्राबादेहूनहि और असल्याविषयीं अधिकच खात्री होईल. कारण हैद्राबाद संस्थानांत राज्य मुसलमानांचें असलें तरी बहुसंख्या हिंदूंची आहे; पण सिंधमध्यें राज्य मुसलमानांचें व बहुसंख्याहि मुसलमानांचीच अशी सर्वस्वी प्रतिकूल स्थिति आहे. शिवाय हैद्राबाद संस्थानाला नाहीं असा सिंधला आडदांड व धर्मवेड्या बलुचिस्तानाचा शेजार असल्यामुळें तेथील हिंदु समाजाचे हाल अंगावर शहारे आणण्यासारखे भयंकर होत आहेत. यावरून असेंहि वाटतें कीं, हिंदूंना सळो का पळो करून हाकून लावून सदर प्रांत अविन्धमय बनविण्याचा इरादा, तो प्रांत वेगळा करून मागण्यांत तत्प्रांतीय मुसलमान पुढाऱ्यांचा आधींपासूनच असावा. त्याच्या जोडीस अलीकडे पाकिस्तानच्या कल्पनेनें मुसलमान पुढाऱ्यांच्या डोक्यांत ठाणें दिलें आहे तें लक्षांत घेतल्यास पाकिस्तानच्या योजनेस अनुसरून हिंदुस्थानचे तुकडे पाडल्यावर सिंधमधील हिंदूंना परप्रांतांत घालवून द्यावयाच्या उपक्रमाची ही सुरुवातहि असेल!

### खिलाफत चळवळीनें धर्मवेड पसरलें

सिंध प्रांतांत हिंदूंची कत्तल आज उतास आलेली दिसत असली, तरी तिचा अल्पसा प्रारंभ सन १९२० सालापासूनच झाला असल्याचें दिसून येतें. त्यापूर्वी मुसलमानांत धर्मवेड नसून ते हिंदूंशीं शेजारधर्मानें वागत असत. पण सदर वर्षी खिलाफतीच्या चळवळीमुळें मुसलमानांत धर्मवेड वाढूं लागलें. खिलाफतीच्या चळवळीनें मुसलमानांच्या मनांत हिंदूंविषयीं जी धार्मिक द्वेषभावना उत्पन्न केली तिच्यांत अलीकडे मुस्लिम लीगच्या चळवळीनें राजकीय द्वेषाची नवी भर टाकली. लीगला मंजलगा प्रकरणाचा खासा आधार मिळाला व त्या आधारावर वैराचें विष

लीगच्या पुढाऱ्यांनीं राज्यकारभारांतहि कालविलें. हिंदूविरुद्ध सारा प्रांत उठविण्याकरितां लीगच्या पुढाऱ्यांनीं अशा अनेक साधनांचा उपयोग केला.

अशा रीतीनें मुस्लिम लीगनें चोहोंकडून रान उठवून मुसलमान समाज हिंदूविरुद्ध खवळून सोडला. पुढें प्रांताची राजकीय सत्ता काय ती हातीं घ्यावयाची राहिली. ती या उपायांनीं साध्य होऊन लीगनें सिंधच्या विधिमंडळांतील मुसलमान सभासदांत फूट पाडून मुस्लिम लीगचें नसलेलें अल्लाबक्ष मंत्रिमंडळ उलथून टाकलें व तेथें सध्यांच्या बंदेअल्लीखान मंत्रिमंडळाची स्थापना केली. मंत्रिमंडळच मुस्लिम लीगचें बनल्यानंतर हिंदूंची त्रेधा उडवून देण्यास मुसलमानांना काय अवकाश! गुंडगिरीला अडथळा काय तो डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट व पोलीस सुपरिंटेंडेंट हे मुसलमान नसल्यास व युरोपियन असल्यास त्यांजकडून व्हावयाचा. पण सध्यांच्या मंत्रिमंडळानें याबाबतींत जिल्हाधिकाऱ्यांचीहि हुकमत कांहीं बाबतींत काढून घेतली असल्यामुळें आपल्या अब्रूकरितां जे अधिकारी कडक उपायांचा अंमल करण्याचें मनांत आणतील त्यांनाहि ती गोष्ट दुर्घट झाली आहे.

मंत्रिमंडळानें केलेल्या या कडेकोट बंदोबस्ताचा परिणाम असा घडून आला कीं, कोणत्याहि हिंदूचा खून हमरस्यावरहि पाडण्यास मुसलमानांना दिक्कत वाटेनाशी झाली. पूर्वीच्या मुसलमानांच्या दंग्यांत सुमारें दोनशें हिंदूंचे मुडदे पडलेच, पण त्यानंतर दर आठवड्याला होणाऱ्या खुनांचा विचार केल्यास किरकोळ खूनहि तितकेच भरतील असें वाटतें. या खुनी इसमांपाशीं बंदुका, पिस्तुलें यांसारखीं हत्यारें असतात. त्यांच्या साहाय्यानें हिंदूंचे खून करून, घरें लुटून किंवा बायकामुलें पकडून पळून जाण्यास व लपविण्यास ज्या सक्कर जिल्ह्यांत हा अनर्थपात होत आहे त्याला अगदीं लागूनच भावलपूर व खैरपूर हीं मुसलमानांचीं संस्थानें व बलुचिस्तान हा देश आहे. खुनी व लुटारू मुसलमानांची एक टोळीच असून तिला कोणाचा तरी गुप्त आश्रय आहे अशी तिकडील युरोपियन अधिकाऱ्यांची समजूत झाली आहे. सक्कर जिल्ह्यांत या टोळीचा दरारा इतका बसला आहे कीं, कोणी हिंदु आपलें गांव सोडून स्टेशनावर जाण्यासहि धजत नाहीं किंवा दुकान उघडें ठेवून त्यांतहि बसूं शकत नाहीं. मुसलमानांप्रमाणें हिंदूंपाशींहि कोठें कोठें बंदुकी, रिव्हॉल्व्हर यांसारखीं हत्यारें क्वचित् आहेत. तीं घरांत अगर दुकानांत घुसून मुसलमान त्यांजपासून हिसकावून नेतात अशीहि हिंदूंची तक्रार आहे. हिंदूंच्या या दौर्बल्याचा फायदा घेऊन मुसलमानांनीं चालविलेल्या हत्याकांडांतून असेंब्लीचे सभासद व साधूहि सुटले नाहींत हें लक्षांत ठेवावयास पाहिजे.

### युरोपिअन व्यापाऱ्यांचीहि ओरड

मुसलमानांनीं हिंदूंचें चालविलेलें हें हत्याकांड कसें थांबेल याविषयीं निरनिराळ्या संस्थांनीं व लोकांनीं निरनिराळे उपाय सुचविले आहेत. युरोपियन समाज परकीय असल्यामुळें तो स्वतःच्या अंगास चाट

लागण्याचा संभव नसल्यास असल्या भानगडींच्या वाटाघाटींत सहसा शिरत नाहीं. परंतु सिंधमध्यें मुसलमानांनीं खुनांनीं, दंग्याधोप्यांनीं, जाळपोळींनीं व लूटमारींनीं जी अंदाधुंदी माजविली आहे तिच्या योगानें व्यापारधंदाहि नीट चालत नाहीं आणि लहानमोठ्या गांवांत राहाणारे दुकानदार नवीन मालाची घाऊक खरेदी न करतां कामचलाऊ खरेदीवरच भागवून घेत आहेत; याची झळ कराची, हैद्राबाद यांसारख्या मोठ्या नगरांतून पेढ्या स्थापून बसलेल्या युरोपियनांस चांगलीच जाणवूं लागल्यामुळें तेहि या मुसलमानांच्या बेबंदशाहीविरुद्ध ओरडत उठले आहेत.

हिंदूंच्या कोरड्या आक्रोशाची कांहींच दाद लागेनाशी झाल्यावर त्यांनीं सक्कर येथें कांहीं दिवसांपूर्वी राष्ट्रीय सभा, हिंदुसभा व पंचायत यांतील सर्व हिंदूंची एक सभा भरवून तिच्यांत सिंध असेंब्लीमध्यें व मंत्रिमंडळामध्यें जे हिंदु म्हणून असतील त्यांनीं राजिनामे द्यावे व गव्हर्नरानें सध्यांची घटना तहकूब करून कायदा व सुव्यवस्था हीं खातीं आपल्याकडे घ्यावीं असे ठराव केले आहेत. पण त्यांजपेक्षां युरोपियनांनीं आतां या बाबतींत लक्ष घातल्यानें त्यांच्या आक्रोशामुळें तरी सिंधमधील हिंदूंच्या दुःखाची कहाणी संपते किंवा काय तें पाहावयाचें आहे. युरोपियन असोसिएशननें मंत्रिमंडळास खडखडीत विचारलें आहे कीं, जर तुम्हांला कायद्याचें व न्यायाचें राज्य पाहिजे असेल तर ज्यांच्यावर या कामाची जोखीम आहे त्या जिल्हाधिकाऱ्यांना हें काम निर्वेधपणानें कां करूं देत नाहीं ! युरोपियन असोसिएशननें जसा हा खोचदार प्रश्न विचारला आहे, तसाच प्रश्न सक्कर प्रकरणाची चौकशी करण्यासाठीं ना. वेस्टन या न्यायाधीशास नेमण्यांत आलें होतें, त्यांनींहि आपल्या रिपोर्टांत विचारला आहे. त्यावरूनच मुसलमान मंत्रिमंडळाचें काळेंबेरें स्वरूप चटकन् ध्यानांत येत आहे.

## जिल्हाधिकारी जागे झाले

युरोपियन असोसिएशननें सिंध मंत्रिमंडळास चमकावल्याचा त्वरित परिणाम असा झाला आहे कीं, जिल्हाधिकारी आपापल्या कल्पनेप्रमाणें खटपटीस लागले आहेत. जाकोबाबादच्या अधिकाऱ्यांनीं आपल्या जिल्ह्याचे लहान लहान विभाग पाडून त्यांत जर कसलीहि गडबड झाली तर त्यांतील जमीनदारांना जबाबदार धरूं असें त्यांस बजावलें आहे. सक्करचे ॲडिशनल डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट मि. हालफर्ड यांनीं रोहरी विभागांतील दोनशें जमीनदारांची सभा भरवून हीच योजना त्यांस समजून सांगितली. लहान खेड्यांतील हिंदूंनीं जिवाच्या भयानें मोठ्या गांवीं राहावयास जावें ही गोष्ट त्यांना पसंत नसून, त्यामुळें उत्पन्न होणाऱ्या धांदलींत दंगेखोरांना अधिकच हात मारावयास सांपडेल असें त्यांचें मत आहे. म्हणून हिंदूंच्या प्रत्येक खेड्यावर रात्रंदिवस पाळत ठेवण्याची योजना त्यांनीं केली आहे. पांचांपेक्षां अधिक लोकांनीं एकत्र जमूं नये असाहि हुकूम काढण्याचा त्यांचा विचार आहे. सक्करचे डि. सुपरिंटेंडंट मि. जेन्नर

यांनीं मिरपूर माथेली येथें पोलीस अधिकाऱ्यांची एक परिषद् भरवून दंग्याच्या भागांत पांच सशस्त्र लॉऱ्या ठेवावयाच्या व त्यांत प्रवाश्यांना मोफत बसवून कामधंद्याच्या गांवीं न्यावयाचें अशी योजना काढली आहे.

सक्कर येथें ता. ६ नोव्हेंबर रोजीं मुख्य मंत्री मीर बंदेअलीखान यांच्या अध्यक्षतेखालीं परिषद् झाली. तिला भावलपूरच्या मुख्य प्रधानांना व खैरपूरच्या जबाबदार अधिकाऱ्यांना मुद्दाम बोलाविण्यांत आलें होतें व त्याशिवाय सक्कर जिल्ह्याचे वरिष्ठ अधिकारीहि हजर होते. सदर अधिकाऱ्यांना बेबंदशाही मोडण्याकरितां व दंगेखोरांची टोळी पकडण्याकरितां सरकारी मदत देण्याचें मुख्य प्रधानांनीं कबूल केलें. त्या सभेंतहि जिल्ह्याचे बंदोबस्ताच्या सोयीसाठीं विभाग पाडण्याची योजना मांडण्यांत आली. परिषद् आटोपल्यावर जिल्हाधिकारी व पोलीस यांनी झडत्यांचें सत्र सुरू करून सात इसमांना पकडलें. सक्करचे अॅ. डि. मॅजिस्ट्रेट मि. हालफर्ड यांनीं मंझलग्यांत प्रवेश न करण्याची मुदत १४४ कलम लावून नोव्हेंबर ८ पासून दोन महिने वाढविली आहे.

### हिंदुमहासभेचें कर्तव्य

वरील प्रयत्नांनीं सिंधमधील दंगल कदाचित् थांबेल व ती न थांबली, तर मंत्रिमंडळाचे अधिकार काढून घेऊन सिंधचा गव्हर्नर ती कडक उपायांनीं बंद पाडील. परंतु तेवढ्यानें हिंदूवरील संकट कायमचें टळलें असें होत नाहीं. सिंधमधील हिंदु लोकांचें जीवित सतत मुसलमानांच्या कृपेवर अवलंबून रहावें ही स्थिति केव्हांहि इष्ट नाहीं. मुसलमानांनीं हिंदूंच्या वाटेस पुनः जाऊं नये असें सामर्थ्य हिंदूंत कधीं ना कधीं तरी यावयास पाहिजेच. जर बहुसंख्य हिंदूंच्या प्रांतांत अल्पसंख्य मुसलमान सुरक्षित राहतात तर बहुसंख्य मुसलमानांच्या प्रांतांत अल्पसंख्य हिंदु कां सुरक्षित राहूं नयेत हा रोकडा प्रश्न आहे. ही गोष्ट मुसलमानांइतके किंबहुना त्यांहूनहि काकणभर अधिक सामर्थ्यवान् हिंदु होतील तरच घडून येणार आहे. तें सामर्थ्य सिंधमधील हिंदूंत आणण्याचें यश हिंदुमहासभेनें मिळविलें तरच अखिल भारतांतील हिंदूंचा प्रश्न सुटणार आहे. किंबहुना ती त्याची कसोटीच ठरणार आहे. यासाठीं सिंधमधील हिंदु पुढारी व हिंदुमहासभेचे पुढारी यांनीं एकत्र बसून कांहीं उपाय शोधून काढणें अत्यंत आवश्यक आहे. सिंधमधील हिंदूंची परिस्थिति नीट समजून घेऊन व तिजवर उपाय ठरवून जर सिंधबाहेरील हिंदूंचा सक्रिय पाठिंबा हिंदुमहासभा सिंधला मिळवून देईल तर हिंदुमहासभा आपल्या कर्तव्यास जागली असें लोकनिदर्शनास येईल. येत्या डिसेंबर महिन्यांत मदुरेस हिंदुमहासभेचें अधिवेशन व्हावयाचें आहे, त्या अधिवेशनापुढें हा विषय विचाराकरितां ठेवण्यांत आल्यास कांहीं परिणामकारक मार्ग निघाल्याशिवाय राहणार नाहीं अशी आम्हांस खात्री वाटते.

# मतस्वातंत्र्याची गळचेपी : : : : : ४

[ स्वराज्यप्राप्तीनंतर कॉंग्रेसची दृष्टि पालटून कॉंग्रेसी मंत्रिमंडळानेंच काळे कायदे करून मतस्वातंत्र्याची गळचेपी करण्याला कसा प्रारंभ केला त्याची माहिती या लेखांत दिली असून, परकी सरकारच्या रौलेट ॲक्टापेक्षाहि हा कायदा अधिक जुलमी कसा आहे तें यांत दाखविलें आहे. आणि महायुद्धानंतर जगांत इतरत्र वृत्तपत्रांना लेखन-स्वातंत्र्य देण्याची तजवीज होत असतां येथला कायदा वृत्तपत्रांची कशी गळचेपी करीत आहे तें तुलनात्मक कोष्टकानें दर्शविलें आहे. ]

### स्वराज्यांतले काळे कायदे

१९१९ सालीं त्या वेळच्या परकी सरकारनें राष्ट्रांतील चळवळी दडपून टाकण्याकरितां चळवळ्या लोकांना चौकशीविना अडकवून ठेवण्यासाठीं एक काळा कयदा केला. तो ‘ रौलॅट ॲक्ट ’ या नांवानें त्या वेळीं गाजला होता. त्या कायद्यानें जनतेच्या नैसर्गिक हक्कांची गळचेपी होते म्हणून त्या कायद्याविरुद्ध विधिमंडळांतून तीव्र विरोध दर्शविला गेला; परंतु सरकारनें हुकमी बहुमताच्या जोरावर तो कायदा पास करून घेतला. त्या वेळीं त्या काळ्या कायद्याचा सक्रिय निषेध करण्यासाठीं देशव्यापी सत्याग्रहाची चळवळ सुरू झाली. त्या चळवळींतून कोणते घोर प्रसंग उद्भवले त्यांची पुनश्च आठवण करून देण्याची जरूरी नाहीं. कारण जनतेला त्यांची विस्मृति कधींच होणार नसून दरवर्षी दि. ६ ते १३ एप्रिलपर्यंतचा आठवडा त्या वेळच्या सत्याग्रहाचा सप्ताह म्हणून पाळला जातो. त्याचा उल्लेख आतां करण्याचें कारण एवढेंच कीं, रौलॅट कायद्याविरुद्ध केल्या गेलेल्या चळवळीची स्मृति म्हणून ‘ राष्ट्रीय सप्ताह ’ पाळले जात असतां त्याच वेळीं इकडे मुंबई सरकारनें गतवर्षीच्या दडपशाहीच्या कायद्याचे पेंच आणखी घट्ट आवळून मतस्वातंत्र्याची पुरतीच गळचेपी केली. रौलॅट ॲक्टानें मतस्वातंत्र्याची गळचेपी होते म्हणून २९ वर्षांपूर्वी ज्या कॉंग्रेस पक्षानें देशव्यापी प्रतिकाराची चळवळ केली, त्याच कॉंग्रेस पक्षाच्या पुढाऱ्यांनीं स्वतः अधिकारारूढ होतांच रौलॅट ॲक्टाच्याहि वर ताण करणारा असा काळा कायदा राष्ट्रीय सप्ताहाच्या वेळींच मंजूर करून भाषणस्वातंत्र्य व लेखनस्वातंत्र्य दडपून टाकावें, हा योगायोग विचित्र नव्हे काय ? एकीकडे रौलॅट कायद्याच्या विरुद्ध झगडा करून आपण मतस्वातंत्र्य प्रस्थापित करण्यासाठीं कसे झटलों याची जाणीव जनतेला करून देण्यासाठीं राष्ट्रीय सप्ताहाचीं धामधूम करावयाची आणि त्याच वेळीं दुसरीकडे प्रामाणिक

( सह्याद्रि, मे १९४८ )

1994 भोर

मतभेदाला प्रकट होण्याला संधिच मिळूं नये इतकी लेखनस्वातंत्र्याची गळचेपी करावयाची, याहून उक्ति आणि कृति यांमध्यें अधिक विसंगति कोणती असूं शकेल ?

## रौलॅट ॲक्टापेक्षां अधिक जुलमी

महायुद्धाच्या बिकट परिस्थितींत परकी सरकारनें जे निर्बंध लेखन व भाषण यांवर लादले होते तेहि असे सर्वव्यापी व इतके कडक नव्हते; कारण त्यांची मर्यादा युद्धाच्या तजविजीला बाध येऊं नये एवढीच निश्चित होती. ज्या लेखनाचा व भाषणाचा युद्धमूलक हालचालींवर परिणाम होणार नाहीं अशा भाषणाला व लेखनाला त्या वेळीं मुभा होती. रौलॅट ॲक्टाच्या योजनेंत युद्धाचा संबंध नव्हता. तथापि ज्याला अटक करावयाची त्याचें वर्तन शांततेला व सुरक्षिततेला बाधक आहे असा अभिप्राय हायकोर्टाच्या न्यायाधिशाच्या दर्जाच्या इसमाकडून घ्यावा लागत असे. अर्थातच एखाद्याचें वर्तन आक्षेपार्ह वाटल्यास त्या घडलेल्या वर्तनाची न्यायाधिशाच्या चष्म्यांतून पाहणी केली जात असे. गतवर्षीं मुंबई सरकारनें जो सुरक्षा कायदा केला त्यांतून ही न्यायाधिशाच्या चष्म्यांतून पाहण्याची कसोटी गाळली गेली आणि केवळ वरिष्ठ पोलीस अधिकारी व डि. मॅजिस्ट्रेट यांच्या मतावरूनच कोणाहि इसमाच्या स्वातंत्र्याचा अथवा अटकेचा विचार होऊं लागला ! या दृष्टीनें गतवर्षींचा सुरक्षा कायदा रौलॅट ॲक्टापेक्षां एक पायरी खालीं उतरला व तितक्या मानानें नागरिकांचें मतस्वातंत्र्य दडपलें गेलें. परंतु एवढा निर्बंध देखील हल्लींच्या मुंबईच्या मंत्रिमंडळाला अपुरा वाटत असून, नव्या कायद्यांत प्रत्यक्ष घडलेल्या वर्तनाच्याऐवजीं 'वर्तन होण्याचा संभव' हीच कसोटी ठरविली गेली आहे ! 'आक्षेपार्ह वर्तन' आणि 'आक्षेपार्ह वर्तन घडण्याचा संभव' या दोहोंत जमीनअस्मानाचें अंतर असल्यानें गतवर्षींचा सुरक्षा कायदा व नवा घडविलेला सुरक्षा कायदा यां दोहोंत जमीन-अस्मानाचें अंतर आहे. एखाद्याच्या हातून 'आक्षेपार्ह वर्तन घडलें' असें म्हणून त्यास अटक झाल्यास तसें वर्तन घडलें काय व तें वर्तन आक्षेपार्ह आहे काय, असे दोन मुद्दे कोर्टापुढें चर्चेकरितां येतात आणि जर 'वर्नत घडल्याचाच' पुरावा नसेल तर दुसरा मुद्दा आपोआपच गळतो. याच रीतीनें हायकोर्टाकडून अनेक अटकबंद्यांची मुक्तता करण्याविषयीं ताकीद देण्यांत आली आणि पोलीस अधिकारी व मॅजिस्ट्रेट यांच्या दडपशाहीचे धिंडवडे निघाले.

## पूर्वींच्या सत्कीर्तीला काळिमा

हा अपमान भरून काढण्याकरितां आतां मागील कायद्यांत अशी दुरुस्ती करण्यांत आली आहे कीं, कोणाहि इसमाला कांहीं कारण न दाखवितां १५ दिवसपर्यंत अटकेंत ठेवतां येतें आणि ती बंदी वाढवावयाची असल्यास त्या इसमाचें

वर्तन शांततेला व सुरक्षिततेला बाधक होण्याचा संभव आहे, असें डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटला वाटलें कीं, तेवढें कारण अटकबंदीची मुदत वाढविण्याला पुरें होतें. आक्षेपार्ह कृति घडली असें म्हणण्याला साक्षीपुरावा द्यावा लागत होता व लेचापेचा पुरावा पुढें आल्यास तो खोडून काढण्याची संधि अटकबंद्याला मिळत होती. आतां 'आक्षेपार्ह वर्तन घडण्याचा संभव' म्हटल्यावर सगळाच कारभार आटोपला! यांत केवळ पोलीस अधिकारी व मॅजिस्ट्रेट यांच्या मतावरच सगळी भिस्त असून कोणाचें मत काय असावें याला व्यावहारिक धरबंध कांहींच नाहीं. सारांश, पोलिस अधिकारी व मॅजिस्ट्रेट या उभयतांची लहर लागल्यास कोणाहि इसमाला या नव्या कायद्याखालीं अटक होऊं शकेल व त्याला प्रतिरोध करण्याला हायकोर्टालाहि कायदेशीर मार्ग राहणार नाहीं. अशा रीतीनें रौलॅट कायद्यापासून तो नव्या सुरक्षा कायद्यापर्यंत नागरिकांच्या मतस्वातंत्र्याभोंवतीं एकेक वेढा अधिकाधिक जोरानें आवळण्यांत आला आणि प्रस्तुतच्या कायद्यानें तें मतस्वातंत्र्य केवळ पोलीसशाहीच्या मर्जीवर अवलंबून ठेवलें. रौलॅट ॲक्टाची धिंड काढण्यासाठीं जी चळवळ २९ वर्षांपूर्वी करण्यांत आली त्या चळवळीचे गोडवे गाण्यासाठीं कॉंग्रेस पक्षाकडून राष्ट्रीय सप्ताह साजरा केला जात असतां त्या रौलॅट कायद्यापेक्षां दसपटीनें अधिक जुलमी कायदा त्याच कॉंग्रेस पक्षाच्या मंत्रि-मंडळानें घडवावा आणि आपल्याच हातानें आपल्या पूर्वीच्या सत्कीर्तीला कालिमा फांसावा हें दृश्य उद्वेगजनक होय.

गेल्या महायुद्धापासून नैसर्गिक मानवी हक्कांची व मतस्वातंत्र्याची घोषणा एकसारखी चालू आहे. त्यांत स्वातंत्र्याचीं जीं चार अंगें म्हणून गणलीं गेलीं त्या चारांत लेखन-स्वातंत्र्य हें आद्यस्थानीं गणलें गेलें आहे. हें लेखन-स्वातंत्र्य वृत्त-पत्रांना कसें उपभोगतां येईल याचा विचार करण्यासाठींच नुकतीच जिनीव्हा येथें अनेक वृत्तपत्रव्यवसायिकांची आंतरराष्ट्रीय परिषद् भरली होती. त्या परिषदेंत वृत्तपत्रांना बातमी मिळविण्याला, ती तारायंत्रद्वारां पाठविण्याला आणि वृत्तपत्रांतून प्रसिद्ध करण्याला कोणताच प्रतिबंध केला जाऊं नये अशा आशयाचा ठरावहि झाला. जी वार्ता प्रसिद्ध करावयाची ती सत्य असली पाहिजे एवढाच एक काय तो निर्बंध पाळला जावा असेंहि त्या परिषदेंत ठरलें. आंतरराष्ट्रीय परिषदेंत वार्ता-प्रकाशनाला एवढी मुभा दिली जात असतां इकडे मुंबई सरकारनें त्याच वेळीं येथील वृत्तपत्रांची अनेक बाजूंनीं मुस्कटदाबी करावी, खरी वार्ता कळली तरी ती सरकारच्या परवानगीविना प्रसिद्ध करणें आक्षेपार्ह ठरवावें आणि सरकार जी वार्ता ज्या स्वरूपांत प्रकाशित करण्याला सांगेल त्या स्वरूपांत प्रकाशित करण्याची सक्ति केली जावी, हें सर्वच गर्हणीय होय. जिनीव्हा येथें जमलेल्या आंतरराष्ट्रीय वृत्तपत्रकारांना मुंबई सरकारची ही मतस्वातंत्र्याची गळचेपी पाहून काय बरें वाटेल?

## दोहोंची तुलना करून पाहा –

### वृत्तस्वातंत्र्य वाढविण्यासाठीं जिनीव्हा येथील ठराव

१. प्रत्येकाला विचारस्वातंत्र्याचा आणि उच्चार-स्वातंत्र्याचा हक्क राहील. यामध्यें कोणताहि प्रत्यवाय न येतां वाटेल तीं मतें धारण करण्याचा आणि देशाच्या सरहद्दींचा अडथळा न जुमानतां वाटेल त्या मार्गांनीं माहिती शोधण्याचा, मिळविण्याचा आणि प्रसृत करण्याचा हक्क समाविष्ट होतो.

२. माहिती मिळण्याच्या ठिकाणीं शक्य तितका अनियंत्रित प्रवेश मिळण्याचा आणि बातमी मिळविण्याच्या कामीं अनिर्बंधपणें प्रवास करावयास मिळण्याचा वार्ताहराचा हक्क अबाधित राहिला पाहिजे.

३. या हक्कांची अंमलबजावणी करण्यावर फक्त एकच नियंत्रण चालावें आणि तें म्हणजे इतरांच्या हक्काबद्दलचा आदर.

४. सर्व सरकारांनीं बातम्यांचा दर्जा सुधारावा आणि बातम्यांची शक्य त्या प्रकारें विविध वर्णनदर्शनें उपलब्ध व्हावीं म्हणून आवश्यक असलेल्या सर्व साधनांचा पाठपुरावा करावा.

५. निर्भेळ सत्य शोधून काढणें आणि फक्त वस्तुस्थितिच प्रकट करणें याबद्दल प्रत्येक वृत्तपत्रावर आणि वार्तासंस्थेवर नैतिक जबाबदारी आहे.

६. या नैतिक जबाबदारीची प्रगति

### वृत्तस्वातंत्र्य दडपण्यासाठीं मुंबई सरकारचा कायदा

( अ ) कोणतेंहि वृत्तपत्र, नियतकालिक, पुस्तक किंवा पत्रक (कागदपत्र), अजीबात किंवा कांहीं ठराविक मुदतीपुरतें, प्रांतांत आणणें, विकणें, वांटणें किंवा प्रसार करणें यांवर प्रांतिक सरकार लेखी हुकुमानें बंदी आणूं शकेल. आणि त्याला ( प्रांतिक सरकाराला ) (ब) कोणाहि मुद्रक, प्रकाशक वा संपादक यास व्यक्तिशः, किंवा सर्व मुद्रक, प्रकाशक, संपादकांस वर्गशः किंवा त्यांच्यापैकीं कांहीं विशिष्ट गटाला उद्देशून लेखी हुकूम काढून ( १ ) अजीबात किंवा कांहीं ठराविक मुदतीपुरतें, वृत्तपत्रें, नियतकालिकें, पुस्तकें व कागदपत्रें यांच्या एखाद्या किंवा अनेक अनुक्रमांकांत एखाद्या विवक्षित किंवा विशिष्ट वर्गांतील विषयासंबंधीं मजकूर छापण्यास किंवा प्रकाशनास बंदी करतां येईल. ( २ ) विशिष्ट अंकांत विशिष्ट मुदतींत आणि विशिष्ट प्रकारानें कोणताहि मजकूर प्रकाशित करण्यास भाग पाडतां येईल. ( ३ ) विशिष्ट किंवा विशिष्ट प्रकारच्या विषयांवरील मजकूर प्रसिद्ध करण्यापूर्वी दिलेल्या अधिकाऱ्याकडे तपासण्यासाठीं देण्याची सक्ति करतां येईल; ( ४ ) अजीबात किंवा कांहीं मुदतीपर्यंत वृत्तपत्रादींचें प्रकाशन किंवा एखाद्या छापखान्याचा उपयोग

व्यक्तिशः वृत्तपत्रकारांवर आणि वृत्त-पत्रकारांच्या संघावर आणि संघटना-वरच अर्थात् अवलंबून आहे.

७. ही जबाबदारी बरोबर पाळली जाते किंवा नाहीं हें पाहण्याचें काम वृत्तपत्रें आणि इतर वार्तासंस्था ज्या जनतेची सेवा करतात त्या जनते-कडूनच उत्तम केलें जातें.

[ वृत्तस्वातंत्र्य परिषदेंत (जिनीव्हा) मान्य झालेला साप्ताहिक विचार-उद्-गार-स्वातंत्र्याचा ठराव – टाइम्स ऑफ इंडिया, ४ एप्रिल १९४८. ]

बंद करतां येईल. आणि या कलमांचा भंग करणारास १ वर्षाची कैद, दंड किंवा दोन्ही शिक्षा भोगाव्या लागतील.

[ मुंबई सरकारनें १९४७ च्या पब्लिक सिक्युरिटी मेजर्स ॲक्टमध्यें मान्य करून घेतलेल्या दुरुस्त्या. बाँबे गव्हर्मेंट गॅझेट, २१ मार्च १९४८; भाग ५; पृष्ठ १७९ व १८०. ]

---

# या अनुनयाला आळा घाला : : : : ५

[ पाकिस्तान निर्माण होऊन तेथील हिंदूंचा अमानुष छळ चालू असतां तो बंद पाडण्यासाठी तीव्र उपाययोजना न करितां भारत सरकार पाकिस्तान-वाल्यांशीं नमून वागून त्यांचीच मनधरणी कशी करीत आहे त्याचें चित्र या लेखांत पाहावयास मिळेल. पाकिस्तानांतील हिंदूंना स्वास्थ्य व सुरक्षितता प्राप्त व्हावयाची असल्यास हा अनुनय थांबवावा आणि मंत्रिमंडळानें व जनतेनें पाकिस्तानाशीं अतःपर कसें वागावयाचें तें ठरवून पंडितजींना तसा निर्बंध घालून द्यावा अशी सूचना या लेखांत आहे. ]

न च क्षान्तेन ते भाव्यं नित्यं पुरुषसत्तम ।
सुधर्षो हि मृदू राजा क्षमावानिव कुंजरः ॥
क्षममाणं नृपं नित्यं नीचः परिभवेज्जनः ।
हस्तियन्ता गजस्येव शिर एवारुरुक्षति ॥

– महाभारत, राजधर्म

महाभारतांत राजनीति ग्रथित करीत असतांना व्यास महर्षींनीं सर्व बाजूंनीं दूरवर विचार करून राज्याला परमकल्याणपर असा उपदेश करून ठेवला आहे. त्यांत सत्ताधारी पुरुषानें कसें वागावें म्हणजे त्याचा अधिकार सुरळीत

(केसरी, दि. १ डिसेंबर १९५०)

चालतो, नाहीं तर शत्रु डोईजड होऊन डोक्यावर मिरे कसे वाटतात याचें मार्मिकपणानें वर्णन केलें आहे. प्रस्तुत प्रसंगीं त्या उपदेशाची आठवण होण्याला, नुकताच प्रसिद्ध झालेला नेहरु-लियाकतअल्ली यांचा पत्रव्यवहार व त्यावरील पंडित नेहरूंचें भाष्य कारणीभूत झालें. त्या पत्रव्यवहाराला अनुलक्षून पंडितजींनीं संसदेंत जें भाषण केलें तें वाचून मन विषण्ण होतें. मृगजळाच्या आशेनें धावून धावून उरीं फुटण्याची पाळी आल्यावर भोळ्या हरिणाची देखील निराशा होऊन तें त्या मृगजळाची आशा सोडून देतें; पण वर्षभर पत्रव्यवहार करून त्यांतून आपला कांहींच हेतु सफळ न होतां उलट आपल्यावरच भांडखोरपणाचें टेपर ठेवण्यांत आलें हें पाहून देखील पंडितजींचा आशावाद संपत नाहीं, हा चमत्कार नव्हे काय ?

## लियाकतअल्ली ओढून कां धरतात ?

'आपसांत युद्ध नको. आपण सर्व तंटे तडजोडीनें मिटवूं या' असें उभयतांनीं जाहीर करावें, असा पंडितजींचा आग्रह असून त्यांनींच प्रथम अनधिकृतपणें हा उपक्रम केला. पाकिस्तानाला तरी युद्ध करण्याची हौस आहे असें नाहीं, आणि 'युद्ध नको' असें जाहीर करण्यापासून आपलें काडीमात्र नुकसान नसून, भारत सरकारचे हात बांधून घेतल्यानें आपल्यास त्या कराराचा वाटेल तसा फायदा घेतां येईल, हें न कळण्याइतके लियाकतअल्ली भोळे नाहींत. तरी पण पंडितजींनीं ज्या अर्थी असा करार करण्याचा ध्यास घेतला आहे त्या अर्थी आपण जितकें ओढून धरूं तितकें आपणांस पंडितजींना मुठींत आणतां येईल, या कावेबाज कल्पनेनें लियाकतअल्ली हे आढेवेढे घेत आहेत आणि असा करार करण्यापूर्वी आजपावेतों उपस्थित झालेले वादाचे मुद्दे लवादामार्फत निकालांत काढून घ्यावे असा त्यांनीं पेंच टाकला आहे.

लवादाकडे जाण्यापूर्वी प्रथम आपसांत वाटाघाट करून वाद मिटविण्याचा प्रयत्न करावा, दोन महिन्यांत या वाटाघाटींतून कांहींच तडजोड निघाली नाहीं तर मध्यस्थांच्या मदतीनें तडजोड करावी, तेंहि न साधलें तर आंतरराष्ट्रीय लवादापुढें उभयतांनीं वाद मांडून लवादाकडून जो निर्णय मिळेल तो उभयपक्षांनीं प्रामाणिकपणें मनःपूर्वक पाळावा, अशी लियाकतअल्लींनीं तीन मजली योजना पंडितजींपुढें टाकली असून ती त्यांना अमान्य आहे. तडजोड न झाली तर तो प्रश्न लवादाकडे जाणार असें अगोदर ठरल्यावर वाटाघाटींत मध्यस्थीनें कोणतेहि वाद मिटणारच नाहींत; कारण शेवटीं लवादाकडे जाण्याचें आमिष उभयतांनाहि असल्यावर पहिले दोन टप्पे अयशस्वी होणार हें निर्विवाद आहे. त्याचप्रमाणें वाटाघाटीची मुदत दोन महिने अपुरी आहे. सगळेच प्रश्न सारख्याच महत्त्वाचे आणि गुंतागुंतीचे नसतात. यास्तव ही मुदत त्या त्या प्रश्नाच्या महत्त्वाच्या प्रमाणावर अवलंबून ठेवण्यांत यावी, इत्यादि कारणाकरितां पंडितजींना या अटी मान्य नाहींत.

काश्मीरचा प्रश्न आणि जुनागडचा प्रश्न या दोन प्रश्नांना अग्रस्थान मिळावें

आणि कालव्याच्या पाण्याचा वाद मिटल्याखेरीज निर्वासितांच्या इस्टेटीचा प्रश्न हातीं घेऊं नये, अशा अनेक अटींचीं लोढणीं भारताच्या गळ्यांत अडकविण्याचा पाकिस्तानाचा विचार आहे; पण पंडित नेहरूंना यांतली कोणतीच सूचना मान्य नाहीं. त्यांच्या मतें जुनागडचा प्रश्न यापूर्वीच सुटला असल्यानें आतां तो प्रश्न तड-जोडीच्या कक्षेंत येतच नाहीं. काश्मीरच्या बाबतींत मध्यस्थी होऊन तिच्यांतून कांहींच निष्पन्न झालें नाहीं. तेव्हां काश्मिरांतलें लोकमत घेऊनच या तंट्याचा निकाल लावावा. यासारखेच मतभेदाचे आणखी अनेक मुद्दे असल्याचें सांगून पंडितजींनीं वाटाघाटी फिसकटल्याबद्दल खेद व्यक्त केला आहे.

### भारतावरच दोषारोप

वाटाघाटी फिसकटल्या याबद्दल कोणासहि पंडितजींसारखाच खेद होईल; परंतु यांतून पुढें मार्ग कसा काढावयाचा, याबाबतींत लियाकतअल्ली व त्यांचे सह-कारी यांच्या तोंडून जे उद्गार बाहेर पडत आहेत त्यांच्या तुलनेनें पंडितजींचे विचार अगदींच मिळमिळीत वाटतात. पाकिस्तानांतली एक इंच देखील जागा आम्ही हातची जाऊं देणार नाहीं व तिच्याकरितां पाकिस्तानांतला प्रत्येक इसम प्राणपणानें लढेल, अशा धमक्या पाकिस्तानांतून ऐकूं येतात. त्याचबरोबर जुनागड संस्थान पाकिस्तानांत विलीन झालें असतां भारतानें आपलें लष्कर पाठवून त्या संस्थानावर आक्रमण केल्याचा आरोपहि भारतावर करण्यांत येत आहे! काश्मिरांत भारताचें सैन्य आहे तें तेथून हलल्याखेरीज काश्मीरचें खरें लोकमत प्रकट होणार नाहीं, असली सबब पुढें करून हिंदी सैन्य आधीं हुसकून लावावें आणि मग लोकमत घेतल्याचा दिखाऊ फार्स केला जावा, असाहि पाकिस्तानाचा डाव आहे. हिंदी निर्वासितांची जी हजारों कोटि रुपयांची मिळकत पाकिस्तानांत राहिली आहे तिचा हिशेब देण्याची टाळाटाळ करून वरती भारताकडे आमचें जें येणें आहे तें देण्याची भारतानें टाळाटाळी चालविली आहे असला उलटा आरोप करण्यासहि पाकिस्तानाला दिक्कत वाटत नाहीं.

या सर्व तक्रारींना पं. नेहरू यांनीं समर्पक उत्तरें दिलीं आहेत. पण जाणून-बुजून झोपेचें सोंग घेणाऱ्याला कोण जागें करूं शकेल? भारत सरकारच तडजोडीला तयार नाहीं, असा खोटा अपप्रचार बाहेरच्या देशांत करून इकडे पाकिस्तानांत सैन्याची वाढ मात्र झपाट्यानें चालू आहे. एवढ्याशा छोट्या पाकिस्तानांत अडीच लक्ष खडें सैन्य जय्यत तयार आहे. लष्करी खात्यावर पाकिस्तान दरसाल ७०।८० कोटि रुपये खर्च करीत असून परराष्ट्रांतून अद्ययावत् लष्करी हत्यारें आणविण्याचा त्यांचा खटाटोप चालू आहे.

### पंडितजींची लष्करांत काटकसर

आपल्याइकडे त्याच्या अगदीं उलट प्रकार चाललेला पाहून चीड येते. काटकसरीच्या नांवाखालीं, आणि 'युद्ध नको' ही आपली घोषणा प्रतिपक्षाला

पटविण्यासाठीं पं. नेहरू हे भारतीय लष्करांतील ५० हजार सैनिक कमी करणार आहेत असें कळतें! अखंड भारताचे तीन तुकडे झाल्यानें सरहद्दीवरचें नैसर्गिक संरक्षणांचें साधन नाहींसें होऊन, संरक्षण करावयाची सरहद्द मात्र कल्पनातीत वाढली आहे. त्यांतच आतां नेपाळ व तिबेट या शेजारच्या देशांत क्रांतिकारक बंडाळी माजून तिचा धोका या देशाला येऊन भिडला आहे. आंतरराष्ट्रीय परिस्थितीहि दिवसेंदिवस चिघळत चालली आहे. अशी एकंदर परिस्थितिच धोक्याची दिसत असून त्यांतच पाकिस्तानाच्या धुसफुसीची भर पडत आहे. अशा वेळीं कोणीहि दूरदर्शी पुढारी लष्कर कमी करण्याची भाषा न बोलतां उलट आपली लष्करी शक्ति वाढविण्याची तरतूद करण्यांत गढून जाईल.

## निषेधपर खलित्यांचा मारा

परंतु पंडितजींचें व्यवहारशास्त्र सगळ्या जगाच्या उलट असल्यानें त्यांची पाकिस्तानाचा अनुनय करण्याची खोड कांहीं सुटत नाहीं. निषेधपर खलित्यांचा मारा करून ते पाकिस्तानाला जेरीस आणूं पाहात आहेत. संसदेंत परवा अशी माहिती दिली गेली कीं, जुलै महिन्यापासून ऑक्टोबरअखेरच्या चार महिन्यांत पाकिस्तानी पोलिसांनीं अथवा सैनिकांनीं भारतभूमीच्या सरहद्दीच्या आंत ८१ वेळां आक्रमण केलें. या आक्रमणांत ४ हिंदी नागरिक ठार झाले, १३ नागरिक पळवून नेण्यांत आले व ३५ हजार रुपये किंमतीच्या मालमत्तेचा विध्वंस करण्यांत आला! सरकारी नोंद झालेले हे इतके अत्याचार घडले; मग ज्यांची नोंद होऊं शकली नसेल, असे अत्याचार आणखी किती झाले असतील अल्ला जाणें! तें एक वेळ असो; पण ज्या अत्याचारांची प्रत्यक्ष नोंद झाली, त्यांची दाद लावून घेण्याचा इलाज कोणत्या प्रकारें करण्यांत आला, असा प्रश्न सहजच पुढें येतो. त्यास पंडितजी सांगतात कीं, या हल्ल्याच्या निषेधार्थ हिंदुस्थान सरकारनें पाक सरकारकडे निषेधाचे पस्तीस खलिते पाठविले! या खलित्यांची वासलात कशी लागली असेल हें न सांगतांहि कळण्यासारखें आहे. तेंहि एक वेळ असो; पण मध्यंतरीं पंडितजींनीं लियाकतअल्लींची भेट घेतली, त्या वेळीं समक्ष कांहीं खुलासा करून घेतला असेल असें मानावें तर समक्ष भेटींत हा प्रश्न चर्चेला निघालाच नाहीं! असले प्रश्न आपोआप पुढें कसे येणार? लियाकतअल्लींना ते प्रश्न पुढें यावयाला नकोच असल्यानें त्यांनीं त्यांचा उल्लेख केला नाहीं आणि असले क्षुल्लक प्रश्न पंडितजींच्या खिसगणतींत नसतात म्हणून विस्मरणामुळें असो, अथवा लियाकतअल्लींची मर्जी बिघडून आपल्या अनुनयाच्या कामांत व्यत्यय येईल म्हणून असो, या अत्याचारांची पुढें वास्तपुस्तहि झाली नाहीं!

## पंडितजी पुनः कराचीला जाणार

पाकिस्तानाचे कावेबाज प्रधान आणि भारताचे भोळे महामंत्री यांच्या रस्सीखेचीच्या खेळाचा निकाल कसा लागणार हें दिसतच आहे; आणि याचें प्रत्यंतर

पाहण्यास तिष्ठत बसण्याचेंहि कारण नाहीं. कां तर आपल्या संसदेंतील भाषणाच्या शेवटीं पंडितजींनीं सांगून टाकलें कीं, लियाकतअल्लीनीं मला पुनः एकदां भेटीला बोलाविलें आहे आणि येथल्या कामाची वासलात लागली कीं मी कराचीला त्यांच्या भेटीसाठीं जाणार आहें. दिल्लींतील वाटाघाटींत पंडितजींना पुरतें घेरतां येत नाहीं, कारण संभाषणाच्या वेळीं दुसरें कोणी उपस्थित नसलें तरी दिल्लींत चर्चेचा सुगावा लागून पंडितजींना थोडकासा तरी कानमंत्र मिळूं शकत असेल; तेवढाहि अडथळा दूर करण्याच्या हेतूनें लियाकतअल्लीनीं स्वतः दिल्लीला न येतां पंडितजींनाच कराचीला नेण्याचें योजिलेलें दिसतें; आणि आमचे हे भोळे सांब लियाकतअल्लीचें बोलावणें आलें एवढ्यावरच भाळून जाऊन, भस्मासुराला वर देण्याला, कराचीला जाण्यास सिद्ध झालेले दिसतात. मागें दिल्लीच्या व कराचीच्या भेटींत पंडितजींनीं किती मुद्दे हातचे घालविले व लियाकतअल्लीकडून आपल्यावर कशी मात करून घेतली हें सर्वांच्या लक्षांत आहेच. तेव्हां पुनश्च हे पंडित कराचीला गेल्यावर आणखी काय काय वचनें देऊन गोत्यांत पडून येतात कोणास ठाऊक! याकरितां मंत्रिमंडळानें या संबंधांत अगाऊ विचार करून एकतर पंडितजींना जाण्यापासून परावृत्त करावें; नाहीं तर पंडितजींना एकटें न पाठवितां कोणी तरी पटाईत मुत्सद्दी त्यांच्याबरोबर पाठवून द्यावा.

### ही घसरगुंडी थांबवा

परराष्ट्र खातें जरी पंडितजींच्या ताब्यांतलें असलें तरी पाकिस्तानाशीं ज्या बाबतींचा ऊहापोह व्हावयाचा आहे त्या सर्व बाबी केवळ परराष्ट्रसंबंधापुरत्या नाहींत. यास्तव सर्व प्रश्नांवर मंत्रिमंडळानें संयुक्त विचार करून पंडितजींना विधिनिषेधात्मक अगाऊ सूचना देऊन पाठवावें. नाहीं तर आतांपर्यंतच्या पंडितजींच्या भोंगळपणाच्या कारभारानें काश्मीर व निर्वासित या दोन प्रश्नांबाबत आपल्या राष्ट्राचें नाहक अतोनात नुकसान झालें आहे, तसेंच नुकसान या पुढेंहि इतर बाबींत होत राहण्याचा संभव आहे. तो टाळावयाचा असल्यास मंत्रिमंडळानें आपली संयुक्त जबाबदारी ओळखून, लियाकतअल्लीच्या कारस्थानाला पंडितजी बळी पडणार नाहींत अशी तजवीज अवश्य करावी. नाहीं तर ही घसरगुंडी भारताला किती खोल खड्ड्यांत नेऊन टाकील याचा नेम नाहीं. मागील घसरलेला डाव सुधारण्याच्या तजविजीच्या आधीं यापुढें नव्या होणाऱ्या चुका तरी थांबविणें अगत्याचें आहे.

### लोकमताचा हक्क बजावा

आजपर्यंत पाकिस्तानशीं जे जे करार झाले त्या करारांत पंडितजींनीं आधीं वचनबद्ध होऊन यावें, मग पंडितजींच्या मुर्वतीस्तव मंत्रिमंडळानें त्यास मान्यता द्यावी आणि मंत्रिमंडळाची पत राखण्यासाठीं संसदेनें, सभासदांच्या वैयक्तिक मताविरुद्ध, डोळे मिटून झालेल्या कराराला संमति द्यावी, असला आत्मघातकी प्रकार चालू आहे. हा आत्मघात थांबविण्यासाठीं संसदेनें आतां सावध होऊन असें बजावावें

कीं, पाकिस्तानाशीं कसें धोरण ठेवावयाचें तें अगोदर येथें मांडून मान्यता घ्या आणि मगच कराचीला जा. आपलें धोरण आगाऊ उघड करतां येत नाहीं ही अडचण सर्वांच्या लक्षांत आहे; पण तिचा परिहार संसदेची गुप्त बैठक घेऊन करतां येतो. इंग्लंडांत ज्या वेळीं असे महत्त्वाचे परराष्ट्रसंबंधाचे प्रश्न चर्चिले जातात त्या वेळीं जाहीर बैठक न भरवितां गुप्त बैठक घेण्याची वहिवाट आहे, तिचा अवलंब येथें करतां येईल. असें न करतां आणि सगळ्या मंत्रिमंडळाची अगाऊ पूर्ण संमति न घेतां, जर पंडितजी यापुढें पाकिस्तानाशीं एखादा करार करतील आणि तो जर भारताला हानिकारक व अपमानकारक वाटेल, तर संसदेनें पंडितजींची भीडभाड न धरतां तो बेलाशक फेटाळून लावावा. दिल्लीचा करार किती तरी सभासदांना नापसंत होता व त्याबद्दल राजिनामे देण्यापर्यंतहि पाळी आली, तरी पण पंडितजींच्या मुर्वतीस्तव त्याची तळी उचलून धरण्यांत आली व त्याचा दुष्परिणाम आज राष्ट्राला भोगावा लागत आहे. यास्तव यापुढें तरी सावध होऊन पंडितजींची अनुनयाची घसरगुंडी थांबविण्यासाठीं त्यांचे हात अगाऊ चर्चा करून बांधून घेणें हेंच राष्ट्राच्या हितासाठीं आवश्यक आहे. यास्तव राष्ट्रानें जागरूकपणा ठेवून आपला हा हक्क बजावावा.

---

## भारतीय राज्यघटनेंतील कांहीं खांचखळगे : ६

[ हा लेख सव्वा वर्षापूर्वी लिहिला; त्या वेळीं ज्या कांहीं शंका दर्शविल्या होत्या त्यांचें प्रत्यंतर इतक्या अल्पावधींतच आलें आहे. घटना-दुरुस्तीचें विधेयक पुढें मांडून तें पसारहि करून घेण्यांत आलें. घटनेंतच व्यक्तिस्वातंत्र्य दुबळें केलें होतें, तें या दुरुस्तीनें अधिकच दुबळें केलें. नागरिकत्वाच्या हक्काची निश्चिति अद्याप होत नाहीं. प्रांताप्रांतांत संघर्ष चालूच आहेच आणि पंजाबांत तर प्रांतिक सत्ता नामशेष झाली आहे. वरिष्ठ न्यायालयाकडे अनेक वाद निर्णयार्थ आले असून त्याला आपलें काम आवरणें दुष्कर होत चाललें आहे. घटनेंतील खाच-खळग्यांचाच हा परिणाम होय. ]

### पायगुणाचा दोष मानूं नये

भारत देशाला संपूर्ण स्वातंत्र्य लाभलें. दीडशें वर्षांचा पारतंत्र्याचा कलंक धुवून गेला. दोन हजार वर्षांनंतर भारत देश एकसंधि होऊन एकाच केंद्रीय सत्ते-खालीं नांदूं लागला आणि ही केंद्रीय सत्ताहि अनियंत्रित वा नियंत्रित राजसत्ता

(सह्याद्रि, मार्च १९५०)

नसून ती प्रौढमतदानाधिष्ठित लोकसत्ता आहे, हें तिचें वैशिष्टय होय. अशा अनेक कौतुकावह घटनांचें एकीकरण होऊन दि. २६ जानेवारीला भरतखंडांत स्वराज्य-महोत्सव सर्वत्र गाजला, हें प्रसंगोचितच होय. मोठ्या कुटुंबांत एकीकडे विवाहादि मंगल कार्यांचा गजर चालू असतां त्याच कुटुंबांतील एखादा दुर्भागी प्राणी एका कोपऱ्यांत आपल्या नशिबीं आलेल्या आपत्तीनें विव्हळत पडलेला असतो, त्याप्रमाणें अखिल भारताच्या खंडित विभागांत कोंडले गेलेले, आणि त्या कोंडींतून कसेबसे केवळ जिवानिशीं निसटलेले, अनेक प्रजाजन आज दुःखांत होरपळत आहेत, हें कोणीहि सहृदय भारतीय विसरूं शकत नाहीं. तथापि नव्या वधूच्या गृहप्रवेशापूर्वीपासूनचें एखाद्याचें भवितव्य हा जसा त्या वधूचा पायगुण मानतां येत नाहीं, त्याचप्रमाणें नवी भारतीय घटना प्रचारांत येण्यापूर्वींच्या हिंदवासियांवरील आपत्तींच्या दोषाचें खापर नव्या घटनेच्या माथ्यावर फोडतां येत नाहीं. यास्तव दि. २६ जानेवारीपासून जी नवी भारतीय राज्यघटना लागू झाली तिचें परिक्षण करतांना तत्पूर्वीं ओढवलेल्या आपत्ति हा तिचा पायगुण समजून त्यावरून तिची पारख न करतां, तिच्या भावी परिणामावरूनच तिची पारख केली पाहिजे. सारांश, आजमितीला जी नवी राज्यघटना अमलांत आली तिच्याकडे पूर्वग्रहदूषित दृष्टीनें न पाहतां प्रत्यक्षतः तिचें स्वरूप व शील यांवरूनच तिचें मूल्य ठरविणें न्याय्य होय. मात्र यापूर्वीं घडलेल्या कोणत्याहि भल्याबुऱ्या घडामोडींची जबाबदारी या नव्या घटनेवर नसली, तरी यापुढें घडणाऱ्या सर्व गोष्टींची जबाबदारी या नव्या घटनेवरच राहील हें विसरतां कामा नये.

## सरनाम्यांतील घोषणा

आतां भारतांत प्रस्थापित झालेली सत्ता प्रजासत्ताक स्वरूपाची आहे आणि विविध सत्ताप्रकारांत प्रजासत्ताक पद्धतिच टिकाऊ व लोककल्याणकारक होऊं शकत असल्यानें भारताची राज्यघटना प्रजासत्ताक बनविण्यांत आली हें योग्यच झालें. या घटनेंत सर्वांना न्याय, स्वातंत्र्य आणि समान संधि यांचा लाभ व्हावा, राष्ट्रैक्य साधावें आणि भ्रातृभाव वाढावा अशी योजना करण्यांत आली असल्याचें घटनेच्या सरनाम्यांतून घोषित केलें आहे. तत्त्वांच्या दृष्टीनें ही घोषणा अनाक्षेपार्ह आहे. मात्र यांतील न्याय, स्वातंत्र्य, समता, भ्रातृभाव व राष्ट्रैक्य यांच्या मर्यादा कांटेकोरपणानें पाळल्या गेल्या पाहिजेत. याचाच अर्थ असा कीं, यांतील कोणत्याहि एका तत्त्वाची बजावणी करतांना दुसऱ्या कोणत्याहि तत्त्वाला बाध येतां कामा नये, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. आपल्या पांचभौतिक देहांत पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश हीं पांचहि तत्त्वें असतात आणि कफ, वात, पित्त हे तीन दोषहि असतात; पण त्यांतील कोणताहि एक घटक दुसऱ्याला बाधक न होतां सगळे समप्रमाणांत असतात तोंपर्यंत शरीर निरोगी राहून त्याचे व्यापार सुरळीत चालतात; त्याचप्रमाणें आपल्या नवनिर्मित प्राजकांत (प्रजासत्ताक राज्यांत) न्याय, स्वातंत्र्य,

समता, भ्रातृभाव व राष्ट्रैक्य आपापल्या मर्यादेंत राहतील तर आपलें हें प्रजासत्ताक (प्राजक) सुख व शांतता उपभोगीत चिरायु होईल.

वर निर्दिष्ट केलेल्या सरनाम्यांत उद्घोषित केलेली पंचतत्त्वात्मक आशा खरी ठरण्याला नवी घटना निर्दोष पाहिजे आणि घटनेची बजावणी करणारे अधिकारीहि सच्छील व समर्थ असले पाहिजेत. परंतु आपणांस तूर्त अधिकाऱ्यांच्या अंगच्या दोषांचा विचार करावयाचा नसून घटनेंतच मूलतः कांहीं दोषस्थलें आहेत कीं काय एवढेंच पाहावयाचें आहे.

### प्रथमग्रासे मक्षिकापातः

सरनाम्यांत भारतांतील सर्व रहिवाशांना, स्वातंत्र्य, समता, समानसंधि यांचा लाभ होईल असें आश्वासन दिलें गेलें असलें तरी जुने प्रांत, विलीन झालेलीं संस्थानें आणि विलीन न झालेलीं संस्थानें यांच्यांत घटनेच्या दृष्टीनें कमी-अधिक भेदभाव आहेतच. ते भेदभाव दूर होईपर्यंत सर्वत्र समता प्रस्थापित झाली असें म्हणतां येणार नाहीं आणि अशी समता प्रस्तापित करण्याची योजना या घटनेंत नमूद नाहीं. त्याचप्रमाणें पाकिस्तान, गोवा, पांडेचरी यांसारखे जे भाग आजच्या भारताच्या सीमेबाहेर आहेत ते भारतांत कसे आणतां येतील यासंबंधाचें दिग्दर्शन या घटनेंत नाहीं; म्हणून तत्त्वतः ही घटना अपुरी आहे. त्याचप्रमाणें एकभाषेच्या सोयीसाठीं अथवा इतर राज्यव्यवस्थेच्या सोयी-साठीं प्रांतांची विभागणी वा जोडणी करावयाची झाल्यास ती करण्याचा अधिकार पार्लमेंटला देऊन ठेवण्यांत आला असला, तरी त्यांत दोन्ही बाजूंच्या संमतीची अट घालून ठेवल्यामुळें या अधिकाराची बजावणी करणें दुर्घट होईल असें वाटतें.

### नागरिकत्वाचा अधिकार

भारताचें नागरिकत्व कोणाला हक्कानें मिळावें व कोणाला तें मिळूं नये यासंबंधाचे या घटनेंतले नियम अत्यंत गुंतागुंतीचे व घोटाळ्याचे झाले आहेत. अखंड भारताचें दुखंड होऊन अनेक भारतीय हिंदु निरुपायानें व परेच्छेनें पाकिस्तानांत राहिले; कित्येकांची तशी इच्छा असून ते १९ जुलै १९४८ च्या आंत भारतांत येऊं शकले नाहींत, अथवा त्या तारखेनंतर त्यांची येण्याची इच्छा असूनहि त्यांना तसा परवाना मिळूं शकला नाहीं; अगर फाळणीनंतरहि आपण पाकिस्तानांत राहूं शकूं, असें वाटून आणि तेथील कायद्याची अट पाळण्या-साठीं म्हणून ज्यांनीं तेथील नागरिकत्व त्या वेळीं स्वीकारलें, अशा सर्व हिंदूंना यापुढें भारताचें नागरिकत्व मिळविण्याच्या मार्गांत मोठीच धोंड येऊन पडल्याप्रमाणें झालें आहे. उलट पक्षीं अनेक धूर्त मुसलमानांनीं दोन डगरींवर हात ठेवून या घटनेंतील मुदतीच्या आंत जाऱ्ये करून लटपटीनें भारतीय नागरिकत्व पदरांत पाडून घेतलें आहे, अशा या उलट सुलट दोन्ही प्रकारांत भारतीय नागरिकत्वाची विटंबना होण्याचा संभव असून, ती दूर करण्याचा मार्ग या

घटनेंत नाहीं. शिवाय जे भारतीय आशिया, आफ्रिका, अमेरिका इत्यादि दूर दूरच्या प्रदेशांत स्थायिक होऊन राहिले, परंतु ज्यांना आतां तेथें होणाऱ्या नित्य नव्या कायद्यामुळें तेथील नागरिकत्वाचा त्याग करून परत भारतांत येण्याची इच्छा होत आहे, त्यांच्या मार्गांतहि या घटनेनें अडसर घालून ठेवला आहे.

भावी नागरिकत्व संपादनाच्या बाबतींत कायदा करण्याचा अधिकार पार्लमेंटला देऊन ठेवण्यांत आला आहे; तथापि त्या संबंधांत भारताचें सामान्य धोरण काय असावें, यांचें तात्त्विक दिग्दर्शन तरी या घटनेंत असावयास पाहिजे होतें. आजपावेतों हिंदुस्थान देश म्हणजे जगांतील धर्मशाळा. कोणीहि, कोठूनहि कोणत्याहि हेतूनें येथें यावें आणि आपली पथारी येथें पसरावी, असा अनिर्बंध प्रकार होत आला आहे व त्याचीं कटु फळें आपण सध्यां भोगीत आहों. तेव्हां यापुढें भारतांत पाऊल ठेवूं इच्छिणाऱ्या पाहुण्यांवर कडक नजर ठेवून त्याला सहजासहजीं नागरिकत्व न मिळेल, आणि पाहुण्यांच्या आगमनापासून भारताचें कल्याण होईल, निदान तो पाहुणा खाल्लयाघरचे वासे मोजणार नाहीं, असे कडक निर्बंध घालून ठेवावे, अशी तात्त्विक सूचना तरी भावी पार्लमेंटला देऊन ठेवणें जरूरीचें होतें. परंतु क्षुल्लक बाबतींत शब्दांचा कीस काढीत बसणाऱ्या घटना-समितीनें या महत्त्वाच्या बाबतींत मूग गिळून बसावें, हें आमच्या अंगचा परंपरागत अनिष्ट भोंगळपणा अद्याप गेला नाहीं आणि इष्ट अशी दक्षता अंगीं आली नाहीं याचेंच निदर्शक होय. हा भोंगळपणा भावी काळांतहि आपल्यास असाच भोंवल्याशिवाय राहणार नाहीं.

## मूलभूत हक्क व त्यांचें संरक्षण

यापुढील प्रकरण मूलभूत हक्क व त्यांचें संरक्षण यासंबंधाचें असून, इतर कोठल्याहि राष्ट्राच्या घटनेंत नसेल इतका तपशीलवार ऊहापोह या प्रकरणांत केला गेला आहे. यांत समानता, स्वातंत्र्य, धार्मिक आचार-विचार, शिक्षण, मिळकत इत्यादिसंबंधींच्या हक्कांचा तपशीलवार उल्लेख असून, सदर हक्कांवर गदा आल्यास उच्चतम न्यायालयाकडे दाद मागण्याची सवडहि यांत ठेवली आहे. अशा रीतीनें आपणांस मूलभूत हक्कांचें संरक्षण मिळालें म्हणून आनंदांत गर्क होणाऱ्याला एवढा इशारा देणें अगत्याचें वाटतें कीं, दुधांत मिठाचा खडा पडून तें नासावें त्याप्रमाणें या सगळ्या हक्कांवर एका अपवादात्मक कलमानें बोळा फिरविला आहे. सार्वजनिक सुव्यवस्था आणि नीतिमत्ता यांच्या नांवावर यांतील कोणताहि हक्क हिरावून घेतां येईल. सार्वजनिक सुव्यवस्था आणि नीतिमत्ता या शब्दांचें स्पष्टीकरण कोठेंहि केलेलें नसून अधिकारारूढ पक्ष त्या शब्दांचा जो अर्थ करील त्यांवर हें स्वातंत्र्य अवलंबून राहणार. त्याचप्रमाणें वैयक्तिक स्वातंत्र्याच्या बाबतींतहि. राज्यावर संकट येण्याचा संभव दिसला तर सर्व हक्क नष्ट होतात. व्यक्तीला अटक केल्यानंतर त्याचीं कारणें कळविलीं पाहिजेत असा निर्बंध यांत आहे; पण त्याबरोबरच अटक करणाऱ्या अधिकाऱ्यास जर

अटकेचीं कारणें उघड करणें सार्वजनिक सुरक्षिततेच्या दृष्टीनें अनिष्ट वाटलें, तर त्याला अटकेचीं कारणें उघड सांगण्याला भाग पाडतां येत नाहीं; म्हणजे हा तर तोंड बांधून बुक्क्यांचा मार झाला. अशा रीतीनें एका हातानें स्वातंत्र्याचे सर्व मूलभूत हक्क दिले आहेत आणि दुसऱ्या हातानें ते काढून घेतले आहेत. याचा परिणाम असा होणार कीं, अधिकारारूढ पक्षाच्या अनुयायांना तेवढी सर्व बाबतींत मुभा आणि प्रतिपक्षाच्या घटकांना मात्र अधिकाऱ्याची लहर लागेल तेवढेंच स्वातंत्र्य! संकटप्रसंगीं कोणत्याहि हक्काला मर्यादा घालण्याचा अधिकार राजसत्तेला असतो व तसा अधिकार असलाच पाहिजे. पण त्या संकटाचें स्वरूप व्यापक व व्यक्त पाहिजे, आणि संकटाची परिस्थिति सर्वमान्य असली पाहिजे. कोणाहि अधिकाऱ्याच्या लहरीचा फायदा घेऊन कोणाहि एका व्यक्तीवर 'तुझ्या वागणुकीमुळे राज्यावर संकट कोसळणार आहे' असला आरोप ठेवून त्याचें स्वातंत्र्य हिरावून घेण्याला कायद्यानें सवड ठेवतां कामा नये; परंतु या घटनेंत स्वातंत्र्याच्या हक्कांना इतके मोघम व व्यापक अपवाद घालून ठेवले आहेत कीं, त्यांच्या दडपणाखालीं प्रतिपक्षाच्या स्वातंत्र्याची गळचेपी झाली आहे. प्रजासत्ताकांतील आचार-विचार-प्रचारस्वातंत्र्याच्या घोषणेला असले व्यापक व लवचीक अपवाद शोभत नाहींत; अल्पसंख्याकांच्या सांस्कृतिक व शैक्षणिक हक्कांना मात्र कांहींएक निर्बंध न घालतां पूर्ण संरक्षण दिलें आहे! यांतला हेतु उघड दिसतो. मुसलमान, अँग्लो-इंडियन्स, ख्रिश्चन, पारशी, यहुदी इत्यादिकांना या कलमाचा फायदा मिळेल; परंतु हिंदु हे बहुसंख्य असल्यानें त्यांतले दलित, मागसलेले व वन्य वगळून, इतर कोणाला या कलमाचा फायदा मिळूं शकणार नाहीं. हिंदूंना, ते बहुसंख्य म्हणून, विशेष सवलती नाहींत आणि हिंदूंतील पोटजातींना तर बहुसंख्येचाहि फायदा नाहीं आणि अल्पसंख्येचाहि फायदा नाहीं, अशी त्यांची दोहोंकडून कुचंबणा होणार आहे.

## प्रौढ मतदानाची उडी

प्रजासत्ताकाची पूर्णता म्हणजे, वयांत आलेल्या प्रत्येक स्त्री-पुरुषाला मतदानाचा अधिकार असणें, ही होय. ही पूर्णता अद्यापि कित्येक सुधारलेल्या देशांतहि गांठली गेली नाहीं. हिंदुस्थानांत अद्यापि सार्वत्रिक सक्तीच्या शिक्षणाचाहि पल्ला गांठला गेला नसून निरक्षरतेचें प्रमाण छाती दडपून जाईल इतकें मोठें आहे. अशा परिस्थितींत प्रौढ मतदानाचा हा वर भारताच्या नागरिकांना कितपत झेपेल याची शंकाच वाटते. नवे राष्ट्राध्यक्ष बाबू राजेंद्रप्रसाद यांनीं या शंकेला प्रत्युत्तर देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या मतें खेड्यांतील मतदार समजूतदार असतात, त्यामुळें ते आपल्या मताधिकाराचा दुरुपयोग न करतां, तो अधिकार विचारपूर्वक वापरतील. डॉ. राजेंद्रप्रसाद यांचें हें मत प्रत्यक्ष अनुभवाला कितपत जुळतें तें ज्याचें त्यानेंच पाहावें. या बाबतींत डॉ. आंबेडकरांनीं असा इशारा दिला आहे कीं,

आमच्यांतील विभूतिपूजेचें बंड मोडल्याशिवाय मतदानाच्या हक्काचा दुरुपयोग थांबणार नाहीं. डॉ. आंबेडकर यांचें मत राजेंद्रप्रसादांच्या मतापेक्षां अनुभवाला अधिक पटणारें आहे. परंतु विभूतिपूजेच्या अवगुणापेक्षां आपला मताधिकार वापरतांना व्यक्त होणारा भित्रेपणा, स्वार्थीपणा आणि विसरभोळेपणा हे अवगुणच अधिक नडणार आहेत.

२६१/४६३२

### उमेदवारांच्या पात्रतेची कसोटी

लोकशाही स्थापन करावयाची म्हणजे प्रौढ मतदानाधिकार देणें प्राप्तच आहे; आणि पाण्यांत पडल्याविना पोहतां येत नाहीं, त्याप्रमाणेंच मताधिकार दिल्याशिवाय तो वापरण्याचें तारतम्य अंगीं येऊं शकत नाहीं; म्हणून जो धोका केव्हां तरी पत्करावा लागणार तो आतांपासूनच पत्करावा असें ठरवून घटनाकारांनीं ही प्रौढ मतदानाची आवांक्याबाहेरची उडी घेण्याचें ठरविलें हें तत्त्वतः गैर झालें असें म्हणतां येत नाहीं. तथापि एक धोका पत्करला तरी त्याच्यावर दुसरा कांहीं तरी उतारा योजून ठेवावयास पाहिजे होता. तसा उतारा योजलेला नाहीं ही घटनाकारांची चूक होय. बाबू राजेंद्रप्रसाद यांनीं घटनेंतील हा दोष प्रांजलपणें निर्दिष्ट केला आहे. निवडणुकीला उभा राहणारा उमेदवार, इतक्या लायकीचा असला पाहिजे, तो अमुक इतक्या कसोटीला उतरला तरच तो उमेदवार होऊं शकतो, अशी अट घालून ठेवली असती म्हणजे प्रौढ मतदानापासून होणारा गोंधळ पुष्कळच आटोक्यांत आला असता. परंतु घटना-समितीनें कोणतीच कसोटी न ठेवतां उमेदवाराला सगळें रान मोकळें सोडलें आहे. त्यामुळें निवडणुकींत केवढा गोंधळ माजेल याची कल्पना करवत नाहीं ! आणि अशा दंगलींतून दडपून पुढें आलेले यशस्वी उमेदवार पार्लमेंटपुढें येणाऱ्या प्रत्येक बिलावर मत देणार ! हिंदुकोडासारखें बिल उद्यां पार्लमेंटपुढें आलें तर त्यावर मत देणाऱ्या सभासदाला दायभाग व मिताक्षरा हे शब्द तरी कानांवरून गेलेले असावयास नकोत काय ? परंतु समान संधि याचा अर्थ तज्ज्ञांप्रमाणेंच अज्ञालाहि पार्लमेंटचा दरवाजा खुला पाहिजे, असा केला गेल्यामुळें या घटनेंत कोठल्याहि निवडणुकीला उमेदवार उभें राहण्याला अट म्हणून ठेवलेली नाहीं. राष्ट्रपाल वा राष्ट्राध्यक्ष होऊं इच्छिणारा इसम निदान ३५ वर्षांच्या वयाचा असला पाहिजे, अशी अट नमूद करून ठेवणें, ही पात्रतेच्या कसोटीची निव्वळ थट्टा होय. नोकरींत वा इतर व्यवसायांत जर पायरीपायरीनेंच मनुष्य वर चढतो, तर विधानमंडळाच्या सभासदत्वालाहि तशा कांहीं पायऱ्या ठेवण्याला हरकत काय ? ग्रामपंचायत किंवा लोकलबोर्ड येथपासून क्रमाक्रमानें चढत प्रांतिक विधिमंडळाचा सभासद झाल्यावरच मध्यवर्ति विधिमंडळाला उमेदवार म्हणून उभें राहतां यावें, अशी अट घातली असती तर लोकशाहीच्या तत्त्वाला बाध न येतां, अनुभविक आणि लायक असे सभासद केंद्रीय पार्लमेंटांत बसलेले दिसले असते आणि मग त्यांच्या मतानें संमत होणारा कायदा विचारपूर्वकच केला जाईल, असा जनतेला भरंवसा वाटला असता.

1994

### राज्याचें धोरण कसें असावें ?

आपल्या प्रजासत्ताकांत जी राजकीय सत्ता चालविली जाईल ती कोणत्या धोरणानें चालविली जावी, यासंबंधांत मार्गदर्शनासाठीं म्हणून कांहीं सर्वसाधारण तत्त्वें नमूद करून ठेविलीं आहेत. भावी कायदेमंडळाला दिशा दाखविणारें हें होकायंत्रच आहे, असें म्हटलें तरी चालेल. आपण योग्य दिशेनें चाललों आहों, का भलतीकडे झुकत चाललों आहों, हें पडताळून पाहण्याकरितां, आपल्या भारतीय राज्याचीं मूलभूत तत्त्वें म्हणून कांहीं विशिष्ट धोरण या प्रकरणांत नमूद करून ठेवलें आहे. हें धोरण ठरवितांना रामराज्यांतील सर्व सुधारणा व सुखसोयी आपल्या राज्यांत अमलांत आणण्याचा प्रयत्न केला जाईल, असें नमूद करून ठेवलें आहे ! हें धोरण आज जरी मनोराज्याच्याच कोटींत असलें तरी उच्च ध्येय नजरेसमोर असणें हें केव्हांहि अभिनंदनीयच होय; तथापि असल्या मनोराज्यांत वादग्रस्त तत्त्वें नमूद नसावींत; पण यांत कांहीं वादग्रस्त मुद्देहि धोरण म्हणून नमूद केले गेले आहेत. उत्पादनाचीं साधनें आणि उत्पन्न झालेली संपत्ति यांचें अहितकारक केंद्रीकरण न होईल अशी आर्थिक व्यवस्था करण्याचें धोरण ठेवलें जाईल, असें यांत म्हटलें आहे. अर्थशास्त्रांतल्या अनेक वादग्रस्त तत्त्वांपैकींच हें एक तत्त्व आहे व तेंहि इतकें मोघम आहे कीं, तें तत्त्व पाळलें जातें का मोडलें जातें हें समजणेंहि कित्येकदां कठीण होईल. त्याचप्रमाणें राष्ट्राराष्ट्रांत वाद उपस्थित न होतां शांतता व सुरक्षितता निर्माण होईल अशाविषयीं प्रयत्न करणें, राष्ट्राराष्ट्रांतील वादांचा निकाल लवादामार्फत केला जावा अशी खटपट करणें, आंतरराष्ट्रीय करार आणि तहनामे यांच्याविषयीं आदरबुद्धि वाढेल असें करणें इत्यादि मनोराज्यें यांत उभारलीं गेलीं आहेत ! पाकिस्तानाशीं वाटाघाटी करतांना आपल्या या सर्व सदिच्छा कितपत व्यवहार्य व परिणामकारक होऊं शकतात, याचा अनुभव वर्षभर येतच आहे. तरी पण भारत सरकारनें पाकिस्तानाकडे, आपले तंटे युद्धानें न सोडवितां लवादानें सोडवावे असा आपण करार करूं, म्हणून खलिता पाठवून आपला शब्द गुंतवून ठेवलाच आहे ! अशा रीतीनें दगडाखालीं सांपडलेला हात धडपणें काढून घेणें हें देखील किती अवघड आहे, याचा कटु अनुभव भोगावा लागत असतां, केवळ सत्ययुगाला शोभणारे आपले मनोरथ घटनेंत नमूद करून स्वतःला बंधन घालून घेण्याची जरूरी काय होती ?

### प्रांतिक स्वातंत्र्याचा कोंडमारा

ही घटना संघराज्याची आहे, एकसत्तात्मक राज्याची नव्हे. असें असून देखील प्रांतिक स्वायत्ततेला जीं नानाविध बंधनें घातलीं गेलीं आहेत त्यामुळें ही घटना संघराज्यापेक्षां सत्तेच्या केंद्रीकरणाकडेच झुकलेली दिसते. प्रांताचा गव्हर्नर प्रांतानें निवडावयाचा नसून राष्ट्राध्यक्षांकडून त्याची नेमणूक व्हावयाची आहे. प्रांतिक सत्ता व केंद्रीय सत्ता यांच्यांत संघर्ष उत्पन्न होऊं नये म्हणून ही योजना आहे असें सांगितलें जातें. पण या योजनेनें संघर्ष कसा

टळणार ? प्रांतिक लोकमतानें ठरविलेली एखादी योजना केंद्रीय सत्तेला अमान्य झाली तर संघर्ष उद्भवणार. अशा वेळीं प्रांतिक गव्हर्नर जर लोकमताला विरोध करूं लागला तर लोकसभा व गव्हर्नर यांच्यांत जो संघर्ष निर्माण होईल तो संघर्ष तत्त्वतः प्रांत व केंद्रीय सत्ता यांच्यांतलाच होय. केंद्रीय सत्तेनें राष्ट्राध्यक्षांमार्फत विरोध केला काय अथवा राष्ट्राध्यक्षाचा हस्तक जो गव्हर्नर त्याच्यामार्फत विरोध केला काय, प्रांतीय सत्ता व केंद्रीय सत्ता यांच्यांतलाच तो विरोध होय. असा विरोध जेव्हां राज्याला विघातक होण्याचा संभव दिसेल तेव्हां राष्ट्राध्यक्ष हा प्रांतिक स्वायत्ततेला बंधन घालून ती सत्ता आपल्या हातीं घेईल ! प्रांतिक सत्तेवर असें आक्रमण आणीबाणीच्या प्रसंगींच केलें जाईल, हें तत्त्वतः खरें असलें तरी, हातांत दिलेलें हें शस्त्र केव्हां उगारावयाचें तें ठरविण्याचा अधिकार प्रांतांना नसून केंद्रीय सत्तेलाच आहे, यामुळें प्रांतिक स्वायत्तता अगदींच संपुष्टांत आली आहे. याशिवाय कर बसविण्याचा, वसूल करण्याचा आणि खर्च करण्याचा अधिकार प्रांतिक सरकाराकडे किती दिला आहे याचा विचार आर्थिक व्यवहाराच्या प्रकरणांत केला आहे, त्यावरूनहि प्रांतिक अधिकाराचा पंगूपणा व्यक्त होतो.

### प्रांत एकभाषी एकजिनसी नाहींत

भाषावार प्रांतरचना केली गेली नाहीं; एवढेंच नव्हे तर तशी प्रांतरचना होण्याच्या मार्गांत जे अनेक खड्डे खोदून ठेवले आहेत, त्यांचा उद्देश देखील प्रांतीय सत्ता प्रबळ न व्हावी हाच दिसतो. राज्यकारभार सुलभ, ठाकठिकीचा व काटकसरीचा होण्याला भाषावार प्रांतरचना होणें आवश्यक आहे; परंतु तसे प्रांत बनविल्यास, नाकापेक्षां मोती जड, असा प्रकार होईल, अशी धास्ती घटनाकारांनीं घेतली, आणि तेवढ्यासाठीं भाषावार प्रांतरचना टाळण्याचा प्रयत्न झालेला दिसतो. ब्रिटिश सरकारची **'फोडा व झोडा'** ही जी राजनीति होती त्याच राजनीतिचें अवलंबन करून, एकेका प्रांतांत भिन्न भिन्न भाषीय लोक एकत्र कोंबून, त्यांच्यांत अंतस्थ संघर्ष निर्माण होईल व प्रांतिक सत्ता डोईजड न होइल, अशी तजवीज केली गेल्याचा संशय, ही घटना वाचतांच कोणासहि येईल.

### प्रांत व केंद्र यांच्यांतील अधिकार-विभागणी

प्रांत व केंद्र यांच्यांतील अधिकार-विभागणी, बरीच गुंतागुंतीची झाली आहे. कायद्याची बजावणी, करवसुली, मामुली राज्यकारभाराचीं कामें, यासंबंधांत प्रांतांना जरूर तितके सर्व अधिकार निश्चित स्वरूपाचे व तोडून दिलेले आहेत. परंतु कायदे करणें आणि कर बसविणें आणि वसूल झालेल्या करांचा वांटा मिळणें या बाबतींत प्रांतांना पूर्णाधिकार नाहींत. यासंबंधांत विषयवार वांटणी करणारीं कलमें या घटनेंत नमूद आहेत. त्यांत केंद्राधीन विषयांची संख्या ९७ आहे, प्रांताधीन विषयांची संख्या ६६ आहे; तथापि ज्या विषयासंबंधीं केंद्रें व

प्रांत यांना समानाधिकार दिला गेला आहे असे विषय ४७ आहेत. या विभागाला 'समानाधिकार सूची' असें म्हटलें आहे. या बाबतींत प्रांतिक कायदेमंडळ कायदा करूं शकेल आणि केंद्रीय कायदेमंडळहि कायदा करूं शकेल. पण अशा दोन कायद्यांत विरोध आला तर केंद्रीय कायदाच प्रभावी ठरणार हें उघड आहे. अर्थातच तेवढ्या बाबतींत प्रांताची सत्ता निष्फळ ठरणार आणि असली आपत्ति ओढवूं नये म्हणून प्रांतानें कायदा करण्याचें टाळलें व केंद्रीय सरकारनेंहि कायदा केला नाहीं, तर अनवस्था प्रसंग येणार. यास्तव असले 'समानाधिकाराचे' विषय शक्य तितके कमी असावयास पाहिजेत; आणि जेवढ्या बाबतींत असा समानाधिकार दिला असेल तेवढ्या बाबतींत प्रांतानें आपला अधिकार अगोदर बजावला तर केंद्रीय सत्तेला त्या प्रांताच्या अधिकाराला व्यत्यय आणण्याला प्रत्यवाय असावा. पण असा निर्बंध या घटनेंत नसून त्याच्या उलट निर्बंध मात्र नमूद आहे.

याशिवाय घटनेंतील कलम २५० अन्वयें केंद्रीय पार्लमेंटला आणीबाणीच्या प्रसंगीं प्रांतांच्या समानाधिकारांतच नव्हे, तर प्रांतांच्या खास अधिकारांतील विषयांतहि हस्तक्षेप करतां येतो. याखेरीज कलम २५३ व २५४ यांत मध्यवर्ति सरकारला विशेषाधिकार देऊन प्रांताच्या सत्तेची खच्ची करण्यांत आली आहे. केवळ आंतरराष्ट्रीय परिषदेनें शिक्षण, आरोग्य इत्यादीसंबंधीं एखादा ठराव केला तर त्या ठरावाची बजावणी करण्यासाठीं केंद्रीय पार्लमेंटनें कायदा करून प्रांतावर सक्ती करावी हें अनुचित होय. आंतरराष्ट्रीय परिषदेनें शिक्षण, आरोग्य इत्यादि सार्वजनिक हिताच्या बाबींसंबंधीं एखादी उपयुक्त सूचना केली तर तिची अम्मलबजावणी आपण करावी, एवढी लोकहितदक्षता प्रांतिक सरकारांत नाहीं असें केंद्रीय सत्तेनें गृहीत धरून, ती सुधारणा प्रांतावर लादणें हा प्रांतिक सत्तेचा उघड उपमर्द होय.

### स्वाराच्या हातांत लगाम नाहीं

प्रस्तुतच्या घटनेंतील इतर सर्व भागांपेक्षां आर्थिक व्यवहारासंबंधाचे निर्बंध फारच घोटाळ्याचे आहेत. कर बसविणें, बसविलेले कर वसूल करणें, वसूल झालेली रक्कम संभाळणें आणि त्या रकमेंतून खर्च करणें, यासंबंधांत एकसूत्रीपणा नाहीं. एकानें कर बसवावयाचा, दुसऱ्यानें तो वसूल करावयाचा, तिसऱ्यानेंच वांटणी ठरवायाची, अशी गुंतागुंत यांत फार आहे. प्रांताच्या उत्पन्नांत शेतजमिनीवरील सर्व प्रकारचे कर प्रांतांनींच बसावावयाचे व प्रांतांनाच मिळावयाचे आहेत. ही प्रांताची उत्पन्नाची मुख्य बाब असल्यानें हा कर कमी करण्यांत प्रांताची नुकसानी आहे; परंतु शेतीवर कर आधींच डोईजड असतांना त्यांत आणखी नव्या करांची भर पडल्यास शेतकऱ्यांची दुरवस्था होईल व प्रांतिक सरकारविषयीं असंतोष वाढेल. अबकारी कर यापुढें उत्पन्नाची बाब राहिली नसून, मद्यपान-प्रतिबंध अमलांत आणण्याविषयीं करावा लागणारा खर्चच प्रांतांना डोईजड होत आहे.

विक्रीवरील कर व करमणुकीवर कर हे दोन कर प्रांतांच्या पूर्ण अखत्यारीचे आहेत; तथापि या करांचें ओझें श्रीमंत व गरीब यांजवर सारखेंच पडत असल्यानें गरीबांना झेपेलइतकीच या करांची मर्यादा ठरवावी लागते. त्यामुळें खजिन्याची तूट भरून निघेल इतके हे कर वाढवितां येत नाहींत. प्रांतांची ही तूट भरून येण्याकरितां प्राप्तीवरील कराचा मोठा हिस्सा प्रांतांना मिळाला पाहिजे; परंतु त्या कराची आकारणी व वसुली केंद्रीय सरकार करणार आणि आर्थिक मंडळ त्याची वांटणी ठरविणार! ही वांटणी ठरवितांना प्रांताप्रांतांत वैषम्य उत्पन्न होईल आणि प्रांत व केंद्र यांच्यांतहि घासाघीस होईल. प्राप्तीच्या करांतून मुंबई इलाख्याला अवघे २१ टक्के मिळावें असें तूर्त ठरल्याचें कळतें. ही रक्कम मुंबई सरकारला अगदींच अपुरी पडेल हें निश्चित आहे. ही तूट भरून काढण्यासाठीं 'प्रॉपर्टी टॅक्स' बसवावा तर तो बसविण्याची सत्ता प्रांतांना नसून मध्यवर्ति सरकारलाच आहे. त्या सरकारनें तो कर अगदीं कमी बसविला तर प्रांतांनीं काय करावें? तीच अवस्था वारसा-कर, सीमान्त-कर, स्टॉक एक्स्चेंज कर आणि जाहिरातींवरील कर यांची आहे. या करांचें उत्पन्न प्रांतांना मिळावयाचें, पण कर लादण्याचा अधिकार केंद्रीय सरकाराचा. घोड्यावर बसणाऱ्या स्वाराच्या हातीं लगाम नसला म्हणजे त्याची जी अवस्था होते तीच अवस्था प्रांतिक सरकारांची होणार. यामुळें प्रांताप्रांतांत चुरस व मध्यवर्ति सरकाराविरुद्ध तक्रार सतत चालू राहील. नाहींतर प्रांतिक सरकारला आपल्या अखत्यारींतील कर डोईजड होतील इतके वाढवून प्रजाजनांकडून शिव्याशाप खावे लागतील. पण पूर्वीप्रमाणें आतां शाब्दिक शिव्याशापानेंहि भागणार नाहीं. जादा कर लादणारें मंत्रिमंडळ अप्रिय होईल आणि कर कमी करतो म्हणून थापा देणारे उमेदवार यशस्वी होऊन मंत्रिमंडळांत उलथापालथ होईल. पण असलें थापेबाज मंत्रिमंडळ तरी थोडक्या करांत कारभार कसा चालविणार? त्या मंत्रिमंडळाला आपलें आसन स्थिर राखण्यासाठीं केंद्रीय करकारकडून अधिकाधिक मदत मागावी लागणार आणि केंद्रीय सरकारला प्रांतांच्या मागण्या पुरवितां पुरवितां नाकीनव येणार!

### मध्यवर्ति सत्तेची अडचण

प्रांतांच्या मागण्या पुरवितां पुरवितां मध्यवर्ति सरकार हमखास टेकीस येईल. शिवाय स्वतःचा खर्च भागविण्याला तरी केंद्राला भरपूर उत्पन्न मिळेल अशी शाश्वती कोठें आहे? कद्र-सरकारच्या उत्पन्नाच्या मुख्य बाबी प्राप्ति-कर, आयात-निर्गत जकात, रेल्वे, पोस्ट व तार, वारसा-कर, अबकारी, स्टॉक एक्स्चेंज, वायदेबाजारावरील कर इ. इ. यांतून प्राप्तीच्या करांपैकीं ४० टक्केच केंद्रीय सरकारला मिळतील. रेल्वे, पोस्ट व तार यांचें उत्पन्न बरेंच झालें तरी त्या खात्यांत नव्या नव्या सुधारणा करण्याची खर्चाची जबाबदारी मध्यवर्ति सरकारवरच पडणार. जकातीचें उत्पन्न परराष्ट्रांशीं

होणाऱ्या व्यापारावर अवलंबून असल्यानें अनिश्चितच राहील. आयात वा निर्गत जकात प्रमाणाबाहेर वाढविली तर उत्पन्न तर घटतेंच, पण त्याशिवाय देशी कारखान्यांची ओरड सुरू होते, असा त्यांत दुहेरी पेंच आहे. खर्च कमी करण्यासाठीं लष्करी खात्यांत काटकसर करावी तर तिकडूनहि संकट ओढवण्याचा संभव आहे. एवंच, इतर अडचणींपेक्षां आर्थिक पेंचप्रसंगच नव्या सरकारास विशेष तापदायक होतील.

## उच्चतम न्यायालयांची व्यवस्था

प्रांतिक न्यायालयांतील निकालावर शेवटचें अपील यापुढें विलायती प्रिव्ही कौन्सिलकडे न जातां दिल्लींतील सर्वोच्च न्यायालयांतच चालविलें जाईल. संपूर्ण स्वातंत्र्याचें हें स्पष्ट द्योतक असल्यामुळें तें अभिनंदनीय आहे. न्यायखातें व बजावणीखातें वेगवेगळें करण्याला नव्या घटनेंत सवड ठेविली आहे, हेंहि इष्टच होय. स्वातंत्र्याचे मूलभूत हक्क, प्रांताप्रांतांतील तंटे, प्रांत व केंद्र यांच्या दरम्यानचा वाद आणि घटनेंतील कोणत्याहि कलमाच्या अर्थाविषयींचा व उद्देशाविषयींचा वाद या बाबतींत सर्वोच्च न्यायालयाकडे दाद मागण्यास सवड ठेवलेली आहे. या सवलतीचा दुरुपयोग केला जाऊन निष्कारण तंटे-बखेडे वाढतील व तें काम उच्चतम न्यायालयाला अनावर होईल कीं काय अशी धास्ती वाटते. ही घटना कार्यवाहींत येऊं लागतांच सर्वोच्च न्यायालयाकडे दाद मागण्याला सुरुवातहि झाली आहे. असे दाखल होणारे वाद लवकर निकालांत निघावे याकरितां उच्चतम न्यायालयांत न्यायाधिशांची संख्या भरपूर ठेवावी लागेल.

## सर्वसामान्य विचार

घटना-समितीनें पुष्कळच परिश्रम घेऊन ही व्यापक घटना शक्य तितकी अनाक्षेपार्ह तयार केली यांत शंका नाहीं. तथापि ज्या परिस्थितींत आणि ज्या मनःस्थितींत ती तयार केली गेली, त्यांचें प्रतिबिंब या घटनेंत पडल्याशिवाय राहिलें नाहीं.

१. प्रांतांना अधिकाधिक स्वायत्तता द्यावी तर केंद्रीय सत्ता दुबळी होईल या भीतीनें पछाडल्यामुळें संघराज्याची घटना लिहितां लिहितां तिचें केंद्रीकरण प्रमाणाबाहेर झालें आहे.

२. घटनेमध्यें मुख्य तत्त्वें तेवढीं नमूद करावयाचीं आणि तपशिलाची सर्व व्यवस्था राष्ट्रपाल अथवा कायदेमंडळ यांच्याकडे सोंपवून द्यावयाची, अशीच प्रथा सर्वत्र आढळते. परंतु आपल्या या घटनेंत अगदीं किचकट, क्षुल्लक तपशीलहि कलमवार नमूद केला गेला आहे. उदाहरणार्थ, कलम २३८ यांतील पोटकलम ३ पाहा. त्यांत म्हटलें आहे कीं, "राजप्रमुखाचें स्वतःचें निवासस्थान नसेल तर, भाडें न देतां त्याला सरकारी निवासस्थानाचा वापर करण्याचा हक्क असेल." इतका किरकोळ तपशील घटनेंत

कशाला ? आणि तपशीलच जर द्यावयाचा तर मग "जेथें राजप्रमुखाला हृदय-विकार असेल तेथें त्याला वरच्या मजल्यावर पोंचविण्याकरितां 'लिफ्ट' असावा," असा तपशील त्याच्यापुढें कां जोडला नाहीं ? लिहिण्याचा मतलब एवढाच कीं, या घटनेंतील किती तरी किरकोळ तपशील गाळून ही घटना अधिक सुटसुटीत करतां आली असती. घटनेंत तपशील नमूद केल्यानें कारभार करणाऱ्यांचे हात निष्कारण बांधले जातात आणि वादविवादाचीं स्थळें प्रमाणाबाहेर वाढतात.

३. आर्थिक व्यवहारांची व्यवस्था आणि कर लादणें, वसूल करणें व वांटणी करणें, याबाबतचा तपशील वादग्रस्त होऊन सर्वोच्च न्यायालयाला हे तंटे तोडण्याचें काम मोठें जिकीरीचें होऊन बसेल.

४. काटकसरीच्या धोरणाची तरतूद कोठेंच नसल्यामुळें असलेले कर वाढविणें अथवा नवे नवे कर लादणें, यांवर कांहींच नियंत्रण न राहून जनतेवरील करांचा बोजा वाढतच जाईल.

५. इतर अनेक कर वाढवून देखील जमाखर्चाची तोंडमिळवणी होत नाहींसें झाल्यास मध्यवर्ति सरकारला मिठावरील कर पुनः बसवावा लागेल !

६. धार्मिक स्वातंत्र्याचें आश्वासन आणि सध्यां प्रचलित असलेले कित्येक कायदे व पुढें येणारीं बिलें यांच्यांत विरोध उत्पन्न होऊन असल्या प्रत्येक कायद्यावर व बिलावर सर्वोच्च न्यायालयाकडे दाद मागण्याची प्रथा सुरू होईल. जैन पुढाऱ्यांनीं आम्ही हिंदु नव्हे अशी तक्रार मांडून यासंबंधांत 'सूत उवाच' करून ठेवलेंच आहे.

७. "सरकार आपल्या खर्चानें चालविलेल्या शाळांत धार्मिक शिक्षण देणार नाहीं" असलें निषेधात्मक कलम घटनेंत घालून ठेवल्यामुळें धार्मिक संस्थांना धर्मशिक्षण देण्यासाठीं आपापली स्वतंत्र व्यवस्था करावी लागेल. त्यामुळें धर्मसहिष्णुता वाढण्याच्याऐवजीं असहिष्णुताच अधिक वाढेल. धर्मसहिष्णुता वाढीस लागावी हें उद्दिष्ट सरकारला साधावयाचें असेल, तर सरकारनें आपल्या शाळांतून सर्वमान्य धार्मिक व नैतिक शिक्षण देण्याची व्यवस्था स्वतःच करावयास पाहिजे होती. तसें न करतां निषेधात्मक कलम घातल्यानें त्याचा परिणाम नेमका सरकारच्या हेतूच्या उलटच होण्याचा संभव आहे.

हे व अशासारखे आणखी कित्येक खांचखळगे या घटनेंत आहेत आणि जसजशी त्या कलमांची बजावणी होत जाईल तसतसा त्यासंबंधाचा कटु अनुभव येत जाईल. तथापि या बाबतींत घटना-समितीनें एक बरी सोय करून ठेवली आहे कीं, घटना बदलण्याची तरतूद दुर्घट करून ठेवलेली नाहीं., यामुळें अनुभव येईल तसतसा फेरबदल करण्याचा उपक्रम करण्यास अडचण भासणार नाहीं. अलिकडे इंजिनियरिंगचीं कामें इतकीं मजबूत होत असतात कीं, एकीकडे इमारत पूर्ण झाल्याचें सर्टिफिकीट लिहिलें जातें, तर त्याच वेळीं दुसरीकडे

दुरुस्तीच्या कामाचें कंत्राट दिलें जातें! तसा प्रकार न व्हावा अशी कितीहि सदिच्छा असली तरी एवढ्या मोठ्या व्यापक व किचकट तपशिलाच्या घटनेंत, परस्परविरोध, विसंगति वा उणीव आढळून येणें व दुरुस्तीचे प्रसंग उद्भवणें साहजिक आहे. मुंबई सरकारला किरकोळ गुमास्ता कायदा जाहीर केल्या दिवसापासूनच जर त्यांत दुरुस्ती करावी लागली, तर या व्यापक घटनेवर तसा प्रसंग आल्यास नवल नाहीं. अशासारखे कितीहि किरकोळ आक्षेप या घटनेवर घेतां आले, तरी भारताच्या पूर्ण स्वतंत्र अशा प्रजासत्ताक राज्याची ही घटना, भारतवासियांनींच, भारताच्या भावी उत्कर्षाकरितां, स्वयंनिर्णयाच्या तत्त्वानुसार, स्वतः तयार केली, याचा अभिमान प्रत्येक नागरिकाला हर्षोत्फुल्ल करील हें निश्चित आहे.

## निराळा पक्ष न काढतां हिंदुसभाच बळकट करा : ७

[ खालील लेख प्रसिद्ध झाल्यानंतर जयपूर येथें हिंदुमहासभेचें खास अधिवेशन झालें. त्यांत स्वतंत्र पक्ष स्थापण्याचा विचार अमान्य झाला. अहिंदूंना हिंदुसभेचे सभासद करून घेण्याचा विचारहि अग्राह्य ठरला. मात्र निवडणुकीच्या वेळीं जे कोणी हिंदुमहासभेचा कार्यक्रम मान्य करतील त्यांच्याशीं, हे अहिंदु असले तरी, सहकार्य करावें असें ठरलें. या योजनेमुळें हिंदुमहासभेच्या बाहेरच्या मतदारांचेंहि साहाय्य हिंदुमहासभेला मिळूं शकेल आणि आपल्या सभासदांव्यतिरिक्त अन्य उमेदवारांचाहि हिंदुमहासभा पुरस्कार करूं शकेल. या ठरावानें हिंदुमहासभेचें बळ वाढण्याला मदत होईल. ]

हिंदुमहासभेनें यापुढें राजकारण करावयाचें झाल्यास तें कोणत्या मार्गानें करावें, महासभेंतच अहिंदूंना, विशिष्ट कार्यापुरता प्रवेश देऊन तें करावें, का राजकारणासाठीं निराळाच पक्ष स्थापावा, असा प्रश्न येऊन पडला असून, त्यावर तीव्र मतभेद झालेला दिसत आहे. या वादाचा निर्णय करण्याकरितां पुढील महिन्यांत जयपूर येथें हिंदुमहासभेचें खास अधिवेशन भरणार असून, तेथें यासंबंधांत निर्णय घेण्यांत येईल. हा प्रश्न महत्त्वाचा असल्यानें, त्या बाबतींत अगाऊ नीट विचार करून मतप्रदान व्हावें याकरितां, त्याची जितकी सूक्ष्म चिकित्सा होईल तितकी चांगली हें जाणून, मतदारांच्या विचाराकरितां पुढील विचारसरणी मांडण्यांत येत आहे.

( केसरी, दि. २० मार्च १९५१ )

## राजकारणाकडे लक्ष दिलेंच पाहिजे

भारताला स्वातंत्र्य प्राप्त झालें असून, येथें धर्मातीत लोकशाही राज्यघटनाहि प्रस्थापित झाली आहे, आणि त्या नव्या राज्यघटनेंत जातिविशिष्ट अथवा धर्मविशिष्ट मतदारसंघांना स्थानच नाहीं. अशा या नव्या परिस्थितींत हिंदुमहासभेसारख्या विशिष्ट धर्माच्या संस्थेला वेगळें असें राजकारण कोणतें करावें लागणार ? राजकारणांतील कोणत्याहि प्रश्नाकडे केवळ हिंदु या दृष्टीनें पाहणें युक्त नाहीं, याकरितां यापुढें हिंदुसभेनें केवळ धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यापुरतेंच आपलें क्षेत्र मर्यादित करून, राजकारणांत लोकशाही तत्त्वानुरूप जे कोणते धर्मातीत पक्ष असतील त्यांत, जेथें जसें रुचेल वा जुळेल तसें, सामील व्हावें, आपला असा निराळा राजकीय पक्ष ठेवूंच नये, असें प्रतिपादन करून बुद्धिभेद करण्यांत येत आहे. वरकरणी ही विचारसरणी निरुत्तर करणारी दिसतें खरी, परंतु सूक्ष्म विचार केल्यास हा मार्ग हिंदुमहासभेला श्रेयस्कर होणार नाहीं. भारतांत जरी धर्मातीत लोकशाही राज्यघटना स्थापित झाली असली तरी ती इंग्लंड, अमेरिका इत्यादि देशांतील घटनेसारखी खरी मनापासूनची, धर्मातीत नाहीं. ओठांतून ती धर्मातीत आहे, पण पोटांतून ती धर्मातीत नाहीं.

येथील बहुजनसमाजाच्या मनांत धर्मभावना इतकी खोल रुजलेली आहे कीं, अगदीं केवळ राजकीय गोष्टीकडेहि तो धर्माच्या चष्म्यांतूनच स्वभावतः पाहतो. चष्मा वापरणारा मनुष्य माझी दृष्टि चष्म्याच्या रंगावर किंवा रचनेवर अवलंबून नाहीं, असें म्हणत असला तरी तें जसें अस्वाभाविक त्याचप्रमाणें भारतांतील विद्यमान स्थितींतला हिंदु असो वा मुसलमान असो, तो कोणत्याहि प्रश्नांकडे धर्मनिरपेक्ष दृष्टीनें पाहील, हें सद्यःस्थितींत अस्वाभाविक आहे. त्यांतून स्वतः सरकारचीच दृष्टि धर्मनिरपेक्ष म्हटली जात असली तरी निधर्मितेचा देखावा करण्याची चटक लागल्यानें ती इतकी विकृत झाली आहे कीं, हिंदुसमाजाला आपले हितसंबंध सुरक्षित राहतीलच असा विश्वास वाटत नाहीं. ही साशंकतेची दृष्टि अशीच कायम राहील असें म्हणण्याचा उद्देश नाहीं; तथापि जोंपर्यंत गेल्या तीस वर्षांतल्या राजकारणाची स्मृति लुप्त झाली नाहीं, विशेषतः गेल्या पांच वर्षांतले अत्याचार स्मृतिपटलावरून पुसले गेले नाहींत आणि जोंपर्यंत दिल्ली-करारासारखे करार करणें आणि ते मोडणें चालूच आहे, जोंपर्यंत व्यापारी-करारांतहि अडवणूक चालूच आहे. काश्मीरचा प्रश्न जोंपर्यंत धडपणें सुटला नाहीं आणि मुख्यतः निर्वासितांच्या जिनगीचा ताबा त्यांना मिळाला नाहीं, तोंपर्यंत हिंदुमहासभेला राजकारणाकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं.

## राजकारणांत सहकार्याची आवश्यकता

हिंदुमहासभा राजकारणापासून निवृत्त होऊं शकत नाहीं हें मान्य केल्यावर त्या सभेनें तें राजकारण एकाकी लढवावयाचें का त्या कामीं इतरांचें

साहाय्य घ्यावयाचें हा प्रश्न पुढें उभा राहतो आणि या प्रश्नाचें उत्तर अगदीं साधें व उघड आहे. सध्यांच्या परिस्थितींत प्रबळ असा विरोधी पक्ष उभा करण्याची ताकद एकट्या हिंदुसभेच्या अंगीं नाहीं. हिंदुमहासभेच्या बाहेर मतदारांची एवढी प्रचंड संख्या आहे कीं, तिच्यांतून आपण कोणाशींच सहकार्य न करूं तर गेल्या निवडणुकीप्रमाणें आपण महापुरांत वाहत जाऊं आणि आपणाला कोठेंच ठाव मिळणार नाहीं. याकरितां आपण समान विचाराच्या कांहीं हिंदुसभाबाह्य पक्षांशीं सहकार्य केलें पाहिजे. असें सहकार्य आपापले पक्ष व त्यांचे कार्यक्रम वेगवेगळे ठेवून खुल्या दिलानें होऊं शकत नाहीं.

येथपर्यंतहि फारसा वाद नाहीं. पण याच्या पुढल्या धोरणासंबंधानेंच तीव्र मतभेद उत्पन्न झाला आहे. हिंदुसभेशीं सहकार्य करूं इच्छिणाऱ्यांना हिंदुसभेच्या '**पार्लमेंटरी फ्रंट**'चे दरवाजे खुले ठेवणें हा एक मार्ग असून, हिंदुमहासभेनें पार्लमेंटरी कामासाठीं एक निराळा पक्ष स्थापित करून त्यांत अहिंदूंना येण्यास वाव ठेवावा हा दुसरा मार्ग होय. या दोहोंतून दुसऱ्या मार्गाची चिकित्सा आधीं करूं. निराळा पक्ष स्थापन केल्यानें सगळा वाद मिटेल असें वाटतें खरें, पण त्या योगानें आपल्या मूळच्या ध्येयाला व कार्यक्रमालाच धोका पोंचत आहे.

### निराळा पक्ष स्थापण्यांतला धोका

राजकारणासाठीं निराळा पक्ष उभा केला कीं, सगळा राजकारणाचा डाव त्या पक्षाच्या हातीं जाऊन, हिंदुमहासभेला राजकारण कांहींच उरणार नाहीं. याचाच अर्थ हिंदुमहासभेनें राजकारणापासून निवृत्त व्हावें असा होतो; परंतु आपण वर पाहिलेंच कीं, सध्याच्या परिस्थितींत हिंदुसभेनें राजकारणाचा संन्यास घेणें म्हणजे हिंदुसमाजाच्या हिताचा बळी देण्यासारखेंच आहे; आणि तो एक प्रकारें हिंदुसमाजाचा विश्वासघात आहे.

निराळा पक्ष स्थापन केला तरी आपण त्या पक्षामार्फत राजकारणाचा डाव खेळणारच आहों, असें समाधान करून घेणें ही आत्मवंचना होय. निराळा पक्ष स्थापन केल्यावर त्या पक्षाच्या कार्यक्रमाचीं सूत्रें कोणाच्या हातीं राहणार ? हिंदुसभेपासून अगदीं अलग असा जर तो पक्ष आहे तर त्याचा कार्यक्रम स्वतंत्र राहील; आणि मग तो हिंदुमहासभेच्या धोरणाला अनुसरूनच राहील अशी हमी कोण देऊं शकेल ? पक्ष निराळा असला तरी त्यांतील बहुसंख्य सभासद हिंदुसभेचे सभासदच असतील असें सांगण्यांत येईल; परंतु वेगळा धर्मनिरपेक्ष राजकारणी पक्ष स्थापन केल्यावर त्या पक्षांत हिंदुमहासभेच्या सभासदांनीं सामील व्हावेंच अशी सक्ती कशी करतां येईल ? ज्यांना केवळ धार्मिक व सांस्कृतिक कार्य करावयाचें असेल ते या नव्या पक्षांत सामील होणार नाहींत. एतावता त्या पक्षाचीं सूत्रें हिंदुसभेच्या हातीं राहणार नाहींत.

हिंदुसभेच्या सभासदांव्यतिरिक्त अन्य सभासद तरी भरपूर मिळतील असें म्हणावें, तर लोकशाही स्वराज्य पक्षाचा अनुभव सर्वांना आहेच. या पक्षाला केव्हांच बाळसें आलें नाहीं. मग हा नवा पक्ष तरी बाळसेदार होईल अशी आशा कशाच्या जोरावर बाळगावयाची ? दुसरी मुख्य अडचण पदाधिकाऱ्यांची. नवीन पक्ष म्हटला कीं, त्याला हिंदुमहासभेच्या पदाधिकाऱ्यांहून सगळे वेगळे पदाधिकारी हवेत. या पदाधिकाऱ्यांचें त्यांच्या कामांत हिंदुसभेच्या पदाधिकाऱ्यांशीं एकमतच होईल, खटके उडणार नाहींत, हें कशावरून ? हिंदुमहासभेनें कलकत्त्याच्या अधिवेशनांत जो आर्थिक कार्यक्रम मान्य केला, तोच कार्यक्रम या नव्या पक्षास मान्य होईल काय ? तो मान्य न होतां त्यांत या पक्षानें कांहीं बदल केला, तर तो फेरबदल हिंदुमहासभेनें मान्य केलाच पाहिजे अशी हिंदुसभेवर तरी सक्ती कशी करतां येईल ? आपणच वेगळा पक्ष काढून आपणाला एक प्रतिस्पर्धी निर्माण केला, अशी आपत्ति ओढवणार नाहीं काय ?

### हा शब्दच्छल कशासाठीं ?

उलटपक्षीं हिंदुमहासभेचे पदाधिकारी, कार्यक्रम, ध्येय व सभासद या सर्वांची नव्या पक्षाशीं एकरूपता राहील असें म्हणावयाचें असल्यास तो वेगळा पक्ष कसा ? हिंदुमहासभेचीच ती एक विशिष्ट कामापुरती शाखा झाली, असें कबूल कां करीत नाहीं ? वेगळा पक्ष म्हणावयाचा आणि एकरूपता गृहीत धरावयाची, हा नुसता शब्दच्छल नव्हे काय ? नवा पक्ष हा जर स्वतंत्र असला तर ती महासभेच्या ध्येयाची उत्क्रान्ति कशी मानावयाची आणि असा नवाच पक्ष स्थापन झाल्यानें महासभेवरचा जातीयतेचा आक्षेप दूर कसा होईल ? महासभेच्या ध्येयाची उत्क्रान्ति व्हावयाला आणि तिच्यासंबंधाचे गैरसमज दूर होण्याला महासभेनेंच आपली एक शाखा म्हणून **'पार्लमेंटरी फ्रंट'** सुरू केला पाहिजे.

ही जी शाखा सुरू करावयाची तिचें कार्यक्षेत्र संसदेंतील व विधानसभांतील कार्यापुरतेंच मर्यादित राहील आणि या शाखेच्या कामापुरतेंच हिंदुसभेचें द्वार अहिंदूंना खुलें राहील. जे अहिंदु हिंदुमहासभेचा कलकत्ता अधिवेशनांतील राजकीय कार्यक्रम मान्य करतील, त्यांनाच या शाखेंत प्रवेश मिळेल. ज्यांना भारताचें नागरिकत्व प्राप्त झालें नाहीं, अथवा जे भारताचे नाममात्र नागरिक असून, भारताबाहेरच्या कोणत्याहि देशाशीं आपली राजनिष्ठा निगडित ठेवूं इच्छितात, किंवा ज्यांच्या चळवळी अत्याचाराच्या व भारताच्या हिताला विरोधी अशा दिसतील, त्यांना या शाखेंत प्रवेश मिळणार नाहीं. जर कोणी प्रथम सभासद होऊन मागाहून पंचमस्तंभी कारवाई करूं लागेल तर सभेच्या शिस्तीच्या नियमानुसार अशा इसमाचें सभासदत्व रद्द करतां येईल.

### अधिक विपरीत कोणतें ?

हा इतका तपशीलवार खुलासा करण्याचें कारण एवढेंच कीं, अहिंदूंना प्रवेश

खुला ठेवतांच पाकिस्तानी वृत्तीचे मुसलमान अंत घुसतील असा कित्येकांस धाक वाटतो. हा धाक काल्पनिक आहे. पाकिस्तानवाला अगर लीगवाला यांत प्रवेश करूं शकणार नाहीं, अशी त्यांची खात्री पटविण्याकरितां वरील तपशील दिला आहे. इतर कित्येकांना हिंदुसभेंत अहिंदु – विशेषतः मुसलमान – सभासद होऊं शकेल असें म्हणतांच तें अब्रह्मण्य असें वाटतें; पण आपल्या पार्लमेंटरी बोर्डांत अहिंदु घेण्यापेक्षां अहिंदूंच्या नव्या पक्षांत आपण प्रवेश करणें हें अधिक विपरीत नव्हे काय?

पाकिस्तानवाले मोठे कारस्थानी आहेत, ते वरून आपल्या शाखेची शिस्त पाळण्याचें मान्य करतील; पण आंत आल्यावर फंदफितुरी करतील, असले आक्षेप घेणारांचें समाधान कोण करूं शकणार? ज्यांना इतकी धास्ती वाटते त्यांनीं राजकारणाच्या धकाधकीच्या मामल्यांत न पडणेंच बरें. दुसरेंहि एक त्यांना असें उत्तर देतां येईल कीं, जे पाकिस्तानवाले इतके कपटी असतील ते शुद्धीकृत हिंदु होऊन हिंदुसभेंत आले, तर त्यांना तुम्ही मज्जाव करूं शकत नाहींना? शिस्तीचा बडगा शुद्धीकृतावर चालविण्यापेक्षां अहिंदूंवर चालविणें अधिक सोपें आहे, एवढें तरी त्यांनीं विचारांत घ्यावें.

### वादाचा निष्कर्ष

सारांश,

( १ ) हिंदुमहासभेनें राजकारण आपल्या अंगाबाहेर टाकणें युक्त नाहीं. त्या योगानें महासभेच्या कोणत्याच कार्यास तेज चढावयाचें नाहीं.

( २ ) राजकारण करावयाचें म्हटल्यानंतर आपलें बल वाढविण्याचा विचार अवश्य कर्तव्य आहे. हिंदुसमाजांतले अनेक नामवंत पुढारी आणि अहिंदु समाजांतील समान विचाराचे अनेक म्होरके जे आज महासभेच्या कक्षेबाहेर आहेत ते ‘ पार्लमेंटरी फ्रंट ’मध्यें सामील होऊं शकतील.

( ३ ) हा पक्ष हिंदुसभेची शाखा न मानतां वेगळा स्वतंत्र पक्ष मानल्यास त्याचीं सूत्रें हिंदुसभेच्या हातीं राहणार नाहींत; व त्या पक्षाचा हिंदुसभेला तादृश फायदा होणार नाहीं.

( ४ ) वेगळा पक्ष काढून तो हिंदुसभेच्या धोरणानेंच चालेल असें करावयाचें, याचाच अर्थ हिंदुसभेची ती शाखाच होय, असा होतो. मग तसें स्पष्ट म्हणण्याला बिचकण्याचें कारण काय?

( ५ ) अहिंदूंना हिंदुसभेंत प्रवेश देणें यांत शाब्दिक विसंगति दिसली, तरी तिला भिण्याचें कारण नाहीं. संसदेच्या कामापुरता हिंदु व अहिंदु हा भेद नव्या घटनेनेंच नाहींसा केला आहे व हिंदुसभेनेंहि लोकशाही राष्ट्रीयत्व मान्यच केलें आहे.

( ६ ) ‘ पार्लमेंटरी फ्रंट ’चें काम कोणतें आणि महासभेचें धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक काम कोणतें यांच्या मर्यादा निश्चित केल्या म्हणजे एकाची

दुसऱ्यांत ढवळाढवळ होण्याला कारण राहणार नाहीं. जेथें शंका उत्पन्न होईल तेथें अध्यक्षांचें मत हें अखेरचें निर्णायक मत मानून चाललें पाहिजे.

( ७ ) इतर पक्षांशीं सहकार्य करावयाची भाषा बोलावयाची, पण आपल्या राजकारणाचे दरवाजे इतरांना बंद ठेवावयाचे, हें विसंगत होय. अशी एकांगी सहकारिता कोण करूं इच्छील ? ज्यांच्याशीं सहकार्य करावयाचें त्यांना त्या सहकार्यापुरतें तरी सभासदत्व दिलेंच पाहिजे. त्याचा फायदा कोण घेतील, हा त्यांचा प्रश्न आहे, पण आपण तरी संकुचित वृत्तीच्या आरोपांतून मुक्त होऊं. नवीन स्वतंत्र पक्ष काढल्यानें आपली संकुचित वृत्ति अधिकाधिक दृढ, हास्यास्पद व आत्मघातकी होईल.

## समर्थांच्या चतुःसूत्रीच्या धोरणानें चला

थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे हिंदुमहासभेचें कार्य श्रीसमर्थांच्या चतुःसूत्रीला धरून चालवावें. (१) पहिलें तें हरिकीर्तन; यांत हिंदूंच्या धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक सुधारणांचा समावेश व्हावा व हिंदुसभेचें हें मुख्य कार्य, केवळ हिंदु सभासदांपुरतें मर्यादित असावें. ( २ ) दुसरें तें राजकारण; यांत ग्रामपंचायतीपासून तो तहत संसदेपर्यंतच्या सर्व सभा, त्यांच्या निवडणुकी व त्यांतील कामें, यांचा समावेश व्हावा आणि या कामांत समान विचारांच्या अहिंदूंनाहि भाग घेण्यास मुभा असावी. ( ३ ) तिसरें तें सावधपण सर्व विषयीं; यांत आपली तत्त्वच्युति न होईल आणि पंचमस्तंभीयांना गडबड करण्याला सवड मिळणार नाहीं, अशी शिस्त राखण्याची जबाबदारी येईल. ( ४ ) चवथा तो साक्षेप; यांत पहिल्या दोन कलमांतील कार्यभाग अधिकाधिक प्रभावी होण्यासाठीं करावयाच्या उद्योगाचा समावेश होतो. हिंदुमहासभेचा प्रभाव समाजावर न पडण्याला 'साक्षेप' या गुणाचा अभावच कारणीभूत आहे. अंग मोडून आणि स्वार्थत्यागपूर्वक कार्य करूं लागल्यास हिंदुमहासभेचें सभासदत्व किती तरी वाढूं शकेल. त्यांतल्या त्यांत नवा जो 'पार्लमेंटरी फ्रंट ' उघडावयाचा त्यांत सभेबाहेरच्या अनेकांना आंत ओढण्याचा प्रचंड उद्योग केला पाहिजे. तिकडे आपली शक्ति खर्च न करतां वादापुरतें तेवढें आपल्याला बळ चढतें, हाच तर हिंदु समाजाला मोठा दुर्गुण जडला आहे.

हा दुर्गुण झाडून टाकून अंग मोडून कार्य करणारे उत्साही सभासद भेटतील तर नवा पक्ष ( आंतला म्हणा अगर वाटल्यास बाहेरचा म्हणा ) प्रबळ होईल आणि त्या योगानें हिंदुमहासभा प्रबळ होईल. केवळ 'आंतला' अथवा 'बाहेरला' एवढ्या शाब्दिक फरकानें सद्यःस्थितींत कांहींहि सुधारणा होणार नाहीं.

# धर्म व तत्त्वज्ञान

श्रीसमर्थांचें राजकारण : : : : : : १

[ एकवीस वर्षांपूर्वी हें व्याख्यान **शिवाजी-मंदिरांत** झालें आणि त्या व्याख्यानाला लेखांचें स्वरूप देऊन हे लेख त्याच वेळीं **केसरी** पत्रांत प्रसिद्ध केले. त्या वेळेपासून आतांपर्यंतच्या मध्यंतरींच्या काळांत याच विषयावर अनेक लेख वा ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत. तथापि या एकवीस वर्षांपूर्वींच्या व्याख्यानांत कांहीं फेरबदल केला पाहिजे असा नवा मुद्दा पुढें आला नाहीं. अलीकडे **समर्थभक्त** श्री. नानासाहेब देव यांनीं समर्थावताराचे तीन खंड लिहून प्रसिद्ध केले. त्यांतील कांहीं नव्या माहितीनें माझ्या या व्याख्यानांतील विधानांना दुजोराच मिळाला आहे. विशेषतः '**अकारपूर्वक यवनासि मारविलें**' हा उल्लेख अफझलखानाच्या वधास उद्देशून असला पाहिजे, असा जो तर्क त्या वेळीं केला होता, त्याला प्रत्यक्ष पुरावाच मिळाला आहे. कारण मूळ पोथींत प्रथम '**अफझलखानास मारविलें**' असेंच लिहिलें होतें; मागाहून त्याला हरताळ फासून वर चिठ्ठी चिकटवून '**अकारपूर्वक यवनास**' असा बदल केला आहे. हा शोध घालण्यांतला हेतु, पहिलें विधान खोडून काढण्याचा नसून तेंच विधान सांकेतिक भाषेंत असावें, स्पष्ट नसावें, हा दंडक पाळणें, एवढाच दिसतो. व्याख्यानांतील इतर मुद्दे तर्कशुद्ध असून ते खोडले गेले नाहींत; म्हणून हे लेख जशाचे तसेच येथें छापले आहेत.

( केसरी, दि. ४ मार्च १९३० )

श्री. **नानासाहेब देव** यांचें सविस्तर समर्थचरित्र प्रसिद्ध झाल्यानंतर श्री. **न. र. फाटक** यांनीं **'समर्थचरित्र'** नांवाचें एक पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. कालानुक्रमानें तें पुस्तक अगदीं अलीकडचें असल्यानें त्या पुस्तकांतील विधानांनीं पूर्वीचीं विधानें खंडित झालीं कीं काय असा वाचकांना संशय पडेल म्हणून रा. फाटकांच्या पुस्तकाचा समाचार घेणारा एक लेख **सह्याद्रि** मासिकांत लिहिला व तो या लेखमालेस जोडला आहे. पहिले चार लेख विधायक स्वरूपाचे असून हा पांचवा लेख 'खंडनपर' आहे. रा. फाटकांचीं विधानें कलुषित दृष्टीचीं व तर्काला न पटणारीं अशीं आहेत, असें त्यांत दाखविलें आहे. एवंच, या खंडन-मंडनपर अशा पांच लेखांनीं समर्थांच्या राजकारणाचें स्वरूप स्पष्टपणें निदर्शित करण्यांत आलें आहे. ]

## लेखांक पहिला

पुण्यास **स्नेहसंवर्धक मंडळाच्या** विद्यमानें जो **दासनवमीचा** उत्सव झाला त्या उत्सवांत **'श्रीसमर्थांचें राजकारण'** या विषयावर माझें व्याख्यान झालें. त्या व्याख्यानांत कालमर्यादेमुळें कित्येक महत्त्वाचे उतारे वाचून दाखवितां आले नाहींत आणि कांहीं मुद्द्यांचा संक्षेप करावा लागला. तेव्हां ते सगळे मुद्दे सविस्तर मांडले जावेत अशी अनेक स्नेही मंडळींनीं सूचना केल्यावरून तेंच व्याख्यान विस्तारपूर्वक पुढें देण्यांत येत आहे.

### वादाची भूमिका

तीसपस्तीस वर्षांपूर्वीं इतिहासाचार्य विसूभाऊ राजवाडे यांनीं समर्थांच्या कामगिरीसंबंधानें 'ग्रंथमालें'त एक लेख लिहिला. त्या लेखांत इतर साधुसंत हे केवळ निवृत्तिपर व राजकारणविन्मुख होते आणि समर्थ रामदास हेच काय ते प्रवृत्तिपर आणि राजकारणसन्मुख असे होते असें मत प्रतिपादन केलें. त्या वेळेपासून रामदासांचें राजकारणांत कांहीं अंग होतें काय आणि नामदेव, तुकारामादिक साधुसंत राजकारणविन्मुख होते काय असा दुहेरी वाद चालू आहे. इतर साधुसंत प्रचलित राजकारणापासून अलिप्त नव्हते असें ज्यांना म्हणवत नाहीं असे आक्षेपक रामदासांनाहि त्याच मालिकेंत ओढून रामदासहि प्रचलित राजकारणापासून अलिप्तच होते असें म्हणूं लागले आहेत! उलटपक्षीं ज्यांना रामदासांच्या चरित्रांत राजकारण दिसत नाहीं असें म्हणण्याचें धाडस करवत नाहीं असे वारकरी पंथाचे अभिमानी इतर साधुसंतांच्या काव्यांतहि राजकारण आहे असें म्हणूं लागले आहेत! दोघांचाहि हेतु एकच, पण मार्ग मात्र वेगळा; हेतु असा कीं, इतर साधुसंतांहून रामदासच तेवढे वेगळे राजकारणी दिसूं नयेत. ठरले तर सगळेच साधुसंत राजकारणी ठरावेत; नाहीं तर रामदासासुद्धां सगळेच केवळ निवृत्तिपर भक्ति-

मार्गी ठरावेत ! पण हे परस्परविरोधी आक्षेपक एकमेकांचे आक्षेप परभारेंच खोडून काढीत असल्यानें त्यांच्या वादांत पडण्याचें आपणास कारण नाहीं. तथापि केवळ राजकारणाच्याच दृष्टीनें विचार करणारे कांहीं आक्षेपक रामदासांचा राजकारणाशीं कांहीएक संबंध नव्हता, किंबहुना त्यांच्या ग्रंथांत 'राजकारण' हा शब्द 'चातुर्य' या अर्थानेंच वापरला आहे असें प्रतिपादन करतात ! तेव्हां त्यांचा तेवढा विचार करणें प्राप्त आहे.

### राजकारण शब्दाचा अर्थ व त्याची व्याप्ति

रामदासांनीं राजकारण कांहींच केलें नाहीं असें म्हणणाऱ्यांच्या मतें 'राजकारण' या शब्दाचा अर्थ तरी काय असावा हेंच समजत नाहीं ! कारण राजकारण या शब्दाचा हल्लींचा कोणताहि प्रचलित अर्थ घेतला तरी रामदासांनीं राजकारण केलें नाहीं असें सिद्ध करणें अशक्यच आहे. राजकीय परिस्थितीसंबंधानें विचार करून अमुक प्रकारची राजकीय स्थिति असावी आणि अमुक प्रकारची राजकीय स्थिति नसावी असा विचार व उच्चार करणाऱ्या तत्त्वज्ञापासून तों आपल्याला इष्ट अशी राज्यक्रान्ति घडवून आणण्याकरितां प्रत्यक्ष रणांगणावर चमकणाऱ्या वीरापर्यंत सर्वच आपापल्या परीनें राजकारणांत भाग घेणारे असतात. देशाची राजकीय स्थिति काय आहे याचा विचारहि न करणारे किंवा ती कशी का असेना, मला तिच्याशीं बिलकूल कर्तव्य नाहीं, असें म्हणून तिकडे न पाहणारे किंवा हा संसार म्हणजे सगळीच माया आहे, तिच्यांत 'गजोऽपि मिथ्या पलायनमपि मिथ्या' या विचारसरणीप्रमाणें 'अफझलो मिथ्या शिवोऽपि मिथ्या' असें म्हणून सर्वच विश्व शिवमय पाहणारे किंवा 'ब्रह्मानंदीं लागली टाळी कोण देहातें सांभाळी' अशा वृत्तीचे जे आत्यंतिक वैराग्यशाली असतील त्यांचा मात्र राजकारणाशीं वस्तुतः तिळमात्र संबंध नाहीं असें म्हणतां येईल.

पण 'निशिदिनीं जनचिंता लागलीसे उदारा' असें म्हणून 'विश्वाची चिंता' वाहणारे, 'एकची मागणें आतां द्यावें तें मजकारणें। तूझा तूं वाढवी राजा। शीघ्र आम्हांचि देखतां॥ दुष्ट संहारिले मागें ऐसें उदंड ऐकतों। परंतु रोकडें कांहीं मूळ सामर्थ्य दाखवी॥ रामदास म्हणे माझें। सर्व आतुर बोलणें॥' अशा आतुरतेनें रामवरदायिनी देवीला रोकडें सामर्थ्य दाखविण्याविषयीं कळवळून प्रार्थना करणारे रामदास राजकारणापासून अलिप्त होते हें म्हणणें कोणास तरी पटेल काय ? रामदासांनीं हातांत प्रत्यक्ष शस्त्र घेऊन रणांगणावर उडी घेतली नसेल; पण 'राजकारण' शब्दाची व्याख्या तितकी संकुचित कोणीच कधींहि केली नाहीं. 'आमच्या देशाची स्थिति' हा निबंध लिहून लोकजागृति करणारे '**विष्णुशास्त्री चिपळूणकर**' हे जर राजकारणसंप्रदायाचे आद्य गुरु तर "बहुत लोक मिळवावे। एकविचारें भरावे। कष्ट करोन घसरावें। म्लेंछावरी॥ आहे तितुकें जतन करावें। पुढें आणिक मिळवावें। महाराष्ट्र राज्य करावें। जिकडे तिकडे॥" असला रोकडा चंडोल मुत्सद्दीपणाचा

उपदेश करणारे रामदास हे राजकारणविन्मुख ठरविण्याचें धाडस केलें जावें हा चमत्कार नव्हे काय ? 'सोशल कॉंट्रॅक्ट' हें पुस्तक लिहून 'स्वतंत्रता, समता व बंधुता' यांचा उपदेश करणारा रूसो जर फ्रेंच राज्यक्रान्तीचा आद्यप्रवर्तक मानला जातो तर "मराठा तितुका मेळवावा। आपला महाराष्ट्र धर्म वाढवावा। येविषयीं न करतां तकवा। पूर्वज हासती॥" असला क्षात्रधर्माचा स्फूर्तिदायक उपदेश करणारा महंत राजकारणी नव्हे असें मानणाऱ्या आक्षेपकाची दृष्टि दुराग्रहानें अंध झाली आहे असेंच मानण्याशिवाय गत्यंतर नाहीं.

## समर्थांची राजकारणांतली कामगिरी

समर्थांची राजकारणांतली मजल विचार व उच्चार एवढ्यावरच थांबली नसून आपल्या शिकवणीस अनुसरून त्यांनीं आचारहि पाळला. अर्थातच ते केवळ शब्द-पांडित्य करणारे शब्दशूर नसून 'बोले तैसा चाले' किंवा 'यः क्रियावान् स पंडितः' या कोटींतले कर्मवीर होते. किंबहुना त्यांनीं जो जो उपदेश केला तो तो 'आधीं केलें मग सांगितलें' अशा स्वरूपाचा असल्यानें त्यांच्या राजकारणांतील कामगिरी-विषयीं शंका तरी कशी उपस्थित होते हेंच गूढ पडतें. आणि तें गूढ उकलण्यास 'आंतरः कोऽपि हेतुः' असें मानण्यावांचून दुसरा उलगडाच होऊं शकत नाहीं. असो. समर्थांनीं विचार, उच्चार व आचार अशा त्रिविध मार्गांनीं वेळोवेळीं कोणतें राजकारण केलें तें आतां पाहूं. समर्थांचें सगळेंच राजकारण तत्कालीन परिस्थितीमुळें अत्यंत गुप्त रूपानें व सावधानतेनें खेळलें गेल्यामुळें आणि — इशारतीचे बोलतां नये। बोलावयाचे लिहों नये। लिहावयाचे सांगों नये। जबाबीनें॥ असा त्यांचा दंडक असल्यामुळें त्यांच्या राजकीय चळवळीचा साद्यंत इतिहास लिहिलेला आढळणें शक्य नाहीं. तथापि कोर्टांत देखील जर 'Circumstantial evidence' म्हणजे अनुमानपरंपरेचा पुरावा ग्राह्य मानला जातो, तर इतिहासांत तो ग्राह्य मानलाच पाहिजे अशा प्रकारच्या अनुमानपरंपरेवरून 'फलानुमेयाः प्रारंभाः' या कालिदासोक्तीस अनुसरून समर्थांच्या सगळ्या राजकारणाचा उलगडा होतो. अनुमानपरंपरेंत आपण निर्विवाद गोष्टीवरून विवादविषयक गोष्टींचा छडा लावितों. त्याच पद्धतीस अनुसरून प्रतिपक्षालाहि अमान्य करतां येणार नाहीं अशा सिद्ध गोष्टींवरून वादग्रस्त गोष्टींचा उलगडा करण्याचा उत्तम मार्ग म्हणून समर्थांच्या चरित्रांतल्या शेवटच्या कामगिरीपासून आपण सुरुवात करूं.

## संभाजीमहाराजास केलेला उपदेश

समर्थांनीं आपल्या कारकीर्दीच्या अगदीं अखेरीस संभाजीस उपदेशपर असें जें पत्र लिहिलें त्यांत —

मागील अपराध क्षमावे। कारबारी हातीं धरावे।
सुखी करून सोडावे। कामाकडे॥

श्रेष्ठीं जें जें मिळविलें । त्यासाठीं भांडत बैसले ।
मग जाणावे फावले । गलिमांसी ॥
ऐसें सहसा करूं नये । दोघे भांडतां तिसऱ्यास जाये ।
धीर धरोन महत्कार्य । समजोन करावे ॥
बहुत लोक मिळवावे । एकविचारें भरावे ।
कष्ट करोन घसरावें । म्लेंछावरी ॥
शिवराजास आठवावें । जीवित तृणवत् मानावें ।
इहपरलोकीं रहावें । कीर्तिरूपें ॥

असला अमोलिक उपदेश केला आहे. हा उपदेश राजकारणाचा आहे का केवळ भक्तिपंथाचा आहे ?

याच ठिकाणीं असाहि प्रश्न विचारावासा वाटतो कीं, समर्थांनीं जर बालपणापासून कसलेंहि राजकारण केलें नसतें आणि राज्यकारभारांत काय चाललें आहे तें पाहण्याचाहि त्यांचा परिपाठ नसता, तर वयाच्या ७१ व्या वर्षी असला अव्यापारेषु व्यापार करण्याची त्यांना आकस्मिक स्फूर्ति कशी झाली असती ? बरें, दरबारी लोकांनीं त्यांच्याकडे येऊन स्वतःच्या कार्यासाठीं त्यांना भीड घातली म्हणावें, तर त्या दरबारी लोकांना तरी याच वेळीं समर्थांचीच आठवण कशी व कां झाली ? संभाजीसारख्या तापट प्रकृतीच्या आणि सावत्र आईच्या कारस्थानाच्या संशयामुळें खवळलेल्या राजाकडे समर्थांचें पत्र पाठविलें जावें अशी तजवीज मुत्सद्दयांनीं ज्या अर्थी केली त्या अर्थी समर्थांचा राजकारणाशीं हा पहिलाच संबंध नसावा व संभाजीलाहि समर्थांच्याविषयीं आदर वाटत असावा असेंच नाहीं कां यावरून अनुमान निघत ? आणि या पत्रांतील भाषा नवशिक्या राजकारणी पुरुषाची आहे का मुरब्बी माणसाची आहे हेंहि तज्ज्ञ जाणतीलच. पण या ठिकाणींहि केवळ अनुमानावरच अवलंबून राहण्याचेंहि कारण दिसत नाहीं. समर्थांनीं संभाजीकडे जें उपदेशपर पत्र लिहिलें त्या पत्रांतच "पूर्वी राजश्रीस राजधर्म, क्षात्रधर्म व अखंड सावधान ऐसीं पत्रें पाठविलीं होतीं. तीं पत्रें प्रसंगानुसार वाचून मनासी आणून वर्तणूक होईल. तरी त्या वचनाचा अभिमान श्री. देवासी आहे" ( सांप्रदायिक कागदपत्रें ले. ४३ ) असा पूर्वीचा हवाला दिला आहे. त्यावरून संभाजीस केलेला उपदेश हें समर्थांचें शेवटचें राजकारण असलें, तरी तेंच कांहीं त्यांचें पहिलें राजकारण नव्हे. एवढें सिद्ध होऊन राजधर्म, क्षात्रधर्म व अखंड सावधानता या उपदेशाइतका तरी हा राजकारणाचा संबंध मागें जातो हें उघड आहे. पण राजधर्माचा व क्षात्रधर्माचा उपदेश कोणत्या वेळीं केला तें ठरविण्यापूर्वी मध्यंतरीचें दुसरें राजकारण पाहूं.

### शिवाजीमहाराजांची समर्थांस सनद

समर्थांच्या देवस्थानास ३३ गावें, ४१९ बिघे जमीन, एक कुरण व १२१

खंडी धान्य दिल्याची सनद शके १६०० आश्विन शुद्ध १० ची आहे. ही सनद बार झालेली व शिक्कामोर्तबासहित आहे. तेव्हां तिच्या अस्सलपणाविषयीं आणि तिथि-मितीविषयीं शंका घेण्यास प्रतिपक्षास जागाच नाहीं. त्याचप्रमाणें सनदेंतल्या मजकुराविषयींहि शंका घेतां येत नाहीं, कारण सनदेंतील विधानें विचारपूर्वक आणि माहिती घेऊनच लिहिलीं असलीं पाहिजेत. या सनदेंत स्वतः शिवाजी राजे लिहितात कीं, "मजवर कृपा करूनु मज सनाथ केलें. आज्ञा केली कीं, तुमचा मुख्य धर्म राज्यसाधन करूनु धर्मस्थापना करावी ... ... त्यावरून जो जो उद्योग केला ... ... जे जे मनीं धरिलें ते ते स्वामींनीं आशीर्वादप्रतापें मनोरथ पूर्ण केले; या उपरि राज्य सर्व संपादिलें तें चरणीं अर्पण करूनु सर्व काळ सेवा करावी ऐसा विचार मनीं आणिला तेव्हां आज्ञा झाली कीं, तुम्हांस पूर्वी धर्म सांगितले तेच करावे, तीच सेवा होय ... ... इ. इ." या पत्रांतील मजकुरावरून किती गोष्टींचा उलगडा होतो पाहा. 'मजवर कृपा करून सनाथ केलें' या वाक्यावरून 'निश्चयाचा महा मेरू' इत्यादि मजकुराचें पत्र आपण होऊन समर्थांनीं लिहून 'शिवाजीच्या भेटीचा योग घडवून आणला' त्याचा संदर्भ नीट लागतो; आणि त्या पत्रावरून समर्थ हे शिवाजीच्या राजकारणांत सहजासहजीं पडले नसून हेतुपूर्वक पडले असावे असें दिसतें. कारण त्या पत्रांतच 'उदंड राजकारण तटलें' म्हणूनच तें पत्र लिहिल्याचा उल्लेख निस्संदिग्ध आहे. असो. त्यानंतरच्या दुसऱ्या वाक्यावरून राजधर्माचा उपदेश समर्थांनीं शिवाजीस केला, या संभाजीच्या पत्रांतील विधानाला दुजोरा येतो आणि राजधर्म हें प्रकरण निस्संदेहपणें शिवाजीलाच सांगितलें असें सिद्ध होतें. यावर प्रतिपक्षी कदाचित् असें म्हणतील कीं, समर्थांनीं शिवाजीस राजधर्माचा उपदेश केला असेल, पण तो शके १५९४ च्या चैत्रांत भेट झाल्यानंतर केला असेल; परंतु सनदेंतलें तिसरें वाक्य असें आहे कीं, "त्याजवरूनु जो जो उद्योग केला, जे जे मनीं धरिले ते ते स्वामींनीं आशीर्वादप्रतापें मनोरथ पूर्ण केले." यांत तर क्षात्र व राजधर्माचा उपदेश केल्यावरून 'आपण उद्योग केला व आपले मनोरथ पूर्ण झाले' असें स्वतः शिवाजीमहाराज लिहितात. पण शके १५९४ तच जर समर्थ व शिवाजी यांची पहिली भेट झाली असेल तर राजधर्माचा व क्षात्रधर्माचा उपदेश केल्यानंतर कोणता नवा उद्योग त्यांनीं सुरू केला? शके १५९४ त शिवाजीमहाराजांची सत्ता सर्वत्र प्रस्थापित होऊन ते तर राज्याभिषेकाच्या विचारास लागले होते; तेव्हां राजधर्माचा उपदेश हा शके १५९४ च्या पूर्वी बरींच वर्षें, शिवाजीच्या राज्याची स्थापना व विस्तार होण्यापूर्वीचा, असला पाहिजे हें उघड आहे. राज्याभिषेकाच्या तयारीला लागलेल्या राजाला राज्य संपादन करणें हाच तुमचा धर्म असें सांगणें हें अप्रयोजकपणाचें ठरणार नाहीं काय? अर्थातच शिक्केमोर्तबानिशीं असलेल्या या सनदेवरून समर्थांनीं शिवाजीस भेट देऊन सनाथ केलें, त्यास राजधर्माचा उपदेश केला आणि त्यानंतर

शिवाजीच्या राज्यांची उभारणी झाली असा निष्कर्ष निघतो व त्यावरून ही भेट शिवाजीच्या हालचालींच्या सुरुवातीसच झाली असली पाहिजे, शके १५९४ मध्यें म्हणजे इतक्या उशीरा झाली नसली पाहिजे, हें उघड आहे.

## शके १५९४ मधील भेट

याच क्रमानें आणखी मागें गेल्यास आपण शके १५९४ ला येऊन पोंचतों. शके १५९४ च्या चैत्र कृष्ण पक्षांत शिवाजी व समर्थ यांची भेट झाली ही गोष्ट उभय पक्षांस सारखीच मान्य आहे. मतभेद एवढाच कीं, हीच भेट पहिली असा प्रतिपक्षाचा आग्रह आहे; आणि तीं पहिली नसून आणखी कितवी तरी असावी असें आमचें ठाम मत आहे. या वेळच्या पत्रांतील 'राजे यांची पहिलीच भेट आहे' हें वाक्य केशव गोसावी याचें आहे, दिवाकर गोसावी यांचें नव्हे. दिवाकर गोसावी "राजेश्री शिवराजे भोसले हे समर्थांचें भेटीस येणार" एवढेंच लिहितात. आणि त्या लिहिण्याच्या झोकावरून त्यांना कांहीं या भेटींत अपूर्वता वाटत नव्हती असें दिसतें. कारण पूर्वींपासूनच राजदरबारीं जाण्याचें काम दिवाकर गोसावी यांच्याकडेच असल्यानें त्यांचा शिवाजीमहाराजांशीं बराच परिचय असावा; आणि समर्थ व शिवाजी यांच्या भेटी तत्पूर्वी अनेक वेळां झालेल्या त्यांना अवगत असाव्या. वाकेनिसी टिपण स्वतः दिवाकर गोसावी यांनींच लिहिलेलें असून त्यांत समर्थांचा शिवाजीस अनुग्रह शके १५७१ वैशाख शु. ९ गुरुवार या दिवशीं झाल्याचें व शके १५९४ च्या श्रावणांत शिवाजीस परमार्थप्राप्ति झाल्याचें लिहिलें आहे. यांखेरीज १५७१ ते १५९४ च्या दरम्यानच्या काळांत शिवाजी व समर्थ यांच्या भेटीचे अनेक प्रसंग झाल्याचें दिवाकर गोसावी यांनींच वाकेनिसी टिपणांत नमूद केलें आहे. तेव्हां दिवाकर गोसावी हे आपल्या पत्रांत शिवाजीची ही पहिली भेट असें कसें लिहितील? राज्यदरबाराच्या कारस्थानाशीं अपरिचित असलेला केशव गोसावी हा या भेटीस 'पहिलीच भेट' मानतो; पण तेवढ्यावरून आपणहि ही भेट पहिलीच मानावी असें सिद्ध होत नाहीं. पारगांव-मनपाडळें या विशिष्ट ठिकाणीं ती पहिली भेट असेल एवढाच अर्थ त्यावरून निघूं शकतो.

## पन्हाळगडाचें कारस्थान

या पत्रांत शिवाजीमहाराज समर्थांच्या भेटीस येणार असल्याची बातमी वाचून केशव गोसावी यांनीं या भेटीच्या वेळच्या बंदोबस्ताकरितां त्रिंबक गोसावी, विठ्ठल गोसावी व दत्तात्रय गोसावी यांस उदयीक पाठवितों असें कळविलें आहे. (या सगळ्या महंतांचीं नांवें समर्थप्रताप ग्रंथांत आलीं आहेत). भानजी गोसावी 'गांवीं असतील' असें या पत्रांत मोघम म्हटलें आहे; पण गांवाचें नांव लिहिलें नाहीं. यावरून हें पत्र किती सावधगिरीनें लिहिलें आहे तें ध्यानांत येतें व त्यावरूनच त्यांत राजकारण असावें असा तर्क होतो. रामनवमीचा उत्सव चाफळच्या बाहेर

असा एकदांच ' पराशर प्रांतीं पारग्रामीं केला ' असा उल्लेख समर्थप्रतापांत आहे. पराशर प्रांत म्हणजे पन्हाळगड प्रांत आणि पारग्राम म्हणजे वारणा नदीच्या कांठचें पारगांव-मनपाडळें. येथें समर्थांनीं स्थापिलेला मारुती होता व समर्थांचा मठहि होता.

चाफळाहून मुद्दाम मूर्ति आणवून येथें उत्सव करण्याचें कारण राजकारणाशिवाय दुसरें कोणतें असणार ! या ठिकाणीं शिवाजीमहाराजांच्या भेटींत कोणतें राजकारण ठरलें असेल त्याचें अनुमान ' फलानुमेयाः प्रारंभाः ' या रीतीनेंच करावें लागतें. शके १५९४ च्या श्रावणांत पुनः एकदां शिवाजी राजे चाफळाजवळ शिंगणवाडीस भेटीस आले व त्या वेळीं त्यांना परमार्थप्राप्ति झाली. पुढें १५९४ च्या फाल्गुनांत अण्णाजीपंतांनीं अवघे ६० लोक पाठवून पन्हाळगड घेतला. त्यावरून भेदनीतीनें पन्हाळगड कसा पोखरला गेला होता तें दिसून येतें. पन्हाळगड घेतल्याची बातमी कळतांच शिवाजी राजे रायगडाहून पन्हाळगडास जाण्यास निघाले. पाठीमागून समर्थहि पन्हाळगडास गेले. तेथें एक दिवस राहून अमात्यांच्या घरीं कीर्तन करून समर्थ परतले ( पर्णाल-पर्वतग्रहण काव्य पाहा ). यावरून पन्हाळगड घेण्याच्या कारस्थानांशीं समर्थांचा किती निकट संबंध होता तें दिसून येतें. समर्थांचा जर त्यांत संबंध नसता तर हा किल्ला हस्तगत होतांच तेथें जाण्याचें त्यांना प्रयोजन काय ? आणि शके १५९४ च्या चैत्रांतच जर समर्थ व शिवाजी यांची प्रथमच भेट झाली, तर शिवाजीमहाराजांनीं तरी समर्थांना इतक्या अल्प परिचयानें या दूरच्या किल्ल्यावर कशासाठीं बोलावलें असतें !

---

## लेखांक दुसरा

### आग्रा येथील सुटकेनंतरचा प्रवास

शके १५९४ च्या पूर्वीचा समर्थ व शिवाजी यांचा संबंध शोधीत गेल्यास शके १५८८ च्या श्रावण वद्य १२ स शिवाजीमहाराज आग्रा येथील अवरंगजेबाच्या अटकेंतून निसटले त्या वेळचा प्रसंग पुढें येतो. शिवाजीमहाराजांच्या बरोबर जी मंडळी आग्र्यास गेली होती त्यांत उत्तर-हिंदुस्थानांत प्रवास करून आलेला कोणीहि नव्हता. अशा बिकट परिस्थितींत मथुरा, अंतर्वेदी, काशी, गंगासागर, तेलंगण, इंदूर-बोधन इत्यादि ठिकाणीं शिवाजीस निर्भयपणें व एकनिष्ठपणें साहाय्य करणारे व वाटाड्याचें काम करणारे जे जे भेटले ते ते समर्थशिष्यांहून अन्य कोण असणार ? संभाजीमहाराजांविषयीं संशय आला असतां ' हा माझाच मुलगा आहे ' असें म्हणून त्याला आपल्या पानांत घेऊन जेवणारा मथुरेचा पंडित

( केसरी, दि. ८ मार्च १९३० )

हा समर्थशिष्यावांचून अन्य कोण असेल ? आणि भलत्याच्याच घरीं शिवाजीमहाराज आपल्या कलिजास कसे ठेवतील आणि ठेवून घेणारा तरी आपल्यावर हें अरिष्ट काय म्हणून घेईल ?

"विश्वनाथ नामा पंडित । प्रेरिला अंकित उत्तरपंथें", "विश्वासराय समर्थचिंतनीं । वाराणसी यात्रा धरूनि मनीं ।। अशरीरिवाचे प्रकाश देखतां आंगणीं । महायात्रे निघाला ।।" आणि "शिवराम नामा समर्थसंगें । कितेक दिवस अंतरंगें ।। पुढें पुढें जगदोद्धारणप्रसंगें । तेलंगण प्रांतें आज्ञापिला ।।" इत्यादि ओंव्यांतून समर्थप्रतापांत जें वर्णन आहे तें याच संकटप्रसंगीं समर्थांनीं आपल्या शिष्यांना उत्तर-हिंदुस्थानांत व तेलंगणांत पिटाळल्याच्यासंबंधाचें असावें असें दृढ अनुमान निघत नाहीं काय ? शिवाजीच्या सुरक्षिततेशिवाय समर्थांना दुसरा कोणता जगदोद्धारप्रसंग उत्तर-हिंदुस्थानांत महत्त्वाचा वाटणें शक्य आहे ?

### अफझलखानाचा वध

आग्र्याच्या प्रसंगाच्या पूर्वींचा संबंध शोधूं लागल्यास अफजलप्रसंगावर येऊन आपण ठेपतों. या प्रसंगीं समर्थांनीं शिवाजीस केलेला उपदेश दासबोधांत दशक १८ समास ६ यांत थोडासा वाढवून ग्रथित केलेला आहे. या समासांतल्या पहिल्या सुमारे ९–१० ओंव्या अफजलवधाच्या आधींच्या शिवाजीमहाराजांस प्रोत्साहनपर व आश्वासनपर अशा असून शेवटच्या ९–१० ओंव्या अफजलवध झाल्यानंतरच्या गौरवपर अशा आहेत. बरें ईश्वर आहे साभिमानी । विशेष तुळजाभवानी । परंतु विचार पाहोनी । कार्य करणें ॥ हा उपदेश कांहीं सर्वसामान्य उपदेश नसून विशिष्ट व्यक्तीस विशिष्ट प्रसंगीं केलेला उपदेश आहे आणि त्यांत 'विचार पाहोनी कार्य करणें' ही जी सूचना आहे ती कार्यसिद्धीनंतरची नसून कार्याकरितां निघतांना दिली असावी असें मानलें तरच ती उचित ठरेल; नाहीं तर हा उपदेश अगदींच अप्रयोजक ठरेल.

अफजलप्रसंगाच्या वेळीं समर्थ 'शिवथरघळींत' म्हणजे प्रतापगडाच्या नजीकच होते. त्या वेळीं ते महाबळेश्वरीं येऊन राहिले होते अशीहि आख्यायिका आहे. पण तत्संबंधीं निश्चित पुरावा नाहीं; परंतु ते शिवथरघळींत किंवा महाबळेश्वरीं कोठेंहि असले तरी "अफझलखान हा बेइमानी आहे. त्यानें पूर्वी कर्नाटकांत शिऱ्याच्या किल्लेदारांस भेटीच्या प्रसंगींच ठार मारलें आहे, तेव्हां त्याजवर विश्वास ठेवूं नये; अखंड सावधान असावें, आणि या प्रकरणाचा एकदांचा शेवट लावावा" असा समर्थांचा निरोप शिवाजीला कळविण्यांत आला होता व शिवाजीनेंहि 'समयीं धारिष्ट धरून अद्भुत कार्य केलें' याबद्दल समर्थांनीं त्याचा अत्यंत आदरपूर्वक गौरव केला. हाच सर्व इतिहास दशक १८ समास ६ यांत वर्णिला आहे, हें त्या समासाचें सूक्ष्म निरीक्षण केल्यास लक्षांत येतें आणि याव्यतिरिक्त त्या समासाचा सुसंगत असा अर्थच होत नाहीं.

समर्थांच्या सगळ्या चरित्रांत 'समर्थप्रताप' हें चरित्र सर्वांत आधींचें आणि अत्यंत विश्वसनीय आहे. त्या 'समर्थप्रतापां'त

समर्थें अकारपूर्वक यवनासी मारविलें । मग चाफळक्षेत्र उभें केलें ।

श्रीतुळजा माउलीसी संस्थापिलें । जाउली पर्वतीं प्रतापगडीं ।। स. प्र. १८–३६

असा उल्लेख आहे. 'अकारपूर्वक' म्हणजे अफझलखान याविषयीं संशय नाहीं. कारण अफझलवधानंतरच प्रतापगडच्या देवीची संस्थापना झाली. चाफळचें देऊळ जरी पूर्वींच शके १५७० मध्यें बांधलें होतें तरी त्याची क्षेत्र म्हणून प्रसिद्धि १५८१ पासूनच झाली. आणि शिवाजीमहाराजांनींहि चाफळच्या उत्सवाला २०० होन देण्यास याच वेळीं सुरुवात केली.

अकारपूर्वक, गकारपूर्वक, सकारपूर्वक असले सांकेतिक उल्लेख पेशवाई-तल्या पत्रव्यवहारांत तर सर्वत्र आढळतातच; पण 'समर्थप्रताप' ग्रंथांत देखील कथासंक्षेप करण्याकरितां –

ककारादि क्षकारें नामें । अकारादि षोडश स्वरें संभ्रमें ।।

महापुरुष पातले अनुक्रमें । सज्जनगिरी माझारीं ।। स. प्र. १०–९७

असा नांवांचा संक्षेपानें उल्लेख आलेला आहे. तेव्हां ही सांकेतिक व संक्षिप्त नाम-पद्धति गिरिधरांच्या परिचयाची होती असें यावरून दिसतें. अर्थातच 'अकार-पूर्वक यवन' म्हणजे अफझलखान याविषयीं तिळप्राय संशय राहात नाहीं.

याच ठिकाणीं शिवाजीमहाराजांनीं चाफळच्या उत्सवास सालिना २०० होन नक्त नेमणूक याच वर्षापासून करून दिली याचा उल्लेख अप्रासंगिक होणार नाहीं. शके १५८१ च्या मार्गशीर्षांत अफजलखानाचा वध झाला आणि तत्पूर्वीच्या फाल्गुन महिन्यांत समर्थशिष्य भास्कर गोसावी हे रामनवमीच्या उत्सवाकरितां भिक्षाद्रव्य गोळा करीत असतां शिवाजीमहाराजांनीं त्या शिष्याची 'कोण कुठला' वगैरे चौकशी करून चाफळच्या उत्सवाकरितां २०० होनांची कायमची नेमणूक करून दिली. हा कांहीं काकतालीय न्याय नसावा. आणि विशेष मौजेची गोष्ट ही कीं, ज्या पत्रावरून आक्षेपक हे शिवाजी व समर्थ यांची पाहिलीच भेट शके १५९४ च्या चैत्र वद्यांत झाली असें ठरवूं पाहतात त्याच पत्रांत शिवाजीमहाराजांकडचे २०० होन नेहमीप्रमाणें उत्सवाकरितां पावल्याचा उल्लेख आहे. म्हणजे पहिल्या भेटीपूर्वी चौदा वर्षें हे २०० होन दरसाल समर्थांच्या चाफ-ळच्या उत्सवास शिवाजीकडून येत होते; पण शिवाजीला मात्र समर्थांची भेट घेण्याची किंवा समर्थांना शिवाजीची भेट घेण्याची इच्छा झाली नाहीं किंवा संधि प्राप्त झाली नाहीं असें मानावें लागतें ! ही कल्पना मनुष्यस्वभावास धरून आहे काय याचा वाचकांनींच विचार करावा.

## राजधर्म, क्षात्रधर्म, सावधानता प्रकरण

अफजलप्रसंगाच्या पूर्वीचें समर्थांचें सर्वांत अत्यंत महत्त्वाचें राजकारण

चंद्रराव मोऱ्याचें प्रकरण हें होय. संभाजीमहाराजांच्या शके १६०२ मधील पत्रांत " पूर्वी राजश्रीस ( शिवछत्रपतीस ) राजधर्म, क्षात्रधर्म व अखंड सावधान ऐशी पत्रें पाठविलीं होतीं " असा उल्लेख असल्याचें मागील लेखांत प्रारंभीं नमूद केलेंच आहे. यांतलीं २ पत्रें मोगलाईतल्या नीलगें येथील मठांत सांपडलीं. तीं समर्थशिष्य आण्णाप्पा यांच्या हातचीं आहेत. आण्णाप्पा हे समर्थांचेच पट्टशिष्य असून त्यांचा उल्लेख समर्थप्रतापांत " आणक नाम महंत । नाना अुत्तम गुणें आळंकृत " (स. प्र. १०–३०) असा केला आहे. त्यावरून त्यांची योग्यता कळते. त्यांच्या हातचें 'क्षात्रधर्मा'च्या उपदेशाचें प्रकरण मिळालें आहे. हा उपदेश शिवछत्रपतींस केला; पण तो कधीं केला याचा कालनिर्देश कोठेंच आढळत नाहीं. परंतु त्या उपदेशांत

" मराठा तेतुका मेळवावा । आपुला महाराष्ट्र धर्म वाढवावा ।
येविषयीं न करतां तकवा । पूर्वज हांसती ॥
भले कुळवंत म्हणावे । तेही वेगी हजीर व्हावे ।
हजीर न होतां कष्टावे । लागेल पुढें ॥
देवद्रोही तितुके कुत्ते । मारूनि घालावे परते ।
देवदास पावती फत्ते । यदर्थी संशय नाहीं ॥
विवेकविचार सावधपणें । दीर्घ प्रयत्न केलाचि करणें ।
तुळजावराचेनि गुणे । रामें रावण मारिला ॥
अहो हे तुळजाभवानी । प्रसिद्ध रामवरदायिनी ।
रामदास ध्यातो मनीं । ब्रन्निमित्त ॥ "

अशीं जी कांहीं सूचक विधानें आहेत त्यावरून या उपदेशकालाचें अनुमान करतां येतें. मराठा तेतुका मेळवावा, हा उपदेश शिवाजीच्या चळवळीच्या आरंभीं शोभतो का राज्याभिषेकाच्या सुमारास शोभतो ? भले कुळवंत जे असतील त्यांनीं शिवाजीच्या बाजूनें लढण्यास हजर व्हावें, ते तसे हजर न होतील तर पुढें त्यांच्यावरच संकट ओढवून त्यास कष्ट भोगावे लागतील, हा उपदेश राजकारणाचा का भक्तिमार्गाचा ? आणि तो शिवाजीचा दरारा सर्वत्र बसण्याच्या आधींचा का नंतरचा ? पण यांतली '. विवेकविचार सावधपणें । दीर्घ प्रयत्न केलाचि करणें । ' ही ओवी विशेष महत्त्वाची आहे. या ओवीवरूनच शिवाजीचे प्रयत्न ज्या वेळीं शिथिल पडले होते त्या वेळीं त्यास पुनः पहिल्यासारखाच प्रयत्न, परंतु तो अधिक विचारपूर्वक व सावधानतेनें, करण्याविषयीं सांगण्यांत येत आहे हें सिद्ध होतें. शिवाजीचा प्रयत्न शके १५७१ मध्यें शिथिल पडला होता का शके १५९४ मध्यें शिथिल पडला होता ? शहाजी राजे अटकेंत पडलेले व शिवाजीचे प्रयत्न तटून राहिलेले अशी वेळ म्हणजे शके १५७१ चा चैत्र-वैशाख महिनाच नव्हे काय ? अर्थातच शके १५७१ च्या वैशाख शुद्ध ९ स शिवाजीस समर्थांची भेट झाली व त्या वेळीं राजधर्म, क्षात्रधर्म यांचा उपदेश करण्यांत आला

ही आख्यायिका या अंतर्गत पुराव्यावरून खरी ठरत नाहीं काय ! व त्यावरून वाकेनिशी टिपणांतली व बखरींतली मितीच विश्वसनीय असल्याचें प्रत्ययास येत नाहीं काय ?

राजधर्मांतल्या उपदेशांत 'तुरुंग शस्त्र आणि स्वार । पहिला पहावा विचार ।' असाहि अुल्लेख आहे. हा काय शके १५९४ मधला अुपदेश ? त्या वेळीं शिवाजीजवळ काय स्वारांचा व शस्त्रांचा तुटवडा पडला होता ? ज्या वेळीं शिवाजी-जवळ हजार-पांचशें देखील घोडा नव्हता त्या वेळीं म्हणजे शके १५७१ मध्येंच हा उपदेश उचित ठरत नाहीं काय ? 'अमर्याद फितवेखोर । त्यांचा करावा संहार । शोधिला पाहिजे विचार । यथातथ्य ।।' याहि ओंवीवरून शिवाजीच्या राजकारणाचा प्रारंभकाल तोच उपदेशकाल असावा हेंच संभवनीय दिसत नाहीं काय ? शके १५९४ मध्यें शिवाजीच्या सैन्यांत फितवेखोरांचा सुळसुळाट झाला होता असें मानणें सयुक्तिक तरी दिसेल काय ?

---

## लेखांक तिसरा

### 'अखंड सावधानतेचा उपदेश'

'सावधानता प्रकरणाचा उल्लेख वरील दोन प्रकरणांबरोबरच केलेला असला तरी हा उपदेश शके १५७१ मधील नसून शके १५७७ मध्यें शिवाजीनें समर्थांच्या झोळींत चिठ्ठी टाकल्यावेळचा असावा असें वाटतें.

प्रयत्नीं चुको नये । सुखवासी कामा नये ।
सुचावे नाना उपाय । अनेक विषयीं ॥
धुरेनें धीर सोडूं नये । मुख्य प्रसंग चुको नये ।
उद्योगरहित कामा नये । पशू जैसा ॥
उपाधीस कंटाळला । विचाराचा आळस केला ।
म्हणजे जाणावा चेवला । बुद्धिपासूनी ॥
जेथें बहुविचार । तेथें ईश्वराचा अवतार ।
मागे झाले थोर थोर । धक चपेटे सोसूनी ॥
पाहिलेंचि पाहावें । केलेंचि करावें ।
शोधिलेंचि शोधावें । राज्यकारण ॥
इशारतीचें बोलतां नये । बोलायाचें लिहूं नये ।
लिहावायाचें सांगू नये । जबानीनें ॥

(केसरी, दि. ११ मार्च १९३०)

भोर

या उपदेशांत उपाधीस कंटाळो नये आणि पूर्वी केलेलेंच राज्यकारण ( चातुर्य नव्हे ! ) पुनः धरावें असा जो उल्लेख आहे त्यावरून शहाजीच्या सुटकेनंतर विजापूरकरांशीं एक प्रकारें तहनामा झाल्यामुळें राजकारण अडून राहिलें होतें त्या वेळच्या शिवाजीच्या वैतागास व वैतागानें राज्याच्या सनदा समर्थांच्या झोळींत टाकल्या त्या रुसव्यास हें उत्तर आहे हें संदर्भावरून उघड होतें. याच संबंधांत 'गयाळ राजा व खबर्दार राजा' 'धूर्तपणाचें राजकारण' वगैरेहि प्रकरणें सांगितलेलीं असावीं. त्या त्या प्रकरणांचा सूक्ष्म दृष्टया विचार केला असतां असा संदर्भ लागतो.

चंद्रराव मोऱ्यावर स्वारी शके १५७७ च्या पौष महिन्यांत झाली आणि शके १५७८ त शिवाजीनें रायरी घेतली व चंद्रराव स्वाधीन झाले. यापूर्वीच शके १५७२ पासून १५७६ पर्यंत केव्हां तरी समर्थ शिवथरच्या घळींत येऊन राहिले होते. शिवथरच्या घळीपासून चंद्ररावाचा वाडा व त्याचा किल्ला अगदीं नजीक आहे. चंद्ररावास वश करून घेण्याचा प्रयत्न शिवाजी राजांनीं कित्येक दिवस करून पाहिला. व तो आपल्या बाजूस वळत नाहीं असें निश्चित झाल्यावरच त्याचा कांटा काढून टाकण्यांत आला. यापूर्वी समर्थ एकदां रामेश्वराच्या यात्रेनिमित्तानें दक्षिणेंत जाऊन शके १५७७ च्या आषाढ श्रावणांत बंगलोर प्रांतीं शहाजीस भेटले असावेत. कारण याच वेळीं व्यंकोजी राजे यांस उपदेश दिल्याचा उल्लेख वाकेनिसी टिपणांत आहे. चंद्रराव मोरे वश न झाल्यामुळें शिवाजीचें अडून राहिलेलें राजकारण, उद्वेगानें राज्याच्या सनदांची चिठ्ठी समर्थांच्या झोळींत टाकणें, समर्थांचा सावधानता प्रकरणांतला व धूर्तपणाचें राजकारण इत्यादि उपदेश, जावळीच्या अगदीं शेजारीं शिवथरच्या घळींत समर्थांनीं जाऊन राहणें, कर्नाटकांत जाऊन समर्थांनीं शहाजीची भेट घेणें आणि इकडे शिवाजीनें चंद्ररावाचा कांटा उपटून टाकणें या सर्व हालचाली पृथक् पृथक् नसून त्यांचा परस्परांशीं अत्यंत निकट संबंध असावा असेंच यांतून अनुमान निघतें. नाहीं तर 'सावधानता प्रकरणां'तील उपदेशाला कांहीं 'मूळ ना शेंडा' असा प्रकार होतो. समर्थ एवढे मोठे अनन्य रामभक्त आणि चाफळास नुकताच कोठें देऊळ बांधून उत्सव आरंभिलेला अशा वेळीं त्या उत्सवाची सर्व जबाबदारी दिवाकर गोसाव्यांकडे सोंपवून 'ग्रंथलेखनाचा संकल्प' करून ते शिवथरच्या घळींत चंद्ररावाच्या उशाशीं जाऊन राहतात याचा हेतु काय ? दासबोध ग्रंथाच्या लेखनाला चाफळची हवा मानवत नव्हती आणि शिवथरची हवा मात्र मानवत होती असाच याचा अर्थ समजावयाचा काय !

### शिवाजीस उपदेश व शहाजीची सुटका

चंद्रराव मोऱ्याचें प्रकरण निकरावर येण्यापूर्वी शिवाजीनें समर्थांच्या झोळींत राज्याची चिठ्ठी टाकली व त्यावरून समर्थांनीं शिवाजीस "पाहिलेंचि पाहावें। केलेंचि करावें। शोधिलेंचि शोधावें। राज्यकारण ॥" असें म्हणून पुनः राजकाण हातीं

घेण्यास प्रोत्साहन दिलें व कर्नाटकाची सफर करून शहाजीची भेट घेऊन नव्या राजकारणास अनुमति मिळवून दिली, यावरून समर्थ व शिवाजी यांची भेट शके १५७७ च्या पूर्वी बरेच दिवस झाली असली पाहिजे असें अनुमान निघतें. अर्थात् वाकेनिसी टिपणांत शके १५७१ वैशाख शुद्ध ९ गुरुवार ही जी मिति दिली आहे तीच खरी मानण्यास हरकत नाहीं. या वाकेनिसी टिपणांतल्या बहुतेक सर्व मित्या अवांतर ऐतिहासिक पुराव्यांवरून बिनचूक ठरल्या आहेत. आणि हें वाकेनिसी टिपण दिवाकर गोसाव्यांनीं तयार केलें असून शिवाजीच्या दरबाराशीं होणारा सर्व पत्रव्यवहार दिवाकर गोसाव्यामार्फतच होत असल्यामुळें शिवाजीच्या भेटीच्या मितींत दिवाकर गोसाव्याकडून चूक होईल हें संभवनीय नाहीं.

अवांतर परिस्थितीचा विचार केल्यास तिकडूनहि ही भेट याच वेळीं होणें विशेष संभवनीय व साहजिक दिसतें. या वेळीं शहाजी राजे विजापुरास अटकेंत होते. शिवाजीच्या सगळ्या हालचाली बंद पडल्या होत्या. अशा संकटाच्या वेळींच सत्पुरुषांच्या आशीर्वादाची आवश्यकता वाटूं लागते. ही शिवसमर्थ भेट वैशाख शुद्ध ९ ला झाली आणि नंतर जेष्ठ शुद्ध १५ स शहाजी राजांची सुटका झाली, हा अगदींच काकतालीय न्याय नसेल. विजापूरच्या दरबारीं द्यानतराव देशपांडे हे एक वजनदार अधिकारी होते. ते स्वतः समर्थांचे शिष्य असून समर्थांच्या पट्टशिष्यीण अक्का यांचे वडील जे रुद्राजीपंत देशपांडे त्यांचे ते निकट आप्त होते. अर्थातच शिवाजीमहाराज समर्थांचे शिष्य झाल्यानें द्यानतराव त्यांचे गुरुबंधु झाले. तेव्हां त्यांनीं सुलतानाकडे मध्यस्थी केली असल्याचा संभव आहे. शहाजहानकडून हुकूम आणविण्याचाहि प्रयत्न झालाच होता. पण त्याला हा दुजोरा मिळाल्यानें कार्यभाग लवकर झाला असेल.

समर्थांनीं भेटीची इच्छा दर्शविली नसतां शिवाजी राजे समर्थांच्या भेटीस आले असते तर त्यांत समर्थांचें राजकारण तितकेसें व्यक्त झालें नसतें. शिवाजी भेटीस येण्यापूर्वी समर्थांनीं आपण होऊन शिवाजीस पत्र लिहिलें आणि भेटीची इच्छा दर्शविली. त्या इच्छेंत समर्थांचें राजकारण अधिक स्पष्ट होतें. या पत्रांत समर्थ लिहितात कीं —

तुमचे देशीं वास्तव्य केलें । परंतु वर्तमान नाहीं घेतलें ।
ऋणानुबंधें विस्मरण जालें । काय नेणूं ॥
उदंड राजकारण तटलें । तेणें चित्त विभागलें ।
प्रसंग नसतां लिहिलें । क्षमा केली पाहिजे ॥

तुमचे देशीं म्हणजे महाराष्ट्रांत एवढाच अभिप्राय नसून शहाजी राजांच्या देशमुखीच्या गांवीं मसुरास येऊन राहिलों असा अभिप्राय आहे. कारण कऱ्हाड प्रांत हा कांहीं शिवाजीच्या जहागिरींतला भाग नसून तो प्रांत त्या वेळीं अदिलशाही अमलाखालींच होता. मसुरास उत्सव सुरू झाल्यानंतर शिवाजी राजे एखादे वेळीं

उत्सवाकरितां तेथें आले असावे व त्यांची व समर्थांची तात्पुरती औपचारिक भेट त्या वेळीं झाली असावी. कारण अशी भेट पूर्वी झाली नसेल तर 'विस्मरण जालें' या शब्दाला कांहीं अर्थच राहात नाहीं.

असो. पण समर्थांनीं आपण होऊन या भेटीची आगंतुकी कां केली? त्यांना कांहीं इनामाची हाव सुटली नव्हती; कारण शिवाजीकडून यापुढेंहि शके १६०० पर्यंत त्यांनीं कांहीं इनाम घेतलें नाहीं. अर्थातच ही भेट कांहीं वैयक्तिक स्वार्थाकरितां नसून जें उदंड राजकारण तटलें होतें त्याला वाट काढून देण्याकरितांच ही भेट समर्थांना हवी होती आणि म्हणूनच त्यांनीं आपला मोठेपणा बाजूस ठेवून आपण होऊन भेटीची अपेक्षा दर्शविली. या भेटीचें प्रयोजन याच पत्रांतील २–३ ओंव्यांत ग्रथित झालें आहे –

तीर्थक्षेत्रें मोडिलीं। ब्राह्मणस्थानें भ्रष्ट झालीं।
सकळ पृथ्वी आंदोळली। धर्म गेला॥
देवधर्म गोब्राह्मण। यांचें करावया संरक्षण।
हृदयस्थ जाला नारायण। प्रेरणा केली॥
या भूमंडळाचे ठायीं। धर्म रक्षी ऐसा नाहीं।
महाराष्ट्र धर्म राहिला कांहीं। तुम्हाकरितां॥

धर्मसंरक्षण करण्याची प्रेरणा ईश्वरानें केली आणि धर्मसंरक्षण करण्याचें हें सामर्थ्य तुमच्यावांचून अन्य कोणाच्याहि अंगांत दिसत नाहीं, तेव्हां हें कार्य आपणच आपल्या शिरावर घ्यावें अशी प्रार्थना करण्याकरितांच समर्थांना ही भेट हवी होती. राजाश्रयावांचून धर्मसंरक्षण होऊं शकत नाहीं, यास्तव म्लेंछांचें माजलेलें बंड मोडून काढून आपला हिंदुधर्मी राजा सिंहासनारूढ व्हावा या इच्छनेंच हरिकीर्तनाच्या पाठोपाठ राजकारणांतहि समर्थांना लक्ष घालावें लागलें. धर्म व राजकारण यांच्यांतला हा समवायसंबंध इतर साधुसंतांनीं ओळखला नव्हता, पण तो समर्थांनीं ओळखला, म्हणूनच 'रामकथा ब्रह्मांड भेदून पैलाड' नेण्याच्या आधीं रामकथा निर्विघ्नपणें चालण्याकरितां राजकारणांत मन घालण्याची जरूरी त्यांस पटली; आणि तेवढ्याकरितांच त्यांनीं आपण होऊन शिवाजीस भेटीविषयीं पत्र लिहिलें.

### राजकारण शब्दाचा अर्थ

दासबोधांतील 'राजकारण' शब्दाच्या अर्थाबद्दल अलीकडे एक वितंडवाद माजविण्यांत आला आहे. वर निर्दिष्ट केलेलें पत्र शिवाजीची भेट होण्यापूर्वीचें आहे व दासबोधाच्याहि रचनेच्या पूर्वीचें आहे. तेव्हां या पत्रांत समर्थांनीं प्रथमच 'राजकारण' हा शब्द वापरला असें म्हणावयास हरकत नाहीं आणि ग्रंथकार हा ज्या वेळीं एखादा शब्द प्रथमच वापरतो त्या वेळीं त्याचा जो अर्थ त्यानें योजिला असेल त्याच अर्थानें तो शब्द पुढें वापरण्यांत येतो, असा सर्वसाधारण नियम आहे. यास्तव दासबोधांत जो 'राजकारण' शब्द २७ वेळां आला

आहे तो शब्द तेथें कोणत्या अर्थानें वापरला असावा याचा संशय उत्पन्न झाल्यास, वर निर्दिष्ट केलेलें पत्र दासबोधाच्या रचनेच्या व शिवाजीच्या भेटीच्याहि आधींचें असल्यामुळें, त्या पत्रांत तो अर्थ शोधावा आणि त्या दृष्टीनें पाहिल्यास 'उदंड राजकारण तटलें' या चरणांतील 'राजकारण' शब्दाची कितीहि ओढाताण केली तरी त्याचा अर्थ कांहीं 'चातुर्य' असा होऊं शकत नाहीं. या ठिकाणीं 'राजकारण' शब्दाचा अर्थ 'राजकारण' असाच आहे, दुसरा-तिसरा कांहीं नाहीं आणि शिवाजीमहाराजांची भेट होण्यापूर्वीचेंच हें पत्र असल्यानें तत्पूर्वीपासूनच समर्थांच्या मनांत राजकारणाचा विचार घोळत होता, ते राजकारण जाणीत होते आणि त्यांचें लक्ष कोठें कोणतें राजकारण चाललें आहे आणि कोठें कोणतें राजकारण अडलें आहे याकडे होतें हेंहि आपोआपच सिद्ध होतें.

### राजकारणाकडे लक्ष केव्हांपासून वेधलें ?

शिवाजीमहाराजांच्या भेटीविषयीं त्यांना पत्र लिहिण्याच्या आधींपासूनच समर्थांचें लक्ष राजकारणाकडे वेधलें होतें हें वरील पत्रावरून सिद्ध झाल्यानें हें लक्ष कधींपासून वेधलें याचा सुगावा काढण्यास शके १५७१ च्या वैशाखाच्याहि मागें आपणांस गेलें पाहिजे. हा मागला टप्पा आपण शके १५६६ पर्यंतचा धरूं. कारण त्या वर्षी ते कृष्णातीरीं येऊन मसूरनजीक राहिले. या ठिकाणीं समर्थ हे कऱ्हाड, मसूर, चाफळ या भागांतच येऊन कां राहिले असा प्रश्न उद्भवतो. केवळ भक्तिपंथाच्या व निवृत्तिमार्गाच्या साधुसंताला सर्व प्रांत, सर्व गांवें, सारखींच. त्यांत जर सरस अगर निरस निवड करावयाचीच असली, तर आपल्या उपास्य देवतेचें जें प्रसिद्ध क्षेत्र तेंच त्यांनीं सर्वांत आवडतें स्थळ मानलें पाहिजे. समर्थ हे कट्टे रामोपासक आणि नाशिक-पंचवटी हा प्रांत रामचंद्राच्या निवासामुळें पुनीत झालेला. रामाची तेथील देवळेंहि सुप्रसिद्ध असून शिवाय शेजारीं टाकळीस तर त्यांनीं १२ वर्षें पुरश्चरण केलेलें. अशा पवित्र क्षेत्रांत न राहतां समर्थ कृष्णतीराला कां आले? आणि त्यांत देखील धोम, महाबळेश्वर, ब्रह्मारण्य, वाई, माहुली असलीं क्षेत्रें सोडून मसूरसारख्या भिकार खेडेगांवांत कां येऊन राहिले? मसुरासच त्यांची काय मिरास पुरली होती? बरें, पंचवटीच्या रामाविषयींची त्यांची उत्कट भक्ति ओहोटीला लागली होती असें म्हणावें तर कृष्णातीराला येऊन राहिल्यापासून त्यांच्या मनाला तळमळ लागून राहिली होती आणि ती त्यांनीं पंचवटीच्या रामोपासकांस एक पत्र पाठवून व्यक्त केली आहे त्या पत्रांत ते लिहितात –

तुम्ही निकट देवापाशीं। आणि मी पडिलों दुरि देशीं।
कृपाळूपणें रघुनाथाशीं। माझी करुणा भाकावी॥
प्रत्यहीं माझा नमस्कार। देवासी करावा निरंतर।
मजकारणें शरीर। इतुकें कष्टवावें॥

बाळ वृद्ध नरनारी। सकळ भक्त कुमार कुमारी।
समस्तांसी नमस्कारी। कृष्णातीरवासी॥

आपल्यासाठीं रामाला दुसऱ्यांनीं नमस्कार करावा इतकें आर्जव करण्याचें प्रयोजन काय? 'मी पडिलों दुरि देशीं' असें काकुळतीनें म्हणून दुसऱ्याच्या-मार्फत आपला नमस्कार देवास पोंचविण्याचा द्राविडी प्राणायाम करण्याची अशी आपत्ति समर्थांवर कोणती आली होती? कृष्णातीर सोडून स्वतःच पंचवटीला जाण्याला त्यांना हरकत काय होती? बारा वर्षें आसेतु हिमाचल तीर्थाटन करणाऱ्या समर्थांना कृष्णातीरावरून गोदातीरीं जाणें असें काय मोठें दुर्घट होतें कीं, तेवढ्याकरितां त्यांनीं दुसऱ्या उपासकांचे आर्जव करावें? अर्थातच समर्थांचें मसुराला राहणें हेतुपूर्वक होतें व तो हेतु केवळ रामभजनाचा नसला पाहिजे. कारण रामभजनच करावयाचें तर त्यांस पंचवटी क्षेत्र आणि मारुतीची स्थापना करावयाची तर त्यांस अंजनी पर्वतासारखें मारुतीचें जन्मस्थान, हींच सर्वतोंपरी उचित स्थळें नव्हत काय? मसूर-कऱ्हाड-चाफळ या पंचक्रोशींत अशी कोणती विशेष सोय होती? सारांश, धर्मकारण व राजकारण यांची नवी उभारणी करण्याला कऱ्हाडची पंचक्रोशी हेंच उत्कृष्ट स्थळ होय व त्यांत मसूर गांवाची देशमुखी शहाजी राजाकडे असल्यामुळें आणि इकडे पुणें प्रांतांत शिवाजीची स्वराज्यस्थापनेची धामधूम सुरू व्हावयाची असल्यामुळें विजापूर आणि शिवाजीच्या चळवळीचें क्षेत्र यांच्या दरम्यान आड-पडदा म्हणून विजापूर व पुणें यांच्या मध्यावर असलेलें शहाजीच्या देशमुखीचें मसूर गांव हेंच समर्थांनीं पसंत करावें यांत नवल काय! डोंगराचा आसरा व बंदोबस्ताची सुकरता या दृष्टीनें लवकरच मसूर गांव सोडून समर्थांनीं शेजारचें चाफळ क्षेत्र पसंत केलें यांतहि त्यांची दूरदृष्टीच दिसून येते. सारांश, समर्थ मसूरलाच येऊन तळ देऊन राहिले, हा केवळ घुणाक्षर न्याय नसून त्यांत आणि विशेषतः मसूरला येऊन राहिल्यापासून पांच वर्षांत मनपाडळें-पारगांवापासून तों शिंगण-वाडीपर्यंत जी अकरा मारुतींची स्थापना त्यांनीं केली त्यांतहि अशीच मुत्सद्दीपणाची दृष्टि दिसते. इकडे समर्थांनीं अकरा मारुतींची स्थापना करून सातारा प्रांत आपल्या मठांच्या संघटनेनें व्यापून टाकला असतां त्याच पांच वर्षांच्या अवधींत शिवाजी-महाराजांनींहि महत्त्वाचे किल्ले घेऊन बारा-मावळें काबीज केलीं. अशा रीतीनें गंगा-यमुनांचे हे दोन ओघ शेजारीं शेजारीं इतक्या जोरानें वाहूं लागले असतां त्यांचा संगम लवकरच घडून यावा यांत नवल काय?

## लेखांक चौथा

### रामदास ध्यातो मनीं । इदं निमित्य ॥

समर्थ सातारा प्रांतांत आले ते रामभक्तीचा प्रसार करण्याकरितां म्हणून आले; पण रामाची भक्ति म्हणजे देवांचा बंदिवास सोडविणाऱ्या देवाची भक्ति हें ते कधींहि विसरले नाहींत. हें ध्येय त्यांनीं तीर्थाटन करीत असतांनाच निश्चित केलें असावें. स्वतः समर्थच देवीच्या एका स्तोत्रांत असें सांगतात कीं –

अंतरीं कल्पना केली । एकान्तीं बोलिलों बहु ।
रक्षिता देव देवांचा । त्याचा उच्छाव इच्छिला ॥

हा मनोमन संकल्प केव्हांहि कोठेंहि केला असो, पण 'एकान्तीं बोलिलों बहु' असें जें म्हटलें आहे तें बोलणें कोणाशीं कोठें झालें असावें ? 'एकान्तीं बोलिलों' म्हणजे 'आत्मगत भाषण केलें' असला विचित्र व विसंगत अर्थ आजपर्यंत करण्यांत येत आहे. परंतु 'अंतरीं कल्पना केली' यांत आत्मगत विचार आलाच; मग पुनः 'एकान्तीं बोलिलों बहु' असें वेगळें सांगण्याचें कारण काय ? अर्थातच हा एकान्त कोणा तरी प्रमुख माणसाशीं झाला असला पाहिजे. आणि ज्या अर्थी हा संकल्पित उत्सव प्रथम मसुरास सुरू करण्यांत आला आणि मसूर हें शहाजीच्या देशमुखीचें ठाणें होतें त्या अर्थी समर्थांची ही वाटाघाट शहाजीशीं झाली असली पाहिजे, नाहीं तर मसूर गांवाची देशमुखी शहाजीकडे आहे ही माहिती तरी समर्थांना कळण्याचा संभव काय ! ज्या अर्थी त्यांनीं मसूर गांवच मुद्दाम पसंत केलें त्या अर्थी हें गांव शहाजीकडे असल्याचें त्यांना कळलें असलें पाहिजे आणि ही वाटाघाट दक्षिण-हिंदुस्थानांत तीर्थाटन करतेवेळीं बंगलोरास शहाजीची भेट झाली असतां झाली असावी. शके १५६५ त शहाजी बंगलोरास अधिकारी होता त्याच वेळीं समर्थ दक्षिण हिंदुस्थानांत यात्रा करीत होते, आणि तेथून महाराष्ट्रांत परत येण्याबरोबर त्यांनीं एकदां घरीं जाऊन मातोश्रीस दर्शन दिलें व पंचवटीस जाऊन यात्रा संपूर्ण केली आणि ते ताबडतोब कऱ्हाडच्या पंचक्रोशींत येऊन राहिले. यावरून मसूर गांवास राहण्याचा विचार तत्पूर्वीच म्हणजे शहाजीच्या भेटींत ठरवून ते इकडे आले असावेत. कारण इकडे आल्यानंतर त्यांनीं कालहरण मुळीच होऊं दिलें नाहीं.

समर्थांची भक्ति रामावर होती, कारण तें त्यांचें कुलदैवतच होतें. तरी पण ज्यांचें तें कुलदैवत नसेल त्यांनीं रामाचीच भक्ति कां करावी असें कोणीं विचारल्यास त्यावर त्यांचें उत्तर ठरलेलें होतें तें हेंच कीं –

जेणे फेडिला पांग ब्रह्मादिकांचा । बळें तोडिला बंद त्या त्रीदशांचा ।
म्हणोनी कथा थोर या राघवाची । जनीं ऐकतां शांत होते भवाची ॥

( केसरी, दि. १५ मार्च १९३० )

अशा रीतीनें रामानें रावण मारिला व तोहि केवळ मर्कटांच्या साहाय्यानें मारिला या कथाभागानें महाराष्ट्रांत स्फूर्तीची प्रेरणा करण्यांत अभ्युदय व निःश्रेयस दोनहि साधतां येतील असें समर्थांस वाटत होतें. रामचंद्राच्या उपासनेप्रमाणेंच देवीची, तुळजामातेची, उपासना समर्थांच्या कुलांत चालू होती. त्याहि उपासनेचा त्यांनीं रामकथेशीं कायमचा संबंध लावून दिला होता. देवीची प्रार्थना करतांना त्यांचा आवडता शब्द 'रामवरदायिनी' हा होता; आणि या देवीनें रामाकडून रावण मारविला म्हणून मी जसें तिचें ध्यान करतों तसें इतरानांहि तें करावें, अशी समर्थांची शिकवण होती. शिवाजीला क्षात्रधर्माचा उपदेश करतांना समर्थ सांगतात –

विवेक विचार सावधपणें । दीर्घ प्रयत्न केलाचि करणें ।
तुळजावराचोनि गुणें । रामें रावण मारिला ॥
ऐसी हे तुळजाभवानी । प्रसन्न रामवरदायिनी ।
रामदास ध्यातो मनीं । इदं निमित्य ॥

तुळजामातेच्या वरानें रामानें रावण बुडविला म्हणूनच मी तुळजाभवानीची प्रार्थना करतों; मनांतला हेतु हा कीं, तिनेंहि आतां असाच प्रत्यय आणून द्यावा; आणि शिवाजीच्या हातून यवनांचा निःपात व्हावा. ही केवळ माझी कविकल्पना नाहीं.

दुष्ट संहारिले मागें । ऐसें उदंड ऐकतो ।
परंतु रोकडें कांहीं मूळ । सामर्थ्य दाखवी ॥
देवांचीं राहिलीं सत्त्वें । तूं सत्त्व पाहसी किती ।
भक्तासी वाढवी वेगीं । इच्छा पूर्ण परोपरी ॥
रामदास म्हणे माझें । सर्व आतुर बोलणें ।
क्षमावें तुळजे माते । इच्छा पूर्णचि ते करी ॥

या देवीच्या स्तोत्रांत त्यांनीं आपली इच्छा आतुरतेनें निवेदन केली आहे. ती हीच कीं, देवीनें भक्तास ( म्हणजे शिवाजीस ) उत्कर्षास चढवावें आणि दुष्टसंहाराचें आपलें ब्रीद त्याच्यामार्फत खरें करून दाखवावें. अर्थातच रामावतारीं जसा देवीनें रामास वर दिला व रामाकडून रावण मारविला त्याचप्रमाणें या वेळींहि देवीनें शिवाजीस वर द्यावा व त्याच्या हातून त्याचे शत्रु मारवावे ही उत्कट भक्ति केवळ निवृत्तिपर व भक्तिपंथीय आहे कां या भक्तींत कोणास कांहीं 'राजकारणाचा' वास येतो हें ज्याचें त्यानेंच पाहावें.

### समर्थ हे अप्रासंगिक उपदेश करणारे नव्हते

समर्थांचें राजकारण याच्याहि मागें शोधीत जाण्याचें कारण राहिलेलें नाहीं. तीर्थाटनसमाप्ति करून महाराष्ट्रांत येऊन समर्थांनीं जी संघटना केली आणि जी रामोपासना व तुळजामातेची उपासना वाढविली तिच्या बुडाशीं हेतु काय होता हें स्वतः समर्थच स्वमुखानें देवांपुढें सांगत आहेत. त्याचप्रमाणें त्यांचा दासबोध हा

ग्रंथ, आनंदवनभुवनादि स्फुट कविता, आणि राजधर्म क्षात्रधर्म, सेवकधर्म, अखंड सावधानता इत्यादि प्रासंगिक प्रकरणें यांतून त्यांनीं राजकारणाचा प्रसंगोपात्त किती मार्मिक उपदेश केला आहे, याचा तीं तीं प्रकरणें वाचून पाहणारास प्रत्यय येईलच. आता या ठिकाणीं आक्षेपकांच्या शेवटच्या एका शंकेचा समाचार घेऊन हें लांबलेलें प्रकरण आटोपतें घेऊं. समर्थांच्या दासबोधांत व इतर प्रकरणांत 'राजकारण' नाहीं असें सिद्ध करतां येणें दुरापास्त ठरल्यावर या आक्षेपकानें अशी एक शक्कल लढविली आहे कीं, "हा जो रामदासांचा राजकारणाचा उपदेश आहे त्याची मर्यादा त्या त्या प्रसंगापुरती, वर्गापुरती किंवा व्यक्तीपुरती मानणेंच उचित ठरतें. ... ... राजधर्म, क्षात्रधर्म वगैरे प्रासंगिक प्रकरणांतील उपदेशावरून रामदास राजकारणी होते असें ठरविणें चुकीचें आहे!" अर्थातच या प्रकरणांचा राजकीय उलाढालीशीं साक्षात् संबंध आहे ही गोष्ट आक्षेपकांनाहि टाळणें अशक्य झालें. तेव्हां कोटी काय लढविली तर, शिवाजीसारखा क्षत्रिय शिष्य किंवा सरदारवर्ग अथवा अफजलवधासारखा युद्धाचा प्रसंग प्राप्त झाला असतां रामदास राजकारणाचा उपदेश करीत असत; पण त्यांचा सर्वसामान्य उपदेश (म्हणजे राजकारण वगळून राहिलेला उपदेश) हा केवळ भक्तिमार्गाचा किंवा सामान्य नीतीचा असे! का, आहे कीं नाहीं शक्कल? गीतेंतला उपदेश अर्जुन क्षत्रिय म्हणून त्याच्यापुरता कर्मयोगाचा पण इतरांकरितां तो संन्यासमार्गाचा असें म्हणण्यांतलाच हाहि एक प्रकार नव्हे काय? राजकारणाचे तेवढे प्रसंग वगळून बाकीच्यांत राजकारण दाखवा, असाच या आव्हानाचा अर्थ नव्हे काय?

या आक्षेपकांना असें सांगणें प्राप्त आहे कीं, प्रत्यक्ष राजकारणाचाच ध्यास घेणाऱ्या सार्वजनिक पुढाऱ्याबद्दलहि असेंच आव्हान करतां येईल! पण त्यांनीं एवढें तरी लक्षांत ठेवावें कीं, प्रसंगोपात्त राजकारणाचा उपदेश करणाऱ्याला सुद्धां राजकारण कळावें लागतें व तो त्यांत तज्ज्ञ असला तरच त्याच्याकडे प्रसंगविशेषीं विचारपूस करण्यास इतरांनीं येणें संभवतें. महर्षि आण्णासाहेब पटवर्धन हे कांहीं वैद्यकीचा किंवा वकिलीचा धंदा करीत नव्हते; तरी पण इतर डॉक्टरांनीं किंवा वकिलांनीं हात टेकले असतां तीं प्रकरणें घेऊन कित्येकजण त्यांच्याकडे येत व ते त्यांना अचूक उपाय सांगत. अर्थातच अण्णासाहेब पटवर्धन हे अत्युत्कृष्ट वैद्य व पटाईत वकील होते ही गोष्ट, त्यांनीं रोजचा तो व्यवसाय केला नसला तरी, अमान्य करतां येईल काय? समर्थांनीं तर राजकारणाच्या बरोबरच दुसरी एक अशी नवीनच संघटना निर्माण केली कीं, ती त्या महत्त्वाच्या प्रसंगीं राजकारणाला उपयोगी पडली; आणि स्वतः समर्थांची राजकारणाची शिकवण तर इतकी स्फूर्तिदायक होती कीं, तिच्या योगानें त्या वेळचा सगळा महाराष्ट्र थरारून गेला. १९१४–१५ सालीं महाराष्ट्रांतून रिक्रूट

मिळविण्याला जो समर्थांचा उपदेश उपयोगी पडला तो शिवाजीमहाराजांच्या पराक्रमाच्या व उत्कर्षाच्या वेळीं उपयोगी पडला नसेल काय ?

सारांश, समर्थांनीं जरी आपल्या महंताच्या लक्षणांत ‘ मुख्य हरिकथानिरूपण, दुसरें तें राजकारण ’ असें म्हणून राजकारणास दुसरी पायरी दिली आहे, तरी स्वतः त्यांनीं ज्या ज्या वेळीं प्रसंग आला त्या त्या वेळीं ‘हरिकथानिरूपण’ बाजूस सारून राजकारणासच अग्रस्थान दिलें. नाहीं तर पंचवटीच्या रामाचें भजन सोडून मसूरसारख्या कुग्रामीं येऊन राहण्याचें, चाफळच्या उत्सवाचा भार दुसऱ्यावर सोपवून शिवथर खोऱ्यांत जाऊन राहण्याचें, शके १५७७ त रामेश्वरापर्यंत पुनः प्रवास करण्याचें, शके १५९४ त चाफळच्या मूर्ति हलवून पारगांव-मनपाडळें येथें रामनवमीचा उत्सव करण्याचें, समर्थांना काय कारण होतें बरें ? परंतु त्यांना राष्ट्राचा प्रपंच करावयाचा होता म्हणून त्यांनीं इतकी आटापीट केली आणि राष्ट्राचा व्यापक प्रपंच म्हणजेच राजकारण. सजर्थांनीं ‘प्रपंच’ आणि ‘उपाधि’ हे शब्द याच व्यापक अर्थानें आपल्या कवितेंत योजिले आहेत आणि पुनः पुनः ‘ उपाधीस कंटाळो नये ’ असें निक्षून बजावलें आहे; तेव्हां ते स्वतः आपणच उपाधीचा कंटाळा कसा करतील आणि राजकारण कसें टाळतील ? न्यायमूर्ति रानडे हे जरी बाह्यतः सरकारी नोकर म्हणून राजकारणापासून अलिप्त होते तरी पण त्यांचें अंतरंग सगळें राजकारणानेंच रंगलेलें होतें. त्याचप्रमाणें समर्थांचे बाह्य व्यवसाय कांहींहि चालले असले, तरी त्यांचें अंतःकरण राष्ट्राच्या प्रपंचाच्या म्हणजे राजकारणाच्या विचारानेंच व्यापिलें होतें हें निर्विवाद सिद्ध आहे.

---

# श्री. फाटक यांच्या ‘श्रीसमर्थचरित्रा’चा परामर्श : २

### वाचकांची निराशा

श्रीयुत न. र. फाटक यांनीं हें २२० पृष्ठांचें पुस्तक ‘समर्थचरित्र’ म्हणून लिहिलें आहे. हें पुस्तक वाचून अतिशय निराशा होते. ‘ नांव सोनूबाई, हातीं नाहीं कथलाचाहि वाळा ’ अशासारखी या पुस्तकाची स्थिति झाली आहे. ‘श्रीसमर्थचरित्र’ असें बडें व आकर्षक नांव पुस्तकास दिलें असलें तरी, पुस्तकांत पाहावें तों समर्थांचें चरित्र पृ. ३२ ते ५७ या अवघ्या २५ पानांत कोंबलें आहे. प्रारंभींचीं ३२ पृष्ठें चरित्राच्या साहित्याच्या तपासणीच्या कामांत खर्ची पडलीं आहेत. त्यानंतर २५ पानांत कसेंबसें समर्थांचें त्रोटक चरित्र सांगून, समर्थांच्या कामगिरीचें सार सांगण्याच्या निमित्तानें पृ. ५८ ते ८८ हीं तीस पानें

( सह्याद्रि, ऑगस्ट १९५१ )

खरडलीं आहेत आणि त्यांत समर्थांच्या सगळ्या आयुष्यांतील कामगिरी कोणती वर्णिली आहे म्हणाल, तर 'देवस्थानांची उभारणी व संपादणी हें समर्थांचें कार्य' नमूद केलें आहे. हा नुसता तर्क नसून स्वतः चरित्रकारानेंच पृ. ९५ वर '**समर्थांचें ध्येय मूर्तींची स्थापना व देवळांची उभारणी**' हें होतें, स्वराज्यस्थापन हें नव्हतें' असें नोंदून ठेवलें आहे! पूर्वी पाण्यांत बुडवून टाकलेल्या देवतांच्या मूर्ति शोधून काढणें, त्यांची स्थापना करणें, नव्या मूर्ति व नवीं देवळें यांची संपादणी करणें आणि देवतांचा उत्सव करणें, ही ज्याच्या आयुष्यांतली मोठी कामगिरी अशा भाविक भक्ताच्या चरित्रांत अधिक काय असणार, अशा भावनेनें २५ पानांत चरित्र आटोपलें असल्यास त्यांत नवल काय?

## दासबोधाचा नीरस परिचय

यावर वाचक विचारतील कीं, २२० पृष्ठांतून हा एवढा भाग वगळला तर बाकीचीं पृष्ठें कोणत्या मजकुरानें भरलीं आहेत? त्याचें उत्तर असें कीं, पृ. ८८ ते १७० पर्यंतचीं ८२ पानें श्रीसमर्थ आणि शिवाजी यांची भेट शके १५७१ वैशाख शु. ९ ला झाली नाहीं; शके १५९४ पर्यंत समर्थ व शिवाजी यांची दृष्टादृष्ट झालीच नव्हती, हें वाचकांच्या गळीं उतरविण्याकडे खर्च झालीं आहेत; त्यानंतर समर्थांच्या ग्रंथ-संपत्तीचा थोडा तरी परामर्श घेतला पाहिजे म्हणून **'बहुजिनसी'** या मथळ्या-खालीं दासबोधांतील कांहीं विषयांचा परिचय करून देण्यांत आला आहे. तो परिचय करून देतांनाहि **'राजकारण'** म्हणजे '**केवळ चातुर्य**' होय **'राजकारण'** नव्हे, हें अट्टाहासानें सांगण्यास लेखक विसरले नाहींत. अशा रीतीनें राजकारण वगळून 'नीरस' केलेल्या दासबोधाचा परिचय करून दिल्यानंतर इतर ग्रंथांतून व दासबोधांतून जेवढे अगदीं निर्लेप (राजकारणाचा वासहि न येईल) असे कांहीं किरकोळ वेंचे देऊन आणि समर्थांच्या मनांत मुसलमानांविषयीं द्वेष नव्हता हें सिद्ध करण्यासाठीं कांहीं ऊहापोह करून हा **'बहुजिनसी'** भाग संपविला आहे. शेवटच्या पृ. २०९ ते २२० या बारा पानांत समर्थांच्या निर्याणानंतर समर्थ-संप्रदायाची कशी **'अवदशा'** झाली ते सांगून ग्रंथसमाप्ति केली आहे. स्वतः समर्थांचें ध्येयच जर 'देवालयांची बांधणी व संपादणी' एवढेंच आकुंचित होतें, तर समर्थांच्या पश्चात् त्यांच्या संप्रदायाची **'अवदशा'** झाली हें कोणत्या अर्थानें लेखक म्हणतात, तें लक्षांत येत नाहीं. कारण समर्थ-सांप्रदायिक आजमितीलाहि देवालयें राखून उत्सव करून कालक्रमणा करीतच आहेत! समर्थांचें ध्येय याहून जर कांहीं '**अधिक भव्य, उत्कट व उदात्त**' असतें तर मात्र सांप्रदायिकांच्या अवनतीबद्दलचें लेखकाचें खेदप्रदर्शन सकारण मानतां आलें असतें; परंतु चरित्र-काराच्या मतें समर्थांचें कार्यच जर इतकें मिळमिळीत होतें, तर प्रस्तुतच्या सांप्रदायिकांचें कार्य त्याहून अधिक पांचट होणार तरी कसें!

वस्तुस्थिति अशी आहे कीं, ग्रंथाला नांव जरी 'श्रीसमर्थचरित्र' असें दिलें

असले तरी, समर्थांनीं कोणतें अवतारकार्य केलें, हें सांगण्याचा लेखकाचा हेतुच नाहीं. समर्थांचें चरित्र सांगण्याचें कार्य जुन्या चरित्रकारांनीं, बखरकारांनीं आणि आधुनिक लेखकांत कै. राजवाडे, कै. पांगारकर, कै. स. खं. अळतेकर, कै. आठल्ये प्रभृतींनीं आणि अलीकडे डॉ. शं. दा. पेंडसे, श्री. भा. वा. भट धुळें, अनंतदास रामदासी व श्री. नानासाहेब देव प्रभृतींनीं केलेंच आहे. तेव्हां श्री. न. र. फाटक यांना कोणतीच विधायक कामगिरी करावयाची राहिली नव्हती; अर्थातच पूर्वीच्यांच्या चरित्रलेखनांतून त्यांच्या मनाला जें जें रुचलें नाहीं, त्याची मोडतोड करण्याची विघातक कामगिरी तेवढी त्यांनीं आपल्याकडे घेतली व ती करण्याचा त्यांनीं जिवापाड प्रयत्न या पुस्तकांत केला आहे.

### मोडतोड करण्याची विघातक कामगिरी

श्रीसमर्थ हे अवतारी पुरुष नव्हते, त्यांच्या अंगीं अलौकिक सामर्थ्य नव्हतें, देवभक्ति व परमार्थबोध यांच्या पलीकडे त्यांना कांहीं साधावयाचें नव्हतें, स्वधर्मरक्षणाचें व स्वराज्यसंस्थापनेचें जें प्रचंड कार्य त्यांच्याच समोर अगदीं शेजारीं चाललें होतें, त्याच्याशीं त्यांचा बिलकूल संबंध नव्हता, त्यांच्या लेखांतील 'राजकारण' शब्दाचा अर्थ 'चातुर्य' याहून अधिक व्यापक नव्हता, शिवाजी व समर्थ यांची भेट अगदीं अखेरीअखेरीस झाली व त्या भेटीचें फळ चाफळ मठाला मोठें इनाम मिळविणें याहून दुसरें कांहीं नाहीं, स्वधर्मरक्षण व स्वराज्यस्थापन यांचा समवायी संबंध नाहीं, मुसलमानांविषयीं समर्थांच्या मनांत द्वेष नव्हता, दक्षिणेंत मुसलमानांकडून हिंदूंचा तसा छळ होतच नव्हता, शिवाजीमहाराजांच्या स्वराज्यस्थापनेच्या मुळाशीं स्वधर्मरक्षणाची कल्पना नसून तो केवळ राजकीय प्रश्न होता इत्यादि कुकल्पना उराशीं बाळगून, पूर्वींच्या ज्या ज्या ग्रंथांत याविरुद्ध मतें डोकावत असतील तीं तीं खोडून काढण्यासाठीं त्यांनीं हा ग्रंथ लिहिला आहे आणि 'मूले कुठारः' या न्यायानें शिव-समर्थ भेट शके १५७१ त झालीच नसून ती शके १५९४ च्या आधीं केव्हांहि झाली नाहीं, असें दाखविलें म्हणजे समर्थांच्या अवतारकार्यांतला आत्माच नष्ट झाल्याप्रमाणें होतो, मग इतर कल्पनांचें खंडन करण्याची आवश्यकताच राहात नाहीं, या समजुतीनें त्यांनी आपल्या ग्रंथांतला एक तृतीयांश भाग केवळ या एकाच विधानाच्या खंडनार्थ राबविला आहे.

परंतु ऐतिहासिक घटना आणि समर्थांच्या दासबोधादि ग्रंथांतील प्रत्यक्ष वचनें ज्या वाचकांच्या नजरेसमोर आहेत त्यांना भ्रमाच्या भोंवऱ्यांत गिरक्या खावयास लावण्याचा रा. न. र. फाटकांचा खटाटोप निष्फळ झाल्यास नवल नाहीं. समर्थांच्या दासबोधांतील आणि इतर कवितेंतील प्रत्यक्ष वचनेंच शिव-समर्थांचा घनिष्ट संबंध पूर्वींपासूनचा असल्याचें दर्शवीत असल्यानें फाटकांच्या धूळफेकीनें कोण फसेल? फाटकांना जर समर्थांच्या कार्यभाराचा सगळाच डोलारा उडवून द्यावयाचा होता तर त्यांनीं मुळींच दासबोध ग्रंथ तरी समर्थांचाच कशा-

वरून, येथपासूनच मुळावर हल्ला चढवावयास पाहिजे होता. आणि असलें विक्षिप्त मत आपण कसें मांडावें, अशी शंका फाटकांच्या मनाला शिवण्याचें कारण नाहीं. कां, तर पूर्वी एका गृहस्थानें दासबोध हा ग्रंथ समर्थांचा नव्हे, असें मत प्रतिपादन करण्याचें धाष्टर्य केलेंच होतें. दासबोध ग्रंथच उडवून टाकला म्हणजे समर्थांनीं राजकारण केलें नाहीं आणि समर्थांची शिवाजीशीं भेट झाली तरी तिचा राजकारणाशीं बिलकूल संबंध नव्हता, असें प्रतिपादण्याची वाट अगदीं मोकळी झाली असती.

परंतु श्री. फाटक हे दासबोध व अन्य कविता समर्थकृत असल्याचें मान्य करून बसले आहेत. त्याचप्रमाणें शके १५७१ त नसे ना कां, पण १५९४ मध्यें तरी शिव-समर्थ भेट झाली, शिवाजीमहाराज शके १५८० पासून चाफळच्या उत्सवास दोनशें होन प्रतिवर्षी देत असत, शके १६०० मध्यें त्यांनीं चाफळ-मठासाठीं इनाम-पत्र करून दिलें, इत्यादि घटनाहि त्यांनीं मान्य केल्या आहेत. तेव्हां त्या कबुलीजबाबांतूनच समर्थांनीं राजकारण कांहीं केलें नाहीं, हें आपलें प्रमेय सिद्ध करण्याची त्यांची धडपड चालली आहे व प्रस्तुतचें पुस्तक हें त्या धडपडीचें प्रतीक आहे.

### स्वतःचीच कबुली

श्री. फाटक यांची ही धडपड, '**बुडत्याचा पाय खोलांत**' या म्हणीप्रमाणें त्यांनाच अधिकाधिक गुंतविण्याला कारणीभूत होत आहे; कारण सत्य दडपून कितीसें दडपलें जाणार? स्वतः फाटकच या पुस्तकांत पृ. १६० वर असें लिहितात कीं, "**समर्थांच्या चारित्र्याचा व कर्तृत्वाचा परिणाम महाराजांच्या मनावर इतरांच्या मानानें अधिक झाला, असें उपलब्ध कागदपत्रांच्या आधारें म्हणतां येतें.**" आणि श्री. देव प्रभृति समर्थभक्त तरी वेगळें काय म्हणतात? तेहि हेंच म्हणतात कीं, शिवाजीमहाराजांनीं अनेक साधूंचा आशीर्वाद घेतला असेल व त्यांना इनामें दिलीं असतील, परंतु समर्थांच्या **कर्तृत्वाचा** परिणाम महाराजांच्या मनावर अधिक ठसला. श्री. फाटक यांचें वर उद्धृत केलेलें विधान आम्हांस मान्य आहे. त्यावर आमची फाटक यांना एवढीच विनंती आहे कीं, त्यांनीं आपल्या विधानाच्याच पुष्ट्यर्थ समर्थांच्या कर्तृत्वाचीं दोनचार उदाहरणें नमूद करावींत आणि त्या कर्तृत्वाचा शिवाजीमहाराजांच्या मनावर अधिक परिणाम होण्यासारखा त्यांचा संबंध काय होता त्याचें स्पष्टीकरण करावें, म्हणजे त्यांच्या शंकांचें निरसन त्यांच्या स्वतःच्याच उत्तरानें होईल.

### भिन्न चष्मे वापरण्याचा परिणाम

समर्थचरित्र लिहिण्यापूर्वी श्री. फाटक यांनीं एकनाथांचें चरित्र लिहून प्रसिद्ध केलें. एकनाथांच्या चरित्रावर त्यांचीं जाहीर व्याख्यानेंहि झालीं. त्यांत त्यांचा प्रयत्न असा होता कीं, एकनाथादि साधुसंतांनीं स्वकालीन, सामाजिक व

राजकीय स्थितीकडे दुर्लक्ष केलें नसून परिस्थितीला अनुसरून त्यांचें आचरण व लिखाण होतें. भावार्थरामायणांत तर 'देवब्राह्मणगाईंचा रक्षणकारी राम आणि त्यांचा छळ करणारा रावण' असें तात्पर्य वाचकांस पटेल, असा कटाक्ष आहे; रावणाचा व्यवहार एखाद्या उन्मत्त सुलतानाला शोभणारा असा वर्णिला आहे; हिंदूंच्या अवनतींतून मार्ग काढावयाचा किंवा दाखवावयाचा एकच आदर्श होता व तो म्हणजे रामाच्या चरित्राचा; अर्थातच एकनाथांना श्रीरामानें प्रेरणा करून भावार्थरामायण लिहविलें; याचाच अर्थ तत्कालीन संकटांतून पार पडण्याचा मार्ग रामचरित्रच दाखवूं शकेल, अशी एकनाथांची मनोभावना झाली होती. "एकनाथांच्या उपदेशानें स्वधर्माभिमानाचें चैतन्य अंगीं भरलेल्या जनतेनेंच त्यांच्या जीवनकार्याला सफळ केलें, हें त्यांच्या पश्चात् लवकरच उदयास आलेल्या हिंदूंच्या स्वराज्यानें सिद्ध झालेलें आहे" (एकनाथ-चरित्र, पृ. १२–१३). श्री. फाटक हेच पुढें असें लिहितात कीं, "ध्येयानिमित्त भेदशून्य एकजूट हा एकनाथांच्या कामगिरीचा तथ्यांश पुढें अर्धशतकाच्या आंत महाराष्ट्रांतील स्वराज्याच्या रूपानें सफळ झाला" (एकनाथ-चरित्र, पृ. ३०). एकनाथांच्या उपदेशाच्या परिणामाचा संबंध पाऊणशतकानंतर स्थापन झालेल्या स्वराज्याशीं जोडणारे श्री. फाटक, प्रत्यक्ष शिवाजीच्या कार्यारंभींच धर्मस्थापनेच्या प्रेरणेचा उपदेश करीत असणाऱ्या रामदासांच्या उपदेशाचा स्वराज्यस्थापनेशीं कांहीं संबंध नव्हता, असें दाखवूं पाहतात, हें आश्चर्य नव्हे काय ? हा दोष त्यांनीं वापरलेल्या भिन्न चष्म्याचा आहे. एकनाथापर्यंतच्या साधुसंतांच्या चरित्राकडे पाहतांना त्यांच्या कामगिरीचा स्वराज्यस्थापनेशीं असलेला अत्यल्प व दूरान्वित संबंध अति मोठा व निकटचा दिसावा असाच चष्मा त्यांनीं वापरला होता. उलटपक्षीं समर्थांच्या चरित्राकडे पाहतांना समर्थांच्या कामगिरीचा स्वराज्यस्थापनेच्या परिस्थितीशीं असलेला अतिनिकट व स्पष्ट संबंधहि दृष्टीआड व्हावा असाच चष्मा त्यांच्या डोळ्यावर चढला होता; तेव्हां शिव-समर्थसंबंध त्यांना दिसला नसल्यास तो दोष त्यांचा नव्हे !

**कर न कऱ्याचा वसा**

समर्थांनीं राजकारण कोणतें व कसें केलें याविषयीं लेखी पुराव्याची अपेक्षा धरणारांनीं समर्थांचा दंडक ध्यानीं घेतला पाहिजे.

**"इशारतीचें बोलतां नये । बोलायाचें लिहूं नये ।**
**लिहायाचें सांगूं नये । मुखजबानीनें ॥"**

असा ज्यांचा नियमच होता त्यांच्या हातचे लेख किंवा त्यांच्या भेटी-गांठी सल्लामसलतीसंबंधाचे लेख आढळणार कोठून ? त्यांतून जेवढें लिहिलें जावें व प्रकट केलें जावें अशी समर्थांचीच अनुज्ञा असेल तेवढीं प्रकरणें लिहिलेलीं आढळलीं आहेत. अशा प्रसिद्ध प्रकरणांतून (१) शिवरायाचा गौरव आणि प्रोत्साहन, (२)

राजधर्म, (३) क्षात्रधर्म, (४) सेवकधर्म समास १ व २, (५) सावधता प्रकरण, (६) संभाजीस पत्र, (७) आनंदवनभुवन, (८) देवीचीं स्तोत्रें, इतकीं प्रकरणें प्रसिद्ध आहेत. या सर्व प्रकरणांतून शब्दाशब्दांत राजकारण खच्चून भरलें आहे. यांशिवाय (१) अफझलखानाच्या वधप्रसंगीं दिलेला इशारा व (२) धूर्तपणाचें राजकारण हीं दोन प्रकरणें दासबोधांतच दशक १८ समास ६ आणि दशक १९ समास ९ यांत समाविष्ट केलीं गेलीं आहेत. यांखेरीज लोकस्थितिवर्णनपर आणि सामान्य जनतेला मार्गदर्शक अशीं किती तरी प्रकरणें स्वतंत्र आहेत. दासबोधांतला एकपंचमांश भाग असा वेगळा काढतां येईल कीं, त्यांत व्यावहारिक राजकारणच शिकविलें आहे. एवढा मोठा कवितासंग्रह पुढें असतां, समर्थांनीं राजकारण कांहींच केलें नाहीं, केवळ 'देवालयांची उभारणी व संपादणी' हेंच त्यांचें जीवितकार्य होय, असें प्रतिपादन करणाऱ्या वावदुकास काय म्हणावें तेंच कळत नाहीं. हट्टाग्रहानें जेथें जें नाहीं तेथें तें आहे असें भासवावें आणि जेथें जें आहे तेथें तें नाहींसें भासवावें, असला 'कर न कऱ्याचा वसा' ग्रंथकारानें घेतलेला दिसतो. निजलेल्यास जागें करतां येतें, पण जो मुद्दामच झोपेचें सोंग घेतो, त्याला जागें करण्याचा प्रयत्न व्यर्थ होय. तथापि असला नसता बुद्धिभेद करणाऱ्या ग्रंथाच्या दिखाऊ मोठेपणानें भाळून जाऊन भ्रमांत पडणारे कांहीं वाचक असतील तर त्यांच्या मार्गदर्शनार्थ यापुढील विवेचन करण्यांत येत आहे.

### असत्य व फुसकी सबब

मसूर येथें पहिलाच रामनवमीचा उत्सव सुरू झाला. त्या उत्सवास शिवाजीमहाराज आले होते, असें दासविश्रामधाममध्यें नमूद आहे. शहाजीचा देशमुखीचा गांव म्हणून तेथील उत्सवास शिवाजी येणें हें स्वाभाविक आहे. तो प्रांत त्या वेळीं आदिलशाहीच्या राज्यांत असला तरी शहाजी राजांचा जर तेथें देशमुखीचा हक्क चालत होता तर समर्थांना तेथें मठ करण्याला व शिवाजीला तेथें उत्सवाला येण्याला हरकत कां असावी? समर्थांनीं मठस्थापना व रामाची उपासना सुरू केली त्या वेळीं हिंदूंचें स्वराज्यच जर नव्हतें, तर त्यांची मठस्थापना परराज्यांतच व्हावयाची. उत्तरेंत तर स्वराज्य-स्थापनेचा संभवहि नव्हता, तथापि तेथेंहि त्यांनीं आपले मठ स्थापून ठेवले. दक्षिणेंतहि स्वराज्याच्या सीमेबाहेर त्यांचे पुष्कळसे मठ होते; परंतु जेथें स्वतः राहून संघटना व नियंत्रणा करावयाची तें स्थळ पर्यायानें परकी अमलाखालीं असलें तरी जेथें प्रत्यक्ष देशमुखीचा अंमल शहाजी राजांचे प्रतिनिधि म्हणून शिवाजीमहाराजांचा होता तेंच स्थळ उत्सवाचें व संघटनेचें केंद्र करण्यांत समर्थांचा दूरदर्शीपणाच दिसतो. अशा उत्सवासाठीं जाण्यायेण्यालाहि प्रतिबंध करण्याइतका कडक बंदोबस्त आदिलशाहींत नव्हता. अर्थातच शिव-समर्थ भेट लवकर झाल्याचें नाकारण्यासाठींच फाटक हे शिवाजीमहाराजांच्या संचाराला धोका असल्याची असत्य व फुसकी सबब पुढें करीत आहेत!

### पार्श्वभूमीच डळमळीत करण्याचा डाव

असल्या विपर्यस्त सबबींमुळें त्यांच्या ग्रंथांत विसंगतीहि उत्पन्न झाली आहे. शिवाजीच्या संचारालाहि धोका असल्याचा आविर्भाव आणणारे फाटक दुसरीकडे याच ग्रंथांत त्या वेळीं हिंदु-मुसलमानांत असें वैर नव्हतें आणि हिंदूंच्यावर जुलूम-जबरदस्तीहि फारशी होत नव्हती, असें लिहितात. असें दर्शविण्याच्या बुडाशीं असलेला हेतु उघड आहे. मुसलमानांच्या जुलमाचा अतिरेक झालाच नव्हता असें दाखविलें म्हणजे समर्थांच्या कार्याची पार्श्वभूमीच डळमळते. धर्मावर भयंकर संकट कोसळलें आहे, असें म्हणून समर्थांनीं त्याच्या प्रतिकारार्थ संघटना केली, धर्मरक्षणाविषयीं शिवाजीला भीड घातली, देवीची प्रार्थना करून आतां 'रोकडें कांहीं सामर्थ्य दाखवी' असा धांवा केला, ही जी आजवरची समजूत तीच निर्मूल आहे असें ठरविण्याकरितां हा विपर्यास केला गेला आहे. समर्थांनीं 'अस्मानी सुलतानी' हें प्रकरण लिहून जनतेंत जागृति निर्माण केली; पण त्या वेळच्या सर्व संकटांची जबाबदारी एकट्या 'अस्मानी'वर लादून 'सुलतानी' संकटाला दृष्टीआड करण्याचा फाटकांचा प्रयत्न आहे. फाटक लिहितात, 'दक्षिणेंत केवळ धर्माच्या अभिमानानें इस्लामी राज्यें चालविलीं जात नव्हतीं.' "केव्हां केव्हां धार्मिक जुलमाचे हुकूम सुलतानशाहीमार्फत अंमलांत येत होते! या हुकुमांचा सुळसुळाट उत्तरेच्या मानानें दक्षिणेंत अंगदीं कमी होता!" दक्षिणेंतील सुलतानशाहीची ही सगळी पोचट तरफदारी कशासाठीं? तर समर्थांच्या हिंदुधर्मरक्षणाच्या उठावणीच्या पाठीमागचा आधारच डळमळीत करून समर्थांचा राजकारणाशीं संबंध तोडण्याकरितांच, ही सगळी वकिली आहे. पण एकनाथचरित्रांत हेच फाटक लिहितात कीं, "एकनाथाच्या अंगावर बिनदिक्कत थुंकण्याचा उर्मटपणा करण्याइतका बेफामपणा सामान्य मुसलमानांतहि वसत होता. म्हणून हिंदूंमध्यें देवाधर्माचा अभिमान जागृत करण्याचें दुष्कर कार्य एकनाथांना करावयाचें होतें" (एकनाथ-चरित्र, पृ. १२) आणि समर्थांच्या वेळीं मात्र हें दुष्कर कार्य करण्याची आवश्यकता नव्हती, असें हेच फाटक भासवूं पाहतात!

### भेटीची आतुरता कां?

आतां आपण समर्थांच्या कार्याकडे वळूं.

'निश्चयाचा महामेरू' या शब्दांनीं प्रारंभित झालेल्या पत्राचा नीट सुसंगत अर्थ केल्यास त्यांतून पुष्कळ गोष्टींचा उलगडा होऊं शकतो. समर्थांनीं हें पत्र शिवाजीमहाराजांस भेटीच्या उद्देशानें लिहिलें, याविषयीं मतैक्य आहे. श्री. फाटक म्हणतात कीं, या पत्रावरून समर्थांनाच भेटीची आतुरता अधिक होती असें दिसतें; हेंहि अगदीं मान्य आहे. मात्र स्वतः फाटकांनींच याचा उलगडा करावा कीं, समर्थांना शिवाजीच्या भेटीची इतकी आतुरता कां लागली होती? त्यांना काय गुरुदक्षिणा लाटावयाची होती, का इनाम मिळवावयाचें होतें, का महा-

राजांच्या राज्यांत एखादा अधिकार संपादन करावयाचा होता? डोहांतल्या मूर्ति वर काढावयाच्या, देवळें बांधावयाचीं व पूजा-उत्सव करीत बसावयाचें सोडून समर्थांना हा नसता उद्योग कोणीं सांगितला होता? बरें, चाफळच्या उत्सवाकरितां वर्षासन मिळवावें असा यांत हेतु होता म्हणावें, तर शिवाजीमहाराजांकडून ही मदत शके १५८० पासून मिळतच होती आणि फाटकांच्या मतें तर ही भेट शके १५९४ मधली आहे. तेव्हां शके १५९४ मध्यें श्रीसमर्थांनीं भेटीची इतकी आतुरता कां दाखविली, याचा उलगडा त्यांनीं करावा.

वास्तविक परिस्थिति अशी होती कीं, हृदयस्थ नारायणानें प्रेरणा केल्यावरून समर्थ कृष्णातीराला आले होते. इकडे शिवाजीनेंहि स्वराज्याचें तोरण बांधून स्वराज्य-स्थापनेचा उपक्रम केला होता. उभयतांचे कार्यभाग आपापल्या परीनें चालू झाले तरी निकट संबंधाची आवश्यकता उभयतांसहि भासली होती. त्यांतून शके १५७१ त शहाजीमहाराजांना विजापुरीं अटक झाल्यावर शिवाजीमहाराजांचा उद्योग अडून राहिला आणि पिताजींना सोडविण्याची चिंता मनाला व्यथित करूं लागली. या वेळीं शिवाजीला समर्थांची आठवण व्हावयास हवी होती, तथापि राजकीय उद्वेगांत त्यांस विस्मरण झालें; परंतु समर्थ हे कार्याचे भुकेले होते, मानाचे भुकेले नव्हते, म्हणून त्यांनींच शिवाजीला पत्र लिहून त्यांची स्मृति जागृत केली. त्यांत असें सुचविलें कीं, "तुम्हापासीं अनेक आश्रित येऊन राहिले आहेत; तरी पण 'उदंड राजकारण तटलें। तेणें चित्त विभागलें॥' ही स्थिति कांहीं पालटली नाहीं. अर्थातच या तटलेल्या राजकारणाची कोंडी फोडण्याचा उपाय मी सांगूं शकेन. हें जर मी विनाकारण लिहिलें असें वाटत असेल तर क्षमा करा." या पत्राचा जो परिणाम व्हावयाचा तोच झाला. शिवाजीनें आपणच समर्थांच्या भेटीस जावयाचा निश्चय केला आणि शके १५७१ च्या वैशाख शु. ९ ला ही भेट झाली आणि त्यानंतर सव्वा महिन्यानें शहाजीमहाराजांची सुटका झाली. शके १५९४ ला यांतली कोणतीच परिस्थिति जुळत नाहीं. त्या वेळीं कोणाचेंच राजकारण 'उदंड तटलें' नव्हतें.

### पत्रांतील गौरव लौकिकार्थानें खरा

या पत्रांत 'तुमचे देशीं वास्तव्य केलें' या विधानाला हरकत घेऊन फाटक म्हणतात, शके १५७१ त कऱ्हाड प्रांत शिवाजीच्या ताब्यांत आलाच नव्हता, तेव्हां 'तुमचे देशीं वास्तव्य केलें' असें म्हणणें कसें जुळतें? हा आक्षेप निरर्थक होय. मसूरची व कऱ्हाडची देशमुखी जर शहाजी राजाकडे होती आणि शहाजी राजांनीं जर शिवाजीला आपल्या सर्व जहागिरींची व्यवस्था पाहण्याकरितां पुणें प्रांतीं पाठविलें होतें, तर मसूर-कऱ्हाड भागांत राहणें हें 'तुमचे देशीं वास्तव्य' नव्हे असें कसें म्हणतां येईल? त्या काळांत ठिकठिकाणचे देशमुखच त्या त्या प्रांताचे राजे समजले जात आणि केवळ तेवढ्याच अर्थानें समर्थ 'तुमचे देशीं

वास्तव्य केलें ' असें लिहीत आहेत. सगळा मुलूख बादशहाचा असला तरी जेथला जो अम्मलदार त्याचाच तो देश हें लौकिकार्थानें खरेंच आहे.

शिवाजीमहाराज हे अद्यापि नरपति, भूपति झाले नव्हते, या आक्षेपांतहि कांहीं तथ्य नाहीं. शिवाजीमहाराज या वेळीं गडपति, हयपति व गजपति तर झालेच होते. 'जलपति' हा पाठ चूक आहे तो शब्द मुळांत नाहीं. बाकीचे दोन शब्द नरपति, भूपति हे मायन्याचे शब्द देशमुखासारख्यांना लावीत असत. शिवाय शिवाजीनें 'प्रतिपच्चंद्ररेखेव' ही राजमुद्रा चालू केली होती. शिवाय या पत्रांत समर्थ हे शिवाजीमहाराजांच्या भावी उत्कर्षाचें चित्र मांडून शिवाजी राजांना प्रोत्साहन देत आहेत. ' सावधपणें नृपवर तुच्छ केले ' आणि ' कित्येकांस धाक सुटले ' या विधानांत अतिशयोक्ति नसून विजापूरच्या दरबाराला धाक सुटला होता, याविषयीं शिवभारतांतील उल्लेख महत्त्वाचे आहेत. विजापूरच्या सुलतानाला शिवाजीचें प्राबल्य पाहवेना म्हणूनच तर शहाजीला धरून आणून शिवाजीला वठणीवर आणण्याचा प्रयत्न त्याजकडून अप्रत्यक्षपणें चालला होता. ' पुरंदर आणि शक्ति पृष्ठभागीं ' याचा उद्देश ' श्रीशंकर आणि भवानी माता ' आपल्या पाठीशीं आहेत हें सुचविण्याचा आहे.

सारांश, ' निश्चयाचा महामेरू ' हें पत्र समर्थांनीं शके १५७१ त अगदीं योग्य वेळीं पाठविलें असेंच दिसून येईल. समर्थांना शिवाजीच्या भेटीची प्रेरणा होऊन त्यांनीं कृष्णातीरीं येणें आणि शिवाजीलाहि स्वप्नांत समर्थांचें दर्शन होणें यांत अद्‌भुत व अशक्य असें कांहींच नाहीं. ज्याला ज्या गोष्टीची उत्कट भावना असते त्याला ती स्वप्नांत दिसणें हें नैसर्गिक आहे. रा. फाटकांना त्यांच्याच गुरूंचा दाखला लवकर पटेल म्हणून त्याचाच उल्लेख करतों. ' आपण कोणता व्यवसाय करावा ' याचें चिंतन करीत असतांना श्री. कृष्णाजीपंत खाडिलकर यांना स्वप्नांत **'केसरी'** हीं अक्षरें दिसलीं हें त्यांनींच नमूद करून ठेवलें आहे. हें तर असत्य नव्हेना ? मग बखरकारांनीं शिवाजीला व समर्थांना एकमेकांना भेटण्याची प्रेरणा झाली असें लिहून ठेवलेलें असत्य कां मानावें ?

## मसूरलाच कां आले ?

इतका हा या मुद्द्याचा विस्तार करण्यांतला हेतु असा कीं, जन्मापासूनच ' चिंता करितों विश्वाची ' ही भावना समर्थांच्या मनांत घर करून राहिली होती. पुढें पंचवटींतलें अनुष्ठान संपत आल्यावर रामप्रभूनें त्यांस कृष्णातीरीं जाऊन धर्मस्थापनेच्या कार्याला साहाय्य करण्याची प्रेरणा केली. पण तीर्थयात्रा करण्याच्या निमित्तानें सगळीकडची देशस्थिति पाहून येण्याला समर्थ निघाले. त्यांत मध्येंच हिमाचलावर वैराग्य प्रबल होऊन समर्थांनीं जलसमाधि घेण्याचा विचार मनांत आणला; त्या वेळींहि रामदासांना ' तुम्हांला जगदुद्धार करावयाचा आहे, धर्म-

स्थापनेच्या हेतूनें तुमची काया दोन तपें रक्षिली ' असा साक्षात्कार झाला. अशा अंतःप्रेरणेनेंच धर्मस्थापनेचें कार्य करण्यासाठीं समर्थ कृष्णातीरीं आले.

प्रत्येक गोष्टीचा विपर्यास करण्याचा चंग बांधलेले फाटक हाहि हेतु अमान्य करण्याच्या बुद्धीनें असें दाखविण्याचा प्रयत्न करतात कीं, आपल्या जन्मगांवीं किंवा ओळखीच्या प्रांतांत माणसाला मोठेपण मिळत नाहीं, म्हणून रामदास कृष्णातीरीं आले ! पण परठिकाण शोधतांना त्यांनीं मसूरच कां पसंत केलें, परप्रांतांतच राहावयाचें तर गोकर्ण महाबळेश्वर, श्रीशैल्य, रामेश्वर, पंपासरोवर इत्यादि स्थळांची त्यांना कां आठवण झाली नाहीं ? शहाजीच्या जहागिरीचेंच गांव नेमकें कसें आठवलें, याचें कांहीं समाधानकारक उत्तर फाटक देऊं शकतील काय ?

### स्वराज्य व स्वधर्मरक्षण यांचा समवायी संबंध

सांप्रतच्या निधर्मी राज्याच्या वातावरणांत वावरणारांना स्वधर्मस्थापना व स्वराज्यस्थापना या दोहोंचा अभेद्य संबंध पटणार नाहीं; पण समर्थकालीन परिस्थिति तशी नव्हती. त्या वेळीं स्वराज्य-स्थापनेशिवाय स्वधर्मरक्षण होऊं शकत नव्हतें आणि स्वधर्माभिमानाशिवाय स्वराज्याचा झेंडा उभारण्याची प्रेरणा होऊं शकत नव्हती. यास्तव स्वधर्मरक्षक आणि स्वराज्यसंस्थापक यांचें परस्परांशीं सहकार्य अपरिहार्य होतें. याकरितांच शिवाजीमहाराज हे अनेक साधुसंतांचा परामर्श घेत होते आणि समर्थहि 'तुझा तूं वाढवी राजा' अशी देवीची प्रार्थना करीत होते. शिवाजीमहाराज साधुसंतांची भेट घेत असत, हें दर्शविण्यासाठीं फाटकांनीं अनेक साधूंची नामावळी दिली आहे, पण तींत तुकारामबुवांच्या भेटीचा उल्लेख तेवढा गाळला आहे; कारण तुकारामाचा उल्लेख केला कीं, समर्थ रामदासांची भेट घ्या, हा तुकारामाचा आदेश गळ्याशीं येईल; आणि ही भेट गाळण्याची मखलाशी अशी कीं, तुकारामाच्या प्रयाणापूर्वी तुकारामाला शिवाजीचें व समर्थांचें नांव तरी माहीत असेल कीं नाहीं, असा फाटकांना संशय आहे ! पण पुण्याशेजारीं देहू, लोहगांव येथें ज्यांच्या कीर्तनाकरितां हजारों लोक जमतात त्या तुकोबाचें नांव शिवाजीमहाराजांच्याहि कानावर आलें नव्हतें असेंहि मानावयाचें काय ? पण स्वतःच्या दुर्मताच्या आड जो जो पुरावा येईल तो तो त्याज्य असा फाटकांचा दंडकच आहे आणि याच दडपेगिरीनें शिव-समर्थ भेट शके १५७१ त झाली असें सांगणारे सर्व पुरावे निराधार ठरवून ही भेट तेव्हां न झाल्याचें ते दाखवूं पाहात आहेत.

### अतिशयोक्ति वगळून बाकीचा मजकूर खरा

आपल्याकडे कालक्रमानुसार पद्धतशीर इतिहास लिहिण्याची परंपराच नसल्यानें ऐतिहासिक बखरींतूनहि कालानुक्रमांत, स्थलकालनिर्णयांत, कार्यकारणसंबंध जोडण्यांत जर ढोबळ चुका होतात, तर भक्तिमार्गीय सांप्रदायिकांच्या टिपणांतून

व कथांतून अशा चुका झाल्यास तीं टिपणें, त्या बखरी, त्या पोथ्या सर्वच खोट्या म्हणून ठरवावयाच्या कीं काय ? शिवाजीमहाराज अवरंगजेबास भेटावयाला दिल्लीला गेले, असें कित्येक ग्रंथांतून लिहिलें गेलें. अलीकडे ही भेट आग्रा येथें झाली, दिल्लीस नव्हे, असें सिद्ध झालें आहे. पण तेवढ्यावरून शिवाजीमहाराज दिल्लीला गेले हें लिहिणारे इतिहासकार आमूलाग्र खोटे मानावयाचे, आणि शिवाजीमहाराज उत्तरेकडे गेलेच नाहींत असें मानावयाचें काय ? दुसरें उदाहरण तालिकोटच्या लढाईच्या स्थानाचें. ही लढाई तालिकोटला न होतां रक्कसतंगडी या गांवानजीक झाली; पण तेवढ्यावरून 'तालिकोटची लढाई' झालीच नाहीं, असें मानावयाचें काय ? अर्थातच बखरकारानें 'राजगड'च्या जागीं 'रायगड' लिहिलें एवढ्यानें तो खोटा कसा ठरतो ? अद्भुत व अतिशयोक्त वर्णनालाहि ह्याच न्याय लावला पाहिजे. अद्भुत चमत्कार किंवा अतिशयोक्ति अविश्वसनीय म्हणून तिच्या बुडाशीं असलेली घटनाच खोटी मानावयाची कीं काय ? पन्हाळगडावर अमात्यसदनीं समर्थांनीं कीर्तन केलें, याचें वर्णन करतांना भाविक चरित्रकारांनीं कीर्तनानंतर समर्थ पर्वतावरून उड्डाण करून निघून गेले असें वर्णिलें आहे. यांतील उड्डाणाची अतिशयोक्ति तेवढी टाळण्याच्याऐवजीं, समर्थ गडावर गेलेच नव्हते आणि त्यांनीं अमात्यसदनीं कीर्तन केलेंच नाहीं, असें म्हणणें युक्त ठरेल काय ?

### बखरकार हे खोटे साक्षीदार नव्हत

अशा विवेचक दृष्टीनें सारासार विचार करून बखरी व चरित्रें वाचल्यास समर्थांचें अद्भुत चरित्र आपल्या डोळ्यासमोर उभें राहतें आणि त्यांतील मुख्य मुद्द्यावर सर्व चरित्रकारांचें मतैक्य दिसून येतें. मतभेदाच्या मुद्द्यासंबंधांतहि एक धोरण लक्षांत घेतलें पाहिजे तें असें कीं, जेथें परस्परांत उत्तर-दक्षिण ध्रुवाइतका विरोध असेल, तेथें कोण खरा हा संशय उत्पन्न होईल; पण जेथें तपशील कमीजास्त सांगणें अशा स्वरूपाचा फरक असेल, तेथें तपशिलाचा परस्परांत छेद न मानतां दोहोंचें एकत्रीकरण केलें पाहिजे. उदाहरणार्थ, एका चरित्रकारानें समर्थांच्या तीर्थाटनांत पांच-सात तीर्थांचीं नांवें सांगितलीं आणि दुसऱ्यानें कांहीं कमीजास्त नांवें सांगितलीं, तर उभयतांच्या माहितीचें एकत्रीकरण करणें हेंच युक्त ठरेल. ह्याच नियम शिव-समर्थ भेटीविषयींहि लागू करतां येईल. एका चरित्रकारानें आपणांस ठाऊक असलेल्या किंवा ऐकलेल्या तीन भेटींचा उल्लेख केला व दुसऱ्यानें जर वेगळ्याच दोन भेटींचा उल्लेख केला, तर शिव-समर्थ भेट मुळींच झाली नाहीं, असा त्यांतून इत्यर्थ न काढतां पांच वेळां भेट झाली असेल असेंच मानणें युक्त ठरेल. याचें कारण हेंच कीं, हे चरित्रकार ऐतिहासिक पुराव्याची छाननी करण्याइतके अनभिज्ञ नसले, तरी ते जाणूनबुजून कोणाची दिशाभूल करण्याकरितां खोटेंच लिहून ठेवणारे आजकालचे खोटे साक्षीदार नव्हत. म्हणून ज्याला जेवढें अवगत झालें तेवढें त्यानें लिहिलें असेंच समजलें पाहिजे.

## गर्हणीय हेटाळणी

या दृष्टीनें पाहिल्यास 'समर्थप्रताप'कार गिरिधरस्वामी हे सर्व चरित्रकारांत अधिक विश्वसनीय ठरतात. कारण त्यांनीं साद्यंत नांवनिशीवार खूपच तपशील दिला आहे. ह्या समर्थप्रतापातला '**अकारपूर्वक यवनास मारविलें**' हा उल्लेख दृष्टीआड करतां येण्याजोगा नाहीं. 'चरित्र लिहितां लिहितां एकास अफझलखान आठवला' असें म्हणून फाटकांनीं त्याची हेटाळणी केली आहे, ती अत्यंत गर्हणीय आहे. गिरिधरांनीं आपल्या लहानपणापासून ती कथा ऐकली असेल, म्हणूनच त्यांना ती आठवलीना! गिरिधर काय किंवा हनुमंतस्वामी काय, कोणीहि कादंबरी लिहावयास बसले नव्हते. मठपरंपरेंत पिढ्यान् पिढ्या ज्या कथा त्याच्या कानावर आल्या त्याच त्यांनीं लिहिल्या; अर्थातच त्यास मुळांत आधार असला पाहिजे.

'**अकारपूर्वक यवनास मारविलें**' या विधानाचें सत्यत्व तर अलीकडे अधिक स्पष्ट झालें आहे. मूळचा पाठ '**अफझलखानास मारविलें**' असा होता; परंतु शिव-समर्थांच्या भेटींत राजकारणाची वाच्यता करावयाची नाहीं, '**मंत्रभेद**' करावयाचा नाहीं, असा दंडक असल्याचें स्मरण झाल्यावरून आपण खानाचें नांव लिहिल्यानें दंडक न पाळल्याचा दोष येतो, असें ध्यानांत आल्यावरून पहिल्या लिखाणांतील '**फजलखा**' एवढ्या चार अक्षरांना हरताळ फासून, त्यावर कोरी चिठी चिकटवून, काकपद घालून '**कारपूर्वकयव**' अशी दुरूस्ती करण्यांत आली आहे. यावरून किती तरी गोष्टींवर प्रकाश पडतो.

## टिपणें अलाहिदा असत

राजवाडे याना जें '**वाकेनिसी टिपण**' आढळलें, त्यांतल्या हकीकतीचा इतिहासाशीं कितपत पडताळा मिळतो याची कलमवार छाननी अनंतदास रामदासी यांनीं केली आहे. पण तिकडे फाटकांनीं लक्षहि दिलें नाहीं. कारण त्यांचा अहंकार असा कीं, आपणाला जी ऐतिहासिक दृष्टि आहे ती या सांप्रदायिकांना कोठून येणार! परंतु समर्थांच्या गाथ्याची अनंतदासांची ती प्रस्तावना आणि फाटकांचें हें प्रस्तुतचें लिखाण या दोहोंची तुलना केली असतां, कोणाची दृष्टि कलुषित आहे व कोणाची साफ आहे तें सहज वाचकांच्या लक्षांत येतें. पण या ठिकाणीं तो मुख्य मुद्दा नसून वाचकांचें लक्ष दुसऱ्याच एका विधानाकडे खेचावयाचें आहे. वाकेनिसी टिपणांत ३९ कलमें असून त्यांतल्या अकरा (११) कलमांत 'सविस्तर मजकूर अलाहिदा लिहून ठेवला आहे,' असे शेरे आहेत. त्यांतलें वैशिष्ट्य हें कीं, जेथें जेथें शिवाजीमहाराजांचा संबंध आला, त्या त्या ठिकाणीं त्याचा तपशील निराळा लिहून ठेवला आहे, असा शेरा सांपडतो. त्यातलेंच एक कलम १८ हें असून त्या कलमांत "शिवाजीमहाराज यांस अनुग्रह शके १५७१ त शिंगणवाडीच्या बागेंत वैशाख शु.'९ गुरुवारीं जाला" असें लिहून पुढें "वरकड शिवछत्रपति प्रकरण अलाहिदा लिहिलें आहे" असा शेरा मारला आहे. यावरून ही गोष्ट सूचित होते कीं, सांप्रदायिक

घटनांचीं टिपणें आणि राजकारणाचीं टिपणें अलाहिदा असत. म्हणूनच सांप्रदायिक कागदपत्रांत शिवाजीच्या भेटीविषयींचे किंवा सल्लामसलत दिल्याविषयींचे लेख आढळत नाहींत. त्या संबंधांत लेखी पत्रव्यवहार करावयाचा नाहीं आणि भेटीहि गुप्त व्हावयाच्या, तेव्हां त्यांची माहिती सांप्रदायिक पत्रव्यवहारांत कशी मिळणार? केवळ सांप्रदायिक शिष्यत्व आणि उत्सवादिकांच्या निमित्तानें भेटणें एवढ्याच गोष्टी सांप्रदायिक कागदपत्रांत नमूद आहेत.

### शके १५९४ पर्यंत ही गुप्तता पाळली गेली

ही गुप्तता शके १५९४ पर्यंत चालू होती. त्यानंतर शिवाजीची सत्ता इतकी प्रबळ झाली कीं, त्यास इतकी गुप्तता राखण्याची गरज वाटेनाशी झाली; आणि म्हणूनच शके १५९४ च्या भेटीचा उल्लेख दिवाकरांच्या पत्रांत आढळला. या दृष्टीनें पाहिल्यास '**पहिलीच भेट आहे**' याचा अर्थ स्पष्ट होतो. अनंतदास रामदासी यांनीं तीन-चार अर्थ सुचविले आहेत. त्यांतला राजवाडे यांचा अर्थ अगदीं पटण्यासारखा नाहीं. श्री. विनायकराव भावे यांनीं सुचविलेला अर्थ संभवनीय आहे. शिवाजीमहाराजांची भेट पहिलीच (पूर्वीपासूनच झालेली) आहे, तेव्हां त्यांच्या भेटीचा आतांच कांहीं एवढा मोठा बाऊ करण्याचें कारण नाहीं, असा अर्थ त्यांतून निघूं शकतो; पण केशवानें हें वाक्य दिवाकरास लिहिणें, म्हणजे लहान तोंडीं मोठा घांस घेतल्यासारखें होईल, यास्तव तो अर्थ आपण सोडून देऊं. शेवटचा सुसंगत अर्थ हाच कीं, आतांपासून शिवाजीमहाराजांची भेट उघड राजरोस सुरू झाली; त्यांतली ही पहिलीच भेट आहे. तेव्हां या वेळीं समर्थांच्या शिष्यमंडळींकडून उत्तम बडदास्त ठेवली गेली पाहिजे. अर्थातच यानंतर शिवाजीमहाराज समर्थांकडे येऊन महिनान् महिना राहिल्याचे अनेक प्रसंगांचे उल्लेख सांपडतात. त्यावरून या वेळेपासून भेटींतली गुप्तता गेली, हें उघड आहे. अर्थातच यानंतर उघड भेटीचा प्रघात सुरू झाला व त्या प्रघातांतली ही पहिलीच भेट यांत शंकाच नाहीं.

### पहिलीच भेट आडवळणीं रानांत कां ?

शके १५९४ त पहिली भेट झाली व गुरूपदेश झाला असें मानावयाचें, तर याच वेळीं त्या उभयतांना भेटीची आतुरता कां झाली याचें कारण एकाहि बाजूनें सयुक्तिक देतां येत नाहीं आणि हीच भेट अगदीं पहिली असें मानणारा पक्ष भेटीच्या आवश्यकतेचा उलगडा करूं शकत नाहीं, आणि म्हणूनच करूं इच्छीत नाहीं. शके १५७१ मध्यें उभयतांनाहि भेटीची गरज कशी भासत होती हें आपण सहज समजूं शकतों. दुसरें असें कीं, १५९४ मधली हीच भेट अगदीं पहिली असें गृहीत धरूं म्हटल्यास ही भेट चाफळ, मसूर, सज्जनगड• इत्यादि ठिकाणीं न होतां एखाद्या अज्ञात व गैरसोयीच्या ठिकाणीं कां व्हावी? ज्या ठिकाणीं दिवाकरांच्या मदतीला पांच-चारहि शिष्य नाहींत, झाडी बहुत, गांवचे लोक

मदतीला आणण्याची गरज पडावी, अशा अप्रसिद्ध आणि गैरसोयीच्या ठिकाणीं शिवाजीमहाराज प्रथमच समर्थांच्या भेटीस जातात व उपदेश घेतात आणि समर्थहि आपल्या राजशिष्याला उपदेश देण्यासाठीं असल्या आडरानांत बोलावतात, हें कां, याचा उलगडा फाटक प्रभृति आक्षेपक करूं शकतील काय ? पन्हाळ्याचें राजकारण शिजत होतें असें मानलें तरच पन्हाळ्याशेजारीं पारगांवास ही भेट कां, याविषयीं कांहीं अनुमान बसवितां येतें.

## शब्दानुशब्दांत राजकारण भरलें आहे

बरें, १५९४ च्या आधींच्या भेटी गुप्त म्हणून त्यांचा उल्लेखच जर कोठें आढळत नाहीं तर त्या भेटी झाल्या हें तरी गृहीत धरावयाला आधार काय ? याचें उत्तर समर्थांच्या दासबोधांत व स्फुट काव्यांत आढळतें. 'गाजी पुरुष आढळेल' याच्या शोधांतच समर्थ होते; असें असतां शिवाजीच्या पराक्रमाची कीर्ति त्यांच्या कानीं पडली नाहीं, अथवा कीर्ति कानीं पडूनहि त्यांनीं भेट घेण्याचा प्रयत्न केला नाहीं, असें मानणें म्हणजे समर्थांच्या पदरीं अजागळपणा बांधणेंच होय. दासबोधाच्या १८ व्या दशकाच्या ६ व्या समासांतील वर्णन केवळ सर्वसाधारण उत्तम पुरुषाचें आहे, असें कोणी तरी सिद्ध करूं शकेल काय ? उत्तम-पुरुषलक्षणांत 'म्लेंच्छ दुर्जन उदंड । बहुतां दिवसांचें माजलें बंड', 'समया सारिखा समयो येना । नेम सहसा चालेना । नेम धरितां राजकारणा । अंतर पडे', 'समर्थापासीं बहुत जन । राहिला पाहिजे साभिमान । निश्चळ करूनियां मन । लोक असती' इत्यादि विधानें हीं काय उत्तम पुरुषाचीं केवळ लक्षणें समजावयाचीं ? या समासांतील शब्दानुशब्दांत राजकारण भरलेलें आहे. तें ज्याला दिसत नसेल तो एक आंधळा तरी असावा अथवा तो न दिसण्याचें ढोंग तरी करीत असावा. 'तुंड हेकांड कठोर वचनी । अखंड तोले साभिमानी । न्यायनीति अंतःकरणीं । घेणार नाहीं' हें विशिष्ट व्यक्तीचें वर्णन, कां हेंहि उत्तमपुरुष-लक्षणच मानावयाचें ? अनेक गुप्त कारस्थानांपैकीं अफझलखानाच्या वधाचें हें कारस्थान नमुन्याकरितां म्हणून दासबोधांत कसें तरी दडपून बसवून, एक प्रकारें हा साक्षीपुरावा पुरून ठेवला. एवढाहि उल्लेख नसता, तर मात्र समर्थांच्या चरित्रावर प्रकाश पाडणेंच दुष्कर झालें असतें; परंतु डोळस चिकित्सक वाचकांस अशीं कांहीं स्थळें आढळतात आणि त्यावरूनच समर्थ हे राजकारणांत आकंठ बुडाले होते, असें कळून येतें. त्यांतील एकाहि स्थळाचा खुलासा समाधानकारकपणें न करतां श्री. फाटक हे 'राजकारण' म्हणजे 'चातुर्य' आणि शिव-समर्थभेटीचें वर्ष शके १५९४ हें तुणतुणें एकसारखें वाजवीत आहेत. चाफळ संस्थानाला इनाम गांवें दिलीं त्या संबंधाची सनद आद्यंत संबंधांचा स्पष्ट उल्लेख करीत असतां फाटक म्हणतात कीं, 'हें सारें वर्णन दक्षिणदिग्विजयाला लागू आहे ! !' (पृ. १४८). आजपावेतों जें जें मनीं धरिलें तें तें स्वामींच्या आशीर्वादानें सिद्धीस गेलें, असें स्वतः महाराजच

लिहीत असत, तें डावलून शके १५९४ नंतरच्या पराक्रमाला हें लागू आहे, असें भासविणें हा सत्यापलाप होय. शिवाजीमहाराजांचे पराक्रम, किल्लेकोट घेणें, दुर्ग बांधणें इत्यादि कार्यें शके १५७१ पासून किती झालीं आणि शके १५९४ नंतर किती झालीं यांचीं तुलना केल्यास, हा उल्लेख शके १५९४ नंतरच्या ६ वर्षांतल्या पराक्रमांपुरता मर्यादित आहे असें कोणीहि मानणार नाहीं. कारण त्या वेळीं महाराजांना साधुपुरुषांच्या आशीर्वादाचीहि आवश्यकता राहिली नव्हती.

### मनें फिरलीं कीं तोंडें तेव्हांच फिरतात

समर्थांनीं केलेली मारुतीची स्थापना व प्रचारांत आणलेली रामोपासना यांचा शिवाजीमहाराजांच्या स्वराज्यस्थापनेस उपयोग झाला, हें विधान खोडून काढण्यासाठीं फाटक यांनीं केलेला विपर्यास नमुनेदार आहे. शिवाजीमहाराज हे रामराज्य स्थापन करणारे आणि म्लेंछ राजे हे रावणासारखे दैत्य, अशी भावना पटवून देऊन जनतेनें म्लेंछ दैत्यांना साहाय्य न करतां शिवाजीच्या स्वराज्य-स्थापनेला साहाय्य करावें, हें समर्थांच्या शिकवणींतलें मर्म होतें. अर्थातच मारुतीसारख्या देवतेची उपासना करून मारुतीसारखे एकनिष्ठ सेवक शिवाजीला लाभावेत हाच त्यांचा पोटांतला हेतु होता. ही भावना जनतेला पटली व रूढ झाली याचें ठळक गमक म्हणजे, जेधे-बांदलांसारखे शिवाजीचे जे प्रमुख सरदार त्यांच्यासंबंधीं 'हनुमंत अंगद रघुनाथाला – जेधे-बांदल शिंवाजीला' अशी म्हण प्रचारांत आली. 'कल्पांत मांडिला मोठा म्लेंछ दैत्य बुडावया'; 'तुळजावराचे निगुणें। रामें रावण मारिला ॥ अहो, हे तुळजाभवानी। प्रसिद्ध रामवरदायिनी ॥ रामदास ध्यातो मनीं। यन्निमित्त ॥'; 'कैंपक्ष घेतला रामें आनंदवनभुवनीं' इत्यादि वचनांनीं शिवाजीचा पक्ष हा देवांचा, रामाचा पक्ष आहे, त्याची सेवा मारुतीप्रमाणें एकनिष्ठेनें करा, असा एकसारखा उपदेश चालू होता. हें तत्त्व मनांत पटल्यावर सुलतानांची चाकरी न करतां शिवाजीला जाऊन मिळावें अशी प्रेरणा होणें साहजिक आहे; परंतु फाटक असें भासवितात कीं, "एखादी चळवळ एखाद्या महापुरुषानें सुरू केली तरी, तिचीं तत्त्वें लोकांत रुजून, पसरून तिचें कार्य प्रत्यक्ष दिसूं लागण्याला बराच कालावधि लोटावा लागतो" (पृ. ५९). यांतली हातचलाखी वाचकांच्या लक्षांत आल्याशिवाय राहणार नाहीं. समर्थांची चळवळ ही कांहीं अक्रोडाच्या झाडाप्रमाणें ६० वर्षांनीं फळें देणारी नव्हती. मनांत, वृत्तींत, ध्येयांत फरक होण्याला वर्षानुवर्षांचा कालावधि लागत नाहीं. ज्याला आपण सत्पक्ष मानीत होतों तो असत्पक्ष असून असत्पक्ष हा सत्पक्ष आहे अशी खात्री पटतांच तोंडें व तलवारी फिरण्याला वेळ लागत नाहीं. याचा प्रत्यय सुभाषबाबूंनीं आणून दिलाच आहे. तथापि समर्थांच्या काळचें एक ठळक उदाहरण पाहूं. बाजी प्रभू हा पराक्रमी सरदार प्रथम चंद्रराव मोऱ्यांच्या वतीनें शिवाजीविरुद्ध लढला. मागाहून त्याला शिवाजीच्या स्वराज्यस्थापनेचें मर्म पटतांच तो शिवाजीच्या पक्षास येऊन

मिळाला आणि त्यानें पुढें पावन खिंडींत केवढा पराक्रम शिवाजीच्या रक्षणार्थ केला तें सर्वश्रुतच आहे. जनतेच्या वृत्तींत अशी उलटापालट होण्याला समर्थांच्या उपदेशांतलें एक मार्मिक वचन देखील पुरें आहे. 'म्लेंछ दुर्जन उदंड। बहुतां दिवसांचें माजलें बंड' या एका रोख-ठोक उक्तीनें जे पूर्वी म्लेंछांची सेवा करण्यांत कृतार्थता मानीत होतें, तेच ती सेवा पाप समजून स्वराज्यपक्षास येऊन मिळूं लागले. अशाच महामंत्रांनीं जनतेचीं मनें धर्मस्थापनेच्या कार्याकडे वळवून घेणें हें समर्थांच्या कार्यांतलें प्रधान अंग होतें. '**भले कुळवंत म्हणावे। तेहि वेगीं हजीर व्हावें। हजीर न होतां कष्टावें। लागेल पुढें ॥**' ही हांक तर प्रत्यक्ष रिक्रूटभरतीचीच हांक नव्हे काय? आणि असा सवाल टाकणारा उपदेशक हा राजकारणाचा प्रचारक नव्हे तर काय, केवळ अध्यात्मविद्येचा प्रचारक मानावयाचा!

### स्वधर्म व स्वराज्य यांची सांगड

श्री. फाटक लिहितात, '**समर्थांचें ध्येय मूर्तींची स्थापना व देवळांची उभारणी हें होतें; स्वराज्याची उभारणी हें नव्हतें.**' स्वराज्याच्या उभारणीशिवाय आपलीं देवळें उभीं राहतील, टिकतील, असें मानण्याइतके समर्थ भोळसट नव्हते. स्वधर्माचा कोणी कैपक्षी, कैवारी, असल्याविना स्वधर्म तग धरूं शकत नाहीं, हा तर तीनशें वर्षांचा इतिहास समर्थांच्या डोळ्यांसमोर होता. असें असतां स्वराज्यस्थापनेच्या पाठिंब्याशिवाय आपण स्वधर्माचा उत्कर्ष करूं असें समर्थ मानीत होते, असें प्रतिपादन करणें, हा आपला अजागळपणा समर्थांच्या माथीं मारण्याचा अक्षम्य गुन्हा होय. स्वधर्मस्थापना व स्वराज्यस्थापना यांचा समवायसंबंध जाणूनच, जेथें शिवाजीमहाराज स्वराज्यस्थापना करीत होते, तेथेंच स्वधर्मस्थापना शक्य आहे, हें जाणूनच समर्थ हे, गोदातटाक व परमपावन पंचवटी सोडून, कृष्णातटाकीं मसूरसारख्या कुग्रामांत येऊन राहिले. शिवाजी-महाराजांस पहिलेंच पत्र लिहितांना त्यांनीं 'या भूमंडळाचे ठायीं। धर्मरक्षी ऐसा नाहीं। महाराष्ट्रधर्म राहिला कांहीं। तुम्हांकरितां' असें जें लिहिलें त्यांत जेथें स्वराज्य आहे तेथेंच स्वधर्म राहूं शकतो, हें तत्त्व त्यांनीं स्पष्ट केलें. त्यानंतर क्षात्रधर्माचा उपदेश करतांना "देव मात्र उच्छेदिला। जित्यापरीस मृत्यु भला। आपला स्वधर्म बुडविला। ऐसें समजावें॥ मराठा तितुका मेळवावा। आपुला महाराष्ट्रधर्म वाढवावा। येविषयीं न करितां तकवा। पूर्वज हांसती॥" असें म्हणून स्वराज्यस्थापनेची व स्वधर्मरक्षणाची त्यांनीं सांगड घालून दाखविली. पुढें संभाजीमहाराजांस उपदेश करतांना "बहुत लोक मिळवावे। एक विचारें भरावे। कष्टें करोनि घसरावें। म्लेंछांवरी॥ आहे तितुकें जतन करावें। पुढें आणिक मिळवावें॥ महाराष्ट्र-राज्य करावें। जिकडे तिकडे॥" या शब्दांत महाराष्ट्र-राज्यप्रसार करण्याचा आदेश दिला आहे. महाराष्ट्रधर्म आणि महाराष्ट्र-

राज्य यांची समर्थांच्या मनांत अशी पक्की सांगड बसली होती कीं, धर्मस्थापनेचा प्रयत्न आणि स्वराज्यस्थापनेचा प्रयत्न यांत ते भिन्नता मानीत नव्हते. अर्थातच 'स्वराज्यस्थापना' हें समर्थांचें ध्येय नव्हतें, असें मानण्यांत समर्थकालीन परिस्थितीचें अज्ञान आणि समर्थांच्या मनोवृत्तीचें अज्ञान व्यक्त होतें.

### राजकारणाचे उल्लेख किती पाहिजेत ?

स्वधर्मरक्षण व स्वराज्यस्थापन या दोहोंची ताटातूट होऊंच शकत नाहीं, असें समर्थांचें ठाम मत होतें; हें लक्षांत आल्यावर 'हृदयस्थ नारायणा'नें धर्मस्थापनेची प्रेरणा ज्यांना केली, ते समर्थ धर्मस्थापनेला उपोद्बलक अशा स्वराज्यस्थापनेच्या कार्यांत लक्ष घालून त्या कार्याच्या सिद्धीसाठीं पार्श्वभूमि तयार करण्याच्या आणि प्रत्यक्ष चाललेल्या स्वराज्यस्थापनेविषयीं जनतेची मनोभूमिका अनुकूल करून घेण्याच्या प्रयत्नाला लागले, यांत नवल काय ? शिवाजीमहाराजांचें 'उदंड राजकारण तटलें' असतां शिवाजीमहाराजांची भेट घेण्यासाठीं आतुरतेनें व तळमळीनें समर्थ धांव घेतात, एवढी एक घटना देखील समर्थांचा राजकारणाशीं किती निकट संबंध होता, तें दर्शविण्यास पुरेशी आहे. दासबोधांत २७ ठिकाणीं राजकारण हा शब्द आला, इतका तो शब्द समर्थांच्या तोंडीं बसून गेला होता. दासबोधाशिवाय राजधर्म, क्षात्रधर्म, सेवकधर्म, सावधानता, आणि देवीचीं स्तोत्रें हीं प्रकरणें तर केवळ राजकारणमयच आहेत. त्याशिवाय दास. द. १८ स. ६ हा समग्र समास आणि संभाजीस पाठविलेलें पत्र हा प्रत्यक्ष धगधगीत राजकारणाचा गाभाच आहे. श्रीसमर्थ हे शिवाजीमहाराजांचे केवळ मोक्षगुरुच असते, तर संभाजीसारख्या उग्रप्रकृति, तापट समशेरबहाद्दरानें समर्थांची भेटहि घेण्याचें मनांत आणलें नसतें, मग त्यांच्याजवळ राहणें, त्यांचा उपदेश ऐकणें आणि त्यांच्या उपदेशानुसार मंत्रिवर्गावरचा क्रोध आवरून त्यांस परत आपल्या मर्जींत घेणें, या गोष्टी त्याच्या हातून केव्हांच घडल्या नसत्या. संभाजीला धाडलेल्या त्या सुप्रसिद्ध पत्रांत समर्थ शिवरायाचा जो उल्लेख करितात, त्यावरूनहि समर्थ व शिवाजी यांचा संबंध किती जिव्हाळ्याचा (सलगीचा) होता तें व्यक्त होतें.

हें सगळे प्रसंग समर्थांच्या हयातीच्या अखेरचे आहेत असा जर कोणी यावर आक्षेप काढील, तर त्या आक्षेपाचें निरसन समर्थांच्या प्रारंभींच्या स्फुट प्रकरणावरून होतें. त्याकरितां पुढील उतारे पाहा —

तुझेनि सर्व बोलणें । तुझेनि सर्व चालणें ॥
तुझेनि योगधारणें । तुझेनि राजकारणें ॥
तुझीच चालते सत्ता । बुझेल तोचि धूरता ॥
तुझी करून आस तो । फिरे उदास दास तो ॥ (देवीस्तोत्र)
शक्तीनें मिळतीं राज्यें । युक्तीनें यत्न होतसे ॥
शक्ति युक्ति जये ठायीं । तेथें श्रीमंत धांवती ॥

युक्तीनें चालति सेना । युक्तीनें युक्ति वाढवी ॥
संकटीं आपणा रक्षी । रक्षी सेना परोपरी ॥
लोकांसी राखणें राजी । तें राज्य प्रबळे बळें ॥
अंतरीं कल्पना केली । एकांतीं बोलिलों बहु ॥
रक्षिता देव देवांचा । त्याचा उच्छाव इच्छिला ॥
इच्छा पूर्ण करी माता । वाढवी बहुतां परी ॥
बोलणें हें प्रचीतीचें । अन्यथा वाउगे नव्हे ॥ ( देवीस्तोत्र )
एकची मागणें आतां । द्यावें तें मजकारणें ॥
तूझा तूं वाढवी राजा । शीघ्र आम्हांचि देखतां ॥
दुष्ट संहारिले मागें । ऐसे उदंड ऐकतों ॥
परंतु रोकडे कांहीं । मूळ सामर्थ्य दाखवी ॥
भक्तासी वाढवी वेगीं । इच्छा पूर्ण परोपरी ॥ ( देवीस्तोत्र )
लोक हे राखतां राजी । सर्व राजीच होतसे ॥
अंतरीं चुकतां तेथें । सर्व भाजीच होतसे ॥
प्रसंग हा कठीण हो । बहुत पावले मोहो ॥
परंतु यत्न पाहाती । सुखेंचि तेचि राहती ॥
प्रसंगें वर्ततां आलें । येथातथ्यचि सूचलें ॥
मनुष्य राखिले राजी । तो प्राणी शाहाणा बरा ॥
जनाचें मन तो राखे । युक्तीनें काम चालवी ॥
युक्ती तें सांगतां येना । रिझतां झिजतां कळे ॥
अचूक यत्न तो देवो । चुकणें दैत्य जाणिजे ॥
न्याय तो देव जाणावा । अन्याय राक्षसी क्रिया ॥

असे शेंकडो उतारे देतां येतील कीं ज्यांतून आरंभापासून समर्थांनीं राजकारणाचा, राजनीतीचा, क्षात्रधर्माचा, समाजधर्माचा, सेवकधर्माचा जनतेला उपदेश केला. रामाजवळ समर्थ मागणें कोणतें मागत असत तेवढें जरी पाहिलें, तरी त्यावरूनहि त्यांची राजकारणाच्या उपदेशाची कळकळ व्यक्त होते.

प्रसंग वेळ तर्केना । सुचेना दीर्घ सूचना ॥
मैत्रिकी राखितां येना । बुद्धि दे रघुनायका ॥
सोडवील्या देवकोटी । भूभार फेडिला बळें ॥
भक्तांसि आश्रयो मोठा । बुद्धि दे रघुनायका ॥
उपाधी गुणें लागतो पक्ष घेणें । उपाधी गुणें सत्य सोडून देणें ॥
उपाधी गुणें वीषयीं जीव रंगे । उदासीन हे वृत्ति कोठें न लागे ॥
उदास दास राहतो । प्रतीत सत्य पाहतो ॥
कळेल त्या सुखें कळो । वळेल त्या सुखें वळो ॥

बुद्धि देतो सेवकाला । बुद्धीनें पार पाडवी ॥
अनंत गुण देवाचे । पाहतां पार नाढळे ॥
सोडवी जो देव तोचि देवराव । येर सर्व नांव नाथिलेंचि ॥
प्रतापाचें नांव एका राघवासी । रामी रामदासी धन्य बोला ॥
रामदास म्हणे नका करूं शीण । रामें भक्त कोण उपेक्षीले ॥

## याला पुराव्याची जरुरीच नाहीं

ज्यांना 'निशिदिनीं जनचिंता' लागली होती आणि 'कैसीं ब्राह्मण्यें वांचतील । कोणीकडे जातील हे' हीच विवंचना ज्यांनीं जन्मादारभ्य केली, ते रामदास जनोद्धारासाठीं कृष्णातीरावर येऊन राहिल्यानंतर ३८ वर्षें श्रीशिवाजी राजांची भेट घेत नाहींत, आणि स्वराज्यसंस्थापक शिवाजीमहाराजहि आपल्या प्रांतांत येऊन राहिलेल्या एका संघटनाचतुर महंताची ४० वर्षांत वास्तपुस्तहि करीत नाहींत या दोन्ही कल्पना असंभवनीयच नव्हत काय? अर्थापत्तीनें सिद्ध होणाऱ्या या घटनेला स्वतंत्र पुराव्याची जरुरी तरी काय?

पुराव्यावांचूनहि जी गोष्ट सामान्य तर्कानें सिद्धवत् ठरते, तिला पुरावा दाखवा म्हणून आग्रह धरणें हा संशयी स्वभावाचा अतिरेक होय. असा संशयच घेऊं लागल्यास कालिदासानें 'रघुवंश' हें महाकाव्य लिहिलें याला तरी पुरावा कोण देऊं शकेल? आणि हाच आग्रह कायम ठेवल्यास प्राचीन इतिहासांतल्या शेंकडा किती तरी घटना घडल्याच नाहींत असें म्हणावें लागेल. यास्तव प्रत्यक्ष पुराव्याच्या अभावीं देखील शिवाजी व समर्थ यांची भेट समर्थ चाफळखोऱ्यांत येऊन राहिल्यापासून दोन-चार वर्षांच्या आंतच झाली असली पाहिजे, असें अनुमानितां येईल; पण येथें किती तरी चरित्रें व बखरी यांचा आधार असतांना शिव-समर्थ-भेट शके १५९४ च्या पूर्वीं झालीच नाहीं अशी बतावणी करणें हा तर्कशास्त्राचा अपमान होय. ज्या ग्रंथांत शिव-समर्थभेट शके १५७१ त झाली असें प्रत्यक्ष लिहिलें गेलें ते ग्रंथ अप्रमाण मानणें आणि इतर कांहीं ग्रंथांत त्या वेळच्या भेटीचा उल्लेख नाहीं, एवढ्यावरून अनुल्लेखाधिष्ठित अनुपलब्धि हें प्रमाण शिरोधार्य मानून शके १५७१ त भेट झालीच नाहीं, असा सिद्धान्त ठोकून देणें हा तर्कशास्त्राचा विपर्यास होय. सभासदाची बखर बरीच विश्वसनीय खरी; पण तेवढ्यावरून तींत उल्लेख नसलेल्या गोष्टी घडल्याच नाहींत असें अनुमान काढणें हें अशास्त्रीय होय. 'शिवभारत' हा ग्रंथहि तसाच प्रमाणभूत खरा; परंतु त्यांत ज्यांचा उल्लेख नाहीं अशा किती तरी गोष्टी सत्यघटना म्हणून सर्वमान्य आहेत. एकच उदाहरण देऊं. पावनखिंडीच्या युद्धांत बाजी प्रभूनें आपले प्राण देऊन शिवाजीचे प्राण वांचविले. बाजी प्रभूच्या या पराक्रमाचा उल्लेख शिवभारतांत नाहीं यावरून पावनखिंडीचें युद्धच झालें नाहीं असें मानावयाचें काय?

## अनुल्लेखानें सिद्ध काय होणार ?

बरें; ज्या ग्रंथातून शिव-समर्थभेट शके १५७१ मध्यें झाली असें तपशीलवार सांगितलें त्यांची ही तिथि-मिति स्वकपोलकल्पित आहे, हें कशावरून ठरतें ? शकावल्या व शिवाजीवरील कांहीं चरित्रें यांनीं ही तिथि-मिति दिली नसेल; पण त्या शकावल्या व चरित्रें तपशील कितपत देतात याची चर्चा शिवचरित्र-प्रदीपांतून पाहावी. सभासदी बखरींत तर शिवराज्याभिषेक व शिवाजीचा मृत्युकाल या दोन घटनांशिवाय इतर कोणत्याहि घटनेचा काल कथन केलेला नाहीं. इतर प्रसंगांचे काल दिलेले आहेत त्यांत शकावल्यांत परस्परविरोध किती तरी आहे. असल्या शकावल्यांत उल्लेख नाहीं म्हणून शके १५७१ ची भेट ही जर मानावयाची नाहीं तर शके १५९४ मधली भेट तरी खरी कां मानावयाची ? सभासदाच्या बखरींत शके १५९४ मधल्या भेटीचाहि उल्लेख नाहीं म्हणून त्या वेळींहि भेट झाली नाहीं असेंच म्हणावें लागेल ! अनुल्लेखाला अवास्तव महत्त्व देण्याचा हा प्रकार झाला. ज्या चरित्रांतून वा बखरींतून उल्लेख आहे, तेथें कालानुक्रम साधला नाहीं, साहाय्य केलें पण तें कसें केलें याचें स्पष्टीकरण नाहीं, राजगडास गेले असें लिहिण्याच्या-ऐवजीं रायगडास गेले असें लिहिलें, असल्या फुसक्या सबबी सांगून शिव-समर्थ-भेटीवर जितका पडदा पाडतां येईल तितका पडदा पाडला गेला; पण असल्या खटाटोपानें शिव-समर्थभेट शके १५७१ त वैशाख शु. ९ ला झाली हा अनेक बखरींतील व वाकेनिसी टिपणांतील उल्लेख खोडला जाणें शक्य नाहीं.

## तान् प्रति नैष यत्नः

स्वधर्मरक्षण व स्वराज्यस्थापना हीं दोन कार्यें भिन्न नसून परस्परांशीं निगडित आहेत, हें ज्यांना पटलें त्यांना समर्थ व शिवाजी यांचा संबंधहि आरंभापासून असाच निगडित आहे हें मान्य होईल. धर्मरक्षण करील असा अवतारी पुरुष जन्मास आला आहे व त्याची भेट घेण्यासाठीं कृष्णातीराला जाण्याचा रामप्रभूचा आदेश आहे, अशी ज्यांची दृढभावना ते समर्थ त्या आदेशानुसार कृष्णातीरीं येतात, मठ स्थापन करतात, 'अंतरीं कल्पना केली, एकान्तीं बोलिलों बहु' यांत निर्दिष्ट केल्याप्रमाणें जगदुद्धारासाठीं रामोपासना सुरू करतात, त्या रामोपासनेची मुहूर्तमेढ शहाजीच्या देशमुखीच्या गांवींच रोवतात, तरी देखील शिवाजीमहाराजांची ३८ वर्षें भेट घेत नाहींत; शिवाजीमहाराजहि आपल्या स्वराज्यस्थापनेचा मनोरथ पूर्ण व्हावा, जो जो उद्योग आरंभावा तो तो सिद्धीस जावा, या हेतूनें अनेक साधु-संतांची भेट घेतात, परंतु आपल्या कार्यक्षेत्राच्या सान्निध्यांत 'महंतें महंत करावे । देशोदेशीं विखरावे ' अशा स्वरूपाची प्रचंड संघटना करणाऱ्या समर्थांची ४० वर्षांत भेट घेत नाहींत, हें जर सत्य मानावयाचें असेल तर त्यांनीं खुशाल तसें मानावें. 'तान् प्रति नैष यत्नः'

समर्थांचा अवतारच जर शिवाजीमहाराजांस साहाय्य करून स्वराज्याच्या

छायेखालीं स्वधर्मरक्षण करणें यासाठीं होता, तर तें अवतारकार्य त्यांनीं आपल्या अवतारसमाप्तीच्या वेळीं आरंभिलें, असें मानणें म्हणजे आपला अप्रयोजकपणा समर्थांच्या माथीं मारणें होय ! 'आधीं केलें मग सांगितलें' ही समर्थांची प्रतिज्ञा त्यांनीं स्वतःच खोटी पाडली, हें मानण्याची आमची तयारी नाहीं. आमच्या मतें पुढील घटना अगदीं नैसर्गिक व स्वभावसिद्ध आहेत आणि त्यांतील बहुतेकांना बखरी व चरित्रें यांचा आधार आहे.

## नैसर्गिक व स्वभावसिद्ध घटना

१. शिवनामा स्वराज्यसंस्थापक निर्माण झाला आहे. त्याच्या साहाय्यार्थ कृष्णातीरीं जावें असा साक्षात्कार समर्थांना दोन वेळां झाला.

२. या हृदयस्थ नारायणाच्या प्रेरणेनेंच समर्थ कृष्णातीराला गेले.

३. स्वराज्यस्थापनेला अनुकूल अशी धर्मजागृति करण्यासाठीं, दीर्घ विचार करून आणि एकान्तांत वाटाघाटी करून समर्थांनीं देवांना बंधमुक्त करणाऱ्या रामाची उपासना आणि त्याचा उत्सव करण्याचें योजिलें.

४. शहाजीच्या देशमुखीच्या गांवीं ( मसूर येथें ) त्यांनीं पहिला उत्सव केला.

५. हा उत्सव सुरू करतांना तो उत्सव केवळ धार्मिक आहे असाच त्याचा थाट ठेवण्यांत आला होता. त्यामुळें मुसलमानांच्या राज्यांतले अधिकारी सुद्धां उत्सवांत सामील होऊं शकत.

६. पहिल्याच उत्सवांत श्रीशिवाजीमहाराज हे उपस्थित होते हें दासविश्रामधाम या ग्रंथावरून ( दा. वि. धाम, वर्ग ७, पृ. २०६ ) दिसून येतें.

७. या भेटीनंतर चार वर्षें समर्थांचें 'महंतें महंत करावे । देशोदेशीं विखरावे' हें कार्य आणि शिवाजीमहाराजांचें मावळे काबीज करण्याचें आणि गड हस्तगत करण्याचें कार्य अव्याहत चाललें होतें.

८. शके १५७१ मध्यें शहाजीराजांना अटक करून विजापुरीं बंदींत ठेवलें त्या वेळीं शिवाजीच्या राज्य-संपादण्याच्या मार्गांत मोठें विघ्न आलें. 'उदंड राजकारण तटलें' तेव्हां समर्थांनीं शिवाजीला पत्र लिहून, त्याचें विस्मरण दूर घालवून, त्याची पूर्वस्मृति जागृत केली आणि शिवाजीनें वैशाख शु. ९ ला समर्थांची भेट घेऊन अनुग्रह संपादन केला. त्यानंतर सव्वा महिन्यांत शहाजीची मुक्तता झाली.

९. शहाजीची मुक्तता झाली तरी शिवाजीचे हात बांधल्यासारखे झाले होते. त्यामुळें वैतागानें शिवाजीनें आपलें राज्य समर्थांना अर्पण केल्याची चिठ्ठी समर्थांच्या झोळींत टाकली. त्यावरून समर्थांनीं कर्नाटकांत जाऊन शहाजीची भेट घेऊन, शिवाजीमहाराजांना वचनबद्धतेंतून सोडविलें.

१०. अफझलखानाच्या वधासंबंधानें समर्थांनीं दिलेला संदेश दासबोध दशक १८ समास ६ यांत समाविष्ट असून तो सर्वश्रुत आहे.

११. शके १५८५ मध्यें शहाजी राजे शिवाजीला भेटण्यास पुणें प्रांतीं आले असतां त्यांनीं समर्थांचीहि भेट घेतल्याचा उल्लेख ग्रंथांत आहे.

१२. आग्र्याहून अटकेंतून सुटून शिवाजीमहाराज अतिदीर्घ प्रवास अपरिचित प्रांतांतून करून त्वरित सुखरूप परत आले; या कामीं समर्थांच्या ठिकठिकाणच्या मठांची व त्या मठांतील शिष्यांची मदत झाली असली पाहिजे, हें अर्थापत्तिप्रमाणानें सिद्ध होतें. कारण शिवाजीबरोबर आग्र्याला गेलेल्या व त्याजबरोबर बैरागी वेषांत असणाऱ्या शिवाजीच्या कोणाहि संवगड्यास हा प्रवासाचा मार्ग परिचित नव्हता व विविध भाषाहि अवगत नव्हत्या.

१३. आग्र्याहून परत आल्यानंतर कांहीं दिवसांनीं शिवाजीनें समर्थांची भेट घेऊन आपली कृतज्ञता व्यक्त केली.

१४. शके १५९३ मध्यें मोंगलाशीं परत बिघाड झाल्यानंतर शिवाजीनें मोंगलाकडून सिंहगड, पुरंदर इत्यादि गड परत घेण्याचा सपाटा चालविला. त्यांत त्यांस बरेंच यश प्राप्त झाल्यावर शिवाजीच्या मनांत राज्याभिषेक करून घेण्याची कल्पना उद्भवली व समर्थांनाहि ती पटली.

१५. अशा रीतीनें स्वधर्मरक्षणाची व स्वराज्यस्थापनेची कल्पना मूर्तस्वरूप धारण करूं लागल्यानंतर शिवसमर्थ भेटींत गुप्तता राखण्याची आवश्यकता भासेनाशी झाली आणि उघड पत्रव्यवहार होऊन भेटी होऊं लागल्या.

१६. या उघड भेटींतली पहिली भेट शके १५९४ त चैत्र वद्यपक्षांत पारगांवीं किंवा जवळपास कोठें तरी घडली व दिवाकरांचें विवाद्य पत्र या भेटीसंबंधाचेंच होय. या भेटीनंतरचा पुष्कळसा पत्रव्यवहार सांप्रदायिक कागदपत्रांत आढळतो; पण तत्पूर्वींचा आढळत नाहीं, याचें कारण पूर्वींची गुप्तता होय. हा गुप्त व्यवहारहि 'अलाहिदा' लिहून ठेवला होता, असें वाकेनिसी टिपणांवरून दिसून येतें; परंतु अलाहिदा लिहून ठेवलेला हा पत्रव्यवहार पुढील धामधुमींत नष्ट झाला असावा व त्यामुळेंच वावदुकांना वाद करण्याला संधि सांपडत आहे.

१७. राज्याभिषेकापूर्वीं शिवरायाची धार्मिक पात्रता निर्विवाद व्यक्त करण्याकरितांच शके १५९४ च्या श्रावण महिन्यांत शिवाजीला परमार्थाचा उपदेश करण्यांत आला. पूर्वीं अनुग्रह झाला होता; पण अनुग्रह कोणालाहि देतां येतो; त्यामुळें विशिष्ट पात्रता सिद्ध होत नाहीं. ती सिद्ध करण्यासाठीं परमार्थाचा उपदेश करण्यांत आला.

१८. राज्याभिषेकाच्या पूर्वीं व अभिषेकानंतर शिवाजीमहाराज समर्थांना भेटून गेले.

१९. राज्याभिषेकानंतर चाफळ संस्थानाला जी इनामाची सनद देण्यांत आली त्या सनदेंत अगदीं आरंभापासून समर्थांच्या आशीर्वादानें आपले सर्व मनोरथ कसे पूर्ण होत आले ते शिवाजीनें स्वाक्षरीनें मान्य केलें असल्यामुळें उभयतांची भेट अगदीं प्रारंभीं झाली असली पाहिजे असें अनुमान प्रत्येक वाक्यांतून निघतें. हे उल्लेख

कर्नाटकाच्या मोहिमेला अनुलक्षून आहेत असें म्हणणें हें वितंडवादाचें लक्षण होय.

२०. संभाजी बिथरून मोंगलाकडे गेला असतां त्यास परत आणवून समर्थांच्या सान्निध्यांत ठेवलें होतें, यावरून शिवाजीमहाराज हे समर्थांना नुसते मोक्षगुरुच मानीत नव्हते हें सिद्ध होतें.

२१. शिवाजीमहाराजांच्या मृत्यूनंतर संभाजीमहाराजांना जें उपदेशपर पत्र पाठविण्यांत आलें, त्यांत समर्थांच्या आयुष्यांतील एकंदर राजकारणाचें सूत्ररूपानें वर्णन आहे; आणि दासबोधांतील विविध समास आणि स्फुट प्रकरणांतील बोधवचनें हीं समर्थांच्या राजकारणावर भाष्यरूप आहेत. असें असून समर्थांनीं राजकारण कांहींच केलें नाहीं असें म्हणणारे वावदूक भेटावेत यांत कांहीं नवल नाहीं. प्रत्यक्ष रणांगणावर अर्जुनाला ‘ ऊठ, शत्रूंचा निःपात कर ’, असें सांगणारी गीता ही जर निवृत्तिपर असल्याचा दावा सांगणारे आढळतात, तर समर्थांच्या गुप्त व्यवहारांत आणि अध्यात्मांत गुरफटलेल्या राजकारणसंदेशांत प्रत्यक्ष राजकारण नाहीं असें म्हणणारे आक्षेपक पुढें यावेत यांत कांहीं नवल नाहीं.

असो. समर्थांनीं राजकारण केलें नाहीं, असें म्हणणारे आक्षेपक राजकारणाचा व्याख्याच इतकी आकुंचित करतात कीं, लोकमान्य टिळक, शिवरामपंत परांजप प्रभृतींनीं देखील क्रान्तिकारक राजकारण केलें नाहीं, असेंच त्या सकुंचित अर्थानें म्हणावें लागेल. कारण या उभयतांनींहि ‘अभिनवभारत’ संस्था स्थापिली नाहीं अथवा ते त्या संस्थेचे सभासद झाले नाहींत; परंतु ‘अभिनवभारत’ संस्थेंत शिरण्याची स्फूर्ति आम्हांस **‘केसरी’** व **‘काळ’** या पत्रांच्या शिकवणींतून मिळाली, असें अनेकांनीं सांगितलें आहे. तेव्हां राजकारणांत भाग घेण्याची स्फूर्ति ज्यांच्याकडून मिळाली त्यांनीं कांहींच राजकारण केलें नाहीं असें म्हणावयाचें असल्यास समर्थांनींहि राजकारण केलें नाहीं असें खुशाल म्हणावें.

समर्थांच्या शिष्यगणांत शिवाजीमहाराज, रामचंद्र नीलकंठ अमात्य, अण्णाजी दत्तो, बाळाजी आवजी चिटणीस यांसारखी धुरंधर मुत्सद्दी मंडळी होती. यांतले रामचंद्रपंत अमात्य तर लहानपणापासून समर्थांच्या सान्निध्यांतच वाढले. त्यांनींच पुढें सुप्रसिद्ध ‘अमात्यनीति’ हा ग्रंथ लिहिला. समर्थांची शिकवण जर केवळ अध्यात्मपर असती तर रामचंद्रपंतासारखे चंडोल मुत्सद्दी समर्थांच्या सान्निध्यांत कसे तयार झाले असते ? संघटनाचातुर्य हें राजकारणाचें एक प्रमुख अंग आहे. त्यांत समर्थांनीं नैपुण्य दाखवून आपल्या देशव्यापी संघटनेनें सर्वांस चकित करून सोडलें; तरी पण आक्षेपक म्हणतातच कीं, समर्थांनीं राजकारण केलें नाहीं ! यावरून वाचकांनींच काय तो बोध घ्यावा.

सारांश, श्रीयुत फाटक यांनीं हें ‘समर्थचरित्र’ केवळ पूर्वग्रहदूषित होऊन लिहिलें आहे. एकनाथचरित्राच्या वेळचा चष्मा बदलून उलटा चष्मा लावल्यामुळें, सर्वत्र विपर्यस्त मतेंच यांत आढळतात. विधायक स्वरूपाचा मजकूर यांत अत्यल्पच आढळतो.

# सिद्धावस्था व व्यवहार प्रकरण पुनः एकदां वाचा : ३

[ लो. टिळकांच्या गीतारहस्याची सहावी आवृत्ति लोकमान्यांचे पौत्र श्री. **जयंतराव टिळक** यांनीं प्रसिद्ध केली. त्या आवृत्तीच्या परीक्षणाच्या प्रसंगानें पुढील तीन-चार लेख लिहिलेले आहेत. वास्तविक पाहतां गीतारहस्याचें परीक्षण यांत नाहींच. पण त्या निमित्तानें गीतारहस्यावर जे कांहीं आक्षेप आधुनिक विद्वानांकडून घेतले जातात त्या आक्षेपांचें खंडन या लेखांतून आहे. सत्यासत्य-विवेक, हिंसा-अहिंसाविवेक इत्यादि मुद्द्यासंबंधानें गांधीजी व टिळक यांच्या लेखांची तुलना करून लोकमान्यांनीं 'साधनशुचिते'वर कटाक्ष ठेवला नाहीं, या बाबतींत गांधीजींनीं टिळकांच्या किंबहुना प्रत्यक्ष गीतेच्याहि पुढची मजल गांठली असें प्रतिपादन गांधीभक्त करीत असतात. त्या आक्षेपांना पुढील तीन लेखांतून उत्तर असून तें उत्तर गीतारहस्याच्या आधारानेंच दिलें आहे. आक्षेपकांच्या शंका गृहीत धरून टिळकांनीं बहुतेक शंकांचें निरसन रहस्यांतच केलें आहे. याकरितांच आक्षेपकांनीं वाद उपस्थित करण्यापूर्वी गीतारहस्यांतील '**कर्माकर्म विचार**' आणि **सिद्धावस्था व व्यवहार**' हीं दोन प्रकरणें पुनश्च वाचावीं असें म्हटलें आहे. ]

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनीं मंडाले येथील कारावासांत लिहिलेल्या आणि तेथून सुटून आल्यावर १९१५ सालीं प्रथम प्रसिद्ध केलेल्या सुविख्यात ग्रंथाची ही सहावी आवृत्ति आहे. मराठींतल्या पांच आवृत्त्या खपून आतां सहावी आवृत्ति निघाली आहे. इंग्रजी, गुजराथी, कानडी, तेलगू आणि इतर भाषांतूनहि या ग्रंथाचीं भाषांतरें होऊन त्यांच्याहि हजारों प्रति खपल्या आहेत. यावरूनच या ग्रंथाचें लोकोत्तरत्व व लोकप्रियत्व सिद्ध होत आहे. अर्थातच लोकमान्यांसारख्या अद्वितीय पंडितानें लिहिलेल्या ग्रंथाचें परीक्षण करण्याची गरजहि नाहीं आणि तशी पात्रताहि कोणास नाहीं. तथापि सांप्रत कांहीं अवांतरवाद उत्पन्न झाल्यामुळें त्या संबंधांत कांहीं लिहिणें क्रमप्राप्त आहे.

### जुने टीकाकार गेले, नवे आले

JAN 199

गीतारहस्य प्रथम प्रसिद्ध झालें, त्या वेळीं त्यावर आचार्यानुयायी संन्यास-पक्षीय टीकाकारांनीं झोड उठविली आणि गीतारहस्याचें वाभाडे काढण्याचा चंग बांधला. या वादाचा एका अर्थानें सुपरिणामच झाला. कारण या वादामुळें गीता-रहस्याकडे जनतेची दृष्टि अधिकच खिळून राहिली आणि लोकमान्यांनीं गीतेचें

( केसरी, दि. १६ मे १९५० )

जें कर्मयोगपर रहस्य प्रकट केलें तेंच गीतेचें सारसर्वस्व होय, अशी वाचकांची स्वतंत्र अभ्यासानें खात्री पटत चालली. संन्यासपक्षीयांच्या प्रतिपादनांतील कच्चे-पणा सुस्पष्ट झाला आणि गीता म्हणजे कर्मयोग हें समीकरण इतकें सुप्रतिष्ठित झालें कीं, केवळ आचार्यसांप्रदायिक पक्षपाती लेखक वगळून, त्रयस्थांच्या स्वतंत्र भूमिकेवरून, जे जे ग्रंथ अलीकडे पंचवीस वर्षांत लिहिले गेले त्यांत संन्यासपक्षी-यांच्या मतास थारा मिळालेला क्वचितच आढळेल.

संन्यासपंथी प्रतिपक्षी निराश होऊन वादविन्मुख झाले खरे, पण आधुनिक काळांत अहिंसावादाच्या नांवाखालीं एक नवाच पक्ष उदयोन्मुख होऊन त्यानें गीतरहस्यावर आडवळणानें हल्ला चढविण्यास प्रारंभ केला आहे. संन्यासमार्गीय टीकाकार गीतेंतील श्लोकांच्या अर्थावर बोट ठेवून गीतेंत कर्मयोग नव्हे, तर कर्म-संन्यास प्रतिपादिला आहे, असें भासवीत असत. अर्थातच गीतेंतील श्लोकांचाच सरळ व संदर्भानुसारी अर्थ करून आणि उपक्रमोपसंहारादि कसोट्या लावून दाखवून कर्मयोगाचा पक्ष सिद्ध करणें सुलभ होतें व त्यामुळें ते आक्षेपक निरुत्तर होत. परंतु हल्लींचे जे नवे आक्षेपक आहेत त्यांचा मार्गच आडवळणाचा आणि अनिश्चित स्वरूपाचा असल्यानें त्यांचें तोंड बंद करणें दुरापास्त आहे. तथापि लोकमान्य टिळकांनीं जें मत प्रतिपादिलें नाहीं, अथवा जें पूर्वपक्ष म्हणून मांडून ज्याचें लोकमान्य टिळकांनींच खंडन केलें, तेंच मत टिळकांच्या माथीं लादून जेव्हां हे वावदूक गैरसमज पसरवितात, तेव्हां टिळकांचें खरें मत वाचकांच्या समोर मांडून तो गैरसमज दूर करणें हें प्राप्तकर्तव्यच होऊन बसतें.

## गांधींचा टिळकांशीं वाद

या वादाला प्रारंभ प्रथम गांधीजींनीं केला आणि उच्च ध्येयसिद्धीसाठीं अशुद्ध मार्ग स्वीकारला, तरी 'The end justifies the means' या न्यायानें तें क्षम्य आहे असें टिळकांचें मत असून, तें योग्य नाहीं असें लिहिलें. टिळकांनीं त्यावर उत्तर दिलें कीं, जेसुइट पंथाचें हें तत्त्व आपणांस पसंत नसून, निरपवाद अहिंसा व निरपवाद सत्य या अपूर्ण जगतांत शक्य नसून, साधुसंतांचा तो मार्ग असला तरी व्यवहारांत व राजकारणांत अहिंसा व सत्य यांना मुरड घालावी लागतें, असें मी प्रतिपादिलें आहे. त्या वेळीं हा वाद तेवढ्यावरच थांबला. आतां गांधीजींचे अंधभक्त पुढें येऊन, टिळकांनीं लोकसंग्रहाचें उच्च ध्येय प्रतिपादिलें खरें, पण त्यांत साधनशुद्धतेकडे कटाक्ष ठेवला नाहीं, त्यामुळें उच्च ध्येयासाठीं वाटेल त्या मार्गाचा अवलंब करावा असा निष्कर्ष निघतो; गांधीजींनीं साधन-शुचितेवर जोर देऊन, गीतारहस्यापुढें एक पाऊल टाकलें, असें ते सांगत सुटले आहेत! या मताचे एक पुरस्कर्ते आचार्य भागवत हे असून त्यांनीं यावर अनेक ठिकाणीं व्याख्यानें देऊन टिळकांच्या अनुयायांवरहि शिंतोडे उडविले आहेत! मारत्याचा हात धरवतो, पण बोलल्याचें तोंड धरवत नाहीं, असें

म्हणतात. त्याच न्यायानें आम्ही आचार्य भागवतांच्या भरकटण्याला आळा घालूं शकत नाहीं. तथापि जें मत टिळकांनीं प्रतिपादन केलें नाहीं, तें जेव्हां टिळकांच्या माथीं मारलें जातें तेव्हां श्रोत्यांना व वाचकांना आम्ही असें सांगूं इच्छितों कीं, गीतारहस्याची सहावी आवृत्ति नुकतीच प्रसिद्ध झाली आहे; त्या ग्रंथांतील '**सिद्धावस्था व व्यवहार**' हें मुख्य प्रकरण स्वतः वाचून पाहा आणि त्यावरून ठरवा कीं, टिळकांनीं कार्याच्या सिद्धीसाठीं अशुद्ध मार्गाचा अवलंब करावयास शिकविलें, हा आक्षेप खरा आहे का तो टिळकांच्या मताचा केवळ विपर्यास आहे.

### स्वतः टिळकांनींच दिलेलें उत्तर

गीतारहस्य पृ. ३५५ ( आवृत्ति सहावी ) वर ते लिहितात, "विधिनियमापलीकडचा, म्हणजे वाटेल तें खोटेंनाटें करणारा, असाच आपल्या मनचा तर्कटी अर्थ करून 'स्थितप्रज्ञाला सर्व दुष्कृत्यें करण्याची मुभा आहे' असा वरील सिद्धान्ताचा कांहीं जण विपर्यास करीत असतात." ( आचार्य भागवत हे याच कोटींत पडतात ); पण "पूर्णावस्थेस पोंचलेल्या सत्पुरुषाची गोष्ट निराळी असून त्याचें एखादें कृत्य लौकिकदृष्ट्या जरी विपरीत दिसलें, तरी त्यांतील बीज निर्दोषच असलें पाहिजे." त्यानंतर पुढें पृ. ३६६ वर ते लिहितात, "नीतिमत्ता ही नुसत्या जडकर्मांत नसून, ती सर्वस्वीं कर्त्याच्या बुद्धीवर अवलंबून असते, असा गीतेचा सिद्धान्त आहे; परंतु या आध्यात्मिक सिद्धान्तांतलें खरें तत्त्व न ओळखतां, जर कोणी वाटेल तें करूं लागेल तर तो पुरुष राक्षसी किंवा तामसी होय, असें गीतेंतच ( अ. १८–२५ ) म्हटलें आहे." म्हणजे स्वतः टिळक गीतारहस्यांत ज्याला राक्षसी किंवा तामसी म्हणतात, असा पुरुष लोकमान्य टिळकांच्या मतें सिद्धावस्थेला पोंचलेला असें आचार्य भागवत भासवितात !

त्यापुढें पृ. ३८३ वर लो. टिळक लिहितात, "'**आत्मार्थे पृथिवीं त्यजेत्**' या चरणाचा कांहीं मतलबी किंवा शास्त्रानभिज्ञ लोक, कधीं कधीं विपरीत म्हणजे स्वार्थपर अर्थ करीत असतात, म्हणून आत्मरक्षणाचें हें तत्त्व अप्पलपोटेपणाचें नव्हे, असें येथें सांगितलें पाहिजे."

पृ. ३८७ "म्हणून बाह्य कर्माचा सारासार विचार, या व्यापारी क्रियेंत सद्वर्तनाचें खरें बीज नसून, साम्यबुद्धिरूप 'परमार्थ' हाच नीतीचा मूळ पाया होय, असें आमच्या शास्त्रकारांनीं ठरविलें आहे ... ज्याचें मन किंवा अंतःकरण शुद्ध तोच उत्तम पुरुष म्हणावयाचा किंबहुना अंतःकरण निर्मल, निर्वैर व शुद्ध नसतां केवळ बाह्य कर्मांच्या हिशेबी तारतम्यांत गुंतून त्याप्रमाणें वागणारा पुरुष ढोंगीहि बनण्याचा संभव आहे." असेच आणखी किती तरी उतारे देतां येतील. त्यावरून वाचकांच्या हें लक्षांत येईल कीं, लो. टिळकांनीं साधनाच्या शुद्धतेला आपल्या ग्रंथांत स्थान दिलें नाहीं, असें भासविणें हा निव्वळ विपर्यस्त प्रचार होय. अंतःकरणशुद्धि, समत्वबुद्धि आणि सर्व भूतांना आत्मवत् मानणें या अत्यंत विशुद्ध तत्त्वावरच

गीतोपदेशाची सारी उभारणी आहे. असें असतां गीतारहस्यांत साधनशुद्धतेचा विचार नाहीं, किंबहुना गीतारहस्य अत्याचाराची तरफदारी करतें असें भासविणें हें कुटिलपणाचें लक्षण होय.

### असा विपर्यास कसा होतो ?

असा विपर्यास जाणूनबुजून केला जावो अथवा चुकीनें केला जावो, त्या विपर्यासाची उभारणी कशी होते, याची थोडीशी चिकित्सा करणें अगत्याचें आहे. 'ज्ञानी पुरुषानें ज्ञानोत्तर लोकसंग्रहार्थ कर्म करावें' असें टिळकांचें वाक्य घेऊन संन्यासपक्षीय आक्षेपक त्या वाक्यांतील 'कर्म' शब्दाचा 'निष्काम अतएव निवृत्त कर्म' हा टिळकांचा अर्थ न घेतां 'कर्म' म्हणजे सकाम, बंधनकारक कर्म, असा अर्थ त्याला चिकटवून हें पाहा, टिळक ज्ञानी माणसाला **'कर्म'** करावयास सांगतात, असें भासवितात. याच पद्धतीनें हे आधुनिक गांधीपक्षीय आक्षेपक टिळकांच्या लेखांतल्या **'जशास तसें', 'आघातास प्रत्याघात', 'धटासि आणावा धट'** इत्यादि वचनांचा विपर्यास करतात. सिद्धावस्था प्राप्त झालेल्यांची मनःस्थिति विसरावयाची व त्यांच्या बाह्यकर्माचें स्वरूप अनीतिमान् माणसाच्या कर्माच्या स्वरुपासारखेंच आहे एवढेंच साम्य पाहून, स्थितप्रज्ञाला वाटेल तसें वर्तन करण्याला परवानगी आहे असें टिळक सांगतात असा त्याला भलताच अर्थ जोडावयाचा, असा हा अपप्रचाराचा प्रकार आहे.

### स्थितप्रज्ञ तरतमभाव जाणीत नाहीं

स्थिप्रज्ञाची, वा सिद्धावस्थेस पोंचलेल्या पुरुषाची बुद्धि अत्यंत शुद्ध, निष्काम झालेली असून, सर्व प्राणिमात्रांत भगवद्भाव पाहिल्यानें त्याची आत्मौपम्यबुद्धि पराकोटीला गेलेली असते. असा स्थितप्रज्ञ जेव्हां कांहीं आचरण करतो, त्या वेळीं 'शुद्ध मार्गानें सत्कार्य यशस्वी होत नसल्यास अशुद्ध मार्गाचा त्यानें अवलंब करावा' असें टिळक सांगतात, असें प्रतिपादन करण्यांत आक्षेपकांच्या बुद्धींतला भ्रांतिष्टपणाच व्यक्त होतो. विधिनिषेधातीत झालेल्या त्रिगुणातीत पुरुषानें कसें वागावें, हें सांगण्याचा अधिकार टिळक आपणांकडे घेतात, ही कल्पनाच विक्षिप्त होय आणि त्याहून विक्षिप्त कल्पना ही कीं, सिद्धावस्थेच्या पराकोटीला गेलेला पुरुष, हें माझें कार्य नीतीच्या मार्गानें यशस्वी झालें नाहीं म्हणून आतां मी अनीतीच्या मार्गानें तें यशस्वी करीन, असें ठरवितो ! सिद्धावस्था या शब्दाची याहून अधिक थट्टा दुसरी कोणती असूं शकेल ? वस्तुस्थिति अशी असते कीं, त्रिगुणातीताला स्वधर्माचा जो एकच मार्ग दिसतो त्याच मार्गानें तो जात असतो. त्या मार्गाला इतरांनीं सरळ मार्ग म्हणावें, अगर वाकडा मार्ग म्हणावें, पण स्थितप्रज्ञाच्या बुद्धींत हा भेदाभेद आणि तरतमभाव नसतोच.

### इतरांनीं धडा घ्यावा

उदाहरणांनीं हा अर्थ अधिक स्पष्ट करूं. रोग्याला औषधोपचार करूं पाहणारा

डॉक्टर जर अतज्ज्ञ असेल तर तो, हा नाहीं तर तो, असा वेगवेगळा उपाय करीत बसेल, पण तोच डॉक्टर जर पूर्ण तज्ज्ञ असला तर तो जो उपाय योजील तोच योग्य असला पाहिजे, मग तो इतरांच्या दृष्टीला कसाहि दिसो. स्थितप्रज्ञाच्या शुद्धबुद्धीचा प्रभाव एवढा असतो कीं, त्यांच्या इंद्रियांनाहि बरेंवाईट आपोआपच कळूं लागतें. 'सर्वद्वारेषु देहेऽस्मिन् प्रकाश उपजायते' (गी. १४–११) यांत हेंच तत्त्व सांगितलें आहे. स्वामी रामकृष्ण यांची अशी आख्यायिका सांगतात कीं, त्यांना पैशाचा स्पर्शहि सहन होत नसे. एकदां एका चिकित्सकानें त्यांची परीक्षा पाहण्याकरितां ते झोपले असतां, त्यांच्या मिटलेल्या हातांत हळूच एक रुपया सारला, त्याबरोबर झोपेंतच त्यांच्या हातानें तो रुपया झाडून टाकला! सारांश, स्थितप्रज्ञ तरतमभाव पाहून यशापयश जोखून भला अगर बुरा मार्ग स्वीकारतो, असें मानणें अप्रयोजक असून, स्थितप्रज्ञाच्या हातून जें वर्तन घडतें तेंच वर्तन त्या परिस्थितींत योग्य होय, असा धडा इतरांनीं घ्यावा, असें टिळकांचें सांगणें आहे; आणि तें यथार्थच आहे. उत्तम सदाचरण हातून घडण्याला 'आत्मौपम्यबुद्धि' हीच उत्कृष्ट कसोटी होय आणि ज्याला अशी आत्मौपम्यबुद्धि प्राप्त झाली त्याची नुसती बुद्धीच नव्हे, तर मन व इंद्रियेंहि अत्यंत शुद्ध व निर्विकार झालेलीं असतात; म्हणून त्याचें जें आचरण तेंच इतरांना आदर्शभूत होतें.

### ही साधनाची शुचिता नव्हे काय?

या पलीकडे साधनाची शुचिता ती कशी असावयाची? कर्मसंग्रहाला 'करण, कर्म, कर्ता' अशीं तीन साधनें गीतेनें सांगितलीं आहेत. सिद्धावस्था प्राप्त झालेल्या पुरुषांत कर्ता व करण या दोहोंची शुद्धता झालेलीच असते हें वर आलेंच. आतां कर्माच्या तेवढ्या शुचितेचा विचार करावयाचा. गीतेनें सात्त्विक कर्माची व्याख्या '**नियतं संगरहितमरागद्वेषतः कृतम्। अफलप्रेप्सुना कर्म यत्तत्सात्त्विकमुच्यते॥**' (गी. १८–२३) या श्लोकांत सांगितली आहे. यांत कर्माच्या बाह्य स्वरूपावरून सात्त्विक, राजस व तामस अशी वर्गवारी न करतां कर्त्याच्या बुद्धीवरूनच ही वर्गवारी केलेली आहे. टिळकांनीं यांतील मर्म बरोबर ओळखलें आणि त्यांचे आक्षेपक गीतेची ही व्याख्या नेमकी दृष्टीआड करतात. गीतेनें कर्माला विशेषणें लावून सात्त्विक, राजस व तामस असा भेद न सागतां कर्त्याला अफलप्रेप्सु, कामेप्सु व मोहित अशीं विशेषणें लावून कर्माची सात्त्विक, राजस व तामस अशी वर्गवारी केली आहे. अर्थातच निष्कामबुद्धीचा मनुष्य, आसक्ति न ठेवतां रागद्वेषानें प्रेरित न होतां, जें स्वधर्मप्राप्त कर्म करतो तें कर्म सात्त्विकच होय, मग त्याचें बाह्य स्वरूप इतरांना कसेंहि दिसो. हेंच सात्त्विक कर्माचें लक्षण दृष्टीसमोर ठेवून लो. टिळकांनीं सिद्धावस्था व व्यवहार हें प्रकरण लिहिलें. यांत कर्माच्या बाह्य स्वरूपाला महत्त्व नसून, कर्त्याची शुद्धबुद्धि हीच कर्माच्या सात्त्विकतेची कसोटी सांगितली आहे; यांत साधनाची शुद्धता आलीच.

### व्यावहारिक उदाहरणें

बाह्यतः समान दिसणारें कर्म बुद्धीच्या शुद्धाशुद्धतेनें भलें अगर बुरें कसें होतें, याचीं उदाहरणें वाचकांच्या नजरेसमोर असतीलच. परस्त्रीच्या शरीराला स्पर्श करणें हें अधर्म्य खरें, पण दंतवैद्य अगर बाळंतिणीची सुटका करणारा डॉक्टर याचें तें कृत्य धर्म्यच होय. आत्महत्या हें पाप खरें, परंतु साधूची जलसमाधि आणि सतीचा अग्निप्रवेश धर्म्यच होय. मालकाच्या परवानगीवांचून त्याची वस्तु हरण करणें हें चौर्य होय, पण पुत्रलाभाची आनंदाची वार्ता सांगून 'पूर्णपात्र' हरण करणें ही चोरी नव्हे, दुसऱ्याचा प्राण जाईल असें कृत्य करणें ही हिंसा होय, पण फांशीची शिक्षा सांगणें अथवा तिची बजावणी करणें ही हिंसा नव्हे. अनृत भाषण हें पाप होय, पण चोराला द्रव्य पुरून ठेवलेली जागा न सांगतां भलतीकडे लावून देणें हें अनृत नव्हे.

अशा प्रकारचीं अनेक उदाहरणें देऊन टिळकांनीं हा विषय स्पष्ट केला असतां, टिळकांनीं साधनशुचिता सांगितली नाहीं व त्यामुळें अत्याचाराला प्रोत्साहन मिळालें, असले भरमसाट आरोप हे टीकाकार करीतच असतात !

### भाषेंतील शब्दांची उणीव

असा विपर्यास केला जाण्याला भाषेंतील शब्दांची उणीव कांहीं अंशांनीं कारणीभूत होते. अद्वैताचें प्रतिपादन करतांना जशी द्वैताची भाषा वापरावी लागते त्याचप्रमाणें कर्माकर्म, धर्माधर्म, सत्यासत्य, हिंसा-अहिंसा, पापपुण्य याचा विचार करतांना ज्या वर्तनाला या जोडींतून कोणताहि शब्द लागू पडत नाहीं, त्या वर्तनाला या जोडींतलाच कोणता तरी एक शब्द वापरावा लागतो; आणि मग त्या शब्दावर वाद सुरू होतो. जो मित्रहि नव्हे व शत्रूहि नव्हे त्याला जसा मध्यस्थ किंवा तटस्थ हा स्वतंत्र शब्द आहे तसा एकेक शब्द कर्माकर्म, सत्यासत्य, हिंसा-अहिंसा, यांच्या मध्यस्थ स्थितीचा दर्शक असा भाषेंत असता तर इतका वाद माजला नसता.

पिनल कोडांतहि ही अडचण कांहीं ठिकाणीं भासते. खून नव्हे असा सदोष मनुष्यवध, निर्दोष मनुष्यवध, इत्यादि शब्दसमुच्चयांत वध याच्या जागीं जर 'प्राणात्ययदर्शक पण निर्दोषता'दर्शक शब्द वापरतां आला असता तर ठीक झालें असतें. गीताकाराला ही अडचण बरीच भासली, त्यामुळें '**किं कर्म किमकर्मेति कवयोऽप्यत्र मोहिताः**' असें म्हणावें लागलें. याहून अधिक स्पष्ट विरोधाभासाचें उदाहरण म्हणजे '**हत्वाऽपि स इमाँल्लोकान्न हन्ति न निबध्यते**' (गी. १८–१७) हा श्लोक होय. यांत '**हत्वा**' म्हणून त्यालाच '**न हन्ति**' म्हणावें लागलें.

लो. टिळकांनाहि हीच भाषेची अडचण भासली आणि त्यामुळेंच टीकाकारांना विपर्यास करण्यास संधि सांपडली. आततायी चालून आला असतां त्याचा

वध करावा असें शास्त्रकार सांगतात, पण या कृत्याला हिंसा म्हणावें कां अहिंसा म्हणावें ? प्राणघात असल्यानें शब्दतः हिंसा आहे, पण शास्त्राधारें ती अहिंसा आहे, कांहीं म्हटलें तरी उलट बाजूनें आक्षेप घेण्यास जागा राहते.

समर्थ रामदासस्वामींनीं महताचें वर्णन करतांना 'जाते स्थळ तो सांगेना, सांगे त्या स्थळीं जाईना' असें म्हटलें आहे. यांत काय समर्थांनीं खोटें बोलण्याला मुभा दिली असें मानावयाचें ?

गांधीजींचेंच उदाहरण दिलें असतां हा शाब्दिक वाद कसा निरर्थक आहे तें त्यांच्या अनुयायांच्या लक्षांत येईल. प्रवास करीत असतांना अनेक वेळां गांधीजी ज्या शहरीं जावयाचें तेथील स्टेशनावर न उतरतां अलीकडच्या एखाद्या लहान स्टेशनावर आकस्मिक उतरत व गुप्तपणें निघून नियोजित स्थळीं जात. याला सत्य म्हणावें कां असत्य म्हणावें हा वाद राहणारच; कारण सत्य व असत्य यांतली मध्यस्थ भूमिका दर्शविणारा तिसरा शब्द भाषेंत नाहीं. लो. टिळकांनाहि स्थित-प्रज्ञाच्या व्यवहाराचें वर्णन करतांना अनेक स्थळीं अशीच अडचण भासली. त्यामुळें '**हत्वाऽपि न हन्ति**' अशासारखी दुटप्पी भाषा त्यांस वापरावी लागली. पण तेवढ्यावरून त्यांतील केवळ वध, हनन, हिंसा, असत्य, पाप इत्यादि शब्द वाच्यार्थानें घेऊन तें तें कृत्य अधर्म्य आहे, तरी तें करण्याला टिळक स्थित-प्रज्ञाला मुभा देतात, अशी टीका केली जाते, पण हा शब्दच्छल व वितंडवाद होय.

### बरें, पुढें काय ?

वाद न वाढवितां आंखडता घेण्यासाठीं घटकाभर असेंहि गृहीत धरूं कीं, टिळकांनीं साधनशुचिता सांगितली नाहीं, पण पुढें काय ? ही उणीव गांधीजींनीं भरून काढली, आणि रहस्यापुढें एक पाऊल टाकलें हें खरें आहे काय ? गांधीजींनीं असें काय सांगितलें कीं, त्यानें हा प्रश्न उलगडला जावा ? 'जीवनाच्या अपूर्णा-वस्थेंत सुद्धां कोणत्याहि सबबीवर अशुद्ध मार्गाचें अवलंबन करणें चूक आहे', असें गांधीजींनीं सांगितलें; तथापि एवढ्यानें हा प्रश्न मिटला काय ? अशुद्ध मार्गानें जाऊं नये, हें ठीक आहे, पण दुसरा शुद्ध मार्ग शक्य आहे व तो श्रेयस्कर आहे, हें दाखवून दिल्याशिवाय या प्रश्नाची निरगांठ कशी सुटणार ? अशुद्ध मार्गानें जाऊं नये, आणि शुद्ध मार्ग तर शक्य नाहीं; अशा वेळीं काय ? जागच्या जागीं डांबून कुजावयाचें ? नुसता निषेधात्मक उपदेश हा केव्हांहि अपूर्णच होय. अशुद्ध मार्गाचा दरवाजा बंद करणारानें शुद्ध मार्गाचा दरवाजा उघडून दाखवावयाला नको काय ! 'अक्रोधानें क्रोध जिंकावा' हा शाब्दिक उपदेश झाला; पण प्रतिपक्षाचा क्रोध जिंकला न जातां अधिकच भडकला तर काय करावें, याला उत्तर कोठें आहे !

गीतारहस्य पृ. ३८० (सहावी आवृत्ति) वर नेमका हाच प्रश्न विचारून टिळकांनीं उलट पेंच टाकला आहे, याची गांधीभक्तांनीं दखलगिरी घेतली आहे काय ! टिळक लिहितात, 'साधुपणानें दुष्टाला जिंकावा' या वाक्यांत दुष्टाच्याचा

पाडाव किंवा निवारण करणें हें साधुपुरुषाचें मुख्य कर्तव्य आहे, हें गृहीत धरूनच तत्सिद्ध्यर्थ कोणता उपाय योजावा याचें दिग्दर्शन करावें लागतें. सावधपणानें निवारण न होईल तर ‘जशास तसें’ या न्यायानें त्याचें निवारण करूं नये, त्याच्या दुष्टकृत्यास साधुपुरुषानें खुशाल बळी पडावें, असें आमच्या धर्मग्रंथकारांनीं कोठेंहि प्रतिपादन केलें नाहीं.” अर्थातच ‘दुष्टावा जिंकावा’ हा पक्ष उभयमान्य असल्यावर जिंकण्याचा उपाय सांगण्याची जबाबदारी उभय पक्षांवर सारखीच आहे.

### गांधीजी मागेंच रेंगाळत आहेत

आमच्या शास्त्रकारांनीं व विशेषतः गीतेस अनुसरून टिळकांनीं **‘जशास तसें’** हा उपाय सांगितला. गांधीजींनीं कोणता उपाय सांगितला? बलिदानाखेरीज दुसरा कोणता उपाय त्यांनीं सांगितला आहे काय? बलिदानानें क्रोध जिंकला न जातां ‘हविषा कृष्णवर्त्मेव’ तो अधिकाधिक भडकल्यास पुढें काय करावयाचें? शिवाय वैयक्तिक बाबतींत ज्याचा तो आपल्या प्राणाचें बलिदान देण्यास मुखत्यार आहे, पण जेथें राष्ट्राच्या पुढाऱ्यांवर असा पेंच येतो, तेव्हां अखिल राष्ट्राचा बळी देण्याला त्या पुढाऱ्याला अधिकार पोंचतो काय? समाजाच्या पुढाऱ्यांनीं आणि राष्ट्रधुरीणांनीं याचा अवश्य विचार करणें प्राप्त आहे; परंतु गांधीजींनीं या प्रश्नाचें समर्पक उत्तर दिलेलें नाहीं. मग जो उपाय मुळीं सांगितलेलाच नाहीं तो टिळकांच्या पुढें, रहस्याच्या पुढें, कसा ठरणार? मनु, व्यास, टिळक इत्यादिकांनीं **‘मायाचारो मायया बाधितव्यः। साध्वाचारः साधुना प्रत्युपेयः’** असें उत्तर देऊन ठेवलें आहे. गांधींना याचें उत्तर देतां न आल्यानें तें संशयात्म्याप्रमाणें मागेंच रेंगाळत आहेत.

### अपुरा आणि गैरलागू

गांधीजींचें तत्त्वज्ञान गीतारहस्याच्या पुढें जाणारें नसून मागेंच रेंगाळणारें आहे, याला कारण त्यांच्यांतील अपुरेपणाचा दोष होय. लो. टिळक जीवन्मुक्तस्थिति शक्य मानतात आणि अशा निस्त्रैगुण्य स्थितींतल्या असामान्य व्यक्तींना विधिनिषेध लागू नसून, उलट जीवन्मुक्तांचें जें आचरण तेंच इतरांना आदर्शभूत उदाहरण होय, असें सांगतात. याला गीतेंतहि **‘यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः’** या श्लोकांत आधार आहे. जे लोक अशा असामान्य कोटीला पोंचले नसतील त्यांच्या परमोच्च ध्येयाला मुरड कशी घालावी लागते, हेंहि टिळकांनीं महाभारत, मनुस्मृति आणि गीता यांच्या आधारें दाखवून दिलें आहे. अशा रीतीनें गीतारहस्य हें असामान्य व सामान्य अशा उभय कोटींतील लोकांना त्यांचा मार्ग दर्शवितें.

गांधीजींना जीवन्मुक्तावस्था शक्य कोटींतील वाटत नाहीं. ते म्हणतात कीं, सर्वच मानव प्राणी अपूर्णावस्थेंत आहेत, पूर्णावस्थेला कोणीच पोंचलेला नाहीं हें

जर खरें, तर त्यांनीं अपूर्णावस्थेंतील मानवांना जे नीतिनियम झेपतील तेच त्यांना सांगावयाला हवेत; परंतु नीतिबोध करतांना गांधीजींना परमोच्च ध्येयाला मुरड घातलेली खपत नाहीं. त्यांना निरपवाद अहिंसा, निरपवाद सत्य, निरपवाद प्रेम पाहिजे. याचा अर्थ असा कीं, जगांतील मानव सामान्य दर्जाचे आणि गांधीजींचीं नीतितत्त्वें असामान्यांकरितां! अर्थातच सामान्य जनांकरितां त्यांची शिकवण नसल्यानें त्यांच्या उपदेशावर अपुरेपणाचा दोष येतो.

यावर कोणी म्हणतील कीं, ज्यांना निरपवाद अहिंसा आचरण्याचें धैर्य नसेल त्यांनीं अन्याय सहन करण्यापेक्षां त्याचा प्रतिकार करावा, म्हणजे हिंसामार्ग स्वीकारावा, अशी परवानगी गांधीजींनीं दिलीच आहे! परंतु ही परवानगी खरी मनापासूनची नसून हा त्रागा आहे; यास्तव सामान्य जनांकरितां सांगितलेला तो नीतिनियम असें मानतां येत नाहीं. आणि तो नीतिनियमच आहे, त्रागा नव्हे, असें जर गांधीजींचे अनुयायी म्हणतील, तर त्यास आमचा प्रश्न असा कीं, मग यांतून जें टिळकांनीं सांगितलें तेंच गांधीजींनींहि सांगितलें असें निष्पन्न होत असल्यानें, गांधीजी गीतारहस्याच्या पुढें गेले असें म्हणण्याला आधार काय? जगांत जीवन्मुक्त नाहींत असें त्यांनीं मानलें, पण त्यांना लागू पडणारा धर्म सांगितला आणि जगांत जे सामान्य लोक आहेत त्यांना मार्गदर्शक होईल असा उपदेश केला नाहीं, यास्तव तो उपदेश अपुराच नव्हे तर गैरलागूहि होय.

### जशास तसें याचा अर्थ

या संबंधांत टिळकांच्या प्रतिपक्षाकडून आणखी एक विपर्यास करण्यांत येत असतो. '**जशास तसें**' याचा विपरीत अर्थ करून 'कुत्रा आपल्याला चावला तर आपण कुत्र्याला चावावें काय' असले आचरट प्रश्न कित्येक जण विचारतात. 'जशास तसें' याचा खरा अर्थ असा कीं, जशा स्वरूपाचा, लहान अथवा मोठा, गुन्हा असेल त्या मानानें त्याला त्याचें फळ (प्रायश्चित्त – शिक्षा) द्यावयाचें. यांतला हेतु, त्यानें पुनश्च तसला गुन्हा करूं नये, हा आहे व या उपायानेंच दुष्टांचा दुष्टावा बंद पाडतां येतो. मतपरिवर्तनाचा उपाय करून पाहूं नये असें नाहीं. ते प्राथमिक उपाय आहेतच व ते मनुष्य करीतच असतो. गुळानें आजार बरा झाला तर कडू कोयनेल खाण्याचा आग्रह कोण धरील; आणि बाळंतिणीची सरळ सुटका झाली तर मूल कापण्याचा राक्षसीपणा कोण करील! परंतु शास्त्रकारापुढें प्रश्न येतो, तेव्हां तो सामान्य उपायानें सुटत नाहीं, म्हणूनच येतो. कृष्णाची शिष्टाई सफळ झाली असती, तर गीता सांगण्याचा आणि त्या गीतेंत 'हत्वाऽपि स इमाँल्लोकान्न हन्ति न निबध्यते' असा शास्त्रार्थ सांगण्याचा प्रसंगच आला नसता. परंतु जेव्हां साम, दाम व भेद हे उपाय निष्फळ ठरतात, तेव्हांच शेवटचा 'दंडा' चा उपाय सांगावा लागतो; आणि जो शास्त्रकार साम, दाम एवढेंच उपाय सांगून थांबेल तो अर्धवटच मानला पाहिजे. 'प्रेमानें शत्रूला जिंकावें' हें फार चांगलें, परंतु त्यानें शत्रु अधिक

शेफारला व दुगाण्या झाडूं लागला, तर त्याची हड्डी नरम करावी, हा मार्ग दुबळा कां त्याच्या लाथांना बळी पडावें, असें सांगणारा मार्ग दुबळा ? टिळकांच्या शिकवणीनें राष्ट्र दुबळें झालें का प्रबळ झालें, याची साक्ष इतिहास देतच आहे आणि गांधीजींच्या शिकवणीनें भारत किती प्रभावी झालें याचा गेल्या पांच वर्षांचा इतिहास डोळ्यापुढें आहेच. तेव्हां गांधीभक्तांनीं गांधीजींच्या शिकवणीचा कितीहि उदोउदो केला, तरी त्यांचा मार्ग पुढचा कां मागचा, प्रबळ का दुर्बळ, हें जगास कळून चुकलें आहे.

## दुष्ट मनुष्यच पापाचा धनी

'**जशास तसें**' वर्तन करून दुष्टाचा नायनाट केल्यास त्या हिंसेचें पाप आपल्या माथीं बसेल, ही अर्जुनाचीच फुसकी शंका हल्लींचे वावदूकहि पुढें मांडीत असतात. पण याला गीतेनें व आपल्या शास्त्रकारांनीं स्पष्ट उत्तर दिलें कीं, असली हिंसा ही हिंसाच नव्हे व त्या घोर कृत्याची जबाबादारी दुष्ट माणसावरच पडते, त्याला शिक्षा देणाऱ्यावर पडत नाहीं. दुष्ट मनुष्य आपल्या दुष्टाव्यानेंच आधीं आध्यात्मिकदृष्ट्या मेलेलाच असतो. फक्त त्याचा आधिभौतिक देह तेवढा पडावयाचा राहिला असतो. तो पाडण्याला जो निमित्तमात्र झाला त्याला पाप लागण्याचा संबंध काय ? 'मयैवेते निहताः पूर्वमेव । निमित्तमात्रं भव सव्यसाचिन्' या उपदेशांतील मर्म हेंच आहे.

## यतिधर्म व गृहस्थधर्म यांतील भेद

मात्र हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, हे सर्व विचार ज्याच्यावर समाजाच्या व राष्ट्राच्या संरक्षणाची व लोकसंग्रहाची जबाबदारी आहे त्याच्यासाठींच आहेत. गृहस्थाश्रमी माणसासहि त्याच्या कुटुंबाच्या रक्षणाच्या दृष्टीनें या जबाबदारीचे अंशभाक् व्हावें लागतें. जो सर्वसंगपरित्याग करून, संन्यासाश्रम स्वीकारून, सर्व जबाबदारींतून मुक्त झाला, त्या यतीनें प्रेम, अहिंसा, सत्य यांचें तिळमात्र उल्लंघन न करतां स्वतःच्या प्राणावर बेतल्यास आत्मबलिदान खुशाल करावें, पण त्याला सुद्धां आपल्या कृतीनें इतरांच्या जिवांचें बलिदान देण्याचा अधिकार पोंचत नाहीं. एवंच, निरपवाद अहिंसा, सत्यप्रेम हे यतिधर्म आहेत. त्यांचा गृहस्थधर्माशीं संबंध जोडणें व त्या गृहस्थधर्माची समाजधुरीणाच्या कर्तव्याशीं सांगड घालणें हा धर्मसंकर होय. वर्णसंकर हा जसा समाजाला घातक होतो तसाच धर्मसंकरहि समाजाला घातक होतो. गांधीजींनीं आपल्या उपदेशांत सर्व वर्णाश्रम धर्मांची खिचडी करून राजधर्म बिघडविला आहे. लो. टिळकांनीं प्रत्येकाच्या धर्माची पृथक् पृथक् फोड करून प्रत्येकाच्या धर्माची ज्याला त्याला जाणीव करून दिली आहे. गांधीजींशीं टिळकांचा पत्रद्वारें वादविवाद झाला तेव्हां, टिळकांनीं असा स्पष्ट इशारा दिला कीं, गांधीजी, आपण संन्यासधर्माचा विचार राजकारणांत घुसडून राजकारण बिघडवूं नका. राजकारणांत निरपवाद अहिंसा,

सत्य, प्रेम या गोष्टी बसवूं लागल्यास दुष्टांचें निर्दाळण व सुष्टांचें संरक्षण, या गोष्टी साधूं शकत नाहींत; पण गांधीजींनीं आपला हेका सोडला नाहीं. एवढेंच नव्हे, तर दुसऱ्या महायुद्धाच्या वेळीं युध्यमान राष्ट्रांना शांततेचा उपदेश करून त्यांनीं आपली अव्यवहार्यता जगजाहीर केली !

असो; या एकंदर विवेचनाचा निष्कर्ष हाच कीं, टिळकांचा उपदेश अत्याचारास प्रोत्साहन देतो, त्यांचा मार्ग दुबळा आहे, त्यांच्या उपदेशांत साधनाची शुचिता नाहीं इत्यादि आक्षेप अगदीं फोल असून, गांधीजींनीं 'रहस्याच्या पुढें पाऊल टाकलें', 'त्यांचा उपदेश राष्ट्र प्रबळ करतो' इत्यादि वल्गना निराधार आहेत. वस्तुस्थिति त्याच्या अगदीं उलट आहे. 'दुष्टाचा दुष्टपणा कसा जिंकावा' या प्रश्नाची गांधींनीं तड लावली नसल्यानें, ते गीतारहस्याच्या फार मागें आहेत आणि त्यांचा मार्ग राष्ट्राला दुर्बळ करणारा आहे.

वाचकांना विनंती एवढीच कीं, रहस्याचा विपर्यास करणाऱ्या वावदुकांच्या तर्कटानें दिशाभूल होऊं न देतां त्यांनीं गीता वाचावी आणि रहस्याचा गाढ अभ्यास करावा. विशेषतः कर्माकर्मविचार आणि सिद्धावस्था व व्यवहार हीं दोन प्रकरणें तर त्यांनीं मुखोद्गत करावीं. गीतारहस्याची ही नवी आवृत्ति त्यांना या कामीं स्पष्ट मार्गदर्शक होईल.

---

## हा भगवद्गीतेचा निष्कर्ष नव्हे : : : : ४

'नवशक्ति' पत्राच्या दिवाळी अंकांत आचार्य **शं. द. जावडेकर** यांनीं '**भगवद्गीता, टिळक आणि गांधी**' या मथळ्याखालीं एक लेख लिहिला आहे. गीतारहस्याच्या वाचकांनीं हा लेख वाचावा अशी आम्ही शिफारस करतों. याचें कारण एवढेंच कीं, कांहीं महिन्यांपूर्वी आचार्य भागवत यांनीं एका व्याख्यानांत गीतारहस्यावर आक्षेप घेणारी धूळफेक करून 'गांधीजी हे गीतारहस्याच्या पुढें गेले' असें प्रतिपादन केलें होतें. गांधीजींचा 'अनासक्तियोग' हा गीतारहस्याच्या पुढें का मागें याचा विचार करण्यापूर्वी तो आधीं गीतेला धरून तरी आहे काय, याचा विचार झाला पाहिजे. हा विचार आचार्य जावडेकर यांनीं प्रांजलपणें पुढें मांडला आहे. आचार्य जावडेकरांच्या त्या लेखांतील कांहीं महत्त्वाचे उतारे पाहा —

( १ ) "गांधींचा दृष्टिकोण, भगवद्गीतेच्या शिकवणींत आपण कांहीं भर घालीत आहोंत, तिचा अनासक्तीचा संदेश अधिक विशद व विस्तृत करीत आहोंत, असा होता. उलट, टिळक आपल्या गीतारहस्यांत भगवद्गीतेचा संदेश आहे तसाच आपण सांगत आहों, या भूमिकेनें लिहीत आहेत."

( केसरी, १ डिसेंबर १९५० )

( २ ) " शस्त्रयुद्ध व शस्त्रक्रान्ति यांना अनत्याचाराचा पर्याय शोधून काढला पाहिजे अशी त्यांची ( गांधींची ) दृष्टि आहे. ही आपली दृष्टि भगवद्गीतेच्या संदेशास अनुसरूनच आहे असा गांधींचा आग्रह आहे; मात्र आपण त्या संदेशाचा विकास करीत आहों याची त्यांना जाणीव आहे. "

( ३ ) " सत्याग्रह युद्ध हेंच खरें धर्मयुद्ध होय व त्या युद्धानेंच आजच्या जगापुढें उभे असलेले प्रश्न सुटूं शकतील, अशी त्यांची ( गांधींची ) भूमिका आहे. ही भूमिका अर्थात् गीतेच्या व गीतारहस्याच्या भूमिकेहून भिन्न आहे हें उघड आहे."

( ४ ) " युद्धानें व सशस्त्र क्रान्तीनें लोकसंग्रह होत नाहीं, म्हणून लोकांनीं आतां सत्याग्रहानें लढण्यास शिकलें पाहिजे. श्रीकृष्ण म्हणतो, ' मामनुस्मर युध्य च ' ( माझें स्मरण ठेवून लढ ). गांधी म्हणतात, ' हृदयांतील परमेश्वराला व सत्प्रवृत्तीला स्मरून लढ; सत्यानें व अहिंसेनें लढा ' ही भूमिका गीतेच्या व गीतारहस्याच्या पुढची आहे. "

( ५ ) " विदुरनीति ही बुद्ध किंवा ख्रिस्त यांच्याप्रमाणें केवळ अप्रतिकारवादी आहे व ती संन्यासी आहे. गांधींची सत्याग्रहनीति ही अहिंसक असली, तरी प्रतिकारवादी आहे व कर्मयोगी आहे. या गांधीनीतीचा विचार गीतारहस्यांत नाहीं. त्यांत ( गीतारहस्यांत ) केवळ विदुरनीति व श्रीकृष्णनीति ( भगवद्गीता ) या दोहोंचाच विचार झाला आहे. "

## पुरोगामित्व आणि परिणामकारकता

वरील उतारे आचार्य जावडेकर यांच्या लेखांतूनच घेतले आहेत. या उताऱ्यावरून काय सिद्ध होतें ? गांधीजी गीतेच्या व गीतारहस्याच्या पुढें गेले असें सिद्ध होतें काय ? यांतील पहिल्या उताऱ्यांतील कबुली अत्यंत महत्त्वाची आहे. टिळक हे भगवद्गीतेचा संदेश जशाचा तसा सांगतात, गांधीजी मात्र गीतेच्या शब्दाचा अर्थ ' विशद व विकसित ' करतांना त्यांत आपल्या पदरची भर घालतात. सत्याग्रहाच्या लढ्याला गीतेची शिकवण अपुरी पडते म्हणून गांधीजी आपल्या पदरचा अभिप्राय गीतेवर लादतात, असाच याचा अर्थ होत नाहीं काय ? यासंबंधांत संशय बाळगण्याचेंहि कारण नाहीं. शेवटचा जो उतारा वर दिला आहे त्यांत आचार्य जावडेकर हें मान्य करतात कीं, गीतारहस्य हें विदुरनीति व श्रीकृष्णनीति या दोहोंना धरून आहे. गांधीनीति ही विदुरनीति किंवा बुद्धनीतीप्रमाणें अहिंसक असली, तरी ती प्रतिकारवादी व कर्मयोगी आहे. हा अहिंसक प्रतिकारवाद कोणी उपदेशिला ? विदुर, श्रीकृष्ण अथवा गौतमबुद्ध या तिघांतून एकानेंहि तो उपदेशिला नाहीं. विदुराचा अप्रतिकारवाद, बुद्धाची अहिंसा आणि श्रीकृष्णाचा कर्मयोग या तिहींची ही खिचडी आहे.

अशा संमिश्र नीतीचा व्यवहारांत उपयोग तर होत नाहींच, पण उलट अपाय मात्र होऊं शकतो, हें वाचकांना पटण्यासाठीं पुढील दृष्टान्त देतां येईल.

होमिओपाथी व ॲलोपाथी अशा दोन पद्धति रोगप्रतिकारार्थ वापरल्या जातात व प्रत्येक चिकित्सक आपापल्या श्रद्धेप्रमाणें यांतली कोणती तरी एक पद्धति स्वीकारतो. पण जर एखादा डॉक्टर होमिओपाथी व ॲलोपाथी या दोहोंचा संकर करून औषधोपचार करूं लागला, तर तो इतर वैद्य व डॉक्टर यांच्यापुढें गेला असें म्हणावयाचें कीं काय ? अशा संमिश्र औषधोपचारानें रोग्याला गुण आला, तर ती एक नवी व पुरोगामी चिकित्सापद्धति मानतां येईल; पण प्रयोगावस्था चालू असतांना व रोग्याला गुण न येतां तो खंगत चालला असतांना, त्या नव्या पद्धतीचें पुरोगामित्व वाखाणणें हें विसंगत नव्हे काय ?

सारांश, गांधीजींचा अहिंसक प्रतिकारवाद हें केवळ काल्पनिक नीतितत्त्व आहे. व्यवहारांत आलें कीं, तें अहिंसक न राहतां हिंसक तरी होतें अथवा प्रतिकारक न होतां निष्प्रतिकारक तरी होतें. हिंदुस्थानांतला सत्याग्रहाचा लढा तरी हिंसात्मक व प्रतिकारात्मक झाला तेव्हांच तो यशस्वी झाला. अर्थातच जो प्रयोग कधीं कोठें यशस्वी झाला नाहीं तो पुरोगामी कसा मानावयाचा ?

### औचित्याचा विचार

दुसरा महत्त्वाचा मुद्दा हा कीं, गीतेचा अर्थ करतांना त्यांत नसलेलें स्वतःच्या पदरचें नवें तत्त्वज्ञान घुसडणें हें कितपत समुचित ठरेल ? टिळकांनीं गीतारहस्यांत गीतेंतील विचारसरणी जशीची तशी मांडली; तिला तुम्ही प्रतिगामी म्हणा वा पुरोगामी म्हणा, पण तो गीतेचा निष्कर्ष खास आहे व त्याला श्रीकृष्णाच्या वचनांचा आधार आहे. गांधीजींचा 'अनासक्तियोग' हा गीतेच्या अर्थाला धरून नाहीं. गीतेचा अर्थ विकसित व विशद करण्याच्या सबबीवर गांधींनीं त्यांत आपली नवी नीति घुसडली आहे. अर्थातच त्यांच्या 'अनासक्तियोगा'ला श्रीकृष्णनीति न म्हणतां, 'गांधीनीति' म्हणणेंच सयुक्तिक ठरतें. त्या नीतीला विदुर, श्रीकृष्ण अथवा गौतमबुद्ध या तिघांतून एकाचाहि पाठिंबा नाहीं. कारण ती तीन तत्त्वांची खिचडी आहे. या गांधीनीतीचा प्रयोग या जगद्रूपी रंगभूमीवर नव्यानेंच सुरू झाला आहे. तो प्रयोग यशस्वी झाला तरच त्याला पुरोगामित्वाचें शिफारसपत्र मिळेल. उलटपक्षीं जोंपर्यंत तो अयशस्वी झाल्याचा कटु अनुभव येत आहे, तोंपर्यंत त्याला प्रतिगामी म्हणणेंच युक्त ठरेल.

या वादांतून आणखी एक महत्त्वाचा मुद्दा आपोआपच स्पष्ट झाला. गीतारहस्य प्रसिद्ध झाल्यावर संन्यासमार्गीय टीकाकारांनीं त्यावर असा आक्षेप घेतला कीं, लोकमान्यांनीं आपल्या राजकीय चळवळीला आधार मिळावा म्हणून गीतेचा अर्थ **'कर्मयोगपर'** लावला. आतां प्रस्तुतच्या वादांत आचार्य जावडेकर स्पष्ट सांगतात कीं, टिळकांनीं गीतेचा अर्थ गीतारहस्यांत जशाचा तसाच सांगितला. गांधींनीं मात्र सशस्त्र युद्ध हें जगाच्या शांतीला विरोधक आहे, यास्तव सत्याग्रहाचें ( अहिंसक युद्ध ) स्वीकारलें जावें, या हेतूनें 'अनासक्तियोग' हा ग्रंथ लिहून त्यांत

गीतेंतील 'धर्मयुद्ध' या शब्दाचा अर्थ 'सशस्त्र युद्ध' असा न करतां 'अहिंसक सत्याग्रह-युद्ध' असा आपल्या नीतितत्त्वाला अनुसरून केला. यावरून मूळ ग्रंथाला धरून अर्थ कोणाचा आणि त्या ग्रंथाला सोडून पदरचा अर्थ त्यावर कोणी लादला, हेंहि आपोआपच उघड झालें.

---

## सत्यासत्य-हिंसाऽहिंसा-विवेक : : : : ५

सत्येऽप्यसत्यं यः पश्येत् असत्ये सत्यमेव च।
स बुद्धिमान् मनुष्येषु स युक्तः कृत्स्नकर्मकृत् ॥
अहिंसया भवेद् हिंसा हिंसया च तदन्यथा।
इति जानाति यस्तत्त्वं स युक्तः कृत्स्नकर्मकृत् ॥

'गीतारहस्या'चा विपर्यास करणाऱ्या वावदूकांना उत्तर म्हणून दि. १६ मे १९५० च्या 'केसरीं'त मी 'गीतारहस्या'वरील आक्षेपांचें खंडन करणारा लेख लिहिला होता आणि त्या लेखांत 'गांधीजी हे टिळकांच्या पुढें गेले' या कल्पनेचा निरास केला होता. तो लेख वाचल्यानंतर गांधीजींचे पट्टशिष्य श्री. शंकर दत्तात्रय देव यांनीं 'नवभारत' या मासिकाच्या फेब्रुवारी (१९५१) च्या अंकांत लेख लिहून त्यांत आरंभींच असें सांगून टाकलें कीं, "मी 'गीतारहस्यां'-तील 'सिद्धावस्था व व्यवहार' आणि 'कर्मजिज्ञासा' हीं प्रकरणें पुनश्च वाचलीं. तीं वाचून अंतःकरणाला आनंद झाला; पण बुद्धीला अधिक प्रकाश मिळाला नाहीं." श्री. देवांच्या या लिहिण्यांत अंतर्गत विसंगति आहे. बुद्धीला जर अधिक प्रकाश मिळाला नाहीं, तर अंतःकरणाला आनंद कसा होणार ? आनंद होण्याला प्रकाशाची जरुरीच असते; जेथें नवा प्रकाश नाहीं, तेथें आनंद कशापासून मिळणार ? पण ज्या अर्थी आनंद झाला अशी कबुली ते स्वतः देत आहेत, त्या अर्थी त्यांना कांहीं तरी नवा प्रकाश मिळाला असला पाहिजे; मग ती गोष्ट ते मान्य करोत वा न करोत ! आणि खरोखरच जर नवा प्रकाश त्यांना लाभला नसेल, तर त्यांच्या लेखाला उत्तर देणें हेंहि व्यर्थच होणार; कारण, ज्यांना 'गीतारहस्या'सारख्या ज्ञानदीपापासून प्रकाश मिळाला नाहीं, त्यांना माझ्या या लेखापासून प्रकाश मिळण्याची आशा मी कां धरावी ? तथापि, 'नवभारता'च्या संपादकांनीं आग्रह केल्यावरून आणि ज्यांनीं दि. १६ मे १९५० च्या 'केसरीं'तील माझा लेख वाचला नसेल, पण श्री. देवांचा

(नवभारत, जुलै १९५१)

'नवभारतांत'ला लेख वाचला असेल, त्यांचा गैरसमज दूर करण्यासाठीं आणि कित्येक विसरभोळ्यांची स्मृति ताजीतवानी करण्यासाठीं हा लेख मी लिहीत आहें.

### वादाचें बीज

जगांत शांतता प्रस्थापित करण्याच्या मार्गांत 'गांधीजी हे टिळकांच्या गीतारहस्याच्या, किंबहुना प्रत्यक्ष गीतेच्याहि पुढें गेले' असा गांधीभक्तांचा दावा असून, तेंच वादाचें मूळ बीज आहे. त्या मूळ बीजांतून मग वादाला अनेक फांटे फुटले. त्यांत टिळकांनीं साधनशुचितेचा आग्रह धरला नाहीं; साध्य शुद्ध असलें म्हणजे साधन कसेंहि असलें तरी चालेल, असें टिळक मानतात; एवढेंच नव्हे तर, 'End justifies the means' (साध्य चांगलें असलें म्हणजे तत्प्राप्त्यर्थ वापरलेलें कसलेंहि साधन न्याय्य ठरतें) असें टिळक म्हणतात इत्यादि अनेक उपप्रश्न उद्भवले. टिळकांच्यावर लादलेलीं हीं मतें टिळकांनीं कधींहि प्रतिपादलीं नाहींत, असें पुनः पुनः सांगितलें तरी, आक्षेपक तिकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करतात आणि आपल्या विधानांना आधार देण्याचें टाळतात. यामुळें वादाचें क्षेत्र निर्मर्याद झालें आहे. तथापि, आक्षेपांतले प्रमुख आक्षेप घेऊन त्यांना उत्तर देऊन त्यांचें खंडन केल्यावर 'प्रधानमल्लनिबर्हणन्याया'नें इतर आक्षेप आपोआपच गळून पडतील.

सत्य व अहिंसा हे सद्गुण सर्वश्रेष्ठ आहेत, हें टिळकांनाहि मान्य आहे; पण व्यवहारांत समाजधारणेसाठीं कित्येक वेळां त्या सद्गुणांना अपवाद करावे लागतात. असे अपवाद करावे लागतात का नाहीं आणि ते केव्हां, कशासाठीं करावे लागतात व तसे अपवाद करणें हें समाजाच्या हितार्थ अपरिहार्य आहे का नाहीं, हें वादाचें मुख्य बीज असून श्री. देव यांनीं आपल्या लेखांत नेमका तोच मुद्दा डावलला आहे. समाजाच्या व्यवहारांत व राजकारणांत असे पेंचप्रसंग निर्माण होतात का नाहीं व तसा पेंच पडला असतां तेथें सत्य व अहिंसा यांना डावलणें हेंच धर्म्य ठरतें कीं नाहीं, हें टिळकांनीं अनेक उदाहरणें देऊन दाखवून दिलें आहे. टिळकांचें मत खोडून काढावयाचें असल्यास त्याच पेंचप्रसंगांचीं उदाहरणें घेऊन, त्या परिस्थितींतहि सत्य व अहिंसा न सोडणेंच श्रेयस्कर होय, असें दाखवून द्यावयाला पाहिजे.

असे अपवादाचे प्रसंग अधिक स्पष्ट करण्याकरितां श्री. ग. वि. केतकर यांनीं 'केसरी'तूनच 'साध्यानुकूल साधनविवेक' ही लेखमाला लिहून तींत गांधीजी देखील कित्येक अपवाद मान्य करतात आणि जेथें ते अपवाद मान्य न करतां निरपवाद अहिंसेचें स्तोम माजवितात तेथें त्या आग्रहाचा परिणाम किती शोचनीय होतो, हें मोठ्या मार्मिकतेनें दर्शविलें आहे. श्री. देव यांनीं अशा अपवादात्मक प्रसंगांचें एकहि उदाहरण घेऊन ती समस्या वेगळ्या रीतीनें कशी सोडवितां येईल, हें दाखवून दिलेलें नाहीं.

भोर

### अपवाद केव्हां व कोठें सांगतात ?

लो. टिळक हे सत्य व अहिंसा निरपवाद न मानतां सापवाद मानतात, असें मोघम विधान करून त्यांच्याविषयीं गैरसमज पसरविणें हा त्यांच्या लेखाचा विपर्यास असून त्यांच्यावर अन्याय करणें होय. माणसानें नुसतेच गोड पदार्थ खाल्ल्यास त्याच्या प्रकृतीस अपाय होतो, म्हणून डॉक्टर जसें त्यास गूळ व साखर कमी करून थोडें तिखट व मीठ खावयास सांगतात, तसें कांहीं टिळक हें सत्य व अहिंसा यांचा वीट येईल म्हणून मधून मधून थोडें खोटें बोलावें, थोडी हिंसा करावी, असें सांगतात कीं काय ? 'बाळ्या, तूं सकाळपासून आतांपर्यंत खरें बोललास, आतां थोडेसें खोटें बोल; आज तूं कोणत्याहि प्राण्याला त्रास दिला नाहींस, आतां थोडासा उपद्रव दे ' हें जसें आई आपल्या मुलाला कधींहि सांगूं शकत नाहीं व इच्छीत नाहीं, तसेंच टिळकहि उगाच सत्य व अहिंसा यांना अपवाद करावाच म्हणून अपवाद करण्याला सांगत नाहींत. सत्य व अहिंसा यांची कांस धरल्यानें समाजाचा मोठा घात होतो, अशा अपरिहार्य प्रसंगींच आपल्या सत्य व अहिंसा या व्रताचा हट्ट धरून समाजाचा घात खुशाल होऊं द्यावयाचा कीं काय, असा प्रश्न येतो. या प्रश्नाला टिळक हे शब्दांची लटपट न करतां सरळ उत्तर देतात कीं, अशा प्रसंगीं समाजाचा घात टाळण्यासाठीं असत्य भाषण करणें व हिंसा पत्करणें हाच धर्म होय आणि हें मत टिळकांनीं आपल्या पदरचें नवें शोधून काढलें नसून वेदोपनिषदांपासून तों आधुनिक संतश्रेष्ठांपर्यंत सर्वांनीं तें मान्य केलें आहे. असे अपरिहार्य प्रसंग केव्हांहि येतच नाहींत, असें श्री. देव यांचें मत आहे कीं काय ? आणि जर असें अपरिहार्य प्रसंग आलेच तर कसें वागावयाचें, याचें उत्तर श्री. देव यांनीं द्यावयास हवें. त्यांच्या सबंध लेखांत अशा पेंचप्रसंगांचा उल्लेखच नाहीं, मग उलगडा कोठून आढळणार ? पण त्यांनीं आपल्या अंगलट येणारीं अशीं उदाहरणें टाळलीं असलीं, तरी वाचक त्यांना तसले प्रश्न विचारून उत्तर मागणारच.

### गांधीजी तरी उत्तर काय देतात ?

प्लेगचा प्रसार होऊं नये म्हणून उंदीर मारण्यास हरकत आहे कीं काय, अशी पृच्छा केली असतां 'उंदरांना मारण्यानें माझ्या अहिंसेला बाध येत नाहीं' असें गांधीजींनीं सांगितलें. वानरांचा उपद्रव वाढल्यानें धान्याचा व फळझाडांचा नाश होतो, तेव्हां काय करावें असा प्रश्न उद्‌भवला असतां धान्याची व फळांची नासाडी टाळण्याकरितां वानरांना यमसदन दाखवावें, अशी गांधीजींनींच अनुज्ञा दिलेली आहे. हीं उदाहरणें कल्पित नसून प्रत्यक्ष घडलेलीं आहेत. यावर जर कोणी अशी मल्लिनाथी करील कीं, गांधीजींचा कटाक्ष मानवी प्राण्यांच्या हिंसेविरुद्ध आहे, कीटकादिकांच्या हिंसेवर नाहीं, तर त्याला मानवी प्राण्यांच्या हिंसेलाहि गांधीजींनीं अनुज्ञा दिलेली दाखवून देतां येईल. 'आततायी आला आणि अत्याचार करूं लागला, तर त्याला पकडावें; पण त्याला पकडण्याची शक्यता

किंवा धमक नसेल तर त्याला ठार मारावें; राष्ट्रावर परचक्र चालून आलें तर राष्ट्रघात टाळण्यासाठीं युद्ध करावें, ' असें गांधीजींनींच लिहून ठेवलें आहे. हे सगळे अहिंसेला अपवादच असून ते जसें टिळकमान्य आहेत, तसेच ते गांधीमान्यहि आहेत.

अहिंसेला जसे हे अपवाद आहेत, तसेच सत्यालाहि अपवाद आहेत. दूध न पिण्याची शपथ घेतली असतां दक्षिण-आफ्रिकेंत सत्याग्रहाचा लढा चालविण्यासाठीं प्रकृति सुधारावी म्हणून शेळीचें दूध पिण्याचें मान्य करण्यांत आपण सत्यापासून ढळलों अशी गांधीजी स्वतःच कबुली देतात. हें वैयक्तिक उदाहरण सोडून दिलें, तरी वधिकाला वध्य दाखवून देणें, चोराला खजिन्याची किल्ली कोठें आहे तें सांगणें, हेरानें आपण हेरगिरी करावयास आलों आहों असें सांगणें, इत्यादि बाबतींत सत्य-कथनाच्या पायीं कार्यनाश करणें गांधीजींनाहि मान्य नव्हतें आणि आपल्या चळवळीच्या योजनेंत त्यांनीं यांतील बहुतेक अपवादांचा अवलंब केला होता.

'अशी जर वस्तुस्थिति आहे, तर मग वाद कोठें राहिला ' असें वाचक विचारतील. त्याला उत्तर एवढेंच कीं, हा वाद केवळ शाब्दिक आहे. मन्वादि प्राचीन शास्त्रकार व टिळक अपवादांचीं स्थानें ओळखून अशा विशिष्ट परिस्थितींतली हिंसा ही अहिंसाच होय, आणि असत्यहि सत्यच होय, असें मानतात. गांधीजी म्हणतात कीं, " छे ! हिंसेला अहिंसा व असत्याला सत्य म्हणणें हें अनुचित आहे व ती ध्येयच्युति आहे. मनुष्यप्राणी पूर्ण सद्गुणी नाहीं, समाजाची ही अपूर्णावस्था आहे व स्वतः माझीहि अपूर्णावस्था आहे, म्हणून अहिंसा व सत्य यांपासून ढळण्याचे प्रसंग येतात; पण तो प्रकार इष्ट नसून मान्यता पावण्याच्या लायकीचा नाहीं; यास्तव आपण हा उणेपणा ओळखून पूर्णतेकडे जाण्याचा प्रयत्न केला पाहिजे."

मनुष्याची दृष्टि केव्हांहि पूर्णावस्थेकडे लागलेली असावी व पूर्णता प्राप्त करून घेण्याची महत्त्वाकांक्षा टाकून देऊन त्यानें केव्हांहि मला इतकी हिंसा व इतकें असत्य चालेल असें मानून अपूर्णच राहूं नये, कारण त्यामुळें प्रगतीचा मार्गच खुंटतो, हें खरें आहे; परंतु शक्याशक्यतेचा विचार पाहूनच व्यवहार करावा लागतो. युक्लिडच्या व्याख्येबरहुकूम बिंदू, सरळ रेषा, वर्तुळ इत्यादि आकृति काढणें अशक्य आहे. म्हणून त्या आकृति न काढतां अडून बसावयाचें कीं काय ? व्याख्येच्या जितकें जवळ जातां येईल तितकें चांगलें; पण त्यासाठीं भूमितींतील प्रमेयें सोडविण्याचें थांबवूं नये. त्याचप्रमाणें अहिंसा व सत्य तंतोतंत पाळतां येत नाहींत म्हणून व्यवहारांत अडून बसणें हानिकारक होईल. विद्यार्थ्याला सर्वज्ञ गुरु आणि गुरूला १०० टक्के गुण मिळविणारा विद्यार्थी लाभे-पर्यंत शिक्षणाचें कार्य चालवायाचें नाहीं असा आग्रह धरल्यास शिक्षण देणें-घेणें स्थगितच होईल. ज्या डॉक्टराच्या हातांतला एकहि रोगी दगावला नाहीं, त्या डॉक्टराचेंच औषध मी घेईन, असा निश्चय केल्यास, डॉक्टर न मिळाल्यानें औषधाच्या अभावींच मरण्याची पाळी यावयाची. सारांश, माणसानें आपल्या

डोळ्यापुढें उत्तमांत उत्तम असा आदर्श ठेवावा, हें जरी आवश्यक व श्रेयस्कर असलें, तरी त्याच्याहि मर्यादा जाणून अलौकिकत्वाच्या भरीला पडूं नये.

अति सर्वत्र वर्जयेत् ।

दुर्गुण तर वाईटच असल्यानें त्याचा आग्रह कोणी धरूंच शकत नाहीं; पण सद्गुणांचा अतिरेक हाहि एक प्रकारें अपायकारक असल्यानें सद्गुणाची पराकाष्ठा करण्याच्या नादांत आपण अतिरेकाच्या दोषांत सांपडतों, हें गांधीजी व त्यांचे स्तुतिपाठक विसरतात. आपल्या शक्तीची मर्यादा न ओळखतां अतिरेकाच्या नादीं लागल्यानें हरिश्चंद्र, श्रियाळ, बलि इत्यादिकांवर सत्त्वहरण व गर्वहरण होण्याची पाळी आली. क्षत्रियानें रणांत आपलें शस्त्र खालीं ठेवूं नये, हा क्षत्रियांचा धर्म खरा; परंतु नारायणास्त्रापुढें शस्त्र टाकून नमन करणें हाच एक आत्मरक्षणाचा उपाय असल्यानें, तसा प्रसंग आल्यास त्यांत आपला धर्म बुडाला असें मानूं नये. अर्जुनानें हा नियम जाणून शस्त्र खालीं ठेवलें. भीमदादा अतिरेकी त्यानें हट्ट धरला कीं, मी हातांतली गदा खालीं ठेवणार नाहीं. तेव्हां तो नारायणास्त्रानें जळूं लागला. तें पाहून श्रीकृष्ण व अर्जुन या उभयतांनीं भीमास धरून खालीं पाडलें व त्याच्या हातची गदा ओढून घेऊन खालीं ठेवविली व त्याला हात जोडावयास भाग पाडलें! अर्जुनानें मर्यादा पाळली म्हणून तो क्षत्रियत्वाचा आदर्श नव्हे आणि भीमच खरा श्रेष्ठ आदर्श, असें आपण म्हणूं काय? या उदाहरणांवरून बोध हाच घ्यावयाचा कीं, कोणतीहि प्रतिज्ञा करतांना किंवा व्रत स्वीकारतांना त्याची अंतिम मर्यादा ठरवून ठेवावी.

समर्थांची दृष्टि अतिसूक्ष्म व दूरदर्शी असल्यानें त्यांनीं अफजलखानाच्या भेटीच्या प्रसंगीं शिवाजीमहाराजांना अगाऊच असा इशारा देऊन ठेवला होता कीं,

समयासारखा समयो येना। नेम सहसा चालेना।
नेम धरतां राजकारण। अंतर पडे ॥
अति सर्वत्र वर्जावें। प्रसंग पाहोन चालावें।
हठनिग्रही न पडावें। विवेकी पुरुषें ॥

यावरून समर्थ रामदास व शिवाजीमहाराज हे खरे आदर्श पुरुष नव्हत, सत्यवचनी नव्हत, असें मानावयाचें काय?

गांधीभक्त अतिरेकांतला दोष व पूर्णतः सत्य व अहिंसा पाळण्याची अशक्यता जाणीत नाहींत असें नाहीं. सत्य व अहिंसा पूर्णपणें पाळणें स्वतः परमेश्वराशिवाय इतरांस शक्य नाहीं, असें गांधीजींनींच म्हटलें आहे, तर मग ते अपवादाला मान्यता कां देत नाहींत? याचें कारण त्यांच्या मतें असें कीं, "एकदां आपण आदर्श सोडून खालीं येण्याला मान्यता दिली कीं, लोक कोठवर खालीं घसरतील कोण जाणे (टिळकांचे अनुयायी असेच घसरत चालले आहेत, असा श्री. देवादिकांचा आरोप आहे). वास्तव शुद्ध आदर्श जनतेपुढें ठेवावा; अपवादाची भाषाच बोलूं नये; मग

JAN 1954

जी ती व्यक्ति आपापल्या धारणेप्रमाणें आदर्शाच्या जितकी समीप जाईल तितकी जावो. या अपूर्ण जगांत आदर्शाचें शिखर कोणी गांठूं शकत नाहीं हें खरें असलें, तरी सर्वांची दृष्टि आपण किती खालीं घसरावें इकडे न वेधतां आपण किती वरचा पल्ला गांठावा इकडे लागून राहील."

### मानसशास्त्रदृष्ट्या सदोष

तात्त्विकदृष्ट्या ही विचारसरणी मोहक दिसत असली, तरी मानसशास्त्रदृष्ट्या ती सदोष आहे. आदर्श तर साध्य नाहींच; आणि आदर्शाच्या कितीहि जवळ गेलों, तरी तुम्ही आम्हांला अपूर्ण म्हणून नालायकांतच काढणार; मग अर्धवट वर चढण्याचे परिश्रम तरी कां करा व त्यासाठीं प्राणार्पणापर्यंतचा स्वार्थत्याग तरी कशाला करा असें म्हणून बहुतेक लोक उच्च आदर्शापासून परावृत्त होतात. उलट-पक्षीं, मनुष्य वरच्या पायरीला जितका जाईल तितकें त्याचें कौतुक केल्यास प्रत्ये-काला इतरांपेक्षा एकदोन पायऱ्या तरी वर जाण्याची ईर्षा वाटूं लागते व त्यामुळें समाज घसरगुंडीला न लागतां प्रगतिपर होत जातो.

झीज सोसूनहि स्वदेशी मालच शक्य तितका वापरा अशी चळवळ सुरू होती, त्या वेळीं परदेशी मालाला आळा बसून स्वदेशीला उठावणी मिळाली. पुढें जेव्हां नखशिखान्त खादीचा अतिरेकी उपदेश सुरू होऊन, पूर्ण खादी न वापरणारा व परदेशी कापड वापरणारा दोघेंहि एकाच मापानें मोजले जाऊं लागले, त्या वेळीं परदेशी कापड वापरण्यांत पूर्वीं जो कमीपणा वाटत होता तो जाऊन, एवीतेवी जर आपली गणना अपात्रांतच होणार, तर अतिमहाग स्वदेशी कापड वापरून आपलें आर्थिक नुकसान कां करून घ्या, असली उलटी विचारसरणी फैलावली.

### टिळकांच्या व गांधींच्या उपदेशांतील फरक

अहिंसा व सत्य यांचे अपवाद मान्य केल्यास दुसरी एक आपत्ति ओढवते, असें गांधीवादी प्रतिपादतात; पण ती शंकाहि फोल आहे. त्यांना अशी भीति वाटते कीं, एकदां अपवाद मान्य करूं लागलों कीं, अपवादांची संख्या फुगत जाईल व मूळ सिद्धान्ताचा कोंडमारा होईल; पण ही भीति साधार नाहीं. व्याकरणशास्त्रांत मूळ नियमाला अनेक अपवाद सांगितले जातात. तथापि, भाषाशास्त्राचा असा अनुभव आहे कीं, अपवादानें मूळ नियमाचा लोप न होतां उलट त्याचें दृढीकरणच होतें. इंग्रजींत Exception proves the rule अशी म्हणच आहे व तीच अनुभवसिद्ध आहे.

पिनल कोड हा न्यायदानशास्त्राचा गाथा आहे; पण पिनल कोड रचणारांना कांहीं अशी गांधीभक्तांच्या शंकेसारखी शंका आली नाहीं. त्यांनीं कोणतीं व कोणाचीं कृत्यें अपराध गणलीं जाऊं नयेत, हें सांगण्यासाठीं अनेक अपवाद नमूद करून ठेवले. त्यांत आत्मसंरक्षणार्थ केलेला मनुष्यवध हा खून नव्हे असें लिहून ठेवलें.

जो तो मनुष्य आत्मसंरक्षणाच्या सबबीवर खून पाडूं लागेल व जिकडेतिकडे खून बोकाळतील, अशी शंका त्या कायदेपंडितांना शिवली नाहीं आणि प्रत्यक्ष अनुभवहि शंका घेण्यासारखा आला नाहीं. याचें कारण एवढेंच कीं, आपलें कृत्य अपवादाच्या मर्यादेंत येतें हें सिद्ध करण्याचा पुराव्याचा बोजा अपराधी व्यक्तीच्या माथीं बसतो व तें सिद्ध करणें मोठें दुर्घट असतें. हाच न्याय सत्य व अहिंसा यांचा भंग करून अपवादाचा फायदा घेऊं इच्छिणारांनाहि लागू पडतो. समजा, एखाद्यानें मनुष्यवध केला. आतां ज्याचा वध झाला तो आततायी होता, तो विशिष्ट घोर गुन्हा करण्याच्या हेतूनेंच येत होता आणि त्याचा वध केल्यावांचून ती आपत्ति टळण्यासारखी नव्हती, अशा तीन गोष्टी वध करणारानें सिद्ध करून पटवून दिल्या तरच तो निर्दोष मानला जाईल; आणि कोणीहि मनुष्य उगाच लहरीखातर एवढी मोठी जबाबदारी स्वशिरावर घेण्याला उद्युक्त होणार नाहीं. हीच विचारसरणी सत्यासत्यालाहि लागू आहे. 'होय, मी असत्य भाषण केलें खरें, पण तें एखादा मोठा समाजघात टाळण्याकरितां केलें,' अशी सबब सांगणाराला तशा समाजघाताच्या संभाव्यतेची खात्री पटवून द्यावी लागेल. तात्पर्य, सत्य व अहिंसा पाळणें जेथें समाजहिताला बाधक व राष्ट्राला घातक होईल, त्या ठिकाणीं तो घात टाळण्यासाठीं हिंसा करणें वा असत्य भाषण करणें क्षम्यच नव्हे, तर धर्म्य आहे, असें जें प्राचीन शास्त्रकारांनीं व भगवद्गीतेनें सांगून ठेवलें व ज्याचा अनुवाद लो. टिळकांनीं केला, तें त्यांचें सांगणें समाजाला उन्मार्गाला नेणार नसून सन्मार्गाला नेणारेंच ठरतें. "मांसभक्षण करावयाचें तर सोमयाग करून मांस खा, मद्य प्यावयाचें तर सौत्रामणी यज्ञ करून प्या, स्त्रीसंग करावयाचा तर विधिपूर्वक विवाहित स्त्रीशीं विध्युक्त कालींच करा," अशी परवानगी दिल्यानें मांसभक्षण, मद्यपान व मैथुन यांचा सुळसुळाट न होतां उलट त्यांना आळाच बसला, असा समाजशास्त्रकारांचा अनुभव आहे.

'गीतारहस्यां'त लोकमान्यांनीं अहिंसा व सत्य यांना अपवाद असतात, असें सांगितल्या वेळेपासून खून व लबाड्या यांना भरती आली आणि गांधीजींनीं अहिंसा व सत्य यांचा निरपवाद घोष सुरू केल्यापासून मात्र पूर्वीच्या भरतीला ओहोटी लागली, असा समाजांतला अनुभव नाहीं. अनुभवच पडताळून पाहूं लागल्यास, वरील कल्पनेच्या उलट अनुभव मात्र पदोपदीं येत आहे. गांधीजींनीं हिंदु व मुसलमान यांच्यांत एकी व्हावी म्हणून अट्टाहास सुरू केल्यापासून मुसलमानांच्या दंग्यांना ऊत आला. सत्याचा उपदेश जोरांत चालू असतांनाच लांड्यालबाड्या, फसवणुकी आणि विश्वासघात यांचें पीक फोंफावत चाललें. अहिंसेच्या उपदेशाचीहि तशीच उलटी स्थिति झाली. यावरून समाजांतील दुष्ट प्रवृत्ति, केवळ साधूंच्या उदाहरणानें आणि उपदेशानें, सुष्ट होत नसून, 'दंडोंचि खळ, वळे कीं' हा सिद्धान्तच अबाधित ठरतो. तेव्हां धर्माला, सत्याला, अहिंसेला

अपवाद सांगितले आणि श्रीराम, युधिष्ठिर, अर्जुन इत्यादि श्रेष्ठ व्यक्तींनीं त्या अपवादांचा फायदा घेतला म्हणजे समाजांतील नीतीला ओहोटी लागते आणि कलियुगाचें सत्ययुग करण्याची महत्त्वाकांक्षा मागें पडून उलट सत्ययुगाचें कलियुग होतें, अशी जी भीति गांधीभक्तांकडून कांगावखोरपणानें पुढें मांडली जाते, ती अयथार्थ होय.

### दुष्टांना फूस कशानें मिळते ?

दुष्टांना आपण सदुपदेश करावयाचा आणि त्यांनीं तो न ऐकला, तर आपण सत्याग्रह करून आत्मबलिदान करावयाचें, या आत्मघातकी मार्गानें चालल्यास दुष्टांना आयतेंच फावतें आणि साधूंचा नाश होऊन दुष्टांच्या पुंडाईला सगळें रान मोकळें होतें. परमेश्वराला हा मार्ग रुजू नसल्यामुळेंच तो दुष्टांचें निर्दालन करण्यासाठीं अवतार घेतो आणि राक्षसी वृत्तीचा समूळ उच्छेद करून तेथें साधुवृत्तीची प्रतिष्ठापना करतो. केवळ सदुपदेशानें काम भागत नाहीं. याचा उत्कृष्ट दाखला म्हणूनच अंगदशिष्टाई आणि श्रीकृष्णशिष्टाई यांचे प्रसंग महाकवींनीं वर्णिले आहेत. आणि सरतेशेवटीं सगळ्या दुष्ट अनुयायांसह रावणाचा वध करून त्याच्या जागीं बिभीषणाची स्थापना केल्यानें आणि दुर्योधनादिकांचा वध करून त्याच्या जागीं धर्मराजाची स्थापना केल्यानेंच पहिल्या उदाहरणांत रामराज्याची आणि दुसऱ्या उदाहरणांत धर्मराज्याची गुढी उभारली गेली, हें महर्षींनीं दाखवून दिलें आहे. अर्थातच आपणांस जर समाजांत नीतीचा व धर्माचा झेंडा उभारावयाचा असेल व रामराज्य स्थापावयाचें असेल, तर अतिरेकी सत्याचा व अहिंसेचा अवलंब करून दुष्टांच्या कारस्थानाला आपण बळी पडणें हा सत्याच्या विजयाचा मार्ग नसून, दुष्टांच्या कारवाया ओळखून त्यांच्या मर्मस्थानावर घाव घालून त्यांचा समूळ उच्छेद करणें व साधूंचा मार्ग निष्कंटक करणें, हाच खरा उपाय होय. पौराणिक उदाहरणांच्या जागीं अगदीं अलीकडील ऐतिहासिक उदाहरण पाहावयाचें झाल्यास श्रीसमर्थांचें **'आनंदवनभुवन'** हें प्रकरण वाचावें. त्यांत "बुडाला औरंग्या पापी म्लेंछसंहार जाहला । मोडलीं मांडलीं क्षेत्रें आनंदवनभुवनीं ।। बुडाले सर्वही पापी हिंदुस्थान बळावलें । अभक्तांचा क्षयो झाला आनंदवनभुवनीं ।। येथून वाढला धर्मू रमा धर्मसमागमें । संतोष मांडला मोठा आनंदवनभुवनीं ।। बुडाले भेदवाही ते नष्ट चांडाळ पातकी । ताडिले पाडिले देवें आनंदवनभुवनीं ।। उदंड जाहालें पाणी स्नानसंध्या करावया । निर्मळ जाहली पृथ्वी आनंदवनभुवनीं ।। " असें वर्णन आहे.

या सर्व वर्णनांत 'नष्ट, चांडाळ, पातकी' यांचा संहार झाल्यावरच पृथ्वी निर्मळ झाली आणि **'येथून वाढला धर्मू'** असें स्पष्ट म्हटलें आहे. तेव्हां अहिंसेनें आत्मबलिदान केल्यानें सत्ययुग प्रस्थापित होत नसून दुष्टांचा संहार करणें हाच सत्ययुग स्थापन करण्याचा मार्ग होय.

### उलटसुलट अनुभव

गांधीजींच्या हयातींतच त्यांना दोन्ही प्रकारचीं चित्रें पाहावयास मिळालीं आहेत. कानपूरच्या हिंदुमुसलमानांच्या दंग्यांत अत्याचार थांबविण्यासाठीं उपदेश करण्याकरितां म्हणून श्री. गणेश शंकर विद्यार्थी हे गांधीभक्त दंगेखोरांच्यामध्यें जाऊन उभे राहिले आणि फुकट बळी पडले; पण दंगा शांत झाला नाहीं. त्यानंतर दुसऱ्या पक्षाकडून जशास तसेंच नव्हे, तर शेरास सव्वा शेर असें सव्याज उत्तर मिळतांच दंगा शांत झाला. पूर्व बंगाल्यांतील काय अथवा पश्चिम पंजाबांतील काय दोन्ही ठिकाणच्या कत्तली, जशास तसें उत्तर मिळाल्यानेंच थांबल्या, हा अगदीं अलीकडचा गांधीयुगांतलाच अनुभव आहे. तो अनुभव दृष्टीआड करून अहिंसेनें दुष्टांचा पुंडावा मोडून काढून सत्ययुग स्थापण्याची भाषा गांधीजींच्या अनुयायांनीं सजवून पुढें मांडावी हा सत्यमार्ग नव्हे.

जगांतील परिस्थिति व अनुभव, निरपवाद सत्य व अहिंसा आचरणांत आणणें हें अशक्य होय, असें सांगत असतां आणि ही अशक्यता स्वतः गांधीजींनींहि मान्य केली असतां, "पूर्ण अपूर्णाप्रमाणें वागून अपूर्णांना पूर्ण करतील कीं, अपूर्ण पूर्णाचें ध्येय डोळ्यांपुढें ठेवून स्वतः तसें वागतील, तर पूर्णावस्थेच्या दिशेनें अखंड प्रगति करीत राहतील ?" असा प्रश्न श्री. देव हे विचारतात, हें आश्चर्य नव्हे काय ! अशक्य गोष्टीचें ध्येय डोळ्यांपुढें ठेवून प्रगति करावयाची म्हणजे काय करावयाचें ? तें ध्येय गांठावयाचें हाच याचा अर्थ ना ? पण जें ध्येय गांठणें अशक्य म्हणून तुम्हीच कबुली देतां, तें ध्येय गांठतां कसें येईल ? जर तें गांठतां येईल, तर त्याला तुम्ही अशक्य कां म्हटलें ? पूर्णावस्था प्राप्त होणें हें जर अशक्य, तर सिद्धावस्था प्राप्त झालेला सत्पुरुष, जेथपर्यंत जाऊं शकला, तेंच व्यावहारिक ध्येय म्हणणें उचित नव्हे काय ? मग त्या ध्येयापर्यंत पोंचलेल्याला अपूर्ण कां म्हणावें ? व्यवहारतः ज्या परमसीमेला सिद्ध पुरुष जाऊं शकतो तेथपर्यंत जो गेला, तोच या जगाच्या दृष्टीनें पूर्ण व तोच आदर्श. अर्थातच त्या परमसीमेपर्यंत जे येऊं शकले नाहींत ते मात्र अपूर्ण असून त्यांना हा सिद्धपुरुष आपण गांठलेल्या सीमेपर्यंत येण्याविषयीं आदर्श पाठ देतच असतो. अशा सिद्ध पुरुषाला व त्याच्या आदर्श पाठाला अपूर्ण ठरवून, काल्पनिक व अशक्य अशा आदर्शाच्या नादीं लागणें, हें मृगजळांतील पाणी अधिक स्वच्छ व गोड आणि वाटेंतल्या नदीचें पाणी अस्वच्छ व मचुळ मानून त्याचा त्याग करून तृषार्त स्थितींतच मृगजळाच्या आशेनें धांवून धांवून उरीं फुटण्यासारखें वेडेपणाचें होय. सारांश, शून्याच्या व्याख्येप्रमाणें प्रत्यक्ष आकृति काढणें हें अशक्य असल्यानें ज्यानें त्या व्याख्येच्या अगदीं समीप जाण्याची सीमा गांठली, त्याला अपूर्ण न मानतां व्यवहारतः पूर्ण मानून इतरांच्या पुढें तोच कित्ता ठेवल्यानें व्यवहार शक्य कोटीपर्यंत सुधारेल. अशक्य कोटीपर्यंत तो सुधारला नाहीं, म्हणून त्याची खंत बाळगण्यापासून लाभ कोणता ?

## तारतम्याचा अभाव

दुसरा एक महत्त्वाचा मुद्दा हे आक्षेपक दृष्टीआड करतात. व्याख्येप्रमाणें शून्य व रेषा यांची आकृति काढतां येत नाहीं, म्हणून व्याख्येच्या जितकें जवळ जातां येईल तितकें जवळ जाऊन थांबावें लागतें. पण जर एखादा कुशल लेखक त्याच्याहूनहि अधिक जवळ जाऊं शकला, तर त्यांत हानि नसून ती इष्टापत्तिच मानतां येईल; परंतु सत्य व अहिंसा यांच्या व्यावहारिक मर्यादा अशा बिंदूवर स्थिर होतात कीं, त्या मर्यादा ओलांडून सत्याच्या व अहिंसेच्या अधिक जवळ जाऊं पाहणें, हें व्यवहारतः समाजाच्या हिताचें वा कल्याणाचें न ठरतां व्यवहारांत निराळेंच संकट उद्भवण्याला कारणीभूत होतें. याचा अर्थ असा कीं, जेथें सत्याला व अहिंसेला ज्ञात्या पुरुषांनीं अपवाद सांगून परमसीमा घालून दिली, तेथें सत्पुरुषाची सत्य व अहिंसा यांच्या पालनाची शक्ति कुंठित झाली, एवढेंच नसून, सत्य व अहिंसा यांची समाजधारणेची व समाजाचें कल्याण करण्याची शक्तिच तेथें कुंठित होते, हेंच यांतलें मर्म आहे. त्या परमसीमेपलीकडे सत्य हें समाजाच्या हिताला विरोधक होतें. 'यल्लोकहितमत्यंतं तत्सत्यमिति धारणा' अशी सत्याची कसोटी आहे. ज्या उक्तीमुळें समाजाची धारणा न होतां उलट विघटना होते, त्या उक्तीला सत्य कसें मानावयाचें ? हाच न्याय अहिंसेलाहि लागू आहे. ज्या अहिंसेमुळें एका माणसाचा प्राण वांचला आणि शेंकडों माणसांच्या प्राणाला मुकावें लागलें ती अहिंसा नसून हिंसाच होय. सत्य व अहिंसा यांच्या व्यावहारिक सीमांचें उल्लंघन केल्यानें ही जी आपत्ति ओढवते, त्या आपत्तीचा विचार व ती आपत्ति दूर करण्याचा मार्ग यांची चर्चा श्री. देव यांनीं आपल्या लेखांत अगदींच टाळली आहे. "समाजाचें हित व धारणा डोळ्यांपुढें ठेवून पूर्ण पुरुषालाहि परिस्थितिसापेक्ष अपवाद अगर तडजोड त्यांत करावी लागते" असें टिळकांचें मत त्यांनीं उद्धृत केलें; पण टिळक तरी असा अपवाद करावा असें कां म्हणतात ? त्यांना काय सत्याचा व अहिंसेचा वीट आला आहे, का समाजाच्या हितार्थ तसा अपवाद करणें अपरिहार्य किंवा प्राप्त आहे ? याचा विचार करून एक तर तशा अपवादानें व तडजोडीनें समाजाचें कल्याण साधत नाहीं असें दाखवावें, नाहीं तर समाजाचें कांहींहि होवो, मला माझें सत्य सोडावयाचें नाहीं, असें म्हणून समाजाच्या कल्याणाची पर्वा न करतां सत्यपालन करणें, हेंच आमचें ध्येय असें तरी स्पष्ट सांगावें. या पेंचप्रसंगांतून सुटण्याकरितां देवांनीं या मुद्द्याला बगल दिली आहे आणि अशा पेंचप्रसंगांत कसें वागणें श्रेयस्कर आहे, हें सोदाहरण सिद्ध करणें टाळलें आहे.

## मर्यादातिक्रमानें घात होतो

सत्य व अहिंसा यांना कांहीं व्यावहारिक मर्यादा आहेत; त्या मर्यादांचें अतिक्रमण झालें कीं, सत्य व अहिंसा यांचें गुणत्व लुप्त होऊन त्यांना विगुणत्व येतें. याला उत्तम दृष्टान्त रामबाण औषधांचा. हेमगर्भमात्रा ही अत्यंत प्रभावी

आहे. काळाच्या दाढेंत गेलेल्यालाहि ती जीवदान देऊं शकते; पण ही मात्रा अत्यल्प प्रमाणांत दिली तरच ती गुणकारक होते. तें औषध घेण्याचें प्रमाण जर कोणीं उल्लंघिलें तर तीच मात्रा प्राणघातक होते. त्याचप्रमाणें सत्य व अहिंसा हे सद्गुण खरे, पण ते आपल्या मर्यादेंत असतील तोंपर्यंत. ती मर्यादा ओलांडून भलत्या ठिकाणीं त्यांचा प्रयोग केल्यास त्यापासून समाजाचा घात होतो. हेमगर्भाची मात्रा अल्पल्प प्रमाणांत वापरणें हें कांहीं दारिद्र्याचें व कंजूषपणाचें लक्षण नव्हे. अर्थातच जर कोणी मनुष्य अहंकारानें आपली श्रीमंती व उदारता दर्शविण्याकरितां ती मात्रा प्रमाणाबाहेर वापरूं लागला, तर तो रोग्याच्या घाताला कारणीभूत होईल. त्याचप्रमाणें जर कोणी मनुष्य सत्य व अहिंसा यांवरील आपल्या निष्ठेचें प्रदर्शन करण्याकरितां अतिरेक करील, तर तोहि समाजाचा उपकारकर्ता न ठरतां उलट समाजाचा अपकारकर्ताच ठरेल. जगांतील कोणताहि चांगला व्यवहार आणि कोणताहि सद्गुण निरपवाद आणि निर्मर्याद असूंच शकत नाहीं. दान देणें हें सत्कृत्य असलें तरी तें दान 'देशे काले च पात्रे च' असें मर्यादित असलें, तरच सुखाला कारणीभूत होतें. दानाला जशी ही मर्यादा आहे, तशीच सत्य व अहिंसा यांनाहि मर्यादा आहे. सत्याचें बंधन जो स्वतः पाळीत नाहीं, त्याच्याशीं सत्यानें वागण्याला कोणीहि बांधला गेला नाहीं. शत्रूला आपलें मर्मस्थान सांगणें, वधिकाला त्याचें वध्य, हिंसकाला त्याचें भक्ष्य सांपडवून देणें, हीं आपलीं कर्तव्यें नसून उलट वध्याचें रक्षण करणें हें आपलें कर्तव्य असल्यानें त्या कर्तव्याच्या आड येणारें सत्य हें सत्य नसून तेंच अनृत होय, आणि जें अनृत तें सत्य होय.

भवेत् सत्यं न वक्तव्यं वक्तव्यमनृतं भवेत् ।
यत्रानृतं भवेत् सत्यं सत्यं वाऽप्यनृतं भवेत् ॥
तादृशे मुह्यते बालो यत्र सत्यमनिश्चितम् ॥
न स्तेनैः सह संबंधान्मुच्यते शपथादपि ।
श्रेयस्तत्रानृतं वक्तुं सत्यादिति हि धारणा ॥
न कश्चिदस्ति पापानां धर्म इत्येष निश्चयः ।
तथाविधं च यो हन्यान्न स पापेन लिप्यते ॥

महाभारतांत वरील स्वरूपाचीं शेंकडों वचनें आहेत. त्यांतील सर्वांचें तात्पर्य हेंच कीं, करार एकांगी असूं शकत नाहीं, एका बाजूनें करार मोडला कीं, दुसरी बाजू आपल्या वचनांतून आपोआप मुक्त होते; त्याचप्रमाणें ज्यानें स्वतः सत्य, अहिंसादि धर्म सोडला त्याच्याशीं वागतांना आपल्यावर सत्य व अहिंसा पाळण्याचें बंधन राहात नाहीं. पाप्यांशीं वागतांना असत्य हेंच सत्यरूप आणि हिंसा हीच अहिंसारूप धारण करतें, असेंच शास्त्रकारांनीं समाजाच्या 'धारणपोषणाच्या कार्याकडे दृष्टि देऊन ठरविलें आहे. ज्यानें समाजाची धारणा न होतां उलट विधारणा होते तो धर्मच नव्हे :

JAN 1954

अधर्मरूपो धर्मो हि कश्चिदस्ति नराधिप।
धर्मरूपो ह्यधर्मश्च तच्च ज्ञेयं विपश्चिता ।।

अशा प्रकारचा पेंचाचा व अपवादाचा प्रसंग, दोन कर्तव्यांत झगडा उत्पन्न होतो, अशा वेळींहि उद्भवतो. ज्याला स्वतःच्या कल्याणाबरोबरच आपल्या कुटुंबियांचें, समाजाचें, राष्ट्राचें कल्याण साधावयाचें असेल आणि त्यांत एकाचें कल्याण साधतांना दुसऱ्याचें अकल्याण होत असेल, तर दोहोंतून कोणाचें कल्याण साधणें श्रेष्ठ व त्याकरितां कोणाच्या हिताचा बळी देणें युक्त होईल याचा विचार करावा लागतो. सर्व नात्यागोत्यांचा, घरदारांचा, समाजाचा संबंध सोडून देऊन केवळ संन्यस्त वृत्तीनें एकटा राहणारा जो यति असेल व ज्याच्यावर कुटुंबपोषणाची अथवा समाजसुधारणेची कांहींच जबाबदारी राहिलेली नसेल, तो स्वतःपुरता कोणताहि धर्म अगर नीतिनियम ठरवून घेऊन त्याप्रमाणें वागण्यास मोकळा असून, आपल्या वर्तनापासून राष्ट्रावर, समाजावर व इतर व्यक्तींवर कोणता परिणाम होईल याचा विचार त्यानें टाकून दिलेला असतो; परंतु समाजांत राहणाऱ्यांना त्यांतील एक वा अनेक व्यक्तींच्या कल्याणाची जबाबदारी स्वतःवर असल्याची जाणीव असते म्हणून त्यांना अशी बेपर्वाई करून चालत नाहीं. हाच भेद यतिधर्म आणि गृहस्थधर्म या शब्दांनीं व्यक्त केला जातो. लो. टिळक ज्या ज्या वेळीं हा नियम यतीला लागू आहे, राजाला किंवा गृहधर्मीयाला लागू नाहीं असें म्हणतात, त्या वेळीं त्यांच्या डोळ्यापुढें हाच भेद वागत असतो.

श्री. देव हे आपल्या लेखांत, पुराणांतील एक वचन उद्धृत करून असें लिहितात कीं, " येथें सत्याला अपवाद सांगितला नाहीं, आणि हा यतिधर्म आहे, गृहस्थधर्म नव्हे, असेंहि म्हटलेलें नाहीं. किंबहुना गार्हस्थधर्म व यतिधर्म हा भेद प्रथम नव्हता, तो पुढें करण्यांत येऊं लागला." या ऊहापोहांत श्री. देव यांना शास्त्रकारांच्या विवेचनपद्धतीचा विसर पडलेला दिसतो; आणि यति व गृहस्थ या शब्दांचे अर्थ त्यांनीं प्रत्यक्ष आश्रमधर्माच्या दृष्टीनें मर्यादित केलेले दिसतात. टिळक जेव्हां गृहस्थ व यति यांत भेद करतात, तेव्हां त्यांच्या नजरेसमोर प्रत्यक्ष संन्यासाश्रम स्वीकारलेला अथवा न स्वीकारलेला पुरुष असा मर्यादित अर्थ नसून, ज्याच्यावर इतरांच्या धारणपोषणाची जबाबदारी आहे तो गृहस्थ आणि ज्यानें ती टाकून दिली आहे तो यति ( मग त्यानें संन्यासाश्रम प्रत्यक्ष स्वीकारला असो वा नसो ) असें म्हणून ते विवेचन करीत असतात. शास्त्रकारहि अपवाद सांगतांना एकदां एखाद्या प्रकरणांत अपवादांचा ऊहापोह करून जातात; अर्थातच इतर ठिकाणीं सामान्य नियम सांगत असतांना, याला मागील अपवाद लागू आहेत, असें पुनश्च बजावीत नाहींत; पण तेवढ्यानें तो नियम अपवादानें बाधित होत नाहीं असें नाहीं.

### अपवादांची पुनरुक्ति करण्याची जरुरी नाहीं

पिनल कोडांत गुन्ह्याचें प्रकरण सुरू करण्यापूर्वींच सात वर्षांच्या आंत वय

असलेल्या अगर वेड्या माणसानें कांहीं केलें, तरी तो गुन्हा होत नाहीं आणि संकट-प्रसंगीं आत्मसंरक्षणार्थ एखाद्यानें कांहींहि केलें, तरी तो अपराध होत नाहीं, असे अपवाद सांगून ठेवले आहेत. त्यापुढील कोठल्याहि प्रकरणांत या अपवादांची पुनरुक्ति केली नसली, तरी ते अपवाद सर्वत्र लागू आहेतच. त्याचप्रमाणें शास्त्रकारांनीं एकदां अमुक प्रसंगीं अनृत भाषण अथवा हिंसा पाप नव्हे, असें एकदां सांगून टाकल्यावर, पुढें प्रत्येक नियमाच्या वेळीं त्या अपवादाचा पुनरुच्चार केलाच पाहिजे असें नाहीं. आणि श्री. देवांनीं उद्‌धृत केलेलें वचन तरी कोणतें, तर 'जे पुरुष या जगीं कधीं देखील खोटें बोलत नाहींत त्यांसच स्वर्गप्राप्ति होते' असें महादेवानें पार्वतीला सांगितलें हें. या ठिकाणीं श्री. देव हें विसरून जातात कीं, अपवादात्मक असत्य हें असत्य नव्हे, असें शास्त्रकार मानीत असल्यानें 'कधींहि खोटें बोलत नाहींत' या वचनाला अपवादात्मक अनृत भाषणानें बाध येत नाहीं, कारण तें भाषण 'अनृत' नसून 'सत्य'च होय असेंच शास्त्रकारांचें मत आहे. यज्ञांतील वध हा वधच नव्हे, असेंच शास्त्रकारांचें मत असल्यावर ज्यांनीं यावज्जन्म कधींहि हिंसा केली नाहीं तेच स्वर्गाला जातात, असें वचन लिहिणारे पुराणकर्ते, शंभर यज्ञ केलेल्या राजाला स्वर्गांत मज्जाव आहे असें मानतात, असें म्हणणें यथार्थ होईल काय?

व्यक्तिहित आणि समाजहित या दोहोंचा जेथें झगडा येतो तेथें समाजहिताकरितां ज्याप्रमाणें स्वतःच्या हिताचा त्याग करावा लागतो, त्याचप्रमाणें समाजहितासाठीं सत्य व अहिंसा यांचा त्याग करण्याचाहि प्रसंग येतो. ब्रूटस्‌सारख्या सच्छील व उदारमनस्क मित्रानें आपल्या मित्राला, ज्युलियस् सीझरला, ठार मारण्याच्या कटांत भाग घेतला. तेवढ्यावरून कांहीं ब्रूटस् हिंसेच्या वृत्तीचा म्हणतां येईल काय? रोमन राष्ट्राच्या कल्याणार्थ केलेला तो अहिंसाव्रताचा अपवाद होय.

### प्रायश्चित्तांतील रहस्य

सत्य व अहिंसा या व्रतांना असे अपवाद जर शास्त्रकारांनींच सांगितले आहेत, तर तशा अपवादात्मक कृत्यांना प्रायश्चित्त कशासाठीं सांगितलें आहे, अशी आक्षेपकांची शंका आहे. अपवादात्मक असत्य भाषण व हिंसा हीं जर पापेंच नव्हत, तर त्यांना प्रायश्चित्त सांगण्याची तत्त्वतः जरुरी नाहीं; परंतु मानवी स्वभावाची प्रवृत्ति लक्षांत घेऊन शास्त्रकारांनीं असल्या अपवादाची सबब निष्कारण उठल्यासुटल्या सांगू नये, त्याला आळा पडावा, म्हणूनच प्रायश्चित्त सांगितलें आहे. प्रायश्चित्ताच्या निमित्तानें तें कृत्य जगजाहीर होतें व त्या प्रसंगीं अपवाद मानण्याची आवश्यकता होती काय, याची छाननी होते. त्यांत त्या कृत्याचें अपरिहार्यत्व सिद्ध करण्याची जबाबदारी कर्त्यावर पडते. अशा जबाबदारीच्या जाणिवेनें मनुष्य सावधानतेनें व केवळ अपरिहार्य असेल तेव्हांच असत्य भाषणाला अथवा हिंसेला उद्युक्त होतो. शिवाय मोठ्या माणसांच्या आचरणाकडे लहानांचें लक्ष असतें. त्यांना तितका पोंच नसल्यानें एखाद्या महापुरुषानें बाह्यतः विपरीत भासणारें एखादें कृत्य केल्यास, इतर

लुंगेसुंगे लोक त्याच्याकडे बोट दाखवून स्वतः असत्य व हिंसा यांचा कारणाविना अवलंब करूं लागतात. अशा लोकांना शास्त्रमर्यादेंत राखण्याकरितां निष्पाप अशा मोठ्या लोकांनीं प्रायश्चित्त घेऊन लहानांच्यापुढें बंधनाचा धडा घालून देणें श्रेयस्कर असतें. न्यायमूर्ति रानडे यांनीं चहाप्रकरणांत मुकाट्यानें प्रायश्चित्त घेतलें तें कांहीं त्यांनीं आपल्या हातून पाप घडलें असें मानून त्याच्या निराकरणार्थ घेतलें नाहीं, तर आपल्या या कृत्याचा दाखला म्हणून मानून, वाटेल त्यानें वाटेल त्या परिस्थितींत अपेयपान केलें, तरी त्याला कांहींच धरबंध राहणार नाहीं, ही आपत्ति लक्षांत घेऊन, त्यांनीं प्रायश्चित्त घेतलें. याकरितांच मोठ्या माणसांनीं आपल्या वर्तनानें अज्ञ माणसांच्या मनांत गैरसमज उत्पन्न होऊं नये, म्हणून प्रायश्चित्त घेऊन सत्प्रवृत्तीचें पोषण करावें.

आपल्या मनाची शुद्धता ढळली नसल्यानें प्रायश्चित्ताची गरज नसली, तरी तपःसामर्थ्याच्या दृष्टीनें प्रायश्चित्ताचा उपयोग होत असल्यानें शास्त्रकारांनीं प्रायश्चित्त सांगितलें व सिद्धावस्थेंतील पुरुषानें प्रायश्चित्त घेतलें, तरी त्यांत गैरवाजवी कांहीं नाहीं. सर्वांभूतीं समभाव पाहणाऱ्या एकनाथांनीं महाराच्या घरीं भोजन केलें. त्यांत आपण कांहीं पाप केलें अशी त्यांची मनोदेवता सांगत नव्हती. तथापि, शास्त्राचा अनादर होऊं नये, भलत्यासलत्या माणसांनीं सिद्धावस्थेचें ढोंग करून शास्त्राज्ञा उल्लंघूं नये आणि समाजांत वाद माजून समाज विस्कळित होण्याचा प्रसंग येऊं नये यास्तव त्यांनीं प्रायश्चित्त घेतलें. याच विचारसरणीला अनुसरून धर्मराजानेंहि भारतीय युद्धसमाप्तीनंतर प्रायश्चित्तार्थ, अश्वमेध यज्ञ केला. तो यज्ञ केला नसता, तर पांडव हे पातकीच राहिले असते, त्यांच्या पापांची निष्कृति झाली नसती, असा त्याचा अर्थ नव्हे. 'नैवं पापमवाप्स्यसि' हें गीतेचें वचन धर्मानें अश्वमेध यज्ञ केल्यानें कांहीं खोटें ठरत नाहीं, त्याचप्रमाणें टिळकांनीं शास्त्रकारांनीं सांगितलेल्या प्रायश्चित्तांचा उल्लेख केला म्हणून सत्य व अहिंसा यांना सांगितलेले अपवाद खोटे ठरत नाहींत.

### कोडीं उलगडून दाखवा

असे अपवादाचे बिनतोड प्रसंग कसे येतात व अशा शृंगापत्तींतून बाहेर कसें पडावें, हा खरा वादाचा मुद्दा आहे व त्याचें स्पष्टीकरण श्री. देव यांनीं आपल्या लेखांत मुळींच केलें नाहीं. 'कर्मजिज्ञासा' हें प्रकरण पुनश्च वाचा, असें जें मी आपल्या लेखांत म्हटलें होतें, त्यांतला हेतु तीं कोडीं सोडून दाखविलीं जावीं, हाच होता. श्री. देव यांना पुनश्च सांगणें आहे कीं, तात्त्विक वादाचा धुरळा उगाच न उडवितां त्यांनीं नेमके पांच-दहा कोड्यांचे प्रसंग घ्यावे, त्यांत कसें वागलें असतां समाजाचें कल्याण साधतें, टिळकांच्या तत्त्वाप्रमाणें वागून तें साधतें, का गांधीजींच्या तत्त्वाप्रमाणें वागून तें साधतें, हें स्पष्ट उदाहरणानें सिद्ध करून दाखवावें आणि गांधीजींच्या अथवा त्यांना

मान्य असलेल्या इतर साधुपुरुषांच्या आयुष्यांत तसे प्रसंग उद्भवले असतां ते कसे वागले, हेंहि स्पष्टपणें सांगावें. ‘मी अपूर्ण आहें म्हणून मला सत्य व अहिंसा पूर्णत्वानें पाळतां आली नाहीं’ ही सबब पुढें करून निरपवाद सत्य व अहिंसा यांचें प्रतिपादन करीत सुटण्यापासून लाभ काय? जें गांधीजींना साधलें नाहीं, जें धर्मराजाला साधलें नाहीं, तें आचरण सामान्य माणसांच्यापुढें कित्त्यादाखल ठेवून काय उपयोग? काल्पनिक ध्येय सुष्टांनाच काय, पण दुष्टांनाहि तोंडपाठ असतें. पण व्यवहारांत प्रत्यक्ष आचरणालाच खरी किंमत असते. तेव्हां जें आचरण व्यवहार्य असून समाजहितसाधक असेल, त्या आचरणाचाच कित्ता समाजापुढें ठेवून समाज त्या पातळीपर्यंत वर चढेल, असे प्रयत्न करण्यांत स्वारस्य आहे. मृगजळाच्या पाठीमागें लागण्यांत स्वारस्य काय?

## शतायुषी हो, हा वर कां शाप?

टिळक आणि त्यांचें ‘गीतारहस्य’ आम्हांला खोटें बोलण्याला व हिंसा करण्याला सांगतात, असा त्यांच्यावर आरोप करणें म्हणजे, एखाद्यानें मुलाला ‘तूं शतायुषी हो’ असा आशीर्वाद दिला असतां, त्यानें त्याचा उलटा अर्थ करून, ‘मला तुम्ही शंभर वर्षानंतर मरणाचा शाप देतां!’ असा विपरीत वाद घालण्यासारखें आहे. आजच्या कलियुगांत शंभर वर्षें जगणें हीच परमसीमा आहे. ती ओळखून ‘शतायुषी हो!’ असें म्हणणें हा शाप नसून वरच आहे. सध्यांच्या काळांत शंभरी गांठतां आली, तर तो विक्रमच होय, हें दृष्टीआड करून, ‘मला शंभर वर्षेंच आयुष्य कां चिंतिलें, हजार वर्षें कां चिंतिलें नाहीं?’ असा वितंडवाद करणें हें सदभिरुचीचें लक्षण नव्हे. ‘हजार वर्षेंपर्यंत वांच’ असें म्हणण्यांत कांहीं आशीर्वाद देणाराच्या जिभेला न झेपण्यासारखे श्रम पडतात असें नाहीं. त्याचप्रमाणें ‘लोक हो, तुम्ही सत्य, अहिंसा इत्यादि धर्मलक्षणें निरपवाद पाळा, कोठेंहि कसल्याहि पेंचप्रसंगांत त्या धर्माला डावलूं नका, निरपवादपणें ते धर्म पाळतांना समाजाचें हित होईल का अहित होईल हें पाहण्याच्या भानगडींत पडूं नका, आपलें व्रत आपण पाळणें हाच श्रेष्ठ धर्म होय, मग त्या पायीं जगाचें कांहींहि होवो, असला पराकोटीचा संदेश रेखाटण्याला टिळकांची लेखणी असमर्थ होती असें थोडेंच आहे? शेंकडों ग्रंथ वाचून त्यांतून आधार शोधून काढून, व्यवहारांत उद्भवणारे पेंचप्रसंग लक्षांत घेऊन, हीं कोडीं कशीं सोडवावीं, याचा त्यांनीं बोधदीप पाजळला तो जनतेला श्रेयस्कर मार्ग दाखविण्याच्या हेतूनेंच पाजळला. निरपवाद सत्य व अहिंसा पाळा, असें सांगणें म्हणजे, मार्गांतले कांटेकुटे, खांचखळगे, सर्प विंचू इत्यादि अडथळे दिसूं नयेत व ते दिसल्यानें सरळ मार्ग सोडून जरूर तेथें आडवळण घेण्याचा मोह (?) पांथस्थाला पडूं नये म्हणून वाटेंतले सर्व दिवे मालवून टाकण्यासारखेंच होय. याला प्रगति व सुधारणा म्हणावयाचें असल्यास वावदूकांनीं तसें खुशाल म्हणावें; या सारासार

JAN 1954



विचार करणाऱ्या विवेकी माणसाला, गांधीजींनीं कोणतेंहि कोडें सोडवून आपला मार्ग सुलभ केला आहे, असें वाटणार नाहीं.

श्री. देव यांनीं आपल्या दुसऱ्या लेखांत महर्षि अरविंदबाबू यांच्या गीतेवरील निबंधांतला 'कुरुक्षेत्र' या प्रकरणांतला लांबलचक उतारा दिला, हें ठीक झालें. त्यावरून असे अडचणीचे प्रसंग किती अपरिहार्य आहेत तें दिसून येतें. त्या विवेचनांतून (१) जग जसें आहे तसें तें यथार्थानें जाणून घेतलें पाहिजे, (२) जगांत सर्वत्र हिंसा भरली असून जगाचा व जीवाचा विकास संघर्ष व युद्ध यांतूनच होत असतो, (३) जगाच्या व जीवाच्या सध्यांच्या विकासावस्थेंत आत्मबल हें हिंसेची जागा घेऊं शकत नसून, आत्मबल अखेरीस अधिक हिंसेलाच जन्म देतें, (४) जोंपर्यंत आपण मानवाच्या स्वभावांत परिवर्तन करूं शकत नाहीं, तोंपर्यंत एखादी व्यक्ति संघर्षापासून मुक्त होऊं शकणार नाहीं, (५) मानवी समाजाच्या उत्क्रान्तीच्या प्रक्रियेमध्यें गीतेनें युद्ध ही संस्था मान्य केली आहे इतके सिद्धान्त निघतात. तें मान्य केल्यानंतर मग जर कोणी भविष्यकाळांत जगांतून युद्ध नष्ट होईल व विश्वशांति प्रस्थापित होईल अशी आशा उराशीं बाळगून बसला, तरी त्याला त्या आशेला कवटाळून बसण्यास इतरांनीं हरकत घेण्याचें कारण नाहीं; मात्र तो भविष्यकाळ दृष्टीच्या टप्प्याच्या पलीकडे असल्यानें, वर्तमानकाळांत हिंसा अपरिहार्य आहे असें समजून तदनुसार चालणारास दोष देतां येत नाहीं.

### अपवाद मानण्यापेक्षां अहंकाराचा दोष मोठा

जेथें समष्टि किंवा समाज संघर्षापासून अलग राहूं शकत नाहीं, तेथें एखाद्या व्यक्तीनें 'मी त्या संघर्षांत हात गुंतविणार नाहीं, माझ्या हाताला रक्ताचा कलंक लागूं देणार नाहीं' असा डौल मिरविणें हा अहंकार कर्तव्यच्युतिदर्शक नाहीं काय? सध्यांच्या जगाच्या अपूर्णावस्थेंत आत्मबल हें हिंसेची जागा घेऊं शकत नाहीं, हें मान्य केल्यावर एखाद्या महात्म्यानें स्वतःच्या तत्त्वासाठीं, 'मी हिंसेनें हात विटाळणार नाहीं' असें म्हटलें आणि दुसऱ्यानें हिंसा पत्करून सार्वजनिक कल्याण साधलें, तर या दोहोंत कर्तव्यच्युत कोण व कर्तव्यदक्ष कोण हें काय सांगावयाला पाहिजे? अपरिहार्य गोष्ट हीन स्वरूपाची दिसते, म्हणून इतरांना ती करावयाला सांगणें व स्वतःचे हात कसे स्वच्छ, निर्मळ आहेत असें म्हणून शेखी मिरविणें, हें साधुपुरुषाला शोभत नाहीं. कोणी तरी दुष्टाचें निर्दालन केल्याशिवाय दुष्ट प्रवृत्ति नष्ट होत नाहीं, हें उघड दिसत असतां, दंडनाचें कार्य स्वतःकडे घ्यावयाचें नाहीं, आणि दुसऱ्यानें तें स्वतःकडे घेऊन तें पार पाडल्यावर, इतरांबरोबर त्याचा फायदा घ्यावयाला मात्र पुढें येऊन, ज्यानें शत्रूचें मर्दन केलें त्याला हिंसक म्हणून वरतीं हिणवावयाचें, ही वृत्ति कशाची द्योतक आहे तें श्री. देव प्रभृतींनीच सांगावें. आम्हांस तर यांत कर्तव्यच्युति, दंभ आणि साधुत्वाचा अहंकार प्रतीत होतो.

पुराणांतील कथांचें मर्म न जाणल्यानें त्या कथेंतून जें तत्त्व ग्रहण करावयाचें

तें सोडून त्या कथेचें भलतेंच तात्पर्य मानलें जातें. धेनुहरणाचीच कथा पाहा. तींत वसिष्ठानें कामधेनूला सांगितलें कीं, ‘ मी शमदमसंपन्न ब्राह्मण आहें, मी विश्वामित्राशीं लढून तुला सोडवूं शकत नाहीं. ’ तेव्हां कामधेनूनें आपल्या अंगापासून म्लेंच्छ, यवन, शबर, शक निर्माण केले व त्यांनीं विश्वमित्राचें सैन्य झोडपून काढून कामधेनूची मुक्तता केली. या ठिकाणीं वसिष्ठाच्या ‘शांती’चे गोडवे गाण्यासारखें काय आहे ? कामधेनूची मुक्तता अखेरीस तिनें निर्माण केलेल्या सैन्याच्या पराक्रमानेंच झाली; शांतीनें झाली नाहीं. द्रौपदीच्या वस्त्रहरणाची निष्कृति भीमानें दुःशासनाचा कंठनाळ चिरूनच केली. भक्त प्रल्हाद याची सुटका हिरण्यकशिपूचें पोट फाडून त्याला यमलोक दाखविल्यावरच झाली. याचप्रमाणें कोठलीहि कथा घ्या; तींत आत्मबल, अहिंसा, शांति इत्यादि साधनांनीं दुष्कृत्यांची कड लावली गेली नसून देहान्तशासनानेंच त्यांची तड लावली गेली आहे.

योगी अरविंदबाबू यांनीं हाच सिद्धान्त आपल्या गीतेवरील निबंधांतील ‘कुरुक्षेत्र’ या प्रकरणांत सविस्तर मांडला आहे व श्री. देव यांनीं त्यांतील निष्कर्ष मान्य केला आहे. एवढेंच नव्हे तर, अर्वाचीन संतमंडळींनींहि व्यवहाराचा धर्म मोक्षधर्माहून वेगळा मानला आणि वैयक्तिक जीवन व सामाजिक जीवन असा भेदहि त्यांनीं सदैव डोळ्यांपुढें ठेवला. अशा रीतीनें गीतेपासून तों तुकाराम-रामदासांपर्यंत सर्वांनींच लो. टिळकांच्याप्रमाणें व्यवहारांत व राजकारणांत सत्य व हिंसा हे सद्गुण निरपवाद पाळतां येत नाहींत हें मान्य केल्यावर, गांधीजींचे सत्याचे प्रयोग व्यवहाराला लागूं पडूं शकत नाहींत, हें ओघानेंच सिद्ध झालें; पण हें मान्य करणें जिवावर येऊन श्री. देव लिहितात कीं, “ या सृष्टींतहि मानवी प्राणी केव्हां तरी पूर्णावस्थेला जाऊन धर्मानें व्यवहार करूं लागणार; त्याकरितां सम्यग् मार्ग शोधून काढला पाहिजे. याकरितांच अरविंदबाबूंनीं साधना केली आणि गांधीजींचे प्रयोगहि त्याकरितांच चालले होते. ही पूर्णावस्था येण्याला कदाचित् शेंकडों, हजारों वर्षें जातील; पण अशी पूर्णावस्था प्राप्त होईल, अशी श्रद्धा बाळगून तिच्याकरितां प्रयत्न करणें हें श्रेयस्कर होय. ”

### कल्पित भविष्यकाळासाठीं आदर्श

या विधानानें आजच्या व्यवहाराच्या प्रश्नांतून हळूच अंग काढून घेऊन, हजारों वर्षांनीं कदाचित् प्राप्त होणाऱ्या पूर्णावस्थेसाठीं निरपवाद सत्य व अहिंसा यांचा उपदेश आहे, असें श्री. देव यांनीं स्वतःच मान्य केल्यानें, हा वाद येथेंच संपतो. गीताकार, महर्षि व्यास, ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदास इत्यादि संत आणि लो. टिळक हे आपापल्या काळांतल्या विद्यमान पिढीसाठीं व्यावहारिक सन्मार्ग सांगत आहेत व तो सांगतांना त्यांनीं सत्य व अहिंसा यांना अपवाद मानले हें व्यवहाराला धरूनच झालें. गांधीजी हे भविष्यकाळांतल्या कल्पित मानवी समाजासाठीं पूर्णावस्थेचे धडे देत आहेत. त्या वर्गांत बसण्याची इच्छा पूर्ण होण्याची

वेळ आल्यावर आम्हीहि त्यांचा निरपवाद मार्ग मान्य करूं; पण तशी संधि येण्यापूर्वी आजच्या संघर्षांत जगावयाचें कसें, हा जगापुढें प्रश्न आहे. या प्रश्नाचें उत्तर गीतेनें, लो. टिळकांनीं आणि महाराष्ट्रीय साधुसंतांनीं जें दिलें आहे, तेंच पटण्यासारखें व श्रेयस्कर आहे. कल्पित परिस्थितींतलें कल्पित उत्तर बरोबर आहे का चूक आहे याचा तात्त्विक वाद केला, तरी ज्या उत्तराचा ताळा पाहतां येत नाहीं, त्या उत्तराच्या खरेंखोटेंपणाविषयीं काथ्याकूट कशाला ? लो. टिळक हे आजच्या समाजाला उत्तम मार्गदर्शन करीत आहेत; गांधीजींचा उपदेश सध्यांच्या समाजाला लागूच नाहीं; मग तो गीतेच्या पुढें का मागें, या शाब्दिक वादांत अर्थ काय ? आजच्या पिढीला गांधीजींच्या उपदेशांत प्रकाश दिसत नसून अंधारच दिसतो.

आपद्धर्म, कणिकनीति, कूटव्यवहार, जशास तसें हा न्याय आणि सद्धर्माचे अपवाद यांची चर्चा केल्यास सद्धर्मावरील दृष्टि ढळून अपवाद हाच नियम होऊन बसेल, अशी जी शंका आक्षेपकांनीं दर्शविली आहे, ती शंका शास्त्रकारांना व आधुनिक ग्रंथकारांना आली नव्हती असें नाहीं. महाभारतकारांनींच याविषयीं किती दक्षता घेतली आहे ती पाहा. आपद्धर्म सांगण्यापूर्वी भीष्म धर्मराजाला बजावतात कीं,

उपायं धर्मबहुलं यात्रार्थं शृणु भारत ।
नाहमेतादृशे धर्मे बुभूषे धर्मकारणात् ॥

"लोकव्यवहारासाठीं 'उपाय' म्हणून मी हा मार्ग तुला सांगतों, तो ऐक. हा मार्ग 'धर्मबहुल' आहे, शुद्ध धर्म नव्हे, आणि धर्मोपदेशास्तव म्हणून मी हा असला ( शबल ) धर्म सांगण्याची इच्छा धरीत नाहीं." त्यानंतर कणिकनीति सांगितल्यावर भीष्म म्हणतात, 'इतीदमुक्तं वृजिनाभिसंहितं न चैतदेवं पुरुषः समाचरेत् । परप्रयुक्तस्तु कथं विभावयेदतो मयोक्तं भवतो हितार्थिना ॥' कौटिल्यानें अर्थशास्त्रांतहि अनेक कुटिल उपाय सांगून शेवटीं असा इशारा दिला आहे कीं, 'हे कुटिल उपाय आत्मसंरक्षणार्थ आहेत, चांगल्या राजानें दुसऱ्यास फसविण्याकरितां यांचा अवलंब करूं नये.' 'जशास तसें' या न्यायांतहि दुसऱ्यानें आधीं आगळीक केली, तर मग त्याच्या प्रतिकारार्थ कसें वागावें तें सांगितलें आहे. कपटनीतीचा 'श्रीमन्महा' आपणच आधीं करावयाचा नसतो. दासबोधांतहि कपटी शत्रूचें आचरण पारखतां यावें म्हणून कपटनीतीचीं लक्षणें सांगितलीं आहेत, स्वतः तसें आचरण करण्यासाठीं नव्हे, असा इशारा देऊन ठेवलाच आहे. 'किरातार्जुनीयां'तहि 'भवन्ति मायाविषु ये न मायिनः' म्हणजे दुसऱ्यानें कपट केलें असतां त्याच्यावर जे तें कपट उलटवूं शकत नाहींत, त्या मूर्खांचा पराभव होतो, असें म्हटलें आहे; आणि 'गीतारहस्यां'त टिळकांनीं हे सर्व उतारे देतांना त्या त्या ठिकाणीं हे अपवाद प्रतिकारार्थ आहेत, नित्यधर्म म्हणून नव्हत, असेंच सांगितलें आहे. इतकी दक्षता घेऊन समाजाच्या हितार्थ म्हणून जे

उपाय सांगितले, त्या उपायांनीं समाज अधोगतीला जातो असा आक्रोश करणें, हें दांभिकतेचें लक्षण होय. वास्तविक पाहतां या ठिकाणीं भाषेंतील शब्दांची उणीवच नडते, असें मी माझ्या मूळ लेखांत दाखविलें होतें. त्या शंकेला कोणींहि उत्तर दिलें नाहीं अथवा नवे शब्द सुचविले नाहींत. व्यवहारांत मुलीच्या रूपाचें वर्णन करण्याला गोरी व काळी हे दोनच शब्द रूढ आहेत. हें भाषादारिद्य होय. कारण, शेंकडा ९० मुली केवळ गोऱ्या नसतात किंवा केवळ काळ्या नसतात. अशा परिस्थितींत एखाद्यानें मोघमपणें 'आम्हांला मुलगी गोरी असेल तर पसंत, काळी असेल तर नापसंत' असा नियम सांगून ठेवल्यास व्यवहार कुंठितच होईल. त्याचप्रमाणें 'केवळ सत्य व अहिंसा ग्राह्य, असत्य व हिंसा त्याज्य; केवळ धर्म ग्राह्य, अधर्म अग्राह्य' असा नियम सांगितल्यानें व्यवहार अडूनच राहतो. कारण सत्य व असत्य, हिंसा व अहिंसा, धर्म व अधर्म यांच्या दरम्यान इतक्या विविध सूक्ष्म छटा आहेत कीं, त्यांना केवळ हें किंवा तें एकच नांव देतां येत नाहीं. हीच अडचण गीतेनें 'किं कर्म किमकर्मेति कवयोऽप्यत्र मोहिताः' या श्लोकांत व्यक्त केली आहे. यालाच अनुसरून महाभारतांतहि शांतिपर्वांत –

अधर्मरूपो धर्मो हि कश्चिदस्ति नराधिप ।
धर्मरूपो ह्यधर्मश्च तच्च ज्ञेयं विपश्चिता ।।

असें म्हटलें आहे. वरकरणी धर्म भासला, तरी तो अधर्म ( समाजघातक ) असूं शकतो; त्याच्या उलट बाह्यतः एखादें कृत्य अधर्माचें वाटलें, तरी त्यापासून समाजाचें कल्याण साधणारें असल्यानें तें कृत्य धर्मरूप असतें. असल्या या बाह्य रूपाहून अंतर्गत रूप वेगळें असणाऱ्या बाबींचा विचार श्री. देव यांच्या लेखांत मुळींच नाहीं, म्हणजे खरे जे अडचणीचे प्रश्न ते टाळून नुसत्या सत्यासत्य, हिंसा-अहिंसा या दोन खुंटांच्या भोंवतीं ते घिरट्या घालीत आहेत; परंतु अशा घिरट्या कितीहि घातल्या तरी डाव जसा संपत नाहीं, त्याप्रमाणें पेंचप्रसंगाचें कोडें उलगडत नाहीं.

### दोन धर्मांतील विरोध

दुसरा एक वादाचा मुद्दा त्यांनीं अजिबात टाळला आहे. तो मुद्दा म्हणजे दोन धर्मांतीलच झगडा हा होय. सत्य व असत्य अहिंसा व हिंसा, धर्म व अधर्म या जोड्यांतून पहिली ग्राह्य, दुसरी अग्राह्य, हें आपाततः तरी सांगतां येतें. पण जेथें धर्म व अधर्म असा विरोध नसून, दोन धर्मांतच विरोध येतो, तेथें कोणता तरी एक धर्म टाकून दुसऱ्याचा अवलंब करावा लागतो. अशा ठिकाणींहि एका धर्माचा त्याग करावा लागतो. असें म्हणतांच धर्म टाकून अधर्माची कांस धरण्याला सांगितलें, असा आक्षेप श्री. देव हे घेणार काय ? मातेची आज्ञा पाळणें हाहि धर्म व पित्याची आज्ञा पाळणें हाहि धर्मच; परंतु माता व पिता यांनीं परस्परविरुद्ध आज्ञा दिल्या, तर मुलानें काय करावें ? पित्राज्ञा आणि राजाज्ञा यांत विरोध आल्यास

एका आज्ञेचा अव्हेर करावाच लागणार ना? श्रीरामालाच असें कोडें पडलें कीं, पतिधर्म आणि प्रजापालनधर्म या दोहोंतून कशास अधिक महत्त्व द्यावें? श्रीरामानें राजा या नात्यानें प्रजापालनधर्म अधिक श्रेष्ठ मानला; पण त्याकरितां त्याला नांवें ठेवणारे शेंकडों आक्षेपक आहेत. आणि समजा कीं, त्यानें स्त्रीदाक्षिण्य आणि पतिधर्म श्रेष्ठ मानून सीतेचा त्याग केला नसता, तरी देखील त्याला राजधर्माचें उल्लंघन केल्याबद्दल दूषण देणाऱ्या लोकांची संख्या कांहीं कमी भरली असती असें नाहीं.

असाच विरोध राष्ट्र किंवा समाज यांचें कर्तव्य आणि कौटुंबिक कर्तव्य या दोहोंमध्यें येतो. आद्य श्रीशंकराचार्य यांनीं धर्मकार्यार्थ संन्यास स्वीकारण्याचें ठरविलें, त्या वेळीं मात्राज्ञा आडवी आली. श्रीसमर्थांनाहि तीच अडचण भासली. या उभयतांनींहि मातेची एक प्रकारें प्रतारणा करूनच संसारशृंखला टाळली. त्यावरून त्यांना सत्यधर्म अमान्य होता व त्यांनीं असत्यधर्माचा पुरस्कार केला, असें समजावयाचें काय? गांधीजींनीं देखील सत्याग्रहाच्या कर्तव्यापायीं दूध न पिण्याची प्रतिज्ञा मोडलीच कीं नाहीं? दुसरें उदाहरण द्यावयाचें झाल्यास दांडी-प्रवासाचें देतां येईल. दांडीलां समुद्रतीरावर जाऊन त्यांनीं कायद्याविरुद्ध तेथील मीठ 'चोरलें' आणि स्वतः 'निमकचोर' असल्याची शेखी मिरविली. त्याच सत्याग्रहांत लोकनायक बापूजी अणे यांनीं सरकारी जंगलांतील गवत परवानगीविना तोडून आपल्यावर 'गवताच्या चोरी'चा आळ ओढून घेतला व त्यांस 'गवतचोर' म्हणून शिक्षा झाली. धर्मराजाच्या 'नरो वा कुंजरो वा' या वाक्यानें जर जगांत सत्यधर्माचा लोप होऊन असत्यधर्म बोकाळला असें मानावयाचें, तर 'निमकचोरी' 'गवतचोरी' यांच्या उदाहरणानें चोरी करण्याची प्रवृत्ति समाजांत वाढेल असें कां मानूं नये?

## शुद्धबुद्धीचें महत्त्व

सारांश, या सगळ्या विरोधांत, पेंचप्रसंगांत व अपवादांत कर्त्याची शुद्धबुद्धि हीच धर्माची कसोटी होय; आणि तशी शुद्धबुद्धि हीच साधनशुचिता होय.

माणसांची नीतिमत्ता सुधारण्याला त्यांच्या बुद्धीला शुद्ध वळण लागलें पाहिजे. बाह्यतः शुद्ध भासणाऱ्या कर्मांची बाह्येंद्रियांकडून तालीम करवून घेतल्यानें मनुष्याच्या बुद्धीला चांगलें वळण लागलें असें मानणें चुकीचें होय. कारावासांतील कडक बंदोबस्तामुळें तेथें चोरी, खून, व्यभिचार न करतां दहा दहा वर्षें 'शुद्धाचरणी' राहिलेले अट्टल सोदे तुरुंगांतून बाहेर पडल्यावर दहा दिवसाहि गुन्हा न करतां राहात नाहींत. कारण, त्यांच्या बुद्धीवर शुद्ध संस्कार झालेला नसतो. कारावासांत केवळ कायिक शुद्धतेकडेच लक्ष पोंचविलें जातें, त्याचा हा परिणाम होय. समाजांत मानसिक व बौद्धिक शुद्धतेच्या कसोटीवरून मनुष्याचा भलेपणा पारखला जातो. कर्माचें बाह्य स्वरूप श्रेष्ठ का अंतःस्वरूप (मानसिक व बौद्धिक स्वरूप) श्रेष्ठ, असा प्रश्न निघाल्यास कोणींहि अंतःस्वरूप श्रेष्ठ असेंच

उत्तर देईल. कायिक, मानसिक व बौद्धिक शुद्धता ही जर एकाहून एक अधिक श्रेष्ठ, तर बौद्धिक शुद्धतेबरोबर प्रसंगवशात् कायिक शुद्धता न साधली, तरी तो दोष मानतां येणार नाहीं. कारण, अंतःस्वरूपांत व बाह्य स्वरूपांत व्यवहारांत अनेक वेळां उघड विरोध असतो. यास्तवच भारतकारांनीं –

अकार्यमपि कार्यार्थं क्रियते यत्र कर्मसु ।
एतस्मिन् कारणे कर्ता न दोषं प्राप्तुमर्हति ॥

असें म्हणून सत्कार्य साधण्यासाठीं तदन्तर्गत एखादें अकार्य केलें, तरी दोष लागत नाहीं असें म्हटलें आहे.

श्रीमद्भगवद्गीतेच्या १७ व्या अध्यायांत यज्ञ, दान, तप हीं कार्यें 'सत्कार्यें' आहेत असें म्हणून ' कर्म चैव तदर्थीयं सदित्येवाभिधीयते ' या वचनानें यज्ञ, दान, तप इत्यादि सत्कार्यें घडवून आणण्यासाठीं तदंगभूत जें जें कर्म तेंहि 'सत्' मानलें जातें, असा निर्णय दिला आहे. अर्थातच या सगळ्यांत कर्माच्या बाह्य स्वरूपापेक्षां शुद्धबुद्धीच्या कसोटीलाच गीतेनें प्रमाण मानिलें आहे. टिळकांनींहि शुद्धबुद्धि हेंच सदाचरणाचें व नीतीचें अधिष्ठान मानलें आहे. हें अधिष्ठान स्वच्छ, निर्मल असावें असा आग्रह धरणारे टिळक हे साधनशुचितेचें महत्त्व प्रतिपादीत नाहींत आणि कर्माच्या बाह्य स्वरूपाकडेच लक्ष देणारे आक्षेपक मात्र साधनशुचितेचें महत्त्व जाणतात, असें प्रतिपादणें हा विपरीत न्याय नव्हे काय?

---

# कर्मयोगाची चतुःसूत्री : : : : : : ६

**कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ।**
**मा कर्मफलहेतुर्भूः मा ते संगोऽस्त्वकर्मणि ॥**

गीतेंतील सर्वशास्त्रार्थसूत्रणनामक द्वितीयाध्यायांतला हा ४७ वा श्लोक आहे. **लो. टिळकांनीं** आपल्या 'गीतारहस्यां'त या श्लोकाला '**कर्मयोगाची चतुःसूत्री** ' असें म्हणून गौरविलें आहे; आणि खरोखरच तो श्लोक '**चतुःसूत्री**' मानण्याइतका महत्त्वाचा आहे.

या चतुःसूत्रीचा विचार करतां करतां असें लक्षांत येतें कीं, या श्लोकांत कर्मयोगाचीं मूलभूत अशीं तत्त्वें ग्रथित केलीं असल्यामुळें तो श्लोक महत्त्वाचा तर आहेच, पण त्याशिवाय त्या श्लोकाची रचना तर्कशास्त्राला व कार्यकारणभावाला धरून आहे. तथापि या श्लोकांतील कार्यकारणभावाचें स्पष्टीकरण जसें व्हावें तसें

( सह्याद्रि, मे १९४९ )

झालेलें माझ्या पाहण्यांत नाहीं, आणि जो कार्यकारणभाव यांत सांगितला आहे असें मानलें जातें तो असावा तसा निस्संदिग्ध नाहीं. यासंबंधाची चर्चा मी माझ्या 'गीतातत्त्वमंजरीं'त केली आहे. तेव्हां पुनश्च तितका सगळा ऊहापोह येथें करण्याचें प्रयोजन नाहीं; तथापि 'कर्मावरच तुझा अधिकार आहे' म्हणजे काय? फलावर तुझा अधिकार नाहीं, हें म्हणणें शास्त्राला धरून आहे काय? फलावर जर अधिकारच नसेल तर त्याची आशा धरूं नको हें सांगण्यांत स्वारस्य काय आणि इतकेंहि करून कर्म न करण्याचा आग्रह तूं धरूं नको असा निषेध पूर्वीच्या तीन चरणांतून कसा निष्पन्न होतो, या शंकांचीं उत्तरें नीट देतां यावीं या दृष्टीनें विचार करून मी त्या श्लोकाचा अर्थ बसविला आहे, आणि त्यांत अशा शंकांना जागा राहत नसून, चारी चरणांचा परस्परांशीं कार्यकारणभाव सुसंगत कसा लागतो तें दाखविलें आहे.

### प्रकरण-संगति

हें सगळें प्रकरण वेदानें सांगितलेले विधिनिषेध व आपलें तत्संबंधीं धोरण यासंबंधाचें आहे. यांत कर्मविधि सांगण्याचा अधिकार वेदाचा आहे हें आपण मानतों व गीतेनेंहि तें मानलें आहे, म्हणूनच गीतेचा कर्मयोगावर एवढा कटाक्ष आहे. कर्मयोग म्हटला कीं, त्यांत कर्म करण्याचा आदेश आणि कर्माचें फल टाकण्याविषयीं उपदेश येतो. अर्थातच कर्म करणें सोडूं नये आणि फलाची तर आशा धरूं नये, या दोन्ही गोष्टी साधावयाच्या असतील तर, कर्म आणि त्याचें फल यांतला संबंध तोडतां येतो, हें आधीं सिद्ध झालें पाहिजे; नाहीं तर निष्काम कर्माचा उपदेश वायफळच होय. कर्म आणि त्याचें फल यांचा संबंध जर गाय व वासरूं यांच्यासारखा न तुटण्यासारखा असेल, तर कर्म कर आणि फलहेतु धरूं नको, असा उपदेश 'वदतो व्याघाता'सारखा ठरेल. तसा तो विसंगत नाहीं, सुसंगत आहे, हें आधीं सांगणें जरूर होतें आणि कर्मयोगाच्या उपदेशाच्या प्रारंभींच गीतेनें या ( २–४७ ) श्लोकांत तें सांगितलें आहे.

### विधि व अर्थवाद यांतला भेद

वेदानें नित्य कर्में सांगितलीं म्हणजे तो विधि होतो व त्याचें उल्लंघन करतां येत नाहीं; परंतु त्या कर्मांचें फल स्वीकारणें हा कांहीं विधि नव्हे. फलाची अपेक्षा धरणें वा न धरणें हें कर्त्याच्या इच्छेवर अवलंबून आहे. अर्थातच कर्मकर्त्याला जर फलाची इच्छा नसेल तर त्याच्या इच्छेविरुद्ध वेद कांहीं तें फल कर्त्यावर लादत नाहीं. कर्तव्य सांगणें हें वेदाचें काम आहे, फलाचा उपभोग घे असें सांगणें हें कांहीं वेदाचें काम नाहीं. म्हणून फलत्याग करण्याला कर्ता स्वतंत्र आहे, पण कर्मत्याग करण्याला तो स्वतंत्र नाहीं. कारण वेदनिर्दिष्ट कर्में न केल्यास प्रत्यवायदोष येतो. सारांश, कर्म व त्याचें फल या दोहोंची ताटातूट होऊं शकते. त्यांत वेदाज्ञेनें कर्म सांगितलें आहे म्हणून त्याचा त्याग करूं नये, आणि फल स्वीकार-

ण्याचा आग्रह वेद करीत नाहीं, म्हणून फलत्याग करण्याला कर्ता मुखत्यार आहे, असे चार वाक्यांश या चतुःसूत्रींत आहेत. या श्लोकांतील पहिला चरण व चौथा चरण यांत कार्यकारणसंबंध आहे आणि दुसरा व तिसरा चरण यांत कार्यकारणसंबंध आहे. अर्थातच यांतली कोणतीहि आज्ञा केवळ जुलमानें लादलेली नाहीं. आपण सर्व वेदमार्गी लोक वेदाची आज्ञा शिरसामान्य करणारे आहों, म्हणून वेदानें जें कर्म कर म्हणून सांगितलें तें करणें प्राप्त आहे, असें पहिल्या चरणांत सांगितलें; परंतु कर्माचें फल बंधक होतें त्याची वाट काय, अशी शंका येईल म्हणून लगेच दुसऱ्या चरणांत सांगितलें कीं, फल स्वीकारण्याविषयीं वेदाची सक्ती नाहीं. कर्म व फल यांची अशी ताटातूट केल्यावर तिसऱ्या चरणांत सांगितलें कीं, फलाशा बंधक आहे म्हणून फलाची आशा तेवढी टाक; परंतु वेदाची आज्ञा मानावयाची असल्यानें वेदोक्त कर्मच टाकून देईन असा आग्रह धरूं नको, असें चौथ्या चरणांत बजावलें.

### मराठी समश्लोकीचे विविध पर्याय

हा अर्थ मराठी समश्लोकींत बसविला असतां तो वाचकांच्या तोंडीं रूढ होईल. मूळ संस्कृत श्लोक संस्कृत जाणणारांच्याच तेवढा तोंडीं असतो, त्याऐवजीं तो अधिक रूढ व्हावा म्हणून त्याची मराठी समश्लोकी देण्यांत येत आहे. त्याचबरोबर संस्कृत श्लोकाचा जो रूढ अर्थ गीताभक्तांच्या बुद्धींत घर करून बसला आहे, त्याच्या जागीं त्याच श्लोकाचा सुसंगत अर्थ सुलभतेनें मनांत ठसावा म्हणून त्या समश्लोकीचे अनेक पर्याय याखालीं देण्यांत येत आहेत. समश्लोकी करतांना मूळच्या श्लोकांतल्या शब्दाला प्रतिशब्द ठेवण्यां-शिवाय अन्य फरक करूं नये असा दंडक आहे. पण मूळच्या श्लोकांत 'अधिकार' हा शब्द सापेक्ष आहे, 'अधिकार' कोणाचा हें जाणण्याची अपेक्षा राहते. ती पूर्ण करण्याकरितां पूर्व संदर्भावरून वेद शब्द अध्याहृत घ्यावा लागतो आहे. फलाशा टाकावी म्हणून सांगितलें पण ती बंधक आहे म्हणून टाकावी हें कारण सांगितलेलें नाहीं आणि कर्म न करण्याचा आग्रह धरण्यांत वेदाज्ञेचें उल्लंघन होतें, हा कार्यकारण-भावहि गर्भितच आहे. तेव्हां समश्लोकींत ही संदिग्धता न राहावी म्हणून अनेक पर्याय सुचविले आहेत. ज्या ठिकाणीं लक्षणा अभिप्रेत असते अथवा वाक्यार्थ ध्वनीनें सुचविला जातो, तेथें भाषांतर करतांना स्पष्टीकरणार्थ अधिक शब्द घालावेच लागतात. 'गंगायां घोषः' याचें भाषांतर करतांना 'गंगेच्या कांठीं असलेला गौळवाडा' इतका विस्तृत अर्थ करावा लागतो. त्याच न्यायानें पुढील समश्लोकीचे पर्याय मूळ श्लोकाला धरूनच पण संदिग्धपणा जाण्यासाठीं अधिक स्पष्ट केले आहेत असें समजावें.

### चतुःसूत्रीचा समश्लोकी अनुवाद

नियुक्त अससी कर्मीं फलभोगीं न तूं तसा।
फलहेतु नको ठेवूं अकर्माग्रहही नसो ॥ १ ॥

कर्म आज्ञापितो वेद फलभोग न तो तसा ।
गुणावह फलत्याग कर्म-संन्यास वावगा ॥ २ ॥
कर्म नेमियलें वेदें फल केवळ ऐच्छिक ।
करावा फलसंन्यास कर्तव्यत्याग ना करी ॥ ३ ॥
वेद सांगे कर्मविधि न म्हणे फळ घेच तूं ।
म्हणोनी फल टांकू ये न टाकी कर्म तूं हठें ॥ ४ ॥
वेदाची चोदना कर्मी फल घेण्या न चोदना ।
नको धरूं फलाकांक्षा नुल्लंघी कर्मचोदना ॥ ५ ॥
वेदाधीन तुझीं कर्में फलत्यागीं स्वतंत्र तूं ।
म्हणोनी फल टाकावें कर्माज्ञा टाकतां नये ॥ ६ ॥
वेदमूलक कर्तव्य फलाचें मूल कामना ।
कामनात्याग करि तूं कर्तव्यत्याग तो नसो ॥ ७ ॥
कर्मांत गुंतवी वेद फलभोगांत ना तसा ।
फलभोगीं नको गुंतूं कर्मगुंता न तो सुटे ॥ ८ ॥
कर्म संदेश वेदाचा फल संदेश ना कुठें ।
म्हणोनी फल अव्हेरी कर्म अव्हेरितां नये ॥ ९ ॥
कर्माचें मूळ वेदाज्ञा फलाचें मूळ वासना ।
वासना टाक तूं स्वेच्छे सुटे कर्म कसें तुला ? ॥ १० ॥
श्रुति दे कर्मसंदेश फलसंदेश अश्रुत ।
फलेच्छा सोड तूं तस्मात् मनीं नाणी अकर्मता ॥ ११ ॥
कर्मी जुंपी वेद तूतें फल घे अथवा न घे ।
फल त्यजाया तूं शक्त शक्त ना कर्म टाकण्या ॥ १२ ॥
वेदनिर्दिष्ट कर्मातें त्यागणें न धरीं मनीं ।
फल मात्र तुझ्या हातीं टाकुनी मुक्त हो सुखें ॥ १३ ॥
वेदाची चोदना कर्मी फलाचा तूं पुरा धनी ।
फलत्याग तुझ्या हातीं कर्म त्यागूं न ये तुला ॥ १४ ॥
वेदाज्ञा लादते कर्में मूक ती फलयोजनीं ।
म्हणोनी फल टाकी तूं वेदावज्ञा नको करूं ॥ १५ ॥
कर्मी नियुक्ति विधिनें फल दान नसे विधि ।
फलत्यागीं तूं स्वतंत्र कर्मत्यागीं तसा न तूं ॥ १६ ॥
वेद आज्ञापितो कर्में फलीं आग्रह ना कधीं ।
फलवांछा नसो तस्मात् कर्मत्यागहि तो नसो ॥ १७ ॥
कर्मबद्ध प्राणिमात्र तत्फला बद्ध तो नसे ।
फलाला पाठमोरा हो कर्मविन्मुखता नको ॥ १८ ॥

शब्दाची कसरत करीत बसल्यास ही मालिका आणखीहि वाढवितां येईल. पण १८ ही संख्या महाभारतांत विशिष्टत्व पावली असल्यामुळें येथेंच थांबणें बरें. इतके पर्याय देण्यांतला हेतु एवढाच कीं, भिन्नरुचीच्या वाचकांना त्यांतला एक ना एक तरी श्लोक पसंत पडेल. मूळ संस्कृत श्लोकांतली संदिग्धता टाळून गीताकारांचा अभिप्राय जाणून तोच अभिप्राय वेगवेगळ्या शब्दांनीं यांत व्यक्त केला आहे.

## ज्ञानेश्वरांचाहि तोच अभिप्राय

मीं दर्शविलेल्या वरील अर्थाला ज्ञानेश्वरींतहि आधार सांपडतो –

यावानर्थ उदपाने सर्वतः संप्लुतोदके ।

या श्लोकाचा अर्थ ज्ञानेश्वरांनीं श्रीशंकराचार्यांच्या अर्थाहून भिन्न केला हें सुप्रसिद्धच आहे. त्या श्लोकावर ओव्या रचतांना ज्ञानेश्वर म्हणतात –

तैसे ज्ञानिये जे होती । ते वेदार्थातें विचारिती ।।
मग अपेक्षीत स्वीकारिती । ससार जें ॥ २–२६३ ।।

या ओवीनंतर लगेच 'कर्मण्येवाधिकारस्ते' हा श्लोक आला असून, त्यावर टीका करतांना पूर्वींच्या श्लोकाचा संदर्भ लक्षांत घेऊन ज्ञानेश्वर लिहितात् –

म्हणोनि आइकें पार्था । इयाचि परी पाहतां ।।
तुज उचित होय आतां । स्वकर्म हें ।। २–२६४ ।।
आम्ही समस्तहि विचारिलें । तंव ऐसेंचि हें मना आलें ।।
जें न संडिजे तुंवा आपलें । विहितकर्म ।। २–२६५ ।।
परी कर्मफळीं आस न करावी । आणि कुकर्मीं संगति न व्हावी ।।
हे सत्क्रियाचि आचरावी । हेतूविण ।। २–२६६ ॥

यांत वेदाज्ञेचा विचार केला असतां असेंच निष्पन्न होतें कीं, तुला विहितकर्म टाकतां येत नाहीं, मात्र फळाची आशा तूं धरूं नको आणि कर्म न करण्याचा आग्रह धरूं नको.

हा अर्थहि मोघमच आहे, तितकासा स्पष्ट नाहीं; परंतु अध्याय १६ मधील दैवी गुणांतील 'यज्ञ' शब्दावर टीका करतांना ज्ञानेश्वर लिहितात –

तैसे अधिकार पर्यालोचें । हें यज्ञ करणें सर्वांचें ॥
परी विष फळाशेचें । न घापे माजीं ।। १६–९६ ।।
आणि मी करितों हा भावो । नेदिजे देहाचेनि द्वारें जावो ॥
ना वेदाज्ञेसि तरी ठावो । होइजे स्वयें ।। १६–९७ ।।

म्हणजे वेदानें निर्दिष्ट केलेला यज्ञ तर करावा पण फळाशेचें विष तेवढें घेऊं नये. अर्थात् वेदानें सांगितला म्हणून यज्ञ तर करावाच, परंतु तो केल्याचा अहंकार मनांत ऊठूं देऊं नये आणि वेदाच्या आज्ञा तर पाळाव्या. 'वेदाच्या आज्ञेला आपण आपल्या मनांत स्थान द्यावें' हें निक्षून सांगतांना ज्ञानेश्वरांच्या डोळ्यांपुढें 'कर्मण्येवाधिकारस्ते ... मा ते संगोऽस्त्वकर्माणि' हा पूर्वींचा श्लोक असला

JAN 1954

पाहिजे हें उघड दिसतें आणि येथल्या या स्पष्टीकरणावरून अध्याय २, श्लोक ४७ या श्लोकाचा ज्ञानेश्वरांच्या मनांतला अर्थ स्पष्ट होतो व तो मीं दिलेल्या अर्थाला जुळतो.

---

# प्रार्थना फलदायक कशी होते ? : : : ७

**बुद्धि देतो सेवकाला। बुद्धीनें पार पाडवी ॥**

– श्रीरामदासस्वामी.

केव्हांहि माणसांला संकट आलें कीं देव आठवतो; मोठमोठे नास्तिकहि संकट-काळीं लटपटतात, मग लेच्यापेच्या अर्धवटांची काय कथा ! संकटाची कुठें उगीच झळ लागली कीं, ज्यांना पूर्वी कित्येक वर्षांत देव आठवला नव्हता त्यांच्या तोंडूनहि चटकन देवाचें नांव येतें आणि तो देवाचा धावा करूं लागतो.

यावरून संकटकाळीं आपणाला कोणी तरी त्राता भेटावा अशी सर्वांचीच अपेक्षा असते आणि ज्याच्या अंगीं सर्व प्रकारचीं संकटें निवारण्याचें अलोट सामर्थ्य आहे असा त्राता म्हणजे परमेश्वरच असल्यानें आपल्या संकटाच्या वेळीं जो कोणी साहाय्यार्थ उपयोगी पडतो त्यालाच आपण 'देव भेटला' असें म्हणून मोठेंपण देतों. पण ही भाषा अलंकारिकच होय, तिचा अर्थ अक्षरशः खरा मानावयाचा नसतो.

ईश्वराच्या अस्तित्वाचा, दयालुत्वाचा आणि सर्वशक्तिमत्त्वाचा वाद करण्याचें हें स्थळ नव्हे. ईश्वराचें अस्तित्व, दयालुत्व आणि सर्वशक्तिमत्त्व यांची साधार सिद्धि अनेकांनीं ग्रंथांतरीं केली आहे. पण देव भक्तांचें संकट निवारण करतो म्हणजे काय करतो व कसें करतो, याचें तर्कशुद्ध विवेचन क्वचितच आढळतें. यास्तव या लेखांत त्याच मुद्द्याचें स्पष्टीकरण करण्यांत येणार आहे.

ईश्वरानें कोणाहि प्राण्याच्या संकटाच्या प्रसंगीं देह धारण करून प्रत्यक्ष तेथें येणें आणि एखाद्या व्यक्तीच्या रक्षणासारखें क्षुल्लक कार्य स्वतः करूं लागणें, ही कल्पनाच हास्यास्पद आणि तर्काला न पटणारी अशी आहे. युगायुगाच्या ठायीं 'परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृतां। धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥' या अभिवचनानुसार ईश्वरानें अवतार धारण करणें, हें वरील कल्पनेसारखें हास्यास्पद नसलें, तरी या वचनांतील गूढ अभिप्राय बरोबर जाणणें जरूर आहे. 'यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत। अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥' यांतील 'आत्मानं सृजामि' हें पद आणि 'यद्यद्विभूतिमत्सत्त्वं श्रीमदूर्जितमेव

वा । तत्तदेवावगच्छ त्वं मम तेजोंऽशसंभवं ॥ ' यांतील 'विभूतिकल्पना' एकत्र विचारांत घेतल्यास साधूंचें रक्षण व दुष्टांचें दंडन करणें हें कार्य सामान्य माणसांच्या शक्तीबाहेरचें होऊन बसल्यास त्याकरितां विशेष सामर्थ्य एकवटलेली अशी विभूति जन्माला येणें हा नैसर्गिक क्रम दिसतो. यांत संकटाची कल्पना अगाऊ आलेली असून, त्याच्या प्रतिकारार्थ अवश्य असलेल्या सामर्थ्याची जुळवाजुळव अगोदर करून त्या ध्येयासाठींच जन्माला येणें हें वैशिष्ट्य असलें तरी, तें 'यं यं वाऽपि स्मरन्भावं त्यजत्यन्ते कलेवरं । तं तमेवैति कौन्तेय सदा तद्भावभावितः ॥ ' या वचनांतील तत्त्वाला धरूनच आहे.

तथापि हा विचार सार्वजनिक स्वरूपाच्या आणि दीर्घकालीन संकटाच्या प्रतिकारासंबंधाचा झाला. आम्हांला येथे वैयक्तिक आणि आकस्मिक संकटांतून व्यक्तींचें रक्षण कसें होतें याचा विचार करावयाचा आहे. अर्थातच यांत पूर्वसूचना आणि विशिष्ट कार्याच्या उठावणीसाठीं तितक्या तोलाची विभूति जन्माला येणें, याचा समावेश होत नाहीं. एखाद्या भक्तावर आकस्मिक संकट येऊन ठेपलें असतां तो ईश्वराचा धावा करतो, अशा वेळीं त्याच्या प्रार्थनेची परिणति संकटनिवारणांत कशी होते आणि त्या दुःखविमोचक साधनाचा आणि त्या प्रार्थनेचा संबंध काय असतो, याची मीमांसा आपणास कर्तव्य आहे.

या संबंधांत श्रीसमर्थ रामदासस्वामींनीं आपल्या काव्यांत अचूक दिशा दाखवून दिली आहे —

बुद्धि देतो सेवकाला । बुद्धिनें पार पाववी ॥ १ ॥
बुद्धीनें सर्वही होतें । बुद्धिदाता नारायणु ॥ २ ॥
भक्तांचा साभिमानी तो । बुद्धिदाता परोपरी ॥ ३ ॥
भक्ताला काय उणे रे । देव त्रैलोक्य वर्तवी ॥
तो देव आपुला जाला । वैभवा कोण पूसतो ॥ ४ ॥
प्रसंगे वर्ततां आलें । यथातथ्यचि सूचलें ॥ ५ ॥
भक्तानें अंतरीं देवो । जाणोनि धरिला बळ ॥
देवहि विसंभेना कीं । सोडीना भक्तवत्सलु ॥ ६ ॥
बुद्धीनें शोधिला देवो । भावे तत्काळ पावला ॥ ७ ॥
हृदयस्थ झाला नारायणु । प्रेरणा केली ॥ ८ ॥
बुद्धि देणें भगवंताचें । बुद्धिवीण माणुस काचे ॥ ९ ॥
भक्तासी आश्रयो मोठा । बुद्धि दे रघुनायका ॥ १० ॥
आणीक नलगे कांहीं । बुद्धि दे रघुनायका ॥ ११ ॥

या सर्व अवतरणांत हीच कल्पना ठाम सांगितली आहे कीं, जगांतील सर्वकांहीं बऱ्यावाईट गोष्टी बुद्धीच्या जोरावर होतात. शारीरिक शक्तीपेक्षां मानसिक शक्ति मोठी आणि मानसिक शक्तीपेक्षां बौद्धिक शक्ति मोठी, या दृष्टीनेंच आर्य-

चाणक्यानें इतर कोण सहायक आले-गेले याची पर्वा न करतां 'बुद्धिस्तु मा गान्मम' असें म्हटलें आहे. गीतेंतहि बुद्धीचें हें श्रेष्ठत्व ओळखूनच 'कर्मयोगा'ला 'बुद्धियोग' असा पर्यायशब्द योजला आहे.

बुद्धीचें हें सर्वगामी सामर्थ्य जाणूनच समर्थांनीं '**बुद्धीनें सर्वही होतें। बुद्धिदाता नारायणु**' असें म्हटलें आहे व त्यांतच प्रस्तुतच्या शिरोलेखांतील प्रश्नाचें उत्तर आलें आहे. भक्तावर कसलेंहि संकट आलें तरी सर्वगामी बुद्धीनें तें संकट टाळण्याचा मार्ग त्यास सुचतो आणि अशी बुद्धि देणारा कोण तर 'नारायणु' म्हणजे परमेश्वरच होय. हा परमेश्वर कोणाला बुद्धि देतो, तर भक्तालाच ती देतो; आणि ती केव्हां देतो तर भक्त जेव्हां अनन्यभक्तीनें देवाची प्रार्थना करतो तेव्हांच देव त्या भक्ताच्या मनांत प्रेरणा करून त्याला मार्ग दाखवितो. प्रार्थना फलदायक कशी होते, या प्रश्नाचें हें तात्त्विक उत्तर झालें. पण त्याची आधिभौतिक दृष्टया मांडणी कशी करावयाची तें पाहूं.

अंतिम तत्त्वाच्या दृष्टीनें सर्व चराचर सृष्टि एकरूपच असली, तरी व्यवहारांत चिच्छक्ति व जडसृष्टि असे भेद उघड असून, सृष्टींतील सर्व व्यवहार जडसृष्टीच्या रूपानेंच प्रत्ययास येतात. मात्र जडसृष्टींत प्रेरणाशक्ति नसल्यानें त्या प्रेरणाशक्तीसाठीं चिच्छक्तीचें अस्तित्व मानावेंच लागतें. एकवेळ जडसृष्टीचें अस्तित्व अमान्य केलें तरी चालेल, कारण सृष्टीच्या उत्पत्तीपूर्वी तशी स्थिति असूं शकते; परंतु चिच्छक्तीच्या अभावीं केवळ जडसृष्टीची कल्पनाहि करवत नाहीं. अर्थातच सृष्टीचा व्यवहार म्हणजे चिच्छक्तिप्रेरित जडवस्तूंचा व्यवहार होय.

जडवस्तूंचा एकमेकींवर परिणाम होण्याला त्यांचा एकमेकींशीं संबंध यावा लागतो. अग्नीनें लोखंड तापतें पण तें अग्नीजवळ ठेवलें तरच तापतें. शिवाय आपण होऊन् अग्नि लोखंडाजवळ अथवा लोखंड अग्नीजवळ येत-जात नाहीं. मनोमनसंबंध मात्र कितीहि अंतरावरून घडूं शकतो. आकाशवाणीनें आपण जगांतील कितीहि दूर अंतरावरच्या माणसाशीं बोलूं शकतों, हें तर आतां नित्याच्या अनुभवांतलेंच प्रमेय आहे; पण पुण्यांतला मनुष्य अमरावतींतल्या माणसाच्या मनांत या वेळीं काय चाललें आहे हें ओळखूं शकतो, अशासंबंधीं प्रयोग तितके निर्विवाद व भरपूर होऊं शकले नाहींत; कारण ही मनकवडेपणाची शक्ति अशी कांहीं वाटेवर पडलेली नाहीं! तरी पण असला मनकवडेपणा शक्य आहे एवढें दर्शविण्यापुरते प्रयोग झाले आहेत. मानशास्त्रकारहि आतां यासंबंधाची कबुली देऊं लागले आहेत.

कितीहि दूरच्या अंतरावरून असे मनोमन व्यवहार होऊं शकतात हें एकदां मान्य केल्यावर या शक्तीचें उगमस्थान जो परमेश्वर त्याच्याशींहि मनोमन व्यवहार होऊं शकतो हें मान्य करण्याला अडचण कोणती? ईश्वर म्हणजे सर्व चिच्छक्तीचा उगम आणि तिचा अमर्यादित संचय होय. त्या चिच्छक्तीच्या अल्पांशाच्या

साहाय्यानें जर एक मनुष्यप्राणी दुसऱ्या मनुष्यप्राण्याशीं बोलूं शकतो, तर त्या उभयतांचेंहि बोलणें परमेश्वराला कळत नसेल असें कां मानावें ? आणि हें जर सत्य मानावेंच लागतें, तर मग जेव्हां भक्त प्रार्थनेच्या द्वारें प्रत्यक्ष परमेश्वरालाच आळवतो, तेव्हां ती प्रार्थना परमेश्वराच्या कानीं जात नाहीं हें मानणें वितंडवादाचेंच नव्हे काय ?

ही प्रक्रिया समजण्याला आपण टेलिफोनचेंच उदाहरण घेऊं. गोम्या सोम्याशीं बोलण्यासाठीं त्याचा नंबर लावतो व त्याच्याशीं बोलूं लागतो. आतां जर सोम्याला गोम्याचा नंबर माहीत नसला, तर त्याला मध्यवर्ति केंद्राच्या अधिकाऱ्याकडून ती माहिती घ्यावी लागते. परमेश्वर हा अशा केंद्रस्थानचा अधिकारी होय. भक्ताला आपलें गाऱ्हाणें कोणाच्या कानीं घातलें म्हणजे तो तें दूर करील, हें अवगत असलें, तर तो परभारेंच त्या माणसाला तें गाऱ्हाणें कळवील; परंतु जर त्याला आपला भावी साहाय्यकर्ता कोण हें समजण्याला साधन नसलें, तर तो आपलें गाऱ्हाणें देवाच्या कानावर घालील; आणि देव सर्वज्ञ असल्यानें तें गाऱ्हाणें कोणाकडून कसें दूर होऊं शकेल हें जाणून तो त्या भक्ताला 'तूं अमक्याकडे साहाय्य माग' अशी प्रेरणा करतो आणि त्या साहाय्यकर्त्यालाहि तसें साहाय्य करण्याची बुद्धि देतो.

हा सर्व व्यवहार सृष्टीच्या नियमाला अनुसरूनच आहे. यांत अद्‌भुतपणा कांहींच नाहीं. टेलिफोनची घंटा वाजणें, नंबर विचारणें, परत टेलिफोन करणें व कान लावून उत्तर ऐकणें इत्यादि प्रकार दृश्य सृष्टींतल्याप्रमाणें प्रार्थनेमध्यें प्रत्यक्ष होत नसले तरी अदृश्य सृष्टींतल्या विशिष्ट नियमालाच धरून या सर्व गोष्टी होतात. दृश्य सृष्टींत जसे नियम पाळावेच लागतात, तसेंच अदृश्य सृष्टींतहि नियम पाळावेच लागतात. असे नियम पाळण्याची ज्यांची तयारी नाहीं अथवा लायकी नाहीं, त्यांनीं 'आम्हांला याची प्रचीति आणून द्या' असें म्हणून अडविण्यांत अथवा अश्रद्धा दाखविण्यांत हंशील काय ? तुम्हीहि पात्रता दाखवा म्हणजे तुम्हांलाहि प्रचीति येईल हेंच त्यांना उत्तर होय. 'कड्, कट्' केल्यानें व ऐकल्यानें एकमेकांना निरोप सांगतां व ऐकतां कसा येतो हें समजण्याला जर त्या शास्त्राचें निदान प्राथमिक ज्ञान तरी करून घ्यावें लागतें, तर ईश्वराशीं हितगुज करण्याचें शास्त्र मात्र वाटेल त्या अश्रद्धाळू व नियमभंग करणाऱ्या माणसाला सहजासहजीं समजेल इतकें सुलभ कां मानावें ? आणि 'बोलका ढलपा' निरोप कसा सांगतो, याचें गूढ निरक्षर माणसाला कळत नाहीं, म्हणून साक्षर माणसानेंहि बोलक्या ढलप्याच्या साहाय्यानें व्यवहार करावयाचें सोडून देणें समंजसपणाचें होईल काय ?

तात्पर्य हेंच कीं, प्रार्थनेनें भक्ताच्या मनाची एकप्रकारें तंद्री लागते. त्या तंद्रींत आजूबाजूचे बाह्य व्यवहार कळेनातसे झाले कीं, मनोमन व्यवहाराचें तारायंत्र सुरू होतें. भक्ताचें ईश्वराशीं अंतर्गत तादात्म्य झालें कीं, ईश्वरी शक्तीचा

भक्ताच्या अंतःकरणांत संचार होऊं लागतो. त्या तन्मयतेंतून त्याच्या बुद्धीला योग्य मार्गाची चालना मिळते. सुष्टाला संकटनिवारणाचा मार्ग सुचतो, दुष्टाला तें न समजण्याइतका मोह पडतो; शिवाजीला पेटाऱ्यांतून बसून पळून जाण्याची प्रेरणा होते, पोलादखानाच्या बुद्धीला ते पेटारे न तपासतां जाऊं देण्याचा मोह पडतो !

सर्वच प्रार्थनांचें व सर्वच संकटांचें स्वरूप याच प्रकारचें असतें असें नाहीं, आणि सर्वच भक्त केवळ संकटाच्या वेळींच तेवढी ईश्वराची प्रार्थना करतात असेंहि नाहीं. पण प्रार्थनेचें स्वरूप कितीहि भिन्न असलें तरी ईश्वराशीं मनोमन तन्मयता आणि तद्द्वारा बुद्धीला प्रेरणा या गोष्टी सर्वत्र सारख्याच असणार. ज्ञानेश्वरमहाराज निवृत्तिनाथांच्या समोर बसून गीतेवर भाष्य करूं लागत त्या वेळीं त्यांच्या बुद्धींत संचार होत असे व त्याचेंच फळ ज्ञानेश्वरीसारखा ग्रंथ होय. एरवींच्या वेळीं त्यांना तशी स्फूर्ति होत असेल असें वाटत नाहीं. याच दिशेनें इतरहि अद्भुत सामर्थ्याच्या गोष्टींचा उलगडा होऊं शकतो. आपल्यालाच आपल्या बौद्धिक वा मानसिक सामर्थ्याची कल्पना नसते. पण आपल्या मानसिक सामर्थ्याच्या जोरावरच दुस्साध्य व्याधींतूनहि मनुष्य पार पडूं शकतो.

ईश्वरी प्रार्थनेनें मनुष्याचें मन शांत, निर्भय व आत्मप्रत्ययी झाल्यावर त्याला जें आत्मसामर्थ्य येतें त्याचे व्यक्त प्रकार पुढीलप्रमाणें संभवतात –

( १ ) बुद्धीला स्फूर्ति होऊन न उकलणारें कोडें सोडवितां येणें. ( २ ) आत्मसंयमन, दुष्टवासनांचा त्याग, सद्गुणाभिवृद्धि. ( ३ ) छळ सोसण्याची अथवा स्वार्थत्यागाची अलोट शक्ति. ( ४ ) शारीरिक व्याधींचा परिहार. ( ५ ) दुसऱ्याच्या मनावर छाप पाडण्याची शक्ति अंगीं येणें. ( ६ ) विशिष्ट संकटांचा परिहार करण्याचा मार्ग दिसूं लागणें. ( ७ ) मनोवांछित वस्तूची प्राप्ति.

वर दर्शविलेल्या सातहि प्रकारांचीं उदाहरणें आपल्या साधुसंतांच्या चरित्रांत सांपडूं शकतील. परंतु आपण स्वतःच्या अज्ञानानें असल्या गोष्टीस भोळसटपणा म्हणून हंसत असतो आणि आपण स्वतः असले भोळसट नाहीं असें दाखविण्यासाठीं असल्या सामर्थ्याची हेळसांड करीत असतो. आतां आधुनिक शास्त्रीय शोधांनीं या गोष्टी शक्य असल्याचें दिसून येऊं लागलें आहे; आणि ज्यांच्यासंबंधीं बुवाबाजीची शंकाहि मनांत येण्याचें कारण नाहीं अशांच्या अनुभवानें या गोष्टींची प्रचीति घेतां येऊं लागली आहे.

या संबंधांत शास्त्रीय पद्धतीनें खात्री पटविण्याला आणखी किती तरी पाल्हाळिक वर्णन लिहावें लागेल. पण तितका स्थलावधि व कालावधि नसल्यानें या लेखाचें तात्पर्य म्हणून माझ्या तरुण वाचकांस एवढेंच सुचवावयाचें आहे कीं – ' मला लोक भोळा म्हणतील ' असल्या खोट्या भीतीनें आपल्या हातचें हें सामर्थ्य गमावूं नका. ज्यांच्याजवळ हें सामर्थ्य नाहीं अशा दुर्बलांनीं तुमच्या दैवी संपत्तीची थट्टा केली, तर तेवढ्यासाठीं तुम्ही आपली दैवी संपत्ति टाकून द्यावी

हा कोठला शहाणपणा ? आंधळा मनुष्य डोळस माणसाला जर म्हणूं लागला कीं, 'तुला सृष्टिवैभव पाहून आनंद होतो, हा भ्रम आहे' तर काय त्या डोळस माणसानें आपले डोळे फोडून घ्यावे ? एखाद्याचें कर्णेंद्रिय इतकें मठ्ठ असतें कीं, त्याला सा, री, ग, म, प यांतला भेदहि कळत नसेल. असा मनुष्य जर 'काय तुम्ही गाण्याच्या नादानें वेड्यासारखे भारून जातां' असें म्हणाला, तर काय संगीतज्ञ माणसानें आपले कान बधिर करून घ्यावयाचे ? एखादा जन्माचा दळभद्री करंटा जर म्हणूं लागला कीं – 'काय या बँकेंतील ठेवींच्या नादानें तुम्ही भ्रमिष्ट होऊन गेला आहां, मी पाहा कसा अलिप्त आहें' तर काय त्याच्या समाधानासाठीं आपलें बँकबुक व रोखे जाळून टाकावयाचे ?

असाच वेडा प्रकार नास्तिकांच्या नादीं लागून व तें 'टिंगल' करतील म्हणून आपल्या हातचें दैवी सामर्थ्य गमाविण्यांत होत असतो. ईश्वराविषयीं आस्तिक्यबुद्धि ठेवून त्याच्या प्रार्थनेंत त्याच्याशीं तन्मय होणें म्हणजे ईश्वराची वारसदारी प्राप्त करून घेणें होय. त्याची वारसदारी प्राप्त झाली म्हणजे –

भक्ताला काय उणे रे । देव त्रैलोक्य वर्तवी ॥
तो देव आपुला जाला । वैभवा कोण पूसते ।
आपण सर्व देवाचा । देवाचें आपणाकडे ॥
किती घ्यावें किती द्यावें । भोगावें कोणतें किती ॥

असें सामर्थ्य प्राप्त होतें. हें सामर्थ्य प्राप्त करून देण्याची शक्ति प्रार्थनेंत आहे. त्या प्रार्थनेविषयीं ज्याला अविश्वास वाटतो त्याविषयीं रामदास म्हणतात –

अभावें भर्वसा नाहीं । मूढाला निश्चयो नसे ॥
दया हे थोर देवाची । भक्ताला वज्रपंजरू ॥

यांतील रहस्य लक्षांत घेऊन रामदासांनीं 'मूढाला निश्चय नसे' म्हणून ज्याची हेटाळणी केली तसले मूढ बनणार का 'भक्ताला वज्रपंजरू' असणाऱ्या देवाची कृपा संपादन करून त्याच्या वज्रपंजराच्या संरक्षणांत निर्भयतेनें विश्वोद्धाराचें कार्य करणार ?

# दिवंगतांच्या गुणांचें दिग्दर्शन

[ ' **दिवंगतांच्या गुणांचें दिग्दर्शन** ' या विभागांत अनेक पुढाऱ्यांच्या संबंधाचे मृत्युलेख आहेत. हे सर्व लेख त्या त्या व्यक्तींच्या मृत्युकालींच लिहिले असें नव्हे. कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर हे दिवंगत झाले त्या वेळीं तर प्रस्तुतच्या लेखकाचा 'ओनामा'च चालू होता. पण गतवर्षी शास्त्रीबुवांची जन्मशताब्दि झाली व त्या निमित्तानें पुण्यांत अनेक कार्यक्रम झाले. त्या प्रसंगाला अनुलक्षून **'सह्याद्रीं'त** हा लेख लिहिला. त्या वेळीं भारतांत राज्यक्रान्ति होऊन भारत देश स्वातंत्र्य उपभोगूं लागला होता. अशा वेळीं आद्य क्रान्तिदृष्टे **विष्णुशास्त्री** यांचें स्मरण होणें अपरिहार्य होतें. शास्त्रीबुवांनीं सशस्त्र क्रान्तीचा उपदेश वा प्रचार कधींच केला नाहीं. याचा अर्थ त्यांना सशस्त्र क्रान्ति त्याज्य वाटत होती असा नव्हे; परंतु त्यांच्या जन्मानंतर लवकरच सशस्त्र क्रान्तीचा एक प्रयत्न होऊन गेला होता व तो फसला होता. तो प्रयत्न फसण्याचें कारण जनतेंत जागृतीचा अभाव हेंच होय. हें मर्म ओळखून शास्त्रीबुवांनीं राष्ट्रांत जागृति निर्माण करण्याकरितां विचारांना धक्के देण्यास सुरुवात केली. शास्त्रीबुवांच्या प्रभावी लेखांनीं जनतेंत विचारक्रान्ति झाली, पारतंत्र्याची चीड येऊं लागली, स्वातंत्र्यप्राप्तीविषयीं जनता आतुर झाली, आणि आपण स्वराज्य प्राप्त करून घेऊं आणि तें चालवूं शकूं, इतका आत्मविश्वास पुढाऱ्यांच्या मनांत भरून राहिला. शास्त्रीबुवांनीं केलेली ही मोठीच क्रान्ति होय. या कारणास्तवच त्यांना ' **विचारक्रान्तीचे प्रणेते** ' असें म्हटलें आहे. शास्त्रीबुवांच्या मृत्यूनंतर

६८ वर्षांनीं जरी हा लेख लिहिला असला, तरी त्यांत शास्त्रीबुवांच्या वेळची परिस्थिति आणि शास्त्रीबुवांच्या देशभक्तीनें ओथंबलेल्या तिखट लेखांचा तत्कालीन समाजावर घडलेला परिणाम यांचेंच दिग्दर्शन असल्यानें तो लेख मृत्युलेखांच्या सदरांत पडण्यासारखा आहे, म्हणून या विभागांत तो समाविष्ट केला आहे.

दुसरा मृत्युलेख **लो. टिळकांच्या** गुणगौरवार्थ लिहिलेला आहे. हाहि लेख मृत्युकालानंतर लगेच लिहिला नसून, वर्षश्राद्धाच्या प्रसंगानें लिहिला आहे. पहिला मृत्युलेख श्री. **तात्यासाहेब केळकर** यांनीं स्वतः अति विस्तृत असा लिहिल्यामुळें इतरांच्या श्रद्धांजलीला त्या वेळीं अवसर मिळाला नाहीं. दुसऱ्या वर्षापासून अनेकांचे विविध लेख प्रसिद्ध करण्याची वहिवाट सुरू झाली. अर्थातच इ. स. १९२१ पासूनच्या तीस वर्षांत प्रस्तुतच्या लेखकानें लोकमान्यांच्या गुणगौरवार्थ अनेक लेख लिहिले आहेत; परंतु मृत्युकालापासून जसजसें दूर जावें तसतसें लेखाचें स्वरूप पालटत जातें. वर्ण्य व्यक्तींच्या गुणांवर कालान्तरानें वेगळ्या परिस्थितीची छाया पडते आणि परिस्थितीनुरूप चष्माहि बदलत जातो. यास्तव लोकमान्यांच्या संबंधाचा इतर कोणत्याहि वर्षाचा लेख न घेतां वर्षश्राद्धाच्या वेळचा म्हणजे इ. स. १९२१ मधला लेख येथें उद्धृत केला आहे. लेख त्रोटक असला तरी लोकमान्यांच्या अंगचे प्रमुख गुण आणि त्यांच्या राष्ट्रकार्याचें स्वरूप यावर प्रकाश पाडणारा असा तो लेख असल्यानें तोच लेख निवडला गेला.

या दोन लेखांच्या नंतरचे सर्व लेख मृत्युलेख म्हणूनच लिहिले असल्यानें ते लेख त्या त्या पुढाऱ्यांच्या जीवनचरित्रावर प्रकाश पाडणारे असून, त्यांच्या मृत्यूमुळें राष्ट्राच्या कोणत्या अंगांत उणीव भासूं लागली याचें दिग्दर्शन त्या लेखांतून केलेलें आहे.

दिवंगतांच्या या मालिकेंत पैगंबरवासी बॅ. जिना यांच्या गुणांचाहि गौरव आढळून येईल. बॅ. जिना हे पाकिस्तानचे निर्माते झाल्यानें त्यांच्या कामगिरीमुळें भारतावर मोठी आपत्ति कोसळली; हें खरें असलें तरी '**शत्रोरपि गुणा वाच्या दोषा वाच्या गुरोरपि**' या न्यायास अनुसरून बॅ. जिनांच्या अंगच्या कित्येक गुणांची यांत प्रशंसा केली गेली आहे. वास्तविक पाहतां बॅ. जिना हे पूर्वाश्रमांत अगदीं कट्टर देशभक्त होते. लॉर्ड वुइलिंग्डन यांच्या मानपत्रास विरोध करणाऱ्या मुंबापुरीच्या नागरिकांत त्यांनींच पुढाकार घेतला होता. पंधरा वर्षेंपर्यंत त्यांनीं मुस्लिम लीगला विरोधच केला होता; परंतु १९२१ सालापासून काँग्रेसचा जो कायापालट झाला त्या योगानें

बॅ. जिना यांच्याहि विचारांत पालट झाला. तरी पण वीस वर्षेपर्यंत त्यांनीं मुस्लिम लीगला आळा घालून तिला सैरावैरा धावूं दिलें नाहीं; पण १९४० पासून राजकारणांतला ताळतंत्र सर्वच प्रकारांनीं सुटत चालला. त्यामुळें बॅ. जिना यांनाहि लीगला आवरून धरणें अशक्य झालें आणि एकदां धरबंध सुटल्यावर नाव जशी वाऱ्याच्या सोसाट्याबरोबर कोणीकडेहि भडकते त्याप्रमाणें बॅ. जिनांचीहि अवस्था झाली; पण हा सगळा परिस्थितीचा परिणाम होय. तेवढ्यामुळें त्यांच्या अंगच्या स्थायीगुणांचें विस्मरण होऊं नये आणि १९०५ पासून १९२५ पर्यंतची वीस वर्षांची त्यांची राष्ट्रीय कामगिरी दृष्टीआड होऊं नये, म्हणून निःपक्षपातबुद्धीनें त्यांच्या गुणांचाहि यांत सापेक्षतेनें परामर्श घेतला आहे.]

# विचारक्रान्तीचे प्रणेते विष्णुशास्त्री चिपळूणकर : १

## क्रान्तिचक्राचा एक फेरा

मनुष्यप्राणी आपणा स्वतःस मोठा कल्पक समजत असतो, आणि त्यानें आपल्या कल्पकतेच्या बळावर या जगतीतलावर अनेक अद्भुत गोष्टी घडवून आणल्या आहेत यांत शंकाच नाहीं. तथापि कालाच्या अघटित घटनेपुढें मानवी प्राण्याची कल्पकता फिकी पडते. मनुष्यानें अद्भुत बुद्धिकौशल्य लढवून चित्रपट, बोलपट इत्यादि विस्मयकारक देखावे निर्माण केले आहेत. पण सृष्टिनिर्मित चित्रपटापुढें मनुष्यकृत चित्रपटाची मातबरी टिकूं शकत नाहीं. १८५० ते १९५० पर्यंतच्या शताब्दींतील सृष्टीच्या चित्रपटांतील अद्भुत देखाव्यांची सर कल्पित कादंबरींतील देखाव्याला केव्हांच येऊं शकणार नाहीं. इ. स. १८५० पासून १९५० पर्यंतच्या वर्षशतकांत या जगांत कल्पनातीत उलथापालथ झाली. तो सगळा इतिहास आज आपणांस पाहावयाचा नसून आपल्या भरतखंडांत गेल्या शंभर वर्षांत जी विलक्षण क्रान्ति झाली तींतील एका भागाचें विहंगमावलोकन करावयाचें आहे.

इ. स. १८५० ते १९५० या शंभर वर्षांत हिंदुस्थानांत क्रान्तिचक्राचा एक फेरा पूर्ण झाला. दि. २६ जानेवारी १९५० या दिवशीं क्रान्तियुगांतील एका नव्या घटनेला प्रारंभ झाला हें निर्विवाद आहे. पण ज्या क्रान्तिव्रताची सांगता १९५० च्या प्रारंभीं झाली त्या क्रांन्तिव्रताच्या स्वीकाराचें पुण्याहवाचन १८५० मध्यें झालें. सूर्यचंद्रादि तेजस्वी गोल ख-मध्याला जाऊन पोंचले कीं, एकीकडून तेथें ते आपल्या उत्कर्षाची परिसीमा गांठतात, तर दुसरीकडून त्यांच्या अस्तंगत होण्याच्या क्रियेला

(सह्याद्रि, मे १९५०)

प्रारंभहि त्याच बिंदूपासून होतो. १८५० च्या प्रारंभीं हिंदुस्थानांतील ब्रिटिश राजसत्तेनें पंजाब प्रांत गिळंकृत करून रणमैदानावरील आपल्या पराक्रमाचा उच्चांक गांठला. तलवारीनें जिंकावयाचें तें सर्व जिंकून झालें. भोजनोत्तर मुखशुद्धीकरितां तोंडांत कांहीं तरी सहज टाकावें त्याप्रमाणें डलहौसीनें कित्येक संस्थानांचा चट्टामट्टा करून मुखशुद्धीहि आटोपली. पण त्या मुखशुद्धींतच भावी क्रान्तिकारक घटनेचें बीजारोपण झालें. एवंच, १८५० त या देशांतील क्रान्तिचक्राच्या नव्या फेऱ्याला प्रारंभ झाला आणि तो फेरा १९५० च्या प्रारंभीं पूर्ण झाला.

### ब्रिटिश सत्तेला लावलेले सुरुंग

दि. २० मे १८५० या चिरस्मरणीय दिवशीं विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचा जन्म झाला. क्रान्तियुगाच्या आगमनाची ती पहिली ललकारी होय. परकी ब्रिटिश सत्तेचा कोट ढासळून पाडण्याकरितां त्या कोटाखालीं अनेक सुरुंग लावण्यांत आले. त्यांतला महान् परिणामकारक सुरुंग म्हणजे विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं आपल्या लेखांनीं केलेली विचारक्रान्ति हा होय. कोणताहि भरभक्कम कोट ढासळावयाचा झाल्यास त्यास अनेक ठिकाणीं अनेक सुरुंग लावावे लागतात, त्याप्रमाणें ब्रिटिश सत्ता उखडून काढण्याकरितां अनेक स्थळीं सुरुंग लावण्यांत आले; पण त्या सर्वांना आधारभूत आणि मार्गदर्शक म्हणून अग्रपूजेचा मान विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्याकडेच येतो. शास्त्रीबुवांनीं आपल्या लेखांनीं विचारक्रान्ति करण्यापूर्वीच १८५७ मध्यें जो भडका उडाला त्याला पहिला मान देणें हें एका अर्थानें उचित आहे. पण तो भडका म्हणजे सुरुंग पूर्ण ठासून बत्ती लावल्यावर जो भडका उडतो तसा नसून सुरुंगांत दारू ठासत असतांनाच पहारेच्या घावानें ठिणगी उडून जो भडका होतो, तशा प्रकारचा तो भडका होता; त्यामुळें तो सुरुंग परिणामकारक होऊं शकला नाहीं. मात्र त्या अपघातानें सावधपणा शिकून भावी सुरुंग अकालीं उघडणार नाहीं अशी खबरदारी घेण्यांत आली. तरी पण अधूनमधून असे अपघात घडून आले नाहींत असें नाहीं. तथापि त्यानें कांहीं क्रान्तीच्या दीर्घोद्योगांत खंड पडला नाहीं. शास्त्रीबुवांनीं पेरलेल्या विचार-क्रान्तींचीं बीजें इतकीं सर्वत्र व खोलवर रुजलीं होतीं कीं, प्रतिस्पर्ध्यांच्या कोणत्याहि प्रयत्नानें त्यांचा उच्छेद होऊं शकला नाहीं, एवढेंच नव्हे तर त्यांच्या शाखा-उपशाखांचें जाळें सर्वत्र पसरवून अखेरीस त्याला स्वातंत्र्यरूपी फळ आलेलें पाहण्याचें भाग्य आज शास्त्रीबुवांच्या अनुयायांस लाभलें आहे.

शास्त्रीबुवांच्या जन्मानंतर सातच वर्षांनीं स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं झगडण्याचा पहिला अयशस्वी प्रसंग घडून आला. त्या अपयशानें क्रान्तिकारक विचाराचे लोक खचून जाऊन नाउमेद झाले आणि परकी सत्ताधारी अधिक सावध व कावेबाज झाले. त्याचा परिणाम असा झाला कीं, जनतेच्या मनांतील महत्त्वाकांक्षा आणि उभारी लुप्तप्राय झाली.

## परिस्थितीला कलाटणी कोण देतो ?

इ. स. १८५८ पासून १८७० पर्यंतचें राजकीय वातावरण सर्वथैव कोंदट व निरुत्साही असतां, त्याच नाउमेदीच्या काळांत परकीय वर्चस्वाची छाप पाडणारें शिक्षण घेत असतां, त्या अंधारमय परिस्थितींतून विष्णुशास्त्री चिपळूणकर, बाळ गंगाधर टिळक, गोपाळराव आगरकर यांसारखे तारे उदय पावून चमकूं लागले आणि जनतेला क्रान्तीचा मार्ग दर्शवूं लागले, हें आश्चर्य होय. या आश्चर्याचा उलगडा एकाच सिद्धान्तानें होऊं शकतो. तो सिद्धान्त असा कीं, परिस्थिति पुढारी निर्माण करीत नसून, जन्मजात विभूति आपल्या प्रभावानें परिस्थितीला कलाटणी देते. 'कालो वा कारणं राज्ञः । राजा वा कालकारणं ।। इति ते संशयो मा भूत् । राजा कालस्य कारणम् ॥ ' हा जो महाभारतकारांचा सिद्धान्त आहे, तोच निरपवाद सत्य असून तोच आधुनिक काळांतील क्रान्तिकारकांना लावून असें म्हणतां येईल – 'परिस्थिति क्रान्तिवीर जन्माला घालीत नसून, जन्मजात क्रान्तिवीर परिस्थितीला आपल्या मनोदयानुरूप कलाटणी देतो.'

शास्त्रीबुवांच्या वेळचें डेक्कन कॉलेजांतलें शिक्षण विचारांत घेतां तें 'वाघिणीचें दूध' पिऊन शास्त्रीबुवांच्या अंगांत वीरश्रीचा संचार झाला असें नसून शास्त्रीबुवांसारख्या हाताच्या बोटांवर मोजण्याइतक्या अत्यल्प विद्यार्थ्यांच्या अंगांत उपजतच तेजस्विता होती, म्हणून त्यांना तें 'वाघिणीचें दूध' पचलें आणि त्यांच्या पराक्रमास उभारी आली; इतर कित्येकांना तें 'वाघिणीचें दूध' आत्मसात् करतां न आल्यानें ते उपजत स्वभावानुरूप शेळपटच राहिले. प्राचीन विद्या आणि आपल्या पूर्वजांचे पराक्रम याविषयींचा आदर विष्णुशास्त्री यांच्या मनांत विद्यार्थिदशेपासूनच होता व तो निसर्गसिद्ध होता याचें गमक म्हणून असें सांगतां येईल कीं, कॉलेजांत असतांना तेथील विद्यार्थ्यांच्या आठवड्याच्या वादविवाद सभेंत त्यांनीं '**प्राचीन हिंदु लोकांचें ज्ञान**' या विषयावर एक निबंध वाचला होता आणि त्या निबंधांत **विष्णुबुवा ब्रह्मचारी यांच्या वेदोक्तधर्मप्रकाश** या पुस्तकांतून वेदांच्या कांहीं ऋचांचा अर्थ देऊन त्यावरून, सूर्याच्या आकर्षणामुळें पृथ्वी त्याभोंवतीं फिरते, या घटनेचें ज्ञान आपल्या पूर्वजांस होतें असें दाखविण्यांत आलें होतें. त्याचबरोबर त्यांच्या स्वाभिमानाचें दुसरें गमक असें सांगतां येईल कीं, आधुनिक घडामोडींची वार्ता समजून घेण्यासाठीं ते 'ज्ञानप्रकाश' पत्र चाळीत, पण 'टाइम्स' पत्र ते हातांतहि धरीत नसत ! समान शिक्षणांत आणि समान वातावरणांत वावरणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आचार-विचार-उच्चारांतील भिन्नता लक्षांत घेतां '**स्वभावो मूर्ध्नि तिष्ठति**' हा सिद्धान्त मान्य करून कर्तृत्ववान् पुढाऱ्यांच्या अलौकिक कर्तृत्वाचें श्रेय 'परिस्थिती'ला न देतां ज्याचें त्यालाच देणें न्याय्य ठरतें.

## निबंधमालेचा प्रारंभ

अशा रीतीनें विष्णुशास्त्री हे कॉलेजांतून बाहेर पडतांनाच त्यांचें रक्त स्वदे-

शाभिमानानें सळसळत होतें आणि त्यांच्या डोक्यांत विचारक्रान्तीनें काहूर माजविलें होतें. त्या विचारास वाचा फुटण्याची संधि येण्यास २–३ वर्षें लागली. १८७४ च्या जानेवारींत, म्हणजे आपल्या वयाच्या चोविसाव्या वर्षीच त्यांनीं **'निबंधमाला'** मासिक प्रसिद्ध करण्याला प्रारंभ केला आणि त्यांतून **' आमच्या भाषेची स्थिति '** या विषयावर लेखमाला सुरू करून मराठी भाषेच्या उन्नतीकडे महाराष्ट्रियांचें लक्ष वेधलें. त्यानंतर निबंधमालेच्या पहिल्याच वर्षाच्या **आठव्या** अंकांतील **'इतिहास'** या विषयावरील आपल्या लेखमालेंत त्यांचा **देशाभिमान** आणि त्यांची **स्वातंत्र्यप्रीति** हे गुण उत्कटत्वानें प्रकट झाले. शास्त्रीबुवांच्या भावी विचारक्रान्तीचें बीज या आठव्या अंकांतून त्यांनीं देशभक्तांच्या मनांत रुजविलें. देवकीच्या पोटच्या आठव्या गर्भानें ज्याप्रमाणें कंसाच्या मनाला धक्का दिला, त्याप्रमाणें निबंधमालेच्या या आठव्या अंकानें परकी सत्ताधाऱ्यांच्या मनाला जबर धक्का दिला. शास्त्रीबुवांच्या जीविताचें ध्येय या अंकानें निश्चित स्वरूपांत व्यक्त झालें. या ध्येयापासून त्यांना ढळविण्यासाठीं प्रतिपक्षाकडून विश्वप्रयत्न करण्यांत आले, पण शास्त्रीबुवा आपल्या ध्येयापासून एक रेसभरहि ढळले नाहींत. एवढेंच नव्हे तर त्यांनीं विचारक्रान्तीचें हें शिंग दिवसेंदिवस चढत्या आवाजांत फुंकण्याचा क्रम इतक्या सपाट्यानें चालविला कीं, त्याच्या ललकारीनें कुंभकर्णसदृश सुप्त देशभक्तांसहि जागृत केलें; मग जे देशभक्त वीर आधींच जागृत होऊन समरांगणांत उतरण्यासाठीं सज्ज होत होते ते लगबगीनें सुसज्ज होऊन त्यांच्या खांद्याशीं खांदा भिडवून ठाण मांडून उभे राहिल्यास त्यांत नवल काय ?

## निबंधमालेची लोकप्रियता

शास्त्रीबुवांच्या निबंधमालेचें वैशिष्ट्य हेंच कीं, इतर नियतकालिकांतील लेखांप्रमाणें निबंधमालेंतले लेख विस्मृतिपथास गेले नाहींत. बहुतेक वृत्तपत्रें व मासिकें यांतील लेख प्रत्यक्ष वाचणारांच्या पलीकडे इतरांच्या कानावर जात नाहींत आणि ज्या वाचकांच्या कानांवरून ते जातात त्यांच्याहि स्मृतिपटलांवर त्यांचा ठसा पुसट पुसटच उमटल्यानें अल्पावधींतच तो ठसाहि पुसून जातो. निबंधमालेचे तत्कालीन ग्राहक व वाचक यांची संख्या पांच हजारांच्यावर गेली नसेल; परंतु निबंधमालेच्या वाचकांची परंपरा अद्यापि अखंड राहिली आहे. निबंधमाला बंद पडली आणि शास्त्रीबुवाहि दिवंगत झाले. अशा परिस्थितींत निबंधमालेचें पुनर्मुद्रण लवकर होईना; हें पाहून अनेकांनीं मालेच्या प्रकाशनाचा हक्क न जुमानतां स्वतःच मालेचें पुनर्मुद्रण करण्याचें धाडस व्यक्त केलें. अशी लोकप्रियता क्वचितच एखाद्या लेखमालेच्या वांट्यास येते. निबंधमालेच्या अनेक आवृत्त्या अद्यापि निघत आहेत, यावरून तिची लोकप्रियता सिद्ध आहे. ' आमच्या देशाची स्थिति ' हा निबंधमालेंतला अखेरचा लेख सरकारनें १९१० सालीं, म्हणजे प्रथम प्रसिद्धीच्या कालानंतर तीस वर्षांनीं, जप्त केला ! यावरून त्या लेखाच्या अंतरंगाविषयीं खरी कल्पना कोणासहि

करतां येईल. सारांश, निबंधमालेंतील लेखाचा ताजेपणा कालान्तरानें नष्ट न होतां उलट नव्या नव्या पिढींत निबंधमालेच्या वाचनाची उत्सुकता वाढतच गेली आणि आजपर्यंत मालेच्या अनेक आवृत्त्या निघून त्या खपून गेल्या. '**आमच्या देशाची स्थिति**'या निबंधावरील बंदी अलीकडे उठली व ती बंदी उठतांच केवळ तेवढ्या निबंधाच्याहि अनेक आवृत्त्या निघाल्या. सारांश, निबंधमाला सुरू झाल्यापासून वाचकांच्या मनावर तिनें जी मोहिनी टाकली ती अद्यापिहि कायम आहे.

निबंधमालेच्या लोकप्रियतेचें बीज तिच्या विचारक्रान्तींत आहे. जादूगार ज्याप्रमाणें आपल्या जादूनें वस्तूचें रूपांतर करतो त्याप्रमाणें शास्त्रीबुवांनीं निबंधमालेची जादू वाचकवर्गावर टाकून महाराष्ट्राचें एकप्रकारें रूपांतरच केलें. महाराष्ट्रियांच्या विचारांत आमूलाग्र विचारक्रान्ति झाली. चर्चेकरितां हजारों विषय घेऊन, त्याचा फापटपसारा मांडून, सर्वच विषय अर्धेमुर्धे चावून सोडून द्यावे, असला अर्धवटपणा निबंधमालेनें केला नाहीं. सात वर्षांच्या कारकीर्दींत निबंधमालेंत (१) मराठी भाषेची स्थिति, (२) इंग्रजी भाषा, (३) इतिहास, (४) मोरोपंतांची कविता, (५) लोकहितवादी, (६) आमच्या देशाची स्थिति असे पांच-सहा विषयच प्रामुख्यानें चर्चिले गेले. याशिवाय डॉक्टर जॉनसन, लोकभ्रम, विद्वत्त्व व कवित्व, गर्व इत्यादि संकीर्ण विषय अधूनमधून आले होते; पण ज्या ज्या विषयांत शास्त्रीबुवांनीं वाचकवर्गाच्या मनाला धक्के देऊन जागृत केलें आणि त्यांच्या विचाराला नवें श्रेयस्कर वळण लावलें, असे विषय निवडून तेवढेच नेमके निर्दिष्ट करावयाचे झाल्यास ते पांचच घ्यावे लागतील.

### मराठी भाषेचें दैन्य दूर केलें

विष्णुशास्त्री चिपळूणकर यांची पहिली मोठी कामगिरी म्हटली, तर त्यांनीं मराठी भाषेची दैन्यावस्था फेडून तिला समृद्धिसंपन्नता लाभून दिली. अविभक्त हिंदु कुटुंबांत अल्पवयी सासुरवासिणीची जी दुःस्थिति असते, तशी दुःस्थिति त्या वेळीं मराठी भाषेची होती. सरकाररूपी सावत्र सासूबाईकडून हिडिसफिडिस म्हणून अवहेलना चालू होती. परकी भाषारूपी सावत्र नणंदांचा जाच हरघडी सोसावा लागत होता आणि ज्यांनीं आपल्या या गृहलक्ष्मीला आधार देऊन तिला उच्चपदावर चढवावयाचें ते घरधनीच सावत्र आईची मर्जी राखण्यासाठीं हिचा संबंध टाळीत होते. शास्त्रीबुवांनीं मराठी भाषेची वकिली उत्कृष्ट रीतीनें करून तिचें हक्काचें स्थान तिला मिळवून दिलें आणि त्यांनीं हातीं लेखणी धरण्याच्यापूर्वी तिच्या गुणावगुणासंबंधीं जे अपसमज होते ते पार घालवून टाकून तिला मानमान्यता मिळवून दिली. शास्त्रीबुवांच्या लेखानें मराठी भाषेकडे पाहण्याची महाराष्ट्रियांची दृष्टिच बदलली आणि असा दृष्टिकोन बदलल्यानें मराठी भाषेला प्रौढपणा आणि अभिनव सौंदर्य येऊं लागलें. अर्थातच मराठी भाषेला तिच्या घरांत तिचें हक्काचें गृहलक्ष्मीचें स्थान प्राप्त करून देण्याचें श्रेय शास्त्रीबुवांच्या 'निबंधमाले'ला आहे.

भोर

### स्वदेशाभिमान जागृत झाला

मराठी भाषेची शोचनीय स्थिति जाऊन ती वैभवाच्या शिखरावर आरूढ व्हावी असें प्रतिपादन करतांना तुलनेसाठीं म्हणून इंग्रजी भाषेच्या वैभवाच्या वर्णनाचा विषय विष्णुशास्त्री यांनीं हातीं घेतला आणि त्या वर्णनाच्या भरांत इंग्रजी भाषेंतील ऐतिहासिक ग्रंथांचा परामर्श घेणें ओघानेंच आलें. हा परामर्श घेतांना ऐतिहासिक ग्रंथांतील भाषासौष्ठवाकडून शास्त्रीबुवांची दृष्टि त्या ग्रंथांतील विचारप्रणालीकडे वळली आणि इंग्रज लेखकांनीं लिहिलेल्या स्वकीय देशाच्या व परकीय देशांच्या इतिहासांतील महदंतर दिसून येतांच शास्त्रीबुवांचा स्वदेशाभिमान उफाळून वर आला. विष्णुशास्त्री हे जन्मजात देशभक्त होते; त्यांचा देशाभिमान परोपदिष्ट किंवा परप्रत्ययनेय नव्हता. तथापि '**विप्रकृतः पन्नगः फणां कुरुते**' या न्यायानें इंग्रजी इतिहासाच्या वाचनानें त्यांचा देशाभिमान डिवचला जातांच, आपल्या स्वदेशभक्तीचा आविष्कार करणें आणि स्वदेशीयांच्या मनांतील तद्विरुद्ध भावनांचीं जळमटें झाडून टाकून त्यांचीं मनें देशाभिमानाचा उपदेश ग्रहण करण्याला संस्कारक्षम करणें, हें आपलें आद्य कर्तव्य आहे, याची जाणीव शास्त्रीबुवांस झाली आणि त्या वेळेपासून स्वदेशाभिमानाचा आविष्कार करणें हें नैमित्तिक कार्य न होतां तो नित्यधर्म झाला. या वेळेपासून स्वदेशाभिमान हें विष्णुशास्त्री यांच्या लेखांचें एक उपांग म्हणून न राहतां तो त्यांच्या लेखांचा स्थायीभाव झाला. शास्त्रीबुवांनीं वाचकांच्या विचारांत क्रान्ति केली हें सर्वश्रुतच आहे. पण त्यांच्या स्वतःच्या विचारांतहि या वेळीं ही उत्क्रान्ति झाली. मनुष्य स्वभावतः देशभक्त असला, तरी देशभक्तीचें व्रत म्हणून स्वीकार करण्याला कांहीं योग्य प्रसंग यावा लागतो. निबंधमालेच्या लेखनांत स्वदेशभक्ति आरंभापासून प्रसंगानुरोधानें विलसत होतीच; परंतु मालेच्या '**इतिहास**' या विषयावरील **आठव्या** अंकापासून त्यांच्या लेखांत देशाभिमानाच्या स्थायीभावाची सुप्रतिष्ठा झाली आणि शास्त्रीबुवांच्या लेखनशैलीच्या उत्क्रान्तीला पूर्णत्व आलें.

इंग्लंडांतील विद्वान् स्वभाषेच्या उन्नतीसाठीं स्वावलंबनानें आमरण कशी तपश्चर्या करतात त्याचा आदर्श म्हणून शास्त्रीबुवांनीं '**डॉक्टर जॉन्सन**' ही लेखमाला लिहिली. या लेखांचाहि सुपरिणाम होऊन अनेकांना आपल्या मायभाषेच्या सेवेला वाहून घेण्याची स्फूर्ति मिळाली.

### मोरोपंतांची कविता

गद्यवाङ्मयाच्या दृष्टीनें मराठींत व्हावी तशी ग्रंथनिर्मिति झाली नसली, तरी पद्यविभाग कसा समृद्ध आहे तें दर्शविण्याकरितां शास्त्रीबुवांनीं '**मोरोपंतांची कविता**' ही लेखमाला अत्यंत परिश्रमपूर्वक आणि चटकदार भाषेंत गुंफिली. या लेखमालेनें अनेक सारस्वतभक्तांस स्फूर्ति मिळाली. ह. भ. प. पांगारकर यांचें मोरोपंतांचें चरित्र हें त्या स्फूर्तीचें पहिलें प्रत्यक्ष फळ असून, त्याच स्फूर्तींतून

'**मराठी वाङ्मयाचा इतिहास**' पांगारकरांच्या हातून त्रिखंडांच्या रूपानें बाहेर पडला. ठाण्याचे कै. विनायकराव भावे यांच्या '**महाराष्ट्र-सारस्वत**' ग्रंथाच्या निर्मितीलाहि शास्त्रीबुवांची निबंधमालाच कारणभूत झाली.

### शास्त्रीबुवांना आव्हान

'**लोकहितवादी**' ही विस्तृत लेखमाला लिहिण्याची कामगिरी विष्णुशास्त्री यांनीं आपण होऊन हौसेनें पत्करली नसून, ती कामगिरी त्यांच्यावर येऊन पडली. सरदार गोपाळराव हरि देशमुख हे एक शास्त्रीबुवांच्या आधींच्या जुन्या पिढींतलें बडें प्रस्थ होतें. ते सरकारी नोकर असल्यानें '**लोकहितवादी**' या टोपणनांवानें ते आपले लेख लिहीत. विष्णुशास्त्री यांच्या जन्माच्याहि आधींपासून गोपाळराव हरि हे वृत्तपत्रांतून अनेक विषयांवर लेख लिहीत आणि कांहीं लेखन त्यांनीं स्वतंत्रपणेंहि केलें होतें. लोकहितवादींचें बहुतेक लेखन 'निबंधमाले'च्या उदयाच्या पूर्वींचें असल्यानें त्यांतील विचार कोणत्या प्रकारचे असतील तें न सांगतांहि वाचकांना ताडतां येईल. इंग्रजी राज्यसत्तेच्या वैभवानें दिपून गेलेल्या पहिल्या पिढींतल्या सरकारच्या मर्जींतल्या एका सरदाराच्या लेखणींतून उतरलेले जुनेपुराणे विचार निबंधमालेच्या उदयाबरोबरच लुप्तप्राय झाले होते. असल्या आत्मप्रत्ययहीन विचारांचा समाचार मोघम भाषेंत निबंधमालेंत पर्यायानें घेतला जातच होता; परंतु निबंधमालेंतल्या लेखांचा जसजसा अधिकाअधिक बोलबाला होऊं लागला, तसतशी जुन्या विचारांच्या लेखकांना नव्या पिढीची एकांगी वाटणारी विचारसरणी खोडून काढण्यासाठीं स्वतःचे लेख जनतेपुढें ठेवण्याची उत्सुकता वाटूं लागली. त्या उत्सुकतेच्या भरांत लोकहितवादींनीं आपलीं शंभर पत्रें वगैरे छापलेला 'निबंधसंग्रह' आणि इतर पांचसहा पुस्तकें निबधमालाकारांकडे अभिप्रायार्थ पाठवून दिलीं ! शास्त्रीबुवांना हें एक प्रकारें आव्हानच होतें. अर्थातच शास्त्रीबुवांनीं तें अप्रत्यक्ष आव्हान स्वीकारलें आणि लोकहितवादींवर झोड उठवून दिली. लोकहितवादींनींच ही खाजवून खरूज काढल्यामुळें ती त्यांच्या अंगावर इतक्या जोरानें उठली यांत आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. शास्त्रीबुवांचे सर्व टीकात्मक लेख प्रतिपक्षाच्या विकृत विचारसरणीला उत्तर म्हणूनच लिहिण्यांत आले आहेत. विष्णुशास्त्री हे आपण होऊन कधीं कोणावर घसरत नसत; पण प्रतिपक्षानें, भलतेंसलतें थोतांड पसरविण्याचा उपद्व्याप केल्यानंतर मात्र ते त्याचा खरपूस समाचार घेतल्याशिवाय राहत नसत.

प्रहर नमय चापं प्राक्प्रहारप्रियोऽहं ।
मयि तु कृतनिघाते किं विदध्याः परेण ॥

या श्लोकांत वर्णिलेली परशुरामी रणनीतीच त्यांची आवडती होती आणि त्या विचारसरणीस अनुसरून ते कधींहि आपण होऊन कोणाच्या वाटेस जात नसत; परंतु प्रतिपक्षी आखाड्यांत उतरून आव्हान देऊं लागल्यावर त्याला चारीमुंडे चीत केल्याशिवाय ते सोडीत नसत.

लोकहितवादींवरील टीका निष्कारण कडक आहे असें कित्येकांचें मत आहे. पण त्यांनीं यांत दूरवर विचार केलेला आढळत नाहीं. शास्त्रीबुवांची लेखनशैली आणि कोटीक्रमाची पद्धति अनेक वर्षांच्या सरावानें ठरून गेली होती; तेव्हां 'लोकाहितवादीं'वर आग पाखडण्यासाठीं त्यांनीं मुद्दाम कडक भाषा वापरली असा प्रकार मुळींच नाहीं. प्रतिपक्षाचे मुद्दे जितके अधिक लेचेपेचे असतील तितकी तत्संबंधीं टीका त्यास अधिक झोंबते; आणि त्याची विचारसरणी मुळांतच हास्यास्पद असल्यास त्यावरील टीका टर उडविणारी अशी वाटते. लोकहितवादींचा कोटीक्रमच हास्यास्पद असल्यामुळें त्यांवरील शास्त्रीबुवांचें प्रत्युत्तर विशेष झणझणीत वाटल्यास विष्णुशास्त्री यांचा तो दोष नसून, लोकाहितवादींच्या लेखांतील कच्चेपणाकडेच त्या दोषाची जबाबदारी उलटते.

## शास्त्रीबुवांच्या टीकेचें औचित्य व आवश्यकता

लोकहितवादींच्या लेखांतील भिन्न भिन्न विधानांवर शास्त्रीबुवांचा कटाक्ष नसून ज्या मनोभूमिकेवरून लोकहितवादींनीं हे लेख लिहिले त्या मनोरचनेवरच शास्त्रीबुवांनीं आपलें टीकास्त्र चालविलें. लोकहितवादींच्या एकंदर लेखनांतील तात्पर्यार्थ असा कीं, ( १ ) ब्राह्मण मुत्सद्दी वेडे होते ( २ ) ब्राह्मणांची विद्या निरुपयोगी आहे आणि ( ३ ) ब्राह्मण धर्माधिकारी अज्ञानी होते. या स्वरूपाचा मतप्रचार तत्पूर्वी चाळीस वर्षे चालू होता व त्याचा अनर्थकारक परिणाम राष्ट्राला भोंवत होता. त्यास उद्देशून शास्त्रीबुवा विचारतात – 'आपले लोक पेशवाईंत अगदीं मूर्ख होते, हें महातत्त्व ज्यांच्या हृदयांत एकदां बाणलें त्यांच्या ठायीं आपला गतेतिहास वाचण्याची उत्कंठा कशी उत्पन्न होईल ?' अर्थातच ज्याला आपल्या इतिहासावर आधारलेला उज्ज्वल भूतकाल नाहीं त्यांनीं उज्ज्वल भविष्यकाळाची आशा तरी कशाच्या जोरावर करावयाची ? असल्या आत्मप्रत्ययशून्य विचारसरणीमुळेंच तर सगळीकडे हताशता पसरली होती. ही निराशाजनक परिस्थिति साफ घालवून टाकून जनतेंत आत्मविश्वास व महत्त्वाकांक्षा उत्पन्न करावी हें तर शास्त्रीबुवांचें ध्येय. त्या ध्येयावरच 'मूलेकुठारः' अशा प्रकारचा घाव घालणारीं 'शतपत्रें' वाचकांच्या मनाला भुरळ पाडतील, हें संकट हेरून शास्त्रीबुवांनीं त्या शतपत्रांवर चौफेर हल्ला चढवून, त्यांना नेस्तनाबूद करून आपला मार्ग निष्कंटक केला. शास्त्रीबुवांचें टीकेचें हें औचित्य व आवश्यकत्व वाचकांना पटल्यावर त्या लेखांतील विशिष्ट विधानांची चिकित्सा करीत बसणें गौण ठरतें.

## टीकाकारांचा शुद्ध हेतु

या संबंधांत शास्त्रीबुवांचे चरित्रकार लिहितात – " प्रस्तुत निबंधांत जरी रावबहादुर यांच्यावर बराच कडाका उडविला आहे, तरी तो व्यक्तीवर नसून तत्कालीन एकंदर विद्वान् वर्गासच उद्देशून आहे. लोकहितवादींच्या मताचा

प्रसार विष्णुशास्त्री यांच्या वेळीं विद्वान् लोकांत बराच होत होता, तो कमी व्हावा म्हणून त्यांनीं त्या मताचें निरसन करण्याकरितां हा विषय हातीं घेतला. ”

या अभिप्रायावरून शास्त्रीबुवांचा उद्देश स्तुत्य असून त्यांची टीका परिणामकारक झाली हेंहि सिद्ध होतें. अलीकडे कित्येकांच्या नाजूक प्रकृतीस निबंधमालेंतील कडक भाषा मानवत नाहीं, आणि कित्येकांना लोकहित-वादींच्या संप्रदायाविषयीं प्रेमाचा पान्हा फुटला आहे, अशा दुहेरी कारणानें लोक-हितवादींच्या मताचें समर्थन आणि शास्त्रीबुवांच्या मताचें खंडन करण्याचा प्रयत्न रावबहादुरांच्या कांहीं अनुयायांनीं चालविला आहे. त्याला प्रत्युत्तर म्हणून या मुद्द्याचा इतका विस्तार करावा लागला.

लोकहितवादींवरील टीकेवर आक्षेप घेणारे जसे कांहीं लेखक आढळतात तसेच, दयानंद सरस्वती आणि ज्योतिबा यांच्यावरील टीकेलाहि नाकें मुरडणारे अनेक वाचक आढळतात. या संबंधांत सर्वच आक्षेपकांना एका गोष्टीचा विसर पडतो कीं, शास्त्रीबुवांची टीका त्या त्या मंडळींच्या त्या वेळच्या चाललेल्या कार्य-क्रमावर आणि विशेषतः स्वमतप्रचारार्थ त्यांनीं उपयोजिलेल्या कार्यपद्धतीवर होती. त्या त्या पंथांची अलीकडील कामगिरी पाहून ८० वर्षांपूर्वींच्या टीकेचें औचित्य वा अनौचित्य ठरविणें योग्य नव्हे. ज्योतिबा फुले यांच्यावरील टीका केवळ त्यांच्या ‘गुलामगिरी’ या पुस्तकाला उद्देशून होती, आणि कोणीहि निःपक्षपाती परीक्षक त्या पुस्तकांतील विचारसरणी मान्य करील असें म्हणवत नाहीं. आर्यसमाजाची कडवी वृत्ति, संघटना, गुरुकुलांची स्थापना, सामाजिक कार्याविषयींची उत्कटता इत्यादि गोष्टी त्या वेळीं प्रादुर्भूत झाल्याच नव्हत्या. त्या वेळच्या आर्यसमाजाच्या प्रसारांत, वेदांची अतिरेकी स्तुति, वेदांहून इतर स्मृति-पुराणादि ग्रंथांची अतिरेकी निंदा आणि मूर्तिपूजेवर बेसुमार भडिमार, असे तीन मुद्दे प्रामुख्यानें असत आणि त्या मुद्द्यांच्या अतिरेकावरच शास्त्रीबुवांचा कटाक्ष होता.

## निबंधमालेंतील लेखांचा परिणाम

असो; ‘लोकहितवादी’ आणि ‘आमच्या देशाची स्थिति’ या दोन लेखमाला म्हणजे विष्णुशास्त्री यांच्या आयुष्यांतील कामगिरीचें सारसर्वस्व होय. या दोन लेखांत त्यांचें स्वभाषाप्रेम, स्वदेशभक्ति, स्वधर्माभिमान, पूर्वजांविषयीं आदर, पारतंत्र्याची चीड, स्वातंत्र्यप्राप्तीविषयीं अत्युत्कटता, स्वजनांच्या कर्तृत्वावरील दृढविश्वास, आपल्या देशाच्या उज्ज्वल भवितव्यावरील अढळ निष्ठा इत्यादि गुण प्रामुख्यानें व्यक्त होतात. शास्त्रीबुवांनीं आपल्या निबंधमालेनें विचारक्रान्ति केली असें आम्ही म्हणतों तें याच त्यांच्या गुणांच्या आविष्कारावरून होय. त्यांचे लेख वाचून स्वभाषा-निंदक स्वभाषेची सेवा करूं लागले, देशद्रोही लोकांचे डोळे उघडून ते पश्चात्ताप-पूर्वक देशसेवेला सादर झाले, धर्मभ्रष्टतेच्या लाटेला आळा पडून नास्तिक लोक आस्तिक झाले आणि सर्वसामान्य जनतेच्या मनांतील न्यूनगंड नाहींसा होऊन

आपण यत्न करूं तर अपहरण केली गेलेली स्वराज्यलक्ष्मी परत आपल्याकडे खेचून आणूं, असा आत्मविश्वास जनतेच्या मनांत प्रादुर्भूत झाला. क्रान्तिकारक उपायांना हात घालण्यापूर्वी आधीं विचारक्रान्तीची बैठक पक्की व्हावी लागते.. आठ वर्षे अव्याहत लेखणी चालवून शास्त्रीबुवांनीं भावी क्रान्तीच्या बैठकीचा पाया पक्का घातला. लोकहितवादींच्या लेखांनीं तो पाया डळमळीत होण्याऐवजीं, हलवून खुंटा बळकट करावा, त्याप्रमाणें तो पाया अधिकच पक्का व भक्कम झाला. या दृष्टीनें पाहतां लोकहितवादींचे आपण उपकारच मानले पाहिजेत.

देशाभिमान आणि आत्मनिष्ठा यांची पार्श्वभूमि पक्की झाल्यावर शास्त्रीबुवांनीं आपल्या जोरदार लेखणीनें **'परवशता शतगुणें करी जाच'** ही कव्युक्ति कशी अक्षरशः खरी आहे तें अनेक दाखल्यांनीं पटवून दिलें. परकी सत्ता झुगारून देऊन स्वराज्य संपादन करण्याची व तें चालविण्याची धमक जशी आपल्या पूर्वजांच्या अंगीं होती, तशीच ती आपल्या अंगांतहि आहे आणि आपण 'उद्धरेदात्मनात्मानं नात्मानमवसादयेत्' या वचनावर निष्ठा ठेवून वागूं, तर सध्याच्या दुःस्थितींतून मुक्त होऊन स्वातंत्र्याचा उपभोग घेऊं शकूं, हें वाचकांच्या मनावर बिंबविण्यासाठीं शेवटचा 'आमच्या देशाची स्थिति' हा लेख लिहिला गेला आणि त्या लेखानें विचारक्रान्ति पूर्णतेला नेली.

### क्रान्तिपथावरील पहिलीं पावलें

निबंधमालेनें राष्ट्राच्या विचारांत महत्क्रान्ति करून सोडण्याचें जें राष्ट्रोद्धारक कार्य केलें त्या कार्याचें दृश्य फल 'न्यू इंग्लिश स्कूल'ची स्थापना आणि केसरी-मराठा पत्रांचें प्रकाशन या स्वरूपांनीं प्रकट झालें. निबंधमालेंतील विचारसरणी जनतेला पटली म्हणूनच वरील दोन्ही संस्था आरंभापासूनच भव्य स्वरूप धारण करून भरभराटीचा मार्ग आक्रमूं लागल्या. या संस्थांच्या स्थापनेनें शास्त्रीबुवा हे नुसते 'क्रियेवीण वाचाळता' या कोटींतले बोलघेवडे क्रान्तिकारक नसून, 'बोले तैसा चाले' या उक्तीस अनुसरून क्रान्तिपथावर पहिलें पाऊल टाकणाऱ्यांत अग्रेसर आहेत हें सिद्ध झालें.

न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना करण्यांत आपला हेतु काय आहे याचें स्पष्टीकरण त्यांनीं अनेक वेळां आपल्या पत्रांतून व भाषणांतून केलें आहे. "विद्यार्थ्यांत सरकारी नोकरीच्या मिंधेपणाबद्दल अप्रीति व स्वतंत्र धंदे चालवून त्यावर निर्वाह करण्याची आवड हीं उत्पन्न होतील; त्याचप्रमाणें इंग्लिश लोकांचा पेहराव, त्यांचे ऐषआराम वगैरे ढंग न उचलतां विद्यार्थ्यांनीं त्या लोकांच्या अंगचे धैर्य, साहस, सतत उद्योग, स्वाभिमान, देशाभिमान वगैरे उच्च नैसर्गिक गुण घ्यावेत, अशा गोष्टींकडे शास्त्रीबुवांचा रोख असे" हें त्या शाळेचें वैशिष्ट्य होय. केसरी-मराठा वृत्तपत्रें सुरू करण्यांतला त्यांचा हेतु निराळा कथन करण्याची आवश्यकताच नाहीं. अशा रीतीनें निबंधमालेंतून ज्या प्रकारच्या शिक्षणाचा आणि ज्या प्रकारच्या

JAN 1974

सार्वजनिक चळवळीचा व व्यवसायाचा उपदेश त्यांनीं सतत केला, तसलीं राष्ट्रकार्यें त्यांनीं स्वतः जातीनें सुरू केलीं. निबंधमाला वाचून प्रौढांच्या मनाला हितकारक वळण लागेलच, पण त्यापेक्षां लहानपणापासूनच विद्यार्थ्यांची बुद्धि राष्ट्रोन्नतीच्या कार्याकडे खेचली गेली तर अधिक बरें असें जाणून शास्त्रीबुवांनीं नव्या शाळेचा उद्योग आरंभिला; आणि त्यांची ही कल्पना साहजिकच अधिक फलदायी ठरली. निबंधमालेंतील लेखांनीं जितक्या वाचकांचीं मनें देशसेवेकडे वळलीं असतील त्यांहून अधिक जणांना न्यू इंग्लिश स्कूलच्या शिक्षणापासून राष्ट्रकार्याची प्रेरणा मिळाली यांत कांहीं शंका नाहीं.

अशा रीतीनें विचारक्रान्ति करून आणि आचारक्रान्तीचें बीज पेरून दि. १७ मार्च १८८२ या दिवशीं विष्णुशास्त्री यांनीं आपली इहलोकाची यात्रा संपविली. शास्त्रीबुवा आणखी कांहीं वर्षें वाचते तर निबंधमालेचें ग्रंथमालेंत रूपांतर झालेलें दिसलें असतें. न्यू इंग्लिश स्कूलची परिणति कॉलेजांत झालेली त्यांनीं पाहिली असती. डेक्कन एज्युकेशन सोसायटींत पुढें जी फूट पडली ती शास्त्रीबुवांच्या वजनानें दबून गेली असती; पण असल्या कल्पनातरंगांत विहार करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. अवघ्या ३२ वर्षांचें जें अल्पायुष्य शास्त्रीबुवांना लाभलें तेवढ्यांतच त्यांनीं जादूच्या कांडीप्रमाणें आपल्या लेखांनीं महाराष्ट्रियांचीं मनें भारून टाकून तीं देशभक्तीच्या मार्गाकडे वळविलीं. हें अद्भुत कार्य साधल्यानें त्यांचें नांव चिरस्मरणीय होऊन राहिलें आहे.

## शास्त्रीबुवांच्या यशाचें मर्म

शास्त्रीबुवांच्या निबंधमालेनें मराठी भाषेला एक खंबीर पुरस्कर्ता, जुन्या पक्षास एक चतुर वकील, हिंदुराष्ट्रास एक उद्धारकर्ता लाभल्याचें दृश्य दिसून आलें. विष्णुशास्त्री यांच्या उदयकालापूर्वीं हरएक विलायती चीज तेवढी चांगलीच असावयाची आणि आपल्याकडील त्याहून सरस चीजहि उलट प्रकारची भासावयाची, असा जो विपरीत प्रकार पन्नास-साठ वर्षें चालला होता, त्यानें उलट खाल्ली. अशा रीतीनें आपल्याच समाजांतील राष्ट्राला अहितकारक अशा विचारांची लाट उलटवून देशोन्नतीला उपकारक अशी उच्चार, विचार व आचार या त्रयीची नवी लाट निर्माण करण्यांत आली. ही जी विचारक्रान्ति गेल्या शतकाच्या शेवटच्या दशकांत झाली तिचें श्रेय मुख्यतः विष्णुशास्त्री चिपळूणकर यांसच आहे.

शास्त्रीबुवांच्या लेखनकार्याला एवढें सुयश लाभण्यांतलें मर्म हेंच कीं, त्यांचे विचार खऱ्या तळमळीचे असून त्यांच्या लेखांत व कृतींत विरोध नव्हता. त्यांचें आचरण शुद्ध, वृत्ति स्वावलंबी व निर्लोभी आणि स्वकार्यनिष्ठा अढळ होती. दुसरा कोणी लेचापेचा देशभक्त असता तर, त्यांच्या मालेविरुद्ध जें काहूर माजलें त्याच्या दशांश वावटळ उठलेली पाहतांच त्यानें 'क्षमस्व' म्हणून आपला

लेखनव्यवसाय सोडून दिला असता. शास्त्रीबुवांनीं प्रतिपक्षाच्या टीकेची तर क्षिति बाळगली नाहींच, पण सरकारी रोषाचीहि पर्वा केली नाहीं. याशिवाय त्यांचें विवादपटुत्वहि त्यांच्या यशास कारणीभूत झालें. वाचकांना पटेल असा कोटीक्रम करण्यांत आणि विशेषतः प्रतिपक्षाचा कोटीक्रम उलटवून त्याच्याच गळ्यांत अडकविण्यांत त्यांचा हातखंडा असे. अशा विविधगुणसमुच्चयामुळें गेल्या शतकांत विष्णुशास्त्री चिपळूणकर हा क्रान्तिवीर प्रतिपक्षाला दिपवून अल्पकाळांतच दिवंगत झाला. पण त्यांच्या कार्याचें वैशिष्ट्य हें कीं, त्यांनीं पेरलेल्या क्रान्तिबीजापासून उद्भवलेला अंकुर त्यांच्या पश्चात् करपून न जातां उलट फोफावतच गेला. विचारक्रान्तीची उच्चारक्रान्तींत आणि उच्चारक्रान्तीची आचारक्रान्तींत परिणति होत होत १९५० सालीं आपला मायदेश पूर्ण स्वतंत्र झाला. १८५० च्या मेच्या २० व्या तारखेस विष्णुशास्त्री यांच्या जन्माबरोबर जी विचारक्रान्तीची पहिली ललकारी कानीं पडली तिचें १९५० त पूर्ण स्वातंत्र्याच्या जयघोषांत रूपांतर होऊन त्यानें आपली मायभूमि दणाणून सोडली. या जयघोषाच्या निनादाच्या वेळीं कृतज्ञ महाराष्ट्रियांना शास्त्रीबुवांच्या ललकारीचें सानंद व सकौतुक स्मरण होणें साहजिक आहे.

---

## लोकमान्यांचें धोरण व धडाडी : : : : २

मतिभेदतमस्तिरोहिते गहने कृत्यविधौऽनुयायिनाम् ।
सुकृते स्वचरित्रतेजसा कुरुषे दीप इवार्थदर्शनम् ॥

अर्थगौरवाविषयीं विख्यात अशा भारवि कवीच्या सुप्रसिद्ध काव्यांतून प्रकृत प्रसंगास अनुरूपता येण्याकरितां किंचित् फेरबदल करून वरील अवतरण उद्धृत केलें आहे. लो. टिळकांच्या ठायीं त्यांच्या अनुयायांची निष्ठा किती आहे, लोकमान्यांच्या पश्चात् मतभेदांचा केवढा गोंधळ माजून राहिला आहे, त्या मतभेदरूपी तमानें दृष्टि दूषित केल्यामुळें आजमितीला कर्तव्याकर्तव्य जाणणें व तें आचरणांत आणणें किती गहन झालें आहे, तथापि अशाहि किंकर्तव्यताविमूढ स्थितींत देखील लोकमान्यांचें उज्ज्वल चरित्र हें दीपगृहाप्रमाणें राष्ट्रीय पक्षास आपलें अंतिम साध्य व तें साधण्याचा मार्ग यांचा स्पष्ट बोध कसा करून देत आहे या सर्व गोष्टींची यथार्थ कल्पना वरील अवतरणानें एकसमयावच्छेदेंकरून येते. 'मतामतांचा गलबला' हा नेहमींच दृष्टोत्पत्तीस येतो; परंतु प्रस्तुत परिस्थितींत असला बुद्धिभेद केवळ सामान्यतः हानिकारक नसून राष्ट्रघातक होण्याचा संभव असल्यानें या अंधकारमय स्थितींतून अचूक मार्ग शोधून काढण्यास लोकमान्यांच्या चरित्रदीपा-

(केसरी, २६ जुलै १९२१)

च्या प्रकाशाचाच आपणांस आश्रय केला पाहिजे. याकरितांच त्यांच्या पुण्यतिथी-च्या पुण्यप्रसंगीं लोकमान्यांचें राजकीय धोरण व तें ठरलेलें राजकीय धोरण अंमलांत आणण्याची त्यांची धडाडी या दुहेरी गुणांचें किंचित् सिंहावलोकन करण्याचा विचार आहे.

लोकमान्यांच्या ठायीं वरील दोन गुणांचा योग्य प्रमाणांत मिलाफ झाला होता हें त्यांच्या अलौकिकतेचें बीज होय. राजकीय धोरण अचूक ठरविण्याची प्रखर बुद्धिमत्ता अंगीं असली, तरी तें धोरण अमलांत आणण्याची धडाडी कित्येकांत नसते. कित्येकांत अंगीकृत कार्य सहस्रावधि संकटांसहि न जुमानतां शेवटास नेण्याची धडाडी असली, तरी कार्याकार्यविचारणा करण्यांत त्यांची बुद्धि तितपत चालत नाहीं. परंतु लोकमान्य टिळकांच्या अंगीं असें सव्यसाचित्व असल्यानें ते राष्ट्राचे खरे नेते होऊं शकले.

## पुढाऱ्यांची वर्गवारी

लोकमान्यांनीं आपल्या सार्वजनिक आयुष्यक्रमास सुरुवात करतांना जी दिशा पत्करिली तिच्यावरूनच त्यांच्या अंगच्या या गुणद्वयांचा प्रत्यय आला. पुढें पुढें तें राजकारणांत जसजसा विशेष पुढाकार घेऊं लागले तसतशी त्यांची बुद्धि परिपक्व होत जाऊन ते परिणतप्रज्ञ बनले. राजकीय आखाड्यांत उतरल्यापासून त्यांच्या राजकारणाचें विशिष्टत्व हरएक प्रसंगीं व्यक्त होऊं लागलें होतें; परंतु १९०५ सालच्या वंगभंगाच्या चळवळीपासून त्यांच्या धोरणाला विशिष्ट मूर्तस्वरूप आलें आणि सुरतेच्या कॉंग्रेसच्या बखेड्यानंतर तर हा भेद अधिकच स्पष्ट झाला. या पक्षभेदाची आणि आपण आंखलेल्या मार्गाची स्वपक्षीयांस व परपक्षीयांसहि यथार्थ कल्पना यावी यास्तव त्यांनीं सुरतेच्या कॉंग्रेसनंतर ता. ११ फेब्रुवारीच्या केसरींत 'राजकीय पक्षोपन्यास' या मथळ्याखालीं राजकीय पुढाऱ्यांची वर्गवारी केली आहे. गुणबोधक, दोषदर्शक, स्वराज्य-प्रार्थक, स्वराज्यग्राहक आणि स्वातंत्र्यवादी असे ते पांच वर्ग होत. पहिला वर्ग गुणबोधकांचा. यांना ब्रिटिश राज्यपद्धतींत दोष दिसतच नाहींत; याकरितां राजकीय चळवळीच्या दृष्टीनें हा वर्ग असून नसल्या-सारखाच. दुसऱ्या दोषदर्शक वर्गाला राज्यपद्धतींतील दोष दिसतात, पण त्यांची ब्रिटिश न्यायबुद्धीवर इतकी अढळ निष्ठा असते कीं, ब्रिटिशांना त्यांचे दोष दर्श-विण्याचाच काय तो अवकाश, कीं त्यांनीं तो सुधारलाच असें यांस वाटतें. तिसऱ्या वर्गाची मुख्य भिस्त ब्रिटिशांच्या उदार बुद्धीवर आहे; आणि अर्ज, विनंत्या आणि डेप्युटेशन हेच त्यांचे स्वराज्यप्राप्तीचे उपाय होत. जुन्या कॉंग्रेस पक्षामधील बरेचसे पुढारी या दुसऱ्या अगर तिसऱ्या वर्गांत मोडतात. कित्येकांची उत्क्रान्तितत्त्वाप्रमाणें क्रमाक्रमानें एका वर्गातून दुसऱ्या वर्गांत प्रगति झाली असेल; पण त्यांतले फारच थोडे पुढारी चौथ्या पायरीपर्यंत येऊन पोंचले. लोकमान्यांच्या प्रतिभासंपन्नतेची व अचूक राजकीय धोरणाची जी धन्यता वाटते ती एवढ्याचकरितां कीं, त्यांनीं

लहान मुलांप्रमाणें एकेक वर्गाची परीक्षा देऊन पुढल्या वर्गांत प्रवेश न करतां राजकीय आखाड्यांत जी उडी टाकली तेव्हांपासूनच तें 'स्वराज्यग्राहक' पक्षांत दाखल झाले. किंबहुना असेंच म्हणणें सयुक्तिक होईल कीं, त्यांनीं आपल्या राजकीय चळवळीच्या धडाडीनें 'स्वराज्यग्राहक' पक्ष तयार केला आणि त्यांत स्वतःच पुढारीपणानें प्रवेश केला. लोकमान्यांना पहिल्या तीन पक्षांचा परावलंबी मार्ग केव्हांहि पसंत नव्हता. अगदीं प्रारंभापासूनच त्यांची सर्व मदार स्वावलंबनावर होती आणि १८९५ सालापासून १९०५ सालापर्यंत ते हिंदी जनतेला स्वावलंबनाचेंच शिक्षण देत होते. पण १९०५ सालापर्यंत त्यांच्या शिक्षणाचा परिणाम होण्याला परिस्थिति फारशी अनुकूल नव्हती. वंगभंगाच्या चळवळीनें ही अडचण दूर केली आणि लोकमान्यांच्या राष्ट्रकार्याला धडाडीनें प्रारंभ झाला.

### अडवणुकीचें धोरण

स्वावलंबनाच्या मार्गानें स्वराज्यप्राप्तीचीं जीं साधनें त्यांनीं निश्चित केलीं त्यांचा समावेश स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण व स्वराज्य या चतुःसूत्रींत झाला आहे. पण ती चतुःसूत्री किती व्यापक होती याची आजमितीला कित्येकांना यथार्थ कल्पना नसल्यानें लोकमान्यांच्या राजकीय धोरणाविषयीं कित्येकांचा गैरसमज दिसून येतो. तो दूर होण्याकरितां त्या चतुःसूत्रीच्या व्यापक स्वरूपाचें थोडेंसें दिग्दर्शन करणें अप्रस्तुत होणार नाहीं. या चतुःसूत्रींत जर कोणतें एकच धोरण सारखें अनुस्यूत झालें असेल, तर तें 'अडवणूक' हें होय. राजकर्त्यांना आपल्या सत्याग्रहानें ठिकठिकाणीं अडविल्यावांचून आपल्यास स्वराज्यप्राप्ति व्हावयाची नाहीं असें त्यांचें ठाम मत असल्यानें त्यांनीं वेळोवेळीं या अडवणुकीच्या मार्गाचा उपदेश केला आणि स्वतः मोठ्या धडाडीनें त्यांनीं तो अंमलांतहि आणिला. सनदशीर चळवळींत या अडवणुकीची मजल कोठवर जाऊं शकते याचा खुलासा करतांना त्यांनीं एके ठिकाणीं असें स्पष्ट म्हटलें आहे कीं, "सरकारनें जुलमी कायदा किंवा हुकूम केला असतां तो जाणूनबुजून मोडून तुरुंगांत जाण्याच्या निग्रहाचा या अडवणुकीच्या मार्गांत समावेश होतो." अर्थातच १९१९ सालीं रौलेट ॲक्ट पास झाल्यानंतर जी 'कायदेभंगा'ची चळवळ कांहीं दिवस झाली तिचें दिग्दर्शन त्यांनीं १९०८ सालींच केलें होतें; आणि १९१९ सालीं जेव्हां ही सत्याग्रहाची चळवळ सुरू करण्यांत आली त्या वेळीं ते विलायतेंत नसून येथेंच हजर असते, तर त्यांनीं त्या चळवळींत त्याच वेळीं पुढाकार घेऊन आपल्या नेहमीच्या धडाडीनें व करारी स्वभावानें त्या चळवळीचा पल्ला बराच दूरपर्यंत पोंचविला असता, हें विलायतेहून परत आल्यावर त्यांच्या सन्मानार्थ शांतारामाच्या चाळींत जी प्रचंड सभा भरली होती त्या सभेंत त्यांनीं काढलेल्या उद्गारावरून उघड दिसून आलें.

अडवणूक व कायदेभंग या दोनहि प्रखर शस्त्रांची स्वावलंबनाच्या चळवळीच्या चतुःसूत्रीला ते जोड देण्यास तयार असल्यानें त्यांच्या राष्ट्रीय शिक्षण,

स्वदेशी व बहिष्कार इत्यादि उपायांची व्याप्ति किती होती हें आतां वेगळें सांगण्याची जरुरी नाहीं. सरकारी नोकरीवर बहिष्कार घालणें आणि कर देण्याचें नाकारणें या दोनहि अखेरच्या जालीम मात्रांचा उपयोग आपणांस याच चळवळींत करावा लागेल याची योग्य जाणीव त्यांना असून प्रसंग पडल्यास या गोष्टींचा अवलंब कसा करावा याचें तात्त्विक विवेचन त्यांनीं करून ठेविलें होतें. १९२१ सालाच्या मध्यभागापर्यंतहि या दोन जालीम मात्रा अद्यापि पूर्वीसारख्याच बटव्यांत पडून आहेत. लोकमतरूपी सहाणेवर त्यांचे वळसे घेण्यास अद्यापि सुरुवात झाली नाहीं ही गोष्ट लक्षांत घेतां १९०८ सालीं लोकमान्यांनीं या निर्वाणीच्या अस्त्रांचा प्रत्यक्ष प्रयोग करण्यास प्रारंभ कां केला नाहीं याचें आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं; तथापि त्या वेळच्याहि परिस्थितींत मद्यपानप्रतिबंधार्थ त्यांनीं जी पिकेटिंगची चळवळ चालू केली होती तिच्यांत याचें बीज होतें आणि जर ती चळवळ सुरू झाल्यानंतर थोड्याच अवधींत त्यांच्यावर घोरपड ओढवली नसती, तर त्यांनीं पिकेटिंगचें परिणत स्वरूप म्हणून कायदेभंग करण्याचा धडा घालून देण्यास कमी केलें नसतें. राष्ट्रीय शिक्षणाच्या त्यांच्या कार्यक्रमांत केवळ सरकारी व निमसरकारी 'हमालखान्या'वर बहिष्कार घालण्याचा उपदेश करण्यापर्यंतच त्यांची मजल गेली नसून, स्वतंत्र राष्ट्रीय शाळा काढून तशा शाळांतून प्रतिपक्षाला तोंड देतील असे आपल्या स्वराज्याचे नेते त्यांतून निर्माण करणें आणि उलटपक्षीं बुद्धिवान् व करारी स्वभावाचे विद्यार्थी सरकारी शाळांत जाऊं न दिल्यानें सरकारला चांगल्या नोकरांची चणचण भासूं लागेल व त्यांचा राज्यकारभार अव्यवस्थित व खिळखिळा होईल असें करणें, येथपर्यंत त्यांच्या धोरणाची मजल गेलेली होती. सारांश, आजमितीला असहकारितेच्या कार्यक्रमांत ज्या ज्या प्रमुख गोष्टींचा समावेश करण्यांत येत आहे त्यांचा विचार लोकमान्यांनीं १९०८ सालींच करून तो बीजरूपानें आपल्या चतुःसूत्रींत ग्रथित केला होता.

लोकमान्यांच्या स्वराज्याची कल्पनाहि 'वसाहतीसारखें स्वराज्य' याच पायरीवर अडून राहिली नव्हती. राजकीय पक्षोपन्यास करतांना त्यांनीं 'स्वातंत्र्यवादी' पक्षाचा वेगळा वर्ग नमूद केला असून हिंदी राष्ट्राचें अंतिम ध्येय 'स्वराज्य' हें नसून 'स्वातंत्र्य' हेंच अंतिम ध्येय आहे असें प्रतिपादन केलें होतें; तथापि व्यवहारदृष्टीनें राष्ट्राची तितकी परिणति होईपर्यंत स्वराज्यप्राप्तीकरितांच आपण आपल्या सर्व उपायांची झोड उठविली पाहिजे, अशी मर्यादा त्यांनीं आपल्या दूरदृष्टीनें घालून दिली होती. अर्थातच त्या वेळीं कोणत्याहि जाहीर सभांतून त्यांनीं 'इंडियन रिपब्लिक' स्थापण्याची कल्पना जाहीर केली नसली, तरी स्वातंत्र्याशिवाय राजकीय मोक्षाची अखेरची पायरी गांठल्यासारखी होत नाहीं व तें अंतिम ध्येय आपल्या राष्ट्राच्या डोळ्यांपुढून ढळूं देऊं नये याविषयीं ते सदोदित जागरूक असत.

एवंच, लो. टिळकांनीं आपल्या अप्रतिहत बुद्धिसामर्थ्यानें राष्ट्राच्या कल्याणा-

साठीं जें राजकीय धोरण आंखून ठेविलें होतें व ज्याचा त्यांनीं, उतार वयांत घोर शिक्षा भोगण्याचा भयंकर प्रसंग डोळ्यांपुढें दिसत असतांहि, इतक्या स्वाभिमानानें, करारी बाण्यानें, निधड्या छातीनें व धडाडीनें स्वार्थत्यागपूर्वक अवलंब केला तें राजकीय धोरण आजच्या प्रगतीपर परिस्थितींतहि त्यांच्या अनुयायांसह सर्वांसच दीपगृहाप्रमाणें मार्गदर्शक होणार आहे. आपलें राजकीय धोरण आंखतांना लोकमान्यांनीं उपायाच्या दृष्टीनें '**अडवणुकीचा मार्ग**' हेंच आपलें निर्वाणीचें शस्त्र आहे आणि हिंदी राष्ट्राचा त्या शस्त्राचा अवलंब केल्याविना निर्वाह लागणार नाहीं, असा इशारा बारा वर्षांपूर्वींच दिला होता; आणि आपली चळवळीची चतुःसूत्रीहि अशीच बनविली होती कीं, ती आजच्या असहकारितेच्या चळवळीपेक्षां कमी व्यापक नसून कांहीं बाबतींत तिची व्याप्ति अधिकच होती. अर्थातच आरंभीं म्हटल्याप्रमाणें, आजमितीला मतभेदरूपी तमानें 'कार्यविधि' जाणणें गहन झालें असलें तरी लोकमान्यांचें सच्चरित्र हें आपणांस दीपाप्रमाणें मार्गदर्शक झाल्याविना राहणार नाहीं.

---

# 'काळ'कर्ते परांजपे यांच्यावर काळाची झडप : : ३

**सर्वं यस्य वशादगात्स्मृतिपथं कालाय तस्मै नमः । – भर्तृहरि**

महाराष्ट्रांतील एक सुप्रसिद्ध वाङ्मयसेवक, देशभक्त पुढारी आणि माजी 'काळ' पत्राचे संपादक शिवराम महादेव ऊर्फ अण्णासाहेब परांजपे यांच्यावर काळानें अचानक झडप घातली हें वृत्त वाचून वाचकांचें मन दुःखावेगानें भरून जाईल व सर्वत्र हाहाःकार उडेल यांत शंका नाहीं. कै. शिवरामपंतांची प्रकृति अलीकडे पांच-सात महिन्यांपासून पूर्वींसारखी सुदृढ नव्हती. त्यांतून बेळगांवच्या साहित्य संमेलनापूर्वीं तर त्यांची प्रकृति मधुमेह व गळवें यांनीं बरीच ढासळली होती आणि संमेलनाचें अध्यक्षत्व तरी स्वीकारावें का नाकारावें अशा विचारांत ते पडले होते. पण सुदैवानें त्या वेळीं त्यांची प्रकृति बरीच सुधारली आणि त्यांनीं बेळगांवास जाऊन मराठी साहित्यसंमेलनाचें कार्य अत्यंत कुशलतेनें आणि उत्साहानें पार पाडलें. परंतु ईश्वरी नेमानेम असा दिसला कीं, ती जाहीर सार्वजनिक कामगिरी हीच त्यांची अखेरची ठरावी! बेळगांवाहून आल्यानंतर कांहीं दिवस त्यांची प्रकृति बरी होती; परंतु पुनः पावसाळ्याच्या प्रारंभीं त्यांना घशांतला कांहीं विकार झाला, तो बरा होतो न होतो तोंच त्यांच्या कानांतल्या ठणक्याचा विकार पुनः बळावला, आणि त्याच्यावरील औषधोपचार चालू असून तो विकार कमी होत

---

( केसरी, दि. २८ सप्टेंबर १९२९ )

आहे असें वाटत असतां एकाएकी त्यांचा मधुमेहाचा आजार बळावून गेल्या बुधवारीं ते बेशुद्ध झाले आणि त्या वेळेपासून अनेक डॉक्टरांनीं हरप्रयत्न चालविला आणि मिठाच्या पाण्याचें इंजेक्शन देण्याचा अखेरचा उपायहि करून पाहिला, तरी ते सर्व उपाय निष्फळ ठरून अखेरीस **शुक्रवार ता. २७ रोजीं सकाळीं** साताच्या सुमारास काळानें त्यांच्यावर झडप घालून त्यांस इहलोकांतून परलोकांत ओढून नेलें. जुनें 'काळ' पत्र चालू असतां दर शुक्रवारीं सकाळीं त्यांच्या वाड्यांतून 'काळ' बाहेर पडत होता. पण अखेर काळानें दावा साधून शुक्रवारीं सकाळीं त्यांनाच घरांतून बाहेर काढलें ! !

दे. भ. शिवरामपंत परांजपे यांचा जन्म शके १७८६ सालीं ज्येष्ठ कृ. सप्तमीस महाड येथें झाला. त्यांचा प्राथमिक अभ्यास कांहीं महाडास व कांहीं रत्नागिरीस झाल्यावर, पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलची कीर्ति ऐकून पुढील अभ्यासाकरितां ते रत्नागिरी सोडून पुण्यास आले. त्या वेळीं महाडचेच रहिवासी वामन मोरेश्वर पोतदार हे त्यांचे सहाध्यायी होते. न्यू स्कूलांत आल्या वेळेपासून शिवरामपंतांच्या बुद्धिमत्तेचें तेज चमकूं लागलें आणि त्या वेळचें न्यू स्कूलचे रत्नपारखी सुपरिंटेंडेंट वामनराव आपटे यांनीं शिवरामपंतांना हातीं धरून त्यांच्याकडून संस्कृतचा विशेष अभ्यास करविला आणि १८८४ च्या मॅट्रिक परिक्षेंत शिवरामपंतांनीं संस्कृतची जगन्नाथ शंकरशेठ शिष्यवृत्ति मिळविली. पुढें एक वर्ष फर्ग्युसन कॉलेजांत काढल्यावर ते डेक्कन कॉलेजांत गेले आणि १८९० सालीं बी. ए. होऊन ते तेथेंच फेलो नेमले गेले. १८९५ सालीं ते भाषाविषयांत एम्. ए.ची परीक्षा पास झाले आणि त्यांत संस्कृत भाषेच्या नैपुण्याबद्दल त्यांनीं भगवानदास प्राईझ व गोकुळदास झाला वेदान्त प्राईझ अशीं बक्षिसें मिळविलीं.

अशा प्रकारें अत्युच्च शिक्षण पूर्ण करून आणि इंग्लिश व संस्कृत या दोन भाषांत प्रावीण्य संपादन करून आपल्या भाषाप्रभुत्वाचा देशकार्याकडे उपयोग करण्याकरितां शिवरामपंतांनीं तत्कालीन चळवळीच्या महासागरांत आपलीहि नाव पुढें ढकलली. त्या वेळीं भावेस्कूलचे प्रमुख प्रो. विष्णुपंत गोखले यांनीं महाराष्ट्र कॉलेज स्थापन करण्याचें ठरविलें होतें आणि आपल्या कर्तृत्वास तें योग्य क्षेत्र आहे असें जाणून अण्णासाहेब परांजपे हे त्या कॉलेजाच्या अध्यापक मंडळांत सामील झाले. विष्णुपंत गोखले, शिवरामपंत परांजपे, नटेशराव द्रविड, अच्युतराव साठे अशी आपापल्या विषयांतील तज्ज्ञ आणि ताज्या दमाची मंडळी कॉलेजला लाभल्यानें महाराष्ट्र कॉलेजाचें नांव लवकरच सर्वतोमुखीं झालें आणि या नव्या कॉलेजाच्या तेजापुढें पुण्यांतील दोनहि जुनीं कॉलेजें लवकरच हतप्रभ होतील अशीं लक्षणें दिसूं लागलीं. परंतु अल्पवयांत इतकें बाळसें आलेल्या या गाडस व होतकरू

बाळाला दृष्ट लागली आणि १८९६–९७ च्या उलाढालीच्या पहिल्याच झटापटींत सरकारच्या विरोधामुळें हें कॉलेज बंद करावें लागलें. महाराष्ट्र कॉलेजांत संस्कृतच्या प्रोफेसरीचें काम करीत असतांनाच अण्णासाहेब परांजपे यांनी आपल्या वक्तृत्वाचा उपयोग व्याख्यानें, पुराणें व प्रवचनें यांच्या द्वारें करण्यास प्रारंभ केला. प्रारंभापासूनच रंगदेवता त्यांच्यावर सुप्रसन्न असून तिनें वरदहस्त ठेवल्यामुळें त्यांच्या वक्तृत्वाची छाप महाराष्ट्रावर इतकी पडली कीं, त्यांचें पुराणश्रवण करण्याकरितां हजारों श्रोते, त्या वेळीं मोटारीची सोय नव्हती तरी, किती तरी लांबचा प्रवास करून येत असत. महाभारतांतल्या 'असंतोषः श्रियो मूलं। संतोषो हरति श्रियं' एवढ्या लहानशा वचनावर त्यांच्या वक्तृत्वाचा ओघ तासन्‌तास अस्खलित चालत असे आणि त्यांत हजारों श्रोत्यांच्या चित्तवृत्ति अगदीं तल्लीन होऊन जात असत. उद्योगपर्वांतील विदुलाख्यान, आदिपर्वांतील कणिकनीति, शांतिपर्वांतील शक्र-बलि संवाद इत्यादि भाग त्यांचे फार आवडते असून त्यावरील स्फूर्तिदायक पुराणद्वारां त्यांनीं महाराष्ट्रांतील तरुण पिढीला आधुनिक राजकीय चळवळीचे धडे दिले आणि आपल्या राष्ट्रीय ग्रंथाविषयीं व संस्कृतीविषयीं अभिमान जागृत केला.

पुराणें व व्याख्यानें यांनीं सगळा महाराष्ट्र गदगदा हलवून सोडल्यावर या नैमित्तिक साधनापेक्षां चळवळीचें कांहीं तरी नित्य साधन आपल्या हातीं असावें या कल्पनेनें १८९८ सालीं त्यांनीं **'काळ'** पत्र सुरू केलें आणि प्रत्येक शुक्रवारीं त्या पत्रांतून अण्णासाहेबांचें देशभक्तीचें पुराण सुरू झालें. थोड्याच दिवसांच्या अनुभवावरून सरकारला हें 'काळ' पत्र खरोखरच काळासारखें वाटूं लागून नोकरशाहीच्या डोळ्यांत तें पत्र खुपूं लागलें. तथापि दे. भ. शिवरामपंत यांची लेखनशैलीच अशी युक्तिबाज असे कीं, सरकारला त्यांचे लेख शल्यासारखे सतत टोचत असले, तरी तें शल्य काढून टाकूं म्हटल्यास कोठेंच प्रत्यक्ष हातीं लागत नसे. १८९८ पासून १९०८ पर्यंतच्या 'काळ' पत्राच्या पहिल्या अमदानींत अण्णासाहेबांनीं आपल्या लेखनद्वारां महाराष्ट्र-वाङ्मयांत किती विविध प्रकारची अमोलिक भर घातली याची कल्पना त्यांचे 'काळ' पत्रांतल्या निवडक लेखांचे सगळे खंड विद्यमान असते तर वाचकांना आली असती. भाषासौष्ठवाच्या आणि ललितवाङ्मयाच्या दृष्टीनें त्यांचे आरंभापासून अखेरपर्यंतचे सगळेच लेख नमुनेदार म्हणून अवश्य संग्रहणीय असे होते. पण त्यांतल्या त्यांत कर्झनशाहींतल्या दिल्ली दरबारापासून राजकीय चळवळीला निराळें वळण लागत चाललें त्या वेळेपासून दे. भ. अण्णासाहेब यांच्यावर राजद्रोहाच्या खटला होईपर्यंतचे त्यांचे लेख विशेष संस्मरणीय असे होते. परंतु नतद्रष्ट सरकारनें १९१० सालच्या प्रेस ॲक्टाच्या वेताळाला त्यांच्या 'काळ' पत्राचीहि आहुति दिली आणि 'काळ' पत्रांतील निवडक लेखांच्या पुस्तकांचीहि आहुति दिली! त्यामुळें महाराष्ट्र-साहित्याचें वाङ्मयदृष्ट्या अपरिमित नुकसान झालें आहे. ( अलीकडच्या नव्या युगांत तें सगळें

जप्त वाङ्मय बंधमुक्त झालें असून श्री. य. गो. जोशी यांनीं तें पुनर्मुद्रित केलें हें महाराष्ट्राचें भाग्य होय.)

'काळ' पत्रांतले संकलित केलेले सगळेच लेख जप्त झाल्यानें नवीन पिढीच्या वाचकांना त्या लेखांची सामान्य कल्पनाहि देतां येणें शक्य नाहीं. तथापि त्या वेळचे जे जुने वाचक असतील त्यांच्या अंतःकरणांत वास करणारे अण्णांच्या लेखनशैलीचें कौतुक आजच्या प्रसंगीं जागृत करावयाचें म्हटल्यास 'ईश्वरी करणी अगाध आहे', 'आहे कीं नाहीं मी सव्हेंट', 'माझ्यावर राज्य आलें', 'पोलंडची अधोगति', 'रावणाच्या अपराधांचें दिग्दर्शन', 'दिल्लीचें तक्त आणि भाऊसाहेबांचा घण', 'कानपूरची विहीर', 'पितृतर्पण', 'टायरोल', 'रॉबर्ट एमेट', 'बुल्फटोन', 'यंग इटली' 'गोविंदरावाचीं आपल्या मुलांस पत्रें', 'पीकपाणी' इत्यादि लेखांची पुसट पुसट स्मृति करून देतां येईल. त्यांतल्या त्यांत 'लोकमान्य आणि राजमान्य' हा लेख तरी लोकमान्यांच्या अनुयायांच्या स्मृतींतून कधींच नष्ट होणार नाहीं; कारण टिळकांना 'लोकमान्य' ही पदवी प्रथम कोणीं कोणत्याहि प्रसंगीं दिलेली असो, दे. भ. अण्णासाहेब यांच्या लेखणींतून 'काळ' पत्रांत 'लोकमान्य आणि राजमान्य' हा अग्रलेख जेव्हां उतरला त्या वेळेपासून टिळकांची **लोकमान्य** ही पदवी **वज्रलेप** झाली आणि त्या वेळेपासून लोकमान्यांच्या मत्सरग्रस्त प्रतिपक्षानें कितीहि आकांड-तांडव केलें, तरी ती पदवी नष्ट होऊं शकली नाहीं.

अशा रीतीनें 'काळ' पत्रद्वारां महाराष्ट्रांतील राजकीय चळवळीला विलक्षण तेज चढत चाललेलें पाहून आणि महाराष्ट्रांतील तरुण पिढीवर स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण या चतुःसूत्रीची छाप पडत चाललेली सहन न होऊन १९०८ सालाच्या दडपशाहीच्या सत्रांत सरकारनें 'काळ' पत्रावर दांत धरून शिवरामपंतांवर राजद्रोहाचा खटला भरला. या खटल्याच्या वेळीं अण्णासाहेबांनीं आपल्या खटल्याचें काम स्वतः इतक्या उत्तम रीतीनें चालविलें कीं, न्यायाधीशानें देखील असें बोलून दाखविलें कीं, 'वकिलाच्या कामाची माहिती नसतां आपण आपला 'डिफेन्स' इतक्या उत्कृष्टपणें देऊं शकला हें पाहून खरोखरच तुमच्या बुद्धिमत्तेचें कौतुक वाटतें.' त्याचप्रमाणें त्या वेळच्या वातावरणांत ज्यूरीकडून आरोपी 'निर्दोषी' आहे असा निर्णय मिळणें असंभवनीय असल्यामुळें ज्यूरीनें त्यांना दोषी ठरविलें असलें, तरी ज्या लेखांवरून हा आरोप लादण्यांत आला होता ते लेख देशभक्तीच्या प्रेरणेनें लिहिले गेले आहेत ही गोष्ट न्यायाधीशांनीं लक्षांत घ्यावी अशी ज्यूरीनें एकमतानें शिफारस केली; आणि जज्जानें केवळ १९ महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा दिली. अशा रीतीनें आपणावर ओढवलेली ही आपत्ति अण्णासाहेबांनीं लोकोत्तर धैर्यानें सोसली आणि मुदत पुरी होऊन ठाण्याच्या तुरुंगांतून ते सुटून परत पुण्यास आले. पुण्यास येऊन ते दाखल

होतांच त्यांना जाहीर पानसुपारी करण्याचा बेत जाहीर झाला आणि सरकारनें दडपशाही करून ती सभा बंद पाडली! अशा रीतीनें शिवरामपंतांना भावी दडपशाहीची चुणूक त्याच वेळीं कळून आली आणि पुढें थोड्याच दिवसांत प्रेस ॲक्टाच्या तडाख्यामुळें 'काळ' पत्र बंद करावें लागलें. त्याबरोबरच 'मनोहर' छापखानाहि नाहीसा होण्याची पाळी आली होती; परंतु अण्णासाहेबांच्या चतुराईमुळें तो प्रसंग त्या वेळीं टळला आणि त्या छापखान्याचें 'गोवर्धन प्रेस' असें नामांतर होऊन छापखाना बचावला.

१९१० पासून १९१४ सालापर्यंतचीं चार वर्षें महाराष्ट्रांत सुप्तावस्थेंतच गेल्यानें अण्णासाहेबांच्या वक्तृत्वाला कोठें फारसा वाव मिळाला नाहीं. तथापि या वेळीं त्यांचें इतर विषयांवरील लेखन चालू होतें. १९१४ च्या मे महिन्यांत सातार्‍यास प्रांतिक परिषद् भरली आणि त्या वेळीं तडजोडीच्या ठरावाची खूपच वाटाघाट झाली. त्या वेळचें तेथलें शिवरामपंतांचें भाषण ज्यांनीं ऐकलें असेल त्यांना १९०६ ते १९०८ सालांतली त्यांची भाषणशैली अद्यापि कायम असल्याची खात्री पटली असेल. १९१४ सालीं लोकमान्य टिळक सुटून आल्यानंतर जी होमरूलची चळवळ सुरू झाली तींतहि अण्णासाहेबांनीं यथाशक्ति भाग घेतला आणि त्यांच्या चटकदार व व्याजोक्तिपूर्ण भाषणांचा तरुण पिढीस पुनः लाभ मिळूं लागला. असहकारितेची चळवळ सुरू होण्यापूर्वी ते नव्या सुधारलेल्या कौन्सिलाकरितां उमेदवार म्हणून उभे राहण्यास तयार झाले होते. परंतु असहकारितेच्या युगाला प्रारंभ होतांच कौन्सिलाची भाषा त्यांनीं सोडली आणि पुनः तारुण्याचा संचार झाल्याप्रमाणें वीस वर्षांपूर्वीच्याच जोमानें या नव्या चळवळींत ते पुढाकार घेऊं लागले. अशा वेळीं आपल्या हातीं चळवळीचें साधन असावें म्हणून त्यांनीं 'स्वराज्य' नांवाचें पत्र आपल्या छापखान्यांत चालू केलें. याच असहकारितेच्या काळांत मुळशीच्या सत्याग्रहाची चळवळ निघून त्या चळवळींत स्वतः सत्याग्रह करून अण्णासाहेबांनीं सहा महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा आपल्यावर ओढवून घेतली. त्या वेळीं त्यांचें वय ५७ वर्षांचें होतें. एवढ्या उतरत्या वयांत सक्तमजुरीची कैद आणि तदनुषंगिक हालअपेष्टा सोसाव्या लागल्या, तरी त्यांनीं त्या अत्यंत शांत चित्तानें व धैर्यानें सोसल्या. त्या वेळीं त्यांचा कर्तव्यदक्ष व करारी स्वभाव चांगलाच कसोटीस लागला.

या तुरुंगवासांतून सुटून परत आल्यानंतर त्यांची प्रकृति बरीच खालावली आणि त्या वेळेपासून ते विशेष दगदगीचीं कामें अंगावर घेतनासे झाले. त्यानंतर थोड्याच दिवसांनीं त्यांनीं 'स्वराज्य' पत्र आणि 'गोवर्धन छापखाना' यांचीहि वारासार केली; तथापि त्यांचें प्रासंगिक लेखन, वाचन व भाषण हे व्यवसाय चालूच होते. लो. टिळकांच्या पश्चात् पुण्याच्या सार्वजनिक सभेच्या अध्यक्षपदाचा मान त्यांस मिळाला होता आण दोन वर्षांपूर्वीपर्यंत ते सार्वजनिक सभेचे अध्यक्ष होते.

१९२८ सालीं संयुक्त पक्षाची महाराष्ट्र प्रांतिक परिषद् पुण्यास भरवावी असें ठरून सुभाषबाबूंच्या अध्यक्षतेखालीं जी परिषद् झाली तिच्या स्वागताध्यक्षाचें काम दे. भ. अण्णासाहेब यांनीं मोठ्या कुशलतेनें व कळकळीनें केलें. बेळगांवच्या साहित्य-संमेलनाच्या अध्यक्षस्थानीं त्यांची योजना झाल्यावर त्यांची प्रकृति बरीच बिघडली व त्यामुळें तो मान त्यांना नाकारावा लागतो कीं काय असें वाटूं लागलें होतें. परंतु सुदैवानें त्यांची प्रकृति त्या वेळीं सावरली आणि बेळगांवास जाऊन त्यांनीं मराठी-कानडीच्या वादाच्या वादळांत सांपडलेल्या साहित्य-परिषदेचें काम मोठ्या चातुर्यानें कोणासहि न दुखवतां पार पाडलें. त्या परिषदेतलें त्यांचें समारोपाचें भाषण तर अत्यंत कळकळीचें व हृदयास हलवून सोडणारें असें झालें. एवढ्या महत्त्वाच्या जाहीर प्रसंगीं झालेलें तेंच त्यांचें अखेरचें भाषण होय, अशी कल्पना त्या वेळीं कोणाच्याहि मनांत आली नसेल; परंतु ईश्वरी योगायोगच तसा होता. कारण त्यानंतर पुनः कांहीं त्यांचें तसें भाषण ऐकण्याचा योग आला नाहीं व यापुढें सुतरां येणार नाहीं! त्याचप्रमाणें गेल्या महिन्याच्या चित्रमयजगत्‌मध्यें 'गीतेंतील एक शंकास्थळ' या मथळ्याखालीं एक विचार-प्रवर्तक असा लेख त्यांनीं लिहिला आहे तोच त्यांच्या लेखणींतून उतरलेला शेवटचा लेख ठरला.

असो. अशा रीतीनें १८९५ सालापासून तों १९२९ पर्यंतच्या ३४ वर्षांत अनेक प्रकारांनीं देशसेवा आणि महाराष्ट्र-वाङ्मयाची सेवा करून हा सरस्वतीच्या कंठाभरणांतील तेजस्वी हिरा गळून पडला. सरकारजमा झालेले त्यांचे लेख सोडून दिले तरी त्यांच्या वाङ्मयाचा पसारा बराच मोठा आहे. त्यांत मानाजीरावासारखीं नाटकें आहेत; तर्क, साहित्य, अलंकार इत्यादि विषयांवरील शास्त्रीय ग्रंथ आहेत, अर्थसंग्रहासारखे मीमांसाशास्त्रावरील गहन ग्रंथ आहेत, गोविंदाची गोष्ट किंवा विंध्याचल यांसारख्या छोट्या किंवा मोठ्या गोष्टीवजा कादंबऱ्या आहेत आणि महाराष्ट्रांतील किल्ले किंवा मराठेशाहीच्या लढाया यांसारखे ऐतिहासिक ग्रंथहि आहेत. अशा या साहित्याच्या द्वारां त्यांनीं महाराष्ट्र-वाङ्मयांत आपलें नांव चिरस्थायी करून ठेविलें आहे; परंतु त्यांच्या सहवासापासून व प्रत्यक्ष दर्शनापासून होणारी देशभक्तीची प्रेरणा आणि विशेषतः फारच थोड्यांना साधणारें त्यांचें मार्मिक वक्तृत्व याला मात्र महाराष्ट्रीय श्रोते त्यापुढें कायमचे आंचवले. प्रतिपक्षाचीं मर्मस्थानें शोधून काढून आपल्या मर्मभेदी आणि उपरोधिक व व्याजोक्तिपूर्ण अशा भाषणांनीं विरुद्ध बाजूची दाणादाण उडवून टाकणारें परिणामकारक भाषण करण्याची दे. भ. शिवरामपंत यांना जी हातोटी साधली होती ती कांहीं अपूर्वच होय! त्यांचीं भाषणें देशभक्तीच्या प्रेमानें थबथबलेलीं असल्यामुळें गंभीर स्वरूपाचीं व प्रभावशाली असत. तरी पण त्यांच्या कोठल्याहि भाषणांत हास्यविनोद व प्रतिपक्षावर नाजूक टीका नाहीं असें सहसा होत नसे. त्यामुळें त्यांचें भाषण ऐकण्याकरितां श्रोते अत्यंत उत्सुक

असत; आणि आपल्या भाषणांत कोणताहि रसाविर्भाव हमखास उभा करावयाची कला त्यांना करतलामलकवत् साध्य झाली असल्यानें ते मनांत आणतील तो रस श्रोतृवृंदाच्या मनावर पगडा बसवूं शके. असा विद्वान् रसिक, विचारक्रान्तिकारक, तेजस्वी, चतुरस्र साहित्यसेवक, जहाल देशभक्त आणि श्रेष्ठ दर्जाचा वक्ता आपल्यांतून नाहींसा झाला ही महाराष्ट्राची आणि मराठी भाषेची मोठी हानि होय.

दे. भ. अण्णासाहेब यांची राहणी जुन्या खानदानीच्या घराण्यांतल्यासारखी आणि टापटिपीची असे. स्वभावानें ते विनोदी, रसिक व प्रेमळ असत. मरणसमयीं त्यांचें वय ६४ वर्षें ३ महिने होतें. त्यांच्या मृत्यूमुळें त्यांच्या कुटुंबांतील मंडळीवर तर मोठाच घाला पडला आहे. परंतु महाराष्ट्राची जी मोठी हानि झाली आहे तिच्या मानानें वैयक्तिक हानि कमीच समजून आणि आपल्या दुःखांत सगळा महाराष्ट्र वांटेकरी आहे हें लक्षांत घेऊन त्यांच्या कुटुंबांतील मंडळींनीं आपला दुःखावेग विवेकानें आवरून धरावा.

---

# कै. रघुनाथ पांडुरंग करंदीकर : : : : ४

### साताऱ्याचा अजब तारा लोपला !

सातारा जिल्ह्यांतच नव्हत तर अखिल महाराष्ट्रांत अत्यंत नाणावलेले, कुशाग्र बुद्धीचे, चतुरस्र वकील श्रीयुत रघुनाथ पांडुरंग करंदीकर यांचा बुधवार ता. २४ रोजीं नागपूर मुक्कामीं छातींत कळ निघून आकस्मिक अंत झाल्याची खेदकारक वार्ता वाचून प्रत्येक महाराष्ट्रियाच्या अंतःकरणास धक्काच बसेल ! नागपुरास चाललेल्या एका फौजदारी खटल्यांत आरोपीतर्फें काम चालविण्याकरितां तेथील प्रसिद्ध ॲडव्होकेट मनोहरपंत बोबडे यांच्या विनंतीवरून ते तिकडे गेले होते. तेथें श्रीयुत बोबडे यांच्या बंगल्यांत असतांना बुधवार ता. २४ रोजीं सकाळीं प्रथम त्यांच्या छातींत कळ आली. त्या वेळेपासून सायंकाळपर्यंत औषधोपचार सुरू होते. परंतु कोणत्याहि उपचाराचा उपयोग न होतां सायंकाळीं सूर्यास्ताबरोबरच दादासाहेबांच्या प्राणज्योतीचा – अर्थातच साताऱ्याच्या अजब ताऱ्याचा – अस्त झाला. विधिघटना विचित्र म्हणतात ती याच कारणासाठीं ! कोठें सातारा व कोठें नागपूर; पण स्वतःचा वाडा, स्वतःचें आवडतें सातारा शहर, इष्टमित्रांचा अगणित परिवार हें सर्व सोडून नागपूरच्या सिव्हिल लाइन्समधील एका स्नेह्याच्या बंगल्यांत त्यांचा अंत व्हावा असा हा योगायोग होता !

### बंडाच्या सालचे थंडे मुत्सद्दी

दादासाहेब करंदीकरांचा जन्म १८५७ सालीं म्हणजे बंडाच्या ज्वलज्जहाल

( केसरी, दि. २६ एप्रिल १९३५ )

वातावरणांत झाला. असें असून देखील ते अत्यंत शांत व धिम्या स्वभावाचे होते. कसलीहि बिकट परिस्थिति निर्माण झालेली असो, प्रतिपक्षाकडून कितीहि निकराचा हल्ला चढविला जावो त्यांचा थंड मेंदू केव्हांहि गरम झाला नाहीं आणि रागाच्या भरांत त्यांच्या मुत्सद्दीपणाची समतोलता बिघडली असेंहि कधीं घडलें नाहीं. याचा अर्थ असा नव्हे कीं, त्यांचे विचारच तसे शांततेचे व मवाळ स्वरूपाचे असत. बंडाच्या सालाला शोभेल अशाच क्रान्तिकारक विचारांचें त्यांना बाळकडू मिळालें होतें आणि त्यांचे ते विचार अखेरपर्यंत कायमच होते. हिंदुस्थानचा स्वयंनिर्णयाचा हक्क मान्य केला जावा आणि या देशाला स्वराज्याचा जन्मसिद्ध हक्क उपभोगावयास मिळावा हीच त्यांची तीव्र मनीषा होती व त्यांच्या राजकीय चळवळीचें सुकाणूंहि त्याच दिशेनें रोखलेलें असें; परंतु ते नुसते बोलघेवडे जहाल नसल्यांमुळें शाब्दिक जहालपणाचें प्रदर्शन करणें त्यांस आवडत नसे; आणि प्रतिपक्षाचा अधिक्षेप करणें हेंहि त्यांच्या स्वभावाला पटत नसे. अर्थातच स्वतःचा मुद्दा केव्हांहि न सोडतां आपल्या वाक्पटुत्वानें आणि प्रत्यक्ष कृतीनें ते इतरांचें मतपरिवर्तन करीत आणि ज्यांच्याशीं आपलें पटत नाहीं अशी त्यांची खात्री होई त्यांच्याशीं वाद करण्यांत कालक्षेप करण्यापेक्षां ते त्यांचें नांवच सोडून देत.

### पुढारीपण गाजवूं लागले

श्रीयुत दादासाहेब करंदीकर यांचा विद्याभ्यास सातारा व पुणें येथें झाल्यावर प्रारंभीं त्यांनीं कोर्टांत नोकरी धरली आणि नोकरी करतां करतांच वकिलीचा अभ्यास करून ते हायकोर्ट वकिलीची परीक्षा पास झाले. परीक्षा पास झाल्यानंतर साताराचे एक प्रसिद्ध वकील बळवंतराव सहस्रबुद्धे यांच्याबरोबर सहकारितेनें ते साताऱ्यास वकिली करूं लागले आणि थोड्याच वर्षांत त्यांचें नांव वकिलीच्या धंद्यांत सर्वतोमुखीं झालें; परंतु केवळ वकिली करून खूप पैसा मिळवावा आणि चैनींत आयुष्य घालवावें असली कोती दृष्टि त्यांची कधींच नव्हती. वकिलीचा स्वतंत्र धंदा करूं लागल्यापासून त्यांनीं राजकारणांतहि लक्ष घातलें. कॉंग्रेसच्या प्रारंभापासून ते तिच्या अधिवेशनास हजर राहत असत. मात्र तेवढ्यानें समाधान मानून घेण्याइतका अल्पसंतुष्टपणा त्यांच्या अंगीं नव्हता. त्यांनां नुसता बोलकेपणा किंवा श्रोतेपणा नको असून कर्तेपणा हवा होता; आणि आपल्या कर्तृत्वाचा फायदा प्रथम आपल्या सातारा शहराला व जिल्ह्याला दिला पाहिजे अशी त्यांची उत्कट भावना होती. त्या भावनेनें प्रेरित होऊन त्यांनीं साताऱ्यास अनेक चळवळी चालू केल्या. त्यामुळें त्या वेळच्या राजकारणांत आणि औद्योगिक चळवळींत साताऱ्याचें नांव प्रामुख्यानें पुढें येऊं लागलें. ह्यूमसाहेबांच्या अध्यक्षतेखालीं वाळवे तालुक्यांत कॉंग्रेस भरविण्याचा अपूर्व बहुमान सातारा जिल्ह्यानेंच पटकावला आणि १८९५ सालीं पुण्यास राष्ट्रीय सभेचें अधिवेशन होण्याच्या वेळीं येथें सामाजिक परिषद् भरविण्याच्या संबंधांत तंटा माजला असतां, पुण्यास राष्ट्रीय

सभा होऊं शकत नसेल, तर ती साताऱ्यास भरवूं असा संदेश दादासाहेबांच्या प्रेरणेनेंच पाठविण्यांत आला होता !

### ताईमहाराजांच्या खटल्यांतील कामगिरी

लो. टिळक आणि दादासाहेब करंदीकर यांच्या विचारांत व वागणुकींत प्रकृतिभेदामुळें मोठेंच अंतर असलें, तरी टिळकांच्या देशभक्तीची व कर्तृत्वाची छाप दादासाहेबांच्या मनावर कायमची बसली असल्यामुळें उभयतांमध्यें आमरण अकृत्रिम स्नेह नांदत होता; आणि टिळकांच्यावर ओढवलेल्या हरएक संकटाच्या वेळीं दादासाहेब हे साहाय्यार्थ सज्ज असत. पहिल्या राजद्रोहाच्या खटल्यांतील शिक्षा पूर्ण होण्यापूर्वींच टिळकांची सरकारनें सुटका केली. त्या संबंधांत सातारा येथें जी जाहीर सभा झाली त्या सभेवर, दादासाहेबांच्याविषयीं टिळकांचें मन कलुषित होईल अशा प्रकारची टीका, वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झाली; तरी पण टिळकांचा स्नेह डळमळला नाहीं. एवढेंच नव्हे तर काशी येथें कै. कृष्णाजी आबाजी गुरुजी यांच्यावर जो खटला चालला, त्यांत त्यांच्यातर्फे काम चालविण्याकरितां टिळकांनीं दादासाहेबांनाच साताऱ्याहून पाठवून दिलें होतें. पुढें टिळकांच्यावरच जेव्हां ताईमहाराजांचें प्रकरण शेकलें त्या वेळीं दादासाहेबांनीं बजावलेली कामगिरी चिरस्मरणीय अशीच आहे.

### विलायतेस प्रयाण

१९०८ सालीं टिळकांच्यावर राजद्रोहाचा खटला होऊन देशावर संकट ओढवलें असतां मुंबई हायकोर्टानें दिलेल्या भयंकर शिक्षेविरुद्ध अपील करण्याच्या कामाकरितां श्री. दादासाहेब खापर्डे हे विलायतेस गेले होते. तेथें त्यांना साहाय्य करण्यासाठीं दादासाहेब करंदीकर हे दि. १५ सप्टेंबर रोजीं मुंबईहून निघाले आणि चार महिन्यांनीं परत आले. या प्रवासांतील पत्रव्यवहार आणि दैनिक वृत्त स्वतः दादासाहेबांनीं नुकतेंच छापून प्रसिद्ध केलें आहे. तें पुस्तक वाचलें असतां दादासाहेबांच्या स्वभावाचें यथार्थ चित्र डोळ्यांपुढें उभें राहतें. टिळकांच्या थोरपणासंबंधाचा त्यांच्या मनांतील निस्सीम आदर, टिळकांवरील खटल्यांत झालेल्या घोर अन्यायासंबंधाची तीव्र चीड, तो अन्याय दूर करण्याकरितां त्यांनीं चालविलेली अहर्निश खटपट, विलायतेंतील सॉलिसिटर्स व बॅरिस्टर्स यांना त्या खटल्यांतील मर्मस्थानें दाखवून देण्यांत त्यांनीं व्यक्त केलेलें कायद्याचें मार्मिक ज्ञान आणि टिळकांच्या हालअपेष्टांमुळें कळवळणारें त्यांचें कोमल हृदय या सर्वांची ज्यांना जाणीव करून घ्यावयाची असेल त्यांनीं दादासाहेबांचें हें प्रवासवृत्त अवश्य वाचावें. या पुस्तकानें दादासाहेबांच्या राष्ट्रप्रेमाचा व्यापकपणा आणि त्यांच्या विविध उद्योगांचीं अंगें-उपांगें वाचकांच्या दृष्टीसमोर जशीं उभीं राहतील तशीं तीं इतरांनीं लिहिलेल्या लेखांनीं किंवा भाषणांनीं व्यक्त होणार नाहींत.

## १९१४ ची साताराची प्रांतिक परिषद्

लो. टिळक मंडालेला गेल्यानंतर इकडचें राजकारण बरेंच थंडावलें होतें. त्या राजकारणांत पुनश्च नवचैतन्य खेळवावें या सदिच्छेनें दादासाहेब करंदीकर यांनीं टिळकांच्या सुटकेपूर्वी कांहीं महिने साताऱ्यास प्रांतिक परिषद् भरविली. महाराष्ट्रांतील त्या वेळच्या जहाल-मवाळ पुढाऱ्यांची दिलजमाई करून राजकारणाचें अडलेलें गाडें चालतें करावें असा दादासाहेबांचा मनोदय होता आणि अत्यंत प्रतिकूल अशा वातावरणांत व विरुद्ध पक्षाच्या कुत्सित टीकेला बिलकूल भीक न घालतां अत्यंत मुत्सद्दीपणानें त्यांनीं ती परिषद् पार पाडली. त्या परिषदेंत व्यक्त झालेली दिलसफाई पुढें टिकली नाहीं हें खरें; तथापि मंडाल्याहून सुटका झाल्यानंतर राजकीय चळवळीचें सूत्रधारत्व पुनः आपल्या हातीं घेण्याला टिळकांना या सातारा परिषदेचे धागेदोरे बरेच उपयोगी पडले.

## विलायतचें शिष्टमंडळ

लो. टिळक हे मंडालेहून परत आल्या वेळेपासून त्यांनीं जी राजकारणाची दिशा ठरविली तींत दादासाहेबांचा त्यांस सर्वतोपरी पाठिंबा मिळाला. महायुद्धाला प्रारंभ झाल्यानंतर टिळकांनीं 'आम्हांला कांहीं जर्मनीचें आधिपत्य नको आहे' असें जाहीरपणें सांगून सरकारचा गैरसमज दूर केला. हें भाषण गायकवाडवाड्यांतील गणपतीपुढें झालेल्या दादासाहेबांच्या व्याख्यानाच्या वेळींच अध्यक्षपदावरून टिळकांनीं केलें. लखनौ कॉंग्रेसनंतर टिळकांनीं स्थापन केलेल्या स्वराज्य संघाला दादासाहेबांचा पूर्ण पाठिंबा होता. १९१७ सालीं दादासाहेबांची ज्युबिली साताऱ्यास झाली त्या वेळीं स्वतः टिळकांनीं साताऱ्यास जाऊन दादासाहेबांचा गौरव केला आणि दादासाहेबांनीं टिळकांच्या स्वराज्य संघास एक हजार रुपये दिले. चिरोल खटल्यांतील कांहीं साक्षीपुरावा घेण्याचें काम मुंबई हायकोर्टांत चाललें होतें. त्या वेळींहि दादासाहेबांनीं टिळकांच्यातर्फे काम चालविलें होतें. पुढें चिरोल खटल्याच्या कामासाठीं आणि रिफॉर्म्स कमिटीपुढील साक्षीसाठीं म्हणून जेव्हां टिळक विलायतेला जावयाला निघाले त्या वेळीं त्यांनीं दादासाहेबांना मुद्दाम आपल्याबरोबर घेतलें होतें; आणि त्या शिष्टमंडळाच्या कामांत दादासाहेबांचा पुष्कळच उपयोग झाला हें सर्वश्रुतच आहे. १९०८ सालच्या विलायतच्या प्रवासाचें जसें त्यांनीं पुस्तक प्रसिद्ध केलें, तसेंच १९१८ च्या विलायतविहाराचेंहि वर्णन प्रकाशित करण्याचा त्यांचा मानस होता. तें पुस्तक प्रकाशित झालें असतें तर त्या वेळच्या अनेक वादग्रस्त प्रश्नांवर चांगला प्रकाश पडला असता.

## इतर क्षेत्रांतील कामगिरी

दादासाहेब करंदीकर हे १९११ सालीं मुंबई इलाख्यांतील मध्यभागातर्फे निवडून आले होते व त्या कौन्सिलांत त्यांनीं आपली कामगिरी अत्यंत निरलसपणें आणि दक्षतेनें केली. १९१७ सालीं पुण्यास बॅ. विठ्ठलभाई पटेल यांच्या

अध्यक्षतेखालीं स्थानिक स्वराज्य परिषद् भरली होती. ती भरविण्याची कल्पना आणि ती तडीस नेण्याचें श्रेय यांत दादासाहेबांचा वांटा सर्वांत मोठा होता. पंजाब प्रांतावर जालियनवाला बागेंतील कत्तल आणि लष्करी कायद्याचा कडक अम्मल यांची घनदाट छाया पडली असतां दादासाहेब करंदीकर हे लाहोरला जाऊन आले आणि त्या प्रसंगीं त्यांनीं अनेकांना पुढें काय करावें या प्रश्नासंबंधीं कायदेशीर सल्ला दिला. मुख्यतः सरलादेवी चौधराणी यांना त्यांच्या कायदेशीर सल्लामसलतीचा मोठाच उपयोग झाला. मॉंटेग्यु-चेल्म्सफर्ड रिफॉर्म्सनंतर ते एकदां कौन्सिल ऑफ स्टेटचे सभासद बिनविरोध निवडून आले होते; पण त्या कायदे-मंडळांतील त्यांच्या कामगिरींत विशेष सांगण्याजोगें असें कांहीं घडलें नाहीं; कारण कौन्सिल ऑफ स्टेटमध्यें असेंब्लींतल्याप्रमाणें कर्तृत्वाला वावच नसतो.

## स्वदेशी व उद्योगधंदे

१८९४ सालीं महाराष्ट्रांत स्वदेशीची दुसरी लाट उद्भवली आणि त्या वेळे-पासून दादासाहेब हे स्वदेशीचे पुरस्कर्ते झाले. स्वदेशी माल खरेदी करणें एवढेंच कांहीं स्वदेशीच्या पुरस्कर्त्यांचें कार्य नसून परदेशी मालाची जागा भरून काढणारा स्वदेशी माल तयार करण्याचा उद्योग करणें आणि त्यास साहाय्य करणें हें त्यांचें कर्तव्य आहे, ही जाणीव त्यांच्या अंतःकरणांत तीव्रतेनें जागृत होती आणि १९०८ सालीं विलायतेला गेल्या वेळीं स्वदेशीच्या अभिवृद्धीला पोषक अशी कोणती यंत्रसामुग्री विलायतेंतून आपणांला साताऱ्याला नेतां येईल याविषयीं त्यांचें जिज्ञासापूर्वक निरीक्षण चालू होतें. "परदेशी जिन्नस जरुरीवांचून घेणें नाहीं. नमुन्याकरितां कांहीं वस्तु आणूं. आपल्या तिकडे (त्या) दाखविल्या कीं, (तेथील कारागीर) तेव्हांच करतील," या त्यांच्या पत्रांतील छोट्याशा उताऱ्यांत त्यांची स्वदेशीची भक्ति आणि स्वदेशीची विधायक बाजू चांगलीच प्रतिबिंबित झाली आहे. १९०५ सालीं स्वदेशीची तिसरी लाट जोरानें उसळूं लागली तेव्हां साताऱ्याच्या मंडळींनीं स्वदेशीचें दुकान थाटून त्या चळवळीचा सक्रिय पुरस्कार आरंभिला. त्यानंतर लवकरच सातारकरांनीं 'वेस्टर्न इंडिया' विमा कंपनी सुरू करून विमाव्यवसायांत महाराष्ट्रियांना मानाचें स्थान प्राप्त करून दिलें. या सर्व खटाटोपांत दादासाहेबानीं प्रामुख्यानें भाग घेतला होता व अखेरपर्यंत त्यांचा त्या व्यवसायाशीं निकट संबंध होता.

## अध्यक्ष व प्रोफेसर

हिंदी विद्यार्थी विलायतेंत जाऊन आपला वेळ व्यर्थ गमावतात व जें शिका-वयाचें तें शिकत नाहींत; यास्तव त्यांना तेथें योग्य मार्गदर्शकत्व मिळावें अशा-विषयीं दादासाहेबांचा प्रयत्न सतत चालू असे. १९०८ सालीं विलायतेला गेल्या वेळीं त्यांनीं तेथील अनेक विद्यार्थ्यांच्या गांठीभेटी घेऊन त्यांच्याशीं चर्चा केली आणि तेथील विद्यार्थ्यांचें संघटन व्हावें व त्यांच्या कार्याला उपयुक्त दिशा लागावी

या विषयाची आपली योजनाहि त्यांना सांगितली. १९१९ सालींहि विलायतच्या दुसऱ्या सफरीच्या वेळीं यॉर्कशायर परगण्यांत लिकले येथें एक हिंदी विद्यार्थ्यांची परिषद् त्यांच्या हस्तें उघडली गेली. त्या वेळींहि त्यांनीं त्याच दिशेनें उपदेश केला. हिंदुस्थानांत तर अनेक राजकीय व इतर परिषदांतून अध्यक्षस्थानावरून त्यांनीं केलेला उपदेश बहुमोलाचा आहे. मंगळवेढें येथील सांगली संस्थान प्रजा-परिषदेच्या वेळचें त्यांचें अध्यक्षीय भाषण संस्थानिकांनीं आणि संस्थानी चळवळीच्या पुरस्कर्त्यांनीं मनन करण्याजोगें आहे. डॉ. केतकर यांनीं नुकतीच कांहीं दिवसांपूर्वी पुण्यास ' स्वयंनिर्णय परिषद् ' भरविली होती. लो. टिळकांनीं पुरस्कार केलेल्या 'स्वयंनिर्णयाच्या' तत्त्वाच्या अभिमानाची ज्योत दादासाहेबांच्या हृदयांत सतत तेवत असल्यामुळें त्या परिषदेचेंहि अध्यक्षस्थान त्यांनीं आनंदानें पत्करिलें होतें. पुण्यास एल्एल्. बी.च्या अभ्यासाची सोय करण्यासाठीं जी सोसायटी स्थापन झाली तिच्यांत दादासाहेबांचें प्रथमपासून प्रामुख्यानें अंग असून ते कित्येक दिवस येथील लॉ-कॉलेजांत व कोल्हापूरच्या लॉ-कॉलेजांतहि प्रोफेसरचें काम करीत असत.

## साधी राहणी व निरलस करणी

एकंदरींत दादासाहेबांची वृत्ति प्रेमळ, स्वाभिमानी व दृढनिश्चयी होती. त्यांची राहणी अत्यंत साधी व अतिशय टापटिपीची असे. त्यांना आर्यसंस्कृतीचा व महाराष्ट्रीय आचारविचारांचा पूर्ण अभिमान असे. स्वदेशांत अथवा परदेशांत कोठेंहि त्यांनीं आपली शुद्ध राहणी सोडली नाहीं. सदासर्वदा ते कांहींना कांहीं तरी उद्योगांत गढून गेलेले असत. त्यांची बुद्धि अतिशय तीव्र व कुशाग्र होती व त्यामुळेंच त्यांनीं चिरनेरच्या खटल्यासारख्या अत्यंत गुंतागुंतीच्या खटल्यांतून साक्षीदारांच्या तोंडून सत्य वदवून घेतलें; पण बुद्धिमत्तेच्या घमेंडीमुळें आपल्या कामाकडे दुर्लक्ष करण्याचा दोष त्यांच्या हातून कधींहि घडला नाहीं. अशा प्रकारचा निष्णात कायदेपंडित, कर्तृत्ववान् स्वदेशाभिमानी, विधायक स्वदेशीचा भक्त, आर्यसंस्कृतीचा कट्टा अनुयायी, निरलस व मार्मिक उपदेशक आणि व्यवहारदक्ष पुढारी हरपल्यामुळें नुसत्या साताऱ्याची किंवा महाराष्ट्राचीच नव्हे, तर हिंदी राजकारणाचीहि हानि झाली आहे.

# कै. बाबा विद्वांस यांची केसरी संस्थेंतील कामगिरी : ५

कै. धोंडो वासुदेव विद्वांस, केसरी-मराठा संस्थेचे व्यवस्थापक, यांच्या शोचनीय निधनाचें दुःखद वृत्त वाचकांना यापूर्वींच कळलें आहे. बाबा विद्वांस यांच्या कामगिरीची यथार्थ कल्पना पुण्याबाहेरच्या वाचकांपैकीं फारच थोड्यांना असेल; त्यामुळें त्यांच्या मृत्यूनें या संस्थेची केवढी घोर हानि झाली आहे तें त्यांच्या लक्षांत येणार नाहीं. पण बाबा विद्वांस यांचा मृत्यु म्हणजे या संस्थेचें अपरिमित नुकसान होय, यांत तिळमात्र शंका नाहीं. लोकमान्य टिळक गेल्यानें सार्वजनिक चळवळीच्या दृष्टीनें संस्थेची मोठी हानि झाली. तथापि संस्थेची दुसरी आर्थिक बाजू संभाळण्याला बाबा विद्वांस यांच्यासारखे अत्यंत चतुर, व्यवहारदक्ष व कष्टाळू व्यवस्थापक होते म्हणून ती बाजू पक्की, सुदृढ व खंबीर अशी राहिली. त्या योगानें संस्थेची टिळकांच्या मृत्यूनें एका बाजूनें ढासळलेली प्रतिष्ठा अन्य मार्गानें भरून काढतां आली. या दृष्टीनें पाहिल्यास बाबा विद्वांस यांचें या संस्थेवर कधींहि न फिटणारे असे उपकार आहेत. हे उपकार परतफेडीच्या आशेनें न करतां केवळ लोकमान्यांवरील निष्ठेसाठीं बाबांनीं पार पाडले हेंहि खरोखरीच कौतुकास्पद आहे.

### संस्थेच्या उत्कर्षाची काळजी

वर्तमानपत्रांच्या अगदीं कमींत कमी दोन बाजू असतात. त्यांत संपादकीय बाजू हा ज्ञानमार्ग होय; परंतु केवळ ज्ञानमार्गी संन्यासी हा परावलंबी असल्यानें त्याला शरीरपोषणार्थ जसें गृहस्थाश्रमी लोकांच्या आश्रयानें राहावें लागतें, तसेंच वर्तमान-पत्राच्या संपादक-शाखेच्या प्रमुखालाहि व्यवस्थापक-शाखेवर अवलंबून राहावें लागतें. ही व्यवस्थापक-शाखा बाबा विद्वांस यांनीं इतक्या उत्तम तऱ्हेनें संभाळली होती कीं, संपादक-शाखेला संस्थेच्या योगक्षेमाची बिलकूल काळजी न करतां निर्धास्तपणें आपलें कार्य चालवितां आलें. अशा रीतीनें संस्थेच्या उत्कर्षाची काळजी वाहत असतांना बाबा विद्वांस यांनीं जी त्यागवृत्ति दाखविली, आणि संस्थेच्या हितासाठीं जी आर्थिक झीज सोसली तिला कोठेंहि तोड सांपडावयाची नाहीं.

### बाबांचा अर्धा हिस्सा

बाबा विद्वांस हे कोंकणांतून १८८२ सालीं अभ्यासासाठीं पुण्यांत येऊन दाखल झाले. त्या वेळेपासून मध्यंतरींचा अगदीं थोडा अल्पावधि सोडून दिल्यास त्यांचा बाकीचा सगळा काल या संस्थेच्या अभिवृद्धीसाठींच खर्चला गेला. लोकमान्य टिळकांनीं १८९४ सालीं विद्वांस यांना लातुराहून पुण्यास आण-विलें व त्यांच्याकडे केसरी-मराठा संस्थेच्या व्यवस्थापकाची कामगिरी सोपविली. त्या वेळेपासून ४६ वर्षें बाबांनीं व्यवस्थापक-शाखेचें काम नुसतें कसेंबसें संभाळलें

( केसरी, दि. ३१ डिसेंबर १९४० )

नसून, लोकमान्यांच्या सार्वजनिक चळवळीच्या कार्याच्या धबडग्याला तें टिकेल इतकें तें खंबीर बनविलें. वर्तमानपत्राच्या मजकुरांतील महत्त्वामुळें जितके ते लोकप्रिय होते, तितकेच ते प्रकाशनाचा चोखपणा आणि वक्तशीरपणा यांच्या योगानेंहि लोकप्रिय होते. म्हणूनच केसरीच्या लोकप्रियतेंत बाबांचा अर्धा हिस्सा आहे असें म्हटल्यास तें वावगें ठरणार नाहीं. संपादकांनीं मजकूर लिहून खिळे जोडणारांच्या अंगावर तो टाकून दिला कीं ते मोकळे झाले. त्यापुढचें त्याचें सगळें बाळंतपण व्यवस्थापकाला करावें लागतें. याकरितां त्याच्या अंगीं अनेक सद्गुण असावे लागतात व ते सर्व बाबांच्या अंगीं भरपूर होते. म्हणूनच त्यांना ही संस्था अनेक आपत्तींतून संकटाला तोंड देऊन सुरक्षितपणें पार पाडतां आली.

बाबा विद्वांस केसरीचे व्यवस्थापक झाले त्या वेळीं केसरी पत्राला कर्ज होतें आणि केसरी पत्राच्या कचेरीची स्वतंत्र अशी व्यवस्था नव्हती. अशी स्वतंत्र व्यवस्था केल्यास आपल्याला काय काय व्यवस्था ठेवावी लागेल, कोणतीं कामें करावीं लागतील, हिशेब कसे ठेवावयाचे इत्यादि माहिती बाबांनीं मोठ्या परिश्रमानें मिळविली. छापखान्यांतली जुनी मंडळी असली माहिती बाबांना करून देण्याला नाखूष असत. पण बाबांनीं रातबेरात परिश्रम करून व अनेकांचीं आर्जवें करून एकेक खात्याची व हिशेब लिहिण्याच्या पद्धतीची माहिती करून घेतली आणि स्वतंत्रपणें आपली कचेरी थाटण्याइतकी त्यांची तयारी झाली.

### गुणांची पहिली परीक्षा

बाबांच्या धोरणी स्वभावाची, कष्टाळूपणाची आणि वक्तशीरपणें बिनचूक काम करण्याची पहिली परीक्षा १८९५ सालीं टिळक कायदे-कौन्सिलच्या निवडणुकीला उभे राहिले त्या वेळीं झाली. मध्यभागांतील म्युनिसिपालिट्या व लोकलबोर्डें यांच्यातर्फे मतनोंदणी व्हावयाची होती. त्याकरितां रात्रंदिवस प्रवास करून, अनेक ठिकाणचे वशिले बांधून, मतदारांचे आर्जव करून ते वेळच्या वेळीं मतें देण्याला हजर राहतील व टिळकांना अनुकूल अशीं मतें देतील अशी तजवीज अनेक ठिकाणीं बाबांना करावी लागली व तें काम त्यांनीं कसें चोख बजावलें हें त्या निवडणुकींतील यशावरून सर्वांना विदितच आहे.

### गणेशोत्सवांतील कामगिरी

१८९४ सालापासून पुण्यांत सार्वजनिक गणपतीचे उत्सव सुरू झाले. त्या वेळीं बाबांना हें एक नवेंच काम उद्भवलें. टिळकांच्या राहत्या वाड्यांत उत्सव करावयाचा, त्याच्या खर्चाची व १० दिवसांच्या उत्सवाच्या व्यवस्थेची तजवीज करावयाची आणि शिवाय उत्सवांतील व्याख्यानांकरितां किंवा पानसुपारीकरितां टिळक जातील त्या त्या ठिकाणीं त्यांच्याबरोबर राहून त्यांची योग्य बडदास्त ठेवावयाची! प्रारंभींच्या एकदोन वर्षांतले हिंदु-मुसलमानांचे या उत्सवांतले तंटे व दंगे ज्यांना अवगत आहेत त्यांना बाबांना किती तंत्रें कशीं संभाळावीं लागत

याची कल्पना येईल. १८९४ सालीं दारूवाल्याच्या पुलाजवळ मारामारी झाली त्या वेळीं त्या गर्दीतून बाबांनीं टिळकांना कसें काढून आणलें, पुढें खटला सुरू झाल्यावर बॅ. ब्रॅन्सन् हा आरोपीतर्फे काम चालविण्यास आला असतां रोजच्या रोज त्याची चंदी बिनचूक वेळेवर त्याच्याकडे पोंचवून त्याला तयार ठेवणें हें काम बाबांनीं किती दूरदर्शीपणानें व मेहनतीनें केलें याची अंतर्गत माहिती ज्यांना आहे, त्यांनाच त्या खटल्यांतल्या यशाचा केवढा मोठा हिस्सा बाबांच्या वाट्याला द्यावा लागेल याची कल्पना येईल.

## धैर्याची आणखी एक कसोटी

बाबांच्या धैर्याची व केसरी संस्थेवरील प्रेमाची खरी कसोटी १८९७ सालच्या टिळकांवरील खटल्याच्या वेळीं लागली. या कामांत टिळकांना केवढी शिक्षा होईल ही भीति डोळ्यांपुढें सतत उभी असे. त्यांच्या खटल्याकरितां लागणाऱ्या खर्चाची तजवीज कशी लावावी याची काळजी एकसारखी चालूच असे आणि त्यांतच इकडे केसरी वेळच्या वेळीं न चुकतां कसा निघेल याची विवंचना पाठीमागें सतत उभी असे. त्यांतून ज्या वेळीं आर्यभूषण छापखान्यानें केसरी छापून द्यावयाचें नाकारलें आणि ज्या 'विठ्ठल' छापखान्यांत केसरी छापण्याचें ठरलें, त्या छापखान्याला आयत्या वेळीं आकस्मिक आग लागली, त्या वेळीं बाबांना ब्रह्मांड आठवलें ! त्या आगींतून केसरीचा कंपोज झालेला मजकूर बाबांनीं कसा वांचविला आणि दुसरीकडे संधान बांधून त्यांनीं तोच मजकूर वेळच्या वेळीं छापून वर्गणीदारांकडे कसा पाठविला याची ज्यांना माहिती आहे, त्यांना बाबांच्या खऱ्या धैर्याची, चिकाटीची व कर्तृत्वाची कल्पना येईल.

## बाबांना भोंवलेले दोन समंध

याच्यापुढचा ताईमहाराजांच्या खटल्याचा समंध तर बाबांना अनेक वर्षें भोंवला. त्या कामांत अनेक ठिकाणीं प्रवास करणें, कोर्टाच्या कामाची दगदग सोसणें, वकिलांची मर्जी सुप्रसन्न ठेवून त्यांना वेळच्या वेळीं कोर्टांत घेऊन जाणें, त्यांतच हरएक प्रकारें टिळकांच्या प्रकृतीची काळजी घेणें, औरंगाबाद, उमरावती वगैरे दूरदूरच्या ठिकाणीं कमिशनमार्फत साक्षीपुरावा चालला असतां तेथें हेलपाटे घालणें वगैरे अनेक तंत्रें बाबांनीं कौशल्यानें संभाळलीं. या सगळ्या प्रकरणांत जो कल्पनातीत खर्च येऊं लागला त्याची तजवीज करतां करतां ते मेटाकुटीस व जिकीरीस आले. तथापि सर्व दुःख आणि मानापमान आंतल्या आंत गिळून आणि स्वतः टिळकांच्या नजरेस कोणतीहि उणीव पडूं न देतां, परभारें सर्व तजवीज करण्यांत बाबांची कार्यकुशलता, प्रसंगावधान, टिळकांवरील प्रेम, सचोटी इत्यादि गुण व्यक्त झाले. या सगळ्या प्रसंगांना तोंड देण्याला बाबांसारखा धीराचा माणूस होता म्हणूनच पुरा पडला. इतरांना असला प्रसंग निभावून नेणें दुष्कर झालें असतें. मध्यंतरीं १९०३ ते १९०५ पर्यंत पुण्यांत प्लेगनें कहर उडविला असतां व कामाला माणूस मिळणें

व तें टिकणें दुर्घट झालें असतां बाबांनीं प्लेगच्या तडाख्यांत आपलें काम कसें निभावलें याचें वर्णन काय करावें !

### टिळकांच्या खटल्याचें महासंकट

१९०८ सालच्या टिळकांच्या खटल्यानें पूर्वीच्या संकटांवर आणखी ताण केली. हें संकट पूर्वीच्या दोन्ही प्रसंगांपेक्षां अधिक भयंकर स्वरूपाचें होतें. या खटल्यांत टिळकांना जी भयंकर शिक्षा झाली, तींतून टिळक कसे निभावून येतील याची चिंता हृदयाचें पाणी करून सोडीत होती. त्याबरोबरच सरकारच्या त्या वेळच्या उग्र स्वरूपाच्या दडपशाहीच्या तडाख्यांतून केसरी संस्था कशी तग धरून अब्रूनिशीं बचावेल याची काळजी बाबांच्या रक्ताचें सतत शोषण करीत होती. अशा भीतिग्रस्त स्थितींत त्या वेळच्या खुनशी सरकारानें केसरीकडून ५ हजारांचा जामीन मागून जोराचा तडाखा मारलाच. या धक्क्यानें लोकमान्यांच्या पत्नीची आधींच क्षीण झालेली प्रकृति अधिकच झुरणीला लागली आणि त्यांतच त्यांचा अंत झाला. अर्थातच टिळकांच्या चिरंजिवांच्या जोपासनेच्या काळजीची नवी भर बाबांच्या संकटपरंपरेंत पडली. आपल्या पत्नीच्या मृत्यूची वार्ता ऐकून टिळकांनाहि एकप्रकारें धक्का बसला व त्यांनीं बाबांना लिहिलें कीं, माझ्या शिक्षेची अद्यापि दोन-अडीच वर्षें लोटावयाचीं आहेत; इतक्या जाचांतून निभावून मी पुन्हा घर पाहीनच असा मला भरंवसा वाटत नाहीं. पत्नी तर गेलीच; तेव्हां आतां दोन्ही मुलगे तुमच्या स्वाधीन केले आहेत. त्यांचा संभाळ आणि त्यांच्या शिक्षणाची तजवीज आतां सर्वस्वीं तुमच्यावर सोंपविली आहे. तुम्हीच आतां हें काम संभाळा.

### खरें कर्तृत्व

असला हा प्रसंग ओढवल्यानें बाबांच्या हृदयाचें पाणी पाणी झालें असल्यास नवल काय ! पण इतकेंहि दुःख निमूटपणें आंतल्या आंत गिळून जणू काय कांहींच विशेष घडलें नाहीं अशा प्रकारें बाबांनीं सर्व कामें सुयंत्रित चालविलीं होतीं. केसरीवरील सरकारी रोषाचें संकट टळावें म्हणून १९१० सालापासूनच त्या संबंधांत बाबांना अनेक तंत्रें संभाळावीं लागलीं. या संबंधांत इकडील दडपशाहीची टिळकांना योग्य जाणीव करून देणें व त्यांच्याकडून यथायोग्य सल्ला मिळवून त्याची बजावणी इकडे बिनबोभाट करणें, हें काम किती अवघड होतें याची कल्पना फारच थोड्यांना येईल. अटकेंतील इसमास पत्र लिहिलें असतां त्यांतील मजकुरास कात्री लावणें आणि समक्ष भेटीच्या वेळीं परस्परांच्या प्रकृतीच्या आलबेलीखेरीज अवांतर विषय बोलूं न देणें इत्यादि सरकारी निर्बंध लक्षांत घेतां बाबांनीं टिळकांच्या ६ वर्षांच्या अटकवासांत येथल्या सर्व कारभाराची अद्ययावत् माहिती टिळकांना कशी दिली असेल, त्यांच्याकडून वेळोवेळीं योग्य सूचना कशा मिळविल्या असतील, त्यांची बजावणी इकडे कशी केली असेल, वयांत येऊं लागलेल्या टिळकांच्या मुलांची मर्जी संभाळून त्यांना कसें कह्यांत ठेवलें असेल आणि इतकीं सर्व अवांतर तंत्रें संभाळून आणि

वारंवार टिळकांच्या भेटीकरितां मंडालेचा दूरवरचा अतोनात खर्चाचा प्रवास अनेकदां करून त्याचबरोबर इकडे केसरी पत्राच्या छपाईचा बिनचूकपणा कसा संभाळला असेल याचें समग्र चित्र एकसमयावच्छेदेंकरून दृष्टीसमोर उभें केलें म्हणजेच बाबांच्या खऱ्या कर्तृत्वाची संपूर्ण कल्पना वाचकांना येईल.

### तपश्चर्या फळास आली

१९१४ च्या जूनमध्यें बाबांची तपश्चर्या फळाला येऊन टिळक सुखरूप परत घरीं आले. टिळकांच्यावरची सरकारची करडी नजरहि ढिली झाली. गीतारहस्य ग्रंथ प्रसिद्ध होऊन टिळकांच्या कीर्तीत नवी भर पडली; आणि प्रिव्ही कौन्सिलांत ताईमहाराजांचा खटला टिळकांनीं जिंकल्यामुळें तो ससेमिरा एकदांचा सुटला. या वेळेपासून पुढील पांच वर्षें टिळकांच्या आयुष्यांत मोठीं उत्कर्षाचीं व भरभराटीचीं गेलीं आणि त्यामुळेंच बाबा विद्वांस यांनाहि त्यांच्या सबंध आयुष्यांत जर कोणता काळ विशेष विवंचना न पडतां गेला असेल, तर तो हाच पांच वर्षांचा अवधि होय.

### संकटांस तोंड देण्याची चतुराई

१९२० सालीं हिंदभूमीचेंच दुर्दैव ओढवलें आणि टिळक दिवंगत झाले, आणि त्याबरोबरच बाबांच्या पाठीमागची विवंचना पूर्वीपेक्षां अधिक सुरू झाली. टिळकांच्या मृत्युपत्राप्रमाणें जी व्यवस्था व्हावयाची तींत केसरी-मराठा संस्थेचा ट्रस्ट करणें हें मुख्य काम होतें आणि टिळकांच्या उभय चिरंजीवांनीं त्या कामांत मनोभावानें सहकार्य करून ट्रस्ट-डीडला व मृत्युपत्राच्या बजावणीला संमति दिली; पण पुढें थोड्याच काळानें सर्वच ग्रह बदलले आणि बाबांना खाजगी, कौटुंबिक अडचणींपासून तों राजकीय आंदोलनापर्यंत सर्वच गोष्टींत प्रतिकूल परिस्थितीला तोंड देण्याची पाळी आली. याहि संकटांना बाबा विद्वांस हे पुरून उरले. या वेळच्या संकटांचें स्वरूप पूर्वीच्या १९०८ सालच्या संकटांहून कांहींसें वेगळें होतें. पूर्वीच्या संकटांत सरकारी दडपशाहीचा व रोषाचा संबंध असल्यामुळें केसरी-मराठा संस्थेला जनतेची पूर्ण सहानुभूति मिळत असे. नवीन संकटांत सरकारी वक्रदृष्टीचा फारसा संबंध नसल्यामुळें जनतेची पूर्वीची सहानुभूति अखंड न राहतां द्विधा झाली व मतभेदाचे प्रसंग वाढत चालले. तरी पण कसल्याहि संकटाला व प्रसंगाला तोंड देण्याची तयारी व अडचणींतून पार पडण्याची चतुराई बाबांच्या अंगीं जन्मसिद्ध असल्यानें त्या गुणांनीं त्यांना या वेळींहि हात दिला आणि या वेगळ्या स्वरूपाच्या आपत्तींतूनहि केसरी संस्थेचें सुकाणू दूरदर्शीपणानें चालवून त्यांनीं ही नाव कोणत्याहि भोंवऱ्यांत सांपडूं दिली नाहीं आणि कुठल्याहि खडकावर आदळूं दिली नाहीं.

### लौकिकांत भर

१९३० सालापासून राजकीय वातावरणाचा रागरंग पुन्हा निराळाच होऊं लागला. सत्याग्रहाची मोहीम सुरू झाल्यानें दडपशाहीचा पारा पुन्हा वर चढूं

JAN

लागला. सोलापूरच्या लष्करी अमलानें जुलमाचा कहर झाला. अशा परिस्थितींत केसरी व मराठा हीं पत्रें आपलें कर्तव्य निर्भीडपणानें, राष्ट्रीय धोरणानें, करीत असतां सरकारचा या संस्थेवर पुनश्च रोष झाला. जामिनांची वारंवार मागणी व जामीन-जप्ती यांचे तडाखे बसूं लागले. पुढेंहि निराळ्या स्वरूपाच्या खटल्यांचे प्रसंग ओढवले. पण ज्यांनीं १८९७, १९०३ व १९०८ या सालच्या घनघोर प्रसंगांत आपला धीर सोडला नाहीं त्या बाबांचें धैर्य या वेळीं ढळणें शक्य नव्हतें. असल्या संकटांशीं दोन हात करण्याच्या कामीं ते आजवरच्या अनुभवानें निर्ढावलेले असल्यामुळें त्यांना हीं अलीकडील संकटें कःपदार्थ वाटत; त्यामुळें या सर्व प्रसंगांतून त्यांनीं ही संस्था यथापूर्व चालविली एवढेंच नव्हे, तर तिच्या लौकिकांत आणखी भर पडेल अशी सुव्यवस्था लावली.

## टापटिपीचा व सचोटीचा कारभार

बाबासाहेब विद्वांस यांच्याच व्यवहारदक्षतेमुळें केसरी-मराठा संस्थेला लोकमान्यांच्या ३ लक्ष रुपयांच्या मानीव कर्जाची फेड करतां आली. या ट्रस्टमुळें लोकमान्य तर अनृणी झालेच; पण त्याबरोबरच संस्थेचे पहिले ट्रस्टी तात्यासाहेब केळकर आणि बाबासाहेब विद्वांस यांच्याहि निरपक्षतेचा व निर्लोभी कर्मयोगाचा लौकिक झाला. बाबा विद्वांस यांच्या कडक शिस्तीमुळें आणि पैशाच्या व्यवहारांतील दक्षतेमुळें त्यांच्या स्वभावासंबंधानें जो कित्येकांचा निष्कारण गैरसमज झाला होता तोहि पार नाहींसा झाला. प्रसंग पडला असतां पैशाची अडचण भागविणें किती दुर्घट होतें याची बाबांना स्वानुभवावरून पूर्ण जाणीव असल्यामुळें पुनश्च संकटाच्या वेळीं दुसऱ्यापुढें तोंड वेंगाडण्याचा प्रसंग येऊं नये म्हणूनच बाबा हात राखून खर्च करीत. या त्यांच्या गुणाचें प्रसंगानुरोधानें चीजच झालें. १९२१ सालीं केसरीच्या कागदाच्या कोठाराला अकल्पित आग लागून २० हजारांचा कागद जळून गेला. त्यांतील आगीच्या विम्याची मिळालेली रक्कम सोडून दिली, तरी दहाएक हजारांचें नुकसान डोक्यावर बसलेंच. पण जेथें दहा वर्षांपूर्वी पांच हजारांची जामिनकी भरण्यास सावकारांच्या घरीं खेटे घालावे लागले तेथें हें १० हजारांचें नुकसान संस्थेनें बिनबोभाट सहज सोसलें व संस्थेविषयीं सहानुभूति बाळगणारांनीं आपण होऊन मदत देऊं केली असतां ती साभार नाकारली. संस्थेला ही खंबिरी आली ती बाबांच्या टापटिपीच्या व सचोटीच्या कारभारामुळेंच आली यांत बिलकुल शंका नाहीं.

## एकनिष्ठ कार्यकर्ता

बाबा विद्वांस यांनीं लो. टिळक, त्यांचा लौकिक आणि त्यांच्या पश्चात् त्यांनीं चालू करून दिलेलीं कार्यें पुढें चालविणें यांखेरीज इतर कशाचीहि प्रतिष्ठा मानली नाहीं. टिळकांचें व त्यांच्या संस्थांचें जें जें पडेल तें तें काम करण्यास ते सतत सज्ज असत. पण स्वतःच्या कामाचा मोठेपणा मिरवावा अशी हाव त्यांनीं कधींहि

बाळगली नाहीं. कामाला सन्मुख आणि मानाला विन्मुख अशीच त्यांची नैसर्गिक प्रवृत्ति होती. त्यांनीं जे जे कष्ट केले ते ते टिळकांच्यावरील एकनिष्ठ भक्तीसाठींच केले. त्यांची दृढ निष्ठा होती म्हणून त्यांना इतके कष्ट सहन करण्याचें सामर्थ्य अंगीं आलें. असा एकनिष्ठ कार्यकर्ता संस्थेला लाभणें हें संस्थेचें मोठें भाग्य होय. अशा एकनिष्ठ सेवकाला त्याच्या सेवेचें फळ मिळाल्याशिवाय राहत नाहीं. संस्थेचें कार्य सचोटीनें व दक्षतेनें करावें आणि संस्थेची भरभराट झाली म्हणजे तिच्या अनुषंगानें स्वतःला जो कांहीं लाभ होईल त्यांत समाधान मानावें हाच उत्कर्षाचा खरा मार्ग होय.

### टिळक या दैवताची सेवा

बाबासाहेब विद्वांस यांनीं टिळकांचा लौकिक आणि त्यांच्या संस्थेचें हित हेंच आपलें सारसर्वस्व मानलें आणि त्यांच्याकरितांच ते यावज्जीव झटले. टिळक जिवंत असेपर्यंत टिळक हे त्यांचें दैवत असे आणि त्या दैवताच्या प्रीत्यर्थ म्हणून ते संस्थेची सेवा एकनिष्ठेनें करीत. टिळक दिवंगत झाल्यानंतर टिळकांचा आत्मा त्यांच्या संस्थेंत व इतर विविध कार्यांत अंतर्भूत झाला आहे, अशा समजुतीनें त्यांनीं टिळकांचीं कार्यें व त्यांच्या संस्था यांनाच दैवत मानून त्यांची वीस वर्षें अखंड सेवा केली व त्या सेवेंतच आपला देह त्यांनीं झिजविला. या सेवेच्या परिश्रमामुळेंच त्यांची शक्ति दिवसेंदिवस क्षीण होत चालली तरी त्यांची मानसिक शक्ति क्षीण न झाल्यानें अगदीं अखेरपर्यंत ते केसरी-मराठा संस्थेचें कार्य यावच्छक्य करीत राहिले व त्यांत यश मिळवून सर्वांकडून धन्यवाद मिळवून त्यांनीं आपला देह ठेवला. त्यांचें हें उदाहरण प्रत्येक कार्यकर्त्याला अनुकरणीय असेंच आहे.

---

## महाराष्ट्राचें महाभूषण गेलें ! : : : : ६

**नाभिषेको न संस्कारो नरसिंहस्य वै कृतः ।**
**विक्रमार्जितराज्यस्य स्वयमेव नरेंद्रता ॥**

अगदीं निकटवर्ती आप्तेष्टांनाहि ज्याची कल्पना आली नाहीं, किंबहुना स्वतः ज्याची त्यालाहि कल्पना आली नाहीं, अशा आकस्मिक मृत्यूच्या आघाताची महाराष्ट्राला व इतर प्रांतांना कल्पना कशी येईल ? अगाऊ कल्पना येणें तर शक्य नव्हतेंच, पण आतां ही वज्राघातासारखी हृदयभेदी घोरवार्ता ऐकून देखील क्षणभर जिच्यावर विश्वास बसणार नाहीं, अशी घोर वार्ता जगाला कळविण्याचा

( केसरी, दि. १५ ऑक्टोबर १९४७ )

दुःखद प्रसंग आज आमच्यावर आला आहे. वाचकहो, केसरी-मराठा संस्थेच्या ट्रस्टचे आद्य आधारस्तंभ **श्रीयुत नरसिंह चिंतामण केळकर** यांच्यावर निर्घृण काळानें काल **मंगळवार दि. १४** ला सूर्योदयाच्या सुमारास आकस्मिक घाला घालून त्यांस या जगांतून ओढून नेलें! हें वर्तमान वाचल्यावर देखील आपण क्षणभर बुचकळ्यांतच पडाल; कारण ता. १४ दिनांकाच्या मंगळवारच्या केसरीच्या अंकांतच रविवार दि. १२ ला सार्वजनिक सभेतर्फे जो श्री. धोंडूमामा साठे यांचा सत्कार-समारंभ झाला, त्या सभेचें अध्यक्षस्थान त्यांनीं मंडित केलें होतें आणि त्या सभेंत त्यांचें जें कळकळीचें भाषण झालें, त्या भाषणाचा सारांश आपण नुकताच वाचला असेल. लगेच त्याच्या पाठोपाठ त्यांच्या मृत्यूचें वर्तमान यावें, यापेक्षां विचित्र विधिघटना ती कोणती असणार! पण कोणाच्या मनाला या आकस्मिकतेमुळें केवढाहि जबरदस्त धक्का बसो, कोणाला काळाच्या निर्घृणतेबद्दल केवढाहि संताप येवो, सगळा महाराष्ट्र, किंबहुना महाराष्ट्राविषयीं आदर बाळगणारा हिंदुस्थानचा भूभाग, या धरणीकंपासारख्या धक्क्यानें कितीहि विषादमग्न होवो, '**महाराष्ट्राचें महाभूषण**' असे तात्यासाहेब केळकर इहलोकची जीवनयात्रा संपवून परलोकच्या यात्रेला गेले, ही घटना वज्रलेप झाली असून ती आतां कोणाच्याहि दुःखानें वा आक्रोशानें बदलूं शकणार नाहीं.

तात्यासाहेब केळकर यांच्या वयाला ७७ वें वर्ष चालू असल्यानें अलीकडे त्यांची प्रकृति कांहींशी थकल्यासारखी दिसत असे. तरी पण त्यांच्या मनाचा उत्साह दांडगा असल्यानें महत्त्वाच्या सार्वजनिक कार्याच्या व सभेच्या वेळीं ते अगत्यानें उपस्थित राहत आणि आपला पोक्त सल्ला निर्भीडपणें देत. दि. १२ ला टिळक-मंदिरांत श्री. धोंडूमामा साठे यांच्या सत्कार-समारंभाची सभा ही त्यांच्या अध्यक्षत्वा-खालची अखेरचीच सभा ठरली! धोंडूमामांच्याविषयींचा आदर आणि सांगलीनजीक नवीनच निघालेल्या इंजिनियरिंग कॉलेजला सुस्थिति प्राप्त व्हावी यासंबंधीं त्यांस वाटणारी कळकळ, यामुळेंच ते त्या दिवशींच्या सभेस आले आणि तीन तास चाललेल्या या सभेचें अध्यक्षपद मंडित करून, त्या कॉलेजास द्रव्यसाहाय्य करण्यानेंच महाराष्ट्राची अब्रू मापली जाणार आहे, असें त्यांनीं मोठ्या कळवळ्यानें सांगितलें. त्यानंतर मधला सोमवारचा एकच दिवस. त्या दिवशीं ते कोठें बाहेर पडले नाहींत. मात्र त्यांनीं अर्धवट राहिलेले एकदोन लेख पूर्ण करून दिले.

### यमाचा चोरटा घाला

असा हा कार्यक्रम चालूं असतांनाच त्यांना किंवा घरच्या कोणा मंडळींनाहि काळपुरुष समीप येऊं लागल्याची चाहूल लागली नाहीं; आणि ती चाहूल लागणार तरी कशी! जाणूनबुजूनच तो काळपुरुष आकस्मिक घाला घालण्याकरितां चोरापेक्षांहि अधिक निःशब्द पावलानें येत होता. तथापि सोम-वारीं रात्रीं तात्यासाहेबांना अस्वस्थता वाढूं लागून चोरट्या घाल्याचा संशय येऊं

लागला. त्यांनीं त्या चोरट्या हल्लयाचा कानोसा घेण्यासाठीं आपल्या स्नेही डॉक्टरास पाचारण केलें. डॉक्टर आल्यानें घरच्या मंडळींत सचिंततेचें वातावरण पसरलें; परंतु डॉक्टरांच्या सांगण्यावरून कांहीं विशेष भीतीचें कारण नाहीं असें समजून मंडळींच्या चिंतेचा पारा उतरूं लागला. तात्यासाहेबांना मात्र अस्वस्थता वाटत असल्यानें झोप येईना. पहाटेच्या वेळीं त्यांस आतां झोप येईल असें वाटून त्यांनीं जवळच्या मंडळीस ' मी आतां झोपतों, तुम्ही जा ' असें सांगितलें आणि ते जे पांघरूण घेऊन निजले ते काळनिद्रेंतच विलीन झाले ! थोड्या वेळानंतर त्यांची घरची मंडळी त्यांची झोप झाली काय, हें पाहावयास येतात तों तेथें काय ? तात्यासाहेब केळकरांच्या आत्म्यानें जड देहाची कायमचीच रजा घेतली असल्याचें त्यांच्या नजरेस पडलें आणि सर्वत्र हाहाकार सुरू झाला.

## तात्यासाहेबांच्या विविध भूमिका

श्री. न. चिं. केळकर ऊर्फ तात्यासाहेब केळकर यांच्या जीवन-चरित्राचा गेल्या ५४ वर्षांतील सार्वजनिक चळवळींशीं अत्यंत निकट संबंध आहे. लो. टिळक जिवंत असून कारागृहाच्या बाहेर असतांना, टिळकांच्या कार्याची धुरा आपल्या अंगावर घेऊन त्याची उठावणी करणारे धुरीण म्हणून, टिळक कारावासांत असतांना त्यांच्या कार्याची जोपासना करणारे कुशल बुद्धियोगी म्हणून, टिळकांच्या मृत्यूनंतरच्या नव्या युगांत महाराष्ट्राच्या पूर्वपरंपरेचे विश्वस्त म्हणून, कॉंग्रेसशीं सहमत असेपर्यंत त्या कार्यांत आपल्या वांट्याचें काम चोख बजावणारे निःस्वार्थी, स्वतःच्या पोळीवर तूप ओढून घेण्याचा विचारहि कधीं मनांत न आणणारे, पुढारी म्हणून, कॉंग्रेसशीं मतभेद झाल्यावर स्वराज्यपक्ष, प्रतिसहकारपक्ष, लोकशाही स्वराज्यपक्ष, हिंदुसभापक्ष इत्यादि विविध पक्षांच्या त्या त्या वेळच्या कार्यक्रमांत पुढाकार घेणारे नेते आणि कॉंग्रेसला तिच्या चुकांच्या भावी घोर परिणामाचा अगाऊ इशारा देणारे भविष्यवादी म्हणून आणि अखेरीस कॉंग्रेस आपल्या लोकशाही स्वराज्यपक्षाच्या तत्त्वावरच आली आणि सरकारहि देशव्यापी चळवळीनें जेरीस आलें आणि अशा रीतीनें पन्नास वर्षांपूर्वी बीजारोपण केलेल्या स्वराज्याची चळवळ फलद्रूप होऊं लागलेली पाहून कृतार्थतेचा निःश्वास सोडणारे आणि अशा परिस्थितींत विश्रांति घेण्याचा स्वाभाविक हक्क प्राप्त झाला असतांनाहि, स्वातंत्र्याच्या चळवळीला येणारा फळांचा घोस आंबट, खारट, तुरट आहे, एवढेंच नव्हे तर त्यांत कांहीं विषारी कीड निर्माण होऊन ती फलभोक्त्यांना प्राणघातक होत असल्याचें पाहून ती कीड मारण्यासाठीं तिच्यावर उपाययोजना करण्याविषयीं अखेरपर्यंत तळमळणारे पुढारी म्हणून, अशा विविध भूमिकांच्या द्वारां भारतभूमीस तात्यासाहेब केळकर यांचा दृढ परिचय झालेला आहे.

अशा विविध भूमिका स्वीकारून साडेचार तपें देशकार्य करणारा पुढारी सध्यांच्या संक्रमणाच्या आणीबाणीच्या वेळीं एकाएकीं हरपला हें महाराष्ट्राचें परम दुर्भाग्य होय.

स्वतः तात्यासाहेबांच्या दृष्टीनें त्यांचा मृत्यु अगदीं क्लेशरहित झाल्यानें '**अनायासेन मरणं विना दैन्येन जीवनं**' ही म्हण त्यांना अक्षरशः लागू पडली हें महद्भाग्यच होय. अगदीं अखेरच्या दिवसापर्यंत आपला आवडता लेखनव्यवसाय चालू ठेवून शेवटीं परावलंबनाचें दुःख तिळमात्रहि सोसावें न लागतां तात्यासाहेबांनीं आपली जीवनयात्रा संपविली, यांत त्यांनीं अखेरी मारून एकप्रकारें, संसाररूपी तापत्रयावर मातच केली यांत बिलकुल शंका नाहीं; पण आपल्या या अशा आकस्मिक निधनानें आपल्या आवडत्या महाराष्ट्रावर केवढा आपत्तींचा डोंगर आपण ढकलीत आहों, याची त्यांस कल्पनाहि आली नसेल.

### बोलके नव्हेत तर कर्ते पुढारी

बहुतेक पुढारी आपापल्या विषयापुरते आणि तदनुषंगिक एखाद-दुसऱ्या विषयामध्येंच तेवढे तज्ज्ञ असतात. तात्यासाहेब केळकरांचा खाक्या कांहीं लोकविलक्षणच होता. त्यांचा मुख्य व्यवसाय राजकारण हा असला, तरीं इतर किती तरी विषयांत ते तरबेज होते. वेदान्तासारखा रुक्ष आणि डरस्फोड करणारा कठीण विषय, काव्यशास्त्र-विनोदासारखा रुचकर आणि सुखसंवेदनपर विषय, आत्मचरित्रासारखा केवळ स्वानुभवपर विषय, थोर पुरुषांच्या चरित्रासारखा लाक्षणिक परकाया-प्रवेशात्मक विद्येनेंच अवगत होणारा अवघड विषय, राजकारणासारखा परपक्षांशीं वाग्युद्ध चालवावयाचा धकाधकीचा मामला, समाजकारणासारखा परदुःख-निवारणाचा साधुवृत्तीचा आविष्कार इत्यादि परस्परविरुद्ध विषयांतून सर्व विषयांवर ते सारख्याच सफाईनें लिहीत व बोलत असत. शिवाय ते नुसते बोलके पुढारी नव्हते. ज्या ज्या विषयाची त्यांना आत्मीयता वाटे त्या त्या विषयांतील कार्यभागांत ते स्वतः कार्यभार उचलण्यास तत्पर असत, त्यामुळें किती संस्थांशीं अध्यक्ष, उपाध्यक्ष, डायरेक्टर, कार्यवाह अथवा सल्लागार म्हणून त्यांचा संबंध आला होता याची बिनचूक गणति करणेंहि दुरापास्त होय.

१९३७ सालीं जेव्हां त्यांनीं केसरी-मराठा संस्थेच्या विश्वस्तपदाचा राजिनामा दिला त्या वेळीं त्यांनीं अनेक संस्थांशीं असलेला आपला संबंधहि सोडला असल्याचें जाहीर करून त्या संस्थांची यादी प्रसिद्ध केली होती. त्या यादींत सुमारें चाळीस संस्थांचीं नांवें होतीं आणि ती यादींहि पूर्ण असल्याची ग्वाही ते स्वतःहि देऊं शकले नाहींत; परंतु त्यापेक्षां आश्चर्याची गोष्ट ही कीं, अशा रीतीनें अनेक संस्थांचा संबंध तोडल्यानंतर आणि यापुढें मी कोणत्याहि संस्थेचा कार्यभार स्वतःवर घेऊं इच्छित नाहीं असें प्रकट केल्यानंतरहि लोकाग्रहास्तव ते अनेक संस्थांचे अधिकारपदस्थ झाले. एकदोन संस्थानांतल्याहि कारभाराचा बोजा, सल्लागार या नात्यानें, त्यांनीं घेतला आणि पूर्वीं ज्या संस्थांचा संबंध तोडल्याचें त्यांनीं जाहीर केलें होतें त्या संस्थांचा संबंधहि नाममात्रच तोडला असल्यानें पूर्वीप्रमाणेंच त्या त्या संस्थांनाहि त्यांच्या नेतृत्वाचा लाभ अखेरपर्यंत मिळत राहिलाच.

## राजकारणात्मक मृत्युपत्र

तात्यासाहेब केळकरांचें शेवटचें विशेष महत्त्वाचें राजकीय भाषण म्हणजे गेल्या दि. १ ऑगस्टला पुण्यांत जी बृहन्महाराष्ट्राची सर्वपक्षीय राजकीय सभा भरली होती त्या सभेच्या स्वागताध्यक्षांचें भाषण होय. तात्यासाहेब केळकरांचें तें राजकारणविषयक मृत्युपत्रच ठरलें असें आतां दुःखानें म्हणावें लागतें. त्या भाषणांत केळकरांनीं गेल्या २७ वर्षांतील राजकारणाच्या हेलकाव्याचा आढावा घेऊन आजमितीला राजकारणाचा लंबक कोणत्या स्थितींत आहे व तो कोणत्या बिंदूवर स्थिर व्हावयास पाहिजे हें मोठ्या मार्मिकतेनें दाखवून दिलें होतें. त्या सिंहावलोकनपर भाषणांत त्यांनीं कॉंग्रेस, हिंदुमहासभा, लोकशाही स्वराज्यपक्ष इत्यादि विविध भिन्न मतांच्या तत्त्वज्ञानांतून सद्यःस्थितीला उपकारकारक असा कोणकोणता भाग घेऊन सद्यःस्थितीला जुळेल व उत्तम मार्गदर्शक होईल असें नवें तत्त्वज्ञान कोणतें स्वीकारावें याचें दिग्दर्शन केलें होतें. त्यावरून त्यांची राजकारणांतली दृष्टि किती व्यापक, मार्मिक व दूरदर्शी होती त्याचें प्रत्यंतर आलें.

## जात्याच समन्वयवादी

तात्यासाहेब केळकरांचा अनेक प्रकारच्या संस्थांशीं निकट संबंध होता याविषयीं अनेकांना एकपट आश्चर्य वाटेल, तर त्यांतल्या कित्येक संस्था परस्परांशीं चढाओढ करणाऱ्या असूनहि त्यांच्याशीं त्यांचे समानतेचे व निःपक्षपाताचे संबंध असत, हें ऐकून तें आश्चर्य अनेकपट वाढेल. डेक्कन एज्युकेशन सोसायटी आणि शिक्षण प्रसारक मंडळी या दोन्ही संस्थांच्या बोर्डावर ते एकाच वेळीं काम करीत या उदाहरणावरून त्यांच्या निःपक्षपाती भूमिकेची साक्ष पटेल. त्यांचा स्वभावच जात्या समन्वयवादी होता. या कामांत त्यांनीं कै. दादासाहेब करंदीकर यांना एकप्रकारें गुरु केलें होतें असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. ही समन्वयवाद्याची तात्त्विक भूमिका दिसतांना दोन्हींकडून प्रशंसापत्रें मिळविण्याची एक खाशी युक्ति होय, अशीच कित्येकांची समजूत असते; परंतु ही भूमिका व्यवहारांत अत्यंत तापदायक होते. दोहोंकडून भलेपणा मिळण्याच्याऐवजीं, मृदंगाप्रमाणें दोहोंकडून मार सोसण्याचाच प्रसंग अनेक वेळां येतो व त्यांतील अडचणी, ‘ जावें त्याच्या वंशा तेव्हां कळे ’ अशा स्वरूपाच्या असतात. असें असूनहि तात्यासाहेब केळकरांनीं आपली समेटाची वृत्ति अखेरपर्यंत केव्हांहि सोडली नाहीं. आपल्या आद्य तत्त्वाला आणि चालू व्यवहाराला बाध न येईल अशी तडजोड करावयास ते केव्हांहि तयार असत. त्यामुळें एककल्ली अतिरेकी माणसाकडून ‘ लवचिक समेटवादी ’ म्हणून त्यांची कित्येक वेळां थट्टाहि होई; पण त्यांचा लवचिकपणा तपशिलापुरताच असे. आपल्या स्वाभिमानाला अथवा देशहिताच्या मार्गाला धक्का पोंचेल अशा प्रकारची कोणतीहि तडजोड करण्याला ते मान्यता देत नसत. त्या वेळीं त्यांची तत्त्वनिष्ठा खरी कसोटीला लागे आणि

JAN

समेटवादी म्हणून त्यांचा उपहास करणाऱ्यांचा स्वार्थी एककल्लीपणा तात्यासाहेबांच्या निःस्वार्थी तत्त्वनिष्ठेच्या तेजांत हतप्रभ होऊन कोठल्या कोठें मावळून दृष्टीआड होई. यामुळें तात्यासाहेब केळकरांचा खरा मोठेपणा त्यांच्या निःस्वार्थबुद्धींत आहे, कोणताहि राजकारणाचा डाव ते स्वतःचा मोठेपणा मिरविण्यासाठीं अथवा क्षुद्र आर्थिक लाभ साधण्यासाठीं खेळत नाहींत, अशी मर्मज्ञ परीक्षकांची खात्री पटे.

### त्यांनीं यशस्वी केलेल्या तीन अकल्पित कल्पना

मामुली राजकारणाचा खेळ ठराविक पद्धतीनें खेळण्यांत कौशल्य तें काय, असें वाटून श्री. केळकर हे प्रत्येक चळवळींत कांहीं तरी नावीन्य शोधीत आणि एखादी अकल्पित कल्पना हातीं घेऊन ती यशस्वी करून दाखवीत. १९१६ सालची लो. टिळकांना ज्युबिलीच्या प्रसंगीं एक लाख रुपयांची थैली देण्याची कल्पना केळकरांच्या सुपीक मेंदूतून निघाली, त्यांच्या अश्रान्त परिश्रमानेंच ती सिद्धीस गेली आणि जनतेची त्यांच्या शब्दावर एवढी श्रद्धा होती कीं, केळकरांनीं ही कल्पना जाहीर करतांच त्यांच्याकडे पावसाच्या सरीवर सरी याव्यात त्याप्रमाणें देणग्यांचा वर्षाव होऊं लागला. ते दिवस हल्लींच्यासारखे द्रव्याच्या सुबत्तेचे व काळ्या बाजारांत मिळविलेला पैसा प्रायश्चित्तानें पचवावा, म्हणून देणग्यांचा वर्षाव करण्याचे नव्हते. असें असून तात्यासाहेबांची ती कल्पना इतकी यशस्वी झाली कीं, त्यांच्या प्रतिपक्षाच्या डोळ्यांत त्यांचें तें यश सलूं लागलें.

लो. टिळक चिरोल खटला हरले, हें कळतांच तात्यासाहेबांनीं ३ लक्ष रुपये जमवून टिळकांच्या शिरावरचा खटल्याच्या खर्चाचा बोजा उतरवावा असें ठरविलें. या वेळेस प्रतिपक्षाकडून पहिल्यापेक्षां अधिक विरोध झाला, तरी देखील अल्पावधींत अडीच लक्ष रुपये जमवून लो. टिळकांकडे ते पाठविण्यांत आले. हें यश पूर्वींच्यापेक्षां अधिक भरदार होतें. त्यानंतर टिळकांच्या पश्चात् केसरीची व्यवस्था अत्यंत काटकसरीनें चालवून आणि केसरी पत्राची वजनदारी वाढवून केळकरांनीं केसरीच्या उत्पन्नांतून सुमारें तीन लक्ष रुपयांची बचत करून ती रक्कम चिरोल-फंडाची एकप्रकारची अप्रत्यक्ष फेड म्हणून राष्ट्रकार्याकरितां ट्रस्ट करून वेगळी ठेवली व त्या ट्रस्टमधून मध्यप्रांत-वऱ्हाड, मध्य-महाराष्ट्र आणि कर्नाटक या तीन प्रांतांत मिळून दरसाल अंदाजे १०–१२ हजार रुपये देशकार्य करण्याच्या कामीं खर्च करतां येतील अशी तरतूद केली. या योजनेंत केळकर यांची निःस्वार्थबुद्धि, कृतज्ञता, त्यागी वृत्ति आणि सार्वजनिक फंडांतून दूरवर विचार करून द्रव्यनिधीचा झरा सतत वाहत राहील असें करण्याची कार्यकुशलता या सर्वच गुणांचा प्रत्यय आला.

### एकपक्षीय अजातशत्रुत्व

अशा रीतीनें निरलसपणें विविध राष्ट्रकर्य करणारे श्री. केळकर हे जात्याच अजातशत्रु होते. मात्र अजातशत्रु या शब्दाचा अर्थ त्यांच्या बाबतींत असाच समजला पाहिजे कीं, त्यांनीं कोणाचेंहि शत्रुत्व केलें नाहीं. आजन्मांत त्यांनीं एकाहि

अपशब्दानें दुसऱ्याचें मन दुखविलें नाहीं; आपण होऊन दुसऱ्याचें कवडीभरहि नुकसान केलें नाहीं, दुसऱ्याचा स्वार्थ बुडवून आपलें घोडें पुढें दामटलें नाहीं, ज्या त्या कामांत आपणच दुढ्ढाचार्यपणा मिरवून दुसऱ्याला पुढें येण्यास संधि मिळूं न देण्याचा आडमुठेपणा केला नाहीं; कोणाचेंहि बरें पाहवत नाहीं असला नत-द्रष्टपणा केला नाहीं; उलटपक्षीं सर्वांना पुढें येण्यास संधि दिली, राष्ट्रकार्यासाठीं स्वतः घस सोसली, समेटासाठीं कोरा चेक लिहून देण्याचीहि तयारी दर्शविली, प्रतिपक्षाच्याहि कार्याची खऱ्या हितकर बाबतींत प्रशंसा केली; प्रतिपक्षाला आपला कार्यक्रम यशस्वी करून दाखविण्याला भरपूर संधि मिळावी म्हणून आपला हेतु बाजूला सारून त्यांची वाट मोकळी करून दिली, सर्व कांहीं केलें; परंतु त्यांच्या जन्मकाळच्या ग्रहांचा गुण म्हणा अगर कांहींहि म्हणा, पण त्यांना खऱ्या अर्थानें 'अजातशत्रुत्व' लाभलें नाहीं. प्रत्यक्ष राष्ट्रघात करणाऱ्या शत्रूंनाहि जी निंदा ऐकावी लागत नाहीं, इतकी अपशब्दात्मक निंदा त्यांना ऐकावी लागली. त्यांनीं सद्हेतूनें केलेल्या कोणत्याहि एखाद्या साध्या सूचनेचाहि विपर्यास केला जाऊं लागला, किंबहुना तात्यासाहेब केळकर यांच्या हेतूचा विपर्यास करणें हेंच एक कित्येकांचें, त्यांच्या मनानें, राष्ट्रकार्य होऊन बसलें !

### प्रतिपक्षाची रग जिरवीत

परंतु याहि बाबतींत त्यांच्या सहनशीलतेची कसोटीच लागली. जोंपर्यंत राष्ट्रकार्याला प्रत्यक्ष हानि न पोंचतां केवळ आपलीच मानखंडना केली जात आहे तोंपर्यंत आपण त्या निंदेकडे दुर्लक्ष करावयाचें व त्या वावदूकांना आपला तामसी आनंद यथेच्छ भोगूं द्यावयाचा असा तात्यासाहेबांचा निर्धार होता व त्यापासून ते कधींहि ढळले नाहींत; परंतु जेथें नुसत्या आपल्या हेतूच्या विपर्यासाचा प्रश्न नसून राष्ट्रकार्यावर निखारे पसरण्याचा उपद्व्याप होत आहे असें दिसेल त्या ठिकाणीं मात्र ते धर्मराजाची सहनशीलता झुगारून देऊन त्याच्या कनिष्ठ बंधूचा अवतार धारण करीत आणि एकदां वाग्युद्ध सुरूच झाल्यावर तात्यासाहेबांसारखा सव्यसाची योद्धा प्रतिपक्षाला 'दे माय धरणी ठाय' असें करून सोडी यांत नवल तें काय ? परंतु याहि बाबतींत त्यांनीं कधींहि आजन्म शत्रुत्व मनांत बाळगलें नाहीं. ज्यांनीं ज्यांनीं त्यांना अनेक वेळां दुखविलें असेल ते जेव्हां आपला विरोध विसरून तात्यासाहेबांकडे कोणत्या तरी बाबतींत सहकार्य मिळविण्यासाठीं येत, त्या वेळीं तात्यासाहेबहि, पूर्वीची आठवण एका शब्दानेंहि न देतां, प्रस्तुत प्रश्नाकडेच नजर देऊन आपल्या हातून जितकें सहकार्य होईल तेवढें करण्यास तयार असत.

अशा रीतीनें श्री. न. चिं. केळकर यांनीं साडेचार तपेंपर्यंत महाराष्ट्राचें राजकारण, समाजकारण, अर्थकारण, शैक्षणिक क्षेत्र, वाङ्मयक्षेत्र इत्यादि विविध अंगांनीं देशसेवा केली. गोलमेज परिषदेंत त्यांची कामगिरी महत्त्वाची ठरली. विलायतेंत असतां अल्पावधींतच त्यांनीं 'इंडिया' पत्राची सुव्यवस्था लावून दिली.

पुणें शहर म्युनिसिपालिटीचे ते अनेक वर्षे अध्यक्ष होते; कॉमनवेल्थ विमा कंपनी ही त्यांच्या अर्थकारणाची भरभक्कम साक्ष आहे. टिळक स्मारक मंदिर व टिळक पर्स-फंड हीं त्यांच्या टिळक-निष्ठेचीं स्मारकें होत. रे इंडस्ट्रियल म्युझिअम ही संस्था त्यांच्याच प्रोत्साहनानें नांवारूपास आली. वाङ्मय हें तर त्यांचें आवडतें क्षेत्रच होतें. त्यांतली त्यांची कामगिरी अद्वितीय आहे. वाङ्मयांत असें एकहि दालन नाहीं कीं ज्या दालनांत त्यांचा एखादा तरी ग्रंथ गुणाधिक्यानें चमकत नाहीं.

आधुनिक अर्थानें अध्ययन व अध्यापन यांचें त्यास जणूं काय व्यसनच जडलें होतें. केसरीची व मराठ्याची ४४ वर्षे सेवा करून ते नाममात्र निवृत्त झाले. त्या पत्रांतून त्यांचें लेखनकार्य चालूंच असे. 'सह्याद्रि' हें तर त्यांचें स्वतःचेंच अपत्य असल्यानें त्याला दर महिन्याला एखाददुसरा गोड घांस भरवावयाला ते कधींहि विसरले नाहींत. मृत्युपूर्वीचा त्यांचा शेवटचा लेख सह्याद्रि मासिकाकरितांच लिहिला जात होता. नवीन ग्रंथ वाचणें, त्यांतून नव्या कल्पना घेऊन आपल्या वाङ्मयांत बसविणें, जुन्या गीता-ज्ञानेश्वरी यांसारख्या ग्रंथांतून आपल्या दृष्टीनें रहस्य काढून तें आधुनिक वाचकांना पटेल अशा सोप्या भाषेंत मांडणें, राजकारणाची तोंडओळख खेडवळांनाहि करून देण्यासाठीं गोष्टींच्या रूपानें राजकारणाचे सिद्धान्त समजून देणें इत्यादि विविध व अपूर्व लेखनप्रकार त्यांच्या वाङ्मयांत आढळून येतात.

## व्यक्ति नव्हे शिक्षण-संस्था

अशा प्रकारें श्री. तात्यासाहेब केळकर ही एक व्यक्ति नसून ज्या संस्थेंत आधुनिक समाजाचा सर्वांगीण विचार केला जातो अशी ती एक शिक्षण-संस्थाच होती, असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. या शिक्षणसंस्थेंत दाखल होऊन आपापल्या बुद्धीच्या आवाक्याप्रमाणें शिक्षण घेण्यास कोणासच प्रतिबंध नसे. त्यांच्या घरीं जाण्यायेण्यास आणि त्यांच्याशीं कोणत्याहि विषयाची चर्चा करण्यास कोणास प्रतिबंध नसे. बरें, तेवढेहि श्रम नको असतील तर तात्यासाहेबांना आपल्या ठिकाणीं, कोणत्या तरी समारंभाच्या निमित्तानें बोलावून त्यांचें उपदेशामृत ऐकण्याचें मनांत आणल्यास तोहि मार्ग सर्वांना सुलभ होता. संस्था लहान असो, मोठी असो, कार्यकर्ते प्रसिद्ध असोत अगर अप्रसिद्ध असोत, विषय गहन असो किंवा उथळ असो. तात्यासाहेबांचे विचार ऐकण्याची ज्यांना ज्यांना इच्छा होई त्यांना त्यांना त्या निमित्तानें तात्यासाहेबांना पाचारण करून त्यांचे विचार काढून घेण्याची संधि केव्हांहि साधतां येणें शक्य असे.

## महाराष्ट्राची लवकर भरून न येणारी हानि

त्यांची राहणी साधी, वृत्ति निरलस, स्वभाव मनमिळाऊ व परोपकारी आणि सदोदित सत्कार्यांत गढून जाण्याची मनःप्रवृत्ति यामुळें तात्यासाहेबांच्या घरीं कोणासच केव्हांहि परकेपणा वाटत नसे. अशा प्रकारें राष्ट्राच्या सर्वांगीण उन्नतीची काळजी वाहून जन्मभर राष्ट्रकार्य करण्यांत गढून गेलेला राष्ट्रधुरीण,

आपल्या अष्टपैलूपणाच्या प्रकाशानें वाङ्मयाचीं सर्व दालनें सुशोभित करणारा खंदा लेखक, विधायक कार्यक्रमाच्या अनेक योजना आंखून राष्ट्रीय कार्यात अनेक कार्यकर्त्यांना नवीनवी दिशा दाखविणारा मार्गदर्शक, लोकमान्य टिळकांच्या राष्ट्रकार्याची धुरा त्यांच्या पश्चात् पंचवीस वर्षें स्वतः परिश्रमपूर्वक वाहून महाराष्ट्राचा मोठेपणा स्वाभिमानपूर्वक सांभाळणारा टिळकांचा वारस आणि महाराष्ट्राच्या परंपरेंतल्या व्यावहारिक राजकारणाचे गुण जन्मापासून अंगीं बाणलेला महाराष्ट्राचा सुपुत्र आज काळानें महाराष्ट्र-समाजांतून ओढून नेला यामुळें महाराष्ट्राची जी हानि झाली आहे तिची यथार्थ कल्पना आजच कोण करूं शकेल ? तात्यासाहेब केळकरांच्या निधनानें महाराष्ट्राचें महाभूषण गळून पडलें. त्यामुळें महाराष्ट्राची जी मोठी हानि झाली आहे, ती लवकर भरून येण्यासारखी नाहीं.

G. P. LIBRARY
:BH :R. :

## लढवय्ये संपादक निवर्तले ७

कृष्णजयंती हा हिंदुसमाजांतील एका मोठ्या उत्सवाचा दिवस. त्या दिवशीं श्रीकृष्णाचा जन्मोत्सव साजरा करावयाचा म्हणून जो तो धर्मनिष्ठ हिंदु त्याच्या तयारींत गढून गेलेला असावयाचा; पण नेमके कृष्णजयंतीच्याच दिवशीं कृष्णाजीपंत खाडिलकरांना आमच्यांतून अकस्मात् ओढून नेऊन काळानें आपली कुटिल गति सर्वांच्या प्रत्ययास आणून दिली; त्यामुळें कृष्णाष्टमीच्या आनंदाची छटा लुप्त होऊन सर्वत्र दुःखाची कृष्णच्छाया पसरलेली दिसून आली. गतवर्षीं ऐन दिवाळीच्या दिवसांत तात्यासाहेब केळकरांना आमच्यांतून एकाएकीं ओढून नेऊन, काळानें दिवाळीच्या रंगाचा बेरंग केला आणि त्यानंतर १० महिन्यांनीं काकासाहेब खाडिलकरांवर अचानक झडप घालून, कृष्णजयंतीची कृष्ण-पुण्यतिथि करून सोडली !

### शेवटचा दुवाहि निखळला

कृष्णाजीपंत खाडिलकर यांचा 'केसरी'च्या संपादकत्वाचा प्रत्यक्ष संबंध सुटून कित्येक वर्षें झालीं असलीं, तरी त्यांचा केसरी संस्थेशीं इतका घनदाट संबंध होता कीं, तो कोणीं तोडूं म्हटल्यानेंहि तुटण्यासारखा नव्हता. अर्थातच निधनसमयीं ते 'नवाकाळ' पत्राचे सेवानिवृत्त संपादक असले तरी 'केसरी'चेहि ते २८ वर्षांपूर्वींचे सेवानिवृत्त संपादक असल्यानें केसरी संस्थेलाहि आपल्यांतलाच एक कार्यकर्ता गेल्याप्रमाणें अपरिमित दुःख होत आहे. या दुःखाचें विशेष कारण असें कीं, 'केसरी' पत्राच्या जन्मापासून चिपळूणकर, आगरकर, टिळक, केळकर, खाडिलकर असे जे गेल्या पिढींतले पांच संपादक झाले, त्या संपादक-पंचकापैकीं

( केसरी, दि. ३१ ऑगस्ट १९४८ )

खाडिलकर हे शेवटचे संपादक आतां मृत्युमुखीं पडल्यानें टिळकांच्या राजकारणांत आरंभापासून प्रत्यक्षपणें आणि हिरीरीनें भाग घेणारा संपादक राहिला नाहीं आणि जुन्या पिढीचा शेवटचा दुवाहि निखळला, या विचारानें मन विशेष विषण्ण होत आहे.

## निकट संबंध आणि ताटातूट

कृष्णाजीपंत खाडिलकर हे १८९६ सालीं टिळकांच्या रणधुमाळीच्या राजकारणाच्या नांदीच्या वेळेसच केसरी-मराठा संस्थेंतून, प्रथम रंगभूमीवर आले, त्या वेळेपासून, मध्यंतरींचे कांहीं अपरिहार्य कालखंड वजा टाकल्यास, पंचवीस वर्षें-पर्यंत त्यांचा केसरी-मराठा संस्थेशीं निकट संबंध होता. एवढ्या दीर्घ काळाच्या मानानें पाहतां 'केसरी' पत्रावर संपादक म्हणून त्यांचें नांव थोडींच वर्षें झळकलें. टिळकांना १८९७ त पहिली शिक्षा झाल्यावर, केसरीच्या संपादकांचें बहुतेक सर्व काम त्यांनींच संभाळलें होतं, पण प्रत्यक्ष संपादक म्हणून त्यांचें नांव नोंदलें गेलें नव्हतें. पुढें १८९९ सालीं टिळकांनीं एप्रिलपासून 'पुनश्च हरिः ॐ' म्हणून स्वतःकडे संपादकत्व घेतलें. त्या वेळेपासून १९०८ च्या जुलैच्या २३ व्या तारखेस टिळकांना शिक्षा होईपर्यंत, टिळकांच्या नांवानेंच 'केसरी' प्रसिद्ध होत असे. त्यानंतर मात्र १९०८ च्या जुलैअखेरपासून दि. ११ जानेवारी १९१० पर्यंत कृष्णाजीपंतांचें नांव संपादक म्हणून नोंदलें गेलें होतें. १९१८ च्या मार्च महिन्यांत टिळक विलायतेस जाण्यासाठीं निघाले त्या वेळीं पुनश्च काकासाहेबांचें नांव संपादक म्हणून झळकूं लागलें; आणि तें दि. २२ जून १९२० पर्यंत तसेंच कायम होतें. त्यानंतर मात्र कृष्णाजीपंतांची व केसरीची खरीच ताटातूट झाली.

वरील वृत्तान्तावरून खाडिलकर यांना संपादकत्वाच्या शिक्क्याचा मान किती थोडा मिळाला तें दिसून येईल; पण राजाचा टिळा कपाळावर नसला तरी पडद्या-आडून राज्यसूत्रें हलविणाऱ्याच्याच हातीं खरी सत्ता असते, त्याप्रमाणें संपादक म्हणून शिक्का नसला तरी १८९७ ते १८९९ एप्रिलपर्यंत आणि पुढें १९०१ ते १९१० पर्यंत 'केसरी'चें बहुतेक लिखाण खाडिलकरांच्या तंत्रानेंच चाललें होतें आणि ही जबाबदारी प्रथमच त्यांच्या शिरावर पडली त्या वेळीं त्यांचें वय पुरतें पंचवीसहि नव्हतें, यावरून त्यांच्या धैर्यनिष्ठेची कल्पना येईल.

## तिखट लेखणीचे चटके

केसरींतून लेखन सुरू झाल्यापासून काकासाहेबांच्या तिखट लेखणीचे तीव्र चटके प्रतिपक्षास बसूं लागले आणि त्यांच्या तेजस्वी व कडक लेखांनीं राजकारणाचें वातावरण तापूं लागलें. लोकमान्य टिळकांच्या सर्वच चळवळींना त्या वेळीं तुफान भरती येत चालली होती. चळवळीची तीव्रता जसजशी वाढत चालली तशतशी टिळक-पक्षाच्या अनुयायांच्या संख्येलाहि भरती येत चालली. ही भरती बेफाम वाढण्याला काकासाहेबांचे लेख कारणीभूत झाले. कृष्णाजीपंतांचे लेख वाचकांच्या हृदयाचा ठाव घेऊन, त्यांतून मेंगेपणाचे विचार हद्दपार करून, त्यांच्या जागीं

उसळत्या राष्ट्रभक्तीचे, निस्सीम स्वार्थत्यागाचे आणि आटोकाट प्रयत्नवादाचे विचार प्रस्थापित करण्याचें स्फूर्तिकार्य करीत असत. कर्झनसाहेबांकडून उद्दाम साम्राज्यशाहीच्या मदाचा जसजसा आविष्कार होई तसतसा त्याचा प्रतिकार करण्याचा जोम जनतेंत वाढत जाई. खाडिलकर यांचें 'कीचकवध' हें नाटक पर्यायानें त्या झगड्याचेंच चित्रण होय असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं.

काकासाहेबांची राजकारणाकडे पाहण्याची दृष्टि व्यापक होती. केवळ आपल्या प्रांतापुरती अथवा हिंदुस्थानापुरती नजर न ठेवतां परराष्ट्रांतून राजकारणाचें वारे कसे वाहात आहेत व त्यांचा आपल्या राजकारणावर कोणता परिणाम होईल याचें दूरदृष्टीनें निरीक्षण करून त्यांतून ते अचूक अनुमान काढीत असत. लॉर्ड कर्झन यांची व्हाइसरॉयांच्या जागीं नेमणूक होतांच कर्झनशाहीचें धोरण काय राहील याचें त्यांनीं अगाऊ विवेचन केलें आणि ज्या वेळीं आपला हा देश त्यांच्या साडेसातीच्या फेऱ्यांतून सुटला त्या वेळीं त्यांनीं सिंहावलोकन करून ७ वर्षांपूर्वीचें आपलें भविष्य कसें तंतोतंत जुळलें तें तुलनात्मक कोष्टकानें वाचकांना पटवून दिलें.

### गनिमी काव्याच्या युद्धाचा बोध

कर्झनच्या कारकीर्दींतच बोअरयुद्ध सुरू झालें आणि कृष्णाजीपंतांना आपल्या आवडीचा विषय हाताळावयास मिळाला. त्या युद्धांत डीवेट आणि डीलारी यांच्या गनिमीकाव्याच्या हालचालींनीं ब्रिटिशांची जी त्रेधा तिरपीट उडाली तीवरून काकासाहेबांना 'गनिमी काव्याचें युद्ध' ही लेखमाला लिहिण्याची स्फूर्ति मिळाली. त्या लेखमालेंत महाराष्ट्रांतून अवरंगजेबाशीं मराठ्यांनीं चालविलेला झगडा, स्पेन देशानें नेपोलियनच्या अजिंक्य सेनापतीशीं दिलेली टक्कर इत्यादि दाखले देऊन साम्राज्यशाहीचें सैनिकबळ कितीहि मोठें असलें तरी, स्वदेशाभिमानें प्रेरित होऊन आत्मबलिदानास तयार झालेले मूठभर सैनिक साम्राज्यशाहीचा मद कसा उतरवूं शकतात, याचे धडे काकासाहेबांनीं पर्यायानें हिंदुस्थानास दिले. त्यानंतर तीन वर्षांनीं रूसो-जपानी युद्ध सुरू झालें आणि काकासाहेबांच्या लेखणीला पुनश्च तेज चढलें. बुटक्या जपान्यांचा टीचभर व नवोदित देश दोन खंडांत पसरलेल्या रशियासारख्या बड्या धेंडाशीं युद्ध करून त्यांस जेरीस आणूं शकतो, हें उदाहरण हिंदी लोकांच्या डोळ्यांपुढें सतत उभें राहावें व त्यापासून त्यांनीं बोध घ्यावा या हेतूनें त्या युद्धाचें चटकदार वर्णन केसरींत देण्यांत येई व त्या युद्धासंबंधाचें 'लायोटंगचें सोनपतपानपत' आणि 'रशियाची रेवडी' हे खाडिलकरांचे लेख अत्यंत स्फूर्तिदायक असे आहेत. हिंदुस्थानांतील स्वराज्याच्या चळवळीचें बीजारोपण रूसो-जपानी युद्धांतील जपानच्या जयामुळें झालें, असें ब्रिटिश इतिहासकारहि मानतात. त्या बीजारोपणाचें बरेचसें श्रेय काकासाहेब खाडिलकरांच्या दूरदर्शी कुशाग्रबुद्धीस आणि त्यांच्या तीक्ष्ण मर्मभेदक लेखणीस आहे.

अशा रीतीनें हिंदी जनतेची मनोभूमिका नांगरून व बी पेरून तयार झाली असतां कर्झनसाहेबांच्या वंगभंगाच्या प्रखर तापानें वावटळ उठविली आणि तिचें पर्यवसान राष्ट्रीय शिक्षण, स्वदेशी, बहिष्कार व स्वराज्य यांच्या चळवळीच्या रूपानें पावसाच्या सरीवर सरी येण्यांत झालें. लो. टिळकांच्या व्याख्यानांची झोड आणि खाडिलकरांच्या लेखाची झोड अशा दुहेरी उठावणीनें हिंद जनता स्वराज्याविषयीं अगदीं आतुर होऊन नोकरशाहीस भंडावून सोडूं लागली.

## दडपशाहीच्या पाशाचा परिणाम

हिंदी चळवळ आपल्या आटोक्याबाहेर जात आहे असें दिसून येतांच नोकरशाहीचे अगदीं निर्वाणीचा उपाय म्हणून लो. टिळकांना सहा वर्षे डांबून ठेवलें, दडपशाहीचे नवे पाश निर्माण केले आणि नवा 'प्रेस ॲक्ट' करून त्याचा पाश 'केसरी'वर टाकण्याची सिद्धता केली. खाडिलकरांच्या लेखणीचा प्रताप नोकरशाहीला असह्य झाल्यामुळें 'इंद्राय तक्षकाय स्वाहा' या क्लृप्तीनें खाडिलकरांचा व 'केसरी'चा असा दुहेरी कांटा काढून टाकण्याचा सरकारचा कावा हाणून पाडण्याकरितां खाडिलकरांच्या नांवचें 'केसरी'चें डिक्लेरेशन बदलून तें तात्यासाहेब केळकरांच्या नांवानें करण्यांत आलें. त्यामुळें व्यक्तिशः खाडिलकरांवरील संभाव्य संकट टळलें आणि केसरी संस्थेवरचें जिवावरचें संकट ५ हजार रुपयांच्या जामिनाच्या रूपानें शेपटीवरच भागलें. लो. टिळक सुटून आल्यानंतर त्यांनीं 'केळकर होते म्हणून आज आम्हांस उभे राहावयास तरी जागा मिळत आहे' असे जे उद्गार काढले त्याची पार्श्वभूमि ही अशा प्रकारची होती. हा सर्वच खुलासा त्या वेळीं उघडपणें होऊं न शकल्यामुळें कित्येक गैरसमज पसरले; पण त्यांत कांहीं तथ्य नव्हतें.

## वृत्तपत्रसृष्टींतून नाट्यसृष्टींत

'डिक्लेरेशन' बदलल्यानंतर खाडिलकरांनीं 'केसरी'चा संबंध सोडला हें खरें. टिळकांच्या संपादकत्वाच्या वेळीं ज्यांनीं जणूं काय आपणच संपादक आहों अशा भावनेनें पूर्ण स्वातंत्र्यानें लेखनकार्य केलें, ते मानधनाग्रणी खाडिलकर दुय्यम संपादकाचें काम करण्याचें कसें पत्करतील? अर्थातच त्यांनीं केसरीचा संबंध सोडला आणि तो काळ नवें स्वतःचें वर्तमानपत्र काढण्याला अत्यंत प्रतिकूल असल्यामुळें नाटकें लिहिण्याकडे आपलें बुद्धिसर्वस्व खर्चण्याचा त्यांनीं संकल्प केला. नाट्यसृष्टींत देखील त्यांचें 'कीचकवध' नाटक जप्त झाल्यानें त्यांना चटका बसलाच होता. त्या अनुभवानें सावध होऊन नाटकांत देखील उघडपणें राजकारण गोवण्याचें त्यांनीं बंद केलें आणि स्फुट राजकारणाला फाटा दिल्यामुळें गद्य-नाटकाला नीरसपणा येईल तो टाळण्यासाठीं त्यांनीं नाटकांत सुरस पद्यें घालून संगीत नाटकें रचण्याला प्रारंभ केला. मानापमान, स्वयंवर, विद्याहरण इ. नाटकांत राजकारण प्रच्छन्नपणें गोवलेलें आहे. वक्रोक्तीचे हे धडे त्यांनीं शिवराम-

पंत परांजपे यांच्यापासून घेतले आणि त्यामुळेंच उभयतांची त्या वेळेपासून गट्टी जमली आणि शिवरामपंती लेखाची छटा खाडिलकरांच्या लिखाणांत तेव्हांपासून दिसूं लागली. या सगळ्या स्थित्यंतराला सिडनहॅमी दडपशाहीच पर्यायानें कारणीभूत झाली.

### राजकारणावरील दृष्टि अढळ होती

इतकें स्थित्यंतर झालें तरी, काकांचा पिंड जात्याच राजकारणाचा आणि तत्पूर्वी १५ वर्षें राजकारण त्यांच्या हाडींमासीं खिळलेलें, तेव्हां तें सोडूं म्हटलें तरी थोडेंच सुटणारें होतें. अर्थातच ते केसरी कचेरींत येत, वर्तमानपत्रें वाचीत आणि राजकारणाची चर्चा करीत. त्या वेळचे दुय्यम संपादक श्री. दत्तो पंत लिमये हे काकांच्या हाताखालीं दहा वर्षें काम करून त्यांच्या राजकारणांत पक्के मुरलेले. अर्थातच त्यांच्याशीं खाडिलकर मोकळेपणानें चर्चा करीत व त्याचा निष्कर्ष दत्तोपंतांच्या लिखाणांत दिसून येई. बाल्कन युद्ध सुरू होण्यापूर्वी एक आठवडा कृष्णाजीपंतांनीं दत्तोपंतांना बाल्कन संस्थानांचे नकाशे तयार करून घेण्यास सांगितलें. लिमयांनीं ती गोष्ट चालढकलीवर नेली, कारण प्रत्यक्ष युद्ध जाहीर झालें नव्हतें; पण दुसऱ्या मंगळवारच्या आंत बाल्कन युद्धाला सुरुवात झाली देखील, तेव्हां काकासाहेब दत्तोपंतांना म्हणाले, 'तुमच्या वृत्तपत्रांत पहिल्याच दिवशीं नकाशासह युद्धाची हकीकत आली असती, ती संधि तुम्ही हातची घालवलीत.' सारांश, केसरीचें संपादकत्व सोडावें लागलें तरी खाडिलकरांची राजकारणावरील नजर ढळली नव्हती आणि 'केसरी' पत्र मागें पडूं नये याविषयींची त्यांची तळमळहि लोपली नव्हती.

हें बाल्कन युद्ध संपल्यानंतर त्यांनीं 'बाल्कन युद्धाचे परिणाम' हा लेख 'चित्रमयजगत्'मध्यें लिहिला आणि आपल्या राजकारणी लेखांना प्रसिद्धीची एक नवी सोय करून घेतली. १९१४ सालचें पहिलें महायुद्ध सुरू झाल्यानंतर थोड्याच दिवसांनीं खाडिलकरांनीं चित्रमयजगत्मध्यें प्रत्येक महिन्याला युद्धाचा आढावा घेण्याची वहिवाट सुरू केली आणि त्यामुळें त्यांची लेखणी गंजून न जातां पूर्वींसारखीच तीक्ष्ण व तेजस्वी राहिली. पहिलें महायुद्ध सुरू झाल्यानंतर वर्ष-समाप्तीचा युद्धाचा आढावा घेणारा लेख 'वर्ष संपलें' या मथळ्याखालीं त्यांनीं 'केसरीं'त लिहिला. दुसऱ्या वर्षाच्या समाप्तीनंतरहि त्यांनीं 'तिसरें वर्ष लागलें' या मथळ्याखालीं पुनश्च दुसरा लेख लिहिला. एतावता खाडिलकरांच्या या अज्ञातवासांतहि त्यांचा राजकारणाचा अभ्यास चालूच होता आणि 'केसरी'शींहि संबंध अगदींच तुटला होता असेंहि नाहीं.

लो. टिळक मंडालेहून सुटून आल्यानंतर त्यांनीं 'होमरूल'ची चळवळ चालू केली आणि त्या चळवळींत खाडिलकर प्रमुखत्वानें भाग घेऊं लागले. १९१७ सालीं बेळगांव जिल्हा सभा अथणी येथें भरली होती. तिचें अध्यक्षपद कृष्णाजी-

पंतांनींच मंडित केलें होतें. चिरोल खटल्यानिमित्त टिळक विलायतेस जावयास निघाले त्या वेळीं पुनश्च सत्तान्तर होऊन खाडिलकरांना केसरीच्या संपादकत्वाचा दुसऱ्यांदा मान मिळाला. पूर्वी १९१० सालीं कारणपरत्वें खाडिलकरांचें संपादकत्व काढून तें केळकरांना देण्यांत आलें होतें. आतां केळकर विलायतेला जाणार या कारणामुळें त्यांचें संपादकत्व खाडिलकरांना दिलें गेलें; अशा रीतीनें टिळकांनीं आपण कोणतीहि गोष्ट परिस्थितीनुरूप सकारण करतों, त्यांत कोणीं हर्षविषाद मानूं नये, असें दर्शविलें.

कृष्णाजीपंतांच्या या १९१८ ते १९२० पर्यंतच्या द्विवार्षिक संपादकत्वाच्या कारकीर्दीतहि त्यांच्या प्रखर लेखणीचे तडाखे प्रतिपक्षास हैराण करते झाले. याच कालावधींत रौलेट ॲक्ट मंजूर होणें, त्याच्याविरुद्ध असहकारिता व सत्याग्रह पुकारला जाणें आणि जालियनवाला बागेंत डायरशाही गाजणें इत्यादि प्रकरणें उद्भवलीं आणि त्या वेळींच या खंद्या लढवय्या संपादकानें सत्याग्रह हेंच यापुढें आपलें लढण्याचें हत्यार होणार असें हेरून ठेवलें.

## मुंबईला प्रयाण

अमृतसरची गाजलेली काँग्रेस आणि त्याहून अधिक गाजलेली सोलापूरची प्रांतिक परिषद् झाल्यानंतर लोकमान्यांनीं १९२० च्या जून महिन्यांत 'केसरी'चीं सूत्रें परत केळकरांच्या हातीं दिलीं. त्या वेळींच टिळकांनीं आपला अवतार-समाप्तीचा काळ समीप आला आणि त्यापुढें नवें युग सुरू होणार, हें हेरलें असावें आणि त्या युगानुरूपच पुढील तरतूद करून ठेवली असावी, असा तर्क वाहतो. तें कसेंहि असो. पण १९२० च्या जूनअखेर काकासाहेब केसरीच्या व्यापांतून मोकळे झाले आणि त्यांचें लक्ष मुंबईकडे वेधलें. रौलेट ॲक्टाविरुद्ध जी सत्याग्रहाची धामधूम झाली त्या वेळीं काकासाहेब पुण्यास नसून मुंबईस होते आणि अशा धामधुमीच्या कार्यक्रमाला पुण्यापेक्षां मुंबईच बरी असें त्यांचें मत झालें होतें. तत्पूर्वीहि त्यांनीं एका प्रसंगीं "सर्वांत पुढें मुंबईच कां!" असा लेख लिहिला होता. एकंदरींत आपल्या भावी कर्तृत्वाला मुंबईचें वातावरण बरें असें ठरवून काकासाहेबांनीं 'लोकमान्य' दैनिकाचें संपादकत्व पत्करून मुंबईस प्रयाण केलें. अशा रीतीनें पुण्यांतली २५ वर्षांची आपली कारकीर्द यशस्वी रीतीनें गाजवून खाडिलकर हे मुंबईच्या 'लोकमान्या'चे संपादक झाले.

आपला स्वतंत्र बाणा सोडून कोणाचाहि मिंधेपणा पत्करावयाचा नाहीं असा काकासाहेबांचा जन्मस्वभावच असल्यानें लिमिटेड कंपनीच्या डायरेक्टरांशीं त्यांचें न पटून त्यांनीं नांवापुरतेंहि बंधन आपणास नको असें म्हणून 'लोकमान्या'चा संबंध तोडला आणि स्वतःच्या हिंमतीवर **'नवाकाळ'** पत्र सुरू करण्याचें ठरविलें; आणि त्या कामांत दहा वर्षांत मोठें यश संपादन केलें. लौकिकदृष्ट्या ते यशस्वी पत्रकार म्हणून गाजले यांत शंकाच नाहीं. 'नवाकाळ' पत्र चालवीत असतां त्यांच्यावर जामिनक्या भरण्याचा, कोर्टांत खेचले जाण्याचा आणि साबरमतीचा

कारावास सोसण्याचाहि प्रसंग ओढवला आणि आपल्या लेखामुळें ज्या कारागृहांत टिळकांना राहावें लागलें त्याच ठिकाणीं आपण राहून आल्यानें त्यांच्या मनांतली रुखरुखहि गेली. या सर्व प्रसंगीं त्यांच्या मनाचा खंबीरपणा आणि आत्मविश्वास अढळ होता.

## वेदान्ताकडे लक्ष वळलें

लौकिकरीतीनें हें सर्व झगडे चालवीत असतां ज्या वैचारिक भूमिकेवरून त्यांना या लढ्यास तोंड द्यावें लागत होतें त्या भूमिकेनें त्यांच्या स्वतंत्र बाण्याच्या लढाऊ वृत्तीचें समाधान होत असेल वा नसेल हा प्रश्नच आहे. नित्य गदा अगर गदा नसल्यास बुंध्यासकट वृक्ष उपटून घेऊन लढणाऱ्या भीमास, अज्ञातवासांतील गोग्रहणाच्या प्रसंगीं जेव्हां धनुष्य घेऊन लढण्याचा प्रसंग आला त्या वेळीं ती कामटीची धनुकली पाहून त्याच्या मनांत जसे विचार आले असतील तसेच विचार कृष्णाजीपंतांच्या मनांतहि येण्याचे अनेक प्रसंग आले असतील. कांचनगडची मोहना, कीचकवध, विद्याहरण, सत्त्वपरीक्षा, मानापमान, स्वयंवर इत्यादि नाटकें ज्या मनोभूमिकेवरून लिहिलीं गेलीं त्या मनोभूमिकेला मेनका, द्रौपदी व सावित्री या नाटकांनीं समाधान वाटलें असेल असें मानणें म्हणजे मनुष्याचा जन्मसिद्ध स्वभाव केवळ परिस्थितीनें बदलतो असें मानावें लागेल. परिस्थितीप्रमाणें मनुष्य आपल्या आचरणाला मुरड घालतो; पण अंतर्यामीं मनाला मुरड घालणें तसें सोपें नसतें. म्हणूनच काकासाहेब खाडिलकर यांचें मन वृत्तपत्राच्या व नाटकांच्या लौकिक-व्यवहारांनीं रमेनासें झालें व ते वेदान्ताच्या वाचनाकडे व लेखनाकडे वळले.

जो कोणताहि विषय हातीं घ्यावयाचा तो आत्मसात् करावयाचा अशी बुद्धीची तीव्रता आणि मनाची दृढता त्यांच्या अंगीं असल्यामुळें त्यांनीं संध्या, पुरुषसूक्त, रुद्र, ईशावास्य-उपनिषद्, ऐतरेय-उपनिषद्, ज्ञानेश्वरी असे एकाहून एक चढते विषय हातीं घेऊन त्यांचा अभ्यास केला, त्यावर प्रवचनें दिलीं आणि ती पुस्तकरूपानेंहि छापून प्रसिद्ध झालीं आहेत. लहानपणासून त्यांचा ईश्वरनिष्ठेकडे कल होता व त्यास अनुसरून त्यांनीं सांगलीनजीक सांगलवाडीस दत्तमंदिर स्थापन केलें व त्या ठिकाणीं ते योगाभ्यासहि करीत असत. अशा रीतीनें काकासाहेबांच्या आयुष्याचीं अखेरचीं वर्षें वानप्रस्थाश्रमांत वेदान्तविचारांत गेलीं.

## राष्ट्रभक्तीचा व राष्ट्रसेवेचा आदर्श

लो. टिळकांनीं १८९५ पासून लढाऊ राजकारणाचा जो आखाडा स्थापिला त्या आखाड्यांत वयाची पंचविशी पूर्ण होण्याच्या आंतच मोठ्या धिटाइनें उडी घेणाऱ्या या धाडशी वीरानें केसरी पत्राची जबाबदारी टाकोटाक आपल्या अंगावर घेतली आणि पावणेदोन वर्षें ती कामगिरी उत्तम रीतीनें पार पाडून सांधा बेमालूम जोडल्याची शाबासकी आपल्या गुरूकडून मिळविली; नेपाळसारख्या त्या वेळच्या अज्ञात प्रदेशांत जाऊन तेथें पीटर दी ग्रेटप्रमाणें हलक काम पत्करून मोठें राजें-

कारण साधण्याचा प्रयत्न केला; ताईमहाराजांच्या खटल्यांत टिळक गुंतले असतां 'केसरी' पत्राच्या लिखाणांत एकहि दिवस त्यांची उणीव भासूं दिली नाहीं; आणि स्वराज्याच्या चतुःसूत्रीचें क्रान्तिकारक राजकारण सुरू झालें असतां, आपल्या सणसणीत व स्फूर्तिदायक लेखांनीं वाचकांची आणि खणखणीत व्याख्यानांनीं श्रोत्यांचीं मनें गदगदा हलवून क्रान्तिकारक विचारांचा पाठपुरावा केला. सत्याग्रहाच्या नव्या आखाड्यांतहि मोठ्या आशेनें वा हौसेनें त्या वीरानें उडी घातली व तेथेंहि ज्या ज्या वेळीं लढा चालू होई त्या त्या वेळीं आपला पराक्रम दाखविला आणि लढाऊ राजकारणाचा प्रसंग नसेल त्या त्या वेळीं वेदान्तांतील गूढ उकलून पाहण्याचा नचिकेताप्रमाणें धीटपणें प्रयत्न केला. अशा रीतीनें जन्मभर आपलें बुद्धिसर्वस्व आपल्या मातृभूमीच्या आणि आपल्या समाजाच्या सेवेंत राबवून अखेरीस आपली मातृभूमि स्वतंत्र झाल्याचें पाहून कृतकृत्यतेच्या समाधानानें मायभूमीच्या मांडीवर आपला देह ठेवून परलोक गांठला. 'केसरी'च्या संपादकपंचकापैकीं हे शेवटचे लढवय्ये संपादकहि पूर्वींच्या चार संपादकांप्रमाणेंच वाचकांपुढें आपला राष्ट्रभक्तीचा आणि राष्ट्रसेवेचा आदर्श ठेवून गेले आहेत. त्याबद्दल त्यांस ही वाङ्मय-श्रद्धांजलि समर्पण करून त्यांच्या आत्म्यास चिरशांति लाभो अशी आम्ही प्रार्थना करतों.

---

## मुसलमानांतला चाणक्य गेला : : : : ८

**अप्यपर्वणि भज्येय न नमेय कदाचन।**

बॅरिस्टर महंमदअली जिना यांचें देहावसान शनिवार दि. ११ ला रात्रीं ११ वाजतां कराची मुक्कामीं झाल्याची अधिकृत वार्ता ऐकून त्यांच्या प्रतिपक्षीयांनाहि हळहळ वाटेल; मग त्यांच्या अनुयायांना असह्य दुःख झालें असल्यास त्यांत नवल काय ? त्यांतून बॅ. जिना हे आपल्या कारकीर्दीच्या आरंभापासूनच हट्टी मुस्लिम लीगवाले आणि पाकिस्तानवादी होते असें नसून, आपल्या कारकीर्दीच्या पूर्वार्धांत ते राष्ट्रीय बाण्याचे व लीगला कसून विरोध करणारे पुढारी होते. अनेक वेळां त्यांनीं लोकमान्य टिळकांच्या खटल्यांत उत्तम वकिली लढवून त्यांना साहाय्य केलें होतें आणि १९१६ सालच्या टिळकांवरील खटल्यांत टिळकांना हायकोर्टांतून न्याय मिळून त्यांच्यावरील भाषणबंदी जी उठली तिचें पुष्कळसें श्रेय बॅरिस्टर जिना यांनाच आहे. या कामगिरीमुळेंच लो. टिळक व बॅ. जिना यांचा स्नेह दृढावत

( केसरी, दि. १४ सप्टेंबर १९४८ )

चालला आणि त्यामुळेंच लखनौचा सुप्रसिद्ध करार चुटकीसरसा घडवून आणतां आला. युद्ध-परिषदेच्या वेळीं मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड वुइलिंग्डन् यांनीं लो. टिळकांना परिषदेंत बोलण्याला अडवणूक केली. तो दंश मनांत धरून वुइलिंगडन् यांच्या प्रयाणाच्या वेळीं त्यांना मानपत्र देण्याला जो जोरदार विरोध करण्यांत आला त्या विरोधाच्या सभेंत बॅ. जिना यांनीं जातीनें पुढाकार घेऊन ती सभा उधळण्याची कारवाई यशस्वी केली. अशाच प्रकारची त्यांची इतर राष्ट्रीय कामगिरीहि लक्षांत आल्यानें त्यांच्या अलीकडच्या दुर्योधनी वृत्तीमुळें वाटणाऱ्या विद्वेषावर कांहींसें विरजण पडतें. तथापि आधीं दुराचारी असलेला मनुष्य मागाहून सुधारला तर त्याचे जसे दुराचार विसरले जातात व त्याची गणना सदाचाऱ्यांत केली जाते, तशी स्थिति आधीं सुवृत्त असलेला इसम मागाहून दुर्वृत्त झाल्यास होत नाहीं. त्याच्या मागाहूनच्या दुराग्रहामुळें त्याच्या पूर्वीच्या सदाचारावर सपशेल बोळा फिरवला जातो. बॅ. जिना यांची अवस्था तशीच झाल्यानें त्यांची पूर्वीची सत्कीर्ति लुप्त होऊन त्यांच्या अपकीर्तीचा मामला हिंदूंच्या स्मरणांत राहील.

## कारकीर्दीचें त्रिविध स्वरूप

बॅ. जिना यांच्या सार्वजनिक कारकीर्दीचे तीन भाग पडतात. पहिला कालविभाग इ. स. १९०६ ते १९२१ पर्यंतचा. या कालखंडांत जिनांनीं अस्सल राष्ट्रीय बाणेदारपणाची कीर्ति संपादन केली. बॅ. जिना यांचें सुदैव असें कीं, बॅरिस्टरीचा अभ्यास करण्यास्तव ते विलायतेस गेले असतां, त्यांना महर्षि दादाभाई नौरोजी यांच्या निकट सहवासाचा लाभ मिळाला. दादाभाईच्या शिक्षणानें त्यांस देशभक्तीचें व राष्ट्रीयत्वाचें वळण लागलें. मुंबईस येऊन बॅरिस्टरी करूं लागल्यावर त्यांना फेरोजशहा मेथांचा सहवास लाभला, त्या योगानें त्यांच्या राष्ट्रीयत्वाला आणखी तेज चढलें. त्याची प्रतीति येण्याचा सुयोग लवकरच आला. १९०७ सालीं मुंबईतील युरोपियन जे. पी.नीं गटबाजी करून फेरोजशहा यांना म्युनिसिपालिटींतून हुसकण्याचा डाव टाकला व तो यशस्वी होऊन मेथासाहेब निवडणुकींत पराभूत झाले. त्याबरोबर बॅ. जिना यांनीं आपल्या जागेचा राजिनामा दिला व त्या मतदार संघांतून निवडून येण्याची मेथांना संधि दिली. या स्वार्थत्यागाचा व बाणेदारपणाचा डंका वाजूं लागून जिनांचें नांव सर्वतोमुखीं झालें. याच सुमारास लॉर्ड मिंटो यांनीं मुसलमानांना सवता सुभा व जादा प्रतिनिधित्व देण्याचें आमिष दांखवून त्यांना कॉंग्रेसपासून फोडण्याचा खेळ आरंभिला. त्या वेळीं असला सवता सुभा उभा करूं नये म्हणून तद्विरुद्ध मुंबईच्या ‘ प्रेसिडेन्सी असोसिएशन ’नें जो खलिता मोर्लेसाहेबांकडे धाडला तो बॅ. जिना यांनींच तयार केला होता. त्याचप्रमाणें मुस्लिम लीगच्या स्वार्थी व अराष्ट्रीय धोरणाचा निषेध करण्याचा ठराव कलकत्ता कॉंग्रेसपुढें आला असतां त्यावर प्रमुख वक्ते म्हणून जिनांनींच भाषण केलें. अर्थातच १९०६ पासून १९१३ सालापर्यंत जिनांनीं लीगचे सभासद होण्यांचेंहि

नाकारलें. इतकें राष्ट्रीयत्व अंगीं बाणलेले जिना वीस वर्षांनंतर मुसलमानांच्या सवत्या सुभ्यासाठीं प्राण पणाला लावून लढूं लागले याचें सखेदाश्चर्य वाटतें.

**लीगचें काँग्रेसशीं सख्य जडलें**

बाल्कन युद्धामुळें मुसलमानांत धर्मवेडाची लाट उसळली आणि युरोपियन राष्ट्रांविषयींचा विद्वेष वाढला. त्या विद्वेषाच्या भरांत मुस्लिम लीगनें आपलें आजपर्यंतचें राजनिष्ठेचें सोंग फेकून दिलें आणि काँग्रेसच्या पावलावर पावलें टाकून स्वराज्य हेंच आपल्याहि चळवळीचें ध्येय ठरविलें. आजपर्यंत एकमेकींचा मत्सर करणाऱ्या या दोन सवतींनीं एकत्र येण्याचा सुयोग १९१५ त मुंबईत साधला. त्या वेळीं अलीबंधु स्थानबद्ध असल्यानें लीगचीं सर्व सूत्रें जिनांच्या हातीं आलीं. बॅ. जिनांच्या कर्तृत्वाची ही चढती पायरी पाहून लो. टिळकांनीं अहमदाबाद येथें भरणाऱ्या मुंबई प्रांतिक सभेच्या अध्यक्षपदीं त्यांची योजना केली व त्या भाषणांत जिनांनीं स्वराज्याची निस्संदिग्ध मागणी केली. त्याचप्रमाणें व्हाइसरॉयांच्या कौन्सिलांतील १९ सभासदांचा सुधारणांच्या पहिल्या हप्त्याची मागणी करणारा जो खलिता विलायतेस रवाना झाला त्यावर जिनांची स्वाक्षरी असून तो मुख्यतः जिनांच्या अहमदाबाद येथील भाषणास अनुसरूनच तयार करण्यांत आला होता. त्यानंतर १९१६ चा सुप्रसिद्ध लखनौचा करार करण्यांत बॅ. जिना हेच मुस्लिम लीगचे त्या वेळचे अध्यक्ष म्हणून प्रामुख्यानें जबाबदार होते. त्या करारांत मुसलमानांचा सवता सुभा मानला गेला असला तरी तो अनेक मर्यादांनीं जखडला गेला होता आणि त्यांत कोठल्याहि प्रांतांत मुसलमानांची बहुमताधिष्ठित सत्ता चालण्याला वाव ठेवला गेला नव्हता. एवंच, या वेळेपर्यंत बॅ. जिनांची दृष्टि राष्ट्रीयतेपासून ढळली नव्हती.

**जिनांचा अज्ञातवास**

१९२० सालीं गांधीमहाराजांचें राजकारण सुरू होऊन असहकारिता व बहिष्कारपंचक यांचा धुमाकूळ माजला. असहकारितेनें व शांततेच्या मार्गानें संपूर्ण स्वराज्य प्राप्त होईल हें बॅ. जिना यांना पटलें नाहीं; म्हणून त्यांनीं 'क्रीड'च्या ठरावास विरोध केला आणि त्या वेळेपासून जिनांनीं ताडलें कीं, राजकारणाची गाडी वेगळ्या रूळावरून चालल्यानें आतां आपला काँग्रेसशीं हार्दिक संबंध राहणें अशक्य आहे. त्या वेळेपासून बॅ. जिनांची मुस्लिम लीग एकप्रकारच्या अज्ञातवासांत काळ कंठूं लागली. नवी खिलापत परिषद् अस्तित्वांत येऊन अलीबंधूंचें प्राबल्य वाढलें आणि त्यांच्यापुढें जिनांचें तेज फिकें पडूं लागलें. त्यांच्या या अज्ञातवासाच्या काळांत मुसलमानांचा शिरजोरपणा अतिशय वाढला आणि त्यांच्या दंग्यांना ऊत आला; पण त्यांची जबाबदारी कोणत्याहि प्रकारें बॅ. जिना यांच्यावर लादतां येत नाहीं. अर्थातच बॅ. जिना हे राष्ट्रीयत्वापासून च्युत होऊन जातीयत्वाच्या घसरणीला लागले, असा त्यांच्यावर त्या वेळीं आक्षेप घेण्याला कारण घडलें नाहीं. एवढेंच नव्हे तर, कौन्सिलबहिष्कार ढिला होऊन जेव्हां स्वराज्यपक्ष मध्यवर्ति कौन्सिलांत घुसला आणि तेथें

पंडित मोतीलाल नेहरू यांनीं आपला स्वराज्याच्या मागणीचा ठराव कौन्सिलांत मांडला, त्या वेळीं त्या मागणीला मुसलमानांचा विरोध नसून पूर्ण पाठिंबाच आहे, असें बॅ. जिना यांनीं अधिकाऱ्यांना खडसावून बजावलें. निर्भेळ राष्ट्रीयत्वाच्या भूमिकेवरून केलेलें बॅ. जिनांचें तेंच शेवटचें भाषण होय.

### जिनांचें सशर्त राष्ट्रीयत्व

त्यानंतर काँग्रेसच्या शहाण्या पुढाऱ्यांनीं लखनौ-करार बदलून नवा करार करण्याचा उपद्व्याप सुरू केला आणि नवा करार होण्यापूर्वीच जुना करार रद्द झाल्याची भाषा बोलून मुसलमानांच्या सवत्या सुभ्यावरची जखडबंदी काढून टाकली! त्याबरोबर अरेबियन नाइट्स्‌मधील गोष्टींतला राक्षस करंड्यावरील मोहोरबंद झांकण दूर होतांच, ज्याप्रमाणें बाहेर पडून उग्र रूप धारण करून, आपल्याला बंदिवासांतून सोडविणाऱ्या उपकारकर्त्यालाच खाऊन टाकण्याची भाषा बोलूं लागला, त्याप्रमाणें मुस्लिम लीगचे पुढारी काँग्रेसच्या डोक्यावर मिरीं वाटण्याची भाषा बोलूं लागले. तरी पण बॅ. जिनांनीं आरंभींच कांहीं अगदींच ताळतंत्र सोडलें नाहीं. त्यांचें पहिलें निर्भेळ राष्ट्रीयत्व जाऊन त्याच्या जागीं सशर्त राष्ट्रीयत्व येत चाललें. त्यांनीं प्रथम सात अटी पुढें मांडल्या. काँग्रेसचे पुढारी दूरदर्शी असते, तर त्यांनीं तेवढ्या अटी मान्य करून मुस्लिम लीगला अधिक हातपाय पसरण्यास कायमची बंदी करून टाकली असती; पण त्या संधीचा फायदा न घेतला गेल्यामुळें लीगच्या मागण्या फुगत चालल्या आणि काँग्रेसच्या दुबळ्या लाचारीपणामुळें लीगनें हातपाय पसरण्यासच नव्हे, तर लाथा झाडण्यासहि सुरुवात केली.

### मुसलमानांच्या प्रतिनिधित्वाची मक्तेदारी

गोलमेज परिषदेमुळें लीगला अधिकच बळ चढलें. त्या वेळेपासून मुस्लिम लीग हीच मुसलमानांची एकमेव प्रातिनिधिक संस्था असून इतर कोणत्याहि संस्थेला—राष्ट्रीय म्हणविणाऱ्या काँग्रेसलाहि—मुसलमानांच्या वतीनें बोलण्याचा अथवा प्रतिनिधि पाठविण्याचा अधिकार नाहीं, असा दावा बॅ. जिना यांनीं मांडला आणि तो हट्ट त्यांनीं अगदीं अलीकडच्या सिमला-परिषदेंत पूर्णत्वानें शेवटास नेला. मुसलमानांच्या प्रतिनिधित्वाची मक्तेदारी मुस्लिम लीगकडेच आहे, असा हट्ट धरण्यांत पाकिस्तानाचें बीज गुप्तपणें दडलें होतें. ही मक्तेदारी प्रतिपक्षीयांकडून मान्य करून घेतली जाईपर्यंत बॅ. जिना यांनीं पाकिस्तानच्या मागणीला उघडपणें संमति दर्शविली नव्हती. या बाबतींत बॅ. जिना यांनीं आपलीं पावलें फारच सावधगिरीनें टाकलीं. सर महंमद इकबल यांनीं १९३० मध्येंच पाकिस्तानची योजना मुसलमानांपुढें मांडली होती; परंतु जिनांना आपला पाया अधिक बळकट करावयाचा असल्यामुळें जणूं काय आपण त्या गांवचेच नव्हे असें त्यांनीं भासविलें आणि गोलमेज परिषदेच्या तंत्रांतून 'जातीय निवाडा' मिळवून मुसलमानांचे हात बळकट करून घेतले.

## पाकिस्तानाची मुहूर्तमेढ

गोलमेज परिषदेनंतरच्या १९३५ च्या कायद्यानें मुसलमानांना प्रमाणातीत प्रतिनिधित्व दिलें असलें, तरी अखंड हिंदुस्थानाचें एकसंधि संघराज्य बनावें अशी योजना त्यांत होती. ही संघराज्याची योजना म्हणजे पाकिस्तानाच्या मुळावरच घाव घालणारी होती. अशी ही योजना मध्यवर्ति कायदेमंडळांत मंजूर झाली असती, तर संघराज्याच्या इष्टतेवर राष्ट्राचें शिक्कामोर्तब केलें गेलें असतें. हें टाळण्यासाठीं बॅ. जिना यांनीं संघराज्याची योजना तेवढी अमान्य करणारा आणि जातीय निवाडा व प्रांतिक स्वायत्तता मान्य करणारा एक कुटिल ठराव असेंब्लीपुढें मांडला. लग्न करण्याची अट अमान्य करावयाची आणि ठरलेला हुंडा तेवढा पदरांत टाका म्हणावयाचें, अशाच स्वरूपाचा हा ठराव होता. खऱ्या दूरदर्शी मुत्सद्द्यानें यांतलें इंगित जाणून तो तात्काळ झिडकारला असता; परंतु काँग्रेसपक्ष त्या वेळीं इतका बेहोष अंध झाला होता कीं, त्यानें भावी परिणामाकडे तिळमात्र लक्ष न देतां हा ठराव मान्य करून घेण्याच्या कामीं जिनांच्या हातास हात लावला ! जिनांनीं तो डाव जिंकला व त्या वेळींच पाकिस्तानाची मुहूर्तमेढ रोवली गेली; मात्र काँग्रेसवाले आपल्या भ्रमांतच गिरक्या घेत राहिले होते; त्यांना जिनांच्या ठरावांतला हेतु उमगलाच नाहीं.

## आधीं दूध पाजून नंतर डिवचण्याचें वेडेपण

१९२६ पासून १९३७ पर्यंत जिनांची मनधरणी करून काँग्रेसनें मुस्लिम लीगचे हात बळकट केले. मृतप्राय सर्पाला आपल्याच हातानें दूध पाजून कडकडून चावण्यास समर्थ केल्यानंतर शहाण्या माणसानें निदान त्याला डिवचण्याचें तरी धाडस करूं नये. परंतु काँग्रेसच्या धोरणाचा सगळाच उलटा प्रकार झाला. ज्या वेळीं मुस्लिम लीग चिरडून टाकतां आली असती त्या वेळीं तिची मनधरणी करून तिला नसती प्रतिष्ठा मिळवून देण्यांत आली; आणि तीच लीग सायुध व समर्थ बनल्यानंतर तिला खिजविण्याचा व लाथाडण्याचा प्रकार सुरू झाला ! १९३७ च्या निवडणुकीनंतर काँग्रेसनें थोडेसें नमतें घेऊन सर्वपक्षीय मंत्रिमंडळें बनविलीं असतीं, तर त्यानंतरच्या किती तरी घोर आपत्ति टळल्या असत्या. ती संधि हातची गेली तरी जिनांचें बस्तान अद्यापि सर्व प्रांतांत बसलें नव्हतें आणि काँग्रेसनें सरकारशीं असहकार करून मंत्रिमंडळाचे राजिनामे देण्याची घिसाडघाई केली नसती, तर काँग्रेसला ब्रिटिश सरकारावरचें आपलें वजन अद्याप कायम राखतां आलें असतें. दुर्दैवानें काँग्रेसनें मंत्रिमंडळें सोडून दिलीं आणि बॅ. जिनांनीं मुसलमानांची जणूं काय एका मोठ्या संकटांतून सुटका झाल्याचा आव आणून सर्वत्र 'मुक्तता-दिन' साजरा करण्याचें फर्मान सोडलें. या फर्मानानें जिनांनीं आपल्या सामर्थ्याचा आढावा घेतला. त्या आढाव्यांत त्यांना सरहद्दप्रांत, पंजाब, बंगाल व सिंध इतक्या प्रांतांत आपला जम नीट बसला नाहीं असें दिसून आलें. हा जम नीट बसवून आपलें सामर्थ्य कल्पनातीत वाढविण्या-

साठीं मुस्लिम लीगनें लाहोरच्या बैठकींत पाकिस्तानच्या सवत्या सुभ्याचा उघड व स्पष्ट ठराव संमत केला आणि लीग पाकिस्तान मिळवून देणार असल्यानें अखिल मुसलमानांनीं तिच्या झेंड्याखालीं येऊन तिचे हात बळकट करावे आणि स्वतंत्र इस्लामी राज्याच्या स्थापनेला साहाय्य करावें असा आदेश देण्यांत आला.

**डायरेक्ट ॲक्शनचा ठराव केला**

याच वेळीं हिंदूंच्या दुर्दैवानें तिकडे पंजाबांतले हिंदूंचे पुरस्कर्ते निधन पावले आणि इकडे राजगोपाळाचार्यांसारख्या कॉंग्रेसच्या एका नामवंत पुढाऱ्यानें बॅ. जिनांशीं पाकिस्तानच्या वाटाघाटी सुरू केल्या. गांधींनींहि आपलीं पूर्वीचीं वचनें धाब्यावर बसवून जिनांची मागणी तत्त्वतः मान्य केली. तपशिलाबाबत मतभेद झाल्यामुळें त्या वाटाघाटी फिसकटल्या; तरी गांधीजींचा तत्त्वतः विरोध नाहीं, एवढा आधार हातीं पडतांच, बॅ. जिना यांनीं ब्रिटिश मुत्सद्द्यांशीं संधान बांधलें. त्यानंतरच्या सगळ्या वाटाघाटींच्या गोंधळाचा पाढा वाचण्याची जरुरी नाहीं. बॅ. जिनांनीं कॉंग्रेसच्या विरोधाचें पाणी जोखलेंच होतें. त्याबरोबरच कसेंहि करून आपण या चक्रव्यूहांतून पार पडावें अशी मजूर-मंत्रिमंडळाची आतुरताहि त्यांच्या पथ्यावर पडली आणि कॅबिनेट मिशनची योजना कॉंग्रेसच्या श्रेष्ठींनीं लाथाडल्याचें निमित्त पुढें करून मुस्लिम लीगच्या कौन्सिलनें दिनांक २३ जुलै १९४६ या दिवशीं आपला प्रत्यक्ष प्रतिकाराचा (direct action) ठराव संमत केला. त्या ठरावावरील बॅ. जिनांचें भाषण हें त्यांचें या लढ्यांतल्या वाटाघाटींतलें अगदीं अखेरचें भाषण होय. त्या भाषणांत त्यांनीं अत्याचाराची उघड उघड धमकी दिली. अशा रीतीनें १९०६ सालीं मुस्लिम लीगच्या स्थापनेचा निषेध करणारे बॅ. जिना, १९२४ सालीं असेंब्लींत स्वराज्याच्या मागणीच्या ठरावाला अनुमोदन देणारे बॅ. जिना, लीगच्या १४ मागण्या मिळाल्यास अखंड हिंदुस्थानाच्या स्वराज्याला संमति देणारे बॅ. जिना, शेवटीं अत्याचारी चळवळींत जिचें पर्यवसान हटकून होणार अशा 'डायरेक्ट ॲक्शन'ला चिथावणी देणारे बनले! यांत त्यांच्या स्वतःच्या स्वभावाचा दोष किती, परिस्थितीकडे दोष किती, त्यांच्या प्रतिपक्षाकडे दोष किती आणि मुसलमानांचे गैरवाजवी लाड करणाऱ्या ब्रिटिश सत्ताधाऱ्यांकडे दोष किती, याची हिस्सेरशी ठरविणें दुर्घट आहे; परंतु सगळाच दोष परिस्थितीवर ढकलून बॅ. जिना हे अगदींच निर्दोष ठरतील असें आम्हांस वाटत नाहीं.

प्रारंभीं दादाभाई नौरोजी, मेथा, गोखले इत्यादिकांच्या संगतीमुळें ते पूर्ण राष्ट्रीय वृत्तीचे पुढारी म्हणून मिरवत होते हें खरें; तथापि जन्मतःच ते अत्यंत अहंमन्य व दुराग्रही होते. भगवद्गीतेंत 'इदमद्य मया लब्धमिमं प्राप्स्ये मनोरथं' येथपासून तों 'कोऽन्योऽस्ति सदृशो मया' येथपर्यंतच्या श्लोकांत आसुरी वृत्तीचें वर्णन केलें आहे, त्या वृत्तीच्या छटा बॅ. जिना यांच्या स्वभावांत दृग्गोचर होतच

होत्या. त्यांना जेथें तेथें पहिलें स्थान पटकावण्याची महत्त्वाकांक्षा होती आणि ती महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्यासाठीं ते कसल्याहि सूक्तासूक्त मार्गांचें अवलंबन करण्यास डरत नसत. दि. २३ जुलै १९४६ च्या लीग कौन्सिलच्या 'डायरेक्ट ॲक्शन'च्या ठरावामुळें ठिकठिकाणीं अत्याचार होतील हें त्यांना कळत नव्हतें असें नाहीं; पण त्यांनीं तिकडे जाणूनबुजून कानाडोळा केला आणि एका शब्दानेंहि अत्याचाराचा निषेध केला नाहीं. किंबहुना अत्याचार घडले म्हणजे ती परिस्थिति गांधीजींना असह्य होऊन पाकिस्तान आपल्या पदरांत पडेल असा कयास त्यांनीं बांधला होता व तोच त्यांचा कयास खरा ठरला.

### बुद्धिर्यस्य बलं तस्य

सारांश, बॅ. जिना हे चाणक्यासारखे अतिखोल बुद्धीचे कारस्थानी असून, आपला डाव साधतांना किती अनर्थापात होईल याची त्यांनीं चाणक्यांप्रमाणेंच पर्वा केली नाहीं. चाणक्याप्रमाणेंच त्यांनीं आपल्या प्रतिस्पर्ध्यांना हतबुद्ध केलें आणि त्यांच्या घोडचुकांचा नेमका फायदा घेऊन आपलें पाकिस्तानाचें मनोराज्य खरें करून दाखविलें. चाणक्याजवळ प्रारंभीं स्वतःच्या बुद्धिबलाशिवाय इतर कोणतेंहि साधन नव्हतें. बॅ. जिना यांनींहि आपल्या लीगच्या कार्याचा प्रारंभ साधनावांचूनच केला; परंतु जादूगारानें ज्याप्रमाणें रिकाम्या पेटींतून वाटेल त्या जिनसा भराभर बाहेर काढून दाखवाव्या, त्याप्रमाणें बॅ. जिना यांनीं शून्यांतून पांच कोटि प्रजाजनांचें पाकिस्तानी राज्य निर्माण केलें आणि तिचे ते पहिले गव्हर्नर-जनरल झाले. यांत त्यांनीं 'बुद्धिर्यस्य बलं तस्य निर्बुद्धेस्तु कुतो बलं' हाच सिद्धान्त खरा करून दाखविला. बॅ. जिनांच्या हट्टी महत्त्वाकांक्षेमुळें जे घोर अनर्थापात या देशांत घडले त्यांच्याविषयींची चीड विसरून जाऊन त्यांच्या बुद्धीचें कौतुक करणें हें, आपल्या वाड्यांतले दागिने हातोहात लांबविले गेले असतां त्यांची पर्वा न करतां, शर्विलकाच्या कौशल्याची तारीफ करणाऱ्या चारुदत्ताचें अनुकरण करण्यासारखेंच हास्यास्पद वाटेल, पण त्यास इलाज नाहीं. जोंपर्यंत आपल्या पुढाऱ्यांची चारुदत्ती वृत्ति सुधारत नाहीं, तोंपर्यंत असे प्रकार घडावयाचेच. जेथें आपलाच दाम खोटा तेथें बॅ. जिनांना दोष देण्यांत अर्थ काय ?

## भालाकार भोपटकर गेले : : : : : १

हिंदुमहासभेचे अध्यक्ष श्री. अण्णासाहेब भोपटकर यांचे वडील बंधु श्री. **भास्कर बळवंत ऊर्फ भाऊसाहेब भोपटकर** यांस अर्धांगवायूच्या झटक्यानें सोमवार दि. २७ ला पहाटे देवाज्ञा झाली, हें वृत्त कळविण्यास आम्हांस अत्यंत दुःख होत आहे. यमराजानें पुण्यांतील मागील पिढींतील एकेक पुढारी खलास करण्याचा जणूं काय झपाटाच चालविला आहे. तात्यासाहेब केळकर गेले, काकासाहेब खाडिलकर गेले आणि आतां भाऊसाहेब भोपटकरहि गेले. सन १९०५ ते १९१० या पंच-वार्षिक कालावधींत हे तिघेहि खंदे लेखक अनुक्रमें मराठा, केसरी आणि भाला या तीन पत्रांतून महाराष्ट्रांतील राजकारण गाजवीत होते आणि या तिघांच्या तडा-ख्यांनीं त्या वेळच्या सरकारला ' दे माय धरणी ठाय ' असें होऊन गेलें होतें.

पण तें सरकारहि कांहीं कमी हरहुन्नरी नव्हतें. त्या वेळच्या सरकारनें प्रथम भालाकार भोपटकरांच्यावर राजद्रोहाच्या खटल्याचा पाश टाकून त्यांची जखडबंदी केली; नवा प्रेस ॲक्ट करून काकासाहेब खाडिलकर व केसरी यांची ताटातूट केली आणि मराठा पत्राचे संपादक तात्यासाहेब केळकर यांना हायकोर्टाच्या बदनामीच्या पेंचांत पकडून हतप्रभ केलें.

भाला पत्रांतील ज्या लेखावरून सरकारनें भाऊसाहेब भोपटकर यांना बंदि-वासांत रखडावयास लावलें, तो ' नरकांतला दरबार ' या मथळयाखालील लेख, आजच्या काळांत वाचकांनीं वाचल्यास त्यांत त्या वेळच्या विद्यमान सरकारच्या विरुद्ध राजद्रोह पसरविणारा मजकूर, शोधून काढूनहि आढळणार नाहीं. त्या लेखांत ब्रिटिश राजनीतीची प्रच्छन्न निंदा होती व त्या राज-नीतीचें प्रतीक म्हणून लॉर्ड क्लाइव्हचें चित्र रंगविलें होतें. परंतु कायदा करणारें सरकार आणि त्याचा अर्थ करणारें सरकार एकच असल्यानें कायद्यांतील कलमांचा ओढूनताणून अर्थ लावून शिक्षा ठोठावण्याचें सत्र त्या वेळीं चाललें होतें व त्या सत्रांत भाऊसाहेब भोपटकर हे बळी पडले.

राजद्रोहाच्या नांवावर झालेली शिक्षा भोगून बाहेर आल्यावर श्री. भाऊ-साहेबांनीं पुनश्च भाला हातीं घेतला खरा, परंतु सरकारच्या दडपशाहीच्या वाढत्या दडपणामुळें त्यांना भाला हातांतून खालीं ठेवावा लागला. भाला पत्र बंद झाल्यावर भाऊसाहेबांचें सर्व लक्ष त्यांच्या लॉ क्लासानें वेधून घेतलें. या कामांत त्यांनीं मोठा लौकिक संपादन केला, हें मुंबई इलाखाभर पसरलेल्या त्यांच्या शिष्यवर्गांतील वकिलांच्या संख्येवरून सिद्ध होत आहे.

( सह्याद्रि, जानेवारी १९४९ )

JAN 1944

शस्त्रसंन्यासाबरोबर माणसाच्या विचारांतहि संन्यासाची छटा येते कीं काय न कळे. पण भाऊसाहेबांच्या बाबतींत तर तसा अनुभव आला. त्यांच्या हातचा पहिला भाला गळून पडल्यावर त्यांच्या राजकीय व सामाजिक विचारांतहि स्थित्यंतर घडून आलें. स्वदेशी चळवळींत भांडवलवाल्या गुजराथी कारखानदारांनीं स्वदेशीच्या भक्तांस कसें नागविलें तें पाहून त्यांची स्वदेशीची ऊर्मीहि थंडावली. अशाच कांहीं इतर अनुभवानें त्यांचे सामाजिक क्रान्तीचे विचारहि बदलले आणि त्यांनीं दुसऱ्यांदा जो भाला हातीं घेतला तो सरकारला खुपण्याऐवजीं इतरांनाच खुपूं लागला. अस्पृश्यतानिवारणाचे आद्य पुरस्कर्ते भालाकार सनातनी पक्षाचे पुढारी गणले जाऊं लागले हा एक आधुनिक हिंदु समाजांतला चमत्कारच होय.

गांधीजींच्या असहकारितेच्या लाटेबरोबर वाहून न जातां भाऊसाहेबांनीं मोठ्या धैर्यानें त्या लाटेस विरोध केला आणि विद्यार्थ्यांनीं 'शिक्षण-संस्थांवर बहिष्कार घालून आपल्या आयुष्याची माती करूं नये' असें उघड प्रतिपादन करून हुल्लडबाज़ांचा रोषहि त्यांनीं स्वतःवर ओढून घेतला. गांधीजींच्या कार्यक्रमावर कडक टीका केल्याबद्दल त्यांच्याविरुद्ध शेंकडों सभांतून निषेधदर्शक ठरावांचा हल्ला चढविण्यांत आला; पण ते कशानेंहि डगमगले नाहींत. वास्तविक पाहतां हा सगळाच प्रकार 'साप साप म्हणून भुई धोपटण्या'सारखाच होता. भाऊसाहेब बोलले काय याची चिकित्सा न करतां केवळ टूम म्हणून निषेधाचे ठराव केले जात होते आणि भाऊसाहेब हे मौजेनें त्यांचा स्वीकार करीत होते !

अलीकडे शक्ति क्षीण झाल्यामुळें त्यांच्या बहुतेक सर्व सार्वजनिक चळवळींना आळा बसला होता; परंतु आपल्या ऐन उमेदीच्या दिवसांत त्यांनीं खंदे लेखक आणि प्रभावी वक्ते म्हणून मोठें नांव मिळविलें होतें. भालाकारांची भाषा ही एक कौतुकास्पद चीज झाली होती. परंतु प्रवाहाबरोबर वाहत जाऊन अग्रभागीं राहण्याचा स्वार्थसाधूपणा त्यांना संमत नव्हता आणि हरघडी उठणाऱ्या नव्या विचित्र लाटांना थोपवून धरण्याचा जोमहि त्यांच्या अंगीं वयपरत्वें राहिला नव्हता; त्यामुळें ते अलीकडे आपल्या समाजाच्या भवितव्यतेविषयीं निराशेनें पछाडलेले असे दिसत असत. त्यांतून गांधीवधाचें निमित्त पुढें करून महाराष्ट्रांत जे अनन्वित अत्याचार करण्यांत आले त्यांनीं त्यांच्या मनाला मोठा धक्का बसला व त्या वेळेपासून त्यांची प्रकृति ढासळत गेली. अखेरीस सुमारें पंधरा दिवसांपूर्वी त्यांना अर्धांगाचा झटका येऊन त्यांतच त्यांचा दि. २७ ला अंत झाला.

अत्यंत तीव्र बुद्धिमत्ता, अमोघ वक्तृत्व, खोचदार लेखनशैली, जाज्वल्य देशाभिमान आणि बेडर वृत्ति इतके गुण एकत्र असून देखील आरंभापासून अखेरपर्यंत प्रतिकूल परिस्थितीशीं झगडावें लागल्यानें भाऊसाहेब भोपटकर यांच्या गुणांचें समाजांत जसें चीज व्हावें तसें झालें नाहीं याबद्दल खेद वाटतो.

# संकीर्ण विभाग

## बृहन्महाराष्ट्र परिषद् : : : : : : १

[ बृहन्महाराष्ट्र परिषदेच्या पहिल्याच अधिवेशनाचें अध्यक्षस्थान स्वीकारण्याचा सुयोग मला लाभला. आतां बृहन्महाराष्ट्र परिषदेच्या कार्याचें बीज चांगलें रुजून त्यांतून निघालेल्या वृक्षाचा विस्तारहि होत आहे. पण प्रारंभीं त्या चळवळीची रूपरेषाहि निश्चित झाली नव्हती अशा पहिल्याच परिषदेंतलें हें भाषण आहे. अर्थातच महाराष्ट्राबाहेर ज्यांना वास्तव्य करावें लागतें अशा महाराष्ट्रियांनीं संघटना कां व कशी करावी, मातृभाषेशीं फारकत न होण्याला उपाय कोणता योजावा, परप्रांतीयांशीं कसें वागावें, महाराष्ट्रियांची सुस्थिति कशी राहील आणि त्यांच्याविषयीं परप्रांतीयांना आदर कसा वाटेल इत्यादि विषयांसंबंधानें या भाषणांत प्रास्ताविक असे विचार मांडले आहेत. त्या वेळीं आंखलेल्या धोरणाला अनुसरून बृहन्महाराष्ट्र परिषदेचें कार्य पंचवीस वर्षें चालून ही चळवळ सुप्रतिष्ठित झाली. आणि सद्यःस्थितींत परप्रांतीय महाराष्ट्रियांना त्या संघटनेचा हरघडी हरएक कामांत उपयोग होत आहे हें पाहून समाधान वाटतें. ]

झांशी येथें ता. ३ व ४ मार्च रोजीं बृहन्महाराष्ट्र परिषदेस सुरुवात झाली त्या वेळीं श्री. **जनार्दन सखाराम करंदीकर** यांनीं अध्यक्ष या नात्यानें भाषण केलें त्याचा आशय असा :–

( केसरी, दि. ६ एप्रिल १९२६ )

बृहन्महाराष्ट्र परिषदेच्या पहिल्याच अधिवेशनाचें अध्यक्षस्थान मला देऊन आपण जो माझा कल्पनातीत बहुमान केला त्याबद्दल मी आपला अत्यंत आभारी आहें. बृहन्महाराष्ट्र परिषदेच्या प्रथमाधिवेशनाच्या दिवशींच रायगडावर श्रीशिव-छत्रपतींच्या समाधीच्या जीर्णोद्धाराचें कार्य महाराष्ट्रियांच्या हातून पूर्णतेस जात आहे हा योगायोग अपूर्व होय. 'महाराष्ट्रधर्म राहिला कांहीं। तुम्हांकारणें' अशी श्रीरामदासांनीं ज्यांची महती वर्णिली त्या महाराष्ट्रवीराच्या पराक्रमामुळेंच महाराष्ट्रीय प्रथम नर्मदा ओलांडून उत्तर-हिंदुस्थानांत निर्भय संचार करूं लागले. अर्थातच महाराष्ट्राबाहेर महाराष्ट्रियांच्या संचारास प्रारंभ ज्या शिवाजीमहाराजांच्या कारकीर्दींत झाला त्या शिवाजीमहाराजांच्या समाधीच्या जीर्णोद्धाराच्या दिवशीं महाराष्ट्रियांनींहि स्वोद्धाराच्या प्रयत्नाचें बीजारोपण करावें हें युक्तच आहे.

## महाराष्ट्र व संयुक्त प्रांत

आर्यांचें मूल वसतिस्थान कोठेंहि असो, हिंदुस्थानांत तरी सिंधू, सरस्वती, गंगा, यमुना, नर्मदा इत्यादि पवित्र नद्यांच्या कांठचा प्रदेश हेंच आर्यांचें मूलस्थान होय. येथूनच आर्यलोक दक्षिणेंत गेले. अर्थातच संयुक्त प्रांत हा महाराष्ट्रियांना परकीय प्रांत नसून तें त्यांचें पहिलें घरच आहे. पण कालाचा महिमा अगाध असल्यानें आज याच आपल्या मूळच्या घरांत महाराष्ट्रीय यजमान म्हणून न राहतां पाहुणे म्हणून नांदत आहेत!

महाराष्ट्रीय व संयुक्त प्रांतीय यांच्या आचारांत, विचारांत, ध्येयांत व ध्येय-सिद्धीच्या मार्गांत बरेंच साम्य आहे असें वाटतें; आणि त्यामुळेंच जे महाराष्ट्रीय संयुक्त प्रांतांत स्थायिक झाले आहेत त्यांना येथें तितका परकेपणा वाटत नसावा असें अनुमान आहे. महाराष्ट्राबाहेर महाराष्ट्रियांची जी वस्ती आहे तींत मराठी भाषा बोलणारांची सर्वांत जास्त संख्या बडोदें संस्थानांत आहे. सेंट्रल इंडिया एजन्सींतलीं सर्व संस्थानें एकत्र केल्यास तेथील मराठी भाषा बोलणारांची संख्या बडोदें संस्थानांतल्याहूनहि अधिक भरते; परंतु संस्थानिकांचा मुलूख सोडून ब्रिटिश हद्दींत शोधूं गेल्यास संयुक्त प्रांतांतच अधिक महाराष्ट्रीय आढळतात.

उत्तर-हिंदुस्थानांत मराठी भाषा बोलणारे लोक किती आहेत त्याची शिरगणती पाहिल्यास सेंट्रल इंडिया एजन्सी ६५९१३, बडोदें ३६१४५, संयुक्त प्रांत ६०२९, बंगाल २४०३, राजपुताना २०२८, आसाम १३९६, बिहार १०४९, बलुचिस्थान ७९६, पंजाब ७५६, अजमीर ६८८, सरहद्दप्रांत २१० आणि इतर ६७१ मिळून ११८०८४ लोकसंख्या भरते. एकंदर हिंदुस्थानांत सबंध पारशी जातीची जी लोकसंख्या आहे तिच्यापेक्षां ही महाराष्ट्रियांची संख्या जास्त आहे. याखेरीज कित्येक महाराष्ट्रीय असे असतील कीं, ज्यांना मराठी भाषा बोलतां किंवा लिहितां येत नसेल, तरी पण ते आचार-विचारानें महाराष्ट्रीय असतील. अशा महाराष्ट्रियांचाहि या परिषदेंत समावेश होणें युक्त असून, ही सर्व संख्या लक्षांत

घेतां नर्मदोत्तर प्रांतांत सव्वा लक्षापासून दीड लक्षापर्यंत महाराष्ट्रीय आहेत असें मानण्यास बिलकूल हरकत नाहीं.

### मराठा तितुका मेळवावा

महाराष्ट्रियांच्या संघटनेची आवश्यकता काय, अशी शंका कित्येकांकडून पुढें येते, तिचा विचार प्रथम केला पाहिजे. या शंकेवर पहिलें उत्तर असें कीं, हा स्वभावधर्म आहे. ही नैसर्गिक प्रवृत्ति असून ती नाहींशी करूं म्हटल्यानेंहि नाहींशी होत नाहीं. स्कॉटिश गृहस्थ पृथ्वीच्या पाठीवर कोठेंहि असला, तरी आपण स्कॉचमन आहों हें तो केव्हांहि विसरत नाहीं आणि सेंट अँड्र्यूजच्या पुण्यतिथीला ठिकठिकाणचे स्कॉच हटकून एकत्र जमतात. आयरिश लोकांचीहि भावना तितकीच तीव्र असते. एकत्र जमून सेंट पॅट्रिक-डे साजरा करण्यांत आयरिश लोकांकडून केव्हांहि हयगय होत नाहीं. बहुसंख्य लोकांनीं अल्पसंख्याकांना आपणांत सामील करून घेतलें, तर अल्पसंख्याकांना सवता सुभा उभारण्याची जरुरी राहत नाहीं; परंतु बहुसंख्य अल्पसंख्याकाला परकी मानूं लागला, तर स्वाभाविकपणेंच त्या अल्पसंख्य समाजाला आत्मसंरक्षणार्थ संघटन करण्याची बुद्धि होते. उत्तर-हिंदुस्थानांतील कोट्यवधि लोकसंख्येंत मूठभर महाराष्ट्रीय अलग राहिले असल्यास तो त्यांचा दोष नसून, इतर समाजांनीं त्यांस आत्मीय भावनेनें आपल्यांत समाविष्ट करून घेतलें नाहीं याचा तो नैसर्गिक परिणाम मानला पाहिजे.

महाराष्ट्रियांच्या संबंधानें इतरांच्या कल्पना कांहींहि असोत; स्वतः महाराष्ट्रियांना आपलें स्वतःचें असें कांहीं वैशिष्ट्य आहे असें वाटतें आणि त्याची परंपरा अखंड राखण्याची महत्त्वाकांक्षाहि त्यांच्या हृदयांत सतत वास करीत असते, म्हणून ते इतर समाजापासून अलग राहतात असें मानलें, तरी त्यांत कांहीं मोठासा दोष पदरीं येऊं शकत नाहीं. ज्या समाजाला अहंभावयुक्त महत्त्वाकांक्षा नाहीं तो समाज दीर्घकालपर्यंत टिकणार नाहीं व त्यानें टिकावयाचें तरी कशाला ? प्रत्येक समाजाला जगांत आपलें कांहीं तरी विशिष्ट कार्य ( मिशन ) आहे असें त्याची मनोदेवता त्यास सांगत असते. हें कार्य जितकें व्यापक व राष्ट्रोद्धारक असेल तितका त्या समाजाचा दर्जा उच्च ठरतो. महाराष्ट्रियांनाहि असेंच कांहीं राष्ट्रोद्धारक कार्य आपल्याला करावयाचें आहे अशी अंतःस्फूर्ति सांगत असते. आणि महाराष्ट्राचा गेल्या तीनशें वर्षांचा इतिहास पाहिल्यास ही अंतःकरणप्रवृत्ति निराधार नाहीं असें दिसून येईल.

### महाराष्ट्राची कामगिरी

तीर्थक्षेत्रें मोडिलीं । ब्राह्मणस्थानें भ्रष्ट झालीं ।
सकळ पृथ्वी आंदोळली । धर्म गेला ॥

अशी स्थिति प्राप्त झाली असतां महाराष्ट्रानेंच यावनी सत्तेस पहिला प्रचंड धक्का दिला आणि अखेरीस दिल्ली-अटकेपर्यंत आपला भगवा झेंडा फडकवून मुसल-

मानी सत्ता रसातळास पोंचविली. आधुनिक काळांतहि कै. **न्यायमूर्ति रानडे** यांनीं सार्वजनिक चळवळीचें बीजारोपण केलें आणि राष्ट्रसूत्रधार **लो. टिळकांनीं** त्यास इष्ट वळण लावलें. सर व्हॅलेंटाईन चिरोलसारखे हिंदद्वेष्टे कुत्सित बुद्धीनें कां होईना पण टिळकांना "फादर ऑफ इंडियन अनरेस्ट" ( हिंदुस्थानांतील असंतोषाचे जनक ) असें म्हणतात तें कांहीं उगीच वायफळ नव्हे. महाराष्ट्राची ही परंपरा अद्यापिहि अभंग आहे आणि त्याचकरितां कोठें गेला तरी महाराष्ट्रीय हा सरकारच्या डोळ्यांत कुसळासारखा खुपतो !

महाराष्ट्रीय समाज भावनाप्रधान नसून व्यवहारचतुर आहे. त्याचा स्वाभिमान सदैव जागृत असतो. प्रतिपक्षाच्या शक्तीच्या देखाव्यानें तो दबून जात नाहीं. त्यास तोंडदेखली स्तुति करण्याची मुळींच संवय नाहीं. याच कारणामुळें सरकारची त्याजवर करडी नजर असून होतां होईतों सरकार त्यास आपल्या अंतरंगांत घेण्याचें टाळतें.

### महाराष्ट्रियांची आजची स्थिति

महाराष्ट्रियांची पूर्वपरंपरा कितीहि उज्ज्वल असो, सांप्रत काळीं महाराष्ट्रियांची स्थिति कशी आहे व ती कशी सुधारावयाची याचा विचार आपणांस मुख्यतः कर्तव्य आहे. हा विचार करतांना महाराष्ट्राबाहेरच्या महाराष्ट्रियांची स्थितीच मुख्यतः लक्षांत घेतली पाहिजे. कारण खुद्द महाराष्ट्र हें महाराष्ट्रियांचें घरच असल्यानें कशाहि स्थितींत तेथें ते मूळ धरून राहतीलच; परंतु ज्या ज्या परप्रांतांत महाराष्ट्रियांची वस्ती आहे तेथें त्यांची स्थिति खालावत चालली आहे का भरभराटली आहे याचा छडा लावून ती स्थिति खालावत असल्याचें दिसून आल्यास ती सुधारण्याचें उपायचिंतन चालविलें पाहिजे. या शंकेचें निश्चित उत्तर देतां यावें म्हणून तर ही परिषद् भरली आहे, आणि महाराष्ट्रियांची जंत्री तयार करण्याचा विचार या परिषदेंत मुक्रर केला जाणार आहे. अर्थातच तशी जंत्री तयार झाल्यावर या प्रश्नांचें निस्संदिग्ध उत्तर मिळूं शकेल; पण तत्पूर्वी आपणांस अनुमानधपक्यावरच अवलंबून राहिलें पाहिजे.

महाराष्ट्रियांच्या अंगचे उपजत गुण म्हणून जें मीं वर वर्णन केलें तें गुणच अशा स्वरूपाचे आहेत कीं, महाराष्ट्रीय समाज कोठेंहि गेला तरी आपलेपण सोडणार नाहीं व नामशेषहि होणार नाहीं. त्याचबरोबर तो कोठेंहि मोठ्या भरभराटीच्या शिखरावर चढेल असेंहि नाहीं. त्याच्या अंगचा चिवटपणा हा जसा त्याला संकटांतून तारण्याला उपयोगी पडतो, त्याचप्रमाणें त्याचा स्वाभिमानमूलक तुटकपणा त्याला वैभवगिरीवर चढूं देत नाहीं. अर्थातच महाराष्ट्रियांची जंत्री तयार झाली तरी तीवरून असेंच दिसून येईल कीं, जेथें जेथें स्वाभिमानाला धक्का न लागतां उत्कर्षाचा मार्ग मोकळा सांपडला तेथें महाराष्ट्रीय उन्नतीला चढले आहेत.

पण ज्या ठिकाणीं स्वाभिमान व संपत्ति यांचा परस्परविरोध आला तेथें महाराष्ट्रियांनीं निष्कांचनत्व पत्करूनहि आपलेपणा राखला आहे.

### संघटनेची दिशा

हिंदुसभेच्या संघटनेची दिशा दाखविण्याकरितां पंडित मदन मोहन मालवीयजी यांनीं कांहीं सूत्रबद्ध कविता केल्या आहेत; त्याच आपणांसहि मार्गदर्शक होणार असल्यामुळें त्या येथें उद्धृत करतों.

ग्रामे ग्रामे सभा कार्या । ग्रामे ग्रामे कथा शुभा ॥
पाठशाला मल्लशाला । प्रतिपर्वमहोत्सवः ॥
अनाथा विधवा रक्ष्या । मन्दिराणि तथा च गौः ॥
धर्म्यं संघटनं कृत्वा । देयं दानं च तद्धितम् ॥

हिंदुधर्माच्या संरक्षणाकरितां धर्म्य संघटनेचा हा जो उपाय सांगितलेला आहे तोच थोड्याशा पाठभेदानें महाराष्ट्रियांच्या समाजसंघटनेसहि लागू पडूं शकेल. जेथें जेथें महाराष्ट्रियांचीं निदान २०–२५ कुटुंबें असतील तेथें तेथें महाराष्ट्र-समाज, समिति अगर मंडळ यांतून कोणत्याहि नांवाची एक संस्था असावी व त्या संस्थेंत महाराष्ट्रियांनीं एकत्र जमून आपल्या परिस्थितीचा विचार करण्याचा परिपाठ ठेवावा. महाराष्ट्रीय समाज मराठी भाषेला अगदींच पारखा होऊं नये, त्याला व्यवहारापुरतें आणि धार्मिक ग्रंथ वाचण्यापुरतें मराठी भाषेचें ज्ञान अवश्य असावें; याकरितां जेथें १५–२० मुलें जमूं शकतील तेथें मराठी भाषा शिकविण्याचा एक वर्ग काढावा. **'देश तसा वेष'** या म्हणीप्रमाणेंच **'पेषा तशी भाषा'** हाहि न्याय मान्य केला पाहिजे. ज्या प्रांतांत आपण राहत असाल त्या प्रांतांतला व्यवहार बिनचूक करतां यावा म्हणून तुमच्या मुलांचें शिक्षण प्रांतिक भाषेंतूनच इतरांच्याबरोबर व्हावें; परंतु महाराष्ट्रधर्माचें मर्म कळण्याकरितां व तें अंगांत बाणण्याकरितां कित्येक मराठी ग्रंथांचा परिचय प्रत्येक महाराष्ट्रियास असणें अगत्याचें आहे व तेवढ्याकरितांच मराठी भाषेचें अध्ययन अवश्य आहे. हें शिक्षण अगदीं सुलभतेनें व बिनखर्चानें आपणांस देतां-घेतां येईल. हें साधण्यासाठीं ही कामगिरी आपण स्त्रीवर्गाकडे सोंपवून द्यावी.

मालवीयजींचें दुसरें सूत्र **'मल्लशाला'** स्थापण्याविषयींचें आहे. यांत महाराष्ट्रियांना वेगळें असें कांहीं करावयाला नको. शरीरबलसंवर्धन हें सर्वच हिंदूंना आतां अपरिहार्य झालें आहे. यास्तव महाराष्ट्रियांनीं त्याकडे दुर्लक्ष न करतां त्याची जोपासना करावी; एवढेंच नव्हे तर शक्य असेल तेथें या कामीं स्वतः पुढाकार घ्यावा.

### महाराष्ट्रियांचे उत्सव

तिसरें सूत्र **'प्रतिपर्वमहोत्सवः'** असें आहे. हिंदुमात्राकडून रामनवमी, गोकुळाष्टमी, दसरा, दिपवाळी, संक्रान्त इत्यादि उत्सव पाळले जाताताच; परंतु महाराष्ट्रियांनीं आपले स्वतःचे म्हणून कांहीं विशिष्ट उत्सव पाळणें हें त्यांचें कर्तव्य आहे. **महाराष्ट्रधर्माचे** प्रणेते **रामदासस्वामी** यांची पुण्यतिथि ( माघ कृ. ९ – उत्तर

JAN 19

हिंदुस्थानांतील पद्धतीप्रमाणें फाल्गुन कृ. ९), हिंदवी स्वराज्यसंस्थापक **शिवाजीमहाराज** यांची जन्मतिथि (फाल्गुन कृ. ३ – उत्तर-हिंदुस्थानी पद्धतीने चैत्र कृ. ३) आणि महाराष्ट्रांतील आधुनिक चळवळींचे व स्वराज्यसंघाचे उत्पादक **कै. लोकमान्य टिळक** यांची पुण्यतिथि (इंग्रजी पद्धतीनें ता. १ ऑगस्ट किंवा पौर्णिमान्तमासपद्धतीनें श्रावण कृ. १) हे तीन उत्सव प्रत्येक महाराष्ट्रियानें न चुकतां साजरे केले पाहिजेत. महाराष्ट्रीय कोण हें ओळखून काढण्याचें तें एक चिन्हच समजलें जावें. यांखेरीज **गणेशोत्सव** आणि **गीता-जयन्तीचा** उत्सव हे दोन धार्मिक उत्सव प्रत्येक हिंदुमात्रानें पाळावयाचे आहेत. त्यांत गीता-जयन्तीविषयीं तर हिंदुमहासभेनें स्वतंत्र ठरावच केला आहे. अर्थातच सर्व हिंदु-समाजाकडून तो पाळला जाईल; पण जर कोठें त्याची हयगय होत असेल, तर महाराष्ट्रियांनीं त्या कामीं पुढारीपणा स्वीकारून इतरांना उदाहरण घालून द्यावें.

## अर्थमूलौ धर्मकामौ

याशिवाय महाराष्ट्रीय समाजाचीं शेंपन्नास कुटुंबें जेथें राहत असतील तेथें समाजाच्या मालकीचें असें एक प्रसूतिगृह असावें व ज्या स्त्रियांची बाळंतपणाची घरच्या घरीं सोय होऊं शकत नसेल त्या स्त्रियांची तेथें सोय व्हावी. त्याचप्रमाणें ज्यांना उपनयनविवाहादि समारंभास घरीं अडचण पडत असेल त्यांच्याकरितां एक सार्वजनिक मालकीची अशी 'महाजनवाडी' असावी. परठिकाणचा कोणी बडा पाहुणा आला, तर त्याच्या सत्काराकरितांहि त्या जागेचा उपयोग व्हावा. त्याच-प्रमाणें महाराष्ट्रीय मंडळाच्या नित्याच्या बैठकीची ती जागा असावी व तेथें महाराष्ट्रीय ग्रंथालय व वाचनालय असावें.

## " अर्थैरर्थाः प्रबध्यन्ते गजाः प्रतिगजैरिव "

हा न्याय लक्षांत ठेवून आपण संपत्तीचा अव्हेर न करतां तिचा उपयोग नवीन संपत्तीच्या उत्पादनाकडे आणि समाजाच्या शिक्षणविषयक सोयी वाढविण्या-कडे केला पाहिजे. आपला समाज संख्येनें बळावत जावा आणि त्यास सांपत्तिक सुस्थितिहि प्राप्त व्हावी अशी आपली अपेक्षा असल्यास आपण नोकरीचा परावलंबी व अल्प फलदायक मार्ग सोडून शेतीचा, कारखान्यांचा अगर व्यापाराचा बहुधनो-त्पादक मार्ग स्वीकारला पाहिजे. संयुक्त प्रांत हा सुपीक प्रांत असून येथें अनेक उद्योगधंदे भरभराटीस येत आहेत; पण त्यांत महाराष्ट्रियांचें स्थान कोठें आहे हें पाहूं गेल्यास निराशाच होईल. याकरितां आपली एकांगी दृष्टि बदलून ती बव्हंगी बनविली पाहिजे. बुद्धिवानाला अशक्य असें कांहीं नाहीं.

नर्मदेच्या उत्तरेस असलेल्या सर्व प्रांतांतल्या महाराष्ट्रियांची एक जंत्री, तुंग-भद्रेच्या दक्षिणेस राहणाऱ्या महाराष्ट्रियांची दुसरी जंत्री आणि हिंदुस्थानाबाहेर जगाच्या पाठीवर कोठेंहि संचार करणाऱ्या महाराष्ट्रियांची तिसरी जंत्री असे तीन वेगवेगळे भाग करावेत. नर्मदा व तुंगभद्रा यांच्या दरम्यानचा जो भाग तो मध्य-

महाराष्ट्र महाराष्ट्रियांचाच असल्यानें त्याची जंत्री करण्याचें कारण नाहीं. या तिहींतून उत्तर-भागाची जंत्री तयार करण्याचें कार्य या परिषदेनें हातीं घ्यावें. या कार्याला केसरी-मराठा संस्थेतर्फे शक्य तितकें साहाय्य करण्याचें अभिवचन त्या संस्थेच्या ट्रस्टींच्या सांगण्यावरून मी आपणांस देत आहें.

या जंत्रींत परप्रांतांतल्या महाराष्ट्रियांनीं आपण मूळ कोठून आलों, इकडे येऊन किती पिढ्या झाल्या, येथें आल्यापासून एक वा अनेक कोणते धंदे केले, महाराष्ट्राशीं संबंध अगदींच तुटला आहे का कायम आहे, संबंध तुटला असल्यास इकडे विवाहादि कार्यास अडचण भासते कीं काय, परप्रांतांतले कोणते समाज आपणांला अगदीं जवळचे असें वाटतात, अशा समाजाशीं एकजीव होण्याच्या मार्गांत कांहीं हरकती आहेत कीं काय, सांपत्तिक स्थिति उत्तम, मध्यम, कनिष्ठ यांतून कोणत्या दर्जाची आहे, आपल्या पंचक्रोशींतली महाराष्ट्रियांची संख्या वाढत आहे का कमी होत आहे, इत्यादि प्रश्नांसंबंधानें माहिती असावी.

अशा प्रकारची जंत्री तयार झाल्यावर तीवरून महाराष्ट्रियांच्या विद्यमान स्थितीचें सविकल्पक ज्ञान होईल आणि त्यावरून पुढील मार्ग स्पष्ट दिसूं लागेल. ही जंत्री आशाजनक अशीच होईल असा मला भरंवसा वाटतो. आपण स्वतःच्या प्रौढीकरितां नव्हे, तर राष्ट्रकार्याकरितां व समाजकार्याकरितां स्वतः झीज सोसून कार्यकर्ते बनले पाहिजे. म्हणजे आपोआपच

म्हणोनि आपण क्रिया करावी। मग पुढिलासी नलगे सांगावी।
तुझी क्रिया देखोनि जीवीं। तेही तैसी करतील॥

असा अनुभव येऊं लागेल. अशा रीतीनें कार्य करूं लागल्यास

एकची जीव सर्वांचा। कट्ट बंध ढळेचिना।
राजकी भोवते येती। तेहिं त्यासीच मीळती॥

अशी समाजांत एकरूपता येईल. अशा रीतीनें आपण कार्यास लागलों असतां

अजयो न होरे जयवंत होरे। आपदा नको रे बहुभाग्य होरे॥
श्रीमंतकारी जनहीतकारी। पर ऊपकारी हरिदास तारी॥

अशी आपल्या कल्याणाकरितां श्रीसमर्थ रामदासस्वामी प्रभु रामचंद्राची प्रार्थना करतील व ती सफल होऊन आपण कृतकार्य होऊं.

# पंचांगवादाचा निष्कर्ष : : : : : : २

[ सांगली येथील १९२० सालच्या पंचांग-परिषदेच्या ठरावाला अनुसरून १९ अयनांशांचें शुद्ध निरयन-पक्षाचें टिळक-पंचांग प्रसिद्ध होऊं लागल्यापासून केतकी-पक्ष आणि शुद्ध पंचांग-प्रवर्तन-पक्ष यांच्यांत अयनांशगणनेसंबंधानें पुष्कळच वाद माजला. विशेषतः १९२८ सालीं पुण्यास **'ऐक्य-परिषद्'** या नांवाची एक परिषद् भरली होती त्यामुळें त्या वादाला मोठीच भरती आली होती. त्या वेळीं प्रतिपक्षाचे मुद्दे खोडून काढून टिळक-पंचांगाची शुद्धता सिद्ध करण्यासाठीं अनेक लेख लिहिले गेले. त्यांतला निष्कर्ष दर्शविणारा हा एक लेख या संग्रहांत घेतला आहे. हा लेख समारोपात्मक असून, त्यांत या वादांतले सर्व मुद्दे क्रमानें मांडून त्यावर टिळक-पक्षाचें म्हणणें काय आहे व तें कसें साधार व सयुक्तिक आहे तें दर्शविलें आहे. एवढा एक लेख वाचल्यानें या वादांतील सर्व शंकांचें निरसन होईल अशा स्वरूपाचा हा लेख वाटल्यावरून, याच लेखाची या लेखसंग्रहांत निवड करण्यांत आली. ]

### अयनांश व दृक्प्रत्यय यांचा संबंध

निरयन पंचांगपद्धतीच्या तत्त्वाप्रमाणें आरंभस्थान निश्चल राहिलें पाहिजे; परंतु वाजवीहून वाढतें वर्षमान आणि वाढती अयनगति घेतल्यानें तें आरंभस्थान हळूहळू पूर्वेस सरकत गेलें आहे, त्यामुळें वास्तविक अयनांश जितके यावयाचे त्याहून चार अधिक वाढले आहेत. यावर असा एक प्रश्न विचारण्यांत येतो कीं, अयनांशांचा दृक्प्रत्ययाशीं संबंध काय ? गुरुशुक्रादिकांचे अस्तोदय आणि सूर्य-चंद्रांचीं ग्रहणें एवढ्यांचाच दृक्प्रत्ययाशीं संबंध आहे असें मानलें, तर अयनांशांचा त्यांच्याशीं कांहीं संबंध नाहीं असें म्हणतां येईल. पण जेथें अयनांशांचें सगळें गणित वर्षमानावर अवलंबून आहे आणि वर्षमान बदललें कीं आरंभस्थान बदलतें तेथें अयनांशांचा दृक्प्रत्याशीं संबंध येतोच येतो. केवळ तिथींचें गणित वर्तवावयाचें असल्यास त्यांत अयनांशांचा संबंध येत नाहीं; पण अमुक ग्रह अमक्या नक्षत्राला केव्हां येणार हें जेथें ठरवावयाचें असेल तेथें आरंभस्थानाचा व अयनांशांचा संबंध आलाच पाहिजे. रवि किंवा दुसरा कोणताहि ग्रह रेवती योगतारा ओलांडून पुढें गेला कीं तो आश्विनी नक्षत्रांत व मेष राशींत गेला असें ग्रंथांच्या आधारें व प्रत्यक्ष दृक्प्रत्ययानें म्हणावें लागेल. पण तुमचें आरंभस्थान जर येथून

( केसरी, दि. १८ सप्टेंबर १९२८ )

पुढें चार अंशांवर गेलें असेल, म्हणजे तुम्ही वास्तविक संख्येहून अधिक अयनांश धरीत असाल, तर रेवती ओलांडून पुढें गेलेला ग्रह देखील अद्यापि अश्विनी नक्षत्रांत व मेष राशींत गेला नाहीं असें तुम्ही म्हणाल. पण इकडे आकाशांतील दृक्प्रत्यय आणि 'यत्र तु रेवती तारा स्थापिता तत्र मीनमेषसंधिः' 'रेवती योगतारा तु सदा मीनाजसंधिगा' हीं वचनें तो ग्रह मेष राशींत गेला असें ठरविणार. अशा ठिकाणीं अयनांश वाजवीहून अधिक घेतल्यामुळें दृक्प्रत्ययास बाध येतो हें उघड आहे. मासल्याकरितां हें एक उदाहरण सांगितलें. पण जेथें आरंभस्थानच चळलें आहे तेथें प्रत्येक ग्रह प्रत्येक नक्षत्रविभागाच्या आरंभीं आला असतां असाच फरक पडणार. यावरून अयनांशांचा दृक्प्रत्ययाशीं संबंध नाहीं हें म्हणणें कसें चुकीचें आहे हें लक्षांत येईल.

### अयनांश व आरंभस्थान यांचा संबंध

असो. आतां या वादांत कित्येकांकडून ज्या कांहीं शंका विचारण्यांत आल्या आहेत त्यांचीं थोडक्यांत उत्तरें देऊन या वादाचा समारोप करूं. सायन रवि व आरंभस्थान यांतील जें अंतर तें अयनांश अशी व्याख्या कोणत्याहि ग्रंथांत दिली नाहीं, असा अेक आक्षेप घेण्यांत येतो. सायन रवि आणि गणितागत निरयन रवि यांतील अंतर म्हणजे अयनांश ही व्याख्या आक्षेपकांसहि मान्य आहे; आणि वर्षमान नवीन शोधाप्रमाणें अगदीं बिनचूक घेतलें म्हणजे गणितागत रवि आणि आरंभस्थान यांचा बरोबर मेळ बसतो आणि त्यावरून सायन रवि व आरंभस्थान यांतील अंतर तें अयनांश हा नियम आपोआप सिद्ध होतो. पण आजपर्यंतच्या करण-ग्रंथांत शुद्ध वर्षमान घेतलें गेलें नाहीं म्हणून त्यांचा गणितागत रवि आरंभस्थानाला सोडून जाऊं लागला आणि त्यामुळें अयनांश ठरवितांना त्यांनीं आरंभस्थानाचा विचार करावयाचें सोडलें, पण आरंभस्थान निश्चल असणें हा तर निरयन पद्धतीचा पाया आणि तें आरंभस्थान निश्चल राहण्याला नव्या शोधानें बिनचूक ठरलेलें वर्षमान घेणें जरूर आहे, आणि असें वर्षमान बिनचूक घेत गेल्यास गणितागत रवीपासून काढलेले अयनांश आणि आरंभस्थानापासून मोजलेले अयनांश तंतोतंत जुळतात व तेच खरे वेधोपलब्ध अयनांश होत. ज्या गणित-ग्रंथांत स्वीकारलेली अयनगति व वर्षमानपद्धति चुकीची आहे त्या ग्रंथावरून गणितागत रवि करून अयनांश ठरविणें हें चुकीच्या पायावर उभारलेल्या डोलाऱ्याप्रमाणें डळमळीतच असणार. कोल्हापूरचे प्रो. आपटे यांनीं जे अयनांश वर्तवून ऐक्य परिषदेच्या अध्यक्षांस कळविलें ते ८॥ पळांनीं अधिक असलेल्या वर्षमानावरून काढलेले आहेत. म्हणून त्यांत चौदाशें वर्षांची सुमारें चार अंशांची कसर कायम राहिली आहे. अशी चुकी न राहण्याला रेवती योगतारेशीं आरंभस्थान निश्चित करणें आणि सायन मेषार्क व आरंभस्थान यांचें अंतर मोजून अयनांश काढणें हाच खरा बिनचूक मार्ग होय. केरोपंती पंचांगांत घेतलेलें वर्षमान

वास्तविक नाक्षत्र सौर म्हणजे ३६५ दिवस १५ घ. २२ प. ५३ वि. इतकें आहे. अयनगतीहि वास्तविक म्हणजे ५०–२३ इतकी मानली आहे आणि शिवाय यांतील ग्रहगतिस्थिति पूर्ण शुद्ध घेतल्यानें या पंचांगाप्रमाणें ग्रहणें, ग्रहयुति इत्यादि गोष्टी दृक्प्रत्ययास बरोबर मिळतात. अर्थातच या पंचांगांतील गणितागत अयनांश व आरंभापासून मोजलेले अयनांश एकच येतात, म्हणूनच हें पंचांग पूर्ण शुद्ध होय. पूर्वी हें पंचांग नॉटिकल अल्मनॅकवरून करीत असत, पण ज्योतिषी केतकर यांच्या ग्रंथांतला रैवताख्य पक्ष घेऊन हें गणित करतां येतें आणि अलीकडे नागपूरचे श्री. दप्तरी यांनीं जो करणकल्पलता ग्रंथ केला आहे त्यावरूनहि हें गणित करतां येतें, त्यामुळें आतां नॉटिकल अल्मनॅकची गरज राहिलेली नाहीं हेंहि आक्षेपकांनीं लक्षांत ठेवावें.

## आरंभस्थानीं तारा आवश्यक आहे

आरंभस्थानाला तारा असण्याचें कारण नाहीं हेंहि एक नवेंच थोतांड आक्षेपकांनीं उभारलें आहे. दिवसभर केलेल्या खोड्या लिहिण्याचें टाळावें म्हणून खोडकर मुलगा जसा रोजनिशी लिहिण्याची चाल वाईट असें सांगत असतो किंवा ज्याला आपल्या हातून होणारा जमाखर्च दुसऱ्याच्या नजरेस पडणें इष्ट वाटत नाहीं असा बेहिशेबी मनुष्य ज्याप्रमाणें जमाखर्च लिहिण्याची जरुरी काय असें विचारतो, तशासारखाच आरंभस्थानीं तारा कशाला पाहिजे हा प्रश्न आहे. ज्याला आपलें गणित शुद्ध आहे कीं चुकत आहे याचा पडताळा पाहावयाचा असेल त्याला आरंभस्थानीं तारा आवश्यक आहे. जो आकाशाकडे कधींहि पाहत नाहीं आणि जो केवळ रूढ पद्धतीनें गणित करून ग्रहगति व स्थिति ठरवीत असतो व आरंभस्थानापासून आपण किती झुकलों याची ज्याला पर्वा नसते त्याला आरंभस्थानीं तारा असण्याची जरुरी भासत नसेल. कारण त्यानें आरंभस्थानीं तारा घेतली तरी दरसाल ती तारा मागें मागें सरकतच जाणार; परंतु असला कोणताहि घोटाळा होऊं नये असें ज्याला वाटत असेल त्याला आरंभस्थानीं तारा घेणें हेंच उत्तम साधन होय. पूर्वींच्या सर्व ग्रंथकारांनीं आरंभस्थानीं तारा मानलीच आहे, मात्र वर्षगति बरोबर न साधल्यामुळें ती त्यांना न कळत सुटत चालली हें निराळें. ज्या चित्रा पक्षाचे अध्वर्यु आरंभस्थानीं तारा नको म्हणतात त्यांनीं स्वतः देखील आरंभस्थानीं चित्रा तारा घेतलीच आहे. कारण चित्रेच्या समोरून १८० अंशांपासून नक्षत्रांचे भोग व अयनांश मोजणें म्हणजे ते पर्यायानें आरंभस्थानच्या चित्रा ताऱ्यापासूनच मोजण्यासारखें आहे, आणि स्वतः ज्योतिर्विद केतकर यांनींहि "कालगणनेचें गणित प्रथम सुरू करतांना आरंभस्थानाचा संबंध दृश्य तारकेशीं असल्याखेरीज गणित करणें शक्य नाहीं" अशीच कबुली दिली आहे.

## आरंभस्थानीं रेवतीच घेण्याचा आग्रह कां?

आरंभस्थानीं तारा घेण्याची इतकी जरुरीच असेल तर एखादा तारा घ्या. पण तो रेवती योगताराच घेतला पाहिजे असा आग्रह कां? चित्रेच्या समोर १८०

अंशांवर असणारा बिंदु घेतला म्हणून काय बिघडलें ? असाहि एक आक्षेप पुढें येतो; आणि त्यास आधार म्हणून पूर्वी एके काळीं मृग नक्षत्र आरंभस्थानीं होतें. पुढें कृत्तिका आल्या, त्यानंतर कदाचित् एके वेळीं अश्विनीहि आरंभस्थानीं असतील आणि नंतर तुमचा रेवती योगतारा आरंभस्थानीं आला, हे जसे इतके फेरफार झाले त्याचप्रमाणें आता रेवती योगताऱ्याच्या ऐवजीं चित्रेच्या समोरचा बिंदु घेतल्यास त्यांत बिघडलें कोठें असेंहि विचारण्यांत येतें! याला पहिलें उत्तर असें कीं, आम्ही पूर्वीचें आरंभस्थान बदलून अमुक ताऱ्यापासून नवें सुरू केलें आहे असें सरळ सांगून आणि करण-ग्रंथांत तसें स्पष्ट नमूद करून मग आरंभस्थान बदललें तर एका दृष्टीनें हरकत घेण्याला जागा राहणार नाहीं. पण आमचें आरंभस्थान हजारों वर्षांपासूनचें जुनेंच कायम आहे असें सांगावयाचें, त्याला नांव देतांना रेवती योगतारा म्हणावयाचें, आणि खरें आरंभस्थान जुनेंहि नाहीं व जें नांव दिलें तेंहि नाहीं अशी स्थिति असावयाची हें योग्य नव्हे. शके १८०९मध्यें चित्राताऱ्याच्या समोर जो बिंदु कर्मधर्मसंयोगानें आला तेंच आरंभस्थान मानून त्यालाच प्राचीन ग्रंथांचा आधार आहे असें भासविणें हें दोषास्पद होय आणि त्यामुळेंच केतकी पक्षाच्या पंचांगावर लपंडाव चालविल्याचा आरोप येतो.

### आरंभस्थान पूर्वेस सरकविणें चुकीचें आहे

पण आरंभस्थान बदलण्यांत दुसरी जी एक दृष्टि ठेवावयास पाहिजे ती केतकी पक्षानें राखली नाहीं हा त्याचा मोठा दोष होय. आरंभस्थान पूर्वी एके काळीं मृग नक्षत्रांत होतें व तेथून बदलत बदलत तें रेवती योगताऱ्यावर आलें हें खरें; तथापि यांत एक क्रम कायम आहे व तो शास्त्रशुद्ध आहे. तो क्रम असा कीं, संपातबिंदु पश्चिमेस सरकत असल्यामुळें निरयन मानाचें आरंभस्थानहि बदलावयाचें झाल्यास तें पूर्वीच्या बिंदूच्या पश्चिमेस नेलें जावें, पूर्वेस नेतां कामा नये आणि मृगापासून रेवतीपर्यंत अशाच क्रमानें तें बदललें आहे; केव्हांहि पश्चिमेकडून पूर्वेस तें नेण्यांत आलें नाहीं. असें असतां शके ४९६ मध्यें जें आरंभस्थान रेवती योगताऱ्यापाशीं (झीटापिशियमपाशीं) सिद्धान्तकारांनीं निश्चित केलें तें पश्चिमेकडे न हलवितां केतकी पक्षानें उलट दिशेला म्हणजे पूर्वेला ४ अंश नेलें आहे. यामुळें सायन व निरयन यांच्यांत जेवढें अंतर वास्तविक पडावयाचें त्याहून विनाकारण चार अंश अधिक अंतर पडत आहे. हा त्यांतील मोठा दोष होय. आरंभस्थान बदलावयाचें झाल्यास तें केव्हांहि पश्चिमेकडून पूर्वेकडे न नेतां पूर्वेकडून पश्चिमेकडेच नेलें पाहिजे व तें ज्या नव्या ताऱ्यानजीक न्यावयाचें तो तारा पूर्वीपेक्षां अधिक ठकळ असला पाहिजे. चित्रेच्या समोरचा बिंदु आरंभस्थान मानण्यांत या दोनहि गोष्टी साधलेल्या नाहींत. तो बिंदु रेवती योगताऱ्याच्या पश्चिमेलाहि नाहीं, चित्रा तारा निःशरहि नाहीं व त्यासमोरचा बिंदु कल्पित असल्यानें तो ठळक कोठून असणार ? अर्थातच यापुढें आरंभस्थान बदलावयाचेंच झाल्यास तें

1 JAN 1994

सुमारें दीड हजार वर्षांनीं शततारका नक्षत्राशीं नेतां येईल; कारण तो तारा ठळक आहे, रेवतीच्या पश्चिमेस आहे व निःशरहि आहे. पण आजमितीस चालू असलेल्या वादांत भावी स्थलांतराच्या विचाराचा काय उपयोग? आजच्या वादाच्या दृष्टीनें केतकी पक्षानें केलेलें स्थानांतर परंपरेला व शास्त्राला धरून नाहीं एवढें सांगितलें म्हणजे पुरें आहे.

या चर्चेत खरे वादाचे मुद्दे जेवढे होते तेवढ्यांचा विचार येथवर झाला. ज्या आक्षेपांचा गणिताशीं किंवा शास्त्रवचनाशीं कांहींच संबंध नाहीं असल्या बाष्कळ आक्षेपांना वरील विवेचनांत उत्तर दिलें नाहीं व तें देण्याची गरजहि नाहीं, कारण त्या आक्षेपांना शास्त्रीय पद्धतीचा पायाच नाहीं. तेव्हां आतां या सगळ्या विवेचनाचा सारांश वाचकांना थोडक्यांत समजेल अशा पद्धतीनें मांडून ही लेखमाला आटोपती घेऊं.

## वादांतील मुद्द्यांचा निष्कर्ष

(१) निरयन पद्धतींत वर्षारंभस्थान निश्चल असलें पाहिजे आणि तें निश्चल राहिलें आहे कीं नाहीं हें समजण्यास तेथें निःशर दृश्य तारा पाहिजे.

(२) सूर्य एका बिंदूतून निघून क्रान्तिवृत्ताची प्रदक्षिणा करून पुनः परत त्याच बिंदूला आला म्हणजे वर्ष पूर्ण होतें. या वर्षाला नाक्षत्र सौरवर्ष असें म्हणतात.

(३) नाक्षत्र सौरवर्षाचा कालावधि ३६५ दि. १५ घ. २२ प. ५३ वि. इतका आहे. नाक्षत्र सौर वर्षमान बरोबर ठरविण्याला आरंभस्थानाचा बिंदु निश्चित पाहिजे. असा निश्चित बिंदु क्रान्तिवृत्तावरील निःशर योगतारा आरंभस्थानीं घेतल्यानें मिळूं शकतो.

(४) वर्षमानाचा कालावधि अगदीं सूक्ष्म व बिनचूक पूर्वी ठरवितां न आल्यामुळें आजपर्यंत निरयन पंचांगवाद्यांनीं जें वर्षमान घेतलें तें साडेआठ पळांनीं अधिक आहे. पण तेवढ्यावरून त्यांचा हेतु नाक्षत्र सौर वर्षमान घेण्याचा नव्हता असें नाहीं. जें वर्षमान ते घेत तें नाक्षत्र सौर म्हणूनच घेत. त्यांत साडेआठ पळांची चुकी आहे व त्यामुळें आपलें आरंभस्थान निश्चल न राहतां तें पूर्वेकडे झुकत चाललें आहे याची त्यांना दखलगिरी नव्हती.

(५) सिद्धान्तकारांना ही दखलगिरी नसली तरी अर्वाचीन शोधांवरून शुद्ध वर्षमान किती घ्यावें आणि आतांपर्यंत आरंभस्थानांत किती अंतर पडलें आहे हें आपणांस आतां कळलें आहे. म्हणून आरंभस्थान पूर्वीच्या जागीं स्थिर करणें आणि नवीन करण-ग्रंथांत शुद्ध वर्षमान घेणें या दोनहि गोष्टी आवश्यक आहेत व पंचांगप्रवर्तन कमिटीनें अशी दुहेरी शुद्धता साधली आहे.

(६) वर्षमान बिनचूक न घेतां ८॥ पळें अधिक घेत गेलें तरी आरंभस्थान निश्चल राहतें हें म्हणणें गणिताला विरुद्ध आहे. वर्षमान वाजवीहून अधिक

घेतलें तरी आरंभस्थान बदलत नाहीं असें जें म्हणत असतील त्यांनीं ते गणितानें सिद्ध करून द्यावें असें आमचें त्यांस आव्हान आहे.

( ७ ) शून्य अयनांश वर्ष शके ४९६ या वर्षी होतें व तें रेवती योगताऱ्यांत होतें हें केतकर यांनींच सांगली संमेलनानंतरहि कबूल केलें आहे. शके ४२१ च्या पूर्वी शून्य अयनांश वर्ष कोणींच दिलेलें नाही; केतकर पक्षानें जें दिलें तें चुकीनें दिलें आहे. ब्रह्मगुप्ताच्या वेळीं सायन रवि व निरयन रवि यांमध्यें ५४ घटकांचें अंतर होतें, त्यावरून शके ४९६ हेंच त्याचें शून्य अयनांश वर्ष येतें.

( ८ ) रेवती योगतारा म्हणजे झीटापिशियम् असें शंकर बाळकृष्ण दीक्षितांच्या पूर्वीच्या सर्व ग्रंथकारांनीं कबूल केलें आहे व त्यांस बापूदेवशास्त्री व व्यं. बा. केतकर यांचीहि संमति आहे.

( ९ ) झीटापिशिअमचा म्हणजे रेवती योगताऱ्याचा शर १३ कला म्हणजे अत्यंत अल्प असल्यामुळें प्राचीन ग्रंथकारांनीं त्यास निःशर असें नांव दिलें आहे.

( १० ) जें शुद्ध व बिनचूक वर्षमान शके १८२४ पासून ज्यो. केतकर यांनीं आणि शके १८४८ पासून ऐक्य पक्षानें स्वीकारलें तें शुद्ध वर्षमान शून्य-वर्षारंभापासून घेऊन जे अयनांश येतील तेच खरे अयनांश होत.

( ११ ) जें सौर सिद्धान्तोक्त वर्षमान ८॥ पळांनीं अधिक असल्यामुळें केतकी व ऐक्य पक्षानें अग्राह्य ठरविलें तेंच अग्राह्य वर्षमान घेऊन गणितागत रवि काढणें आणि त्यावरून येणारे जुने चुकीचे अयनांश ग्राह्य मानणें ही विसंगततेची व अशास्त्रीयतेची कमाल होय !

( १२ ) शुद्ध वर्षमान व शुद्ध अयनगति घेऊन करणागत रवि काढल्यास त्यावरून शके १८४८ त २२–४१ अगर २२–४८ अयनांश येतात असें सिद्ध करून दाखवावें असें आमचें चित्रा पक्षीयांस व ऐक्य पक्षीयांस आव्हान आहे. हें आव्हान ते न स्वीकारतील तर त्यांचा पक्ष चुकीचा हें आपोआपच सिद्ध होतें.

सगळ्या वादाचा मथितार्थ वरील १२ मुद्द्यांत थोडक्यांत दिला आहे. त्यावरून सामान्य वाचकांसहि वादाची भूमिका कळून खरें शुद्ध पंचांग कोणतें याचा निर्णय करतां येईल व तसा निर्णय वाचकांनीं स्वतःच करावा. तज्ज्ञांनींहि अभिनिवेश सोडून स्वतः खऱ्याखोट्याची पारख करावी आणि आपण खरें शुद्ध शास्त्रोक्त पंचांग वापरून आपल्या अनुयायांसहि हितकर सल्ला देण्याचें श्रेय संपादन करावें, एवढीच त्यांस विनंती आहे. अशा रीतीनें तज्ज्ञांनीं आपलें योग्य कर्तव्य बजावल्यास निष्कारण वाढलेला हा पंचांगवाद मिटेल अशी खात्री वाटते.

# नरकासुराच्या कथेंतील मर्म : : : : ३

[ श्रीकृष्णचरित्रांतील अनेक घटनांतील खरें रहस्य लक्षांत न आल्यामुळें श्रीकृष्णाच्या चारित्र्यावर निष्कारण शिंतोडे उडविण्यांत येतात. नरकासुराच्या वधानंतर त्याच्या बंदिगृहांतल्या हजारों स्त्रियांना सोडवून श्रीकृष्णानें त्यांना वरिलें. या घटनेवर असाच आक्षेप घेण्यांत आल्यावरून त्या आक्षेपाचें निरसन करण्यास्तव हा लेख लिहिला. या लेखांत श्रीकृष्णानें जो मार्ग स्वीकारला त्यामुळेंच त्या स्त्रियांच्या बंधमुक्ततेमुळें समाजाला जो एक प्रश्न पडला होता तो प्रश्न नीटपणें सुटला, अन्य मार्गानें तो पेंच सुटला नसता, असें दाखविलें आहे. त्याबरोबरच पौराणिक कथांतील केवळ वाच्यार्थ न पाहतां त्यांतील मर्म कसें जाणावें याचें दिग्दर्शन केलें आहे. ]

पुणें येथील आहिताग्नि राजवाडे यांच्या वाड्यांत वाङ्मय परिषद् झाली. तींत अध्यक्ष या नात्यानें भाषण करतांना **श्रीमंत बाळासाहेब पंतप्रधान** यांनीं रामायणकालीन नीति व भारतकालीन नीति यांची तुलना करण्याच्या ओघांत श्रीकृष्णाच्या चारित्र्यावर एक मोठा आक्षेप घेतला. "नरकासुराला ठार मारल्यावर त्याच्या अटकेंतून सोडविलेल्या हजारों स्त्रिया श्रीकृष्णानें आपल्या भार्या म्हणून द्वारकेंत आणून ठेवल्या. मोठे लोकच असें वागूं लागल्यावर इतरांना नांवें कशीं ठेवावयाचीं" असा श्रीमंतांच्या आक्षेपाचा आशय होता.

भाविकपणानें पुराणें वाचणाऱ्या लोकांच्याबद्दल बोलावयासच नको; कारण केवळ श्रद्धेनें ते असले ग्रंथ वाचतात. त्या ग्रंथांना चिकित्सक व ऐतिहासिक दृष्टि लावणें त्यांना मान्य नसतें. पण त्याबरोबरच 'न देवचरितं चरेत्' हें त्यांचें ठराविक सूत्र असल्यामुळें पौराणिक कथांचा चालू व्यवहारांतील नीति-अनीतीशीं ते संबंधच जोडीत नाहींत; त्यामुळें त्यांना असल्या कथांतील मर्म काय याची चिकित्सा स्वतः करण्याची किंवा दुसऱ्याकडून ऐकण्याची इच्छाच नसते. तस्मात् 'तान्प्रति नैष यत्नः'.

परंतु श्रीमंत बाळासाहेब हे चिकित्सकबुद्धीनें व ऐतिहासिक दृष्टीनें पौराणिक कथांकडे पाहणारे आहेत. याचें प्रत्यंतर त्यांच्या त्या अध्यक्षीय भाषणांत भरपूर मिळतें. ( १ ) दशरथ राजाचें वय सांगतांना त्यांनीं ६० हजार वर्षें असें न म्हणतां ६० वर्षें असेंच म्हटलें. ( २ ) पुत्रकामेष्टियज्ञ केल्यावर दशरथाच्या भार्यांना जें 'पायस' दिलें गेलें तें 'पायस' म्हणजे 'दुधांतून तयार केलेलें एक

( केसरी, दि. ४ डिसेंबर १९३४ )

शक्तिवर्धक औषध ' असाच अर्थ त्यांनीं उकलून सांगितला. ( ३ ) अहिल्या शिळा होऊन पडली होती व रामानें तिला अंगठ्यानें स्पर्श करतांच ती दिव्य देह धारण करून सजीव झाली असें न म्हणतां " पश्चात्तापानें दग्ध होऊन अहिल्या तपाचरण करीत होती व श्रीरामचंद्रांनीं तिचें तपाचरण पाहून गौतम मुनींची समजूत घातली, व त्यांच्याकडून तिचा स्वीकार करविला, " असा त्या कथेचा त्यांनीं उलगडा केला.

## चिकित्सक व ऐतिहासिक दृष्टि

अशी चिकित्सक व ऐतिहासिक दृष्टि श्रीमंतांनीं वरील तीनहि प्रसंगासंबंधानें वापरली. तशाच चिकित्सक दृष्टीनें नरकासुराच्या कथेकडे पाहिल्यास त्या कथेचें मर्म त्यांच्या ध्यानांत येईल व त्यांत श्रीकृष्णाचें वर्तन आक्षेपार्ह नसून, प्रसंगोचित होतें अशी खात्री पटेल. वास्तविक पाहतां 'पायस' घेऊन पुत्रप्राप्ति होणें आणि 'अहिल्योद्धार' या कथांचा व्यावहारिकदृष्ट्या उलगडा करण्यापेक्षांहि श्रीकृष्णाच्या सदर कथेचा उलगडा करणें अधिक सुलभ आहे; कारण त्यांत अशक्य कोटींतील गोष्ट शक्य कोटींत कशी आणावयाची याचा विचार करावयाचा नसून, नरकासुराच्या बंदींतील स्त्रिया आपल्या पत्नी म्हणून द्वारकेंत ठेवून घेण्यांत श्रीकृष्णाचा हेतु काय असावा एवढीच हेतुमीमांसा करावयाची आहे.

माझ्या मतें ही हेतुमीमांसा अगदीं साधी व श्रद्धेय अशीच आहे. जरासंधानें शेंकडों राजे बंदिशाळेंत ठेवले असून, त्यांना तो बळी देणार आहे असें कळतांच श्रीकृष्णानें जरासंधावर स्वारी करून भीमाकरवीं त्याला ठार मारविलें आणि राजे लोकांना बंधमुक्त करून आपापल्या राज्यांत पाठवून दिलें. श्रीकृष्णानें त्या राजांना स्वतःचे दास बनविलें नाहीं आणि त्यांचीं राज्येंहि हिरावून स्वतःकडे घेतलीं नाहींत. अर्थातच राजांची ही बंधमुक्तता श्रीकृष्णानें 'कनकों'च्या लोभानें केली नाहीं, केवळ दुःखपरिमार्जनार्थ व परोपकारार्थ केली, हें सिद्ध आहे.

## कांतालोभ नव्हे

आता नरकासुराच्या कथानकाचा विचार करूं. नरकासुरानें राजांना बंदिवासांत न ठेवतां स्त्रियांना धरून आणून बंदिवासांत ठेवलें होतें. हें कळल्यावरून श्रीकृष्णानें त्याच्यावर ही चढाई केली आणि त्याला ठार करून त्याच्या बंदिशाळेंतून हजारों स्त्रिया बंधमुक्त केल्या.

जरासंधाचा वध जसा 'कनक'-लोभानें केला गेला नाहीं, तसाच नरकासुराचा वधहि 'कान्ता'-लोभानें केला गेला नाहीं, तर मग नरकासुराच्या बंदिशाळेंतून सोडविलेल्या स्त्रिया श्रीकृष्णानें आपल्या 'कान्ता' म्हणून कशा ठेवून घेतल्या? चिकित्सक व ऐतिहासिक दृष्टीनें पाहिल्यास या प्रश्नाचें उत्तर अगदीं साधें व सरळ असून चिकित्सक वाचकांना तें पटेल असा भरंवसा वाटतो.

स्त्रियांचा अपहार करणाऱ्या नरकासुराचा वध केल्याखेरीज त्याचा हा अत्याचार थांबणारा नव्हता; यास्तव त्याचा वध श्रीकृष्णानें केला हें कृत्य दूषणीय

11 JAN 1994

नसून स्तुत्यच आहे. आतां हा प्रश्न असा कीं, नरकासुराला मारल्यानंतर बंदिशाळेंतल्या त्या स्त्रियांचें काय करावयाचें? त्यांचें पालनपोषण करण्याची जबाबदारी कोणावर टाकावयाची? त्या स्त्रियांत कांहीं (१) सधवा असतील, (२) कांहीं विधवा असतील व (३) कांहीं कुमारिका असतील. त्यांतल्या सधवा स्त्रियांना त्यांच्या त्यांच्या भर्त्यांकडे पाठविलें असतें तरी त्यांनीं त्यांना घरीं ठेवून घेतलें असतें काय? त्यांना अनाथ स्थितींत सोडणें नीतिदृष्ट्या योग्य ठरलें असतें काय? असल्या शेंकडों स्त्रिया समाजांत अशा रीतीनें वावरूं लागल्यास त्याचा परिणाम अनिष्टच झाला नसता काय?

ज्या स्त्रिया विधवा अगर कुमारी असतील त्यांना तर कायदेशीर पालक कोणीच नसल्यानें त्यांना कोणाच्या स्वाधीन करावयाचें हाहि प्रश्नच होता. नरकासुराच्याच राज्यांत त्यांना तसेंच सोडून यावें म्हटल्यास त्यांत आर्य स्त्रियांची अब्रू कशी बचावणार आणि इतर असुरांना धाक तरी कसा बसणार? तेव्हां या बाबतींत काय करावें हा खरोखरीच पेंचाचा प्रश्न होता.

## श्रीकृष्णास पडलेला पेंच

हल्लींच्या काळांतल्या हरहमेष घडणाऱ्या गोष्टीचाच दृष्टान्त घेऊन याचा विचार केल्यास ठीक होईल. समजा कीं, सिंध, बंगाल किंवा सरहद्द प्रांत यांतील एखाद्या पुंड मुसलमानानें अनेक हिंदु स्त्रिया पळवून आपल्या गढींत गुप्तपणानें ठेवल्या आहेत अशी वार्ता कळली आणि पोलिसांनीं छापा घालून त्या पुंडास पकडून अंदमानला पाठवून दिलें. आतां त्याच्या घरांतून बंधमुक्त झालेल्या स्त्रियांची व्यवस्था कशी लावावयाची! श्रद्धानंद अनाथालयासारख्या संस्था असल्या व तेथें सोय असली तर ठीकच आहे. तशी सोय नसल्यास कोणा तरी संपन्न व्यक्तीनें त्यांना आपल्या धर्मकन्या किंवा भगिनी मानून कोठें तरी आपल्या एखाद्या वाड्यांत त्यांची सोय करणें प्राप्त आहे. तशी सोय न करतां त्यांना मोकळ्या सोडल्यास त्या स्वतः भ्रष्ट होऊन समाजांतील माणसांनाहि भ्रष्ट करण्यास कारणीभूत होतील. अर्थातच कोठें तरी त्यांना सुरक्षित ठेवणें जरूर आहे आणि ज्या ठिकाणीं ठेवलें असतां दुसरा कोणी मनुष्य त्यांच्याकडे वाकड्या नजरेनें पाहूं शकणार नाहीं अशाच जागीं त्यांना ठेवलें पाहिजे. पण अशा संस्था प्राचीन काळीं नव्हत्या आणि श्रीकृष्णाला तर एकदम इतक्या स्त्रियांची सोय करणें प्राप्त होतें. तेव्हां त्यानें त्यांना द्वारकेंत आणून ठेवलें आणि इतरांनीं त्यांच्याकडे वाकड्या नजरेनें पाहूं नये आणि आपल्यावरहि आक्षेप येऊं नये म्हणून त्यानें त्यांना आपल्या संरक्षणाखालीं घेऊन त्या आपल्या 'धर्मपत्नी' आहेत असें लोकांना बजावलें! श्रीकृष्णानें त्यांना आपल्या खास संरक्षणाखालीं ठेवून दिल्यानें द्वारकेंतल्या कोणाहि माणसाची त्यांचा अभिलाष करण्याची छाती झाली नाहीं आणि नरकासुरासारखे परप्रांतांतले जे आसुरी वृत्तीचे लोक त्यांनाहि स्त्रिया पळवून नेणें अशक्य

झालें; एवढेंच नव्हे तर त्यांनीं पुनश्च इतर स्त्रियांचा अपहार करण्याची बुद्धि मनांत बाळगूं नये इतकी त्यांना जरब बसली.

### कथेचा खरा अर्थ

चिकित्सकबुद्धीला हाच अर्थ यथोचित वाटत नाहीं काय? हल्लींच्यासारखे अनाथालय, महिलाश्रम इत्यादि शब्द त्या काळीं रूढ नव्हतें किंवा भाविक पुराणिकांनीं त्यांचा विपर्यास केला म्हणून हल्लींच्या चिकित्सक माणसांनींहि पुराणकारांचें वर्णन शब्दशः खरें मानून त्यावरून असले आक्षेप घ्यावेत काय? श्रीकृष्णानें गुरुपत्नीचे मृत पुत्र यमाच्या दरबारांतून परत आणून तिला दिले ही कथा शब्दशः खरी मानतां येईल काय? ती जर शब्दशः खरी न मानतां आपण तेथें चिकित्सकबुद्धि चालवितों, तर नरकासुराच्या कथेंतील या भागावरहि तशी चिकित्सक दृष्टि कां चालवूं नये?

सारांश, नरकासुराच्या बंदिशाळेंतून सोडवून आणलेल्या स्त्रियांना श्रीकृष्णानें द्वारकेंत आणून आपल्या 'धर्मपत्नी' म्हणून ठेवून दिलें या कथेंत, हल्लींच्या रूढ भाषेंत बोलावयाचें झाल्यास, परधर्मीयांनीं पळवून नेलेल्या स्त्रियांची सोडवणूक, पतित-परावर्तन, शुद्धीकरण, श्रद्धानन्द अनाथालयासारख्या संस्थेचें संस्थापन इत्यादि तत्त्वांचें बीज दिसून येतें.

---

## दैववाद आणि प्रयत्नवाद : : : : ४

दैव आणि प्रयत्न यांतून श्रेष्ठ काय असा वाद अनादि काळापासून चालू आहे व जोंपर्यंत वाद घालणाऱ्या उभय पक्षांत शब्दांचे अर्थ व वादाची मर्यादा निश्चित केली जात नाहीं तोंपर्यंत या वादाचा निर्णय लागला असें म्हणतां येणार नाहीं; पण शब्दांचे अर्थ आणि वादाची मर्यादा निश्चित ठरविली तर याचा निर्णय देणें कठीण नाहीं. एरवींच्या ठिकाणीं दैववाद आणि प्रयत्नवाद यांचा श्रेष्ठकनिष्ठपणा ठरवावयाची पद्धति व कसोटी असते; आणि फलज्योतिषाच्या दृष्टीनें ती पद्धति व कसोटी निरुपयोगी ठरते. आपणाला या ठिकाणीं केवळ फलज्योतिषाच्या दृष्टीनें विचार करावयाचा असल्यानें श्रेष्ठकनिष्ठपणा हे शब्द सोडून देऊन फलज्योतिषशास्त्रानें दिसणारें फल अटळ आहे कां टळ आहे हेंच मुख्यतः विचारांत घ्यावयाचें आहे. फल अटळ असेल तर तेथें प्रयत्नाला वाव नाहीं, म्हणजे प्रयत्नाची बाजू लंगडी पडते हें सिद्ध होईल. उलटपक्षीं फल टळ ठरल्यास प्रयत्नाला

( ज्योतिषतत्त्वदर्शन : वैशाख शुद्ध १०, शके १८६५ )

वाव राहून दैववाद लंगडा पडेल. यास्तव फलज्योतिषशास्त्रदृष्ट्या फल अटळ का टळ असतें हें ठरविणें हाच मूळ प्रश्नाचें उत्तर देण्याचा मार्ग होय.

या जगांतलें कोणतेंहि मनुष्यकृत शास्त्र पूर्ण नसल्यानें कोणत्याहि शास्त्राचा सिद्धान्त ठामपणें खरा ठरतोच असें नाहीं. अर्थातच अशा अपूर्ण शास्त्राच्या पायावर रचलेलें अनुमान चुकीचें ठरण्याचा संभव पुष्कळच असतो. यास्तव अशा अपूर्ण शास्त्राच्या आधारानें वर्तविलेलें भविष्य चुकीचें ठरण्याचा संभव असतो. एखाद्या रोग्यास पाहून डॉक्टरनें त्याचा आजार असाध्य ठरविला, तरी त्याचा अंदाज चुकीचा ठरेल अशी आशा मनांत बाळगून आपण प्रयत्न करीतच असतों. मग याच विचारसरणीप्रमाणें ज्योतिष्यानें वर्तविलेलें फल चुकीचें असेल असें मानून प्रयत्न चालू ठेवण्यास हरकत कोणती ? डॉक्टरांचें अनुमान जितकें ठाम तितकेंच ज्योतिष्याचेंहि अनुमान ठाम असेल. मग एकाच्या अनुमानानें जर आपण हातपाय गाळून बसत नाहीं तर दुसऱ्याच्या अनुमानानेंच आपण हातपाय कां गाळावे ? डॉक्टरांचें भविष्य जसें अटळ न मानतां टळ मानलें जातें, तसेंच फलज्योतिषाचेंहि भविष्य अटळ न मानतां टळ मानून चालण्यास हरकत काय आहे ? आणि भविष्य टळ मानलें कीं दैववादापेक्षां प्रयत्नवाद श्रेष्ठ ठरलाच.

वरील विचारसरणी शास्त्रोक्त नसून उत्तराची टाळाटाळ करण्याचा तो प्रयत्न आहे असें कित्येकांस वाटेल; पण वास्तविक प्रकार तसा नसून कोणतेंहि शास्त्र पूर्ण नाहीं; आणि एखादें शास्त्र पूर्णतेला पोंचलें तरी त्या शास्त्राचा प्रत्येकाचा अभ्यास पूर्णतेला गेला असतोच असें नाहीं; यावरून चुकीच्या संभवाला किती अवसर असतो हें ध्यानांत घेऊन प्रत्येक माणसानें त्या दृष्टीनें आपल्या प्रयत्नाची चिकाटी केव्हांहि सोडूं नये हें सांगण्याकरितांच कोणत्याहि शास्त्राच्या अपूर्णतेचा मुद्दा प्रारंभींच सांगून ठेवला.

दैव श्रेष्ठ का प्रयत्न श्रेष्ठ या वादाची मर्यादा एका आयुष्यापुरतीच मानावयाची हेंहि उभयपक्षीं गृहीत धरलें गेलें पाहिजे. नाहीं तर या जन्मांत ज्याला आपण संचित किंवा प्रारब्ध म्हणतों तें मागल्या जन्मांतल्या कर्माचें म्हणजे प्रयत्नाचेंच फळ आहे असें म्हणूं लागल्यास दैववादाला कोठेंच अवसर नाहीं हें लक्षांत येईल. पण आपणांस पूर्वीच्या कोणत्या जन्मांत कोठें, कशी चुकी झाली याचें संशोधन करावयाचें नसून, सध्यांच्या जन्मांत विशिष्ट माणसाची लायकी काय, म्हणजे त्याचे प्रयत्न कितपत फलप्रद होतील, हें पाहावयाचें आहे. अर्थातच सद्यःस्थितींत त्याचे प्रयत्न सफल होतील का विफल होतील हेंच मुख्यतः आपणांस पाहावयाचें असतें. त्याची कारणपरंपरा शोधण्याचा प्रश्न या बाबतींत गैरलागूच मानला पाहिजे.

आतां प्रथम दैव व प्रयत्न यांचे अर्थ व त्यांच्या व्यवहारांतील क्षेत्रमर्यादा निश्चित केल्या पाहिजेत. या संबंधांत पुष्कळच विचित्र समज प्रचलित असतात.

प्रयत्नापेक्षां दैवच अखेरीस श्रेष्ठ ठरतें असें एखाद्यानें म्हटल्यास लगेच त्यास 'तर मग तुम्ही हा प्रयत्न कां करतां?' दैवानेंच जर यश लाभतें तर तुम्ही परीक्षेला न बसतां पास होऊन दाखवा, कांहींहि व्यवहार न करतां संपत्ति मिळवून दाखवा, कोणताहि औषधोपचार न करतां आजार बरा करून दाखवा' असला वितंडवाद त्याच्याशीं केला जातो. पण यांत 'दैव' शब्दाची कल्पनाच आमूलाग्र चुकीची आहे. या सृष्टींत कोठेंहि 'केल्यावांचून होत नाहीं आणि पेरल्यावांचून उगवत नाहीं' हा नैसर्गिक नियम आहे, तो कोणीहि टाळूं शकत नाहीं. सुदैवी विद्यार्थी झाला तरी तो शाळेंत न जातां, पुस्तकहि न उघडतां व परीक्षेसहि न बसतां स्कॉलर म्हणून गाजतो असें नाहीं, आणि सुदैवी शेतकरी झाला तरी त्याच्या शेतांत बीं पेरल्याशिवाय पीक तरारत नाहीं. हें जर खरें, तर सुदैवी व दुर्दैवी यांत फरक काय असा प्रश्न पुढें येतो. या प्रश्नाचें उत्तर अगदीं साधें व स्पष्ट आहे व तें उत्तर नीट समजून घेतल्यास या कोड्याचा उलगडा होतो.

या जगांत कोणतेंहि फल लाभण्याला कांहीं तरी प्रयत्न हा करावाच लागतो; परंतु प्रयत्न करण्याच्या सर्वच बाबी प्रयत्न करणाऱ्याच्या स्वाधीनच्या नसतात. ज्या बाबी स्वस्वाधीनच्या असतात तेवढ्या तर ज्यानें त्यानें केल्याच पाहिजेत, त्याशिवाय त्यांस फलप्राप्ति होण्याचा संभवच नसतो, आणि एवढ्यापुरता प्रयत्नवाद हा आवश्यकच ठरतो; परंतु ज्या अनेक बाबी कार्यकर्त्याच्या स्वाधीन नसून परेच्छेवर अवलंबून असतात त्यांची वाट काय? त्या बाबी अनुकूल अथवा प्रतिकूल कार्यकर्त्याच्या हातच्या नसल्यानें तेथें व तेवढ्यापुरता दैवाचा संबंध येतो आणि अशा अदृष्ट गोष्टींतच 'सुदैवी' व 'दुर्दैवी' माणसांत फरक दिसून येतो. 'दृष्ट व्यवहार' हें दैवाचें क्षेत्र नसून तें प्रयत्नाचेंच क्षेत्र होय; परंतु 'अदृष्ट व्यवहार' हें दैववादाचें क्षेत्र आहे. याकरितांच 'दैवा'ला 'अदृष्ट' असा पर्यायशब्द आहे व त्या शब्दावरूनच प्रयत्नवाद कोठें संपतो व दैववाद कोठून सुरू होतो हें कळून येतें. प्रत्यक्ष उदाहरण घेऊन हें स्पष्ट करूं.

शेतांत पीक येण्यासाठीं शेत नांगरणें, बीं पेरणें इत्यादि कामें दृष्ट, आवश्यक व स्वस्वाधीन होत; परंतु पर्जन्यवृष्टि ही ईश्वराधीन असल्यानें तिचा अदृष्टांत समावेश होतो. परीक्षेची ग्रंथपठाणादि तयारी ही स्वावलंबी गोष्ट होय; परंतु परीक्षेच्या वेळीं ठराविक स्थळीं जातांना वाटेंत विघ्न उपस्थित न होतां किंवा इतर कोणतीहि अडचण न येतां परीक्षेला उपस्थित होणें ही गोष्ट अदृष्टाधीन होय. निवडणुकीच्या वेळीं मतें मिळविण्याचा प्रयत्न करणें हें स्वाधीनचें व असलेलीं मतें टपालमार्गें येतांना अतिवृष्टीमुळें रस्ता वाहून जाऊन टपाल न पोंचल्यानें मतें फुकट जाऊन निवडणुकींत हरणें हें अदृष्ट फलच नव्हे काय?

यावर कोणी अशी कोटी लढवील कीं, मिळालेलीं कांहीं मतें फुकट गेलीं एवढ्यानें जर कोणी निवडणूक हरला, तर त्याचा प्रयत्नच कमी पडला असें कां

1 JAN 1954

म्हणूं नये ? आणखी प्रयत्न करून पुरून उरण्याइतकीं मतें मिळविलीं असतीं, तर टपालमार्ग बंद पडल्यानें कांहीं मतें फुकट गेलीं तरी तो निवडून आला असता, म्हणजे प्रयत्नवादाचा जय झाला असता, तो प्रयत्न कमी पडला म्हणून पराजय झाला, त्यांत दैवाला दोष कां द्यावा ? या वितंडवादांतूनच या वादाच्या खऱ्या मर्मस्थानाचा उलगडा होणार आहे. अपयश आलें कीं, मागाहून हे शहाणे असें म्हणणार कीं आणखी थोडा प्रयत्न केला असता तर यश आलें असतें. ही पश्चात्बुद्धि काय कामाची ? कार्यसिद्धीसाठीं किती प्रयत्न करावयास हवा, इतरांनीं किती प्रयत्न केला आहे, त्या मानानें विशिष्ट व्यक्तीचे प्रयत्न कमी पडले कीं काय, याचा सापेक्षतेनें विचार करूनच कोणीहि प्रयत्नाची मर्यादा ठरवितो. असें असतां एखाद्यानें कमी परिश्रम करून त्यास यश आलें व दुसऱ्यानें त्याहून अधिक परिश्रम करून देखील त्यास यश लाभलें नाहीं, तर त्याचा दोष दैवाकडेच द्यावयास नको काय ? याचाच अर्थ असा कीं, ज्याला सापेक्षतेनें अल्पायासानें बहुत फळ मिळतें तो सुदैवी; उलटपक्षीं ज्याला बहुत परिश्रम करून त्या मानानें अत्यल्प फल मिळतें तो दुर्दैवी. सुपीक जमीन व नापीक जमीन यांच्या व्याख्येसारखीच सुदैवी व दुर्दैवी यांची व्याख्या आहे. सुपीक जमीन म्हटली तरी तिच्यांत बीं पेरल्याखेरीज पीक येत नाहीं; परंतु थोड्याशा परिश्रमांनें विपुल पीक येतें ती जमीन सुपीक. उलटपक्षीं शेतकऱ्यानें मरेमरेतों कष्ट केले तरच तिच्यांतून चार दाणे हातीं लागतात ती जमीन नापीक. प्रयत्नाचा अत्यंताभाव दोहोंतहि नसतो. पण एकांत एकपट श्रमाला दसपट फळ तर दुसऱ्यांत दसपट श्रमाला एकपट फळ. हेंच समीकरण सुदैवी माणूस व दुर्दैवी माणूस यांच्या यशापयशास लागू आहे. सुदैवी मनुष्य सहजासहजीं हात घालतो, तर त्याला ठेवा सांपडतो; दुर्दैवी मनुष्य प्रयत्नपूर्वक संचय करून ठेवतो तरी भूकंपासारख्या उलथापालथीनें त्याचा ठेवा बेपत्ता होतो. सुदैवी डिटेक्टिव्ह सहज कोणाशीं बोलतां बोलतां त्याला गुन्हेगाराचा धागादोरा मिळतो; दुर्दैवी डिटेक्टिव्हला माहिती देण्याचा कोणीं प्रयत्न केला, तरी ती वेळेवर त्याच्या हातीं न पोंचल्यानें त्याचा बेत फिसकटतो.

अशीं शेंकडों उदाहरणें दाखवितां येतील. या सर्वांच्या बुडाशीं जें तत्त्व आहे तें हेंच कीं, सुदैवी व दुर्दैवी यांच्या प्रयत्न करण्याच्या इच्छेंत अंतर पडत नसून, त्यांच्या इच्छेच्या स्वाधीन नसलेल्या कांहीं अदृष्ट गोष्टी एकास अनुकूल असतात, त्या त्यास यश देतात व त्या दुसऱ्यास प्रतिकूल असून त्या त्यास अपयश देतात अथवा परिश्रमाच्या मानानें अत्यल्प यश देतात. अर्थातच दृष्टापेक्षां अदृष्टाचें क्षेत्र अधिक विस्तृत आणि दृष्ट विघ्नांचा जसा प्रतिकार करतां येतो तसा अदृष्ट विघ्नांचा प्रतिकार करतां येत नसल्यामुळें अदृष्ट विघ्नांपुढें मनुष्य हातटेकीस येतो-म्हणजेच पर्यायानें प्रयत्नवादापेक्षां दैववाद श्रेष्ठ ठरतो; परंतु याचा निष्कर्ष असा

नव्हे कीं, दैववादावरच अवलंबून माणसानें प्रयत्नाला रामराम ठोकावा ! प्रयत्नांशिवाय फल नाहीं हा तर निसर्गसिद्ध ठाम सिद्धान्त आहे. तेव्हां सुदैवी माणसानेंहि यत्न चालू ठेवलाच पाहिजे; आणि दुर्दैवी माणसाला पुष्कळ श्रमानें अल्प फळ मिळणार असल्यानें त्यानेंहि तेवढें फल मिळण्यासाठीं परिश्रम केलेच पाहिजेत; नाहीं तर तेवढेंहि फल हातचें जाईल !

हा सामान्य विचार फलज्योतिषाच्या भाषेंत कसा बसावयाचा तें पाहूं. जन्मकुंडलीवरून ज्या ज्या भावाचें फल उत्तम मिळणार असें दिसून येईल त्या त्या भावाचें तें तें फल पदरांत पडण्यास थोडेबहुत तरी परिश्रम करावे लागणारच; पण त्यांत कमींत कमी परिश्रमानें त्यास मोठें घबाड मिळेल. उलटपक्षीं जे ग्रह प्रतिकूल असतील त्यांचें अनिष्ट फल टळावें म्हणून त्यास विशेष परिश्रम करणें प्राप्त आहे. याचाच अर्थ असा कीं, प्रत्येक व्यक्तीला ज्या गोष्टी साधावयाच्या किंवा अनिष्ट गोष्टी टाळावयाच्या असतील त्यांत तो सुदैवी असल्यास ग्रहांची अनुकूलता मिळून त्याचे श्रम वांचतील. मात्र तो दुर्दैवी असल्यास ग्रहांच्या प्रतिकूलतेविरुद्ध त्यास झगडावें लागेल. सुदैवी मनुष्य हा नदीच्या प्रवाहानुरूप पोहणाऱ्याप्रमाणें सहज लीलेनें पोहत जाईल आणि दुर्दैवी मनुष्य प्रवाहाच्याविरुद्ध पोहणाऱ्याप्रमाणें एकसारखा धडपडून खूप शक्ति खर्चून थोडीशीच मजल गाठूं शकेल; पण दोघांनाहि जशी पोहण्याची कला ही अवगत पाहिजेच, त्याप्रमाणें सुदैवी व दुर्दैवी दोघांनींहि प्रयत्न हा केलाच पाहिजे; आणि अतिपरिश्रम करून नदीच्या प्रवाहाविरुद्ध देखील जसें पोहतां येतें त्याचप्रमाणें अतिपरिश्रम करून ग्रहांच्या प्रतिकूलतेविरुद्ध झगडून कांहीं तरी यश मिळवितां येतें. याचाच अर्थ ग्रहांचें फळ पूर्णतः अटळ नसून टळ आहे असा होतो; परंतु यांतूनच असाहि सिद्धान्त निघतो कीं, ग्रह प्रतिकूल असल्यास त्याला आपत्ति टाळण्यास जिवापाड परिश्रम करावे लागतात; म्हणजे जिवापाड परिश्रम करावे लागणें ही गोष्ट अटळच ठरली. अर्थातच प्रत्येक व्यक्तीच्या जन्मकालाप्रमाणें त्याला कांहीं ग्रह प्रतिकूल असतात आणि कांहीं अनुकूल असतात. हें आनुकूल्य वा प्रातिकूल्य अटळ आहे. तथापि अनुकूलतेचा फायदा किती घ्यावयाचा आणि प्रतिकूलतेशीं झगडून किती आपत्ति टाळावयाची हें ज्याच्या त्याच्या प्रयत्नावर अवलंबून आहे. यास्तव 'अदृष्टाची रेखा कोणींहि ओलांडूं शकत नाहीं,' हें खरें असलें तरी 'उद्धरेदात्मनात्मानं' हा सिद्धान्तहि खराच आहे. कालावधि आणि परिश्रम यांत मात्र उभयतांत मोठाच फरक पडणार.

गांधीजींच्या नुकत्याच घडून गेलेल्या उपोषणानें ग्रहांचीं फलें टळ असतात का अटळ असतात, याचा एकप्रकारें प्रयोगपूर्वक उलगडाच झाला असें मानण्यास हरकत नाहीं. गांधींनीं उपवास सुरू केला त्या वेळीं त्यांना ग्रह प्रतिकूल होते. विशेषतः त्यांच्या उपवासांतले दहा ते पंधरा हे दिवस त्यांना अत्यंत प्रतिकूल होते. अर्थातच त्या दिवसांत त्यांची प्रकृति इतकी खालावली कीं, एके दिवशीं तर कांहीं काळपर्यंत

त्यांची नाडी लागेना इतकी क्षीण झाली होती. तथापि डॉ. बिधनचंद्र रॉय यांच्यासारखे धन्वंतरी त्यांच्या शुश्रूषेला असल्यानें त्यांनीं तितक्याहि संकटांतून त्यांचे प्राण वांचविले. ग्रहांच्या प्रतिकूलतेशीं डॉक्टर झगडले आणि ग्रहांच्या प्रतिकूलतेचा काल मर्यादित असल्यानें तो अवधि संपतांच गांधींची प्रकृति पुनश्च ठिकाणावर येऊं लागली. यावरून ग्रहांचें फळ टाळतां येतें हें खरें; तथापि तें टाळावयाला किती जबर तयारी असावी लागते व केवढे परिश्रम करावे लागतात हेंहि त्याबरोबरच सिद्ध झालें आणि इतकी तयारी व इतके परिश्रम करण्याचीं साधनें सर्वांस मिळण्याजोगीं नसल्यानें त्यांच्या बाबतींत तें फळ अटळच ठरतें. याकरितांच डॉक्टर ज्याप्रमाणें कोणत्याहि रोग्यास त्याचा रोग असाध्य आहे म्हणून न सांगतां तो कष्टसाध्य आहे म्हणून सांगतात, त्याचप्रमाणें ज्योतिष्यानेंहि कोणाहि व्यक्तीवर ओढवलेली कोणतीहि आपत्ति अटळ म्हणून न सांगतां परिश्रमानें टळण्याजोगी आहे असें सांगावें. परिश्रम किती करावे लागणार व तितके करण्याची शक्यता आहे कीं नाहीं हें ज्याच्या त्याच्या परिस्थितीवर अवलंबून राहील. शनीची एक प्रहर साडेसाती आली असतां ती टाळण्याकरितां महादेव एक प्रहर पाण्यांत लपून बसले आणि मग बाहेर येऊन त्यांनीं शनीला 'तूं माझें काय वांकडें केलेंस' असें विचारलें. शनीनें सरळ उत्तर दिलें कीं, माझ्या धास्तीनें तुम्ही एक प्रहर लपून बसला हा माझाच प्रभाव नव्हे काय ! या कथेंतलें रहस्य मोठें मार्मिक आहे. यांत ग्रहांचें फळ अटळ कसें व टळ कसें याचा उलगडा आहे. साडेसाती आल्यामुळें शंकराला लपावें लागलें ही गोष्ट टळली नाहीं, पण लपून बसल्यामुळें इतर आपत्ति टळली. नोकरींतून बडतर्फी टाळण्यासाठीं कांहीं दिवस रजा घेऊन जाणें हा लौकिक व्यवहारहि वाईट फळ प्रयत्नानें कसें टाळतां येतें हेंच दर्शवितो.

## जन्मकाळ व मृत्युकाळ यांचा संबंध : : ५

फलज्योतिषांत जे अनेक गूढ प्रश्न सोडवावे लागतात त्यांत सर्वांत महत्त्वाचा व तितकाच कठीण प्रश्न मृत्युकाल निश्चित सांगणें हा होय. इतर बाबतींत उत्तर नक्की बरोबर आलें का नाहीं याविषयीं संशयाला जागा राहते. सुखदुःख, संपत्ति वा दारिद्र्य, बुद्धिमत्तेचें प्रमाण इत्यादि गोष्टी अशाच संशयास्पद स्वरूपाच्या होत. त्यामुळें त्या संबंधाचें भविष्य तंतोतंत खरें ठरलें का नाहीं हें पाहण्याला अचूक प्रमाणबद्ध असें साधन नसतें. मृत्युकाल ही संशयातीत गोष्ट आहे. जन्मकाल हा जसा त्या त्या व्यक्तीचें भविष्य वर्तविण्याच्या साधनाचा पाया आहे, तसा मृत्युकाल हा त्या व्यक्तीच्या भविष्याचा शेवट होय. अर्थातच जन्मकालीन कुंडली

( ज्योतिषतत्त्वदर्शन : वैशाख शुद्ध १०, शके १८६५ )

आणि त्याच कुंडलींतले मृत्युकालचे गोचरीचे ग्रह यांच्यांत कांहीं निश्चित संबंध असला पाहिजे. तेव्हां असा संबंध दर्शविणें हें एक फलज्योतिषशास्त्राच्या शास्त्रीयत्वाचें प्रमाणच होय. याकरितां कांहीं प्रसिद्ध पुरुषांच्या जन्मकालीन कुंडल्या मांडून त्याच कुंडलींत मृत्युकाळचे ग्रह मांडले असतां त्यावरून कोणते नियम निघतात तें येथें दाखवावयाचें आहे.

यासंबंधांत प्राचीन शास्त्रकारांनीं जे नियम दिले आहेत ते **'जातकतत्त्व'** या ग्रंथांत **दैवज्ञवर्य श्रीमहादेव शर्मा** यांनी संकलित करून दिले आहेत. ते नियम असे :–

( १ ) लग्न किंवा चंद्र यापासून शनि २ रा, राहु ४ था, रवि ८ वा, मंगळ १२ वा असे एकाच वेळीं येणें.

( २ ) सगळे पापग्रह लग्नांत किंवा जन्मराशींत येणें.

( ३ ) सगळे पापग्रह लग्नाच्या किंवा जन्मराशीच्या सप्तमांत येणें.

( ४ ) लग्न अथवा जन्मराशि आणि लग्नाचें अथवा जन्मराशीचें सप्तम स्थान या दोहोंत मिळून सगळे पापग्रह येणें.

( ५ ) लग्न अथवा जन्मराशि यापासून प्रथम, अष्टम व द्वादश यांत सर्व पापग्रह येणें.

( ६ ) सगळे ग्रह जन्मकाळच्या स्थानाच्या संमुख स्थानांत म्हणजे सप्तमांत जाणें.

( ७ ) लग्न, द्वितीय स्थान व बारावें स्थान यांत सर्व ग्रह येणें किंवा लग्नापासून ६, ७ व ८ या स्थानांत सर्व ग्रह येणें.

जातकतत्त्व या ग्रंथांत हे जे नियम दिले आहेत ते तर अनुभवसिद्ध आहेतच; पण ते नियम अपुरे आहेत, यास्तव यासंबंधाचें आणखी कित्येक अनुभवसिद्ध नियम पुढें देत आहे :–

( १ ) वरील नियमांत चतुर्थ व दशम हीं स्थानें बिघडण्याचा उल्लेख नाहीं, तो अवश्य पाहिजे.

( २ ) मृत्युकालीं शुभग्रहावर राहु, केतु, शनि, मंगळ, हर्शल आल्यानें जसें शुभग्रह बिघडतात व निर्बळ होतात, तसेंच गुरु, चंद्र, रवि हे ग्रह जन्मकुंडलींत ज्या स्थळीं शनि, मंगळ, हर्शल, राहु व केतु असतील त्या स्थळीं आल्यानेंहि निर्बळ होऊन बसतात. म्हणजे शुभग्रहावर क्रूरग्रह येणें अथवा क्रूरग्रहाच्या स्थानीं शुभग्रह जाणें हीं दोन्ही कारणें मृत्यु येण्याला संभवतात.

( ३ ) प्राचीन ग्रंथांत हर्शल व नेपच्यून यांचा विचार सांगितला नाहीं; परंतु क्रूरग्रहांत हर्शल हा विशेष बलवान् व घातकारक दिसतो. त्यामुळें हर्शल जन्मस्थ चंद्रावर, रवीवर अथवा जन्मस्थानावर येणें किंवा त्यांच्या समोर येणें अगर षष्ठ-अष्टम-द्वादश स्थानांत येणें हें मृत्युकारक ठरतें.

( ४ ) नेपच्यून हा ग्रह हर्शलइतका तीव्र परिणामकारक नसला, तरी मृत्युकाळीं तो स्वतः बिघडलेला असतो आणि तो स्वतः बिघडलेला असल्यास त्याची चंद्रादि शुभग्रहांवरची अथवा जन्मलग्नावरची दृष्टि मारक होते.

( ५ ) राहु, केतु, मंगळ, हर्शल, शनि हे ग्रह तनुस्थान किंवा राशिस्थान यांच्यावर अथवा तेथून द्वितीय, चतुर्थ, षष्ठ, सप्तम, अष्टम व द्वादश या स्थानीं आल्यानें मारक होतात; पण इतक्या स्थानांतून ते कोणत्या कुंडलींत कोणत्या विशिष्ट स्थानीं आले म्हणजेच मारक होतात हें निश्चित करतां येत नाहीं. हें कळणें म्हणजे जन्मकुंडलींतलें मर्मस्थान कळणें होय व तें मर्मस्थान नेमकें सांगतां येईल, तर मृत्युकाळ नक्की सांगतां येईल; परंतु मर्मस्थानें अनेक असतात आणि त्य.तलें कोणतें मारक होईल तें तत्कालीन परिस्थितीवरूनच ठरतें. यास्तव रोगी आजारी पडला असतांना त्याला भीति आहे का नाहीं, हें सांगतां येईल; पण तो कधीं आजारी पडेल हें अगाऊ निश्चितपणें सांगतां येणार नाहीं, नुसता संभव सांगतां येईल.

हे जे नियम सांगितले त्यांचा पडताळा पाहण्याकरितां शेवटीं अनेक कुंडल्यांचे ग्रहयोग दिले आहेत. त्यांतील प्रत्येक कुंडलींत कोणते ग्रह मृत्युकाळीं बिघडले व मारक झाले त्याचा त्या त्या कुंडलींच्या नंबरवारीनें खुलासा केला आहे. त्यावरून सामान्य नियम निघतात ते असे :–

( १ ) जन्मस्थ चंद्र, रवि आणि जन्मलग्न व लग्नाधिपति या चोहोंतून एक, दोन, तीन अथवा चारहि मृत्युकाळीं बिघडलेले असतात.

( २ ) रवि, चंद्र, जन्मलग्न व लग्नाधिपति बिघडण्याचे प्रकार अनेक आहेत; पण त्यांतले विशेष अनुभवास येणारे प्रकार पुढीलप्रमाणें आहेत :–

( अ ) चंद्र अगर रवि यांवर राहु-केतु येणें. ( आ ) चंद्र अगर रवि यांच्यासमोर शनि येऊन त्याची पूर्ण दृष्टि रविचंद्रांवर पडणें. ( इ ) जन्मलग्नकुंडलींत राहु, केतु, हर्शल, मंगळ हे मारकस्थानीं अथवा अष्टम-द्वादश स्थानीं येणें. ( ई ) जन्मकुंडलींतलें चतुर्थ व दशम स्थान बिघडणें.

यांतहि प्रत्येक कुंडलींत थोडेंफार वैशिष्ट्य असतें, त्यामुळें मारकग्रहांतहि फरक असलेला दिसून येतो. मूळ कुंडलींतले ग्रह दीर्घायुष्य दर्शवीत असल्यास एखाददुसरा ग्रह बिघडल्यानें मृत्यु ओढवत नाहीं; त्यास मारकग्रहांचीहि बॅटरी तितकीच जोरदार व्हावी लागते; पण जेथें जन्मतःच अशुभ योग विशेष असतात तेथें एखाददुसरा अशुभ योगहि मारक होऊं शकतो. या निबंधांत दिलेल्या कुंडल्यांत अल्पायु योगाची कुंडली एकहि नाहीं. त्यामुळें जन्मलग्नकुंडलींत सगळेच शुभाशुभग्रह राशिस्थानपरत्वें मारक झाल्याविना मृत्यु घडलेला नाहीं.

वरील नियमांच्या स्पष्टीकरणार्थ म्हणून २०।२१ कुंडल्या यापुढें दिल्या आहेत. जन्मलग्नकुंडलींतले ग्रह प्रथम मांडून त्यांच्याच पुढें त्याच जन्मलग्नकुंडलींत मृत्युकाळचे गोचरीचे ग्रह कोणते होते तें दिलें आहे; आणि प्रत्येकाच्या मृत्यूला कारणीभूत झालेली ग्रहस्थिति वर्णिली आहे. तीवरून वर नमूद केलेल्या नियमांचा अभ्यासकाला पडताळा पाहतां येईल.

| क. | नांव | ज.ल. | रवि | चंद्र | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि | राहु | केतु | हर्शल | नेप. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | गणकभास्कर विष्णु गोपाळ नवाथे | कुंभ | २ | ४ | १ | २ | १२ | ३ | ८ | ५ | ११ | ३ | १२ |
| | ज. २६-५-१८६८ मृ. ३-८-१९३१ | मृ. प्र. | ४ | १२ | ६ | ५ | ४ | ४ | १० | १२ | ६ | १२ | ५ |
| २ | श्री. शिवराम महादेव परांजपे | मीन | ३ | १२ | १२ | २ | ७ | ३ | ६ | ७ | १ | ३ | १२ |
| | ज. २६-६-१८६४ मृ. २७-९-१९२९ | मृ. प्र. | ६ | ३ | ७ | ७ | २ | ५ | ९ | १ | ७ | १२ | ५ |
| ३ | श्रीमंत सर बाळासाहेब मिरजकर | धनु | १० | ७ | १० | १० | ९ | १० | ७ | ६ | १२ | ३ | १० |
| | ज. ५-२-१८६६ मृ. १५-१२-१९३९ | मृ. प्र. | ९ | १० | १२ | ८ | १२ | ८ | १ | ७ | १ | १ | ६ |
| ४ | वैद्य शंकरशास्त्री पराडकर | कर्क | १० | ८ | १२ | ९ | १२ | ९ | ६ | १ | ७ | ७ | २ |
| | ज. १४-१-१८९३ मृ. १९-७-१९४२ | मृ. प्र. | ४ | ६ | ५ | ३ | ३ | ३ | २ | ५ | ११ | २ | ६ |
| ५ | श्रीमंत प्रतापसिंहराव, सांगली | मकर | ८ | ८ | ९ | ८ | १ | ७ | ४ | १० | ४ | १० | ४ |
| | ज. २६-११-१९१६ मृ. २२-८-१९४२ | मृ. प्र. | ५ | ९ | ५ | ५ | ३ | ४ | २ | ५ | ११ | २ | ६ |
| ६ | श्री. हरी नारायण आपटे | धनु | ११ | ११ | १० | ११ | ८ | १० | ६ | ८ | २ | ३ | १२ |
| | ज. ८-३-१८६४ मृ. ३-३-१९१९ | मृ. प्र. | ११ | ११ | १२ | ११ | ३ | १२ | ५ | ८ | २ | ११ | ४ |
| ७ | श्री. विश्वनाथ काशीनाथ राजवाडे | कन्या | ३ | ६ | ४ | २ | ६ | ४ | ६ | ८ | २ | ३ | १२ |
| | ज. २४-६-१८६३ मृ. ३१-१२-१९२६ | मृ. प्र. | ९ | ७ | १ | ९ | ११ | ९ | ८ | ३ | ९ | १२ | ५ |
| ८ | श्री. अच्युत बळवंत कोल्हटकर | तूळ | ४ | १० | १ | ५ | ११ | ६ | १२ | १० | ४ | ५ | १ |
| | ज. १-८-१८७९ मृ. १५-६-१९३१ | मृ. प्र. | ३ | २ | ५ | २ | ४ | २ | १० | १२ | ६ | १२ | ५ |
| ९ | गी. वा. सदाशिवशास्त्री भिडे | वृषभ | ७ | १० | ७ | ८ | ९ | ७ | १२ | १२ | ६ | ५ | १ |
| | ज. २०-९-१८७६ मृ. ९-१२-१९३९ | मृ. प्र. | ८ | ८ | १० | ८ | १२ | ९ | १ | ७ | १ | १ | ६ |
| १० | रा. ब. नारायणराव केळकर | कर्क | २ | १२ | ५ | ३ | १ | ३ | ८ | ४ | १० | ३ | १ |
| | ज. ४-६-१८६९ मृ. २५-४-१९४१ | मृ. प्र. | १ | १ | १० | १ | २ | १ | १ | ६ | १२ | २ | ६ |

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ११ | स्वामी श्रद्धानंद | कन्या | १२ | १ | ६व | ११ | ११ | १० | ३ | १ | ७ | २ | १२ |
| | ज. ९-३-१८५६ मृ. २३-१२-१९२६ | मृ.प्र. | ९ | ४ | १ | ८ | ११ | ९ | ८ | ३ | ९ | १२ | ५ |
| १२ | ना. गोपाळ कृष्ण गोखले | तूळ | १ | ११ | १२ | १ | १० | २ | ७ | ६ | १२ | ३ | १२ |
| | ज. ९-५-१८६६ मृ. १९-२-१९१५ | मृ.प्र. | ११ | १ | १० | ११ | ११ | ९ | ३ | ११ | ५ | १० | ४ |
| १३ | श्री. विश्वनाथ बळवंत टिळक | मिथुन | ३ | १२ | ५ | ३ | २ | ४ | २ | ८ | २ | ५ | १ |
| | ज. ७-७-१८८२ मृ. २८-१-१९०३ | मृ.प्र. | १० | १० | ६ | १० | ११ | १० | १० | ६ | १२ | ९ | ३ |
| १४ | श्रीमंत सयाजीरावमहाराज गायकवाड | धनु | ११ | ७ | २ | ११ | ७ | १२ | ६ | ८ | १ | ३ | १२ |
| | ज. ११-३-१८६३ मृ. ६-२-१९३९ | मृ.प्र. | १० | ६ | ८ | १० | ११ | ९ | १२ | ७ | १ | १ | ६ |
| १५ | महर्षि अण्णासाहेब पटवर्धन | मिथुन | १ | ९ | ११ | १२ | २ | २ | ११ | ६ | १२ | १ | ११ |
| | ज. ४-४-१८४७ मृ. २-२-१९१७ | मृ.प्र. | १० | २ | १० | ९ | १ | १० | ४ | ९ | ३ | ११ | ४ |
| १६ | रा. सा. विश्वनाथ नारायण मंडलिक | वृषभ | ११ | ६ | २ | १२ | १२ | १ | ६ | ४ | १० | १० | १० |
| | ज. ८-३-१८३३ मृ. ९-५-१८८९ | मृ.प्र. | १ | ५ | २ | २ | ९ | १ | ४ | ३ | ९ | ६ | २ |
| १७ | लो. बाळ गंगाधर टिळक | कर्क | ४ | १२ | ७ | ३ | १२ | ४ | ३ | १२ | ६ | २ | १२ |
| | ज. २३-७-१८५६ मृ. १-८-१९२० | मृ.प्र. | ४ | १० | ७ | ४ | ५ | ४ | ५ | ७ | १ | ११ | ४ |
| १८ | श्री. लक्ष्मण जनार्दन आपटे | धनु | ३ | २ | ३ | ४ | ६ | ५ | १० | १ | ७ | ४ | १ |
| | ज. ११-७-१८७३ मृ. १८-८-१९२६ | मृ.प्र. | ५ | ८ | १ | ४ | १० | ६ | ८ | ३ | ९ | १२ | ५ |
| १९ | ना. दाजी आबाजी खरे | मकर | ९ | ११ | ६ | १० | ११ | ८ | ३ | १ | ७ | २ | ११ |
| | ज. ११-१-१८५६ मृ. २१-८-१९१६ | मृ.प्र. | ५ | २ | ६ | [illegible] | १ | ३ | ४ | १० | ४ | १० | ४ |
| २० | श्री. गोविंदराव माळोजीराव घोरपडे | कर्क | १० | ७ | ६ | १० | ११ | १० | १० | ६ | १२ | ८ | ३ |
| | ज. २०-१-१९०३ मृ. मार्च १९२० | मृ.प्र. | ११ | ७ | ७ | १२ | ४ | ११ | ५ | ७ | १ | ११ | ४ |
| २१ | दि ड्यूक ऑफ केंट | कर्क | ९ | ५ | ६ | [illegible] | १० | ९ | १० | ७ | १ | ९ | ३ |
| | ज. २०-१२-१९०२ मृ. २५-८-१९४२ | .प्र. | ५ | ११ | ५ | [illegible] | ३ | ४ | २ | ५ | ११ | २ | ६ |

JAN 1994

(१) जन्मस्थ चंद्रासमोर द्वादशांत शनि, गोचरीच्या रवीसमोर शनि, केतु व मंगळ अष्टमांत, हर्शल व राहु द्वितीयांत, चंद्र मारकस्थानीं मंगळानें पूर्ण-दृष्ट, नेपच्यून मूळच्या राहु-क्षेत्रांत.

(२) मूळ चंद्रावर तनुस्थानीं हर्शल, मूळ रवीसमोर शनि, शनिस्थानीं रवि, अष्टमांत मंगळ व केतु, नेपच्यून षष्ठांत.

(३) जन्मस्थ चंद्रासमोर शनि, हर्शल व केतु, जन्मस्थ चंद्रावर राहु, मंगळ चतुर्थस्थानीं, नेपच्यून दशमस्थानीं मूळच्या राहूवर व मंगळ दृष्ट.

(४) जन्मस्थ चंद्रासमोर नेपच्यूनवर शनि-हर्शल, द्वितीय-अष्टमांत राहु-केतु, जन्मस्थ शनीवर नेपच्यून, द्वितीयांत मंगळ व त्याची जन्मस्थ चंद्रावर पूर्ण दृष्टि. शनि-हर्शल युति व त्यांची जन्मलग्नावर पूर्ण दृष्टि.

(५) जन्मस्थ रवि-चंद्रासमोर शनि-हर्शल युति, अष्टमांत राहु-मंगळ, चंद्र द्वादशांत, गुरु जन्मस्थ चंद्राच्या अष्टमांत व जन्मलग्नाच्या षष्ठांत.

(६) जन्मस्थ रविचंद्रावर हर्शल, रवि चंद्रासमोर शनि, राहु-केतु पूर्वीचेच ६ व १२ स्थानीं, नेपच्यून अष्टमस्थानीं, मंगळ चतुर्थस्थानीं व गुरु जन्मस्थ हर्षलच्या क्षेत्रांत.

(७) मूळच्या रवीवर राहु-केतु, मूळच्या नेपच्यूनवर हर्षल व त्याची जन्मस्थानावर व जन्मस्थ चंद्रावर पूर्ण दृष्टि, अष्टमांत मंगळ, द्वादशांत नेपच्यून, नपच्यूनच्या पूर्ण दृष्टींत षष्ठांत गुरु, तनुस्थानाचा अधिपति अस्तंगत व पाताळकेंद्री.

(८) तनुस्थानचा अधिपति शुक्र अष्टमांत, चंद्र अष्टमांत, राहु-केतु षष्ठ-द्वादश स्थानीं व त्यांची दृष्टि जन्मस्थ चंद्र-रवि-शनि यांवर, हर्षल षष्ठांत, जन्मस्थ चंद्रावर शनि, जन्मस्थ रवीसमोर शनि.

(९) तनुस्थानचा अधिपति शुक्रावर राहु, जन्मस्थ चंद्रावर मंगळ, राहु-केतु षष्ठ-द्वादश, मूळच्या नेपच्यूनवर हर्शल आणि शनि, मूळ रवीसमोर शनि-हर्शल-केतु, मूळ रवीवर राहु.

(१०) जन्मकालीन तनुस्थानचा अधिपति चंद्रावर राहु-केतु, जन्मस्थ रवीवर हर्शल, दशमांत पंचग्रही. त्यांत रवि-शनि, जन्मकालीन शनीसमोर हर्शल.

(११) मंगळ अष्टमांत, जन्मस्थ रवीवर व नेपच्यूनवर हर्शल, हर्शलची तनुस्थानावर दृष्टि, नेपच्यून द्वादशांत, तनुस्थानचा अधिपति बुध त्यावर शनि, जन्मस्थ चंद्रावर मंगळ.

(१२) जन्मस्थ चंद्रावर राहु, हर्शलवर शनि, गुरूवर चतुर्थस्थानीं हर्शल व मंगळ, समोर नेपच्यून.

(१३) जन्मस्थ चंद्रावर दशमांत केतु, चतुर्थांत मंगळ व राहु, अष्टमांत पंचग्रही रवि, चंद्र, शनि, बुध, नेपच्यून, हर्शल तनु व सप्तमांत प्रतियुति. जन्मस्थ रवीवर हर्शलची दृष्टि.

JAN 1994

(१४) जन्मस्थ चंद्रावर राहु, जन्मस्थ चंद्रासमोर हर्शल व केतु, जन्मकाळच्या शनीवर नेपच्यून, नेपच्यूनवर शनि, द्वादशस्थानीं मंगळ.

(१५) जन्मस्थ चंद्रावर राहु, तनुस्थानीं केतु, मंगळ अष्टमांत, त्यासमोर शनि व नेपच्यून, जमस्थ रवीवर शनीची पूर्ण दृष्टि, गोचरीच्या रवीवर शनीची पूर्ण दृष्टि, जन्मस्थ शनीवर हर्शल.

(१६) वक्री हर्शल चंद्रावर, नेपच्यून तनुस्थानीं मंगळासह, चंद्र-शनि हर्शलच्या कर्तरींत, राहु-केतु द्वितीय अष्टम.

(१७) जन्मस्थ रवीवर नेपच्यून, अष्टमांत हर्शल, राहु-केतु चतुर्थ दशमांत, शनि द्वितीयांत मारकस्थानीं हर्शलनें पूर्णदृष्ट.

(१८) मूळ रवीवर राहु, मूळ चंद्रासमोर शनि द्वादशांत व चंद्र शनीबरोबर, हर्शल चतुर्थांत मूळच्या गुरूसमोर (तनुस्थानच्या अधिपतीवर पूर्ण दृष्टि). राहु-केतु लग्नस्थ व सप्तमस्थ.

(१९) राहु, केतु, तनु व सप्तमस्थानीं, शनि-नेपच्यून सप्तमांत, हर्शल तनुस्थानांत, लग्नाधिपति शनीवर हर्शलची पूर्ण दृष्टि, रवि अष्टमांत, चंद्र हर्शलच्या क्षेत्रांत व केतूनें दृष्ट.

(२०) तनुस्थानाचा अधिपति चंद्र त्यावर राहु व मंगळ, जन्मस्थ चंद्रावर शनीची पूर्ण दृष्टि, अष्टमस्थानीं गुरूवर हर्शल, रवि-हर्शलसमोर शनि, द्वितीय अष्टम शनि-हर्शल प्रतियोग, जन्मकालीन रविसमोर नेपचून.

(२१) जन्मस्थ चंद्रावर मारकस्थानांत राहु, रवि-मंगळ, शनि-हर्शल युति व तनुस्थानावर त्यांची पूर्ण दृष्टि, शनीची अष्टमस्थ चंद्रावर पूर्ण दृष्टि, तनुस्थानचा अधिपति चंद्र अष्टमांत व त्याच्या समोर मंगळ.

---

## संस्थानिकांना कृतज्ञतापूर्वक श्रद्धांजलि : : ६

[ **संस्थानिकांना कृतज्ञतापूर्वक श्रद्धांजलि** हा लेख म्हणजे केवळ कृतज्ञतेचे उद्गार असल्यानें त्याला प्रस्तावनेची जरुरी नाहीं. दक्षिण-महाराष्ट्रांतील सर्व संस्थानांचा, त्यांत कोल्हापूर सुद्धां समाविष्ट करून, एक गट करून काठेवाडांतील, मध्यभारतांतील, राजपुतान्यांतील संस्थानांप्रमाणें, हींहि संस्थानें एका गटानें दक्षिण-महाराष्ट्रप्रदेश म्हणून राहावीं अशी तीव्र इच्छा होती. दुर्दैवानें संस्थानिकांना चांगला सल्ला लाभला नाहीं व संस्थानिकांत एकमत होऊं शकलें

(सह्याद्रि, एप्रिल १९४८)

नाहीं, त्यामुळें सगळीं संस्थानें विलीन झालीं. या विलीनीकरणामुळें संस्थानांतील अनेक समाजोपयुक्त परंपरांना धक्का बसला. त्या संबंधांत खेद व्यक्त करून, संस्थानिकांच्या आश्रयच्छायेखालीं जे लाभ मिळाले त्याबद्दल निदान चार शब्दांनीं कृतज्ञता तरी व्यक्त करावी याच भावनेनें हा लेख लिहिला असून, हें कृतज्ञतेचें व्यक्तीकरण स्थिर रूपांत राहावें या भावनेनें हा लेख या संग्रहांत समाविष्ट केला आहे. ]

## पूर्वज काय म्हणत असतील ?

कालाचा ओघ अत्यंत विचित्र आहे. एका काळीं जी घटना अभिनंदनीय व अभिमानास्पद मानली जाई, तिच्या अगदीं उलट घटना कालान्तरानें अभिनंदनीय मानली जावी, असली विपरीत उलटापालट कालच करूं शकतो. महाराष्ट्राच्या इतिहासांत असा एक काळ होता कीं, त्या वेळीं वीर पुरुषांच्या पराक्रमाचें चीज जहागिरीच्या दानानें केलें जात असे आणि अशी जहागीर संपादन करणें व शत्रूच्या तोंडावर ती राखणें पराक्रमाचें अभिनंदनीय लक्षण समजलें जाई. हैदर आणि टिपू यांच्यासारख्या कडव्या शत्रूंच्या आक्रमक घाल्यापासून दक्षिण महाराष्ट्र आणि उत्तर कर्नाटक यांचें संरक्षण करण्यांत पटवर्धन सरदारांनीं अतुल पराक्रम गाजविला आणि अनेक वीर पुरुष बळी दिले, म्हणून पेशव्यांनीं पटवर्धन सरदारांना त्या भागांत जहागिरी देऊन हैदर व टिपू यांच्या छातीवर कट्यार रोखल्याप्रमाणें पटवर्धन सरदारांची त्या भागांत स्थापना केली. त्या वेळीं गोविंद हरि, गोपाळराव गोविंद, परशुराम रामचंद्र इत्यादिकांच्या पूर्वजांना स्वर्गांत केवढी धन्यता वाटली असेल; आणि आतां त्याच पटवर्धनांचे एकेक वंशज आपलीं संस्थानें सोडून देऊन विलीनीकरणांत पहिला क्रमांक कोण मिळवितो याविषयीं अहमहमिकेनें स्पर्धा करीत असलेले पाहून त्या पूर्वजांना काय वाटत असेल, याची कल्पनाहि करवत नाहीं. पटवर्धनांचीं संस्थानें अनेक म्हणून त्यांचाच निर्देश वर केला आहे; पण तो उपलक्षणार्थ समजावा. पटवर्धनांच्या पूर्वजांच्या मनाची जी स्थिति तीच स्थिति पंतसचिव, पंतप्रतिनिधि, डफळे, निंबाळकर, भावे, घोरपडे इत्यादिकांच्या पूर्वजांचीहि असणार हेंहि क्रमप्राप्तच आहे.

## विलीनीकरणाचा पहिला धडा !

बदललेल्या परिस्थितींत पूर्वींच्या कृतीच्या अगदीं उलट कृति देखील अभिनंदनीय ठरूं शकते; याचा एक दाखला प्रस्तुत काळीं कित्येकांच्या मनाला समाधान देण्याला उपयोगी पडेल, म्हणून त्याचा उल्लेख करतों. मुंबईहून पुण्यापर्यंत आगगाडीचा रस्ता करण्याच्या वेळीं बोरघाटांतून रस्ता कसा काढावा याचें इंजिनियरांना कोडें पडलें होतें. त्या वेळीं खंडाळ्याच्या पलीकडे ‘ रिव्हर्सिंग

स्टेशन ' करून गाडी उलटवून पुढें नेण्याची युक्ति ज्या इंजिनियरनें यशस्वी करून दाखविली त्याचें त्या वेळीं त्या क्लृप्तीबद्दल अभिनंदन झालें. स्मारकहि झालें आणि इतरत्र त्याचें अनुकरणहि होऊं लागलें. कालांतरानें बोगदे खोदण्याच्या साधनांत सुधारणा झाल्यावर ही 'रिव्हर्सिंग'ची ब्याद त्रासदायक वाटूं लागली. त्या वेळीं दुसरे कल्पक इंजिनियर पुढें आले व त्यांनीं 'रिव्हर्सिंग' सोडून त्याच्या ऐवजीं सरळ समोरचा रस्ता तयार करून दिला. अर्थातच या कृतीबद्दल त्यांच्यावरहि अभिनंदनांचा वर्षाव झाला. बदलत्या परिस्थितींत असे उलटसुलट चमत्कार होऊं शकतात. याच न्यायानें जहागिरीच्या संपादनाप्रमाणेंच जहागीर सोडून देणें हेंहि सद्यःकालीन परिस्थितीच्या चष्म्यांतून पाहिल्यास अभिनंदनीय ठरण्यास हरकत नाहीं! मात्र संस्थानिकांच्या जुलमांतून सुटून आपण सुराज्यांत येऊन पडलों असें वाटून जे या घटनेचें स्वागत करीत असतील, त्यांनीं दुसऱ्या बाजीरावासंबंधीं जो आजवर इतिहासकारांनीं अन्याय केला तो पुसून काढण्यासाठीं, दुसऱ्या बाजीरावाच्या अभिनंदनाचा एक ठराव केल्यास आपणांस आजच्या परिस्थितीमुळें न्याय मिळाला या विचारानें त्याच्या आत्म्यास समाधान वाटेल; कारण माल्कम-साहेबाच्या हातावर स्वराज्याचें उदक सोडून विलीनीकरणाचें पहिलें उदाहरण त्यानेंच घालून दिलें!

## दक्षिणेंत एक न्याय तर उत्तरेंत वेगळाच

कालांतरानें परिस्थितीची उलटापालट झाल्यामुळें परस्परविरुद्ध भासणाऱ्या घटना सारख्याच अभिनंदनीय ठरतात, हें आपण येथवर पाहिलेंच. पण कालाची जादुगिरी याच्याहूनहि अद्भुत आहे. वेगवेगळ्या काळीं, निराळ्या परिस्थितींत, उलटसुलट गोष्टी स्वागतार्ह ठरल्या तर त्यांत विशेष आश्चर्य मानण्याचें कारण नाहीं; परंतु एकाच काळीं एका प्रांतांत एका घटनेचें कौतुक केलें जात असतां त्याच वेळीं दुसऱ्या प्रांतांत त्या घटनेच्या विरुद्ध भासणारी घटनाहि कौतुकास्पद वाटावी आणि तिचें मोठ्या कडाक्यानें जाहीर अभिनंदन केलें जावें, हा चमत्कार नव्हे काय? पण असाच चमत्कार आजकाल घडत आहे. दक्षिणी संस्थानिकांनीं आपला गट करून संयुक्त पद्धतीनें आपापलीं संस्थानें राखण्याचा केलेला प्रयत्न त्याज्य ठरविण्यांत आला आणि त्यांनीं विलीनीकरणाला संमति दिली, याबद्दल त्यांच्यावर स्तुतिसुमनांचा वर्षाव झाला; त्याच वेळीं तिकडे उत्तरेस संस्थानिकांनीं आपले संघ बनवून नवे नवे प्रांत बनविले आणि आपली एकजूट करून संस्थानी परंपरा राखली याबद्दल ठिकठिकाणीं मोठ्या समारंभानें त्यांचें अभिनंदन करण्यांत येत आहे. इंग्रजींत ' एका माणसाचें जें अन्न तें दुसऱ्याचें विष ' ( One man's food is another man's poison ) अशी म्हण प्रचलित आहे. किंवा कालिदासानें ' विषमप्यमृतं क्वचिद्भवेदमृतं वा विषमीश्वरेच्छया ' असें जें म्हटलें आहे त्याचेंच या वेळीं प्रत्यंतर येत आहे. कारण जें घंसराज्य नर्मदेच्या

दक्षिण दिशेला घातक ठरतें तेंच नर्मदोत्तर भागांत उपकारक ठरतें. यांत आपली कांहीं दिशाभूल तर होत नाहींना, याचा विचार महाराष्ट्रियांनीं केलेला दिसत नाहीं.

### संस्थानांचा झालेला उपयोग

दुसऱ्या बाजीरावानें माल्कमसाहेबाच्या हातावर मराठी राज्याचें उदक सोडलें, ही घटना इतिहासजमा झाल्यानें तिच्या युक्तायुक्ततेचा विचार आज करणें हें जसें निरर्थक, तसेंच दक्षिणी संस्थानांचें विलीनीकरण इतक्यातच इतिहासजमा झाल्यानें त्याच्या युक्तायुक्ततेचा विचार करण्यालाहि आज कोणी उत्सुक नसल्यानें, तो विचार आम्ही सोडून देतों. पण ज्या संस्थानांच्या आश्रयाखालीं आपण कित्येक पिढ्या नांदलों व ज्या संस्थानिकांच्या स्वराज्यामुळें व सुराज्यामुळें आपणांस अनेक प्रकारचे लाभ घडले, त्या संस्थानिकांबद्दल कृतज्ञताबुद्धीनें शेवटची श्रद्धांजलि देणें येवढें तरी त्या त्या संस्थानांत नांदलेल्यांचें कर्तव्य नाहीं काय ? ज्यांच्या दुर्दैवानें खत्याळ संस्थानिकांच्या कारकीर्दींत आपत्ति भोगण्याचें नशीबीं आलें असेल त्यांनीं व्यक्तिशः या श्रद्धांजलींत वांटेकरी होऊं नये; परंतु संस्थानी राज्य म्हणजे कुराज्य असें समीकरण मांडणें सत्य नव्हे व युक्तहि नव्हे, असें आम्ही त्यांस सांगूं इच्छितों. येवढेंच नव्हे तर संस्थानें होतीं म्हणूनच अनेक सुधारणांचे प्रयोग संस्थानांत करून पाहून त्या सुधारणा ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या गळ्यांत बांधतां आल्या. किंबहुना स्वराज्याची भूक वाढविण्यास आणि स्वराज्य चालविण्याची पात्रता सिद्ध करण्यास संस्थानेंच उपयोगीं पडलीं. किती तरी नव्या उद्योगधंद्यांची वाढ होण्याला संस्थानांतील क्षेत्रच अनुकूल ठरलें. किर्लोस्करवाडी किंवा ओगलेवाडी संस्थानांतच उदयास येऊं शकली एवढें एक उदाहरण देखील नमुन्याकरितां म्हणून पुढें केल्यास पुरें होईल.

### कै. थोरले अप्पासाहेब यांचें उदार धोरण

असो. प्रस्तुतचा विषय तो नसल्यानें त्याचा पाल्हाळ करीत बसत नाहीं. पण ज्या संस्थानिकांच्या दूरदर्शीपणामुळें व उदार धोरणामुळें संस्थानांतील प्रजाजनांना विविध मार्गांनीं अलभ्य असा लाभ झाला त्यांनीं त्याविषयीं कृतज्ञता व्यक्त करणें, हें त्यांचें कर्तव्यच आहे. जमखंडी संस्थानांतील प्रजाजनांना कै. श्री. थोरले अप्पासाहेब यांच्या शिक्षणविषयक उदार धोरणामुळें जो लाभ झाला तो कल्पनातीत आहे. परशुरामभाऊ हायस्कुलांतून बिनखर्चीं शिक्षण मिळण्याची सोय झाली नसती तर, कै. विठ्ठल रामजी शिंदे यांच्यापासून तों आजमितीला सर परशुरामभाऊ कॉलेजांत मोफत शिक्षण घेत असलेल्या नव्या विद्यार्थ्यांपर्यंत जितके विद्यार्थी उच्च शिक्षण घेते झाले, त्यांतल्या किती विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाचा इतका लाभ घेतां आला असता ? हा एक ठळक दिसणारा लाभ म्हणून त्याचा उल्लेख केला. तसें पाहूं गेल्यास कै. श्रीमंत थोरले अप्पासाहेब हे जुन्या काळांतले राजे असून त्यांच्या अंगीं नव्या व जुन्या दोन्ही विद्यांविषयीं सारखाच अभिमान

JAN 1954

जागृत होता. त्यांनीं उभारलेलें रामतीर्थावरील वस्तुसंग्रहालय व पुस्तकसंग्रहालय अगदीं नमुनेदार होतें. वेद व शास्त्रें या प्राचीन विद्यांना त्यांनीं उत्तेजन दिल्यामुळें जमखंडी संस्थान हें वेदविद्येचें व शास्त्रांच्या अभ्यासाचें आगर झालें होतें. ज्या ज्या नव्या सुधारणा १९ व्या शतकांत इतरत्र अमलांत आल्या त्यांचा लाभ त्यांच्या प्रजाजनांना पूर्वींच मिळाल्याविना राहिला नाहीं. अलीकडच्या प्रजापरिषदांतून संस्थानिकांचा खाजगी खर्च वेगळा व नियमित असावा असे ठराव होत आले. पण थोरल्या अप्पासाहेबांनीं हा नियम आपल्या कारकीर्दीच्या प्रारंभापासून आपण होऊन अंगदीं कसोशीनें पाळला होता.

### पश्चात्तापाची पाळी न येवो !

अशा परंपरेचा लाभ ज्यांना मिळाला त्यांना आजमितीला तें संस्थान हिंदुस्थानच्या घटनेंत विलीन होत असल्यानें पूर्वपरंपरा त्रुटित झाल्यामुळें विषाद वाटणें साहजिक आहे. मात्र हा विषाद केवळ भावनात्मक नव्हे. ज्यांना संस्थानें विलीन व्हावींत अशी अगदीं आतुरता लागून राहिली होती, त्यांनाहि विलीनीकरणाचा अनुभव येऊं लागला व त्यांतलें सुख जाणवूं लागलें म्हणजे इसापनीतींतल्या बेडकांनीं राजा मागितल्यावर त्यांना जसा अनुभव आला तसाच अनुभव येऊं लागेल अशी भीति वाटते. तिचीं पूर्वचिन्हें आतांच दृग्गोचर होऊं लागलीं आहेत. भोर संस्थानांतले मंत्रि गोपिनाथपंत यांनीं संस्थानी नोकरांचें काय होणार, असा प्रश्न उपस्थित करून करुणा भाकली आहे. नोकरीचें काय होणार, हाहि प्रश्न विचारावा लागेलच. संस्थानांचें विलीनीकरण झाल्यावर जमखंडी हायस्कुलांतल्या फीचा व माधुकरी विद्यार्थ्यांचा प्रश्न पुढें आल्याशिवाय कसा राहील ? औंध संस्थानांतील अन्नवस्त्राची स्वावलंबनाची योजना कितपत टिकेल ? प्रत्येक संस्थानांतून असे अनेक प्रश्न पुढें येऊन ते डोकें भंडावून सोडतील आणि मग यांत आपण काय मिळविलें, असा विचार सुरू होईल.

तें कसेंहि असो; पण आजमितीला जी संस्थानी रियासत पंचत्व पावली आहे तिच्याबद्दल हळहळ वाटणें हें नैसर्गिकच आहे. त्यांतून ज्यांना त्या रियासतींत आंगाला चटके न बसतां उलट सुखानुभव घेतां आला आणि उत्कर्षाची पायरी चढतां आली, त्यांनीं तरी 'बरें झालें जुनेंपुराणें सोंग गेलें तें' असें कृतघ्नतेचे उद्गार न काढतां कृतज्ञतापूर्वक श्रद्धांजलि अर्पण करावी हेंच उचित होय.

भोर

# ब्राह्मणवर्गास महत्त्वाच्या सूचना : : : ७

## सध्याचें ब्राह्मणांवरील संकट

विपरीत देशकालपरिस्थितीमुळें सांप्रत भरतखंडांतील आखिल जनताच एकप्रकारच्या आपत्तींत सांपडली आहे; असें असतां त्यांत ब्राह्मण समाजानेंच आपल्यापुरता वेगळा विचार करण्याचें कारण काय, अशी शंका विचारली जाते. याला उत्तर असें कीं, सार्वत्रिक आपत्तीचा विचार सार्वजनिक सभांतून होत असतो व त्यांत ब्राह्मणांचाहि समावेश होतो. तथापि अशा सार्वजनिक आपत्तीखेरीज, केवळ ब्राह्मणवर्गाच्या म्हणून कांहीं विशिष्ट अडचणी आहेत व त्यांचा विचार ब्राह्मण समाजालाच पृथक्पणें करावा लागत आहे. उदाहरणार्थ, ब्राह्मणांना शक्यतोंवर नोकरींतून वगळावें आणि ब्राह्मण विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या मार्गांतहि अडसर घालून ठेवावे, असा उद्योग मद्रास प्रांतांत उघडपणें, इतरत्र प्रच्छन्नपणें, चालू आहे. विद्यार्थ्यांचे वार बंद झाले, माधुकरी लोपली, अन्नछत्रें बंद झालीं, या आपत्ति ब्राह्मणांनाच भोंवत आहेत.

अलीकडील विशिष्ट परिस्थितीमुळें खेड्यापाड्यांतून राहून उपजीविका करणें ब्राह्मणांना दुर्घट होत चाललें आहे. ही परिस्थिति कशी निवळेल आणि ब्राह्मणांना खेड्यांतून पुनश्च स्थायिक होऊन राहावयाचें असल्यास त्यांनीं आपल्या आचारविचारांत कोणती सुधारणा करावी आणि कोणते व्यवसाय करावे याचा विचार ब्राह्मण संमेलनासच करावा लागणार. आज अन्नधान्य व कापड यांची दुर्मिळता होत चालली आहे. ही दुर्भिळता सर्व वर्गांना नडत असली तरी, ब्राह्मणांच्या विशिष्ट राहणीमुळें, वेषभूषेमुळें, त्यांना ती अधिक नडत आहे. भोजन-सभारंभावरील संख्येच्या मर्यादेनें पुरोहित वर्गाची जेवढी हानि होत आहे तेवढी कांहीं इतर वर्गांची झालेली नाहीं. हे व असेच अनेक प्रश्न आहेत कीं यासाठीं ब्राह्मण संमेलन भरविणें व ब्राह्मणांसाठीं मार्गदर्शन करणें अवश्य झालें आहे.

## ब्राह्मणांच्या मनांतील शंकाकुशंका

आपत्काळांत ब्राह्मण आजवर अनेक धंदे करीत आले व सध्यांहि करीत आहेत; पण त्यांत दोष मोठा हा कीं, आपण जगूं काय यांत मोठें पाप करतों आहों, अशी रुखरुख त्यांच्या मनास डाचत असते. पापाचरण हातून घडूं नये म्हणून, मनाला रुखरुख वाटत असणें हें सच्छीलाचें लक्षण आहे; पण पापाची निष्कारण भीति मनांत धरून कोणताहि व्यवहार करीत राहिल्यास तो व्यवहार सफळ व लाभदायक होत नाहीं. यास्तव ही रुखरुख मनांतून काढून टाका, असें सांगण्याचा

( महाराष्ट्र ब्राह्मण संमेलन, पुणें : दि. २८ व २९ एप्रिल १९५१ )

प्रस्तुतचा उद्देश आहे. महाभारतकाळीं आणि मनुस्मृतिकाळींहि ब्राह्मण अनेक धंदे करीत होते. मनुस्मृति सांगते कीं,

अजीवंस्तु यथोक्तेन ब्राह्मणः स्वेन कर्मणा ।
जीवेत् क्षत्रियधर्मेण सह्यस्य प्रत्यनन्तरः ॥
उभाभ्यामप्यजीवंस्तु कथंस्यादिति चेद्भवेत् ।
कृषिगोरक्षमास्थाय जीवेद्वैश्यस्य जीविकाम् ॥

या वैश्यवृत्तीला कित्येक अपवाद सांगितले आहेत. त्या सगळ्यांची चर्चा येथें करणें अशक्य आहे. त्यांतलें तात्पर्य एवढेंच कीं, जेणेंकरून आपल्या मनाला हीन संस्कारांचा लेप होईल असे व्यवसाय करूं नयेत. शुद्ध मनानें, सदाचारानें, प्रामाणिकपणें जे व्यवहार करतां येतील ते सर्व करावे.

मनुस्मृति पुनश्च असें सांगते कीं ( अ. १०–१०२–१०४ ),

सर्वतः प्रतिगृह्णीयात् ब्राह्मणस्त्वनयं गतः ॥
पवित्रं दुष्यतीत्येतद्धर्मतो नोपपद्यते ॥ १०२ ॥
जीवितात्ययमापन्नो योऽन्नमत्ति यतस्ततः ॥
आकाशमिव पंकेन न स पापेन लिप्यते ॥ १०४ ॥

ब्राह्मण प्राचीन काळीं कोणकोणते धंदे करीत होते याची यादीच महाभारतांत दिली आहे. त्या यादीहून अधिक विस्तार करण्याची आजहि जरुरी नाहीं.

सद्यःस्थितींत ब्राह्मणांनीं स्वतः कृषि करण्याचें टाकून देऊन आपली जमीन गमावण्यापेक्षां कृषि करणेंच त्यांना स्वतःला आणि ब्राह्मण समाजाला श्रेयस्कर आहे. कोंकणांत पूर्वी ब्राह्मण शेती सर्वत्र करीत असत. शहाजी महाराजांनीं तंजावर प्रांतांत गेल्यावर तिकडे २० हजार महाराष्ट्रीय आपल्याबरोबर नेले. त्यांत बहुसंख्य मराठे असले तरी पुष्कळच ब्राह्मण होते. त्यांनीं त्या प्रांतांत उत्तम शेती करून तो प्रांत सुपीक केला, असें कर्नाटकच्या इतिहासांतच वर्णन आहे. परावलंबन, लाचारी आणि इतर हलके धंदे यांपेक्षां कृषिकर्म कितीतरी पटीनें श्रेष्ठ असल्यानें ज्या ब्राह्मणांना तें शक्य असेल त्यांनीं केवळ कल्पित दोषाच्या भीतीनें कृषिकर्म टाकून देऊं नये.

इतर उद्योगधंदे तर ब्राह्मणवर्गानें आतां जणूं काय सहजधर्म अशा बुद्धीनेंच अंगीकारले आहेत. सरकारी नोकरीचीं द्वारें अनेक कारणांमुळें ब्राह्मणांना प्रतिबंधक होत असल्यामुळें, अशा नोकरीचा नाद सोडून इतर व्यवसायांकडे वळा, असें सांगण्याची गरजच राहिली नाहीं. उलटपक्षीं आतां अमुक धंदे ब्राह्मणत्वाच्या संस्काराला विरोधी आहेत, यास्तव ते करूं नयेत, असें सांगण्याचाच प्रसंग येऊन ठेपत आहे ! अशा उलटसुलट प्रचारामुळें ब्राह्मणांचीं मनें भांबावून जातात. याकरितां त्यांना निश्चित मार्गदर्शन केलें जावें, हाच या लेखाचा उद्देश आहे.

## एवढे तरी संस्कार पाळा

ब्राह्मणांनीं सद्यःस्थितींत किती संस्कार पाळावे हाहि विचाराचाच प्रश्न आहे. प्राचीन काळीं रूढ असलेले सर्व संस्कार आज पाळतां येणें अशक्य असल्यानें त्यांच्या आवश्यकतेसंबंधानें वाद करणें अप्रस्तुत आहे. किमानपक्ष कोणते संस्कार पाळले असतां ब्राह्मण समाजांत असल्याची ती खूण समजावी या दृष्टीनेंच प्रस्तुत या प्रश्नाचा विचार करणें प्राप्त आहे.

१ गर्भाधान ( योग्यकालीं अथवा कालान्तरित, ) २ उपनयन, ३ विवाह हे तीन संस्कार आणि ते वेदसूत्रोक्त पद्धतीनें, शास्त्रोक्त रीतीनें, ब्राह्मण घराण्यांत चालू असले पाहिजेत. म. ब्रा. सभेच्या सभासदत्वाची जी प्रवेशपत्रिका आहे, ती भरून देतांनाच असा लेख द्यावा लागतो कीं, "मी ब्रह्मकुलोत्पन्न ब्राह्मण आहें. ब्राह्मणांचे शास्त्रविहित असे उपनयनादि संस्कार व नित्यनैमित्तिक आचार मला मान्य आहेत." यांत 'उपनयनादि' असे शब्द आहेत. त्यांतील आदि शब्दानें 'गर्भाधान' व 'विवाह' विवक्षित आहेत.

पूर्वी गर्भाधान संस्कार प्रथम रजोदर्शनानंतर १६ दिवसांच्या आंत होत असे. अलीकडील कायदे व रूढि या दोहोंमुळें प्रथम रजोदर्शन विवाहापूर्वींच झालेलें असतें. यास्तव तो संस्कार विवाहानंतर केव्हांहि सोयीप्रमाणें करावा, मात्र तो पहिल्या प्रसूतीपूर्वी केला जावा. मुलांच्या उपनयनाचा काल शास्त्रोक्त पाळला जात नसला, तरी अद्यापि या संस्कारांत भीतिजनक चालढकल अजून सुरू नाहीं. अपवाद असले तरी मूळ नियम सिद्ध होण्याइतपतच अपवाद आढळतात. तथापि अपवाद हाच नियम आणि नियम हाच अपवाद अशी उलटापालट न होईल अशी दक्षता घेण्याची वेळ आतां आली आहे. यास्तव ब्राह्मण बटूंचें उपनयन झालें आहे कीं नाहीं, याकडे लक्ष देऊन त्याची चौकशी करावी; आणि जेथें उपनयन झालें नसेल तेथें सामुदायिक उपनयनांत तें उरकून घ्यावें.

विवाहाची प्रवृत्ति नैसर्गिक असल्यानें त्यासंबंधांत कोणाला दुसऱ्यानें सांगण्याची गरज नसते; तथापि विवाह नोंदणीपद्धतीनें न करतां वैदिक पद्धतीनें अग्निसाक्ष झाला तरच त्याची गणना संस्कारांत करतां येईल. यास्तव ब्राह्मण समाजांत नोंदणी-विवाहाचें बंड वाढत जाणार नाहीं अशाविषयीं दक्षता घ्यावी.

मुलाच्या विवाहाची तितकीशी अडचण भासत नाहीं; परंतु सध्यां सुशिक्षित व शहरवासी कुटुंबांत मुलींचे विवाह जुळणें मोठ्या जिकीरीचें झालें आहे. त्यांतून ती मुलगी रूपानें सुमार आणि शिक्षणांत मागासलेली असल्यास मग तर पालकांच्या हालास सीमाच राहत नाहीं. यामुळें पूर्वी कधीं प्रचारांत नसलेला वृद्धाकुमारीचा प्रश्न ब्राह्मण समाजांत उपस्थित होऊं लागला आहे! पालकांनीं अथवा वयांत आल्यावर स्वतः वधूनेंहि प्रयत्न करून देखील जर विवाह नच जुळेल, तर ती मुलगी आजन्म संस्कारहीनच राहील, त्याला इलाज नाहीं. अशी मुलगी

4 SEP 1996


निरुपायानें वृद्धा-कुमारीच राहिल्यास त्यासंबंधांत त्या पालकास किंवा त्या कुटुंबास पतित मानण्याचें कारण नाहीं. या संबंधांतला प्राचीन स्मृतींतला निषेध सद्यःस्थितींत लागू नाहीं; असें समजून त्या कुटुंबाला कोणत्याहि प्रकारें हीन समजण्यांत येऊं नये. हा फरक कालकृत असल्यानें त्याला व्यक्ति जबाबदार धरणें युक्त नव्हे. अशा मुलींनीं स्वावलंबनानें उपजीविका करतां येईल असें शिक्षण घेऊन मातापित्यांच्या देखरेखीखालीं जीवनचर्या चालवावी.

### नित्यनैमित्तिक आचार

ब्राह्मणांचे नित्यनैमित्तिक आचार इतके सांगितले गेले आहेत कीं, ते सर्व आचार पाळूं म्हटल्यास रोजचा दिवस आणि सगळें आयुष्यहि त्यास पुरें पडणार नाहीं. यास्तव ज्यानें त्यानें आपल्या परंपरेला व कुलाचाराला अनुसरून सद्यःस्थितींत शक्य, इष्ट आणि व्यष्टिदृष्ट्या व समष्टिदृष्ट्या श्रेयस्कर असतील तेवढे आचार पाळले पाहिजेत. कुटुंबांतील प्रत्येक व्यक्तीकडून इतके आचार पाळले जाण्याची अपेक्षा न धरतां कुटुंबांतील चालकांनीं तरी ते पाळावे.

आश्रम तत्त्वतः चार असले तरी व्यवहारतः गृहस्थाश्रम हाच चारी आश्रमांतला मुख्य मेढा आहे. सामाजिक सुस्थितीच्या दृष्टीनें इतर तीनहि आश्रम गृहस्थाश्रमावर अवलंबून आहेत, म्हणून ज्या समाजांतील गृहस्थाश्रम सुव्यवस्थित चालेल तो समाज सुस्थितींत राहील. अर्थातच ब्राह्मण्यरक्षणाची मुख्य जबाबदारी गृहस्थाश्रमीयांनीं कशी पार पाडावी याचा विचार करणें आवश्यक आहे. समाजधर्म, आचार आणि संस्कृति या सर्व गोष्टी गृहस्थाश्रमी वागणुकीवर अवलंबून आहेत. यास्तव आपली संस्कृति अबाधित राखावयाची असेल, तर गृहस्थाश्रमी मंडळींनीं आपली ही जबाबदारी ओळखली पाहिजे.

पूर्वीच्या काळांत ब्रह्मचर्याश्रम हा सर्व संस्कृतीचा व आचारधर्माचा पाया असे. तो भक्कम असल्यानें गृहस्थाश्रमावर मोठी जबाबदारी नसे. आतां ब्रह्मचर्याश्रमांत पायाभरणीच होत नसल्यानें गृहस्थाश्रमावर पायाभरणीपासूनची सर्व जबाबदारी पडत आहे. याचाच अर्थ स्पष्ट करून सांगितल्यास आपणांस तें चमत्कारिक वाटेल; परंतु अशी परिस्थितीच आली आहे कीं, पूर्वी उपनयन होतांच संध्या, पूजा इत्यादि शिकवीत असत. आतां गृहस्थाश्रम स्वीकारल्यावर ज्या ब्राह्मणाला संध्या व पूजा येत नसेल त्यांनीं ती या आश्रमांत पाऊल टाकल्यावर शिकून घ्यावी आणि गृहस्थाश्रमांत आपले आचारधर्म पाळावे.

नोकरी, उद्योगधंदे, फिरते व्यवसाय इत्यादिकांमुळें गृहस्थाश्रमांत ब्राह्मणाचे सगळे आचारधर्म पाळतां येत नसल्यास शक्य तितके पाळण्याची कोशीस करावी. वेळ मिळत नाहीं, ही सबब तितकीशी खरी नसते. ज्या गोष्टींची मनापासून आवड असते, त्या गोष्टीला वाटेल तसा वेळ काढतां येतो. सिमल्याच्या थंडींत आणि कामाच्या गर्दीतहि प्रातःस्नान व उपासना बिनचूक चालविणारे सद्गृहस्थ

अनेकांना माहीत आहेत. विलायतचा व युरोपचाहि प्रवास करतांना श्री. गणपतराव मराठे यांनीं स्नान व संध्या न चुकविल्याचें त्यांच्या 'विलायत-विहार' पुस्तकांत नमूद आहे. सारांश, जेथें इच्छा असते तेथें मार्ग सांपडतो. यास्तव ब्राह्मणांनीं अशी तीव्र इच्छा बाळगावी.

ब्राह्मणांचा आचार राखतां येत नाहीं म्हणून कित्येक धंदे करण्याचें नाकारून आपलें आर्थिक नुकसान करून घेणारे आचारनिष्ठ ब्राह्मण आपणांस माहीत आहेत. तसेंच धंद्याच्या पाठीस लागल्यामुळें आपले आचार सर्वथैव टाकून देणारे अर्थनिष्ठ ब्राह्मणहि आपणांस माहीत आहेत. आतां आम्हांला केवळ आचारनिष्ठ किंवा केवळ अर्थनिष्ठ ब्राह्मण नकोत. आम्हांस आचार व अर्थ यांचा समन्वय करणारे उभयनिष्ठ ब्राह्मण म्हणजे सव्यसाची ब्राह्मण हवे आहेत.

पूर्वीप्रमाणें आतां ब्राह्मणवर्ग हा राज्यकर्त्यांकडून पोसला जाऊं शकत नाहीं. यास्तव ब्राह्मण समाज हा संसार चालविण्याच्या कामीं आत्मनिष्ठ, स्वावलंबी झाला पाहिजे. याकरितां अर्थ संपादन करणें हा ब्राह्मणाचा धर्म नव्हे असें म्हणून चालवावयाचें नाहीं; परंतु ब्राह्मण समाजहि जर केवळ अर्थनिष्ठ झाला, तर समाजांतील संस्कृतीचा आणि आचाराचा आदर्श कोठें पाहावयास मिळावयाचा ? यासाठीं ब्राह्मणांतच ही कामाची वांटणी केली जावी आणि ब्राह्मण समाजांतील अर्थश्रेष्ठींनीं धर्मश्रेष्ठींच्या धारणपोषणाची जबाबदारी आपल्यावर घेतली पाहिजे.

## पुरोहितवर्गास सूचना

पुरोहितवर्गानेंहि सध्यांची परिस्थिति ओळखून अधिक दक्ष, कर्तव्यनिष्ठ आणि अधिक उद्योगी झाले पाहिजे. केवळ पौरोहित्याचा धंदा करून संसार चांगल्या रीतीनें चालविणें संभवनीय नाहीं हें जाणून, त्या वर्गानें आपल्या पौरोहित्याला बाध न येईल असे कांहीं तरी जोडव्यवसाय केले पाहिजेत. शिक्षक, वैद्यक, ज्योतिष असे धंदे आपल्या व्यवसायास पूरक म्हणून त्यांना करतां येतील.

उदारणादाखल म्हणून एक निर्देश करतों. महाराष्ट्राबाहेर अनेक महाराष्ट्रीय व्यवसायानिमित्त जाऊन राहिलेले आहेत. त्यांना दुहेरी अडचण भासते. त्यांच्या लहान मुलामुलींना मातृभाषेंतून शिक्षण देण्याची त्या त्या प्रांतांत सोय नसते. तसें शिक्षण देण्याची सोय करण्यासाठीं ते खर्च सोसण्यास तयार असतात. तथापि तेवढ्या खर्चात त्यांना शिक्षक मिळत नाहींत. त्याचप्रमाणें बृहन्महाराष्ट्रांत राहणाऱ्या महाराष्ट्रीय कुटुंबांतून नित्यनैमित्तिक धर्म व व्रतें-वैकल्यें करण्याची इच्छा असून देखील त्यांना पुरोहित मिळत नाहींत. इकडील पुरोहितवर्गास हें सांगितलें तरी अशा अनिश्चित प्राप्तीच्या भरंवशावर तें दूर जाण्यास तयार होत नाहींत. यास्तव त्यांस अशी सूचना आहे कीं, पुरोहितवर्गानें मातृभाषेंतून चार वर्षांच्या अभ्यासाइतकें शिक्षण देण्याची तयारी दर्शविल्यास त्यास नित्याचा व्यवसाय म्हणून बृहन्महाराष्ट्रांत शिक्षकाचा धंदा करतां येईल व त्याचबरोबर

पौरोहित्य करतां येईल. अशा दुहेरी व्यवसायावर त्यांचा कुटुंबनिर्वाह होऊं शकेल आणि बृहन्महाराष्ट्रियांची मातृभाषेंतून शिक्षण देण्याची आणि आचारधर्म पाळण्याची नड दूर होऊन त्यांची महाराष्ट्रीय संस्कृति स्थिर राहील.

### परप्रांतांत जाण्याची तयारी

यासंबंधांत महाराष्ट्रीय ब्राह्मणांना अशी सूचना करणें अवश्य वाटतें कीं, त्यांनीं आतां परप्रांतांत जाऊन राहण्याची तयारी दाखविली पाहिजे. महाराष्ट्रांत कुचंबत राहण्यापेक्षां जेथें जेथें आपले महाराष्ट्रीय गृहस्थ उद्योगधंद्यासाठीं अथवा नोकरीसाठीं जातील तेथें तेथें पुरोहितवर्गानेंहि यथाप्रमाण त्यांच्या मागोमाग जाण्यास तयार व्हावें. प्रवासविमुखतेमुळें पुरोहितवर्गाचें आर्थिक नुकसान होतें आणि परप्रांतांत वा परदेशांत जाणारे महाराष्ट्रीय महाराष्ट्रीय संस्कृतीला पारखे होतात. हें दुहेरी नुकसान टाळून उभयतांचाहि फायदा होण्याच्या मार्गाचा आपण विचार करून असे संबंध जुळवून आणण्यासाठीं कांहीं तरी योजना केली पाहिजे.

### ब्राह्मणांचें इतर वर्णांशीं वर्तन

ज्या पूर्वीच्या वचनांचा व समजुतींचा सध्यांच्या काळांत काडीमात्र उपयोग नाहीं, एवढेंच नव्हे तर ज्यांच्यामुळें इतर वर्णांचा ब्राह्मणांवर रोष होतो असल्या समजुती उराशीं बाळगून व त्या बोलून दाखवून ब्राह्मण आपणांवर निष्कारण आपत्ति ओढून घेत आहेत. समाजांतील सर्व वर्ण परस्परावलंबी असल्यानें त्यांतील कोणताहि वर्ण श्रेष्ठ नाहीं व कोणताहि कनिष्ठ नाहीं. सर्व वर्ण मिळून जर एक समाज बनला आहे व त्यांतला प्रत्येक वर्ण जर इतरांच्या सहकार्याशिवाय राहूं शकत नाहीं, तर ब्राह्मणांनीं इतर वर्णांना कमी लेखून आपल्यावर त्यांचा राग कां ओढून घ्यावा ?

ज्ञान, रक्षण, धन व सेवा या चार कर्तव्यांतहि कोणतेंहि एक सर्वश्रेष्ठ म्हणतां येत नाहीं. कारण परिस्थितीनुरूप ज्याला त्याला महत्त्व येतें. त्यांतल्या-त्यांत महत्त्व द्यावयाचेंच झालें, तर समाजरक्षणाला अधिक महत्त्व द्यावें लागेल व त्या दृष्टीनें महाभारतकाळीं क्षत्रियाला श्रेष्ठत्व आलें होतें.

सर्वा विद्या राजधर्मेषु युक्ताः ।
सर्वे लोका राजधर्मे प्रविष्टाः ॥
तस्माद्धर्मो राजधर्माद्विशिष्टो ।
नान्यो लोके विद्यतेऽजातशत्रो ॥
शेषाः सृष्टा ह्यन्तवन्तो ह्यनंताः ।
सुप्रस्थानः क्षात्रधर्मो विशिष्टः ॥
अस्मिन् धर्मे सर्वधर्माः प्रविष्टाः ।
क्षात्रं धर्मं श्रेष्ठतमं वदन्ति ॥

11 JAN 1994

अशा प्रकारें क्षात्रधर्माचें श्रेष्ठत्व वर्णिलें आहे. तसेंच –

अंगमेतन्महाराज धनिनो नाम भारत ।
ककुदं सर्वभूतानां धनस्थो नात्र संशयः ॥

या शब्दांत वैश्यवर्गाचें श्रेष्ठत्वहि वर्णिलें आहे. आणि सेवावृत्तीचें अपरिहार्यत्व व सर्वोपयुक्तत्व व स्वतःसिद्धच आहे. सारांश, समाजांत प्रत्येक वर्णाला इतर सर्वांची गरज असल्यानें सर्वांनीं सर्वांशीं गुण्यागोविंदानें व प्रेमानें बंधुभाव धरून वागावें. सध्यांच्या काळांत तर ब्राह्मणांनीं आपली आढ्यता सोडून लीनतेनें वागण्यांतच त्यांचें व सर्व समाजाचें कल्याण आहे.

इतर वर्ण ब्राह्मणांना मानीत नाहींत ही तक्रार खरी असली, तर तिचें मूळ कारण हें आहे कीं, ब्राह्मणांनींच इतर वर्णांचे अधिकार मानण्याचें सोडून दिलें आणि आपलें अध्यापन, यजन व प्रतिग्रह याचें क्षेत्र संकुचित करून आपलेंच नुकसान करून घेतलें. आधीं ब्राह्मणांनीं ब्राह्मणेतरांना दूर लोटलें म्हणून आतां ब्राह्मणेतर ब्राह्मणेतरांना दूर लोटूं पाहत आहेत. तथापि ही दुर्वृत्ति सार्वत्रिक झाली नाहीं तोंपर्यंत ती सुधारण्याची आशा आहे. ब्राह्मणवर्ग जर ब्राह्मणेतरांशीं प्रेमानें, बंधुभावानें, सहकार्यानें वागूं लागेल, तर तशा वागणुकीचा सुपरिणाम झाल्याविना राहणार नाहीं.

### झिजल्यावांचून प्रतिष्ठा नाहीं

मानव प्राणी असो, जीवजंतु असो, किंवा इतर कोणतीहि वस्तु असो तिचा जोंपर्यंत समाजास कोणत्या ना कोणत्या प्रकारें उपयोग आहे तोंपर्यंतच तिला जगण्याचा हक्क आहे. हाच सामान्य न्याय ब्राह्मण व्यक्तींनाहि लागू आहे. अर्थातच जोंपर्यंत, खेड्यांत असो वा शहरांत असो, ब्राह्मण व्यक्तीपासून समाजाचें कांहीं तरी कल्याण साधत असेल, त्याच्या अभावीं कांहीं तरी अडून राहत असेल, तोंपर्यंत ब्राह्मणांच्या अस्तित्वाला धोका येण्याचा संभव नाहीं. यास्तव व्यक्तिमात्रानें आपण समाजाच्या उपयोगी कोणत्या मार्गानें पडूं तें पाहून तदनुरूप समाजाचें कार्य करीत राहिलें पाहिजे. अज्ञ व असहाय स्थितींतील समाजाला हरएक प्रकारच्या साहाय्याची अपेक्षा असते. ती अपेक्षा जागून, ती पूर्ण करण्याची पात्रता आपल्या अंगीं आणून, स्वतःच्या ज्ञानाची व शीलाची पातळी वाढवून, निःस्वार्थीपणानें ब्राह्मणवर्ग जर समाजाच्या सामुदायिक कार्यांत समरस होईल, तर त्याला समाजाच्या अंतरंगांत खात्रीनें स्थान मिळेल. ब्राह्मणवर्गानें इतका आत्मप्रत्यय मिळविला पाहिजे आणि निरलसपणानें, कळकळीनें नव्या नव्या कल्पना काढून समाजाच्या हिताचीं अनेक कार्यें उभारून व समाजास पटवून देऊन त्याच्या सहकार्यानें तीं तडीस नेलीं पाहिजेत. या गोष्टी ज्यानें त्यानें आपल्या भोंवतालची परिस्थिति ओळखून करावयाच्या आहेत. एकच नियम व एकच मार्ग सर्वत्र सारखा लागू पडत नाहीं. यास्तव तपशील सांगण्याचें कारण नाहीं व तो

सांगून कधीं संपावयाचा नाहीं. तो ज्यानें त्यानें स्वतः जाणून घेतला पाहिजे. याकरितांच शास्त्राचार्यहि शेवटीं असेंच सांगतात कीं, 'न हि सर्वं विधीयते' (सर्वच विधिनियम आंखून देतां येत नाहींत).

तथापि सूत्ररूपानें कांहीं सामान्य सूचना सांगतां येतील. 'जिव्हेपाशीं आहे सूत्र' असें समर्थ सांगतात. एक जीभ चांगली राखली म्हणजे कोणीहि वश होतो.

झिजल्यावांचूनि कीर्ति कैंची। मान्यता नव्हे की फुकाची।
जिकडे तिकडे होते छी छी। अवलक्षणें ॥
जंववरी चंदन झिजेना। तंववरी तो सुगंध कळेना ॥
दुसऱ्याच्या दुःखें दुखावें। दुसऱ्याच्या सुखें सुखावें।
अवघेचि सुखी असावें। ही वासना ॥

या उपदेशानुसार समाजाच्या हितासाठीं स्वतः कष्ट सोसून झिजण्याची तयारी असल्याविना ब्राह्मणास बहुजनसमाजांत मान मिळणार नाहीं. सध्यांच्या काळीं तर जनतेची सर्वच प्रकारची दैना आहे. अशा परिस्थितींत सार्वजनिक कार्याचे डोंगर पुढें उभे असतां समाजकार्याची उणीव नसून कार्यकर्त्यांची उणीव आहे. यास्तव ब्राह्मणांनीं आळस झाडून आणि समाजापासून फटकून एकलकोंडेपणानें वागण्याची वृत्ति टाकून देऊन समाजांत मिळूनमिसळून पुढाकार घेऊन कार्याची धुरा वाहिल्यास त्यास अनुयायांची वाण पडणार नाहीं.

## ब्राह्मण धनिकांस विनंती

ब्राह्मण धनिकांनीं आपल्या देणग्यांचा ओघ आतां ब्राह्मण समाजांतील अध्ययन, अध्यापन कसें वाढेल आणि ब्राह्मणांचें पाऊल उद्योगधंद्यांत व व्यवसायांत पुढें कसें पडेल आणि ब्राह्मणांतील शील व संस्कृति कशी टिकेल हें साधण्याकडे उपयोगांत आणावा. ज्यांना मुलेंबाळें नसतील, त्यांनीं दत्तकाच्या भानगडींत न पडतां एखाद्या संस्थेला आपली संपत्ति देऊन टाकून ती संस्थाच दत्तक घ्यावी. मुलेंबाळें असणाऱ्यांनीं देखील आपली सगळीच इस्टेट मुलाबाळांकरितां राखून ठेवून त्यांना ऐदी व ऐषारामी बनवूं नये. त्यांच्या व्यवसायाला जरूर तेवढी रक्कम त्यांच्या नांवें ठेवून बाकीच्या प्राप्तीचा उपयोग सार्वजनिक कामाकडे करावा.

ज्या संस्था सरकारच्या देणग्यांतून अगर मदतीच्या आधारानें चालणाऱ्या आहेत त्यांचीच धन करण्याकडे अथवा तसल्याच संस्था स्थापण्याकडे आपला पैसा गुंतवूं नये. उदाहरणार्थ, प्राथमिक शिक्षण, दुय्यम शिक्षण व उच्च शिक्षण यांच्या संस्था. आतां आपलेंच सरकार झाल्यानें, त्या सरकारमार्फत चालविल्या जातीलच; परंतु धार्मिक शिक्षण, सांस्कृतिक शिक्षण, कीर्तनप्रवचनादि विद्यांचें शिक्षण देणाऱ्या संस्था सध्यांचें निधर्मी सरकार चालवूं इच्छित नाहीं. यास्तव ब्राह्मण धनिकांनीं आपल्या द्रव्याचा ओघ असल्या संस्थांकडे वळवावा. संस्थानें

विलीन झाल्यामुळें, त्या संस्थानांतून चालविल्या जाणाऱ्या वेदशास्त्रादिकांच्या पाठशाळा बंद पडल्या आहेत, त्यांचें पुनरुज्जीवन करण्याकडे ब्राह्मण धनिकांनीं लक्ष पुरवावें.

नव्या निधर्मी सरकारांतून केवळ ब्राह्मणांकरितां शिष्यवृत्त्या अगर नादाऱ्या दिल्या जात नाहींत व तशा अटीवर देणग्याहि स्वीकारल्या जात नाहींत. याकरितांच ज्यांना ब्राह्मण विद्यार्थ्यांकरितांच शिष्यवृत्त्या व नादाऱ्या यांची सोय करावयाची असेल त्यांनीं आपल्या देणग्या स्वतंत्र ट्रस्ट करून त्याच्या स्वाधीन कराव्या. नाहीं तर त्या देणग्यांचा उपयोग देणगीदाराच्या हेतूला अनुसरून केला जाणार नाहीं. यास्तव आपला हेतु साधण्याकरितां ब्राह्मण सभा व त्यांच्या शाखा यांच्यामार्फतच स्वतंत्र व्यवस्था करावी.

शिष्यवृत्त्या देऊन विद्यार्थी तयार केले व पुढें त्यांस हातचें सोडून दिलें तर आपण पूर्वी केलेली मदत फुकट जाते. यास्तव जे विद्यार्थी पुढें विशिष्ट विषयावर ग्रंथलेखन करतील, अध्यापनद्वारां शिष्यशाखा चालवितील, धर्मकार्याचा प्रचार करतील अशांच्या निर्वाहाची सोय आपण एखाद्या मोठ्या निधींतून केली पाहिजे. यासंबंधांत रामकृष्ण मिशन व आर्य समाजाचीं गुरुकुलें यांचें कार्य अनुकरणीय आहे. रामकृष्ण मिशनमार्फत शिक्षण चालतें, प्रचारक तयार होतात, ग्रंथ प्रसिद्ध होतात आणि ठिकठिकाणीं मिशनच्या शाखा स्थापन करून त्यांच्यामार्फत सार्वजनिक कार्यें करून अखिल समाजाची सहानुभूतिहि संपादन करण्यांत येते. यास्तव आपणहि आपल्या देणग्यांतून अशा प्रकारचें सर्वांगीण शिक्षणाचें कार्य होईल अशी सुव्यवस्था केली पाहिजे.

### स्त्रियांच्या कार्याचा विचार

सद्यःस्थितींत ब्राह्मण समाजाची स्थिति सुधारण्याच्या बाबतींत स्त्रियांच्यावर पुष्कळच जबाबदारी येऊन पडत आहे. घरांतील आचारविचार, संस्कृति, शील व पावित्र्य राखण्याचें कार्य स्त्रियांच्या दक्षतेशिवाय होऊं शकणार नाहीं. घरांतील मुलांच्यावर देखरेख ठेवणें व त्यांना चांगलें वळण लावणें हें पित्यास शक्य नसून मातेसच शक्य आहे. यास्तव मातांनीं स्वतः सुसंस्कृत होऊन मुलांना सुसंस्कृत करावें.

खेडेगावांतील ब्राह्मण कुटुंबांतील स्त्रियांनीं लोकप्रीति मिळविण्यासाठीं झीज सोसल्यास स्त्रियांची एकी पुरुषांच्यापेक्षां लवकर होऊं शकेल आणि त्या एकीचा आपत्काळीं पुरुषांताहि उपयोग होऊं शकेल. स्त्रियांनीं जीं व्रतें करावयाचीं त्यांना आतां समजोपयुक्ततेचें वळण लावलें पाहिजे. ज्या व्रताचरणापायीं खर्च झालेल्या वस्तूंचा कोणासच लाभ नाहीं असल्या व्रताचरणांत फुकट खर्च करूं नये. व्रतानिमित्त खर्च करण्यांत कंजूषपणा करावा असा याचा अर्थ नसून, जो पैसा खर्च झाला तो कोणाच्या तरी उपयोगीं पडला पाहिजे. त्यांतल्यात्यांत ज्याचा फायदा

तात्पुरता होतो अशा प्रकारचा व्यय करण्यापेक्षां ज्याचा फायदा दीर्घकाळ टिकेल अशी योजना करणें हितावह होय.

ब्राह्मण स्त्रियांनीं दुसरी महत्त्वाची गोष्ट ही लक्षांत वागवावी कीं, सध्यांच्या महर्घतेच्या काळांत निष्कारण शोभेचे चोजले करण्याचा हट्ट न धरतां त्या बाबतींत काटकसर करून मुलामुलींच्या ज्ञानांत भर पडेल आणि त्यांना चांगलें वळण लागेल अशा कामीं तेच पैसे लावावे. शोभेच्या दारूकामांत शंभर रुपये उडवून टाकण्यापेक्षां त्याच शंभर रुपयांतून उत्तम उपयुक्त पुस्तकें घेऊन मुलांमुलींस दिल्यास त्यांच्या मनावर चांगले संस्कार होतीलच, पण त्याशिवाय अशा ग्रंथांच्या लेखकांस उत्तेजन मिळून समाजांत असे ग्रंथकार अधिकाधिक पुढें येतील हा अप्रत्यक्ष फायदा होय.

याशिवाय स्त्रियांनीं आपला वेळ आळसांत न दवडतां शिवणटिपणादि कांहीं उपयुक्त कार्य केल्यास तेवढीच कुटुंबाच्या पोषणांत भर पडेल. कुटुंबाच्या पोषणाचा सगळाच भार पुरुष-वर्गावर पडणें हें मध्यम व कनिष्ठ स्थितींतल्या कुटुंबांत उचित नव्हे. सुदैवानें ज्यांच्यावर असली जबाबदारी नाहीं अशा सुस्थितींतल्या स्त्रियांनीं गरीब स्थितींतील स्त्रियांना कांहीं उपयुक्त कलांचें शिक्षण देण्याचे वर्ग आपल्या खर्चानें चालवून त्यांत शिक्षण घेणाऱ्या स्त्रिया स्वावलंबी होतील अशी तजवीज केल्यास तें समाजाचें मोठें कार्य होईल. अडलेल्या माणसास तात्कालिक आपत्ति दूर करण्याकरितां रोख मदत कित्येक प्रसंगीं करावी लागते, तेव्हां तें करण्याचें धनिकांनीं टाळूं नये. पण त्यापेक्षां अडचणींत सांपडलेल्या माणसाला स्वावलंबनानें त्यांतून बाहेर पडतां येईल असा मार्ग दाखविण्याकडे व तसें शिक्षण देण्याकडे खर्च केलेला पैसा समाजाचें अधिक शाश्वत हित करतो.

समाप्त

JAN 1994.
4 JAN 1985

